TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

# श्रीकृष्णचरित्र-रहस्य

★

शंकर गोपाळ वैसास

UNIVERSAL LIBRARY
OU_196111
UNIVERSAL LIBRARY

# श्रीकृष्णचरित्र-रहस्य

शंकर गोपाळ घैसास
सेवानिवृत्त प्रधान-संस्कृताध्यापक, जी. इ. इ. एम्. एच्. हायस्कूल, ठाणे.
प्रल्हाद-जयन्त, जयद्रथ इत्यादि नाटकांचे कर्ते.

प्रथमावृत्ति.

शके १८७१ ] [ मूल्य सहा रुपये

★

प्रकाशक : शंकर गोपाळ घैसास
५६७ शनिवार पेठ, पुणे २.

मुद्रक : भगवान पंढरीनाथ सोमण
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, ३९१ नारायण पेठ, पुणे २.

★

# प्रस्तावना

आज चैत्र व॥ १३ शके १८७१ या दिवशी हे श्रीकृष्णचरित्र-रहस्य मुद्रित करण्यास आरंभ होत आहे. बरोबर एका वर्षापूर्वी याच दिवशी माझी अत्यंत लाडकी, प्रेमळ नात **शांता** [ माझे भाचे चिरंजीव पांडुरंग विनायक दामले M. A , B T यांची कन्या ] ही अगदी अकाली, म्हणजे केवळ सव्वातीन वर्षांची असतां, आम्हा सर्वांना दुःखात लोटून कालवश झाली. एवढ्या लहान वयात देवादिकांचे वर्णनपर वीसपंचवीस संस्कृत व मराठी श्लोक मुखोद्गत करून तिने आपल्या बुद्धीची चमक दाखविली. देवादिकांच्या गोष्टी ऐकण्याची तर तिला फारच आवड होती. श्रीकृष्णाच्या बाळपणच्या गोष्टी मी तिला सांगू लागलो म्हणजे त्या ऐकताना तिला भारी आनंद होई. तिचा तो आनंद पाहून, चिरंजीव शांता-सारख्या प्रेमळ लहान मुलांची करमणूक होईल असे श्रीकृष्णचरित्रातील अद्भुत प्रसंग सोप्या शब्दात गोष्टिरूपाने लिहावेत, असा माझा विचार होता. पण चिमकुली शांता कालवश होताच माझा तो सर्व उत्साह माव-ळला. तिच्या वियोगाने अंतःकरण अत्यंत व्यथित झालें. तिच्या वियोग-दुःखाचा विसर पडावा व मनाला शांतता मिळावी म्हणून भारत, भाग-वत या चिरपरिचित ग्रंथांवरून श्रीकृष्णचरित्राचे अवलोकन करण्यास प्रारंभ केला. त्याचेच फल हे श्रीकृष्णचरित्र-रहस्य मी सहृदय वाचकांच्यापुढे ठेवीत आहे.

श्रीमद्भागवतकारांनी अद्भुतरम्य कथांनी नटवून वर्णन केलेले श्रीकृष्ण-चरित्र फारच रमणीय आहे. भक्तिरसाच्या लाटा उसळत असलेल्या ह्या विस्तीर्ण, मनोहर व शीतल ज्ञानगंगेत यथेच्छ पोहताना होणारा आनंद तर अवर्णनीय आहे. ह्या चरित्रामृताचे मनमुराद सेवन करून अनेक साधुसंत आणि प्रापंचिक जनहि तृप्त झाले आहेत. बुद्धिमानांच्या बुद्धीची कसोटी पाहाणारे, शास्त्री-पंडितांना विचारात पाडणारे, श्रद्धावान् भाविकांना डोलविणारे, सामान्य जनांना सात्त्विक आनंद देणारे असे हे

कल्पवृक्षासारखे श्रीकृष्ण-चरित्र अखिल भारताला भूषणभूत होऊन आपली कीर्ति सर्व जगभर गाजवीत आहे. भारत-भागवत रामायण ह्या ग्रंथत्रयीनें भारतवासीयांना पावन करून व त्याना अनेक अडचणीच्या प्रसगीं हात देऊन मार्गदर्शन केलें आहे; आणि अद्यापहि ही ग्रंथत्रयी तेच काम करीत आहे. पूर्वी कुलपतींच्या विद्यापीठात विद्यार्थ्यांना वेदत्रयीबरोबरच ही ग्रथत्रयीहि पढवीत असत. रामायणांत रामाचा आदर्श जगापुढे ठेवून मार्गदर्शन केलें आहे, तर भारत-भागवतात श्रीकृष्णाच्या उज्ज्वल प्रकाशात स्पष्ट दिसणाऱ्या अनेक नरवीरांच्या, थोर थोर मुत्सद्द्यांच्या, शास्त्रपारंगतांच्या, सुष्ट-दुष्ट पुरुषांच्या, मंत्रतंत्रनिष्णात् योगीजनांच्या, पुण्यश्लोक राजर्षींच्या, ऋषि मुनींच्या व साधुसंतांच्या बोधप्रद कथा उठावदार रीतीनें सागितल्या आहेत. भरतखंडासारख्या पुण्यभूमींत नरदेहात जन्म पावलेल्या प्रत्येक सुबुद्ध व्यक्तीचे अवश्यमेव कर्तव्य म्हणजे ह्या ज्ञानप्रद ग्रंथाचे एकदा तरी सावधान चित्ताने अवलोकन करणें हें आहे. साधुसंतानीं, विद्वान् संशोधकानीं ह्या बहुमोल ग्रंथाकडे जनतेचे लक्ष्य वेधण्याची खूप खटपट केली आहे; पण ह्या ग्रंथांचे हृद्गत कळण्याची, बुद्धिमाद्यामुळे, पात्रता नसणाऱ्या पोटार्थी प्रवक्त्यांनीं धर्माच्या नावाखालीं जनसंमर्दात खालच्या थरापर्यंत फिरून केवळ जनरंजन करून उदरभरण करण्याच्या इच्छेनें ह्या ग्रंथातील बोधप्रद आदर्श कथांना आपल्या विपरीत कल्पनेने अशक्य भाकडकथाचे स्वरूप दिलें आहे. आधुनिक भौतिक शास्त्राच्या झगझगीत प्रकाशानें दिपलेल्या जनतेची दृष्टि तर ह्या ग्रंथांच्याकडे जाईनाशीच झाली आहे. ह्या जुन्यापुराण्या ग्रंथाच्या वाचनांत कालक्षेप करणे मुर्खपणाचें आहे असे अहंमन्य विद्वान् उघडपणें बोलून बुद्धिभेद करण्याचे कार्य करीत आहेत. " जे महाभारतीं नाही तें नोहेचि लोकीं तिहीं " ह्या विचारपूर्वक लिहिलेल्या श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या सुंदर वचनाकडे उपहासाने पाहाणारे आधुनिक विद्वान् कांहीं थोडे थोडके नाहींत. अशा ह्या बुद्धिभेद करणाऱ्या विषम कालांत भारताच्या, विशेषतः भागवतग्रथाच्या, आधारें श्रीकृष्णाच्या चरित्रांतील रहस्य दाखविण्याचा अल्प प्रयत्न करण्याकारितां भक्तीच्या दिव्य काव्यमय आच्छादनाखालीं झांकलेलें,

सर्वसामान्य लोकांना आदर्श म्हणून पुढें ठेवता येण्यासारखें सुंदर कृष्ण-चरित्र वाचकवर्गापुढें ठेवण्यांत येत आहे.

या चरित्रातील विशेष येथें थोडक्यात सागून वाचकांना हा चरित्र-ग्रंथ वाचण्याची मी विनंति करणार आहे. सर्वसामान्य जनतेला भक्तिमार्गाकडे वळविण्याकारिता, श्रीकृष्णचरित्रावर काव्यमय कल्पनांचीं सुंदर व आकर्षक भूषणें भागवतकारानीं चढविलीं आहेत. श्रीकृष्णचरित्राचा मनोहर बाह्य वेष अवलोकन करून श्रद्धाळु जन आनंदानें डुलतात. त्याच्या चित्तवृत्ति तन्मय होऊन ते दिव्य सुखाचा अनुभव घेतात. पण अश्रद्धाळु, चिकित्सक जीवाच्या व्यावहारिक दृष्टीला ती काव्यसृष्टि पटत नाहीं, आणि त्यात त्याची बुद्धि तितकीशी सुसंस्कृत नसली तर तें काव्य-रहस्य त्याला उलगडतहि नाहीं. स्वाभाविकच तो चरित्र-ग्रंथाचा निंदक बनतो. ही गोष्ट ध्यानात आणून श्रद्धाळु किंवा अश्रद्धाळु, भाविक वा चिकत्सक, विद्वान् वा सामान्य, वृद्ध वा तरुण अशा सर्वांनाच कांहीं तरी घेता येईल अशीच ह्या श्रीकृष्णचरित्र–रहस्य ग्रंथाची माडणी मीं केली आहे. भक्तीचा सुदर, झिरझिरीत पडदा तसाच कायम ठेवून श्रीकृष्णाचें ऐतिहासिक, बोधप्रद व मनोहर स्वरूप वाचकाना दाखविण्याचा प्रयत्न मीं ह्या ग्रंथात केला आहे.

छप्पन कोटी यादव होते, ह्या वर्णनाचा अर्थ, यादवाचीं छप्पन कुळें होतीं, असा घ्यायचा हें आता सर्वमान्य झालें आहे. कृष्ण, कंस, अक्रूर, सात्यकी, सत्राजित् वगैरे कृष्णचरित्रातील ज्या प्रसिद्ध यादव व्यक्ती आहेत, त्यांच्या कुळाचा ह्या चरित्रात इतिहास देऊन त्यांचा परस्पर-संबंध काय होता तो येथे दाखविला आहे. त्यावरून वसुदेव हा त्या काळीं किती थोर, शूर, राजकारणी व सर्वांना प्रिय होता हें दिसून येतें. त्याला कैदेंत टाकणें ही गोष्ट कंसाला कशी अशक्य होती तें ह्या चरित्रांत विवेचनपूर्वक सांगितलें आहे. नारद ही एक व्यक्ति नसून ती एक मोठी धर्मकारणी व राजकारणी संस्था होती, ही गोष्ट वाचकांच्या विचारार्थ येथे नव्यानेंच माडली आहे. मुलाचा नामकरणविधि बाराव्या अथवा तेराव्या दिवशीं करण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून चालत

आलेली आहे. देवकीचीं सहा मुलें जन्मल्याबरोबर कंसानें मारलीं असें सांगितलेलें असून दुसऱ्या ठिकाणीं त्या मुलांचीं ठेवलेलीं नांवेहि सांगितलीं आहेत. मनुष्य मरणोत्तर पुण्यपापाप्रमाणे स्वर्गात अथवा नरकात जातो ही गोष्ट प्रसिद्ध असतांना, पुढें हीं मुलें श्रीकृष्णाने पाताळातून आणून देवकीला दाखविलीं असें वर्णन आहे. ह्या सर्व विसंगत गोष्टींची संगति लावण्याचा प्रयत्न ह्या चरित्रात केला आहे.

पूतनावध, शकटासुर, बकासुर, तृणावर्त, अघासुर, वृषभासुर, गोवर्धनोद्धारण, कालियामर्दन, खाडववन-दाह, द्रौपदी-वस्त्रहरण, ह्या सर्व अद्‌भुत चमत्काराचा उलगडा, श्रद्धाळु मनाला धक्का न लावता, चिकित्सक मनालाहि पटेल, असा केला आहे. कंसवध ही गोष्ट चुटकीसरशी झालेली नसून त्यावेळीं कंसपक्षांत फितुरी कशी झाली होती हें येथे दाखविले आहे. सुदर्शनचक्र, हलधर, हीं नामाभिधानें कशीं प्रचारांत आलीं हे सागण्याकरिता यादवाच्या अपूर्व संघटनेचा इतिहास येथे दिला आहे.

भागवतात नसलेली ' राधा ' भाविक भक्तानीं कोठून आणली हे एक कोडें आहे. राधा-कृष्णाच्या शुद्ध, पवित्र व अत्यंत सात्त्विक प्रेमाचें कोडें ह्या चरित्रात सोडविले आहे. जरासंधाच्या स्वाऱ्या ऐतिहासिक आहेत. त्याने आपल्या सहाय्याला बोलावलेल्या कालयवनाचा नाश मुचकुंद-गुहेत कसा झाला ही रहस्यमय कथा येथे उलगडून दाखविली आहे. भगवान् श्रीकृष्णाचे विद्यार्जन, धर्मरक्षण, पतित-परावर्तन, संशोधन आणि त्याची राजकारणकुशलता यांसंबंधीं अत्यंत उद्बोधक माहिती ह्या चरित्रांत मिळेल. श्रीमद्भगवद्गीतासार हें प्रकरण तर वाचकानीं लक्षपूर्वक वाचावें अशी त्याना आग्रहाची विनंती आहे. तात्पर्य, ह्या श्रीकृष्ण-चरित्र-रहस्याच्या वाचनानें वाचकांच्यापुढे विचारार्थ पुष्कळच नवीन गोष्टी येणार आहेत. वाचकानीं ह्या चरित्रावरचा आपला अभिप्राय मला अवश्य कळवावा. चरित्र-स्पष्टीकरणार्थ मला न सुचलेल्या गोष्टी कोणाला सुचल्या तरी त्यांनीं त्याहि मला कळवून ठेवाव्या. पुढील आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यांच्या ग्राह्य कल्पनांचा आभारपूर्वक मी अवश्य स्वीकार करीन.

ह्या चरित्र-ग्रंथ लिहितांना मूळ भारत–भागवत–हरिवंश या ग्रथांचा तर मीं सर्वस्वी आधारच घेतला आहे. त्याप्रमाणेंच भारत–भागवतांवरच्या सर्व उपलब्ध संस्कृत टीकाचा मला फार उपयोग झाला आहे. श्रीमद्भग-वद्गीतासार लिहिताना गीतेवरच्या निरानिराळ्या पंधरा संस्कृत टीका मीं पाहिल्या, त्यातील शांकरभाष्य–आनन्दगिरीकृत टीकेसह, नीलकण्ठी, मधुसूदनी, शंकरानन्दी, श्रीधरी, तत्त्वप्रकाशिका ह्या टीकांचा मीं भरपूर उपयोग करून घेतला. ज्ञानेश्वरी ( मराठी ) ग्रंथाचा तर मला फारच उपयोग झाला. मोठमोठ्या विद्वानानीं केलेल्या भारत–भागवतांच्या मराठी भाषातराचा मला ह्या चरित्रात फार उपयोग झाला; विशेषतः विद्वद्वर्य भारताचार्य चिंतामणराव वैद्य याच्या कृष्णचरित्रानें मला पुष्कळच मार्गदर्शन केले आहे. ह्या सर्व विद्वान् ग्रंथकारांचे उपकार योग्य प्रकारें मानण्याकरता मजजवळ शब्दच नाहींत; त्याच्या ऋणांत राहण्यांतच मला आनंद आहे.

ह्या ग्रंथाचें हस्तलिखित वाचून पाहून, माझे आतेबंधु श्री. अनंत विठ्ठल आपटे B. A., S. T C D. व माझे भाचे चि० पांडुरंग विनायक दामले, M. A , B. T. यानीं उपयुक्त सूचना केल्या. माझे स्नेही उपनिष-त्तीर्थ द. वा. जोग यानी या ग्रंथातील श्रीमद्भगवद्गीतासार ह्या अत्यंत महत्त्वाचा भाग फार काळजीपूर्वक तपासून उपयुक्त सूचना केल्या. माझे स्नेही प्राध्यापक वि. पां. बोकील, M. A , रिटा. एज्यु. इन्स्पेक्टर, पुणें, यानीं हा ग्रथ आत्मीयतेनें वाचून कांहीं सूचना केल्या. ग्रंथ सुंदर दिसण्या-च्या दृष्टीने माझे स्नेही श्री. यशवन्त गणेश वझे, बी. ए., एल्‌एल्. बी., यांनीं पुष्कळ सूचना केल्या. माझे विद्यार्थि-स्नेही प्रा. ना. वि. पाटणकर, एम्. ए., एम् एड्. हे तर ह्या ग्रंथाकडे प्रारंभापासून आत्मीय भावनेनें पाहात आहेत. या सर्व विद्वानांचा मी अत्यंत आभारी आहे.

५१९ दक्षिण कसबा, सोलापूर.
श्रीकृष्णजयंती, शके १८७१.

**शंकर गोपाळ घैसास**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कृष्ण-क्रान्ति | १ |
| २ | नारदीय-उद्योग-पर्व | ९ |
| ३ | अद्भुत कारस्थान व जन्मरहस्य | ३१ |
| ४ | उत्पात व स्थलान्तर | ६० |
| ५ | अपूर्व चमत्कार व गिरिधर गोविंद | ७६ |
| ६ | कंसवध व अलौकिक स्वार्थत्याग | १०३ |
| ७ | विद्या, पराक्रम आणि विवाह | १६० |
| ८ | स्यमंतक, पतितोद्धार व भीषण राजसूय | १९८ |
| ९ | द्यूत, वनवास व युद्धप्रस्थान | २६२ |
| १० | श्रीकृष्णशिष्टाई व भारतीय युद्धाची नांदी | ३०५ |
| ११ | श्रीमद्भगवद्गीतासार | ३३४ |
| १२ | भारतीययुद्ध, यादवी व चरित्रोपसंहार | ३९७ |

## प्रकरण १ लें

# कृष्ण-क्रान्ति

मथुरा नगरीचें वैभव ह्या वेळेस शिखरास पोहोंचलें होतें. सुमारें ५२०० वर्षांपूर्वीची गोष्ट, यादवांतील प्रसिद्ध सात्वत वंश आपल्या अपूर्व तेजानें तळपत होता. ह्याच वंशांत वृष्णि, अंधक, महाभोज यांच्यासारखे प्रसिद्ध कुळाचे मूळपुरुष आणि उग्रसेन, कंस, वसुदेव, श्रीकृष्ण, अक्रुर, सात्यकी, सत्राजित, उद्धव, कृतवर्मा यांसारखे इतिहासप्रसिद्ध पराक्रमी पुरुष निर्माण झाले. अत्यंत सदाचरणी पातिव्रता सुचिरा, ब्रह्मवादिनी आहुकी, राम-कृष्णांसारख्या अलौकिक पुरुषांना जन्म देणारी माता देवकी, पराक्रमी पांडवांची आई पृथा, दंतवक्त्र-शिशुपालाच्या माता श्रुतदेवा व श्रुतश्रवा, अवंति देशाची प्रसिद्ध राणी राजाधिदेवी ह्या प्रसिद्ध स्त्रियांचाही जन्म ह्याच वंशांत झाला. अशा ह्या सात्वत वंशाचा मूळपुरुष महापराक्रमी सात्वत राजा, ह्याचा पुत्र वृष्णि हा वृष्णि कुळाचा मूळपुरुष होता. त्याच्यापासून आठवा पुरुष शूरसेन हा आमच्या गोष्टीला सुरवात होण्याच्या वेळीं मथुरा नगरींत राज्य करीत होता. ह्याच्या कारकीर्दींत मथुरा नगरी वैभवाच्या शिखरावर चढून सर्व माथुर देशाला ह्या पराक्रमी राजामुळेच ‘शूरसेन-देश’ असें लोक ओळखूं लागले होते. शूरसेन प्रजाजनाचा अत्यंत आवडता असून प्रजेवर त्याचें पुत्रवत् प्रेम होतें. मथुरा नगरी शृंगारण्यांत तर शूरसेनानें कमालीचे प्रयत्न केले होतें. ह्या नगरींत राहणारी आपली प्रजा अत्यंत सुखी व्हावी, इंद्राच्या अमरावतीतच आपण आहों कीं काय असें प्रजेला वाटावें, अशी राजाची इच्छा होती. त्या नगरीच्या भव्य वेशीचीं दारें स्फटिकाचीं असून फार उंच होतीं. त्या दारांच्या कमानी मोठ्या असून त्यावर सोन्याचीं तोरणें बांधलीं होतीं. त्या नगरींतील कोठारें व द्रव्य ठेवण्याचीं भांडारगृहें तांब्याच्या व पितळेच्या पत्र्यांनीं मढविलेलीं असून सभोंवारच्या लहान लहान खंदकांमुळें तीं प्रवेश करण्यास दुर्गम होतीं.

नगरीच्या प्रचंड तटासभोवती असलेला खंदक तर फारच विस्तीर्ण असून जलानें भरलेला असल्यामुळें नगरीला बेटाची शोभा आली होती. नगरींत असलेल्या लहान मोठ्या बागांनीं व सुंदर सुंदर पुष्करणींनीं नगरी विशेष शोभायमान दिसत होती. प्रशस्त चव्हाटे, वाड्यापुढच्या जागा रुंदच रुंद व गजबजलेले राजमार्ग असलेल्या व्यापारी पेठा व भव्य इमारती ह्यानीं ती नगरी फारच सुंदर दिसत होती. घराचे ओटे, गच्च्या, खिडक्या, फरशा ह्या सर्व स्फटिकांच्या बनविल्या असून त्यावर नीळ, पोवळीं, पाचू यांची नकशीदार कामें केलीं होतीं. राघु, मैना, कबुतरे, मोर इत्यादि पाळीव पक्ष्याचा शब्द ठिकठिकाणीं ऐकूं येत होता. राजमार्ग, बाजार-पेठेंतील रस्ते, चव्हाटे स्वच्छ झाडून त्यावर पाणी शिंपडलेलें असे. नगरींतील प्रत्येक घराच्या समोर सडासंमार्जन केलेले असून त्यावर चित्र-विचित्र रंगांच्या रांगोळया काढलेल्या असत. प्रत्येक घराच्या दरवाजाच्या दोहों बाजूंस पाण्याने भरलेले तांब्याचे घट ठेविलेले असून त्यावर चंदनाचे व दह्याचे पट्टे ओढलेले असत. त्याच्या सभोंवार फुलांच्या माळा व तोंडावर आंब्याच्या डाहाळया ठेवलेल्या असत. दाराच्या दोहों बाजूंस केळफुलांनीं व केळीच्या घडांनी युक्त असे केळीचे खुंट उभे केलेले असत. त्या पुरातन काळीं नागरिक आपापलीं घरे प्रतिदिनीं अशा मंगल चिह्नांनीं शृंगारीत. अनेक देवताचीं शृंगारलेलीं भव्य मंदिरे, त्याचे ते सोन्यानें मढविलेले कळस, मदिरात जळणाऱ्या सुवासिक द्रव्याचा पसरलेला घमघमाट, देवदर्शनाकारिता जाणाऱ्या भाविक लोकांच्या झुंडी, ह्यांनीं त्या नगरीला एक अपूर्व शोभा आली होती. गगनाला भिडलेले उत्तुंग राजप्रासाद, त्याच्यावर डौलाने फडकणारे राजचिह्नांकित भरजरीचे ध्वज, राजप्रासादासमोर झुलणारे एकदंती शुभ्र हत्ती, अश्वशाळेत अश्वाच्या खिंकाळण्यानें होणारे आवाज, राजप्रासादासभोंवतीं असणाऱ्या हजारो शस्त्रधारी रक्षकांच्या हालचाली, ह्यांनीं अमरावतींतल्या इंद्राच्या ऐश्वर्याची कल्पना येत होती. अशा ह्या अमरावतीतुल्य नगरीचा पराक्रमी शूरसेन राजा प्रतिइंद्र भासत होता.

देवेंद्र म्हटला कीं पौराणिक परंपरेने त्याचा प्रतिस्पर्धी दैत्येंद्र

डोळ्यांसमोर उभा राहतो. देवेंद्राप्रमाणें शोभणाऱ्या वृष्णिकुळांतील पराक्रमी शूरसेन राजाच्या राजवटीत, यादव देवाप्रमाणे सुखोपभोगांत दंग होते; पण त्याच्या वैभवाने दिपून मत्सराने जळत असलेले, सात्वत राजाच्या अंधक नांवाच्या पुत्रापासून निर्माण झालेल्या, अंधक कुळांतील खल पुरुष यादवाच्या विरुद्ध कपटव्यूह रचण्याची शिकस्त करीत होते. अंधक कुळातील सातवा पुरुष दुंदुभि हा महाकारस्थानी, कपटविद्येत फार निष्णात असलेला, अत्यंत दुष्ट, खलपुरुष अंधकांचा पुढारी होता. सात्वत राजाचा तिसरा एक पुत्र महाभोज भोजकुळाचा प्रवर्तक होऊन गेला. कावेबाज अंधकानीं भोज कुळातील वीर पुरुषांना नाना उपायांनीं आपल्या बाजूला करून घेतले होते. अंधककुळ खल-पुरुषांबद्दल प्रसिद्ध होतें तसे भोजकुळ पराक्रमी, वीर पुरुषांबद्दल प्रासिद्धीला आलेले होते. कावेबाज कारस्थानी अंधक, भोजकुळाशीं कपटी उपायांनीं इतके निगडीत झाले होते कीं, सर्वसामान्य लोक अंधकांनाहि भोजच समजत असत. अंधकाचें कारस्थान व भोजाचा पराक्रम एकवटल्यानें वृष्णींना कल्पनातीत भय निर्माण झाले होते. वृष्णींना मात्र ह्या भयाची तितकीशी कल्पना नव्हती. प्रजेचे आपल्यावरचे प्रेम, आपल्या अफाट सेनेची स्वामिभक्ति, शस्त्रास्त्रांची विपुलता, द्रव्याने भरलेली भांडारें, व आपला स्वतःचा पराक्रम ह्या सर्व गोष्टींमुळे शूरसेन राजा निर्धास्त होता. अधक व भोज आपला मत्सर करतात हें त्याला माहित होतें, पण आपल्या विरुद्ध एक मोठें कपटकारस्थान पूर्ण होत आलें आहे ह्याची शूरसेनाला मुळींच कल्पना नव्हती, व म्हणूनच तो असावध होता. राजाचे हेर राज्यांतील नगरोनगरीं गावोगांवीं पसरले होते. पण अंधक-भोजांच्या कारस्थानाचा कोणालाच सुगावा लागला नव्हता.

श्रावण व॥ अष्टमीची पूर्वरात्र. सर्व मथुरानगरी गाढ झोपीं गेली होती. निजतांना आकाशांत मेघ विरळ होते. आपल्यावर काहीं संकट येत आहे ह्याची कोणालाच कल्पना नव्हती. रात्रीचे रक्षकहि निर्धास्तपणे आपापल्या जागीं उभे राहून पहारा करीत होते. दिवसा गजबजलेले राजमार्ग ह्यावेळीं निर्मनुष्य व निःस्तब्ध झाले होते. राजमार्गांच्या दोहों बाजूंस डौलानें उभीं

असलेलीं प्रासादतुल्य मंदिरें दिवसाचा आनंदी वेष टाकून देऊन गंभीर स्वरूप धारण करून उभीं आहेत असा भास होत होता. आकाशात हळू-हळू मेघ दाटी करूं लागले. त्याची कृष्ण छाया अधिकाधिक दाट होत होत नगरीवर पसरूं लागली. आकाशात वीज इतक्या जोराने कडाडली कीं राजमहालांत परांच्या मृदु शय्येवर स्वस्थ निजलेला शूरसेन राजा खड-बडून उठून बसला. त्यानें डोळे उघडले तों महालाच्या खिडकीतून बाहेर होत असलेला विजेचा चमचमाट त्याच्या दृष्टीस पडला. तो एकदम उठून गच्चीवर आला. तितक्यात त्याच्या कानावर ब्रह्मवीणेचा झणत्कार आला. तो चकित होऊन खाली पाहूं लागला तों प्रासादरक्षकाबरोबर मशालीच्या उजेडांत प्रासादाचा स्फटिकसोपान चढून वर येत असलेले देवर्षि नारदमुनि त्याच्या दृष्टीस पडले. राजाने हर्षानें टाळी वाजविली. नारदऋषींनीं वर पाहिले. नेहमीं प्रसन्न, हसतमुख असलेला त्याचा चेहरा गंभीर झालेला पाहून शूरसेन राजा मनात चरकला. ऋषींना गडबडीनें तो सामोरा गेला. वर येताच राजानें दिलेल्या आसनावर न बसतां गंभीर चेहरा करून नारद राजाला म्हणाले, “ राजा, तुझ्या हेरा-कडून तुला कांहींच वार्ता कळली नाही ? इतका गैरसावध राहिलास तरी कसा ! केवढे कारस्थान शिजून तयार झाले आहे ! मृत्यूचे पाश तुझ्या ह्या सुंदर नगरीभोंवतींच नव्हे तर तुझ्याहि गळयाभोंवती आंवळले जात असतांना तूं स्वस्थ निजला आहेस, तुझी प्रजा गाढ झोपेंत आहे. तुझे सैनिक आणि रक्षक घोरत पडले आहेत. ऊठ, एक क्षणाचाहि विलंब करूं नकोस. सम्राज्ञीला व युवराजाला बरोबर घेऊन गुप्तमार्गाने नगरीबाहेर पडून तुझ्या विश्वासांतल्या कोणत्याहि गौळवाड्याचा रस्ता धरून गोप-मंडळींत मिसळून जा. ”

नारदांचे हे शब्द कानांवर पडतांच राजा पराकाष्ठेचा गोंधळून गेला. त्याला नारदांच्या बोलण्याचा अर्थ कळेना. त्याची ती गोंधळलेली स्थिति पाहून नारद म्हणाले, “ राजा, अरे बाबा विचार कसला करतोस ? अंधकांचा कपटी कारस्थानी पुढारी दुंदुभि एका प्रहरांत तुला गैरसावध गांठून तुझ्या छातीवर पाय देऊन उभा राहील. तुझ्या मुत्सद्यांचे, सेना-

नायकाचे वाडे धडाधड कोसळत असल्याचा, व मथुरा नगरी आगीच्या डोंबांत सांपडल्याचा देखावा दृष्टीस पडण्यास तर आता तितकाहि अवधि नाहीं. ऐक, राजा ऐक; वाडे कोसळण्याला सुरवात झाली. तुझे हेर–छे छे, तुझे सगळेच हेर कसे फितुर झाले ! जा जा, उद्यां तूं जाशील त्या गौळवाड्यात येऊन तुझ्या राज्यात झालेल्या फितुरीची हकीगत मी तुला सागेन. आज जीव बचाव. मी येथे राहून, तू नगरीच्या बाहेर पडेपर्यंत तुझ्या शत्रूची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतो. जा जा, उभा राहू नकोस." असे म्हणून नारदानी त्याला महालाच्या दरवाज्याच्या आत ढकलला. राजा व राणी महालातील गुप्त मार्गाने बाहेर पडल्याचा कानोसा घेऊन नारदांनीं मशाल घेऊन उभ्या असलेल्या रक्षकाच्या कानात काही सागितले. लगेच रक्षक घाईघाईने चालता झाला. नारद महालाच्या दाराशीं गच्चीवर उभे राहिले. वाड्या पाठीमागून वाडे धरणीकंप झाल्याप्रमाणे धडाधड कोसळू लागले. नगरींतल्या कित्येक वाड्याच्या भोवतीं आगीचे डोंब दिसूं लागले. नगरीच्या बाहेर हजारो मशालीच्या उजेडात नगरीला शत्रूच्या सैन्याचा वेढा पडलेला दिसू लागला. थोड्या वेळापूर्वी शात असलेल्या मथुरानगरींत एकच हलकल्लोळ झाला. जो तो जीव वांचविण्याकारितां घराच्या बाहेर पडू लागला. मोठमोठ्या सरदारांचे, मोठमोठ्या सेनानायकाचे, राजाच्या प्रमुख मंत्र्याचे वाडे जमीनदोस्त झाले. पडलेल्या वाड्याच्या भोवतींहि अग्निप्रलय होऊन कहर झाला. वाड्यातील सर्वच्यासर्व माणसे बहुतेक गाडली गेली. काहींना बाहेर पडण्यास थोडासा वाव मिळाला तीं अग्निप्रलयांत सांपडून नाश पावलीं. नगरींतील बहुतेक सर्व राजमार्गावर घरे पडण्याचे व आग लागण्याचे प्रकार एकाच वेळेस सुरू झाल्याने एकमेकांच्या मदतीला धांवण्याचीहि पात्रता कोणामध्येंच उरली नाहीं. इतक्यांत नगरीच्या तटाबाहेरून शत्रुसैन्याचा मारा सुरू झाला. तटावरील रक्षक सैन्याने प्रतिकार करण्याची शिकस्त चालविली. पण ह्या अनपेक्षित हल्ल्यामुळे व सेना निर्नायक झाल्यामुळें शत्रूंची सरशी होऊन शत्रुसैन्य नगरांत घुसलें. राजप्रासादाच्या गच्चीवर उभे राहून विपण्ण मनाने नारद हा सर्व प्रकार

पाहात होते ते एकदम राजमहालात शिरले व दरवाजे बंद करून पुढे काय प्रकार होतो त्याची वाट पाहात राहिले.

सर्व नगरीवर आक्रमण करून ती प्रचंड शत्रुसेना राजप्रासादाचे अनुरोधानें धावूं लागली. अशारीतीनें त्या काळच्या रणनीतीला अगदींच विरुद्ध असलेला हा राक्षसी प्रकार पाहून सर्व मथुरावासी यादव गोंधळून गेले. ह्या गुप्त चोरट्या, खुनी आक्रमणाचा प्रतिकार कसा करावा हें कोणासच समजेना. शत्रुसैन्यानें राजप्रासाद वेढला. रक्षकांनीं लढता लढतां धारातीर्थी देह ठेवले आणि प्रासाद शत्रूच्या स्वाधीन झाला. कर्दनकाळासारखा पराक्रमी नरसिंह शूरसेन राजा कोठेंच दिसेना हे पाहून आपल्या ह्या अचाट हल्ल्याला घाबरून जीव बचावण्याकरितां तो राजमहालातच कोठे तरी दडून बसला असेल अशी कल्पना करून त्याला खेचून बाहेर काढण्याकरिता खलनायक खुनी दुदुभि आपल्या भयंकर अनुचरासह राजमहालाचे दरवाजे फोडून आत शिरला तो ब्रह्मवीणा खांद्यावर ठेवून भजनानंदांत गुंग असलेले नारदमुनि त्याच्या दृष्टीस पडले. तो चकित झाला, गोंधळला. भानावर आल्यासारखे दाखवून नारदमुनींनी डोळे उघडले. तें एकदम म्हणाले, "कोण दुदुभि? अंधक कुळाला ललामभूत असणारा दुंदुभि! सात्वत वंशाची कीर्ति दिगंत गाजविणारा रणसिंह दुदुभि! माझे डोळे मला फसवीत नाहींत ना? दुदुभिच ना तू? आणि मी भजन करीत असतां माझ्यापुढें बसून आनंदाने डोलत असलेला शूरसेन मला येथे सोडून कोठे गेला?" "काय, शूरसेन गेला! ह्या दुंदुभीच्या पराक्रमाला भिऊन, घाबरून पळून गेला!" नारदांनीं केलेल्या स्तुतीने फुशारून दुदुभि एकदम बोलून गेला. नारदांनी त्याच्या बोलण्याने चकित झाल्यासारखे दाखवून म्हटले. "काय शूरसेन पळाला! तूं त्याला युद्धाचे आव्हान दिलें असतांना शूरसेन पळाला? तुझें-त्याचे युद्ध केव्हा सुरू झाले? रात्रीं त्यानें मला येथे आग्रहानें ठेवून घेतलें, त्या वेळेस तर तो ह्यासंबंधीं कांहींच बोलला नाहीं. आणि हें काय? हा बाहेर कोलाहल कसला चालला आहे?" नारद एकदम उठले व महालाच्या बाहेर गच्चीवर जाऊन पाहूं लागले. मथुरा नगरींत आगीचे डोंब उमळलेले

त्याच्या दृष्टीस पडले. इतक्यांत भोजांचा सेनापतीहि त्या जागीं येऊन थडकला. नारद ओरडून म्हणाले, "काय ही भयंकर आग! एक प्रहरापूर्वी अमरावतीतुल्य असलेली ही मथुरा नगरी भस्मसात् होत आहे. आणि हा कोण? भोजाचा सेनापति कांतवीर्य! दुदुंभि, हेच का तुमचे युद्ध! अपरात्रीं लोक निद्रेच्या आधीन झाले असताना त्यांना आगींत जाळून टाकणें याला तुम्ही युद्ध म्हणतां? दुंदुभि, कांतवीर्य बोला; ह्या भयकर गोष्टीला तुम्ही युद्ध म्हणता काय? दुंदुभि, पराक्रमी शूरसेन तुमच्या ह्या पराक्रमाला पाहून पळाला असे तूं म्हणालास नव्हे का! मी भजनानंदात तल्लीन असतां तो निघून गेला. तो हा प्रकार पाहून, बेभान झाला असेल, आपल्याच मूळ वंशातील अंधक भोजांचा हा विलक्षण भ्याड पराक्रम पाहून त्याने लाजेनें आगींत जीव दिला असेल. भोज हे पराक्रमी व रणधुरंधर क्षत्रिय योद्धे आहेत अशी कीर्ति आम्ही हिमनगाच्या शिखरावर देवसभेत ऐकत होतों. आज क्षत्रियरणनीतीला कलंक लावणारा हा भोजाचा विलक्षण पराक्रम पाहून मी थक्क झालों. ऐकणें आणि प्रत्यक्ष पाहाणे ह्यांत केवढे जमीनअस्मानाचे अतर पडलें हे! छे छे, तुमचे हे लाजिरवाणे अत्याचार पाहून एरवी सृष्टीला शांत करणारे मेघ विद्युल्लतेसह तुमच्या ह्या पातकाचा स्पर्श आपल्याला होईल ह्या भीतीने येथून कोठे तरी चालते झाले. आतां देवलोकीं जाऊन मी क्षत्रियाची कीर्ति कशी गाऊ? ज्या आगीच्या खाईत शूरसेनाला लाजेनें जीव देणे भाग पाडलेत त्या खाईत ह्या नारदालाहि फेकून द्या, म्हणजे भोजांच्या पराक्रमाची ही भलतीच कीर्ति गाण्याचा प्रसंग तरी माझ्यावर येणार नाहीं. शूरसेनाला तो गैरसावध असतां तुम्ही पकडण्याकरितां आलांत, ज्याच्या समोर रणांगणावर ठाण मांडण्यास प्रत्यक्ष देवेंद्रालाहि क्षणभर विचार करावा लागला असता त्या पराक्रमी नरेंद्राची—शूरसेनाची—बेसावध स्थितींत, हिंस्र प्राण्याप्रमाणे शिकार करण्याकारेतां तुम्ही दिगंत कीर्तीचे भोज अंधकांना मिळालांत. धन्य तुमची! तुमच्यासारख्या भ्याडांच्या पारतंत्र्यांत पडण्यापेक्षां शूरसेनानें अग्निनारायणाला आपला देह आपण होऊन अर्पण केला. तुम्हाला आपल्यासारख्या मनुष्यप्राण्याची शिकार

करण्याची हौस असली तर शूरसेनाच्या जागी हा नारद जाऊन बसत आहे, शूरसेनाऐवजीं त्याची शिकार करा." इतके छद्मी भाषण बोलून नारद झटकन राजमहालांत शिरले. शिरतां शिरता महालाचा दरवाजा सहजगत्या धाडकन ओढून घेतला. एक क्षणाचाहि विलंब न लावता, मागें शूरसेनाने एका भेटीच्या प्रसंगीं महालाची रचना नारदाना दाखवीत असतां, महालांतून एकदम मथुरेच्या बाहेरच्या दाट वनात नेऊन मोडणारा गुप्त मार्गहि दाखविला होता, त्या मार्गाने नारद एकदम चालते झाले.

बाहेर गच्चीवर नारदांच्या शब्दानीं अंधक-भोजाची बाचाबाची सुरू झाली. नारदांनीं भोजाच्या पराक्रमाचें केलेलें वर्णन ह्या बाचाबाचीला कारण झाले. सुरुंग लावून वाडे उडविण्याच्या व आगी लावण्याच्या कृष्णकारस्थानात आपल्यासारख्या पराक्रमी भोजाना गुंतविण्याची दुंदुभीने भयंकर चूक केली याबद्दल दुंदुभीची कार्तवीर्याने उघड उघड निंदा करण्यास सुरवात केली. दुंदुभीला आपला हेतु साधावयाचा होता, म्हणून तो आपल्या कृत्याचें समर्थन करू लागला. भोज-सेनानी म्हणूं लागला, "शूरसेनाबरोबर पराक्रमानें लढून मथुरानगरी व शूरसेन देश काबीज करण्याकरितां आम्हीं तुम्हांला मदत केली." अंधक दुंदुभि म्हणे, "शूरसेनाशीं नुसतें लढून शूरसेन देश जिंकून घेणें शक्य नव्हतें म्हणून कारस्थान करुन मथुरानगरींत यादव सेनानींचा, पुढाऱ्यांचा व मुत्सद्यांचा निकाल लावण्याची युक्ति आम्हांला करावी लागली. शिवाय शूरसेनाच्या लोकांच्या फितुरीनेंच आम्हीं हें कारस्थान पार पाडलें. शूरसेनाच्या विश्वासांतले, खुद्द त्याच्या राजधानींतले लोक फितूर होतात; यावरून स्पष्ट दिसते कीं, शूरसेन राजाच्या, ह्या यादवांच्या सत्तेचा, लोकांना वीट आला होता. नारदांचें बोलणें मनाला लावून घेणे योग्य नाहीं. नारदऋषि म्हणजे अगदीं देवमाणूस. फारच सरळ व दयाळू अंतःकरणाचे तपस्वी ! त्यांच्यापुढे सर्व स्थिति मांडली कीं ते आपल्या बाजूनें बोलूं लागतील. चला, मी त्यांची आतांच समजूत घालतों." असें म्हणून दुंदुभी, भोज सेनानीला घेऊन राजमहालाचा दरवाजा उघडून आंत शिरला. पण नारद केव्हाच

गुप्त झाले होते. गुप्त होण्याच्या त्याच्या योग-सामर्थ्याबद्दल दोघांनाहि पराकाष्ठेचे आश्चर्य वाटले. दोघेहि राजमहालांतून बाहेर पडले. अरुणोदयाची वेळ झाली होती. निम्मीशिम्मी मथुरा नगरी भस्मसात् झाली होती. शूरसेन महाराजांचाच पत्ता नाहीं असे पाहून उरलेसुरले यादव-प्रमुख राजघराण्यातील मिळतील तितक्या सर्व मंडळींना घेऊन पसार झाले होते. सूर्योदयाबरोबर शूरसेन देशाचा अधिपति म्हणून अंधक दुदुभीचा ध्वज मथुरा नगरीवर फडकूं लागला. वृष्णिकुळाकडून अंधक कुळाकडे शूरसेन देश आला. एकदम एवढी मोठी क्रान्ति झाली. पण इतिहासात ह्या क्रातीला कृष्ण-क्रान्ति असे नांव मिळाले.

---

## प्रकरण २ रें

# नारदीय-उद्योग-पर्व

ह्या प्रकरणात आम्हाला पुराणान्तरीं काव्यमय सुंदर कल्पनेखालीं लपवून ठेवलेली एक महत्त्वाची उपयुक्त गोष्ट वाचकांच्या नजरेस आणावयाची आहे. गेल्या प्रकरणातील कथानकाचा धागादोरा हातांत घेऊनच हें काम आम्ही करणार आहों.

शूरसेनाच्या मथुरानगरींतील राजमहालांतून अंधक-भोजांच्या दृष्टीनें नारदऋषि आपल्या दिव्य यौगिक सामर्थ्यानें एकदम गुप्त झाले, हे

आपण वाचलें. पण ते मथुरेच्या बाहेर एका दाट वनांत नेऊन सोडणाऱ्या गुप्तमार्गानें चालूं लागले होते हें आपल्याला माहीत आहे. उजाडायच्या सुमारास ते त्या दाट वनांत येऊन पोहोंचले. गुप्तमार्गाच्या तोंडावरच असलेल्या गर्द झाडींत, चालण्याच्या दगदगीने व भयंकर काळजीनें अत्यंत श्रान्त झालेला शूरसेन राजा, सम्राज्ञी शीतलादेवी, युवराज शिनि, व त्या गुप्त मार्गांत वाटेंत निरानिराळ्या मार्गें येऊन त्याला भेटलेले अगदीं अंतरंगांतील चार प्रधान मुत्सद्दी, यांच्यासह बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. ह्या अंतरंगांतल्या चार प्रधान मुत्सद्यांना सावधपणें ह्या गुप्त-मार्गाला लागण्याचा कानमंत्र त्या मशाल घेतलेल्या रक्षकाच्या द्वारे नारदानीं दिला होता. नारदांनीं सांगितलेली कामगिरी त्या चतुर रक्षकानें हुशारीने बजावली म्हणूनच अशा ह्या संकटकाळीं अगदीं योग्य वेळीं त्या चार मुत्सद्द्यानीं येऊन राजाला थोडा धीर दिला. नारदाचें दर्शन होतांच शूरसेनादि सर्व मंडळींना फार बरें वाटलें. ते सर्व उठून उभे राहिले. त्या मुत्सद्द्यांनीं घाईघाईनें पर्णासन तयार करून नारदांना त्यावर बसण्याची प्रार्थना केली. नारद पर्णासनावर बसताच सर्व मंडळी नारदांच्या भोवतीं बसली. दिङ्मूढ झालेला शूरसेन नारदांचे पाय आपल्या मांडीवर घेऊन कृशतेनें चुरूं लागला. "महाराज केवढे श्रम आपण माझ्यासारख्या क्षुद्र मनुष्याकारितां घेतलेत!" सद्गदित झालेल्या राजाच्या मुखांतून जेमतेम इतके शब्द बाहेर पडले. त्याच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचे अश्रुबिंदु नारदांच्या पायांवर पडले. हा देखावा पाहून सर्वांच्याच डोळ्यांना पाणी आलें. सम्राज्ञी शीतलादेवीला तर हुंदका आवरेना. नारदांना गहिंवर आला. त्यानीं प्रेमळपणानें राजाच्या पाठीवर हात ठेवला. ते म्हणाले, 'राजा, कालाची गति अतर्क्य आहे. दैवानुरोधाने भाग्यचक्र फिरत राहातें. सदाचरणी नीतिसंपन्न पुरुषांना घेऊनच तें नेहमीं फिरत असतें असें नाहीं. दैवबलानें ते थोर पुरुषहि भाग्यचक्राच्या बाहेर कधीं कधीं फेंकले जातात, तर दुराचारी निंद्य व्यक्तींना त्यांचें चांगले प्रारब्धकर्म फलोदयोन्मुख होऊन त्यांना भाग्यचक्रावर नेऊन बसवितें. प्रारब्धकर्माच्या म्हणजे दुसऱ्याच्या अधीन असलेल्या त्या भाग्यचक्राकडे शहाण्या, धीर, विचारी

पुरुषानें लक्ष्यच देऊं नये. दैव-बलानें ज्या परिस्थितींत तो जाऊन पडेल त्या परिस्थितींत त्याच्यापुढें असणारें कर्तव्य त्यानें उत्तम तऱ्हेनें करीत राहावें व तें करीत असतांनाच वेदकथित धर्माला शरण जाऊन धर्मानें दाखविलेल्या उच्च परिस्थितींत जाण्याच्या मार्गावर त्यानें धैर्यानें व श्रद्धेनें पाऊल टाकावे. अशा तयारींत तो राहिला कीं अनुकूल काळ येताच इच्छित स्थळीं झटकन् जाऊन पोहोंचण्याला त्याला वेळ लागत नाहीं. प्रतिकूल काळाला धैर्यानें, शिताफीने बगल देणारा पुरुषच थोर गणला जाऊन अमर होतो. प्रतिकूल काळाशीं अविचारानें टक्कर देणाऱ्या पुरुषाच्या चिंधड्या होऊन त्याचें नावहि जगांत राहात नाहीं. राजैश्वर्य भोगायला सांपडणें हे कांहीं वाईट नाही. पण तें मिळविण्याकरितां आटापिटा करून दुर्लभ नरदेह खर्ची घालावा इतकें तें महत्त्वाचें खास नाहीं. राज्यलक्ष्मी किती चंचल आहे ह्या गोष्टीचा तुझा अनुभव अगदीं ताजा आहे. तिनें तुला टाकून काय किंमतीच्या नराधमाच्या गळ्यांत माळ घातली हें पाहून तर तुला तिचा तिरस्कारच वाटला पाहिजे. राजा, यदूच्या कुळांतील तुझ्या शाखेचा तूं बेचाळिसावा पुरुष आहेस. तुझ्या एकेचाळीस पूर्वजांपैकीं कितीजणांचीं नावें जगांत अमर होऊन राहिलीं आहेत त्याचा नीट विचार करून पाहा. एका हाताच्या बोटांवरच मोजतां येतील इतकीं नावें सोडून बाकी सर्व नांवें सर्वभक्षक काळाच्या मुखांत गडप झालीं आहेत. तूंच आपल्या पराक्रमानें तुझ्या सर्व पूर्वजांवर ताण करून तुझें नांव कांहीं काल तरी लोकांच्या तोंडीं राहील असें करून ठेवलें आहेस. तुझा शत्रु किती काळ ह्या राजलक्ष्मीला धरून राहील कोणाला ठाऊक! चार पांच पिढ्या तरी ही राज्यलक्ष्मी त्यांना लाभेल कीं नाहीं याची शंकाच आहे. त्यांची राज्यलक्ष्मी त्यांच्या नांवासह कालोदधींत नाहींशी होईल, पण शूरसेन देश ह्या नांवानें हा देश ओळखला जाईल तोंपर्यंत, शूरसेना, तुझें नांव मात्र अमर राहील. दीर्घकालानें देशाचें नांव बदलतांच तुझें नावहि इतिहासजमा होऊन लोक विसरून जातील. शूरसेना, यापुढें ह्या गेलेल्या राजैश्वर्याकडे तितकेंसें लक्ष न देतां तुझ्या पुढच्या पिढीकडे अधिक लक्ष दे. पराक्रमानें नांव कांहीं काल लोकांच्य

तोंडीं राहतें. पण ज्ञानसंपन्नतेनें स्वतः दुःखमुक्त होऊन मनुष्य दुसऱ्यांनाहि दुःखमुक्त करतो. स्वतः सुखी होऊन तो दुसऱ्याना सुखी करतो; आणि आपलें नांव अजरामर करून पूर्वजांच्या नांवांचाहि उद्धार करतो. अत्यंत पराक्रमी व पूर्ण ज्ञानसंपन्न पुरुषापुढें सर्व प्रकारचीं ऐश्वर्ये हात जोडून उभीं असतात. राजैश्वर्य हा त्याच्या हातचा मळ आहे. तो पाहिजे त्र त्याला राजा बनवील. राजा, तुम्हां क्षत्रियाना माझा हाच उपदेश आहे. तुम्ही आपले शरीरसामर्थ्य अचाट वाढवा, शस्त्रास्त्रविद्या परमावधीची प्राप्त करून घ्या; पण त्याचवेळीं ज्ञानसंपन्न होऊन आत्मोद्धाराबरोबर जगताचाहि उद्धार करण्यास विसरूं नका. राजा, तुझे राज्य जाण्याला तुझ्या अगदीं जवळचे आप्त, तुझे विश्वासु स्नेही शत्रूला कसे व कोणत्या लोभानें वश झाले हे मी सांगून तुझा ह्या वेळेस चित्तक्षोभ करीत नाहीं. कालान्तरानें तीं नांवे तुला आपोआप कळतील. तूर्त ह्या चार मुत्सद्दी पुरुषांच्या मदतीने ते सांगतील त्या गौळवाड्यांत गवळी समाजांत गुप्त रीतीने राहून युवराज शिनीला मीं आतां सांगितला तसा तयार कर. पुढची कामागिरी तो करील. आतां जाऊं मी ?"

इतकें बोलून नारद उठून उभे राहिले. नारदांचे भाषण ऐकून त्या सर्व मंडळींत अलोट उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राजा हात जोडून म्हणाला, "महाराज आम्ही आपले दास आहों." "छे, छे, दास नाहीं शिष्य आहोंत असें म्हणा. दास निर्बुद्ध अंधश्रद्धाळु असतात. शिष्य ज्ञानेच्छु उन्नति इच्छिणारे, विचारी, श्रद्धावान् असावे लागतात." नारद राजाला त्याचे शब्द पुरे होऊं न देतांच एकदम म्हणाले. राजा म्हणाला "योग्य आहे आपलें म्हणणे. आम्ही आपले शिष्य आहो. शिष्याला वेळोवेळीं ज्ञानदान करणें दयाळु गुरुमाउलीचे कामच आहे. आम्ही आतां निर्धास्त झालों. आमची सर्व काळजी, नारदऋषे, आपल्या-लाच. यादव कुळावर आपली पहिल्यापासून कृपा आहेच. मी आतां आणखी अधिक काय बोलणार ?" राजाचें तें नम्र भाषण ऐकून नारद ऋषि प्रसन्न मुद्रेनें हंसले. त्या चार मुत्सद्द्यांच्याकडे पाहून राजाच्या हिताची आता सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे अशा अर्थाचे, त्यांच्या गौरवपर

त्यांच्याशीं भाषण करून युवराजाला प्रेमानें कुरवाळीत 'आता यादव कुळाची सर्व मदार तुझ्यावर आहे,' असें त्याला सांगून व सम्राज्ञीला शुभाशीर्वाद देतांना 'माता आपल्या शिक्षणानें आपल्या बाळाला जगाचा सम्राट्-जगाचा धनी—बनवूं शकते' असे बोलून त्यांनीं सर्वांचा निरोप घेतला व बघतां बघतां ते दिसेनासे झाले.

देवर्षि नारदांची कामगिरी कोणत्या स्वरूपाची आहे ह्याची थोडीशी कल्पना येण्याइतके नारदऋषींचें वर्णन झाले आहे. "यादव कुळावर पहिल्यापासून आपली कृपा आहे" असे आपण आताच शूरसेनाचे भाषण वाचलें. यादवांच्या बेचाळीस पिढ्यापर्यंत सतत त्याच्यावर कृपादृष्टि ठेवणाऱ्या नारदमुनींबद्दल कुतूहल निर्माण होणें अस्वभाविक नाहीं. पुढेहि कृष्णचरित्रांत नारद पुष्कळ वेळा दृष्टीस पडणार आहेत. निरनिराळ्या पुराणात नारद ऋषि अनेक ठिकाणीं भेटतात. ब्रह्मदेवाचे हे मानसपुत्र. पण त्याहि जन्माच्या मागील जन्माची याची हकिगत प्रसिद्ध आहेच. हिरण्य-कशिपु, प्रल्हाद, बळी, बाणासुर ही सगळी दैत्यपरंपरा नारदानीं पाहिली आहे. त्या प्रत्येकपासून ह्यानीं सत्कारहि करून घेतला आहे. त्यांना सल्लाहि दिला आहे. भगवान् विष्णूच्या दशावतारात हे प्रत्येक ठिकाणीं हजर आहेतच. दक्षप्रजापतीच्या यज्ञांत हे हजर होतेच. सतीने यज्ञमंडपांत दक्षानें केलेल्या अपमानानें चिडून जाऊन प्राणत्याग केल्याची वार्ता यानींच शंकराला कळविली. सतीच्या दुसऱ्या जन्मांत शिवपार्वतीच्या विवाहाला हे हजर होते. वैकुंठ, कैलास, सत्यलोक, अमरावती, पाताल, नागलोक, गंधर्वलोक, यक्षांचा प्रदेश, कोठेहि जा, त्या त्या ठिकाणीं नारद आहेतच. कोठेहि त्यांना मज्जाव नाहीं, कोठेंहि त्यांच्याशीं कोणाचें शत्रुत्व नाहीं. श्रीरामचंद्राचे चरित्र प्रत्यक्ष पाहून तें ह्यांनीं वाल्मीकि ऋषींना सांगितलें. सावित्रीच्या वरयोजनेच्या वेळीं हे अश्वपतीला भेटले होते. ध्रुवाला यांनींच उपदेश करून अढळ स्थान मिळवून दिलें. थोडक्यांत सांगावयाचें तर पुराणेतिहासांतील फार प्राचीनकाळापासून, कलियुग सुरू झाल्यानंतरहि कांहीं वर्षे पुराणलेखन चालू असेपर्यंत, नारद नाहींत असा महत्त्वाचा एकहि प्रसंग सांपडणार नाहीं. कृत, त्रेता, द्वापर व कलीचा कांहीं भाग एवढ्या मोठ्या

काळांत अखंड फिरणारी ही विभूति होती तरी कशी! ही व्यक्ति कविकल्पनेंतील होती का खरीच होती, असे कोणीं विचारल्यास त्यांत कोणाचाहि दोष नाहीं. असे प्रश्न श्रद्धेने, अश्रद्धेनें, सदिच्छेनें, हेटाळणीनें ज्याच्या त्याच्या स्वभाव-धर्माप्रमाणे विचारले जातातहि. उत्तर मिळाले नाहीं कीं 'पुराणे म्हणजे भाकडकथा आहेत,' असा शेराहि मारला जातो, ह्याचा सर्वांनाच अनुभव आहे. नारदासंबंधींच्या प्रश्नाला थोडक्यांत उत्तर देण्याचा प्रयत्न करून आमच्या पुढील कथानकाचें सूत्र आम्ही हातीं घेणार आहो.

श्रीमदाद्य शंकराचार्यांनीं, सनातन वैदिक धर्माविरुद्ध उघड व प्रच्छन्न चळवळ करणाऱ्या अनेक पंथीयांचें पूर्ण खंडन करून खरा वैदिक धर्म लोकांना समजावून दिला. अनेक संशयित गोष्टींत शास्त्रदृष्ट्या धर्मनिर्णय दिले, व हें काम अव्याहत चालण्याकरिता भारताच्या चार दिशांना चार मठांची उभारणी केली. ह्या चारहि मठावर निरनिराळे अधिपति नेमलेले असतात. ही मठस्थापना शके ६३० ते ६४२ च्या दरम्यान झाली आहे. ह्या चार मुख्याधिपतींनीं कित्येक ठिकाणीं आपल्या मठाच्या पोटशाखा करून त्यांवर निरानिराळे अधिपति नेमले. ह्या सर्व अधिपतींना लोक शंकराचार्य ह्या नावानेच संबोधितात. वास्तविक त्या गादीवर बसलेल्या अधिकारी पुरुषांचीं निराळीं नांवें ठेवलेलीं असतांना, सामान्य जनता त्या सर्वांना शंकराचार्यच म्हणते. हे सर्व शंकराचार्य धर्म निर्णय देण्याचें काम आज मठस्थापना झाल्यापासून १२०० वर्षें सतत करीत आहेत. आता आपण असा विचार करु कीं कांहीं चमत्कार होऊन हा मठस्थापनेचा प्रकार आणखी हजार-दोन हजार वर्षांनीं त्या वेळच्या लोकांच्या स्मरणांतून गेला व आपल्या ह्या काळच्या गोष्टी ते लिहीत आहेत. ते लोक त्या कथांतून लिहितील कीं, 'शंकराचार्य नांवाचे अलौकिक बुद्धीचे विद्वान् संन्यस्त महर्षि भारताच्या चारी दिशांना हिंडून १२०० वर्षेंपर्यंत सतत धर्मप्रचाराचें, धर्मशिक्षण देण्याचें कार्य करीत होते.' त्या कथा लिहून झाल्यानंतर आणखी पांचशें वर्षें होऊन गेलीं आहेत असें समजा. आपल्या ह्या वेळच्या मानानें त्या वेळचे, आयु-

मर्यादा ३०-४० वर्षांपर्यंत आलेले विद्वान् पुरुष, त्या कथा वाचून १२०० वर्षें सतत धर्मप्रसार करणाऱ्या शंकराचार्यांना श्रद्धेने देवकोटींत टाकतील, ' चिरजीव ' सदरांत ढकलतील, तर कांहींजण त्या कथांना भाकडकथेच्या वर्गांत घालून मोकळे होतील. हल्लींच्या स्वर्गाच्या कल्पने-प्रमाणें त्यावेळीं स्वर्ग असतील तर त्याकाळीं स्वर्गात असणारे आपण, त्या पृथ्वीवरच्या विद्वान् मंडळींना ह्या कथांचा उलगडा कसा होत नाहीं, असा अचंबा वाटून त्याच्या अज्ञानाला हंसूं. नारदाच्या बद्दल बोलताना आम्हांला हल्लींचे स्वर्गस्थ पुरुष असेच हंसत असतील. श्रीसमर्थ राम-दासांच्या मठस्थापनांच्या अचाट उद्योगाच्या कथाहि धर्मप्रचार करणाऱ्या अनेक मठाधिपति, रामदासांना कालांतरानें एक रामदास समजून लिहि-णाऱ्या काव्यकल्पनेत वावरणाऱ्या ग्रंथकारांच्या ग्रंथांतून सामान्य वाचकांची दिशाभूल करतील. हजारों वर्षें अव्याहत टिकलेल्या सूर्यवंशाचे उपाध्याय वसिष्ठ ऋषि व यादववंशाचे उपाध्याय गर्गमुनि होते असें आज आपणहि समजत आहों. महर्षि वसिष्ठाच्या वंशाकडे सूर्यवंशाचें व गर्गमुनींच्या वंशाकडे यदुवंशाचें पौरोहित्य होतें. त्या त्या वंशातील पुरोहितांना वसिष्ठ व गर्ग हीच संज्ञा मिळाली, ही साधी गोष्टाहि आपल्या लक्षांत येत नाहीं. मिथिलेचे अनेक जनक राजे पहिल्या आत्मज्ञानी जनक राजांत सामावून गेले आहेत. सर्व पुराण ग्रंथकार महर्षि व्यासाचें नांव धारण करतात. सर्व हरिदास आपल्याला नारदांच्या परंपरेंतील म्हणवितात. कमलपत्रांखालीं, निळीखालीं झाकलेले सरोवरातील पाणी शीतल, स्वच्छ, मधुर व समाधानकारक असतें. पण तें प्राप्त होण्याकारितां कमलपत्रें व नीळ हलक्या हातानें बाजूला करावीं लागतात. पुराण ग्रंथाची स्थिति अशीच आहे. पुराण ग्रथात त्या काळीं घडलेले सृष्टिचमत्कार, त्या काळीं वावरणाऱ्या अलौकिक व्यक्ति, त्यांच्या हातून झालेल्या मुत्सद्दीपणाच्या व चातुर्याच्या गोष्टी, त्याकाळचे प्रचलित धर्म व चाली, त्याकाळीं लागलेले शोध ह्या सर्वांचें चित्रण कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरून लेखकानें काव्यपूर्ण, गूढ व मनोहर भाषेत केलेलें असते. म्हणून लेखकाशीं समरस झाल्याशिवाय त्यांचे ग्रंथ उकलतच नाहींत. रसाळ कथांच्या आस्तरणा-

खालीं पूर्वजांचें तत्त्वज्ञान, त्यांनीं लावलेले शोध, प्राचीन राष्ट्रांचा बोधप्रद इतिहास अशा अनेक बाबी सुंदर तऱ्हेनें झांकून ठेवलेल्या असतात. बारकाईनें व एकाग्रचित्तानें वाचणाऱ्या रसिकाला पुराण ग्रंथ म्हणजे पूर्ण तृप्ति देणारी ज्ञानामृताची मेजवानी वाटते. वर वर पाहाणाऱ्यांना ते ग्रंथ म्हणजे मनोरंजन करणाऱ्या अद्भुत भाकडकथा वाटतात. ज्ञानेश्वर महाराजांनीं अशा वाचकांना गाईच्या स्तनातील अमृतोपम दूध पिण्याला अपात्र असणाऱ्या गोचिडाची उपमा दिली आहे. आपला ग्रंथ वाचताना वाचकांनीं कसा वाचावा ह्याबद्दल ज्ञानेश्वर महाराजांनीं सावधागिरीची सूचना देऊन ठेविली आहे. 'जैसे शारदीयेचे चंद्रकळे । माजीं अमृतकण कोवळे । ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे ॥ तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपणा चित्ता । आणूनियां ॥ ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंतःकरणे । आथिला तोचि जाण । मानूं इये ॥'

ही ज्ञानेश्वरांची सूचना नीटपणे समजून घेऊन पुराणग्रथ पाहावे, म्हणजे त्यांतील गूढ भाग सहज उकलतील. हरिभजनाच्या द्वारें जन-मनें आपल्याकडे आकर्षून सर्व जन्मभर लोकांना सर्व प्रकारें कल्याणाचे मार्ग दाखविण्याचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून जनसेवा करणारे म्हणजे सर्वांतर्यामीं असणाऱ्या परमात्म्याची सेवा करणारे आपल्यासारखे शेंकडों ब्रह्मचारी नारदऋषींनीं आपले शिष्य म्हणून तयार केले. नारदऋषि शिष्य निवडतांना फार काळजी घेत. नारदऋषि स्वतः गौरवर्णाचे, नाकीं डोळीं फारच देखणे, सर्व शास्त्राचे अध्ययन केलेले, कंठ फारच मधुर असलेले, गायन व नृत्य कलेंत पूर्ण निष्णात, व्यवहारचतुर असे अत्यंत तेजस्वी ब्रह्मचारी होते. आपले शिष्य निवडतांना ब्रह्मचाऱ्याची परीक्षा ते अत्यंत कसोशीनें घेत. मुख्यतः त्याच्या बुद्धिमत्तेची ते परीक्षा घेत. शरीरसामर्थ्य, रूप, गुण, कंठाची माधुरी यांबरोबरच बुद्धीची चमकहि त्यांच्या कसोटीस उतरली तरच ते आपल्या शिष्यशाखेंत त्याला घेत. असा परीक्षा करून घेतलेला शिष्य नारदऋषींच्या खास शिक्षणाखालीं त्यांच्या सान्निध्यांत बारा वर्षें राहिला म्हणजे तो प्रतिनारद बने. नारदीय विद्यापीठाचा स्नातक म्हणून तो विद्यापीठाचा गणवेष धारण करून नारदांच्या आज्ञेनें

कार्य करण्याकरितां संचारार्थ बाहेर पडला कीं तोंहि आपल्याला नारदच म्हणवी. नारदविद्यापीठाच्या शिक्षणक्रमांत, त्या वेळच्या सर्व ज्ञात भारत-भूपृष्ठाचा प्रत्यक्ष परिचय हा विषय प्रामुख्यानें घेतला जाई. त्या वेळचे देव, यक्ष, गंधर्व, किन्नर, राक्षस, मानव यांचे भूप्रदेश, त्यांचे धर्म, चालीरीति, इतिहास, एकमेकाशीं असलेले संबंध यांचा परिचय संचारार्थ बाहेर पडणाऱ्या नारदाला असे. विद्यापीठाच्या आज्ञेनें ज्या लोकांत, ज्या भूप्रदेशात नारद आपल्या कार्यार्थ हिंडे त्या लोकांत, त्या भूप्रदेशात आपल्या अंगच्या लोकोत्तर गुणानें, प्रेमळपणानें सर्वांचा आवडता, विश्वासातला, सल्लागार बने. 'नारदाला' कोठेंहि जाण्यास कोणाचा केव्हांहि प्रतिबंध नसे, ह्या पुराणान्तरीं आढळणाऱ्या वाक्यांतील रहस्य हें आहे. संचार-कार्यार्थ हिंडणाऱ्या नारदानीं वर्षातील एका ठरींव कालांत एकमेकांना भेटून आपापले अनुभव एकमेकांना सांगावेत, असा नारदीय विद्यापीठाचा दंडक असे, आणि तो कसोशीनें पाळला जातो कीं नाहीं त्याच्यावर मुख्य देवर्षि नारदांची नजर असे; ह्यामुळें सर्वांची सर्व ठिकाणची माहिती ताजी राहून 'नारदा'ची सर्वज्ञ म्हणून कीर्ति कायम राही. विद्यापीठाच्या मूळ प्रवर्तक देवर्षि नारदांच्या मागून विद्यापीठाचे मुख्य देवर्षि नारद म्हणून ह्या शेंकडों नारदांतून त्यांच्या मतानेंच सर्वांत अधिक अनुभवी, प्रभावी, व त्या कार्याला योग्य अशा नारदाची सर्वांच्या मतानें निवड होई. अत्यंत स्वार्थत्याग, निर्मत्सर्य, जनताजनार्दनाची निष्काम सेवा ह्या गुणांची परमावधि अंगीं असलेल्या नारदांच्या मध्यें पूर्ण ऐकमत्य असून सर्व कार्य एकविचारानें, एक तत्त्वानें चाले, ह्यांत कांहीं नवल नाहीं. नारदीय संस्थेचा असा इतिहास आहे. भिन्न भिन्न नारद हजारों वर्षे जगाला एकरूप वाटत राहिले. पुराण-लेखकानीं आपल्या काव्यमय वाणीनें एकाच नारदाचीं स्तुति-स्तोत्रें गाइलीं यांतील रहस्य असे आहे. असो. आतां आपण आपल्या प्रस्तुत कथानकाकडे वळूं.

नारद निघून गेल्यानंतर शूरसेन राजा आपल्या मुत्सद्द्यांच्या सल्लयानें मथुरा नगरीपासून दहा योजनें दूर असलेल्या एका समृद्ध गौळवाड्यांत

राणी शीतलादेवी व युवराज शिनि यांच्यासह गुप्तपणें जाऊन राहिला. तेथील लोकांत तो पूर्णपणें मिसळला. अंधक दुंदुभी मथुरा नगरीचा अधिपति होऊन शूरसेन देशावर राज्य करूं लागला. त्याच्या कारकीर्दीत यादवांचें महत्त्व राजदरबारांत पार नाहींसें होऊन भोजांना यादवांचे स्थान मिळालें. ह्या कारकीर्दींत यादवांचा फार छळ झाला. मिळविलेल्या राज्याचा स्वतः दुंदुभीला स्वस्थपणें उपभोग घेतां आला नाहीं. त्याचा पुत्र दरिद्योत महापुंड होता. कपटनीतींत त्याची बापावर ताण होती. मथुरानगरीचें आधिपत्य शूरसेनाकडून घेतांना त्या रात्रीं मथुरानगरींत घातलेल्या गोंधळांत दरिद्योताचाच मोठा वांटा होता. मथुरेंतल्या ज्या विश्वासघातकी स्वामिद्रोही लोकांकडून, सुरुंग लावून वाडे पाडणें, आगी लावणें, आगींतून प्राण वांचविण्याकरितां धडपड करणाऱ्यांना आगींत ढकलून जिवंत जाळणें, अशीं अनन्वित कृत्यें करवून घेण्याची कामगिरी ह्या दरिद्योतानेंच केली होती, तीं राजद्रोहाचीं कृत्ये पार पाडण्याकरितां दरिद्योतानें त्या दुष्ट लोकांच्यापुढें द्रव्याच्या राशी ओतल्या होत्या. राज्य-क्रान्तीनंतर नवीन राजवटींत त्याना अधिकाराच्या जागा देऊं केल्या होत्या. पण प्रत्यक्ष राज्य प्राप्त झाल्यावर इतक्या हलक्या लोकांच्या हातीं अधिकाराच्या जागा देण्यास दुंदुभी नाकबूल झाला. रक्ताला लालचावलेला हिंस्र प्राणी जसा अनावर होतो तशी त्या दुष्ट लोकांची स्थिति झाली. दुंदुभीला राज्य मिळवून देतांना त्या लोकांनीं जे अनाचार केले ते दुंदुभीला आवडले, पण दरिद्योतानें कबूल केल्याप्रमाणें अधिकाराच्या जागा हस्तगत न झाल्यामुळें हे लोक खवळले व नवीन राजवटीला अत्याचार करण्याच्या धमक्या देऊं लागले. दुंदुभी राजाला ती गोष्ट सहन झाली नाहीं. यादवांच्या राजवटींत अनन्वित अत्याचारांना प्रत्यक्ष प्रोत्साहन देऊन ते करविणारा दुंदुभी स्वतः राजा होतांच त्या अत्या-चाऱ्यांची प्रतिष्ठा न ठेवता त्यांचें निर्मूलन करण्याचे उद्योगाला लागला ही गोष्ट दरिद्योताला पसंत पडेना. ह्या बाबतींत बापलेकांत कलह सुरू झाला. दुंदुभीनें आपल्या म्हणण्याप्रमाणें त्या दुष्ट लोकांचा बहुतेक निकाल लावला, पण ह्या घरांतला द्वेषाग्नि कांहीं त्याला विझवितां आला नाहीं. तो

द्वेषाग्नि सारखा धुमसत राहिला व ह्या बारा वर्षांच्या आंत त्या अग्नीच्या ज्वाला आसमंतांत इतक्या जोरानें पसरूं लागल्या कीं त्या कशा विझवा-व्यात ह्या चिंतेंत व उद्योगांत दुंदुभीला अवांतर राजकारणाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष्य देण्यासहि फुरसत सांपडेना व सुचेना.

शूरसेन राजाचा त्याच्या सर्व अनुयायांसह नाश झाला असें दुंदुभी समजत होता. पण बारा वर्षांच्या अज्ञातवासानंतर शूरसेन जिवंत असून त्याचा पुत्र शिनि मथुरेपासून बारा योजने दूर असलेल्या जहागिरीचा मालक झाल्याचें त्याच्या कानांवर आलें. आपल्या शत्रूला बळावून देण्यांत दरिद्योताचें-प्रत्यक्ष आपल्या पुत्राचें-अंग आहे असें समजताच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. घरांतल्या कलहाग्नीचें स्वरूप फारच उग्र होऊन शेवटीं त्यात दुंदुभीचा बळी पडला. कपट-नीतींत बापसे बेटा सवाई ठरून दुंदुभीला पदच्युत करून दरिद्योत राजा झाला.

यादवाधिपति शिनि रैवतपर्वताला लागून असलेल्या समृद्ध प्रदेशांत मोठा जहागिरदार म्हणून उघडपणें नांदूं लागला. दरिद्योतानें बावीस वर्षें राज्य केलें. नंतर त्याचा पुत्र पुनर्वसु याने वीस वर्षें राज्य केल्यानंतर त्याचा पराक्रमी पुत्र आहुक मथुरेचा राजा झाला. दरिद्योतापासून आहुकापर्यंतच्या कालांत रैवतक जहागिरीवर शिनि, स्वयंभोज, हृदिक असे तीन मालक येऊन आहुकाच्या वेळीं शिनीचा पणतु देवमीढ जहागिरदार झाला होता. मथुरेचा पराक्रमी राजा आहुक व रैवतक जहागिरीचा भाग्यशाली जहागिरदार देवमीढ आपापल्या पणजोबांच्या काळचें वैर विसरून राजा व विश्वासांतला मांडलिक या नात्यानें राहूं लागले होते. आहुक राजा व देवमीढ जहागिरदार दोघे संततीच्या बाबतींत भाग्यशाली होते. आहुकाला देवक व उग्रसेन असे दोन तेजस्वी पुत्र झाले. देवमीढ जहागिरदाराला शूरसेन नांवाचा एक देवोपम पुत्र झाला. त्यानें आपल्या शहाणपणानें सर्व शूरसेन देशात राजकारणी मुत्सद्दी म्हणून कीर्ति मिळविली. त्याचा पराक्रमी पूर्वज प्रसिद्ध शूरसेन याचा तो अवतार आहे असें लोक बोलूं लागले. शूरसेनाची पत्नी मारिषा ही भरतखंडांत एक आदर्श माता झाली. शूरसेनाचे मुख्य सल्लागार देवर्षि

नारद ! शूरसेन-मारिषा ह्या भाग्यशाली पतिपत्नींना वसुदेव आदिकरून दहा पुत्र झाले. ते रूपगुण-संपन्नींत देवांनाहि लाजवितील व पराक्रमाच्या बाबतींत इंद्राच्या बरोबरीचे शोभतील असे झाले. वसुदेव तर विद्वत्ता, शहाणपण व मुत्सद्दीपणा ह्या बाबतींत मूर्तिमंत बृहस्पति होता. शूरसेन-मारिषा यांच्या पृथा आदिकरून पांच कन्या पुढें वीरमाता म्हणून प्रसिद्धीस आल्या. 'पृथा ही पराक्रमी पांडवांची माता,' इतकें सांगितल्यावर अधिक वर्णन करण्याची जरूर नाहीं. हें रैवतक जहागिरदाराच्या संततीचें वर्णन झालें.

मथुरा नगरीच्या आहुक राजाचे पुत्र देवक व उग्रसेन ह्यांनाहि पुष्कळ संतति झाली. वडील मुलगा देवक ह्याला देववान् आदि चार पुत्र व धृतदेवा आदिकरून सात कन्या झाल्या. कन्यांपैकीं देवकी ही भगवान् कृष्णाची माता त्रैलोक्याला वंदनीय झाली. उग्रसेनाला कंस आदिकरून दैत्यतुल्य पराक्रमी नऊ पुत्र व पांच कन्या झाल्या. देवक व उग्रसेनाची आत्या म्हणजे आहुक राजाची भगिनी आहुकी ही पुढें प्रसिद्ध ब्रह्मवादिनी म्हणून प्रसिद्धीस आली. काहीं राजकारण साधण्याकरिता अक्रूराशीं तिचा विवाह झाला. पुढें ओघानें ती गोष्ट आपल्यापुढे येणारच आहे. देवक-उग्रसेन ह्यांच्या गुण-स्वभावांत दोन ध्रुवांइतकें अंतर होतें. देवक अत्यंत सरळ स्वभावाचा तर उग्रसेन दुंदुभीची बरोबरी करण्याइतका कुटिल प्रवृत्तीचा. देवक जितका शांत तितका उग्रसेन तापट; देवकाच्या ठिकाणची दैवी संपत्ति जितकी आनंददायक होती तितकी उग्रसेनाच्या ठिकाणीं असणारी आसुरी संपत्ति त्याच्या नांवाप्रमाणेंच उग्र व दुसऱ्यांना भेडसावणारी होती. देवकाला बाजूला ठेवून वडिलांच्या मागे आपण शूरसेन देशाच्या सिंहासनावर बसावें अशी उग्रसेनाची महत्त्वाकांक्षा होती व त्या दिशेनें त्याचीं सर्व कारस्थानें चाललीं होतीं. आपला भाऊ देवक यादवांचा कैवारी असल्यानें तो राज्यावर येतांच भोजांना तापदायक होईल असें सांगून दरबारांतील बहुतेक सर्व प्रमुख स्थानीं असलेले भोज सरदार त्यानें आपल्या बाजूचे करून घेतले होते. देवक, व यादवांतील रैवतक जहागिरीचा जहागिरदार पराक्रमी शूरसेन यांचा एकमेकांवर फार

लोभ होता हें सर्वांना माहीत होतें. राज्यांतील इतर सरदारांप्रमाणेंच शूरसेनानेंहि मथुरेंत आपला प्रासादतुल्य वाडा बांधला होता. पुष्कळ वेळां आपल्या मुलांमाणसांसह तो त्या वाड्यांत जाऊन राही; त्यावेळीं देवकाचीं मुलें-माणसेंहि त्याच्या कुटुंबांत चार आठ दिवस राहावयास जात, इतका त्याचा घरोबा होता. देवकाचें वसुदेवावर तर पोटच्या मुला-प्रमाणें प्रेम होतें. प्रमुख भोज मंत्र्यांना, सरदाराना ह्या गोष्टीचा अत्यंत संताप येई, पण देवक हा भावी मथुराधिपति व्हावयाचा असल्यामुळें ते आपला संताप उघडपणे दाखवूं शकत नव्हते. परन्तु देवकाला बाजूला सारून आपल्या पक्षाचा पूर्ण कैवारी उग्रसेन मथुराधिपति झाला तर त्यांना मनापासून पाहिजे होतें. राजकारणाचे फांसे तसे पडूंहि लागले होते. उग्रसेनाच्या कुटिल कारस्थानांत भोज प्रमुखांनीं मनापासून भाग घेतला होता.

एक दिवस मथुरेंत शूरसेनाच्या बागेतील विष्णु–मंदिरात मध्यरात्रीं देवर्षि नारद व यादवांचे कुलोपाध्याय गर्गाचार्य मुनि संभाषणात दंग झाले होते. संभाषण ऐन रंगात आल्यावर व आपण म्हणूं त्या गोष्टीला गर्गाचार्य होय म्हणतील अशी आपल्या भाषणाची मोहिनी त्यांच्यावर पडली अशी खात्री झाल्यावर नारद एकदम म्हणाले, " बोला, गर्गाचार्य बोला, आतां तुम्हीच सांगा. अशा स्थितींत तुम्ही काय कराल ? यापुढें यादवांच्या छळाची ह्या राज्यांत परमावधि होईल. यादवांचे तुम्ही पुरो-हित आहांत. यादवांचें कल्याण होईल तेच करणें तुमचें कर्तव्य आहे. उद्यां ह्या विष्णुमंदिरांतील महापूजेच्या सप्ताहांतील शेवटचा दिवस आहे. महाप्रसादाकरितां देवक सहकुटुंब येथें येईल. भोजन–समारंभ वगैरे सर्व आटपल्यानंतर शूरसेन–देवक सुखगोष्टी करीत बसले असतांना तुम्ही तेथें सहज गेल्यासारखे करून देवकाचा हात पाहा आणि मीं सांगितलें त्याप्रमाणें त्याचें भविष्य त्याला सांगा. आचार्य, हल्लींच्या ज्योतिषशास्त्राचे प्रवर्तक म्हणून तुमची ख्याति झाली आहे. तुम्ही ज्योतिष वर्तवा. ज्योतिष खरें ठरण्याची काळजी मी घेईन. काय, मी म्हणतो तें आपल्याला पटतें ना ? " गर्गाचार्य मनापासून म्हणाले, ' देवर्षि

नारदांचें म्हणणें कोणाला पटणार नाहीं ? देवर्षीचें म्हणणें सत्य ठरणार, असें मला वाटतें. ' ह्याच वेळीं पहाऱ्यावरचा प्रहराचा तास वाजला. ' पहा सत्य आहे ' असें म्हणून गर्गाचार्य मुनींनीं टाळी वाजविली, नारद उठले, दोघां तेजस्वी तपस्व्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशीं शूरसेनाच्या वाड्यांत महाप्रसादानिमित्त मोठा थाटाचा भोजन समारंभ झाला. जवळजवळ सर्व मथुरानगरीला महाप्रसाद दिला गेला. पंक्तीवर पंक्ती उठल्या. शेवटच्या खास पंक्तीला शूरसेनाचे सर्व बांधव व राजघराण्यांतील सर्व मंडळी होती. भोजनसमारंभ झाल्यावर देवक कुटुंबियांव्यतिरिक्त सर्व मंडळी घरोघर गेली. समारंभांत झालेल्या निरनिराळ्या गोष्टींसंबंधीं शूरसेन–देवक सुखसंवाद करण्यात दंग असता एकाएकीं तेथें यादवांचे कुलोपाध्याय गर्गमुनि प्राप्त झाले. त्यांना पाहातांच शूरसेन–देवकांनीं उत्थापन देऊन त्यांना बसायला आसन दिलें. बसता बसता गर्गमुनि देवकाला अगदीं घरोब्याच्या नात्यानें म्हणाले, ' युवराज, ज्योतिषशास्त्रांपैकीं हस्तसामुद्रिकशास्त्राचा ज्योतिषशास्त्राशीं मेळ बसल्याचा अपूर्व चमत्कार आज माझ्या सहज नजरेस आला. त्याची पूर्ति आणखी एका हस्तपरीक्षेनें होणार आहे म्हणून मी येथें आलों. तुम्हां राज-घराण्यांपैकीं सर्वांच्या जन्मपत्रिका माझ्याजवळ आहेत. आज सुप्रभातीं तुझ्या कन्यांच्या पत्रिका सहज चाळूं लागलों तेव्हां एक मोठा चमत्कार दृष्टीस पडला. रोज मी माझें सकाळचें आह्निक आटोपताच ज्योतिष-शास्त्रांतील कांहीं सिद्धान्तांचे ताळे पाहाण्याच्या दृष्टीनें कांहीं पत्रिका चाळीत बसतों. त्याचा ताळा जमतो कीं काय हें पाहाण्याकरितां तुझी पत्रिका तपासली. काय चमत्कार सांगावा ! तुझ्या कन्यांच्या पत्रिकेंतील एक विशेष गोष्ट तुझ्या पत्रिकेंत स्पष्ट दृष्टीस पडली, आणि परम आश्चर्य वाटलें. आज येथें तुझ्या कन्या पाहातांच त्यांच्या पत्रिकांत पाहिलेल्या चमत्काराची मला आठवण झाली. ज्योतिषशास्त्राशीं हस्तसामुद्रिकाचा मेळ कितपत बसतो हें पाहाण्याच्या कुतूहलानें त्यांचे हात पाहिले. देवकराज, शूरसेना, काय महदाश्चर्य सांगूं तुम्हांला ? पत्रिकांत सांपडलेली गोष्ट हस्तरेषेंत स्पष्ट उमटलेली दिसली. देवकराज, आतां तुमचा हात पाहिला

कीं त्या गोष्टीची पूर्ति होणार आहे." देवक एकदम म्हणाला, "मग माझी हस्तपरीक्षा आतांच होऊं द्या. ज्योतिषशास्त्रप्रवर्तक आचार्य गर्गमुनींच्या-कडून हस्तपरीक्षा घेण्याचें भाग्य मलाहि लाभूं द्या." देवकानें आपला हात पुढें केला. गर्गमुनि हस्तपरीक्षा करण्यांत तन्मय झाले. शूरसेन व देवक आतां आपल्या कानावर कांहीं आश्चर्यकारक गोष्ट पडणार ह्या उत्कंठेनें त्यांचेकडे दृष्टि लावून बसले. कांहीं वेळाने देवकाचा हात सोडून गर्गाचार्योनीं हर्षाने टाळी वाजविली आणि त्याच क्षणीं देवर्षि नारद एकदम तेथें प्राप्त झाले. सर्वांनीं त्यांना उत्थापन दिलें. "काय गर्गाचार्य, कसला आनंद हा ? ज्योतिर्मार्तंडाना ज्योतिषशास्त्रांतील एकादा नवीन सिद्धान्त आढळला काय ?" "नवीन नाहीं, पण असलेल्या सिद्धान्ताची प्रचीति आली. ज्योतिषशास्त्राचा विजय असो." गर्गमुनि उद्गारले. "कोणता सिद्धान्त प्रचीतीला आला ? आमच्यासारख्या अनभिज्ञांना समजण्यासारखा असल्यास आचार्योनीं सांगावा." "देवर्षि नारद आणि अनभिज्ञ ! मग अभिज्ञ म्हणायचे तरी कोणाला ? आपण आसनावर बसावे. माझ्या प्रचीतीला आलेला चमत्कार आपल्या अवलो-कनाकरितां आपल्यापुढें ठेवतों."

गर्गाचार्योनीं असें म्हणतांच दाखविलेल्या आसनावर नारद ऋषि बसले व त्यांच्या अनुज्ञेने सर्वजण आपापल्या आसनावर बसल्यानंतर गर्गाचार्य बोलूं लागले. हस्त पाहाण्याच्या पूर्वी देवकाला सांगितलेली हकिगत नारदाना सांगून गर्गाचार्य म्हणाले, "आणि म्हणून मीं देवकराजाचा हात पाहिला. देवर्षे नारदा, आपण येथे ह्यावेळीं आलां नसतांत तर मी ह्या दोघांना कांहींच न सागतां गेलों असतों. कारण, एका मोठ्या महत्त्वाच्या उत्तम गोष्टीबरोबर एक अत्यंत वाईट गोष्टहि ह्यांना सांगावी लागणार आहे. नारद ऋषे, सर्व जगताला धीर देणारे आपण आतां येथें समक्ष हजर असताना, मला त्या गोष्टी सांगायला कांहीं हरकत दिसत नाहीं. देवकराज, ऐक. तुझ्या सर्व कन्यांच्या पत्रिकेंत सर्वजणी एकाच रूपगुणसंपन्न व इन्द्रतुल्य पराक्रमी वीराच्या भार्या होतील असा स्पष्ट योग दिसत आहे. तुझ्याहि पत्रिकेंत तुला एकाच

पराक्रमी जांवयाची प्राप्ति दिसत आहे. तुझ्या कन्यांपैकीं रूपगुणसंपन्न देवकीचा मुलगा तुझी कीर्ति अजरामर करील, त्याच्यामुळें त्रैलोक्य तुला पूजनीय मानील. देवकराज, ही तुझ्या परम भाग्याची गोष्ट सांगताना मला अत्यानंद होत आहे. आतां वाईट गोष्ट सांगतों, धीर धर. सर्वज्ञ महामुनि नारद तुझे पाठीराखे असतांना तुला काळजी करण्याचें कारण नाहीं. देवकराज, ऐक. सावधान चित्तानें ऐक. तूं युवराज असताना तुझ्या नशिबीं राज्यसुख दिसत नाहीं. नाहीं ! तें खात्रीपूर्वक तुला मिळणार नाहीं हें मी तुझी पत्रिका व हात यांचा मेळ पाहून सांगत आहें. कपट-कारस्थान तुला राजा होण्याचा योगच येऊं देणार नाहीं. पुष्कळ दिवस तुला पारतंत्र्यांत काढावे लागतील. पण नारदऋषींसारख्या महात्म्यांच्या कृपेनें तूं ह्या संकट-कालांतून मुक्त होशील. माझें ज्योतिष-ज्ञान ही गोष्ट सांगत आहे. सर्वज्ञ नारदांना प्रत्यक्ष काय दिसत असेल तें खरें."

गर्गाचार्यांचें भाषण संपतांच, प्रारंभींच्या त्यांच्या शब्दानें उल्हासित झालेला देवकाचा चेहरा भाषणाच्या शेवटीं एकदम पडला. तो दीन, चिंतायुक्त दिसूं लागला. तो व शूरसेन हात जोडून नारदांच्याकडे पाहूं लागले. त्यांना धीर देण्याकरितां नारदमुनि एकदा प्रसन्न मुद्रेनें हंसले, व म्हणाले, " देवका, गर्गाचार्यांनीं वर्तविलेलें भविष्य खरें ठरणार आहे. पण त्यांत भिण्यासारखें कांहींच नाहीं. तुझ्यावरच्या संकटापेक्षां तुझें भाग्यच मला अधिक उठावदार दिसत आहे. राजैश्वर्यापेक्षां अजरामरत्वच अत्यंत कल्याणकारक व स्पृहणीय आहे. मला तुम्ही सर्वज्ञ म्हणा कीं व्यवहारज्ञ समजा, मला तुझ्या भविष्यांतील काहीं गोष्टी स्पष्ट दिसत आहेत. पण माझ्यावर तुझा विश्वास आहे ना ?" देवक शूरसेन एकदम म्हणाले, "हें काय बोलता नारदा, देवर्षींच्या शब्दावर विश्वास न ठेवण्या-इतके का आम्ही पापी आहों ? आपला शब्द म्हणजे आम्हांला वेद-वाक्य ! आपल्या शब्दाच्या, आपल्या सल्ल्याच्या बाहेर आम्ही एक पाऊलहि जाणार नाहीं." नारद म्हणाले, " त्याबद्दल माझी खात्री आहे म्हणूनच मी आतां मला स्पष्ट दिसणाऱ्या कांहीं गोष्टींची सूचना व थोडासा सल्लाहि देतों. तुला राज्य मिळूं नये म्हणून चाललेलें भयंकर कारस्थान जसें

मला दिसत आहे तसा तुझा इन्द्रतुल्य पराक्रमी जांवईहि माझ्या नजरे-समोर स्पष्ट उभा आहे. त्यांचें तें कारस्थान पूर्ण होण्याच्या पूर्वी तूं आपला पराक्रमी जांवई आपलासा करून घे. शत्रू या कारस्थानानें तुला राज्य मिळणार नाहीं, पण तुझा जावई त्यांच्या दृष्टीसमोर येतांच तुझ्या जिवाला अपाय करण्याचा यमालाहि धाक वाटेल. मग तुझ्या त्या मानवी क्षुद्र शत्रूची तुझ्या जिवाला अपाय करण्याची हिंमत होणार नाहीं, हें कांहीं सांगायला नको. तुझे शत्रु भोजप्रमुख आहेत." "आणि माझा जांवई" उतावीळपणानें देवक बोलूं लागला. नारद त्याला थांबवून म्हणाले, "तुझ्या घरातच असल्यासारखा आहे. तो तुझा फारच आवडता आहे. तुझ्या जिवलग स्नेह्याचा—ह्या शूरसेनाचा—तो देवोपम पुत्र आहे. सर्व-गुण-संपन्न वसुदेवाला तं आपला जावई कर. सिंहासारखे रणशूर नऊ भाऊ ज्याचे पाठीराखे आहेत, ज्याच्या नजरेच्या इशाऱ्या-बरोबर हजारों यादवसेना व बलाढय गोपाल मंडळ हलूं लागेल, त्याच्या श्वशुराच्या जिवाला अपाय करण्याला भोज सरदार धजणार नाहींत. कपटी पण भ्याड उग्रसेन तर ती गोष्ट मनांतहि आणणार नाहीं. देवक, तुला वसुदेव जांवई म्हणून पसंत आहे ना?" देवक चटकन् म्हणाला, "अहाहा! वसुदेवासारखा जांवई मिळाला तर कोण नाहीं म्हणेल?" नारद शूरसेनाकडे पाहून म्हणाले, 'शूरसेना, हा संबंध तुला पसंत आहे का?' "देवर्षींनीं दूरवर दृष्टी देऊन ठरवलेली गोष्ट कोण नाकबूल करील? नारद ऋषींनीं ठरवलेली गोष्ट आणि माझ्या जिवलग देवकराजाशीं होणारा नात्याचा संबंध म्हणजे दुधात साखर पडल्यासारखी होणार आहे." शूरसेनानें आनंदानें अनुमति दिली. नारद म्हणाले, "छान! तुम्हाला दोघांना ही गोष्ट पसंत पडली. शूरसेन—देवक एक झाले कीं उग्रसेन-भोजांचें अर्धें कारस्थान लंगडें पडलें म्हणून समजा. गर्गाचार्य, आतां एका पाठोपाठ उत्तम चार मुहूर्त काढा. देवकाच्या उपवर चार मुलींचा वसुदेवाशीं शक्य तितक्या लवकर विवाह होऊं द्या."

लवकरच मथुरेंत मोठ्या थाटानें वसुदेवाचा देवकाच्या चार कन्यांशीं विवाह झाला. मथुरेंतल्या सर्व लोकांना नवल वाटलें. भोज मुत्सद्दी मनांत

चरकले. देवकाला नाहींसा करून गादी मिळविण्याचें उग्रसेनाचें कारस्थान वितळून गेलें. तो आतां निराळ्याच मार्गानें मथुरेचें आधिपत्य मिळविण्याच्या खटपटीस लागला. कांहींहि करून तांतडीनें उग्रसेनाला गादी मिळवून दिली तरच राज्यांत भोजांची प्रतिष्ठा कायम टिकेल, असें सर्व भोजाना वाटूं लागलें. स्वतः आहुक राजाचा ओढाहि यादवांच्याकडेच होता. तेव्हां ह्या आहुक राजाच्या मनात यादवांच्या खोट्यानाट्या गोष्टी भरवून त्याचें मत यादवांच्या विरुद्ध करण्याच्या उद्योगाला भोज मुत्सद्दी लागले वर डोकें काढू पाहाणाऱ्या यादवांच्या मध्यें फूट पाडून आपला कार्यभाग साधावा असेंहि त्यांनीं ठरविलें. ह्या शूरसेन–वसुदेवाच्या वेळीं त्यांच्याच चुलत घराण्यांत अक्रुर नांवाचा एक महत्त्वाकांक्षी पुरुष होता. त्याला शूरसेन व त्याचा पुत्र वसुदेव ह्यांचा होत असलेला उत्कर्ष सहन होत नव्हता. अक्रूराला मोठेपणा देऊन त्याच्याकडून ह्या शूरसेनाला शह देऊन मथुरेंतून दूर करण्याचें कारस्थान भोजांनीं योजलें. ह्या वेळेस काळहि त्यांना अनुकूल झाला. आहुक राजाची भगिनी आहुकी अत्यंत धोरणी व मोठी विदुषी म्हणून पुढें गाजली. आहुक राजा गादीवर आला त्या वेळीं ती एक महिन्याची होती. ह्या बहिणीचा आहुक राजानें फारच प्रेमानें व दक्षतेनें प्रतिपाळ केला. तिच्या बुद्धिमत्तेची चमक पाहून तर आहुक राजा तिचें फारच कौतुक करी. राजानें तिला शिकविण्याकारितां मोठमोठ्या पंडितांची योजना केली होती. ती पंचवीस वर्षांची झाली तेव्हां ब्रह्मवादिनी म्हणून तिची ख्याति झाली. आपल्या मनाप्रमाणें आपलें ज्ञानसंपादनाचें कार्य पूर्ण होईतों आपल्या लग्नाची गोष्ट न काढण्याबद्दल तिनें राजाला विनाविलें होतें. आपल्या प्रेमळ भगिनीची विनंति मान्य करून राजानेंहि, तिनें स्वतःला योग्य वाटेल तेव्हां लग्नाचा विचार करावा, अशी तिला मुभा दिली होती. तिच्या शहाणपणावर राजाचा इतका विश्वास होता कीं राजकारणांतहि तो तिचा सल्ला ऐके. उग्रसेनानें तिच्याकडून राजाचे मनांत देवकाबद्दल खोट्यानाट्या गोष्टी भरवून देण्याचा प्रयत्न केला. आहुक राजा विचारी होता तरी सतत आपल्या वडील मुलाबद्दल घरांतून व बाहेरून विपरीत गोष्टी ऐकून ऐकून त्याचें

मन देवकाबद्दल कलुपित होत चाललें होतें.

भोज मुत्सद्दयांच्या दुसऱ्या प्रयत्नालाहि यश आलें. तीस वर्षांच्या विदुषी आहुकीचें अक्रूरावर प्रेम जडलें. ह्या विवाहाला राजानें संमति दिली. हा विवाह-समारंभ मथुरेंत मोठ्या थाटानें झाला. अक्रूराचा राजघराण्याशीं संबंध जडतांच त्याचा दर्जा फारच वाढला. देवक-शूरसेनाच्याबद्दल राजाच्या कानांत विष ओतणाऱ्यांमध्यें अक्रूराची एक नवी भर पडली. एक दिवस आहुक राजा देवकाची कानउघाडणी करण्याच्या इच्छेनें त्याला फार बोलला, त्याच्या बद्दलच्या ऐकलेल्या खोट्यानाट्या गोष्टींचा त्यानें देवकाजवळ पाढा वाचून व त्या सर्व गोष्टी खऱ्याच आहेत असें धरून, तो त्याला बोलूं नयेत ते शब्द बोलून गेला. सात्त्विक देवकाला ते शब्द सहन झाले नाहींत. आपल्या जिवलग मित्राचा सल्ला घेण्याकरितां तो शूरसेनाकडे त्याच्या जहागिरीच्या गावीं चालता झाला. त्याच्या शत्रूंनीं ह्या गोष्टीला भलतेंच महत्त्व दिलें. राजानें युवराजाला त्याच्या दुर्वर्तनाबद्दल हद्दपार केला असें त्यानीं मथुरा नगरींत उठविलें. सर्व शूरसेन देशांत ही गोष्ट पसरविण्यांत आली. दुर्दैव असे कीं, ह्यापुढें आठ दहा दिवसांतच आहुक राजा एकाएकीं कालवश झाला. आणि उग्रसेनाला सर्वांनीं एकमतानें राज्याभिषेक केला. उग्रसेनाचें कारस्थान एकाएकीं असें यशस्वी झालें. उग्रसेन राजा झाला, आणि महादुष्ट आसुरी प्रकृतीचा दैत्यतुल्य कंस युवराज झाला. राजदरबारांत भोजांची प्रतिष्ठा परमावधीला पोहोंचली. यादवांच्या दुर्दशेला सीमा उरली नाहीं. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ, तसा अक्रूर यादवांच्या दुर्दशेला कारण होऊं लागला. देवकाला गर्ग-नारदांच्या वचनाची सत्यता पटली. नारदांच्या म्हणण्याप्रमाणें वसुदेवाशीं घनिष्ठ संबंध जोडण्याकरितां त्यानें आपल्या सर्व मुली वसुदेवाला देण्याचा निश्चय करून आणखी तीन मुलींचा वसुदेवाशीं विवाह करून दिला.

देवकाच्या ह्या कृत्याचा सर्व लोकांना आचंबा वाटूं लागला. आपल्या सर्व मुली एका वसुदेवाला देण्यांत देवकाचा काय हेतु आहे हें उग्रसेन-कंसादिकांना एक मोठेंच कोडें पडलें. वसुदेवाला जांवई करून, देवकानें

शत्रूपासून आपल्या जिवाला होणारा अपाय कसा चुकविला हें उग्रसेनादिक मनोमन जाणत होते. वसुदेवानें शस्त्रविद्यापारंगत अशी पराक्रमी यादवांची बलाढ्य सेना उभारल्याचें त्याना माहित होतें. त्याच्या भोंवतीं त्याच्या मल्लविद्यापारंगत स्नेही गोपाळ मंडळींचा प्रचंड जमाव होता व त्याचें एकासारखे एक पराक्रमी नऊ भाऊ त्याचे पाठीराखे होते, हें त्यांच्या दृष्टीसमोर होतें. शूरसेनाने आपल्या पाच मुली–वसुदेवाच्या बहिणी–निरनिराळ्या देशच्या बलाढ्य राजांना दिल्या होत्या. कुरुदेशाच्या पराक्रमी पंडुराजाला पृथा दिली होती. करुपदेशाधिपतीला श्रुतदेवा, कैकयदेशाधिपतीला श्रुतकीर्ति, चेदिदेशाधिपतीला श्रुतश्रवा व अवंतिदेशाधिपतीला राजाधिदेवी अशा मुली देऊन ह्या पांच बलाढ्य देशाधिपतींशीं नाते जोडून वसुदेवाचें सामर्थ्य वाढविलें होतें. अशा वसुदेवाशीं घनिष्ट संबंध जोडून देवक स्वतः निर्भय झाला होता. अंधक भोजांच्या प्रचंड सामर्थ्याशी टक्कर देण्याची ही तयारी होत आहे, हे उग्रसेन व कंस जाणून होते. आपलें बळ ज्यास्त ज्यास्त वाढविण्याचा त्यांचाहि उद्योग चालूच होता. मगध देशाचा अतिप्रबळ सार्वभौम राजा जरासंध याच्याशीं उग्रसेनाने स्नेह केला. जरासंधानें कंसाला आपल्या दोन मुली देऊन ह्या स्नेहाला नात्याचें रूप देऊन अधिक दार्ढ्य आणलें. शिवाय उग्रसेनानें अनेक राजांशीं स्नेह जोडून आपले हात बळकट केले होते. उग्रसेनाचा शत्रूंमध्यें फूट पाडण्याचा कुटिल उद्योगहि चालू होताच. त्यानें वसुदेवाच्या पांच भावांना आपल्या पांच मुली देऊन भावांभावांमध्यें कलह माजविण्याचा प्रयत्न चालविला होता. धोरणी शूरसेनानें व वसुदेवाच्या भावांनीं उग्रसेनाशीं नातें जोडण्याची संमति कां व कशी दिली हें एक तेच जाणोत. यानंतर शूरसेन व वसुदेव, उग्रसेन व कंस यांच्याशीं फारच प्रेमळपणानें वागूं लागले देवकहि आपल्या बाबतींत उग्रसेनानें केलेल्या भयंकर अत्याचाराची जणू काय क्षमा करून लहान भावाशीं स्वाभाविकपणें जसें वागतात तितक्या प्रेमळपणानें वागूं लागला. आपल्या प्रचंड सामर्थ्याला हे सर्वजण भ्याले व वसुदेवाच्या भावांशीं नातें जोडण्याच्या आपल्या धोरणी करामतीनें आपापसांत कलह होईल ह्या भीतीनें ते निवळले

असेंच उग्रसेन व कंस मनांत समजले, आणि त्यांनींहि शूरसेन, वसुदेव, देवकाशीं घरोब्यानें वागण्यास सुरवात केली. देवकानें वसुदेवाला जांवई केला ह्यांत कांहीं अस्वाभाविक नव्हतें; पण आपल्या सहा मुली त्यालाच देण्यांत काय गूढ होतें हें समजण्यास आतांपर्यंत कांहीं मार्ग नव्हता. त्याच्याशीं सख्य होतांच वारंवार वसुदेव-देवकांच्या घरीं जाऊन तें गूढ उकलण्याची कंस खटपट करूं लागला. कांहीं दिवसांनीं पुनः आश्चर्याचा धक्का सर्वांना, त्यातहि विशेषतः उग्रसेन-कंस-पक्षीयांना बसला. देवकाची सातवी आणि आता शेवटचीच रूपगुणसपन्न मुलगी देवकी लग्नाला योग्य झाली. तिच्या सुशील स्वभावाची व सौंदर्याची कीर्ति दूरवर पसरली होती. कित्येक राजेलोकांकडून तिला मागणी घातली गेली तिला मिळ-विण्याबद्दल पराक्रमी वीरपुरुषामध्यें अहमहमिका सुरू झाली. देवकानें सर्वांनाच नकार दिला, पण लग्नाच्या तयारीला मात्र मोठ्या उत्साहानें सुरवात झाली. कंसाने यासंबंधीं देवकाकडे विचारपूस करताच त्याला समजलें कीं देवकीनें वसुदेवालाच पसंत केला आहे व देवकराजहि वसुदेवाला तिला देण्यास सिद्ध झाला आहे. आतां मात्र कंसाच्या आश्चर्याची परमावधि झाली.

राजकुटुंबीय म्हणून कसाला लग्नसमारंभाच्या तयारींत भाग घ्यावाच लागला, व तो समारंभात मनापासून लक्ष घालीत असल्याचेहि दिसूं लागलें. त्याच्या अंतरींची रुखरुख मात्र वाढूं लागली. ह्या समारंभाच्या निमित्ताने मथुरेंत यादवांची गर्दी उसळली. उग्रसेन-कंस यांच्या भया-मुळें देशोदेशीं पागलेले यादव वसुदेवावरच्या प्रेमानें ह्या लग्नसमारंभाच्या निमित्तानें इतक्या प्रचंड संख्येनें मथुरेत जमले, कीं त्यांचा तो जमाव पाहून उग्रसेन-कंस बेचैन झाले. खुद्द वसुदेवाच्या जहागिरीवर सुसज्ज असलेली यादवसेना व मल्लविद्याविशारद गोपमंडळ मथुरेंत येतांच अंधक-भोज पक्षीयांचे तर डोळे दिपले. कुरुदेशाधिपति पंडुराजा याच्या व्यतिरिक्त करुष, कैकय, चेदि, अवंति देशाधिपति आपल्या परिवारासह समारंभास आले होते. त्यांचें तें वैभव पाहून मथुरानगरी दिपली. हिमनग प्रदेशांत राज्य करणारे देव, यक्ष, गंधर्व, विद्याधर, दानव वगैरे चौदा विद्या आणि

चौसष्ट कला यांमध्यें व विशेषतः अस्त्रविद्येमध्यें विलक्षण प्रगति केलेल्या राजांचे प्रतिनिधी वसुदेवाच्या निमंत्रणास मान देऊन आलेले पाहतांच कंसाच्या हृदयांत एक प्रकारची धडकीच भरली. मथुरेंतल्या लोकांनीं पूर्वीं कधीं पाहिला नाहीं असा हा समारंभ झाला. सुमुहूर्तावर शृंगारलेल्या भव्य लग्नमंडपांत आप्तेष्ट यादव, आप्त राजे, वैभवसंपन्न राजांचे प्रतिनिधी, मथुरा-नगरींतले प्रतिष्ठित नागरिक, शूरसेनराजमंडळ, वैदिक पंडित व तपःसंपन्न ऋषी यांनीं मंगलाक्षता टाकतांच सौंदर्यसंपन्न देवकीनें इंद्रतुल्य पराक्रमी वसुदेवाच्या गळ्यात माळ घातली. सर्वांनीं त्यांच्यावर पुष्पवृष्टि केली. मंगलवाद्यांचा गजर झाला. ऋषिमंडळींत असलेल्या देवर्षि नारदाना व सर्व ऋषिमंडळाला वधुवरांनीं नमस्कार केला. देवकीला नारदांनीं, अष्टपुत्रा-सौभाग्यवती भव, असा मंगल आशीर्वाद देताच जवळ उभे असलेले गर्ग-मुनि आनंदानें गहिंवरून असावधपणें बोलून गेले, “मीं वर्तविलेलें भविष्य सर्वांतर्यामीं असलेल्या प्रभूच्या कृपेनें आतापर्यंत खरें ठरलें. आता देवकीचा पुत्र शत्रूंचा नाश करून सात पिढ्यांपूर्वी गेलेलें यादवाचें राज्य प्राप्त करून घेवो व त्या सर्वेश्वराच्या आणि जनताजनार्दनाच्या कृपेनें माझें भविष्य खरें ठरो.” सर्व ऋषिमंडळींनीं एकदम ‘तथास्तु’ म्हणून शुभाशीर्वाद दिला. जवळच उभा असलेला कंस एकदम रागानें मूर्च्छित झाला. नारदांनीं त्याला सावध केलें. झालेली गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. कंस रागानें आतां उसळणार तोंच नारदांनीं त्याला राजमंडळासमक्ष कांहीं न बोलण्याचा त्याच्या कानात इशारा दिला, व भगिनीवरील अत्यंत प्रेमा-मुळें, आतां भगिनीवियोग होणार, ह्या कल्पनेनें कंस मूर्च्छित झाला असें त्याच्या मूर्च्छित पडण्याचें कारण त्यांनीं प्रगट केलें; आणि त्याच्याशीं बोलत बोलत त्याला घेऊन ते राजप्रासादांत कंसाच्या महालांत गेले पुढील सर्व समारंभ मोठ्या थाटानें पार पडला. वधुवरांची मोठी मिरवणूक निघाली, वसुदेवाच्या प्रासादतुल्य वाड्यांत मिरवणूक येऊन पोहोंचली; लक्ष्मीपूजनाचा समारंभ फारच प्रेक्षणीय झाला. कंसाबरोबर राजमहालांत गेलेले नारदमुनि या समारंभाचे वेळीं वसुदेव देवकीला शुभाशीर्वाद देण्याकारितां वसुदेवाच्या वाड्यांत आले. शुभाशीर्वाद दिल्यानंतर

त्यांचा निरोप घेण्याच्या निमित्तानें त्यांना थोडे बाजूला घेऊन त्यांनीं वसुदेव-देवकीला काय द्यायचा तो इशारा दिला. कंसाला नारदांनीं कानमंत्र देऊन त्याच्याशीं हितगुज करतांच त्यानें मान डोलविली. वसुदेवाशीं हितगुज करून त्याला कानमंत्र देतांच वसुदेवानेंहि मान डोलविली. नारदीय उद्योगपर्वाचा आमच्या दृष्टीनें शेवट झाला. त्याचा परिणाम काय झाला, हें पाहाण्याकरितां वाचकांनीं पुढील प्रकरणाकडे वळलें पाहिजे.

---

## प्रकरण ३ रें

# अद्भुत कारस्थान व जन्मरहस्य.

वसुदेव-देवकीच्या विवाहाला आतां दोन महिने होऊन गेले होते. पुनः श्रावण व॥ अष्टमीचा मध्य रात्रीचा प्रसंग. वसुदेवाच्या वाड्यांत देवकीच्या शयनमंदिराच्या बाहेर भेदरलेल्या स्थितींत कंस असतांना त्याचा हात धरून वसुदेव बोलत होता. 'कंसा, काय अविचार हा! केवढें आत्मघातकी धाडस हें! ज्योतिष्यांनीं वर्तविलेल्या भविष्याला घाबरून जाऊन तुझ्यासारख्या अंधक-कुलोत्पन्न राजपुत्रानें प्रत्यक्ष भगिनीचा घात करणारा अधम मारेकरी बनून चोरासारखें लपत छपत येथें यावें! केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे ही! यादवांना केवढें लांछन आहे हें! तुम्ही

आपल्याला अंधकभोज समजून यादवापासून मूर्खपणानें भिन्न समजतां ! तूं आणि मी दोघेहि वृष्णिकुळांत उत्पन्न झालेले वार्ष्णेय यादवच आहोंत. वृष्णिकुलोत्पन्न अंधक कंस मारेकरी ठरला तर वृष्णिकुलोत्पन्न शौरसेन वसुदेवालाहि लाजेनें मान खालीं घालावी लागेल. देवकीपुत्र तुझा नाश करणार ही भविष्यवाणी खरी समजून ती खोटी ठरविण्याकरितां त्या पुत्राला जन्म देणाऱ्या देवकीचाच वध करण्याकरिता तूं मारेकरी बनून येथें आलास, पण ह्या वेळीं तुझें शस्त्र मीं हिसकावून घेऊन तुला निःशस्त्र केला असताना आतां माझ्या ह्या वाक्यांत तुझा मारेकरी बनून देवकीच्या पुत्राचें काम मीं आतांच उरकून टाकलें, तर माझा हात कोण धरणार आहे ! पण क्षुल्लक जीवाच्या आणि क्षुद्र राज्याच्या लोभानें मारेकरी बनून आपल्या अधम कृत्यानें सर्व यादवकुळाला लांछन लावण्याचें काम, अस्सल रक्ताचा कोणताहि यादव करणार नाहीं. हा वसुदेव तर नाहींच नाहीं. ह्या वसुदेवानें सत्यप्रतिज्ञ म्हणून कीर्ति मिळाविली आहे. कंसा, तूं निर्भयपणें व सरळपणानें वागलास तर हा वसुदेव जिवंत असेपर्यंत आपल्या पुत्राच्या हातून राजद्रोह होऊं देणार नाहीं, ह्याची खात्री बाळग, असा निरोप नारद ऋषींच्या बरोबर तुला त्याच दिवशीं मीं पाठविला. असे असतां देवकीचा वध करण्याची कुबुद्धि तूं कां धरावीस हेंच समजत नाहीं. वसुदेव जिवंत असेपर्यंत देवकीच्या जिवाला अपाय करण्याचें मनांत आणणारा आत्मघातकीच ठरेल. ह्या वसुदेवाला कोणाकोणाचें किती साहाय्य आहे, हें तुझ्या ध्यानांत अजून आलें नाहीं, असें मी कसें म्हणूं ? माझ्या जिवाला अपाय करण्याचा प्रयत्न झाला तर तुमची काय स्थिति होईल, हें तुम्हीं समजून असलें पाहिजे. ह्या वसुदेवाच्या राजनिष्ठेवर पूर्ण विश्वास ठेवून तुम्हीं निर्भय राहिलें पाहिजे. सत्यप्रतिज्ञ ही माझी कीर्ति मी कसल्याहि परिस्थितींत गमावणार नाहीं. राजा सरळपणानें वागून आपलें प्रजापालनाचें पवित्र कर्तव्य करीत असेल, तोंपर्यंत हा वसुदेव राजाच्या केसालाहि धक्का लावणार नाहीं व भविष्य कांहींहि म्हणत असलें तरी आपल्या पुत्राकडून राजद्रोह होऊं देणार नाहीं. देवकीच्या पुत्रापासून तुला भीति आहे, अशी अजूनहि तुला

शंका असली तर तूं म्हणशील त्यावेळीं मी देवकीचा पुत्र तुझ्या स्वाधीन करीन. राजानें निर्भयपणें राहावे अशी माझी, ह्या सत्यप्रतिज्ञ वसुदेवाची, इच्छा आहे. आतांच ह्या गोष्टीचा अनुभव घे आतां घडलेल्या ह्या गोष्टीनें तुझी नालस्ती होईल म्हणून कोठेंहि वाच्यता न करतां तुझे कडून घेतलेलें हें खड्ग तुझ्या हातात देऊन येथून सुरक्षितपणें मी तुला जाऊं देत आहें. जा, निर्धास्तपणें जा." इतके म्हणून वसुदेवाने कंसाचें खड्ग कंसाचे हातांत दिलें. लज्जित झालेला कंस जाता जाता म्हणाला, "वसुदेवा, मी तुझ्या वचनावर विश्वास ठेवतों. ठेवूं ना? तुझा पुत्र मी म्हणेन त्या वेळीं माझ्या स्वाधीन करण्याचे तूं वचन दिलें आहेस असे मी समजूं ना? "वसुदेव बोलतो तेंच करतो." वसुदेवानें इतकें म्हणताच कंस निघून गेला.

शयन-मंदिराचा दरवाजा उघडून वसुदेव आंत गेला. देवकी गाढ झोपीं गेली असेल अशी त्याची कल्पना होती. पण बाहेर झालेला खड्गाचा खणखणाट व थोडी दंगामस्ती ह्याच्या योगें देवकी जागी होऊन घाबरून मंचकावर उठून बसली होती, तिने वसुदेव-कंसाचें सर्व भाषण ऐकलें होतें. वसुदेव आंत येताच ती घाबरून म्हणाली, "आपण काय वचन दिलेंत हें?" वसुदेव तिला आश्वासन देत म्हणाला, "घाबरूं नकोस. देवर्षि नारदांनीं सांगितलें तसेंच मी बोललों." देवकी दुःखानें म्हणाली, "आपला पुत्र कंसाच्या म्हणण्याप्रमाणें त्याच्या स्वाधीन केला तर तो काय करील माहीत आहे का? कंस किती दुष्ट व कठोर हृदयाचा आहे, ह्याची आपल्याला कल्पना आहे का?" "अगदीं पुरी कल्पना आहे. तूं काळजी करूं नकोस." वसुदेव तिला धीर देत देत पुनः म्हणाला, 'नारद ऋषींना कंसाच्या दुष्टपणाची पुरी जाणीव आहे. त्यावर काय तोड काढावी ह्याच्याबद्दल त्यांना व मला विचार करण्यास वेळ मिळावा, व त्याकरतां हें संकट थोडें दूर ढकलावें, म्हणूनच तसें वचन देण्यास त्यांनीं मला सांगितलें व मीं तें दिलें. जो आपल्या बहिणीचा प्राण घेण्यास उठला तो भाच्याची अवस्था काय करील ह्याची कल्पना करीत बसण्याची जरूर नाहीं. कंस कठोर हृदयाचा आहे, पण त्याच्या

हृदयानें एकदां एकाद्या बाबतींत कच खाल्ली म्हणजे त्याच्या इतका भेकडहि कोणी नाहीं. देवकी, तूं अगदीं निर्धास्त राहा. स्त्रीनें आपल्या पतीवर पूर्ण विश्वासून स्वतः निर्भय व नेहमीं आनंदी राहावें ती जितकी निर्भय व आनंदी राहील तितकी तिची प्रजाही निर्भय व आनंदी होईल असे ज्ञानी लोक सांगतात.'' आणखीहि पुष्कळ प्रकारें निरानिराळ्या गोष्टी बोलून वसुदेवानें देवकीच्या मनातील भीति घालविली.

देवकीच्या शयन-मंदिरासमोर त्या दिवशीं मध्यरात्रीं झालेला प्रसंग नारदांनींच कंसाला तसा सल्ला देऊन घडवून आणला होता. द्वंद-युद्धांत वसुदेवाशीं गांठ पडल्यास त्याला वसुदेवाचा धाक वाटावा, व वसुदेव देवकीच्या रक्षणाकरिता किती जागरूक आहे हे कंसाला कळून त्यानें पुनः देवकीच्या वाटेस जाऊं नये हा नारदाचा हेतु होता; आणि तो साध्यहि झाला. कंसाचा बेत त्यांनीं वसुदेवाला आगाऊच कळवून ठेवला होता. त्यामुळे तो प्रसग जसा जमायला पाहिजे होता तसा जमून आला.

ह्या प्रसंगानंतर सहा महिन्यांनीं एक दिवस कंस गर्गमुनींच्या आश्रमांत त्यांना मुद्दाम भेटण्याकारितां गेला. गर्गमुनींनीं त्याचें स्वागत केले. त्याला त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें राज्यासंबंधीं कुशल प्रश्न विचारले त्याची चिंताग्रस्त मुद्रा पाहून गर्गमुनि म्हणाले, "युवराज कंसा, तुझा चेहरा चिंताग्रस्त कां दिसतो? मथुरेसारख्या प्रबळ राज्याच्या युवराजाला चिंतेनें ग्रासावें हें नवल आहे!'' गर्गमुनींचें भाषण ऐकून कंस म्हणाला. "गर्गमुने, माझ्या चिंतेचें कारण तुम्हांला माहीत आहे. तुम्हींच देवकीचें भविष्य वर्तविलें. देवकीचा मुलगा आमचा नाश करून मथुरेचा स्वामी होईल. होय ना? देवकी चार महिन्यांची गरोदर आहे ही गोष्ट मला समजल्यापासून वारंवार तें भविष्य डोळ्यासमोर उभें राहतें. गर्गमुने, तुमचें भविष्य नेहमीं खरें ठरतें असें लोक बोलतात.'' "मी वर्तविलेलें भविष्य कधीं खोटें ठरल्याचें माझ्यातरी ऐकिवांत नाहीं. पण युवराज, भविष्य काळीं फार दूरच्या भविष्यकाळीं घडणाऱ्या गोष्टीबद्दल आतांपासून चिंतेनें व्याकुल होऊन बसावें हें युवराजाला—मथुरेच्या युवराजाला—तरी

निदान शोभत नाहीं, असें मला वाटतें." गर्गमुनींचे हें भाषण ऐकून कंसानें विचारलें, "काय म्हटलंत आपण आचार्य ? फार दूरच्या भविष्यकाळची ही गोष्ट आहे ? देवकीचा पुत्र जन्माला यावयाला आतां सहा महिन्यांचाहि अवधि नाहीं. सहा महिने हा काय फार दूरचा भविष्यकाळ आहे ?" ह्यावर गर्गमुनींनीं एकदम हंसून उत्तर दिलें. "सहा महिन्यानीं तें बालक जन्माला येताच दैत्येन्द्राप्रमाणे बलाढय युवराजावर एकदम झडप घालील. ही कल्पना किती हास्यास्पद आहे. आणि स्वतः युवराज ह्या कल्पनेनें घाबरून गेले आहेत, ही गोष्ट तर फारच हास्यास्पद आहे. शिवाय देवकीचा पुत्र तुमचा शत्रू आहे, पण तो कोणता पुत्र ? आमच्या भविष्याप्रमाणें तिला आठ पुत्र व्हावयाचे आहेत. व शेवटचा पुत्र मथुरेच्या राजाचा शत्रू असून त्याच्या हातून राजक्रांति होण्याचा योग आहे." गर्गमुनींचे हे भाषण ऐकून कंसाला थोडा धीर आला. देवकीचा आठवा पुत्र आपला शत्रू आहे हे ऐकून आपल्या नाशाचा योग अद्याप पुष्कळ दूर आहे अशी त्याची खात्री झाली. गर्गाचार्यांच्या भविष्याप्रमाणें सर्व गोष्टी व्हावयाच्याच अशी सर्वांची खात्री असे. देवकीच्या पहिल्या पुत्रापासून आपल्याला धास्ती बाळगण्याचे कांहीं कारण नाहीं हें त्यानें गर्गाचार्यांना नानाप्रकारें प्रश्न विचारून काढून घेतलें. भविष्यकाळीं वाईट फल देणारे पापग्रह कांहीं धार्मिक विधीनें केलेल्या होम-हवन-दानांनीं सौम्य होऊं शकतात, ही माहितीहि गर्गाचार्यांपासून त्याने मिळविली व तो स्वस्थानीं परत गेला.

वसुदेवाच्या डोक्यांतहि आतां निरनिराळे विचार घोळूं लागले. तो जसा रणशूर होता तसाच राजकारणपटुहि होता तो यादवांचें सैन्यबल हळुहळू वाढवीत होता, पण अंधक, भोज व मागध यांच्या एकत्रित प्रचंड सामर्थ्याला तोंड देण्याइतकें यादवसैन्य तयार होईल कीं नाहीं याची त्याला शंका होती. अंधक–भोजांच्या अमानुष छळामुळें देशोदेशीं पांगलेले यादव एकत्र केले तर त्यांचें संख्याबल फार मोठें होतें, पण अंधक–भोज यांच्यापुढें त्यांच्या मनानेंच कच खाल्ली असल्यामुळें नुसत्या संख्याबलाचा कांहीं उपयोग होणार नाहीं हें रणनीतिनिपुण वसुदेव

जाणून होता. अंधक-भोजांशीं अद्याप ज्यांचा कधीं संबंधच आला नाहीं, अंधक-भोजांना मदत करणाऱ्या मगध देशाच्या प्रबळ जरासंधाची धास्ती वाटण्यासारखे प्रसंग ज्यांना कधींच आले नाहींत असे निर्भय अंतःकरणाचे आडदांड तरुण एकत्र झाले तर त्यांच्या हातून कांहीं कार्य होईल असें वसुदेवाला वाटत होते. एकदा मनाने एखाद्या गोष्टींत कच खाल्ली कीं त्याची कितीहि तयारी केली तरी आणीबाणीच्या प्रसंगाच्या वेळीं तें एकदम निर्बल ठरतें हे वसुदेवाने अनुभवानें जाणलें होते. अंधक भोज पराक्रमाच्या, बुद्धिमत्तेच्या बाबतींत आपल्याला फारच भारी आहेत, त्यांच्यापुढे आपण बलहीन, तेजोहीन आहोंत, अशीच सर्व यादवांची कल्पना होऊन बसली होती. अशा यादवांच्या कडून अंधक-भोजाचें पारिपत्य होणें अशक्यप्राय होतें. यादवांच्या मुलांचें अगदीं लहानपणापासून संगोपन व शिक्षण, दुबळ्या, न्यूनगंड बाळगणाऱ्या यादव आईबापाजवळ न होता, गिरिकंदरीं रानावनांतून, नद्याकाठच्या समृद्ध प्रदेशात स्वतंत्र वृत्तीने राहणाऱ्या आडदांड लोकांत व्हावें, अशी वसुदेवाने दूरदृष्टीनें योजना केली होती. वसुदेवाला स्वतःलाही मुलें पुष्कळ होतीं. राजकारणावर दृष्टि ठेवून देवकराजाच्या सातही मुलींशीं त्यानें लग्न केले होते. त्याप्रमाणे दुसऱ्या निरनिराळ्या देशांत राहणाऱ्या देशाधिपतींशी व प्रबळ जमातींशीं स्नेहसंबंध दृढ व्हावा म्हणून आणखी सहा राजकन्या व सरदारकन्या त्यानें वरिल्या होत्या. तेरा बायकापासून त्याला साठ-पासष्ट मुलगे झाले होते. यादवांच्या मुलांप्रमाणेंच त्याने आपल्याहि मुलांना त्यांचें संगोपन व शिक्षण स्वतंत्र वातावरणांत व्हावें म्हणून आपल्यापासून दूर ठेवलें होतें.

गिरिकंदरांत, रानावनात, नद्याकांठच्या समृद्ध प्रदेशांत त्या वेळीं किती तरी गौळवाडे होते. गौळवाड्यांचें चालक गोपमंडळ फिरतें असे. ज्या ठिकाणीं गाईंना चरण्याकरितां तृणांना समृद्ध अशी वनांत जागा असेल, ज्या ठिकाणीं गोड पाण्याचे झरे व वनपुष्पांनीं, वनफळांनीं भरलेल्या वृक्षांच्या घनदाट राई असत, त्या ठिकाणीं ते आपल्या झोपड्या, गाई-वासरांचे गोठे बांधून आपले गौळवाडे तयार करीत असत.

कालान्तरानें त्या ठिकाणचें गवत व फळेंफुलें कमी पडूं लागलीं म्हणजे ते आपले गौळवाडे उठवून वनामध्यें दुसरी, त्या सर्व पदार्थांनीं समृद्ध अशी जागा शोधून काढून त्या ठिकाणीं आपली वस्ती करीत. एकेका गौळवाड्यांत हजारों गाई असत. प्रातःकाळीं प्रत्येक गोठ्यात गाईंच्या धारा काढण्याचा आवाज भरून गेलेला असे. तापत ठेवलेल्या डेऱ्यांतील दुधाचा मधुर सुवास प्रत्येक झोंपडींत भरलेला असे, व मोठमोठ्या डेऱ्यांतून दधिमंथनाचा होणारा घुमघुमणारा आवाज व गवळणींच्या मधुर कंठांतून निघालेल्या सुमधुर गाण्याचे आलाप यांनीं ऐकणाराचे मन प्रसन्न होई. धारा काढून झाल्या, ताकांतून लोणी वेगळे झाले कीं मुलांची व गोप मंडळींची न्याहारी होई. न्याहारीला आपल्या झोंपडीभोवतीं स्वतः पिकाविलेल्या सकस धान्याच्या भाकरी–पोळीवर मोठ्या आंब्याएवढा लोण्याचा गोळा प्रत्येकाला मिळे. ताजे दूध प्रत्येकाला मनमुराद प्यावयास मिळत असे. न्याहारी झाल्यानंतर गाई–वासरे चरावयास सोडीत. वासरे चारण्याचें काम लहान मुले करीत; गाई राखण्याचे काम तरुण मुलांच्याकडे असे. गौळवाड्याच्या जवळपासच्या कुरणांत वासरें चरत, मनमुराद चरता येईल अशा भागांत गाई दूरवर जात. मुलांच्या बरोबर त्यांना दोनप्रहरीं खाण्याकरितां शिदोरी दिली जाई. ते दोनप्रहरों शिदोरी सोडून जेवीत त्या वेळीं त्यांच्या जेवणांत ताक, दही भरपूर असे. वनफळे ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें हवीं तितकीं तोडून ते भक्षण करीत. गाई–वासरे एकदां चरायला सोडलीं कीं गोप–बालकांचे नाना प्रकारचे शारीरिक खेळ चालू होत. धावण्याची शर्यत लावणें, नेम धरून गोफण गुंडे फेकणें, मोठमोठे दगड उचलून फेकणें, उंच उंच झाडांवर झरझर चढून जाणें, लांब उड्या मारणें, उंचावरून उड्या टाकणें, जंगली वानरांच्या शेपट्या धरण्याचा प्रयत्न करणे, आट्यापाट्या, खो खो, धबाधबी, इत्यादि अनेक खेळ ते खेळत. हे खेळ झाले म्हणजे झाडांझाडांखालीं कुस्त्यांचे आखाडे सुरू होत मत्त खोंडांमध्यें ते झोंब्या लावीत. हरीण, ससे यांच्या पाठीमागें तीरासारखे धांवत. कोल्हे, लांडगे, तरस, व्याघ्र, रीस वगैरे हिंस्र प्राण्यांचा

सुगावा लागला कीं तरुण गोप त्याच्यावर धावून जात. नदीकाठ जवळ असेल तर नदीमध्यें यथेच्छ डुंबत; नदीच्या वाळवंटांत उन्हाच्या तिरपेला येऊन पडलेल्या सुसरी मारण्याची त्याना फार आवड, सायंकाळच्या वेळीं चरत चरत लाब लाब गेलेल्या गाई घराकडे वळविण्याकरिता त्यांची चाललेली धावपळ, गाईच्या नावानें चाललेली हाकाहाक, शीळ घालणें, बासरी वाजवणें अशी एकच घाई उडून जाई. लहान मुलें वासरांना घेऊन, थोडेंसें ऊन्ह असतानाच घराकडे परतत. सायंकाळीं तरुण गोपांनीं परतविलेलीं व चरून धुंद झालेलीं गाईचीं खिल्लारें वासराच्या ओढीनें शेपट्या उभारून गौळवाड्याकडे धांवत येत असताना त्याच्या पायाच्या धुरळ्यानें सर्व दिशा धुंद होत. वासरांना साद देण्याकरितां गाईचें हंबरणें, प्रत्युत्तरादाखल वासराचें हंबरणें यानीं सर्व गौळवाडा निनादित होई, त्यावेळची ती गौळवाड्याची शोभा अवर्णनीय असे. जिकडे तिकडें मंगल वातावरण निर्माण होऊन सर्वांचीं मनें प्रसन्न होत. शुभकालाला ' गोरज मुहूर्त ' म्हणून ज्योतिष्यानीं ठरविला आहे तो ह्या गौळवाड्याचा देखावा पाहूनच असावा असें साहजिकच वाटतें.

ह्या वेळीं मोठी गोपमंडळी आपलें शेतीकाम आटोपून घराकडे परत आलेली असे. गौळवाड्यापासून पाचदहा कोसांवर असलेल्या नगरात जाऊन गोरसविक्री करून गोपस्त्रिया परत येऊन मिळालेलें द्रव्य आपल्या पतींच्या हवालीं करीत व त्या द्रव्याचा अडाणी हिशोब चालत असे. तरुण गोपांनीं गाई गोठ्यामध्यें आणून दावणीला बांधल्या कीं पुनः गोप व गोपस्त्रिया धार काढण्याला सुरवात करीत. धारा काढून दूध तापविण्याची वगैरे नीट व्यवस्था लावल्यानंतर प्रत्येक झोंपडींत आपल्या मुलांबाळांसह गोपमंडळी आनंदानें भोजन करीत. त्यावेळीं रानावनात घडलेल्या गोष्टी तरुण गोप सांगत, नगरात पाहिलेल्या गोष्टींचें सुरस वर्णन गोपस्त्रिया करीत. शेतीचें काम चालू असतांना काहीं घडलेल्या गमतीजमती गोपाळ रंगवून सांगत. अशा रीतीनें प्रत्येक झोंपडी आनंदानें भरलेली असे. नंतर गोपस्त्रिया गाणीं म्हणून आपल्या लहान बालकांना थोपटून निजवीत. तरुण गोप दिवसाच्या श्रमानें गाढ झोंपीं जात.

गोपाळमंडळी गौळवाड्यात कोठेंतरी एकत्र जमून गप्पागोष्टी करून परत आपल्या झोंपड्यात येऊन गाढ झोपेच्या विश्रांति-सुखाचा अनुभव घेत. हें गौळवाड्यांतलें एक दिवसाचें वर्णन वाचून वाचकाच्या दृष्टीसमोर अनेक देखावे उभे राहातील. तृप्त होईपर्यंत गोरस भक्षण करण्याकरिता मिळत असल्यामुळें गोप, गोपस्त्रिया, बाल-गोपाळ यांचीं पुष्ट झालेलीं, व अगमेहनतीचे आणि शारीरिक खेळामुळे लोखंडासारखीं मजबूत बनलेलीं पिळदार शरीरे, त्यांची निर्भय आणि धाडसी चित्तवृत्ति, स्वतंत्र वातावरणात सर्वांची वाढ होत असल्यामुळे कोणत्याहि प्रकारच्या न्यूनगंडत्वाचा अभाव आणि त्यामुळे अंगीं आलेला स्वाभाविक आडदांडपणा, खेळकर व उमदा स्वभाव, निगा राखलेल्या पुष्ट गाईंचीं खिल्लारें, मशागत केलेलीं पिकानीं भरलेलीं डौलदार शेते, समृद्ध प्रदेश अशा किती तरी गोष्टी कल्पनेनें पाहून वाचकाना आनंद होईल. हे लोक इतके स्वतंत्र होते, कीं सक्तीनें कर वसूल करण्याकरितां त्यांच्या प्रदेशात पाऊल टाकण्याची राजसेवकाची हिंमत नव्हती. पण ते लोक आपण होऊनच धर्मशास्त्राच्या नियमाप्रमाणें राजाचा अंश राजाला पोहोचता करीत. गोरस–विक्रीवर व धान्याच्या निष्पत्तीवर ते विपुल द्रव्य मिळवीत असत. अशा ह्या स्वतंत्र वातावरणांत यादवाचों तरुण मुलें वाढविण्याची योजना वसुदेवानें केली होती. शिवाय नारदांच्या सल्ल्याप्रमाणे कांहीं यादव तरुण हिमनग-प्रदेशात राज्य करणाऱ्या स्वतंत्र, सुसंस्कृत, शस्त्रास्त्र-संपन्न देव यक्ष, गंधर्व यांच्या प्रदेशात वाढत होते.

वसुदेवाला आता एक मोठा बिकट प्रश्न फारच कुशलतेनें सोडवावयाचा होता. देवकीच्या मुलांच्या रक्षणाची काळजी त्याला घ्यावयाची होती. देवकीचे दिवस भरत आले होते. मुलगा झाला तर कंस त्याला घेऊन जायला येणार, आपल्या बोलण्याप्रमाणे तो त्याला द्यावा लागणार. पुढें कंसाच्या हातून त्या मुलाचें काय होणार, हें दिसतच होते. लौकिकदृष्ट्या आपल्या सत्यवचनी बाण्याला बाध न लागतां मुलाचें रक्षण त्याला करावयाचें होतें. कंसाला विश्वास वाटावा म्हणून देवकीला मथुरेतील वाड्यांत ठेविली होती. वसुदेव आपल्या जहागिरीच्या गांवीं मधून मधून

जाई, तेव्हा 'देवकीच्या रक्षणाची काळजी मीं सर्व प्रकारें घेतली आहेच. तुझी बहीण म्हणून तूंहि माझ्या गैरहजेरींत तिची विचारपूस करीत जा.' असे कंसाला त्यानें सांगून ठेवले होतें. असे सांगण्यात आपल्या वचनाबद्दल कंसाच्या मनात अधिकाधिक विश्वास उत्पन्न करावा असा त्याचा हेतु होता. देवकीला प्रसूत होण्यास अद्याप एक महिन्याचा अवधि होता. वसुदेव आपल्या जहागिरीच्या गावीं कांहीं कामानिमित्त गेला होता. एक दिवस तो तेथे असताना नारदमुनि अचानक त्याला येऊन भेटले. देवकीच्या पहिल्या मुलाबद्दल एक वर्षभर तरी कंस मागणी घालणार नाहीं अशी त्याच्या मनाची तयारी आपण करून ठेविली असल्याचे नारदानीं वसुदेवाला सांगितले वसुदेवाने मात्र मूल जन्मताच कंसाला आपण होऊन वर्दी द्यावी आणि आपल्या सत्यवचनीपणाचे प्रदर्शन करावे असे नारदानीं त्याला सांगून ठेवले. वसुदेवानं आपण मुलाच्या रक्षणाचे बाबतींत काय काय योजना योजून ठेवल्या आहेत त्या नारदाचे कानावर घातल्या; त्यातील कोणती योजना बरी, कीं आणखी दुसरीच कांहीं नवीन योजना केली पाहिजे हे चार-सहा महिन्यात आपण मुद्दाम येऊन कळवू असे आश्वासन देऊन नारद देवलोकीं निघून गेले.

मथुरेत परत येताच आपले व नारदाचे संभाषण देवकीच्या कानावर घालून तिच्या मनाची रुखरुख वसुदेवानं नाहींशी केली. आपल्या पुढील योजना कशा सफल करावयाच्या ह्यादि विचारांना तो आता निर्धास्तपणे लागला. देवकीला नऊ महिने नऊ दिवस पुरे झाले. कार्तिक शुद्ध पौर्णिमेस मध्य रात्रीं चंद्र माथ्यावर आला. सर्व मंदिरातून त्रिपुर लागले आणि देवकीची सुखप्रसूति झाली. मुलगा झाला. सर्व मथुरानगरी शीतल चंद्रप्रकाश व त्रिपुराचे लक्षावधि दीप ह्यानीं नयनमनोहर दिसत होती. सर्वांचीं हृदयें उल्हसित झालीं होतीं. युवराज कंस राजप्रासादाच्या गच्चीवरून तो नयनमनोहर देखावा पाहाण्यांत गुंग झाला होता. अशा वेळीं वसुदेव एकदम त्याच्या जवळ येऊन उभा राहिला. कंसाची दृष्टि वसुदेवावर गेली. सर्व सृष्टी आनंदानें बेहोष झालेली दिसत असतां वसुदेवाचे नेत्रात अश्रु उभे राहिलेले पाहून तो चमकला. त्याने वसुदेवाला ह्यावेळीं कां

आलास असा प्रश्न केला. वसुदेवाच्या सद्गदित कंठातून शब्द निघेना. त्याने कसें बसे आपल्या येण्याचे कारण सांगितले. तो म्हणाला, "कंसा, तुझी बहीण देवकी आताच प्रसूत झाली. मुलगा झाला, एवढे शब्द ऐकले आणि पुत्रमुखहि न पाहता माझ्या वचनाप्रमाणे तुला कळविण्याकरिता मी येथे आलो. त्या पुत्राचे संस्कार तूं सांगशील तर करावयाचे, नाहीतर तो तुझ्या ताब्यात दिला आहे असे समज. तूं त्याचा मामा आहेस. तुला वाटेल ती त्याची व्यवस्था कर." वसुदेवाची ती सत्यप्रियता पाहून आनदात दंग असलेला कंस चकित झाला. सर्व जग आनदात असताना वसुदेवाचे ते करुण शब्द ऐकून त्याचे हृदय भरून आले. तो म्हणाला, "वसुदेवा, देवकीला-माझ्या लाडक्या बहिणीला-पुत्र झाला आणि तुझ्या डोळ्यात अश्रु! मागे घडलेली गोष्ट तुझ्या चित्तात आहे. गर्गमुनींनी माझे समाधान केले आहे. नारदानी त्या गोष्टीला अनुमोदनात्मक पुष्टि दिली आहे ह्या तुझ्या पुत्रापासून मला धास्ती नाही, इतकेच नव्हे तर देवकीला सात पुत्र होईपर्यंत मला कसलाच विचार करायला नको. आठवा पुत्र माझा वैरी आहे पाहू त्या वेळी काय करावयाचे ते! ह्या पुत्राचा-माझ्या भाच्याचा-जन्मोत्सव थाटात झाला पाहिजे. वसुदेवा, तूं आपल्या जहागिरीत असतास तर पुत्रजन्मोत्सव तू जसा थाटाने केला असतास त्या थाटाने नव्हे तर राजधानींत त्याहिपेक्षा थाटानें जन्मोत्सव झाला पाहिजे. त्याचे सर्व जन्म-संस्कार यथाशास्त्र, राजपुत्राला शोभतील, अशा थाटाने झाले पाहिजेत. जा, जा. लवकर जाऊन यथाविधि पुत्र मुख पाहा आणि जन्मसंस्काराला आनंदाने सुरवात करा. पुत्रमुख आनदाने अवलोकन करीत असलेल्या माझ्या बहिणीच्या भेटीला आणि भाच्याच्या मुखावलोकनाला त्याच्या आजोळच्या सर्व मंडळीबरोबर मी येत आहे."

हे कंसाचें भाषण ऐकून आपल्याला परमावधीचा आनंद झाला, असें वसुदेवाने दर्शित केले. कंसाच्या थोर अंत:करणाची त्याने अगदीं मोजक्या शब्दात स्तुति केली व तो आपल्या वाड्यांत परतला. हा झालेला प्रकार ऐकून सर्व वाडा आनंदाने भरून गेला. जन्मसंस्कार

राजैश्वर्यात सुरू झाले. सर्व मथुरानगरींत कंसाज्ञेनें हत्तीवरून शर्करा वांटण्यात आली. राजनौबती झडूं लागल्या. मंजुळवाद्याच्या सुरांनीं सर्व नगरी भरून गेली. वसुदेव-देवकीला पुत्ररत्न झाल्याचें सर्व नागरिकांना कळलें. हा सर्व दीपोत्साह पुत्रजन्मानिमित्तच आहे असे लोक आनंदाने बोलूं लागले. शर्करेनें तोंड गोड झालेले लोक कोणी वसुदेवाची, कोणी देवकीची तर कोणी कंसाची मनमुराद स्तुति करू लागले. वसुदेवाचे आप्तेष्ट व राजाच्या कलानें वागणारे राजदरबारी लोक वसुदेवाचें अभिनंदन करण्याकरितां वसुदेवाच्या वाड्याकडे वाहनातून जाऊं लागले. जन्मोत्सवाला थाटानें सुरवात झाली. बारा दिवस हा उत्सव थाटांत झाला. बारशाच्या समारंभाच्या वेळीं अहेरांनीं व बाळंतविड्यांनीं वसुदेवाचा वाडा भरून गेला. आजोळचा बाळंतविडा तर राजैश्वर्याला शोभेल अशा डौलानें आला. समारंभाने बाळाला पाळण्यांत घातला. नांव '**कीर्तिमान**' ठेवलें. सर्वत्र आनंदीआनंद झाला. सर्व मथुरा नगरीला सुग्रास भोजन मिळाले. अशा रीतीनें सर्व आनंदोत्सवांत दंग असतांना गर्गाचार्य व नारदऋषि यांना वसुदेव-देवकी मनात धन्यवाद देत होते. दुष्टांचे पाषाण-हृदय एकादे वेळीं पाझरत असल्याचा भास झाला तरी शहाण्या पुरुषांनीं त्यावर विश्वास ठेवूं नये, तो भासच आहे अशी त्यानें खूणगांठ बांधावी व सावधानतेने वागावे, असे अनुभवी लोक म्हणतात. हें शहाणपणाचें वचन वसुदेवाला माहित होते. तो धोरणी पुरुष तें वचन डोळ्यापुढें ठेवूनच वागत होता.

कीर्तिमान सहा महिन्यांचा झाला होता. वसुदेव मुलाला व देवकीला घेऊन आपल्या जहागिरीच्या गांवीं कांहीं दिवस राहावयास म्हणून गेला, एक दिवस अकस्मात् देवराज्यांत राहणारा प्रसिद्ध शिल्पशास्त्रज्ञ विश्वकर्मा वसुदेवाच्या भेटीला आला. नारदांच्या सांगण्यावरून ही भेट होती. विश्वकर्म्याचा मुक्काम पंधरा दिवस होता. वसुदेवानें आंखलेली योजनाच नारदांनीं पसंत केली होती, पण त्यामध्यें एक विशेष गोष्ट त्यांनीं सुचविली होती. नुसती वसुदेवाची योजना अपुरी पडली असती. कदाचित् ती उघडकीस येऊन सर्वच बिनसेल अशी स्थिति होती.

नारदांनीं सांगितलेली विशेष गोष्ट, ती योजना बेमालूम सिद्धीला जावी म्हणून होती. ती गोष्ट करण्याची कुशलता त्या वेळीं फक्त विश्वकर्म्या-च्याच अंगीं होती. पंधरा दिवस राहून विश्वकर्म्यानें आपली सर्व योजना देवकी–वसुदेव यांना समजावून दिली. वसुदेवानें विश्वकर्म्याबरोबर हिमनग प्रदेशापर्यंत एकदां जाऊन यावें असें ठरलें. हा प्रवास कांहीं तरी दुसऱ्या मिषानें व्हावयाला पाहिजे होता. विश्वकर्म्याला गंगाद्वाराजवळ भेटायचा संकेत करून वसुदेवानें त्याला निरोप दिला. वसुदेव देवकीसह मथुरेत परत आला. लवकरच पुढें वसुदेवाच्या घरीं तीर्थयात्रेच्या गोष्टी सुरू झाल्या. वृद्ध शूरसेन यात्रेस निघाला. त्याच्या बरोबर त्याच्या दहा पुत्रांपैकीं चार पुत्र वसुदेव, शमीक, वत्सक व कंक हे निघाले. शमीक, वत्सक व कंक ह्यानीं आपल्या बायका बरोबर घेतल्या होत्या. वसुदेवाबरोबर देवकी, भद्रा, मदिरा व इला अशा त्याच्या चार स्त्रिया होत्या. ह्या यात्रेंत कांहीं नाणावलेले यादव–सेनाप्रमुखहि सहकुटुंब होते. यादवांचे कुलोपाध्याय गर्गमुनि आपल्या निवडक शिष्यगणासह चालले होते. तपस्वी ब्रह्मवृंदहि त्यांच्या समागमे चालला होता. सरस्वति, यमुना, गंगा ह्या पवित्र नद्यांच्या काठावर या बहुतेक सर्व क्षेत्रांचे दर्शन घेऊन ही सर्व यात्रेकरू मंडळी गंगाद्वाराजवळ आली. तेथें शूरसेनाच्या ह्या यात्रामेळाव्यांत हिमनग–प्रदेशाचा पूर्ण माहितगार विश्वकर्मा येऊन मिळाला. हिमनग–प्रदेशांतील प्रसिद्ध क्षेत्रें, तपःस्थानें, पवित्र नगरें व मंदिरें यांचें दर्शन घेण्याच्या उद्देशानें निघालेली ही यात्रेकरू मंडळी, त्या प्रदेशांत जवळ जवळ आठ महिने हिंडत होती. देव, दानव, यक्ष व गंधर्व यांची निवास-भूमि, नरनारायणांची तपोभूमि, देवर्षींची पुण्यभूमि, अशा पवित्र रमणीय दिव्य भू–प्रदेशांतील पवित्र तीर्थ–क्षेत्रांचें यथाविधि, यथासांग दर्शन घेऊन सर्व यात्रा निघाल्यापासून जवळ जवळ एक वर्षानें मथुरेस परत आली. गंगापूजन यात्रासांगता हे सर्व विधि फारच थाटानें झाले.

ह्या यात्रेचा परिणाम वृद्ध शूरसेनावर फार झाल्यासारखा दिसला. तो अत्यंत विरक्त झाला. सर्व–संग–परित्याग करून गंगाद्वाराजवळील तपोवनांत जाऊन ईशचिंतनांत उर्वरित आयुष्याचे दिवस घालविण्याचा

आपण निश्चय केल्याचें त्यानें सर्वांना सांगितलें. होणाऱ्या पितृवियोगामुळे वसुदेवादि सर्व बंधु खिन्न दिसूं लागले. बापाच्या सेवेकरिता आपणहि तपोवनात जाणार असा हट्ट शमीक, वत्सक व कंक यानीं धरला. एक धोरणी राजकारणी कारस्थानी म्हातारा आपण होऊन सर्व-संग-परित्याग करून जात आहे, त्याच्या निमित्तानें त्याच्या पुत्रापैकीं तीन शूर तेजस्वी पुत्र दूर गेल्याने राजकारणातून गळत आहेत, हें पाहून उग्रसेन—कंसादिकांना हर्ष झाला. वसुदेवादि बंधु शूरसेनाला त्याच्या निश्चयापासून परत फिरविण्याचा जों जों प्रयत्न करूं लागले, तों तों उग्रसेन-कंसादिकानीं त्याच्या निश्चयाची, त्याच्या पुण्याईची स्तुति कर—करून त्याचा निश्चय कायम करविला. शूरसेनाच्या निश्चयापुढे वसुदेवादिकाचे, देवकासारख्या आप्तांचें व इतर यादवप्रमुखाचेहि कांही चाललें नाहीं. शूरसेनानें पुत्रादि सर्व आप्तबांधवाचा, ऐश्वर्याचा लोभ सोडून सर्वांचा निरोप घेऊन तपोवनाकडे प्रयाण केलें. ठरल्याप्रमाणे त्याचे तीन पुत्रहि आपल्या स्त्रिया-सह त्याच्या बरोबर गेले. वसुदेवाने आपल्या स्त्रियापैकीं दोघीतिघींना आळीपाळीनें पितृसेवेकरिता थोडे थोडे दिवस पाठविण्याचे ठरविलें. त्याप्रमाणें पहिल्याप्रथम, यात्रेंत शूरसेनाबरोबर असलेल्या भद्रा, रोचना व इला ह्याहि त्याच्याबरोबर गेल्या. सर्व यादव खिन्न झाले. वसुदेवादि सर्व बंधु आपापल्या मडळींसह जहागिरीच्या गावीं जाऊन राहिले. उग्रसेन-कंसादि राजमडळी आनदित झाली. सर्व गोष्टी सकल्पाप्रमाणे जमल्याबद्दल खरा आनंद कोणाला झाला होता हें चाणाक्ष वाचकानीं ताडलें असेलच.

आपण दानवकुलांत जन्मलों असून यादवांशीं—विशेषतः वसुदेवाशीं—आपलें हाडवैर आहे असें सांगणारा एक धिप्पाड पुरुष मथुरेंत धूमकेतू-प्रमाणें एकाएकीं प्रगट झाला. तो कंसाला भेटला. आपलें नाव दमघोष असून आपला, हिमनगतलवासी दानवेंद्र राजघराण्याशीं संबंध आहे, असें त्यानें कंसाला सांगितलें. कंसाची स्वतःसंबंधीं व यादवांसंबंधीं कोणी तरी एक विशेष कल्पना करून दिली होती. पुराणांतरीं कालनेमि नांवाचा एक महाबलाढ्य असुर श्रीविष्णूनें मारल्याची एक कथा आहे. तो काल-

नेमि असुर आपण आहोत. यादव हे देवांचे अंश आहेत आणि विष्णु आपल्याला मारण्याकरिता यादवकुलात जन्माला येणार आहे, ही त्याची कल्पना दिवसेंदिवस दृढ होत चालली. देवकीच्या उदरीं आपला शत्रु जन्मणार हे गर्गभविष्य ऐकून तर त्याची ती समजूत जास्तच दृढावली. आपण एक मोठा प्रचंड दैत्य असून देवाचा म्हणजे यादवाचा छळ करणें आपलें कर्तव्यच आहे, असे वाटून तो डौलाने व उन्मत्तपणाने वागे. यादवाचा छळ करण्याची संधि तो वायां दवडीत नसे. हिमनगतलवासी दानवराज्याबद्दल त्याला आपलेपणा वाटे. त्याच्या स्वभावातील ही मख्खी लक्षात घेऊन आपण दानवेंद्राकडून आलो असे सांगून आजपर्यंत त्याला पुष्कळांनीं फसवून आपला कार्यभाग साधून घेतला होता. त्याच्या दरबारात कोणालाहि न जुमानणारे व यथेच्छ चरणारे चाणूर मुष्टिकादि शेकडो मल्ल दानवराज्यातून आलेल्यापैकींच होते. हे दमघोष–प्रकरणहि त्यातलेच एक होते. फक्त दमघोषाच्या पाठीमागे एक फार मोठी व्यक्ति होती, इतकाच त्याच्यात व इतरात फरक. भोज मंत्री, भोज मुत्सद्दी कंसाला दानवेंद्राचा अवतार आहे, असे म्हणून चढवीत व त्याच्याकडून यादवाच्या बाबतींत अत्याचार करवीत. वसुदेवाच्या मुलाच्या बाबतीत कंसानें दाखविलेला मनाचा उदारपणा भोजांना आवडला नव्हता. वसु-देवाशीं कंसाची सख्यत्वाची वागणूक त्याच्या डोळ्यात सलत होती. ते कांहीं तरी खोट्यानाट्या कल्पना कंसाच्या डोक्यात भरवून, ह्या सख्य-त्वात खो आणण्याच्या उद्योगात आहेत असे जाणून त्याच्या अगोदरच आपल्याला पाहिजे तशी घटना घडवून आणावी म्हणून हे दमघोष प्रकरण सुरू झालें होते.

दमघोष आला तो दानवेंद्राकडून आला होता. दानवेंद्राचा मोठा महत्त्वाचा निरोप त्याच्याबरोबर होता. ‘देवकीचा आठवा पुत्र तुझा शत्रु आहे असें सांगून तुझे शत्रु जिवंत ठेवायचे असा देवाचा डाव आहे. देवकीचे सर्वच पुत्र तुझे शत्रु आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवून सावधगिरीने वाग, देवकीचा एकहि पुत्र जिवंत ठेवणे म्हणजे आपला मृत्यु आपल्या हातानें वाढविणें आहे हें ध्यानात ठेव. तूं दानवराज असलास तरी

मानवांच्यामध्यें जन्माला आल्यानें लहान मुलाच्या बाबतींत भयंकर कठोरपणाची वागणूक तुझ्या हातून होणार नाहीं. तुझ्याकरितां हा दमघोष ती कामगिरी बजावील.’ असा कंसाला दानवेंद्राचा निरोप होता. दमघोषानें येतांच आपली कामगिरी अगदीं चोख बजावली. त्यानें देवांचे, कंसाला फसविण्याकरितां चालू असलेले, सर्व उद्योग सांगून टाकले. देवकीचा कोणताहि पुत्र जिवंत न ठेवतां आपणच आपल्या मृत्यूचा मृत्यु बनून देवाचे डाव उधळून लावावयाचे हा निश्चय त्याच्याकडून त्याने करविला. वसुदेव ह्यावेळीं सहकुटुंब सहपरिवार जहागिरीच्या गांवीं राहात होता. त्याला बोलावून आणून त्याच्याकडून मुलगा मागून घेण्याचें काम फार कठीण होतें. पण देवांचें कपट दानवेंद्रानें उघड करून दाखविल्यानंतर आतां कंसाला तो मुलगा मागून घेऊन त्याची वाट लावून टाकणें जरूरच होते. पुत्रासह देवकीला घेऊन मथुरेस येण्याबद्दल वसुदेवाला कसा व कोणत्या मिषाने निरोप पाठवावयाचा याचा विचार आपल्या मुत्सद्दयांच्या सल्ल्यानें ठरविण्याचे कंसाने मनांत आणलें व तसें दमघोषाजवळ त्यानें बोलून दाखविलें पण मुत्सद्दयांनीं सल्ला देण्यापूर्वी दमघोषाला हातीं घेतलेलें काम उरकावयाचें होतें, म्हणून कंस आज्ञा देत असेल तर देवकीच्या पुत्राचें कंसाज्ञेनें हरण करून त्याचा निकाल लावण्याची कामगिरी दमघोष आपण होऊन अंगावर घेण्यास तयार झाला. कंसानें त्याच्या म्हणण्याला रुकार एकदम दिला. मानवांच्यापेक्षां दानवांची शक्ति कितीतरी पट अधिक असल्यानें दमघोष ती कामगिरी सहज बजावील अशी कंसाची खात्री होती.

कंसाज्ञेनें दमघोष वसुदेवाच्या जहागिरीकडे चालू झाला. ह्यावेळीं कीर्तिमान दोन वर्षांचा होता, व देवकीला दुसऱ्या खेपेला कांहीं दिवस गेले होते. कोणी एक दानवाधिपति आपल्या राजधानींत आला असून तो कंसाच्या प्रासादांत उतरला आहे ही वार्ता उग्रसेन महाराजांच्या कानावर गेली. त्या दानवाच्या अचाट सामर्थ्याच्या कल्पित कथाहि जिकडेतिकडे बोलल्या जाऊं लागल्या. उग्रसेनानें आपल्या प्रधान-मंत्र्याजवळ ह्यासंबंधीं चौकशी केली. त्या मंत्र्याच्या गांवींहि ती गोष्ट नव्हती. उग्रसेनाला मोठा

अचंबा वाटला. त्यानें कंसाला भेटून जाण्याबद्दल निरोप पाठविला. एवढा मोठा पाताल-देशाधिपति दानवेंद्र आपल्याला आपल्यापैकींच एक समजतो, आपल्या हिताची काळजी घेतो, आपण खरोखरच मानवकोटीपेक्षां अधिक उच्च आहोत, आपले सामर्थ्यहि आपल्या कल्पनेच्या बाहेर असल्यानें देवाना आपल्याविरुद्ध कपट—कारस्थाने करावीं लागत आहेत, देवानाहि आपली भीति वाटत असली पाहिजे, अशा भलत्याच मोठेपणाच्या मनोराज्यांत कंस गुंग होऊन यादवानाच काय पण भोजानाहि तो तुच्छ लेखूं लागला. दमघोपासारख्या बलाढ्य दानवाला कामगिरीवर जाण्याची आज्ञा आपण करू शकतों म्हणजे आपण केवढे मोठे आहो. अशा कल्पनेत तरंगत असतानाच भेटून जाण्याबद्दल उग्रसेन महाराजांचा निरोप घेऊन पोहोचला. आपल्या ह्या मानवी बापाला आपण मान देणे म्हणजे आपल्या योग्यतेला खरोखर कमीपणा आहे असाहि विचार त्याच्या मनात चमकून गेला. पण तो क्षणमात्रच निरोपाप्रमाणे तो उग्रसेनाच्या भेटीला गेला. उग्रसेनानें कंसाला पाहाताच, कोणी बलाढ्य दानव आपल्या राजधानीत आला असतांना आपल्याला न कळविल्याबद्दल कंसाला दोष दिला. त्याला कंसानें एका गुप्त कामगिरीवर पाठविला आहे असे कळताच उग्रसेन खवळला. आपल्याला न कळवितां परकीय राज्यांतील माणसाला गुप्त कामगिरीवर पाठविण्याची भयंकर चूक कंसाने केली, असे त्याने रागाने बोलून दाखविलें. आपल्या कानावर नसलेली गुप्त गोष्ट आपल्या सल्ल्याशिवाय युवराज परक्या माणसाच्या साहाय्याने करू पाहातो, ही घटना त्याला फार अपमानास्पद वाटली. म्हणून तो रागारागानें बोलूं लागला.

आपल्यापेक्षां सामर्थ्यानें, योग्यतेनें कितीतरी कमी असलेला आपला हा मानवी क्षुद्र बाप, आपल्याला उणेदुणें बोलतो आहे असें दिसताच कंसाचाहि रागाचा पारा चढूं लागला. बापाने गुप्त कामगिरीसंबंधीं खोदून खोदून विचारतांच, अभय देऊन परत दिलेल्या देवकीच्या पुत्राला ठार मारण्याकरितां त्या दानवाला पाठविल्याचें, त्यानें बिनदिक्कत सांगितलेलें ऐकतांच वृद्ध उग्रसेन भयंकर खवळला. अभय दिलेल्या प्रत्यक्ष बाहिणीच्या लहान अर्भकाचा परक्याच्या हातून अमानुष वध करून क्षत्रिय

राजघराण्याला कलंक लावणारा मथुरेच्या युवराजपदाला सर्वथा नालायक आहे, असा त्यानें कंसाचा धिक्कार केला. 'युवराजपदाला नालायक' असे उद्गार ऐकताच भयंकर क्रोधानें मनाचा तोल सुटलेला कंस "थेरड्या, मी दानवाधिपति असतांना, तुझ्यासारख्या मानवाला सिंहासनावरून ओढून न काढता तसाच राहूं दिला म्हणून मी युवराजपदाला नालायक झाल्याचे शब्द तुझ्या थोबाडातून बाहेर पडूं शकले! तुझ्या पोटच्या पुत्राचा—ह्या कंसाचा-मृत्यु ठरलेल्या त्या वसुदेवाच्या कार्ट्याचा नाश झाल्याचें ऐकून तुला सहन झाले नाहीं! अरे, सर्व चोर तुम्ही, देवाचे साथीदार आणि दानवांचे दुष्मन, मला माहीत आहां. आजपर्यंत तुमची गय केली. हा पाहा, हा दानवश्रेष्ठ कंस यादव-पक्षपाती—देवपक्षपाती तुझ्यासारख्या थेरड्याला सिंहासनावरून ओढून काढून आज मथुरेचा सम्राट् होत आहे." असें बोलून वृद्ध पित्यावर धांवून गेला. 'कार्ट्या, बेतालपणाने बोलणाऱ्या पुत्राचेहि मस्तक हें खड्ग धडापासून कसे वेगळें करतें हें मी जगाला दाखवितों.' असें म्हणून उग्रसेनानें खड्ग उपसलें. जवळ असलेल्या भोज मंत्र्यांनीं उग्रसेनाला कसाबसा आवरला. पार्श्वदगणाप्रमाणें कंसाच्या बाजूला असलेल्या मल्लांनीं कंसाला परत फिरविला. पित्याच्या हातून पुत्रघात व पुत्राच्या हातून पितृघात तात्पुरता टळला, पण कंसाने तेथून बाहेर पडतांच आपल्या पाशवी शक्ति असलेल्या मल्लाच्या सामर्थ्यावर क्रूर, यादवद्वेषी सेनानींच्या साहाय्यावर व महाबलाढ्य जरासंधासारख्या सम्राट् सासऱ्याच्या जोरावर उग्रसेनाला—प्रत्यक्ष पित्याला कैद करून मथुरेची गादी बळकावली आणि अंधक कुळाची दुष्ट परंपरा कायम राखली.

तिकडे वसुदेवाच्या जहागिरींत उपवनप्रासादावर रात्रींच्या वेळीं एकाएकीं छापा घालून कंसाज्ञेनें दानवांनीं देवकीच्या पुत्राला—लहानग्या दोन वर्षांच्या कीर्तिमानाला, तेथें असलेल्या यादव-सरदारांशीं व वसुदेवाशीं युद्ध करून पळवून नेला व त्याचा नाश केला अशी ओरड झाली. सर्व यादव खवळले, पण चोरट्यासारखे दानव केव्हाच अदृश्य झाल्यानें कोणाचाच कांहीं इलाज चालला नाहीं. वसुदेव-देवकी पराकाष्टेचीं दुःखी

झाल्याचें दिसूं लागलें. वसुदेव-देवकीच्या पुत्राचा दानवानीं आपल्या आज्ञेनें नाश केल्याचें ऐकून कंसाला समाधान वाटले. तर उग्रसेन, फारच कष्टी झाला. देवकाला अत्यंत दुःख झालें. कांहीं दिवसानीं दानव दमघोष कंसाला स्वतः येऊन भेटला वसुदेव बाहेर गेला आहे असें पाहून रात्रीच्या वेळीं आपण उपवनांतील वसुदेवाच्या प्रासादांत कसे गेलों, मुलाला स्वाधीन करण्याबद्दल देवकीला कंसाची आज्ञा कशी सांगितली, तिने मुलगा देण्याचें कसे नाकारलें, आपण जबरदस्तीने मुलाला घेऊन जाणार असे म्हणताच तिने आरडाओरड कशी केली, यादव सरदार कसे धावून आले, आपली व त्याची चकमक कशी झाली, वसुदेव अचानक कसा आला, वसुदेवाने आपले अचाट सामर्थ्य व अपूर्व युद्ध-कौशल्य कसें दाखविले, शेवटीं आपण मायावी युद्ध कसें सुरू केले व मुलाला घेऊन एकदम कसे गुप्त झालो वगैरे सर्व गोष्टींचे रसभरित वर्णन करून त्याने कंसाचा आपल्यावर व आपल्या दानवी सामर्थ्यावर पूर्ण विश्वास बसविला.

मुलाचा दानवांनीं नाश केल्यानंतर देवकीला जहागिरीच्या गांवीं चैन पडेना म्हणून मथुरेस ती आपल्या माहेरीं देवकराजाकडे आली. उग्रसेन नजरकैदेत होता. कंस कर्तुम् अकर्तुम् सम्राट् खरा, पण देवकी राजप्रासादांत आपल्या चुलत्याकडे आली आहे असे कळताच, अभय दिलेल्या तिच्या पुत्राचा नाश केल्याने तिच्या दृष्टीस पडण्याची शरम वाटून तो स्वारी-शिकारीच्या निमित्तानें मथुरेंतून बाहेर गेला. आठ पंधरा दिवस माहेरीं राहून देवकी तपोवनात गेलेल्या आपल्या सासऱ्याकडे चार पांच महिने जाऊन आली. शूरसेन राहात असलेलें तपोवन म्हणजे वसुदेवादि बंधूंच्या कुटुंबांतील मंडळीचें विश्रांतीकरितां थारेपालट करण्याचें हवेचें ठिकाणच झालें होते. किती वेळा किती तरी मंडळी तिकडे जाऊन येत. देवकी मथुरेंत परत आली तेव्हां तिला पूर्ण दिवस झाले होते. प्रसूतीकरितां देवकी मथुरेंत आपल्या वाड्यांत येतांच, एक गोष्ट सहज साधली. तपोवनांत जाण्यांत आपल्या न कळत तिकडेच प्रसूति होऊन मुलाला लपविण्याचा बेत आहे कीं काय असा जो कंसाला संशय आला होता

तो नाहींसा झाला. वसुदेव सत्यवचनी आहे अशी त्याची खात्री झाली.

देवकी प्रसूत झाली. मुलगा झाला. कंसाच्या कानावर ती गोष्ट घालण्यांत आली. कंसाचा काय बेत झाला असेल कोणाला ठाऊक. कंसानें ती गोष्ट ऐकून काहींच हालचाल केली नाहीं. कंसाच्या अस्थिर वर्तनानें कोणालाच कसला विश्वास अगर उत्साह वाटला नाहीं. वसुदेव वगैरे सर्व उदासीन राहिले. निरुत्साहानेच कां होईना, ह्याहि मुलाचे सर्व जन्मसंस्कार झाले. बारसें झालें. मुलाचे नाव ' सुषेण ' ठेविलें. मुलगा जवळ जवळ वर्षाचा होत आला. कंस ह्या मुलाला हात लावीत नाहीं, असेंच सर्वांना वाटलें. वसुदेव मथुरेंत असला म्हणजे त्याच्या भावापैकीं कोणीतरी एक जण त्याच्या बरोबर मथुरेंत राहात असे. बाकीचे जहागिरीच्या गांवीं असत. तिघेजण तर कायमचेच तपोवनांत राहात होते. मुलगा सुषेण वर्षाचा झाला. तो पराकाष्ठेचा खेळकर होता. आपल्या बाललीलानीं त्यानें एक प्रकारचे आनंदी वातावरण निर्माण केले होतें. त्याचा वाढदिवस साजरा झाला. वसुदेव थोड्याशा निर्धास्तपणानें भावासह जहागिरीच्या गांवीं काहीं कामानिमित्त गेला, आणि मुलाचा नूर पालटला. त्याचा खेळकर स्वभाव नाहींसा झाला. तो आईच्या शिवाय कोणाजवळ जाईना, त्याचें रडणे, फार काय पण हालचालहि बंद झाली. जवळचीं माणसें म्हणूं लागलीं, मुलाला भुतानें झपाटलें. अशा स्थितींत देवकीने वसुदेवाला निरोप पाठविला. एक दिवस दानव दमघोष धूमकेतूप्रमाणें मथुरेंत कंसाच्या महालात प्रगट झाला. राजवाड्यांत सर्वांचीं मनें साशंक झालीं. कंसभीतीनें कोणी कांहीं बोलेना, पण सर्वजण चिंतातुर झाले. देवकीच्या मंदिरांत विशेष भीति निर्माण झाली. वसुदेव तेथें नव्हता त्यामुळें मुलाचे प्राण कसे वांचवावे, कोणाला कांहींच सुचेना. देवकीनें आपलें मंदिर भीतीनें बंद करून घेतलें. पण होणारी गोष्ट टळणार होती थोडीच ! दमघोष व कंस देवकीच्या मंदिराजवळ आले. कंसानें मोठ्यानें देवकीला मुलाला बाहेर घेऊन येण्यास फर्मावलें. देवकीनें हंबरडा फोडला. मंदिराचा दरवाजा न उघडतां तिनें आंतूनच कंसाची विनवणी चालवली. दोन घटका मोठाच घोळ पडला. देवकी दार उघडीना. कंसाला दार

फोडून आंत बाहिणींवर धावून जाणें कर्मीपणाचें वाटूं लागलें. त्यानें धाकदपटशानें बोलून, काहीं अभय देण्यासारखें गोडीगुलाबीनें सांगून काम होते कीं काय ते पाहण्याचे चालविलें. वेळ होऊं लागला. दमघोष उतावीळ झाला. दार फोडायला आपल्याला परवानगी द्या, असे तो म्हणूं लागला. वसुदेवाचें वैर साधण्याचे मार्गांत आड न येण्याबद्दल तोहि कंसाला विनवूं लागला. अशा स्थितींत वसुदेव मथुरेच्या वेशीजवळ आल्याची यादवाची आरोळी आली. त्याबरोबर दमघोषानें विचार न करिता मंदिराचा दरवाजा लत्ताप्रहार करून खाडकन् उघडला व आंत जाऊन देवकीच्या हातून मुलाला हिसकावून घेऊन, तो बाहेर आला व हा काय करणार ह्याची कल्पना कंसालाहि येण्याच्या पूर्वी त्यानें अंगण्यातील एका शिळेवर ताडकन् त्या मुलाला आपटलें. जिकडे तिकडे रक्ताचा सडा झाला. कंसालाहि ते रक्त पाहावले नाहीं. त्याने डोळे मिटले. देवकी तर बेशुद्ध झाली. वसुदेव व त्याचा भाऊ धांवत आले आणि त्याना पाहाताच रक्ताने माखलेला तो दानव एकदम पळत सुटला व अदृश्य झाला. वसुदेव गुडघे टेकून एकदम देवकीच्या व त्या छिन्नविच्छिन्न झालेल्या अर्भकाच्या मध्ये बसला. वसुदेवाचा भाऊ कंसाकडे पाहून तिरस्काराने म्हणाला, "सम्राट् पदावर चढलेल्या कुलाधमा, जा काळें कर, वसुदेव-दादांच्या प्रतिज्ञेमुळे माझे हें खड्ग बाहेर पडूं शकत नाहीं, तोंपर्यंत चालता हो. ह्या अर्भकाच्या रक्ताचा सडा घालून तूं व तुझा साथीदार तो पळपुटा दानव कृतकृत्य झालांत. आता ह्याचा अंत्यसंस्कार करतांना तरी तुझा अभद्र चेहरा येथून काळे करो." कंस वरमला, ह्या तिरस्कारानें फारच शरमला व काहीं न बोलतां चालता झाला. देवकीचा दुसरा पुत्रहि लोकदृष्टीनें इहलोकाला अंतरला.

दानवांच्या मदतीने चाललेल्या कंसाच्या ह्या भयंकर क्रूर हिडिस कृत्यानें यादवांचीं मेलेलीं मनें चळवळ करूं लागलीं. कच खाल्ल्याने थंडगार झालेलें रक्त गरम होऊं लागलें. देवकीच्या ह्यापुढे झालेल्या चार पुत्रांची थोडी कमी अधिक प्रमाणांत, पण अगदीं अशीच कंसाच्या दानवी स्वभावानें वाताहत केली. मुलगा जन्माला येई. त्याचे जन्मसंस्कार होत.

नामकरण–विधि होई. वर्ष, सव्वा वर्ष, दीड वर्ष मुलगा खेळकरपणानें वातावरण आनंदी करी. मग एकदम मलूल होऊं लागे. अगदीं भुताने पछाडल्याप्रमाणे होऊन तो निर्जीव स्थितींत गेल्याचा भास होई, दानवाची मायावी छाया त्याच्यावर पडून अशी स्थिति होत असावी, असा लोक अंदाज करीत. आणि एक दिवस कंसाच्या देखत दानव-हस्ताने छिन्नभिन्न होऊन तो गतप्राण होई. ह्याप्रमाणे कीर्तिमान, सुषेण यांच्या नंतर भद्रसेन, ऋजु, संमर्दन व भद्र ह्या नांवाच्या चार अर्भकाची अवस्था झाली. दानवांच्या मदतीने चालविलेल्या कंसाच्या ह्या भयंकर हत्यांनीं शेवटीं शेवटीं तर यादव इतके बेभान झाले, त्यांना वसुदेवाच्या शांत स्वभावाची व सत्यवचनाची इतकी चीड आली कां ते आपल्या प्राणांची पर्वा न करिता, आपलें बलाबल न पाहतां व वसुदेवाचें न ऐकतां, केव्हां बंड करून उठतील, ह्याचा नेम नाहींसा झाला.

भोज-पक्षीय सरदार, मुत्सद्दी, मंत्रीहि मनांत कंसावर जळफळूं लागले. कंस दानवांच्या व मगध सम्राट् जरासंधाच्या जोरावर भोजांना बाजूला सारून पाहिजे तसा वागूं लागला होता. त्याच्या भयंकर अरेरावीने राज्यांतील सर्व शिष्ट त्याच्या विरुद्ध होऊं लागले. माडलिक सरदारहि मनानें एकामागून एक कंसाच्या विरुद्ध यादवांशीं संगनमत करू लागले. कंसाच्याहि अनाचाराना व उन्मत्तपणाला भरती येऊं लागली. आपल्याला तो दानवेंद्राचा संबंधी समजून, मानवी वर्ण, आश्रम, धर्म यांची उघड उघड पायमल्ली करू लागला. वेदप्रणीत धर्मशास्त्र त्यानें गुंडाळून ठेवले. मंदिरांतल्या देवतांना तो तुच्छ लेखूं लागला. ऋषिमुनींचा, तपःस्वी ब्रह्म-वृंदाचा अपमान करण्यांत त्याला दिक्कत वाटेनाशी झाली. कर्तुमकर्तुम् ईश्वराप्रमाणेंच–नव्हे–प्रत्यक्ष सर्वेश्वरच आपण आहों असें वाटण्याइतका त्याचा अहंकार वाढत चालला. सज्जन त्रस्त होऊं लागले. "परमेश्वरा, ह्या दुष्टाचें पारिपत्य करण्याकरितां कोणाला तरी पाठीव" अशी साधुसज्जन परमेश्वराची प्रार्थना करूं लागले. कंस मात्र स्वतःच्या दृष्टीनें निर्भय होत चालला होता. भविष्यवाणीप्रमाणें त्याचे मुख्य शत्रु म्हणजे देवकीचे पुत्र. त्यांपैकीं सहा पुत्रांना त्यानें आपल्या दृष्टीनें मृत्युलोकांतून हांकून देऊन

परलोकाला पाठविलें होतें. पाहिला कीर्तिमान नाश पावल्याचें त्यानें ऐकलें होते पण पुढच्या पांचांची छिन्नभिन्न झालेलीं शरीरें त्याने स्वतःच्या दृष्टीनें पाहिलीं होतीं–नव्हे त्यांच्या रक्ताचे शिंतोडेहि त्याच्या अंगावर उडाले होते. पण प्रभुकरणीप्रमाणे मुत्सद्द्यांचीहि करणी अघटित आहे. विश्वकर्म्यांच्या कुशलतेनें निर्माण केलेलीं अर्भकें छिन्नभिन्न झालीं असलीं तरी ईश्वरेच्छेनें निर्माण झालेलीं सहा गोंडस धष्टपुष्ट तेजस्वी बाळें पाताल म्हणून प्रसिद्ध असलेल्या हिमनगतल प्रदेशातील दानवाच्या तपोवनात दिवसा–मासाने वाढत होतीं, ह्याची कंसाला दादहि नव्हती. वसुदेवा-सारख्या राजकारणी धोरणी मुत्सद्द्याचे एवढ्या कारस्थानाने समाधान झाले नव्हते. देवकीला एका पाठोपाठ एक सहा तेजस्वी पुत्र झाले हें पाहून भविष्यवाणी अगदीं खरी ठरणार अशी त्याची दृढ श्रद्धा झाली होती. आठवा पुत्र कंसाचा नाशक व आपल्या कुलाचा उद्धारक खास निपजणार अशी त्याची मनोदेवता त्याला खात्रीपूर्वक ग्वाही देत होती. इतर सहा पुत्राप्रमाणे आपल्याच लोकाच्या देखरेखीखालीं पण फार दूर कोठें तरी वाढण्यापेक्षा शेवटचे दोन पुत्र आपल्या स्वतःच्या देखरेखीखालीं वाढावेत अशी त्याला प्रबळ इच्छा झाली.

देवकी सातव्या खेपेला गरोदर राहाताच त्याच्या डोक्यांत निराळेच विचार घोळूं लागले. इतक्यात नारदाची फेरी येऊन ते विचार ठाम होऊन देवर्षींच्या सल्ल्याने पुढील पाउलें देखील पडूं लागली. वसुदेवानें आपल्या स्त्रिया व पुत्र यांना निरनिराळ्या ठिकाणीं गुप्तपणें सुरक्षित ठेवलें होतें, हें मागें वाचल्याचें वाचकाच्या स्मरणांत असेलच. वसुदेवाच्या जहागिरीच्या अगदीं नजिक असलेल्या गौळवाड्याचा मालक त्या वेळचा प्रसिद्ध नंद पाटील, वसुदेवाचा अगदीं जिवलग, अंतरंगांतला स्नेही होता. त्याच्या रक्षणाखालीं वसुदेवानें आपल्या दोन स्त्रिया व कांहीं पुत्र ठेवले होते. नंदाच्या गौळवाड्यांत असलेल्या ह्या स्त्रिया रोहिणी व रोचना ह्या होत. दोघीहि वसुदेवाच्या अत्यंत लाडक्या व भाग्यसंपन्न होत्या. रोहिणीला सात तेजस्वी पुत्र झाले होते व रोचनेचे दोन पुत्र मदनासारखे सुंदर व सिंहासारखे पराक्रमी होते. ते सर्व गौळवाड्यांतच वाढत होते.

देवकी सातव्या खेपेस गरोदर राहिली आणि ह्या वेळच्या कार-स्थानांत रोहिणीनें फार कुशलतेनें भाग घेतला. ती कृतक गरोदर झाली. देवकी गरोदर आहे हें तीन महिनेपर्यंत ह्या कानाचें त्या कानाला कळूं दिलें नाहीं. चार महिन्यांनंतर देवकी गरोदर आहे पण फार आजारी असून निजून आहे, हें कंसाच्या कानावर गेलें. तो आतां थोडा दक्षतेनें महिने मोजूं लागला. योग्यवेळीं देवकी प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. पण तो होतांच फारच गुप्तपणें त्याला गौळवाड्यांत रोहिणीच्या मंदिरांत पोचविण्यांत आले. तेथें तो पोहोचतांच रोहिणीची सुखप्रसूति होऊन तिला पुत्ररत्न झाल्याचे सर्व गोकुळात वृत्त कळले. त्याच वेळीं इकडे मथुरेंत कंसभयाने व आजारीपणामुळे पांचव्या महिन्यांत देवकीचा गर्भ गळून पडल्याचे जाहीर होऊन वसुदेव कष्टी झाला. क्रूरपणाचें प्रदर्शन करावें न लागतांच आपल्या प्रभावाने, आपल्या शत्रूनें राम म्हटला, असें मानून कंस अत्यंत आनंदित झाला. मथुरेंत राम म्हटलेल्या ह्या मुलाचें रोहिणीमातेनें गोकुळात ‘ बळराम ’ असे नाव ठेवलें. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेल्याचा त्या बालकाच्या जन्माचा इतिहास चिरस्मरणीय व्हावा म्हणून गर्ग-नारदानीं त्याचे नाव संकर्षण असें सुचविलें व तेंहि नांव प्रचारात चालू झालें.

वसुदेवाच्या इच्छेप्रमाणें जवळजवळ प्रत्यक्षच त्याच्या देखरेखीखालीं हा मुलगा वाढण्यास आतां कांहीं हरकत उरली नाहीं. ह्यापुढे भविष्य-वाणींतील प्रसिद्ध आठवा जन्माला येणार म्हणून देवकी व वसुदेव दोघेंहि अत्यंत हर्षित व उत्सुक झालीं. आपल्याला ह्यापुढें काय योग्यतेचा गर्भ राहिला पाहिजे ह्याच्यासाठीं करतां येतील तितक्या सुंदर पवित्र कल्पना करण्यांत देवकीमाता तल्लीन होऊ लागली. कुलोद्धारक पुत्राच्या ध्यासानें सुंदर पवित्र कल्पनेंत वसुदेवहि तन्मय होऊं लागला. ज्ञान व ऐश्वर्य ह्या बाबतींत वेदानीं वर्णन केलेल्या परमेश्वरासारखा प्रति-परमेश्वर आपल्या पोटीं यावा, म्हणून त्या पतिपत्नींनीं वेदविधीनें ईश्वराराधना चालू केली. अध्ययन-अध्यापनाचें पवित्र कर्तव्य नेहमीं करणारे, सत्यवचनी, जितेंद्रिय, सर्वत्र समदृष्टि ठेवणारे, तपःस्वी, वेदकथित सदाचार पाळणारे, पवित्रं,

ज्ञानी, योगीवृंदांना संतुष्ट करून त्याच्यापासून अनेक शुभाशीर्वाद वसुदेव व देवकी यांनीं मिळविले. इंद्रियांचे संयमन करून त्यांनीं अनेक व्रतें केलीं. कित्येक दिवस नुसतीं गळलेलीं पानें खाऊन त्यांनीं आपली क्षुधा निवारण केली. कांहीं दिवस नुसतें गोदुग्ध प्राशन करून तीं ईशचिंतन करीत राहिलीं. कांहीं दिवस नुसत्या गंगाजलावर राहून त्यांनीं ईशःमरण केलें. वेदविहित कर्माचरण, शुद्ध सात्विक आहार, मोठमोठ्या तत्त्ववेत्याकडून एकाग्र अंतःकरणाने ईशगुणाचें श्रवण, ईशचरित्राचें मनन, ईशस्वरूपाचें निदिध्यासन ह्यांत तीं कालक्षेप करूं लागलीं अशारीतीनें शुद्धांतःकरणानें अत्यंत पवित्र स्थितींत ईशचिंतनांत तीं पतिपत्नी काल घालवीत असता देवकीला आठवा गर्भ राहिला.

ज्या आठव्याच्या भीतीने कंसानें राक्षसाप्रमाणे क्रूर होऊन देवकीच्या सात पुत्रांचा नाश करण्याचे अघोर कृत्य बिनादिक्कत केले, तो आठवा देवकीच्या उदरांत वाढं लागला हे कानावर येतांच कंसाच्या चित्ताची तळमळ सुरू झाली. देवकीचाच वध करून टाकावा असेंहि अनेकवार त्याच्या चित्तांत येऊं लागलें. पण इन्द्रतुल्य पराक्रमी वसुदेव व त्याचे सिंहासारखे शूर बंधु, हे देवकीच्या रक्षणाकारितां डोळ्यांत तेल घालून जपत आहेत, हे तो जाणून होता. मुलगा होतांच सत्यवचनी वसुदेव त्याला आपल्या स्वाधीन करील असे त्याला वाटत होतें, पण देवकीच्या रक्षणाकरितां ह्या खेपेस वसुदेवानें दाखविलेली दक्षता पाहून पुत्रस्नेहानें तो वचन पाळील कीं नाहीं ह्याचीहि त्याला शंका येऊं लागली. पुत्राला कोठें तरी पळवून नेण्याचे वसुदेव मनात आणील अशीहि शंका कंसाचे मनांत येऊन त्यानें वसुदेवाच्या वाड्याभोंवतीं आपल्या विश्वासांतील दानव म्हणून समजल्या जाणाऱ्या योद्धयांचा जागता पहारा ठेवला होता. पण ह्या खेपेस कंसाच्या दृष्टीनें एक मोठी चमत्कारिक गोष्ट घडत होती. ज्यांना वाड्याच्या आंत बाहेर जाण्यायेण्यास मनाई करणें राजा ह्या नात्यानें हास्यास्पद व निंद्य ठरून कमालीचे भ्याडपणाचें दिसेल, असे नारद, व्यास, गर्ग, वामदेव, शुकासारखे ज्ञानवैराग्य संपन्न ऋषि, मुनि, तत्त्वज्ञ वसुदेवाच्या भेटीला सारखे येऊं लागले.

वसुदेव-देवकीच्या मंदिरांत वसुदेवाशीं वेद, इतिहास, पुराणें निरानिराळीं शास्त्रें, नीति, न्याय, सदाचार, धर्म-रहस्य यांसंबंधीं ते थोर पुरुष चर्चा करीत. देवकी ती चर्चा एकाग्रतेने ऐकत असे. त्या थोर ज्ञानी पुरुषांच्या तोंडून पुण्यश्लोक राजांच्या कथा, रणधुरंधर शूरांचीं चरित्रे, राजकारणपटु मुत्सद्द्यांचीं नीतिनैपुण्य दाखविणारीं आश्चर्यकारक कृत्यें, मानवी बुद्धीचें शास्त्ररहस्य जाणण्याचें, सृष्टींतील गूढे उकलण्याचे अचाट सामर्थ्य व अवर्णनीय प्रयत्न, ऐकत असता देवकी तल्लीन होत असे. मृत्यूला जिंकणाऱ्या निर्भय तत्त्वज्ञान्यांचीं चरित्रें ते ऋषि सांगत असतांना देवकी देहभान विसरून त्या चरित्राशीं समरस होत असे. देवकीला आनंदी व निर्भय ठेवण्याचा हा वसुदेवाचा प्रयत्न वाखाणण्या-सारखा होता.

ह्या वेळीं गोकुळांत नंदाच्या घरींहि एक आश्चर्यकारक योगायोग जमून आला होता. नंद–पाटलाला एका गोष्टीशिवाय सर्व गोष्टींची अनुकूलता होती. राजासारखें ऐश्वर्य, एकनिष्ठ हजारों अनुयायी, पुष्ट व दुधाळ हजारों गाईनीं भरलेले गोठे, अतुल शरीरसामर्थ्य, फार सुंदर स्त्री, जिवाला जीव देणारे जिवलग स्नेही, ह्या सर्व गोष्टी त्याला अनुकूल होत्या; पण अनेक व्रते, वैकल्यें करूनहि मध्यम वय होईपर्यंत पोटीं संतान नव्हतें, म्हणून तो व त्याची सुदर सुशील स्त्री यशोदा कष्टी असत. पण ह्या वेळचा योगायोग अपूर्व होता. देवकीला मथुरेंत ज्या दिवशीं गर्भधारणा झाली त्याच दिवशीं गोकुळांत यशोदेलाहि तोच सुयोग प्राप्त झाला. हा अपूर्व योगायोग पाहून मुत्सद्दी पुरुषांची बुद्धि अघटित घटना घडवून आणण्याच्या उद्योगाला लागली. गोकुळांत असलेल्या वसुदेवाच्या रोचना नांवाच्या स्त्रीलाहि कांहीं दिवस गेल्याचें दिसूं लागलें. नवसासायासांनीं गरोदर झालेली, मध्यम वय उलटून गेलेली यशोदा पहिलटकरीण असल्यानें, ती तिच्या सुखप्रसूतिची काळजी नंदाला फार लागून राहिली होती. वसुदेवाच्या सल्ल्यानें तिची काळजी घेण्या-करितां आपल्या कामांत पूर्ण निष्णात असलेली एक सुईण मथुरेंतून मुद्दाम त्यानें आणून ठेविली होती. आपल्या धाडसी कारस्थानाचा पत्ता

नंदालाहि लागूं न देता वसुदेवाला तें घडवून आणावयाचें होतें. गोकुळात पाठविलेल्या सुइणीला ह्या कारस्थानातील सर्वांत मुख्य भाग फार कौशल्यानें पार पाडावयाचा होता. तिच्या अंदाजाप्रमाणें देवकी यशोदेच्या अगोदर एक दोन दिवस प्रसूत होईल असें होतें. देवकीचें मूल जन्मतांच त्याला कुशलतेने गोकुळात आणून ठेवावयाचें. यशोदा प्रसूत होताच तें मथुरेतून आणलेलें बालक यशोदेपुढें ठेवून यशोदेचे बालक वसुदेवाच्या कृतक गरोदर स्त्रीच्या–रोचनेच्या–पुढे ठेवून यशोदा व थोड्या वेळानें रोचना प्रसूत झाल्याचे लोकाना कळवायचे. देवकीचें मूल आपलेच म्हणून यशोदेनें वाढवावयाचे व यशोदेचे मूल समजूनउमजून रोचनेने वाढवावयाचें. आणि देवकीच्या पुढें ह्या खेपेस दर खेपेपेक्षा आपल्या बुद्धिमत्तेची कमाल करून विश्वकर्म्याने केलेली एक कृत्रिम मुलगी ठेवून तिचा अंत कंस स्वतः करील, असा योग घडवून आणावयाचा. कंसाला त्यावेळीं भयंकर व कल्पनातीत भीतीचा धक्का बसून फिरून तो देवकीच्या वाटेस जाणार नाहीं अशी व्यवस्था करावयाची, असें हें भयंकर, धाडसी, इतिहासांत पूर्वी कधीं न घडलेलें कारस्थान होतें. ह्यांत हिमनगवासी देवाची वसुदेवाला संपूर्ण मदत व्हावयाची होती. वसुदेव स्वतः कारस्थानकुशल होताच, पण देवाची अलौकिक बुद्धिमत्ता व कल्पकता ह्या वेळेस त्याची साथ करीत होती. थोडक्यांत सांगायचें म्हणजे देवर्षि नारदाचे हे जगदुद्धाराचें कार्य धिम्मेपणाने चाललें होतें.

मानवी प्रयत्न कितीहि चागले, लोककल्याणाचे असले तरी त्याना ईश्वरी कृपेची जोड असावीच लागते. कंसासारख्या दुष्टांचे काटेकुटे दूर होऊन मानवी जीवित सुखमय व्हावें म्हणून चाललेल्या ह्या मानवी अचाट प्रयत्नाला ईशकृपेनें हात देतांच तो योजल्याप्रमाणें पूर्ण सफल झाला. कंसाच्या छळानें भयंकर गांजलेले आर्त जीव जिची उत्कंठेनें वाट पाहात होते, त्या कंसनाशक ईश्वरी कृपेचा, यादव कुळाचा उद्धार करणाऱ्या मुलाच्या रूपानें मथुरेंत देवकीच्या मंदिरांत अवतार झाला. श्रावण वद्य अष्टमी मध्यरात्रीचा समय, त्यावेळीं रोहिणी नक्षत्र होतें.

आकाशांतील नक्षत्रें, ग्रह व तारे हीं शांत होतीं. दिशा प्रसन्न होत्या. निर्मल नक्षत्र-गणांचा उदय आकाशांत झालेला होता. नद्या उदकाने संपन्न होत्या. मेघ मधून मधून मंद गर्जना करूं लागले होते. अशा मंगल वेळीं देवकीला सुंदर पुत्ररत्न झालें. वसुदेव-देवकींनीं आनंदाने डोळे भरून ते पाहिले. दुसऱ्या क्षणीं ते बालक मुद्दाम केलेल्या गुप्त मार्गानें वाड्याच्या बाहेर नेण्यांत येऊन त्याच्यासह देवदूत शीघ्रयानाने गोकुळचा मार्ग चालूं लागले. योगायोग मोठा मौजेचा. बालक गोकुळांत पोहोचतें न पोहोचतें तोंच यशोदा प्रसूतिवेदनेने मूर्च्छित झाली होती. तिला कन्या झाली. इतक्यांत देवकीचें बालक सुइणीच्या हाती येऊन तें यशोदेपुढें ठेवलें गेलें व यशोदेची सुंदर मुलगी रोचनेच्या मंदिरात रोचनेपुढें ठेवून, रोचना प्रसूत झाल्याचें तेथील लोकाना कळलें. नंदराजाला सुंदर पुत्ररत्न झाल्याची आनंदकारक वार्ता गोकुळात हा हां म्हणता पसरून नंदाचें अभिनंदन करण्याकरितां नंदवाड्याकडे गोपाळांची रीघ लागली.

मथुरेंतील मायावी घटना अपूर्व अशीच झाली. देवकीचे सुंदर पुत्ररत्न गोकुळच्या मार्गाला लागल्यावर बऱ्याच वेळानें विश्वकर्म्यानें निर्माण केलेली व अगोदरच कितीतरी दिवस वाड्यांत आणून ठेवलेली कृत्रिम दारुमयी कन्या देवकीच्या पुढें देण्यांत आली. ह्याच्यापूर्वी चार दिवस दानव दमघोष मथुरेंत येऊन कंसाच्या वाड्यात तळ देऊन राहिला होता. देवकी प्रसूत झाली कीं काय ह्याचा कानोसा कंस सारखा घेतच होता. वाड्यांत पुढें होणाऱ्या घटनेची जय्यत तयारी होतांच कृत्रिम कन्यकेची कळ दाबतांच तिनें थांबून थांबून टाहो फोडण्यास सुरवात केली. वाड्यांत एकच गडबड उडाली. कंसानें मुद्दाम ठेवलेले टेहळे, देवकी प्रसूत होऊन तिला मुलगी झाल्याची वार्ता घेऊन कंसाकडे धांवत सुटले. 'देवकी प्रसूत झाली' हे शब्द ऐकतांच निजलेले कंस व दमघोष ताडकन् उठून उभे राहिले. 'मुलगी झाली' हे शब्द ऐकतांच दमघोष 'विश्वासघात' म्हणून मोठ्यानें ओरडला व कंस मटकन् खालीं बसला. दमघोष त्याला धरून उठवीत घाईनें म्हणाला, "चला, धांवा महाराज, धांवा. मुलगी झाली ही गप्प आहे. तो मुलगाच असला पाहिजे. आणि मुलगा असो

कीं मुलगी असो, त्याबद्दल विचार न करितां ह्या क्षणीं जन्माला आलेले तें देवकीचें पोरटें पायाला धरून गरगर फिरवून ताडकन् आपटून यमसदनाला पोचविलेंच पाहिजे. तरच, कंसमहाराज तुम्ही निर्भय होऊन वाचाल. चला, चला, देवाच्या कपटकारस्थानाला आपण फसतां उपयोगी नाहीं."

दमघोष, कंस व त्याचे अनुयायी सेवक वसुदेवाच्या वाड्याकडे धांवत सुटले. वाड्यांत देवकीच्या मंदिराच्या अलीकडील चौकात दमघोषाला व नोकराना वसुदेवाच्या पराक्रमी बंधूंनीं अडविलें. कंस एकटाच आत शिरला. दमघोष ओरडून म्हणाला, "कंसमहाराज, जा जा. एक क्षणहि दवडू नका. काहीं दयामाया न ठेवता त्या पोरट्याला गरगर फिरवून ताडकन् आपटा, विसरूं नका. मी ह्याचा समाचार घेऊन येतोच." कंसाने ते शब्द ऐकले तो क्रोधाने बेहोष झाला. केंस मोकळे सुटलेला ठेंचाळत ठेंचाळत धांवणारा कंस, बाळंत झालेल्या देवकीच्या मंदिरात पोहोचला. देवकीनें त्या मुलीला कवटाळून धरलें होतें. कंसाला पाहातांच ती आक्रोश करून म्हणाली, 'दादा माझे सात तेजस्वी पुत्र मारलेस. आतां ही मुलगी आहे, ती तरी मला राहूं दे रे! तुझ्या मुलाला देऊन हिला मी तुझी सून करीन. कृपा कर, एवढी मुलीची ओवाळणी मला घाल.' कंसानें तिच्याकडे तिरस्कारानें पाहिलें. तिच्या हातांतून ती मुलगी त्यानें हिसकावून घेतली. त्या मुलीला घेऊन तो धांवत अंगणांत आला. त्यानें मुलीचे पाय धरून, आपण हातांत काय धरले आहे व आपण काय करतों आहों, याचें भान न राहून दमघोषाच्या सागण्याप्रमाणें त्या मुलीला इतक्या आवेशानें व वेगानें गरगर फिरविली कीं त्या कृत्रिम मुलींत यान्त्रिक सामर्थ्य तयार होऊन त्याच्या हातून ती सुटली व कडाड कडाड असा शब्द होऊन आकाशात आगीचा लोळच्या लोळ उठलेला दिसला. कंस त्या आगीच्या लोळाकडे वर पाहातो, तों त्यांत अग्निज्वालामय अष्टभुजेची मूर्ति व 'मूर्खा, तुझा शत्रु जिवंत आहे' हीं धगधगीत अक्षरें त्याच्या दृष्टीस पडलीं, आणि तें इन्द्रजाल वरच्यावर अदृश्य झालें! आपले सर्व प्रयत्न फसून शेवटीं आपला शत्रु जिवंतच राहिला. ह्या धगधगीत

शब्दांनीं जणूं काय त्याचें अंतःकरण भाजून निघालें व मृत्यूच्या भयानें तो बेशुद्ध झाला. कंस बेशुद्ध झाला, हे दिसतांच आंत घुसण्याचें नाटक करणाऱ्या दमघोषाला व त्याच्या नोकरांना आंत सोडण्यांत आलें. दमघोषानें बेशुद्ध कंसाला उचलून राजमहालात नेले. त्याने कंसाला सावध केलें. कंस सावध होतांच दमघोष म्हणाला, 'देवांनीं आपल्याला फसविलें. पुढे काय करायचें त्याबद्दल दानवेंद्राला विचारले पाहिजे. आता एक क्षणहि दवडून उपयोग नाहीं. हा मी दानवेंद्राकडे चाललोच.' कंस त्याला कांहीं म्हणणार तोंच घाईघाईनें तो आपल्या नोकरासह चालता सुद्धां झाला. कंस हताश दृष्टीने पाहातच राहिला. इतक्यांत ब्रह्मवीणेचा झणत्कार त्याच्या कानावर आला. देवर्षि—नारद त्याचें सांत्वन करण्याकरितां येत होते !

---

## प्रकरण ४ थें

# उत्पात व स्थलान्तर

नारदऋषि आलेले पाहातांच त्याहि स्थितींत कंसाला, आपल्या हिताची कांहीं तरी गोष्ट समजेल, अशी आशा वाटली. त्यानें नारदाना उत्थापन देऊन बसायला आसन दिलें. नारदऋषि आसनावर बसले व बोलूं लागले. ते म्हणाले, "कंसा, ब्रह्मदेवानें ललाटीं लिहिलेलें लिखित कोणालाहि टाळतां येत नाहीं. त्यांत कांहीं फेरफार व्हावयाचा असला तर

तो त्याच्याच इच्छेने होत असतो. त्याची इच्छा म्हणजे वेद. ही सर्व सृष्टि व वेद एकसमयावच्छेदेंकरून त्याच्या मनापासून निर्माण झालीं. म्हणुन ह्या अद्‌भुत सृष्टीचे कोडे एक वेदच उलगडूं शकतो. मरण हे सृष्टींतील एक मोठे कोडें आहे. ते काय आहे ह्याचे यथार्थ ज्ञान फक्त वेदाच्या वचनाधारें विचार केला तरच होतें. तसे ज्ञान झाल्यावर मृत्यूची भीति वाटत नाहींशी होते. मृत्यूची भीति नाहींशी व्हावी अशी तुझी इच्छा असेल तर वेदवचनाधारे कसा विचार करावा ह्याचा मार्ग मी तुला दाखवितों. आज नाहीं उद्या, केव्हा तरी, शंभर वर्षांनीं पण जन्माला आलेल्या प्रत्येक प्राण्याला मृत्यु हा येणारच. तो अटळ आहे. तो प्रयत्नाने पुढे ढकलता येतो. पण तीहि गोष्ट वेदविधीचा आश्रय घेऊनच करता येते. कंसा, गर्गमुनींनीं हा मृत्यु दूर ढकलण्याचा उपाय तुला सुचविला होता. पण तूं तुझ्या मंत्र्यांच्या सल्ल्यानें भलतीच गोष्ट आरभलीस. जगाच्या दृष्टीने महापातक, अशा भयंकर सात बालहत्या तूं केल्यास. पण आठवा तुझा विधिलिखित मृत्यु तुला नाहींसा करता आला नाहीं, ह्या गोष्टीचा तुला अनुभव आला. अजूनहि तूं विचार कर. ह्या बाबतींत सल्ला कोणाचा घ्यायचा ? मंत्र्यांचा, दानवेंद्राचा की गर्गमुनीचा ? हे तुझे तूंच ठरव." कंस हात जोडून दीनपणाने म्हणाला, "नारद ऋषे, तुम्हीच आतां मीं काय करावें ते सागा आपण अंतर्ज्ञानी, सर्वज्ञ आहांत. माझ्या हातांतून निसटलेला मृत्यु कोठे आहे ते मला सागा." नारद म्हणाले, "तो तुझा विधिलिखित मृत्यु कोठे आहे हे इतके सहजासहजीं कळणें आतां कोणालाच शक्य नाहीं. ही गोष्ट कळणें मलाहि जवळ जवळ अशक्यप्राय आहे. पण तूं विचारलेंस म्हणून माझ्या आश्रमात जाऊन शांतपणें समाधि लावून योगसाधनानें, हरप्रयत्नानें ही गोष्ट साध्य होते कीं काय पाहतों. माझा प्रयत्न सफल झाला कीं मी तुला कळावितों. उगीच बेचैन होऊन कुणाच्या तरी नादीं लागून भलताच प्रयत्न करीत बसूं नको. माझ्यावर तुझा विश्वास असेल तर कांहीं काल तरी कसलाच प्रयत्न न करणे तुला श्रेयस्कर आहे, असें मला वाटते."

अशा रीतीनें कंसाला थोडें आशेचें बोट लावून त्याचें समाधान करून नारद निघून गेले. वसुदेवाला आठवा मुलगा न होतां मुलगी झाली आणि ती कंसाच्या हातातून सुटून आकाशमार्गानें निघून गेली, ही गोष्ट हा हा म्हणता सर्व मथुरा नगरींत पसरून, सर्वांनाच आश्चर्य वाटलें. कंसाच्या छळाने त्रासलेल्यांना, कंसाच्या भयंकर प्रयत्नाना न जुमानतां त्याचा मृत्यु त्याच्या हातांतून निसटला हे ऐकून आनंद झाला, आणि मग गप्पाना आणि कल्पना-तरंगांना ऊतच आला. कोणी म्हणत, कंसाच्या हातून झालेल्या सात बालहत्याच पिशाचरूपानें प्रगट होऊन आता त्याचा नाश करतील. कोणी म्हणत कंसाच्या हातून सुटलेली जी मुलगी आकाशमार्गानें निघून गेली, तीच पुत्र रूपानं परत येऊन कंसाचा नाश करील. कोणी म्हणत, कंसाला मारण्याकरितां प्रत्यक्ष ईश्वरानेंच देवकीच्या पोटीं आठव्या पुत्ररूपाने येऊन व कन्या स्वरूपांत गुप्त होऊन आपल्या अंगच्या सामर्थ्याची चुणुक त्यानें कंसाला दाखविली. आता तो अदृश्य रूपानें कंसाच्या भोंवतीं भोंवतीं हिंडत राहून कंसाचा केव्हा प्राण घेईल याचा पत्ता लागणार नाहीं. अशा नानाविध कल्पना हवेंत झपाट्यानें पसरूं लागतांच कंसाची भीति वाढूं लागली. त्याला सर्व ठिकाणीं तो आठवा पुत्र दिसूं लागला. तो झोपेंत दचकून ओरडूं लागला; जागेपणीं प्रत्येकाकडे संशयित दृष्टीनें पाहूं लागला. नारद आपल्या योग-बलानें व दिव्य दृष्टीनें ह्या गोष्टीचा सुगावा लावतील, अशी पुष्कळ दिवस त्याला आशा होती. पण जसजसे दिवस जाऊं लागले, तसतशी त्याची निराशा होऊं लागली. त्याचे मंत्री त्याला निराळ्याच प्रकारचा सल्ला देऊं लागले. दानव म्हणून त्याच्याजवळ राहणाऱ्या दुष्ट लोकांनीं तर देवांच्या कपटाच्या अनेक गोष्टी सांगून त्याला अगदीं गांगरून सोडला. ते म्हणूं लागले, "यादवांना ह्या देवाची मदत आहे. वसुदेव-देवकीचा हा आठवा पुत्र वांचाविण्यांत ह्या देवांचें अंग आहे. देवांचें मूळ विष्णु, विष्णूचें मूळ सनातन धर्म आणि सनातन धर्माचें मूळ वेद, गाई, विप्र, तप व दक्षिणासहित यज्ञ. म्हणून अवतार घेऊन आम्हां दैत्य-दानवांचा नाश करणाऱ्या विष्णूचें अजिबात उच्चाटन करावयाचें

असेल तर तप, सत्य, इंद्रियनिग्रह, शम; श्रद्धा, दया, सहनशीलता व क्रतु ह्या विष्णूच्या तनूंना धारण करणारे वेदवेत्ते तपस्वी व यज्ञशील ब्राह्मण, ऋषि आणि यज्ञाकरिता दुग्धादि हवि देणाऱ्या गाई या सर्वांचा प्रयत्नांनीं नाश केला पाहिजे." मृत्यूच्या भयाने गांगरून गेलेला कंस, दानव म्हणविणाऱ्या दुष्टाच्या सल्ल्याप्रमाणे वागण्याचा निश्चय करून सज्जनांचा नाश करण्याच्या प्रयत्नाला लागला.

इकडे गोकुळांत पुत्रजन्मोत्सव फार मोठ्या थाटानें सुरू झाला. पुत्र झाल्यानंतर मनानें उदार असलेल्या नंदाला आल्हाद झाला. त्यानें स्नान केलें. अलंकार धारण करून त्यानें ज्योतिषशास्त्र जाणणाऱ्या ब्राह्मणांना बोलाविलें. त्यांच्याकडून स्वस्तिवाचन करवून पुत्राचा जातकर्मसंस्कार त्यानें यथाविधि करविला. अलंकार धारण केलेल्या शेंकडों गाई व उंची वस्त्रे यांचें त्यानें ब्राह्मणांना दान केलें. काल, स्नान, शौच, संस्कार, तप, यज्ञ, दानें, संतोष व आत्मविद्या ह्याच्या योगाने अनुक्रमे भूमि, देह, अमेध्य, संसृष्टपदार्थ, गर्भादिक, इंद्रियादिक, ब्राह्मण, द्रव्यें, मन व जीवात्मा ह्यांची शुद्धि होते असें शास्त्रवचन आहे. ब्राह्मण स्वास्तिवाचन करूं लागले. गायक गाऊं लागले. नौबती व चौघडे एकसारखे वाजूं लागले. तें गोकुल तर चित्रविचित्र ध्वज, पताका, माळा, झालरी, पल्लव व तोरणें यांच्या योगानें भूषित झालें होतें आणि त्याच्या वेशी, चौक व आतील घरें ह्यांचे ठिकाणीं झाडून सडा टाकिला होता. गाई, बैल व खोंड ह्यांच्या अंगाला हळद व तेल लाविलें होतें आणि मोरांचीं पिसें, पुष्पाचे हार, वस्त्राच्या झुली त्यांना घातल्या होत्या. त्यावेळीं मोठीं मोठीं मूल्यवान् वस्त्रें, भूषणें व पागोटीं ह्यांनीं भूषित झालेले गोपाल, नाना प्रकारचे नजराणे घेऊन नंदाकडे आले. यशोदेला मुलगा झाल्याचे ऐकून आनंदित झालेल्या गोपींनीं वस्त्रें, अलंकार व काजळ इत्यादिकांनीं आपले देह भूषित केले. त्यांचीं शरीरें बांधेसूद व पुष्ट होतीं. त्यांनीं कानांमध्यें हिऱ्यामोत्यांचे अलंकार धारण केले होते, कंठामध्यें मोहोरांच्या माळा घातल्या होत्या व चित्रविचित्र वस्त्रें परिधान केलीं होतीं. अशा त्या गोपी ओटीचें सामान घेऊन नंदाच्या घरीं गेल्या. बालकाला त्यांनीं आशीर्वाद दिले. गोकुळच्या

पद्धतीप्रमाणें हळद, तेल व उदक एकमेकींच्या अंगावर उडवून त्या गाऊं लागल्या. गोप आनंदित होऊन एकमेकांच्या अंगावर दहीं, दूध, तूप व उदक उडवूं लागले. नाना प्रकारचीं वाद्ये वाजवून ते आनंदाने नाचूं लागले. नाचता नाचतां एकमेकाच्या तोंडात लोण्याचे गोळे घालून ते सतुष्ट झाले. गोप मंडळींचा हा आनंदोत्सव अवर्णनीय झाला. उदार मनाच्या नंदानें ज्याना त्याना त्याच्या त्याच्या इष्ट वस्तु देऊन सर्वांचा यथायोग्य सत्कार केला.

पुढे एकदां नंद कंसाला वार्षिक कर देण्याकारिता मथुरेस गेला. त्यानें राजाला कर दिला. तें वर्तमान ऐकून वसुदेव गाड्याच्या तळावर त्याच्या भेटीस गेला. नंदाला पुत्र झाल्याबद्दल त्याने नंदाचें अभिनंदन केलें. दोघेहि स्नेही एकमेकाना आनंदाने भेटले. कुशलतेने कुशल प्रश्न विचारून वसुदेवाने बळरामाचे व आपल्या नूतन पुत्राचें क्षेम समजून घेतलें. नंदाला उतारवयात झालेल्या एकुलत्या एक पुत्राची पराकाष्ठेची काळजी घेण्याबद्दल त्याने फार कळकळीने सांगितलें. आतां राजधानींत फार वेळ न घालविता गोकुळास परत जाण्यास त्यानें नंदाला सांगून लगेच त्याची रवानगीहि केली. गोकुळाच्या रक्षणाची काळजी आता खुद्द नंदापेक्षांहि वसुदेवाला जास्त लागली होती.

पुढील तीन वर्षें गोकुळाला निरानिराळया प्रकारांनीं फार अनिष्ट अशीं गेलीं. नंदाच्या, विशेषतः वसुदेवाने आपल्या जहागिरीत राहून घेतलेल्या विशेष काळजीमुळें तीं सर्व अरिष्टें शांत झालीं. हल्लीं ज्याप्रमाणें वाख्या-सारखा रोग खेडोपाडीं तीव्रतेनें पसरून मनुष्यसंहार होतो, अशिक्षित लोक वाख्याला मरीआईचा फेरा समजून रोगाचा उपशम होण्याकारितां मरगाई देवतेची आराधना करतात, त्याचप्रमाणें त्या काळींहि रोगा-संबंधीं विचित्र समजुती असून त्या रोगांचीं नांवेंहि अशींच विचित्र असत. पूतना ह्या नांवाची एक भयंकर विषारी तापाची साथ खेडोपाडीं पसरे. मातीमध्यें खेळणारीं तशींच अगदीं तान्हीं मुलें ह्या सांथीनें लवकर पछाडलीं जात. देवी, गोंवर ह्यांसारखा मुलाना संसर्गानें पछाडणारा हा ताप आला कीं मुलांची अगदीं भयंकर अवस्था होई. ताप फार चढे,

मूल अगदीं मलूल होऊन काळवंडून जाई; खाल्लेलें, प्यालेलें ओकून पडे, खाखाई फार होई आणि पोटांत तर काहीं ठरत नसे. दहा बारा वर्षांनीं ह्या सांथीचा फेरा येई व जशी काहीं बलाढ्य शत्रूच्या सैन्याची स्वारीच यावी इतक्या लवकर ती सर्व प्रदेश व्यापून टाकी. म्हणून ह्या सांथीला पृतना म्हणजे बलाढ्य प्रचड सैन्य, असे अन्वर्थक नांव पडलें होते. त्याचें अपभ्रष्ट रूप पूतना असें झालें व त्या नावाच्या एका काल्पनिक भयंकर राक्षसीशी त्या साथीचा संबंध जोडला गेला. गौळवाड्यातून ठवलेल्या आपल्या मुलाचा अशा खेडोपाडीं पसरणाऱ्या सांथीपासून बचाव कसा करावा, ह्या विवंचनेंत असलेल्या वसुदेवादि यादवांचे आयुर्विद्याविशारदांशीं नेहमी विचारविनिमय होऊन औषधी जमविण्याचे, त्याचे प्रयोग करून पाहाण्याचे काम चालूच असे. हिमनगवासी शास्त्रज्ञांशीं वसुदेवाचा अलीकडे फार संबंध आल्याने त्यानीं शोध लावलेला ह्या पृतना रोगावर फार सुलभ व खात्रीचा उपाय यादवांना मिळाला, व त्याचा अनुभव घेण्याचा प्रसंगहि फार लवकर आला.

नंदाला पुत्र झाल्यानंतर एक वर्षाच्या आतच गोकुळात ह्या पृतना सांथीचा भयंकर फेरा आला, शेकडो हजारो मुले बेमार झालीं. सर्व गोकुळवासी लोक गडबडले. रोहिणीपुत्र व नंदपुत्रहि जेव्हां ह्या सांथींत सांपडले तेव्हां तर सर्वांच्या तोंडचे पाणी पळालें. पण हिमनगवासी धन्वंतरी त्याच वेळीं वसुदेवाच्या जहागिरींतील गावीं असल्यामुळें वसुदेवाच्या सांगण्यावरून त्यानीं गोकुळाकडे धाव घेतली व ह्या सांथीवरचा सुलभ पण रामबाण उपाय त्यांनीं सर्व गौळवाड्यात समजावून दिला, आणि नंदपुत्रासह हजारों बालकाचें ह्या सांथीपासून रक्षण केलें. इतकेंच नव्हे तर पुतनेचें ह्या उपायांनीं त्यांनीं समूळ उच्चाटन करून टाकलें. गौळवाड्यासारख्या ठिकाणीं राहणाऱ्या गोपांना ह्या पृतना अथवा पूतना रोगावरचा उपाय सहज साध्य आहे. बालकाचा रक्षणविधि पुढें दिल्याप्रमाणें आहे. रोगानें पछाडलेल्या बालकाला दोन दोन तासांनीं संध्येच्या पळीभर गोमूत्र पाजावें. गोमूत्र व गाईच्या पायानें उडणारी धूळ हीं एकत्र करून त्यांचा त्या बालकाच्या सर्वांगाला वारंवार लेप करावा. गाईचें पुच्छ बालकाच्या

अंगावरून वारंवार फिरवावें. सकाळसंध्याकाळ, दोन्ही वेळां, मुलाला ते घेईल त्या मानानें धारोष्ण गोदुग्ध पाजावें. घरात चंदन, निंब, धूप वगैरे सुवासिक द्रव्यें जाळून रोगाच्या कालांत सर्व घर सुगंधानें भरलेलें राहील अशी व्यवस्था करावी. गोकुळ भागांतून ह्या पूतना रोगाचें समूळ व कायमचे उच्चाटन करण्याकरितां हिमनगवासी धन्वन्तरीच्या सल्ल्याने सतत सात दिवस अहोरात्र गोकुळांतील सर्व भागांत चंदन, निंब, चांफा, उंबर वगैरे वृक्ष व बाम्हा, कचोरा व इतर अनेक जंगली सुगंधी लता-वनस्पति तोडून आणून त्याच्या होळया पेटत ठेवल्या होत्या. ह्याकरितां गोकुळांतील आजूबाजूच्या सहा कोसांतील थोडाबहुत सुगंध देणारे सर्व जंगली वृक्ष व लता तोडल्या गेल्या. सात दिवसपर्यंत गोकुळांतील सर्व वातावरण पेटलेल्या होळयांच्या सुगंधी धुरानें व उष्णतेनें भरून राहिलें होतें. घरोघर विष्णुकवचाचे पाठ [ रान शेणीच्या भस्मांत गाईचे दुधापासून केलेलें दहीं व तूप मिसळून त्याचे तिलक पुढे दिलेल्या श्री-विष्णुकवचानें अभिमंत्रण करून बालकाच्या ललाटादि बारा अवयवांवर लावावें ] म्हटले जात होते. अशा प्रकारचा उत्तम उपाय केल्याने गोकुळांतील पूतनेचा पूर्णपणें नाश झाला. ह्या उत्तम उपायाची सर्वत्र माहिती झाल्याकारणानें जगांतून पूतना नष्ट झाली. नंदपुत्राची विशेष काळजी घेतल्यानें हा उपाय जगाच्या हातीं लागला म्हणून पूतनेचा नाश करण्याचें सर्व श्रेय त्या नंदबालकालाच जगानें दिलें. नंदबालकानें आपल्या प्रभावानें पूतनेचा नाश केला असें आपल्या ग्रंथांत लिहून ठेवून व्यासांनीं ही गोष्ट चिरस्मरणीय केली. लोककल्याणार्थ श्रीमद्व्यासांनीं बालकाला लावण्याचे तिलक अभिमंत्रण करण्याकारितां श्रीविष्णुकवच लिहून ठेवलें आहे. तें आम्ही येथें सार्थ देत आहोंत.

अव्यादजोऽङ्घ्रि मणिमांस्तव जान्वथोरू
यज्ञोऽच्युतः कटितटं जठरं हयास्यः ॥
हृत्केशवस्त्वदुर ईश इनस्तु कण्ठं
विष्णुर्भुजं मुखमुरुक्रम ईश्वरः कम् ॥ १ ॥

अर्थ

तुझ्या पायाचें अज रक्षण करो; गुडघ्यांचें अणिमान्, मांड्यांचें यज्ञ, कंबरेचें अच्युत, उदराचें हयग्रीव, हृदयाचें केशव, वक्षःस्थलाचें ईश, कंठाचें सूर्य, भुजांचें विष्णु, मुखाचें उरुक्रम आणि मस्तकाचें ईश्वर रक्षण करो.

चक्र्यग्रतः सहगदो हरिरस्तु पश्चा—
त्वत्पार्श्वयोर्धनुरसी मधुहाऽजनश्च ॥
कोणेषु शङ्ख उरुगाय उपर्युपेन्द्र
स्तार्क्ष्यः क्षितौ हलधरः पुरुषः समन्तात् ॥ २ ॥

अर्थ

चक्र धारण करणारा हरि तुझ्या अग्रभागीं असो; गदाधारी हरि तुझ्या पाठीमागे असो; धनुर्धर मधुसूदन आणि खड्गधारी अजन हे तुझ्या दोन्ही बाजूंकडे असोत; ज्याची लीला सर्व लोक गातात असा शंख धारण करणारा देव तुझ्या चारी कोपऱ्यांस, उपेंद्र ऊर्ध्वभागीं, गरुड अधोभागीं आणि हलधर असा परमेश्वर तुझ्या सभोंवतीं असो.

इंद्रियाणि हृषीकेशः प्राणान्नारायणोऽवतु ॥
श्वेतद्वीपपतिश्चित्तं मनो योगेश्वरोऽवतु ॥ ३ ॥

अर्थ

हृषीकेश तुझ्या इंद्रियांचें रक्षण करो, नारायण तुझ्या प्राणांचें, श्वेतद्वीपाधिपति चित्ताचें, योगेश्वर मनाचें रक्षण करो.

पृश्निगर्भस्तु ते बुद्धिमात्मानं भगवान्परः ॥
क्रीडन्तं पातु गोविन्दः शयानं पातु माधवः ॥ ४ ॥

अर्थ

पृश्निगर्भ तुझ्या बुद्धीचें आणि सर्वगुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर तुझ्या आत्म्याचें रक्षण करो. तूं खेळत असतांना गोविन्द तुझें रक्षण करो, तूं निद्रिस्त असतांना माधव तुझें रक्षण करो.

व्रजन्तमव्याद्वैकुण्ठ आसीनं त्वां श्रियः पतिः ॥
भुञ्जानं यज्ञभुक्पातु सर्वग्रहभयंकरः ॥ ५ ॥

अर्थ

चालत असतांना वैकुण्ठ, बसला असताना श्रीपती आणि भोजनसमयीं सर्व ग्रहाना भयंकर असणारा यज्ञभोक्ता तुझें रक्षण करो.

डाकिन्यो यातुधानाश्च कूष्माण्डा येऽर्भकग्रहाः ॥
भूतप्रेतपिशाचाश्च यक्षरक्षोविनायकाः ॥ ६ ॥
कोटरा रेवती ज्येष्ठा पूतनामातृकादयः ॥
उन्मादा ये ह्यपस्मारा देहप्राणेन्द्रियद्रुहः ॥ ७ ॥
स्वप्नदृष्टा महोत्पाता वृद्धबालग्रहाश्च ये ॥
सर्वे नश्यन्तु ते विष्णोर्नामग्रहणभीरवः ॥ ८ ॥

अर्थ

डाकिनी, यातुधानी, कूष्माण्ड, इतरहि बालगृह, भूत, प्रेत, पिशाच, यक्ष, राक्षस व विनायक, कोटरा, रेवती, ज्येष्ठा, पूतना, मातृकादिक, उन्माद, अपस्मार, देह, प्राण व इंद्रियें ह्यांचा द्रोह करणारे स्वप्नात दिसणारे आणि वृद्धाना व बालांना झपाटणारे जे ग्रह आहेत ते सर्वहि विष्णूच्या नामग्रहणानेंच भिणारे असल्यामुळें नष्ट होवोत.

अशा प्रकारें रक्षणविधीसह उत्तम औषधोपचाराच्या प्रभावानें पूतनेचा पूर्णपणें नाश होऊन तिच्या भयंकर हल्ल्यांतून नंदपुत्रासह हजारों बालकें सुखरूप पार पडलीं. सात दिवसांनंतर नंदपुत्रासह गोकुळांतील सर्व बालकांना मातांनीं मंगलस्नानें घातलीं, गोमाताचें मोठ्या थाटानें पूजन केलें. पूतनेच्या वधोपायाचा शोध लावून सर्व जगावर उपकार करणाऱ्या हिमनगवासी धन्वन्तऱ्यांचा नंदानें अपूर्व सत्कार केला. अशा रीतीनें गोकुळावर आलेलें पूतनेचें भयंकर अरिष्ट कायमचें नष्ट झालें. हिमनगवासी धन्वन्तऱ्यांनीं सांगितलेला हा बहुमोल औषधि उपचार परमपावन विष्णुकवचाच्या रक्षणाविधीसह श्रद्धेनें जे कोणी करतील त्यांच्या हातून लहान

बालकांवर येणारीं सर्व अरिष्टें नाहींशीं होतील अशी परमश्रेष्ठ व्यासमुनि सर्वांना ग्वाही देत आहेत.

नंदपुत्र उपडा वळूं लागला म्हणून नंदराजानें मोठा समारंभ केला. त्या दिवशीं पुत्राच्या जन्मनक्षत्राचाहि योग आला होता म्हणून पुत्राला स्नान घालतांना जन्मनक्षत्रयोग सौम्य आणि मंगलकारक व्हावा म्हणून वेदविद् ब्राह्मणाकडून मंत्रपठण चालविलें होतें. गोपी वाद्ये वाजवून मंगलगीते गात होत्या. अशा रीतीने ब्राह्मणानीं व सौभाग्यालंकारांनीं भूषित असलेल्या स्त्रियांनीं बाळाचें मंगल केल्यानंतर त्या वेळच्या गोपपद्धतीप्रमाणे दूध, दहीं, लोणी अशा गोरसानीं भरलेले मोठमोठे डेरे ठेवलेल्या मोठ्या गाड्याखालीं टांगलेल्या पाळण्यात त्या बाळाला समारंभाने निजविलें व नंद–यशोदा यांनीं अन्न, वस्त्रे, माळा, इष्टपदार्थ व गाई देऊन जमलेल्या सर्व मंडळींचा सत्कार करण्यास सुरवात केली. इतक्यांत एकाएकीं पाळणा टांगलेला गाडा उलथून पडला. त्यांतील अनेक रसांनीं भरलेल्या भांड्यांचा विध्वंस झाला. चाकें, कणा हीं अस्ताव्यस्त झालीं आणि दांड्याहि मोडून गेल्या. ह्या भयंकर अपघातानें एकदम गोंधळ झाला. सर्वजण गाड्याकडे धांवले. मुलाला इजा झाली असेल ह्या भीतीने नंद–यशोदा व्याकुळ झालीं, पण मोडून पडलेल्या त्या प्रचंड शकटाखालीं पाळण्यांत निजलेल्या बाळाला कांहीं इजा न होतां तें अगदीं सुरक्षित आहे असें पाहून सर्वांना अत्यानंद झाला व परम आश्चर्य वाटलें. सर्वजण म्हणूं लागले, ह्या प्रचंड शकटासुरानें बाळाचा नाश करण्याची वेळ आणली होती, पण द्विजांच्या मंत्रपठणानें व भाग्यवान् बाळाच्या प्रभावानें त्या गाड्याचा— त्या प्रचंड शकटासुराचाच नाश होऊन सर्व अरिष्ट शांत झालें. अरिष्टाला असुर म्हणून संबोधण्याची त्या वेळच्या खेडोपाड्यांतल्या लोकांची चालच होती. बाळावरचें हें दुसरें संकट टळलें.

रोहिणीपुत्र बळराम आतां चालूं लागला होता व नंदबालक रांगूं लागलें होतें. त्यांच्या बाळपणच्या खेळकर चेष्टांनीं गोकुळांतील सर्वांना कौतुक वाटे. गोकुळात त्यावेळीं गाईंच्या करितां गवताचे माचे घालण्याचें काम चालू होतें. शेंकडों गाड्या गवत प्रत्येकाच्या अंगणांत गोठ्यापुढें

येऊन पडलें होतें. अंगणांत सायंकाळच्या वेळीं पाउलें टाकूं लागलेलीं व रांगणारीं मुलें खेळत असतां एक दिवस एकाएकीं वादळाला सुरवात झाली. धुळीचे लोटच्या लोट आकाशात उसळूं लागले. अंगणांत पडलेलें शेंकडों गाड्या गवत वावटळीनें उडवून दिलें. धुळीच्या लोटाप्रमाणें गवत वर उसळून त्याचे अनेक भोंवरे आकाशांत गरगर फिरूं लागले धूळ आणि गवताच्या काड्या ह्यांनीं लोकाना आपल्या घरांबाहेर तोंड काढवेना. जेमतेम मुलांना अंगणांतून उचलून घरांत नेण्याचे काम सर्वांनीं केलें. पण मोठ्या दुर्दैवाची एक गोष्ट झाली. नंदाच्या वाड्याच्या अंगणांत खेळत असलेलें नंदबालक, वाड्यापुढें पडलेले गवताचे ढीग वर उसळले, त्यात कोठें नाहींसें झालें त्याचा पत्ता लागेना. त्याच्या शोधाकरितां गोपमंडळींची धांवाधांव व आरडाओरड सुरू झाली. वादळाच्या प्रचंड वेगानें धूळ–गवत–मिश्रित गरगर फिरणाऱ्या वावटळीच्या भोंवऱ्यांत कोणाला डोळे उघडून शोध करणें अशक्य झालें सर्वजण हताश झाले वावटळीप्रमाणेंच दुःखालापाचेहि कल्लोळ उसळूं लागले. सृष्टीच्या सामर्थ्यापुढें कोणाचेंहि चालेना. हळू हळू वादळाचा जोर कमी होऊं लागला आकाशांत उसळलेली धूळ व गवत आस्ते आस्ते खालीं येऊं लागलें. कांहीं वेळानें जिकडे तिकडे गवतच गवत अस्ताव्यस्त पडलेलें दिसूं लागलें. वादळ शांत झालें. नंदाच्या वाड्यापुढें पडलेल्या गवताच्या ढिगाऱ्याखालीं हरवलेल्या नंदबाळकाचा शोध करण्याकरितां सर्वजण धांवले. सर्व गवत त्यांनीं बाजूला केलें. काय चमत्कार सांगावा! एका नुकत्याच घालण्याला सुरवात केलेल्या माचाच्या भोंवतालचें गवत दूर करताच माचाचे खालीं रडून रडून झोपीं गेलेलें नंदबालक सर्वांच्या दृष्टीस पडलें. घाईघाईनें त्यांनीं त्याला बाहेर काढलें. यशोदा धांवत आली. तिनें त्याला उचलून हृदयाशीं कवटाळलें. बालकानें डोळे उघडून आईच्या मुखाकडे पाहातांच तें खुदकन् हंसलें. त्याच्या हास्यप्रभेंतून पुनः जिकडे तिकडे आनंदाचा झगझगाट होऊन सर्व गोकुळ हर्षातिशयानें प्रसन्न दिसूं लागलें. वादळानें केलेल्या ह्या भयंकर उत्पातालाहि एका असुराच्या दुष्कृत्याचें व त्याच्या नाशाचें स्वरूप देऊन भाग्यवान नंदबाळकाच्या प्रभावानें गोकुळावर

आलेलें हें अरिष्ट टळलें असें सुंदर काल्पनिक कथानक गोकुळवासीयांनीं आपल्या गप्पाष्टकांतून निर्माण केले. संस्कृतमध्यें वादळ, वावटळ ह्याला तृणावर्त असें वावटळीचें बरोबर वर्णन करणारें अन्वर्थक नांव आहे. गोकुळांत झालेली ही भयंकर वावटळ म्हणजे तृणावर्त दैत्यानें गोकुळावर व नंदबालकाच्या जिवावर आणलेलें भयंकर संकट असें ठरवून त्या बालकाने आपल्या प्रभावाने त्या तृणावर्त दैत्याचा नाश करून गोकुळाला त्या अरिष्टांतून मुक्त केलें अशी चर्चा गोकुलवासी लोक करूं लागले.

एकदा वसुदेवानें पाठविल्यामुळें यादवपुरोहित महातपःस्वी गर्गमुनी नंदाच्या गोकुळामध्यें गेले. ते आल्याचें पाहून नंद अत्यंत संतुष्ट झाला. हात जोडून ईश्वरबुद्धीने प्रणाम करून त्याने मुनींचें पूजन केले. नंतर आदरसत्कार स्वीकारून ते मुनि स्वस्थ बसले असतांना मधुरवाणीनें व नम्रतेनें नंद त्यांना म्हणाला, "हे ब्रह्मनिष्ठ, पूर्णकाम असलेल्या आपणाकरिता आम्हीं काय करावे? हे भगवन्, आपणासारख्या महात्म्यांचें आमच्यासारख्या सामान्य गृहस्थाचे घरीं आगमन हे आमच्या कल्याणाकरितांच असते. ज्यानें अतींद्रिय ज्ञान प्राप्त होतें व ज्याच्या योगानें पुरुषाला पूर्वजन्मार्जितकर्म आणि त्याचें फल समजून चुकतें, तें प्रत्यक्ष ज्योतिषशास्त्र आपण केलेलें आहे. आपण ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ आहां. ह्यास्तव आपण ह्या माझ्या बालकाचे यथोचित संस्कार करावे." ह्यावर गर्ग म्हणाले, "नंदा, मी यादवाचा आचार्य म्हणून भूतलावर सर्वप्रख्यात आहे. ह्यास्तव, तुझ्या पुत्राचा संस्कार मीं केला असतां त्याला पापबुद्धि कंस देवकीचा पुत्र मानूं लागेल. तुझें वसुदेवाशीं सख्य आहे, त्याचप्रमाणे देवकीचा आठवा गर्भ स्त्री होणें शक्य नाहीं, हे हातून सुटलेल्या मुलीचे अग्निमय शब्द कंसानें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिले आहेत. त्यांत मीं ह्या मुलाचे संस्कार केले, असें त्यानें ऐकलें तर हाच तो त्याचा शत्रु, देवकीचा आठवा पुत्र अशी शका घेऊन त्यानें ह्या तुझ्या मुलाचा वध केला तर आपल्यावरती मोठांच अनर्थ गुदरेल." यावर नंद म्हणाला, 'आपण ह्या गोठ्यामध्यें अगदीं एकांतांत माझ्या लोकांच्याहि दृष्टीस न पडतां ह्या मुलाचा स्वास्तिवाचनपूर्वक केवल द्विजातींना उपयुक्त असाच

नामकरणसंस्कार करावा.

ह्याप्रमाणें नंदानें प्रार्थना केली असता गर्गमुनींनीं स्वतःच्या मनांत योजिलेलें त्या बालकाचें नामकरण एकांतांत केलें. नंतर गर्ग नंदाला म्हणाले, " हा तुझा पुत्र सामान्य नसून हा प्रत्यक्ष विष्णु तुझ्या घरीं अवतीर्ण झाला आहे असे तूं समज. ह्याचा सुंदर श्यामवर्ण असल्यामुळें लोकांमध्यें हा ' कृष्ण ' ह्या नावाने प्रसिद्ध होईल. हा तुझा पुत्र पूर्वी एकदां वसुदेवाचा पुत्र झाला होता म्हणून ज्ञानी लोक ह्या श्रीमान पुत्राला वासुदेव असें म्हणतील. हा रोहिणीचा पुत्र बलराम ह्याला आपला वडील भाऊ समजून वागेल. तूंहि ह्या दोघांना सख्खे भाऊ समजून एका ठिकाणीं वाढव. गोप व गोकुल याना आनंद देणारा हा तुमचें कल्याण करील, आणि ह्याच्याच योगानें तुम्ही अनायासे सर्व संकटें तरून जाल. हे नंदा, हा तुझा पुत्र श्री, गुण, कीर्ति व प्रभाव ह्याच्या योगानें प्रत्यक्ष नारायणासारखा होणार आहे; म्हणून त्या दृष्टीने ह्याचें आरोग्य व शिक्षण ह्याच्याकडे तूं दक्ष राहून लक्ष दे व ह्याचें रक्षण कर. " ह्याप्रमाणे सांगून गर्ग स्वाश्रमीं निघून गेले. नंद मनामध्ये आनंदित झाला. त्यानें गर्गांच्या वचनाप्रमाणें रामकृष्णांना वाढविण्याचें ठरविलें. त्याच्या शिक्षणाच्या, आरोग्याच्या बाबतींत आपला चतुर, राजकारणपटु शस्त्रास्त्रसंपन्न शूर जिवलग स्नेही वसुदेव ह्याचा नेहमीं सल्ला घ्यायचा असा त्यानें मनाशीं निश्चय केला.

कांहीं काल लोटल्यावर कृष्ण हळू हळू चालूं लागला. रामकृष्ण ही जोडी आपल्या वाड्यांतून दुसऱ्या घरापर्यंत चालून जाऊं लागली. त्यांच्या खेळकर स्वभावाची सर्वजण वाखाणणी करूं लागले. हळू हळू ते आपल्या बरोबरीच्या मुलांबरोबर खेळूं लागले. धावणें, नाचणें ह्या गोष्टींस सुरवात झाली. मुलांच्या खोड्या काढण्यापर्यंत त्यांनीं मजल मारली. त्यांच्या खोडी काढण्यांतहि त्यांचें एक प्रकारचें चातुर्य दिसूं लागलें. खोडी काढण्यापासून कोणाला राग तर येऊं नये, उलट त्यांनीं हंसून त्यांचें कौतुकच करावें, अशा खोड्या ते करूं लागले. गोकुळांत घरोघर रामकृष्णांच्या बोलण्याचें, खेळांचें, खोड्यांचें कौतुक होऊं लागलें. आपल्या

गोड स्वभावानें ते सर्व गोपगोपींना आवडूं लागले. घरामध्यें नानाप्रकारच्या लीलानीं ते नंद, यशोदा, रोहिणी ह्यांना आनंदित करूं लागले. आपल्या सवंगड्यांना जमवून यशोदेच्या न कळत घरांतील दही, दूध, लोणी याचा ते फन्ना करूं लागले. मुलाना व माकडांना लोण्याचे गोळे देण्यात त्यांना मौज वाटे. त्याच्या हाताला येऊं नयेत म्हणून उंच शिंक्यांवर ठेवलेलीं दह्यादुधाचीं भाडीं काठ्यांनीं ते खालीं पाडूं पाहात. आपल्या घराप्रमाणेच इतर गोपींच्या घरींहि मुले जमवून ते हेच प्रकार करीत. गोपी यशोदेकडे येऊन त्याच्या खोड्याचें कांहीं रागानें, कांहीं कौतुकानें वर्णन करीत. त्यांच्या कागाळ्या आणीत. त्या म्हणत, "बाई यशोदे, हा कृष्ण फारच खोड्या करतो. हा अवेळींच वासरे सोडतो. कोणी आरडाओरड केली कीं नुसता हंसतो. आमच्या घरातील दही, दूध आमच्या न कळत पळवतो. मधुर मधुर असेल तें आपण खातो आणि बाकीचें मुलाना, माकडाना खाऊं घालतो. घरांत कांहीं मिळालें नाहीं तर घरांतल्या लहान मुलाना रडवून पळून जातो. दही, दूध उंच ठेवले असल्यास फळी, उखळी याच्या साहाय्यानें तें खालीं काढण्याचा प्रयत्न करतो. असल्या खोड्या बाहेर करतो आणि तुझ्या शेजारीं बघ हा एकाद्या साधूसारखा स्वस्थ बसतो." हीं गाऱ्हाणीं ऐकून यशोदा मनांत आनंदे, पण वरून रागाचा आविर्भाव आणी, तेव्हा कृष्ण भ्यायल्यासारखा चेहरा करून तिलाच बिलगे. आणि मग सगळीं गाऱ्हाणीं व सगळा राग पार वितळून जाई.

एकदा गाऱ्हाणीं घेऊन येणाऱ्या गोपींचे समाधान व्हावें व कृष्णानें खोड्या करण्याकरितां बाहेर जाऊं नये म्हणून यशोदेनें त्याला दाव्याने उखळीशीं बाधून ठेवलें व आपण गृहकृत्यांत दंग झाली. कृष्ण ती उखळी दाव्यानें ओढीत ओढीत, अंगणांत असलेल्या दोन जुनाट मोठ्या अर्जुन वृक्षांखालीं गेला आणि मोठा भयंकर अपघात झाला. ते दोन वृक्ष एकदम काडकाड असा आवाज करून खालीं उन्मळून पडले. वृक्ष पडण्याचा मोठा आवाज ऐकून घरांतील सर्व माणसें, नंद, यशोदा हीं सर्व धांवत आलीं. ते दोन वृक्ष आपल्या विस्तारानिशीं सपशेल जमिनीवर

आडवे पडलेले पाहून, सर्वांच्या पोटात धस्स झाले. कृष्ण त्याना दिसेना, तेव्हां आपण त्याला उखळीला बाधल्याचें यशोदेला स्मरले. ती पाहू लागली तों उखळीहि दिसेना. तेव्हा तिनें 'कृष्णा, कृष्णा' म्हणून हांका मारण्याचा सपाटा चालविला. पडलेल्या झाडाच्या विस्ताराखालून कृष्णाने भ्यायलेल्या स्वरात 'ओ' दिली. त्याचा शब्द ऐकताच सर्वजण तिकडे धावले. त्या प्रचंड झाडांचीं खोडे एकमेकावर आडवी पडलेलीं असून, मध्यें झालेल्या पोकळीत, उखळीच्या आधाराने बसलेला कृष्ण पाहाताच त्याला तेथून काढण्याची एकच धादल उडाली. उखळीला त्याला बांधल्याबद्दल यशोदा स्वतःला दोप देऊ लागली. शेवटीं एकदाचा कसा-बसा त्याला तेथून काढला. एवढ्या मोठ्या अपघातात कृष्णाला थोडीसुद्धा इजा न झालेली पाहून सर्वांना पराकाष्ठेचा विस्मययुक्त आनद वाटला. कोणीं नंद-यशोदेच्या भाग्याची महती गाण्यास सुरवात केली, तर कोणी कृष्णाच्या तेजानेच तो कोणत्याहि सकटातून मुक्त होतो, असे म्हणून त्याच्या अंगीं दैवी तेज असल्याचे सागू लागले.

नंदादि वृद्ध वृद्ध गोपांना बृहद्वनामध्ये मोठ्या उत्पाताचा अनुभव आल्यामुळे एकत्र जमून गोकुलाच्या हिताविषयी त्यानीं विचार चालविला. त्याच्यामध्यें उपनद नावाचा एक ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध, देश, काल व अर्थ ह्याचें तत्त्व जाणणारा आणि रामकृष्णावर फार प्रेम करणारा गोप होता. तो विचारपूर्वक म्हणाला, "आता आपण गोकुलाचे हित इच्छि-णाऱ्यांनीं येथून उठलेच पाहिजे. कारण, बालकाचा नाश करणारे मोटमोठे उत्पात येथे झाले. बालघातकी पूतनेच्या तावडींतून हें बालक महत् प्रयत्नांनीं मुक्त झाले. खरोखर परमेश्वरकृपेनेच, उलटलेल्या प्रचड गाड्या-खालीं हा कृष्ण सुखरूप राहिला. वावटळीचे रूपाने प्राप्त झालेल्या दैत्याचे हातून हा ईशकृपेनेच सुटला. वृक्षांच्यामध्ये सापडून हा किंवा दुसरा कोणीहि बालक दगावला नाहीं, हेंहि अच्युतानेच केलेलें रक्षण होय. ह्या-साठीं आणखी एकादा उत्पातसंबंधी अनर्थ गोकुलावर येऊन गुदरला नाहीं तोंच, मुलांबाळांना, गाई-वासरांना घेऊन आपण आपल्या चीजवस्तूंसह हे ठिकाण सोडून दुसरीकडे राहण्यास जाऊं. येथून जवळच वृंदावन नामक

वन पशूंना हितावह आहे. त्यांत नऊ पोटवने आहेत. गोप, गोपी आणि गाई ह्यांना राहण्यास ते अगदीं सर्वप्रकारे योग्य आहे. त्यात पुण्यपर्वत, नद्यांच्या उगमस्थानचे जिवंत झरे, सुदर जलाशय, भरपूर तृण व वेली आहेत. म्हणून आजच्या आज आपण येथून निघून तेथेच जाऊं. गाडे जोडा, उशीर नको. तुम्हांला रुचत असल्यास गोधने पुढे जाऊं द्या." हें त्याचे भाषण ऐकून सर्वांनीं एकमताने 'उत्तम, उत्तम' असें म्हणून माना डोलावल्या. त्याचवेळीं एकदोन दिवस अगोदर बृहद्वनातील गोकुल दुसरीकडे कोठेतरी लाव हालवा, असा वसुदेवाकडून नंदाला निरोप आला होता. नद काय करावे ह्या विचारात होताच, त्याला वृंदावनात जाण्याचा हा विचार एकदम पटला. त्यानें वृंदावनात जाण्यास अनुमति देताच निघण्याची एकच गडबड उडाली.

आपापले सामानसुमान गोपानी गाड्यावर घातले आणि आपापले शेंकडों शकटसमूह जोडून ते निघण्यास तयार झाले. वृद्ध, बाल, स्त्रिया याना गाड्यात बसवून गोपाल हातीं धनुष्ये घेऊन सज्ज झाले. त्यानीं गोधने पुढे चालविलीं. सर्व बाजूनी ते शिंगे फुंकूं लागले. आणि तूर्य वाद्याचा मोठा घोष चालला असताना पुरोहितासह ते बृहद्वन सोडून चालले. नवीन केशरामुळें ज्याचीं मुखकमले शोभत आहेत, ज्यानीं मोहोराच्या माळा घातल्या आहेत, ज्यानीं उत्कृष्ट वस्त्रे परिधान केलीं आहेत अशा रथारूढ गोपी आनदाने आपापल्या मुलाना व रामकृष्णाना, गाणीं गात गात, प्रवास करूं लागल्या. यशोदा व रोहिणी एकाच रथावर रामकृष्णासह शोभत होत्या. अशा रीतीने आनदाने प्रवास करून वृंदावनात प्रवेश केल्यावर, त्या ठिकाणीं उत्तम रमणीय व प्रसन्न जागा पाहून गोपानीं शकटाच्या योगाने अर्धचंद्राकृति गोकुलस्थान तयार केलें. वृंदावन, गोवर्धन पर्वत आणि यमुनेचीं वाळवंटे पाहून, सर्व गोपमंडळीना विशेषतः बाल गोपालांना, फार आनंद झाला. पुढे गोकुलवासी जनाना आपल्या बाललीलांनीं आनंद देणारे रामकृष्ण, वासरे चारण्याचे वय होण्याइतका काल लोटल्यावर, वत्सपालक झाले. गौळवाड्याजवळच गोपालाच्या मुलांबरोबर नाना प्रकारचीं खेळण्याची साधनें बरोबर घेऊन ते वासरे चारूं

लागले. कधीं कधीं ते मुरली वगैरे वेणुवाद्ये वाजवीत असत. कधीं कधीं ते गोफणीनें दगड मारीत असत. कधीं कधीं ते पायांत घुंगुर घालून नाचत असत आणि कधीं कधीं ते बैलांचीं सोंगें घेऊन खेळत असत. बैलाप्रमाणें गर्जना करून ते परस्पर कधीं कधीं युद्ध करीत. कधीं कधीं अनेक प्राण्यांचे शब्द करून ते आपली व सवंगड्यांची करमणूक करीत. अशा प्रकारें वृंदावनांतला काळ मोठ्या आनंदांत चालला होता. मोठमोठ्या उत्पातात अनेक प्रकारानीं चिंतेत दिवस घालविल्यानंतर हे स्थलान्तर गोपमंडळींना फारच आवडले व ते वृंदावनांत सुखाने कालक्रमणा करूं लागले.

———

प्रकरण ५ वें

# अपूर्व चमत्कार व गिरिधर गोविंद

श्रीकृष्णानें सातव्या वर्षांत पदार्पण केलें. सहाव्या वर्षापासून सोळाव्या वर्षापर्यंतच्या कालाला पौगंडावस्था म्हणतात. पौगंडावस्थेंत प्रवेश केलेल्या रामकृष्णांनीं वडिलांच्या परवानगीनें गाई चारण्यास नेण्याचा हळु हळु उपक्रम केला. वासरें चारणाऱ्या लहान मुलांहून आतां आपण मोठे आहों, त्यांच्यापेक्षां आतां आपण धीट आहों, शूर आहों, असा त्यांना अभिमान वाटूं लागला. दिवसेंदिवस त्यांचें शरीरबल व धाडसी वृत्ति वाढूं लागली. आपल्यापेक्षां लहान मुलांना ते धीर देत. वासरें चारणाऱ्या

लहान मुलांवर एकदां एक मोठा विचित्र प्रसंग आला. वृंदावनांत राहावयास गेल्यानंतर त्या जंगली भागातील कांहीं नवीनच संकटें लहान मुलांना व मोठ्यांनाहि भेडसावूं लागलीं. एकदां लहान मुलें वासरें चारीत असता जंगली गाईचें एक धिप्पाड जंगली वासरूं ह्या वासरांच्या मध्ये येऊन त्या वासराना व मुलांना हुंदडून, त्याच्या अंगावर धांवून जाऊन, त्याना त्यानें अगदीं सतावून सोडलें. तीं मुले जीव घेऊन धांवत सुटलीं त्यांची व रामकृष्णांची गाठ पडतांच त्या वत्सासुराची ( कोणत्याही उग्र व भयंकर वाटणाऱ्या प्राण्याला असुर म्हणजे राक्षस म्हणण्याची त्यावेळीं चालच होती. ) हकिगत त्यांनीं रामकृष्णांना सांगितली. रामकृष्णानीं त्या लहान मुलांना धीर दिला व आपल्या बरोबरीच्या गोपाळांना बरोबर घेऊन त्या वत्सासुरावर त्यानीं हल्ला चढविला. गोफणींतून दगड, गुंडे भिरकावून त्यानीं त्या वत्सासुराला जायबंदी करून खालीं पाडलें, मग काठ्यांनीं त्याच्यावर तुटून पडून त्याला मरेपर्यंत मारले. ह्या वत्सासुराचा नाश करण्याचा त्यांचा मोठा पराक्रम पाहून लहान गोपबालकानीं त्यांचा जयजयकार केला. त्यानाहि आपल्या सामर्थ्याबद्दल एक तऱ्हेचा अभिमान वाटू लागला. लहान गोपांनीं वासरे घेऊन घरीं येताच रामकृष्णांच्या पराक्रमाची ही हकिकत आपल्या आईबापांना मोठ्या उत्साहाने सागितली. सर्व गोपमंडळींनीं रामकृष्णाचे फारच कौतुक केले, त्यामुळें अशा पराक्रमाच्या गोष्टी करण्याबद्दल त्यांना साहजिकच जास्त हुरूप वाटूं लागला.

वृंदावनासारख्या अगदीं नवीन जंगलात वसाहत केल्यानतर आणखीहि पुष्कळ चमत्कारिक जंगली प्राणी गोपाळांना भेटले. एकदां लहान गोपाळ वासरांना पाणी पाजण्याकरितां एका जलाशयावर गेले त्या ठिकाणीं एवढे मोठमोठे बगळे बसले होते कीं त्यांनीं तसले बगळे त्यावेळेपर्यंत कधीं पाहिले नव्हते. ते बगळे पशुपक्ष्यांना मुळींच भीत नव्हते, मनुष्यानांहि जुमानीत नव्हते. बगळ्यांनीं त्या वासरांना आपल्या चोचींनीं टोंचण्यास सुरवात करतांच, व आपल्या मोठमोठ्या पंखांचा फडफड असा आवाज करतांच, तीं सर्व वासरें बुजलीं आणि त्यांनीं इकडे तिकडे

धांवण्यास सुरवात केली. लहान गोपालहि घाबरून वासरांना आवरण्याकरितां त्यांच्या पाठीमागें धावूं लागले. इतक्यांत त्या बगळ्यांपैकीं एक फारच मोठा बगळा क्याक् क्याक् असा मोठा आवाज करून आपले मोठे पंख फडफडावीत त्या मुलांच्या पाठीमागें लागला. मुलांची दाणादाण उडाली. त्यांनीं मोठमोठ्यानें ओरडण्यास सुरवात केली. त्यांची ती आरडाओरड जवळच्या जंगलांत गाई चारत असलेल्या रामकृष्णांच्या कानांवर जाताच आपल्या बरोबरीच्या गोपाळांसह ते काठ्या, गोफणी घेऊन धांवतच आले. मग गोपाळ आणि ते बगळे यांचें एक प्रकारचें युद्धच सुरू झालें. रामकृष्णादि गोपाळांच्या दगडांच्या माऱ्यांनीं त्या बगळ्यांची जलाशय गांठतां गाठतां पुरेवाट झाली. अवजडपणामुळें त्यांना धड उडतांहि येईना व धांवताहि येईना. कित्येक बगळे गतप्राण झाले. तो मोठा प्रचंड बगळाहि दगडाच्या मारांनीं घायाळ झाला. त्याच्याजवळ आलेल्या कृष्णावर त्यानें जोरानें हल्ला केला. पण कृष्णानें हातांत असलेल्या जाड काठीचा त्याच्या चोचीवर एवढा जबरदस्त तडाखा दिला, कीं तो चीं चीं करीत गडबडा लोळला व कृष्णानें दिलेल्या आणखी दोन चार तडाक्यांनीं तो गतप्राण झाला. हा प्रचंड बकासुर मारल्याबद्दल गोपाळांनीं कृष्णाचा जयजयकार केला. घरीं परत येतांच बालगोपालांनीं त्या प्रचंड बकासुराचें केलेलें वर्णन व त्याला मारण्याचा श्रीकृष्णानें केलेला पराक्रम ऐकून नंदासह सर्व गोपाळ चकित झाले. त्यांनीं कृष्णाची वाहवा केली. यशोदेनें व इतर गोपींनीं त्याच्यावरून मीठमोहऱ्या व दहींभात ओवाळून टाकिला.

शरीरसामर्थ्य वाढविण्यांत रामकृष्णांच्या उत्साहाला भरती आली. मोकळ्या हवेंत कसून केलेल्या व्यायामानें, धांवणें, खेळणें, लांब व उंच उड्या मारणें, उंच उंच झाडांवर झरझर चढणें, उंच डोंगरावर झपाझप चढून जाणें, जलाशयांत दीर्घकाल पोहत राहणें, गोफणीनें व धनुष्यानें नेमबाजी करणें, व कुस्ती करणें अशा साधनांनीं आणि सकस गोरसभक्षणानें रामकृष्ण लवकरच आपल्यापेक्षां दुप्पट तिप्पट वयाच्या गोपमल्लांना भारी झाले. हिंस्र पशूंची शिकार करण्याचा आतां त्यांना छंद

लागला. दांडपट्टा व भालाफेंकींत त्यांनीं इतकें नैपुण्य मिळविलें कीं त्या कलेंत पूर्णत्वाला पोहोंचलेले मोठमोठे सराइत गोपहि त्यांच्या त्या कलेंतील नैपुण्यानें चकित होऊं लागले. त्यांच्या भालाफेंकीने त्यांनीं रानडुकरां-सारखे कित्येक भयंकर प्राणी अचूक लोळविले.

एकदां वनांत चरणाऱ्या गाई-वासरांना, फार काय, जंगली जनावरां-नाहि गिळून गट्ट करणारा एक प्रचंड अजगर, वृंदावनातल्या एका निबिड पोटवनांत गाई राखणाऱ्या गोपांच्या व शिकार करून उपजीविका कर-णाऱ्या जंगली लोकांच्या दृष्टीस पडला. त्याचा तो भयंकर आकार पाहून त्याला पाहणारा प्रत्येक मनुष्य घाबरून पळून जाई. सर्व जंगली लोक व गोवारी त्या अजगराला पाहून ' अघासुर आलारे आला ' असें म्हणून पळत. रामकृष्णांच्या कानावर ती गोष्ट जातांच वडील माणसे नको म्हणत असतांहि त्यांनी आपल्या गाई त्या वनात चारण्यास नेल्या. ते अजगराचें प्रचंड धूड आपल्या स्थानांतून एकदम बाहेर आले, आणि त्याने एका गाई-वर झडप घालून तिला गिळण्याला सुरवात केली. त्याचा तो प्रचंड जबडा पाहून रामकृष्णांच्या बरोबरचे गोपाळ घाबरले व गाईचा कळप वळवून पळून जाण्याची त्यांनी एकदम तयारी चालविली. रामकृष्णानीं त्यांना धीर दिला. त्यानीं त्या अजगराच्या, गाईला गिळण्याकरिता उघडलेल्या जबड्यांत इतके तीर मारले कीं तो अजगर घायाळ होऊन तडफडूं लागला. नंतर त्यांनीं त्याच्यावर भालाफेक चालू केली. यामुळें गोपाळांना धीर आला. तेहि त्याच्यावर चोहोंबाजूंनी तिरंदाजी करूं लागले. अशा प्रकारें घायाळ झालेला तो निश्चेष्ट होतांच, लांकडें फोडण्याच्या तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडींनीं रामकृष्णानीं त्याचीं खांडोळीं केलीं. अघासुराला ठार मारल्यानें कृष्णाच्या पराक्रमाची, त्याच्या दैवी सामर्थ्याची कीर्ति वृंदावनांत सर्वतोमुखीं झाली. गाई चरायला नेणाऱ्या त्याच्या बरोबरीच्या व त्याच्यापेक्षां मोठ्या गोपाळांचा कृष्णाबद्दल आदर व अभिमान वृद्धिंगत झाला. नंदादि वृद्ध गोपाळांचा तो कौतुकाचा व स्तुतीचा विषय झाला. यशोदेच्या वयाच्या वृद्ध गोपींना तो पुत्रवत् आवडूं लागला. त्याच्या पराक्रमांचीं, त्याच्या जन्मापासून त्याच्या अंगीं चिकटविण्यांत आलेल्या दैवी चमत्कारांचीं

स्तुतिस्तोत्रें सारखीं कानांवर आल्यानें तरुण गोपी त्याला आपल्या पाठी-राख्या भावाप्रमाणे व देवाप्रमाणें मानूं लागल्या.

अघासुर अजगराच्या वधानंतर सर्व गोपाळांना रामकृष्णांच्या सामर्थ्या-बद्दल व त्यांच्या चातुर्याबद्दल विश्वास वाटूं लागला. त्यांच्या मदतीनें आपणहि पराक्रम करूं शकूं असा त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वासहि उत्पन्न झाला. वृंदावनात 'तालवन' म्हणून ताडांच्या वृक्षांनीं आणि अनेक मधुर फलवृक्षानीं फार समृद्ध असा एक भाग होता. पण त्या भागात गाढवासारखे दिसणारे अत्यंत उग्र असे जंगली प्राणी फार होते. त्यांचें ओरडणें व दुगाण्या झाडणें इतकें भयंकर होतें कीं कोणीहि त्यांच्यापुढें जाण्यास धजत नसे. त्यामुळे त्या वनात विपुल असणारीं अमृतोपम ताडफळें व असंख्य मधुर फळें यांचा कोणालाच उपयोग होत नव्हता. त्या जंगली गाढवाना वनांतील लोक धेनुकासुर असें म्हणत. रामकृष्णानीं ज्यावेळीं ह्या धेनुकासुराचें वर्णन ऐकले तेव्हा त्या जंगली गाढवाना त्या जंगलांतून हांकून देण्याचा त्यानीं बेत केला. त्यानीं गाई चारणाऱ्या आपल्या सर्व गोपालाना आपला बेत सांगितला. रामकृष्णांच्या सामर्थ्या-वर सर्वांचा पूर्ण विश्वास असल्यामुळें सगळे गोपबालक त्यांच्या बेताप्रमाणें वागण्यास तयार झाले. गोफणी, धनुष्यबाण, भाले, बरच्या, पट्टे, कुऱ्हाडी, लाठ्या ह्यानीं सज्ज होऊन बलरामाच्या नेतृत्वाखालीं ती गोपसेना ताल-वनाकडे निघाली. तालवनांत शिरतांच बलरामाच्या सूचनेप्रमाणें कित्येक गोप तेथील उंच उंच झाडांवर झरझर चढून बसले. काहीं गोप मोठ-मोठे बुंधे असलेल्या झाडांच्या मागे दबा धरून राहिले. आणि मग सर्वांनीं एकसमयावच्छेदेंकरून बरोबर आणलेले शंख व तुताऱ्या वाजवून व कर्कश आरोळ्या ठोकून तें वन दणाणून सोडलें. त्याचा तो आरडा-ओरडा ऐकतांच वनाच्या अन्तर्भागांत असलेले धेनुकासुर ओरडत व दुगाण्या झाडीत वेडेवांकडे धांवत आले. त्याबरोबर वरून, समोरून, चहूंबाजूंनीं गोपसेनेनें त्यांच्यावर हल्ला चढविला. झाडांवर चढलेल्या कृष्णादिकांनीं धनुष्यबाणानें तिरंदाजी करून, झाडांमागें दबा धरलेल्यांनीं तीं गाढवें आटोक्यांत येतांच भाले–बरच्यांची फेंक करून, बलरामाच्या

नेतृत्वाखालीं समोरून दांडपट्टयांचे, लाठ्यांचे, हात करून आणि कांहींनीं तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडींचा उपयोग करून, कांहींनीं गोफणींतून पाषाणाचा वर्षाव करून त्या गाढवाना हैराण करून सोडलें त्या दिवशीं बलरामानें आपल्या पट्टयांनीं व कुऱ्हाडीनें शेंकडों गर्दभ लोळविले व आपलें बलराम नाव सार्थ केलें. ह्या भयंकर हल्लयात बहुतेक सर्व गर्दभासुराचा नाश होऊन त्या धेनकासुर म्हटल्या जाणाऱ्या असुरानीं यमलोकाची वाट धरली. अशाप्रकारें ते तालवन बहुतेक निर्गर्दभ झाले. रामकृष्णाच्या पराक्रमानीं व चढाईच्या चातुर्यानें तें तालवन गोपालाना गाई चारण्यास व मधुर फळाचा मनसोक्त उपभोग घेण्यास मोकळे झालें.

रामकृष्ण ह्या वेळेस पंधरा सोळा वर्षांचे होते. त्यानीं आपलें शरीर-सामर्थ्य कसें आणि किती वाढविले होतें, हें आपण पाहिलेंच. नंदाच्या घरीं वारंवार अनेक विद्यामध्ये निपुण असे लोक येत. अशा लोकानीं वारंवार नंदाच्या घरीं जाऊन आणि महिना-पंधरा दिवस राहून आपल्या विद्येचा चमत्कार तेथील लोकास दाखवावा, अशी वसुदेवानें नारदाचे साहाय्याने योजना करून ठेविली होती. वृंदावनात नारदाची फेरी तर पुष्कळदांच होई. त्यामुळें रामकृष्णासारख्या तैलबुद्धीच्या मुलाना, अशा अनेक विद्याविभूषित व व्यवहारचतुर पुरुषांच्या परिचयानें, त्याच्याशीं केलेल्या संभाषणानें व त्याच्या विद्याचा प्रभाव प्रत्यक्ष दृष्टीस पडल्याने, आपलें उपजत बुद्धिसामर्थ्य अधिक वाढविण्यास फार मदत होत असे. नारदादि ऋषिमहर्षींच्या तोडून रामकृष्णाना निरनिराळ्या शास्त्राची माहिती झाली. प्राचीन इतिहास ऐकावयास सांपडला. निरानिराळ्या राजघराण्यांच्या वंशावळी, त्यावेळीं भरतखंडांतील निरानिराळ्या भूप्रदेशांत प्रत्यक्ष राज्य करीत असलेल्या अनेक सबल, सत्ताधारी राजाची माहिती, यात्रेच्या निमित्तानें हिंडणाऱ्या ऋषींच्या मुखांतून त्यांनीं श्रवण केली. त्यांच्या यात्रांचे अनुभव ते लक्षपूर्वक ऐकत, त्यामुळें त्यांना ठिकठिकाणचे लोकव्यवहार, तेथील चालीरीती, उद्योगधंदे, समृद्ध आणि रुक्ष भूप्रदेश, यांसंबंधीं सर्वसाधारण माहिती सहज होऊन, त्यांचे व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत होऊं लागलें. प्रत्येक गोष्टीचा चौकस बुद्धीनें विचार करण्याची

त्यांना संवय झाली.

वृंदावनाजवळील तृण-फलांनीं समृद्ध असें 'तालवन' धेनुकासुरांचा नाश झाल्यामुळें जसें गोपाळांना गाई चारण्यास, फळफळावळ मिळविण्यास मोकळें झालें, तसाच दुसरा एक तालवनालगत असलेला वृंदावनांतील वनप्रदेश गोपाळांना पाहिजे होता. तो प्रदेश गोपाळांनाच काय, पण इतर साऱ्या जंगली लोकाना, गुरावासरांना, पशुपक्ष्यांना सुद्धां दुर्गम होता. त्या वनप्रदेशाजवळून पवित्र यमुना नदी वाहात होती. तेथील यमुनेच्या पात्राला कालिंदी असे म्हणत. त्या ठिकाणीं कालिंदीमध्ये एक मोठा डोह होता. त्या डोहाला कालिया डोह म्हणत असत. कालिया नांवाचा एक महाविषारी सर्पराज तेथें राहात होता, त्याला म्हणे शंभर फणा होत्या, त्या डोहाचें पाणी विषमय होतें, विषारी वाफा सर्व वनभर पसरल्यामुळें वृक्ष सुद्धा त्या ठिकाणीं वाढत नसत, पक्षी त्या ठिकाणीं राहणे शक्य नव्हतें, तेथें कोणी गेला कीं विषबाधा होऊन त्याला मरण यावयाचेंच, अशी त्या कालिया डोहाची आणि त्याजवळील वनाची ख्याति होती. त्या वनाचें हें वर्णन रामकृष्णांच्या कानांवर गेलें होतें. धेनुकासुरांना मारून 'तालवन' सर्वांना मिळवून दिल्यानंतर आतां श्रीकृष्णाची दृष्टि कालिया डोहाकडे व त्याच्या जवळील वनाकडे वळली. ह्या सर्पराजाची व त्याच्या विषारी प्रदेशाची चौकशी करण्याचे त्यानें ठरविलें. ह्या विषारी प्रदेशाची धास्ती सर्वांना बसलेली असल्याकारणानें त्यानें सर्पराज कालिया याची पूर्ण माहिती लागेपर्यंत तो प्रदेश आक्रमण करण्याचा आपला हेतु, नंदाला किंवा कोणाहि गोपाळालाच काय, पण प्रत्यक्ष आपला वडील भाऊ बळराम ह्यालाहि कळविला नाहीं. रोज तालवनांत गाई चरायला सोडल्या, नित्याचे सर्व खेळ झाले, ताडफळें व इतर फळें काढण्यांत बळराम व इतर गोपाळ गुंतले म्हणजे श्रीकृष्ण आपल्याला अगदीं जीव कीं प्राण करणाऱ्या दोनचार सवंगड्यांना बरोबर घेउन, कालिया डोहाची टेहेळणी करीत असे. आतांपर्यंत तालवनांतच जाणें शक्य नसल्यामुळें, त्याच्या पलीकडे असलेलें कालिंदीचें वन फारच दुर्गम होतें. परंतु आतां कृष्णाला तालवनांतल्या

उंच उंच झाडांवर चढून, कालिया डोहाचें निरीक्षण करतां येऊं लागलें. बरेच दिवस निरनिराळ्या बाजूंनीं निरीक्षण केल्यानंतर कांहीं गोष्टी उघडकीला आल्या.

डोहाच्या आजूबाजूस काहीं लोकाची वस्ती असून ते लोक नारदांच्या व इतर ऋषींच्या मुखातून ऐकलेल्या सर्प जातीच्या लोकांच्या वर्णनाशीं अगदीं बरोबर जुळणारे होते. त्यानीं बाळगलेलीं जनावरें कालिया डोहावर पाणी पीत असलेलीं पाहून, व कालिया डोहांत अनेक लोक डुंबत असलेले व जलचर प्राणी पकडीत असलेले पाहून, कालिया डोह विषारी आहे, ही गोष्ट कल्पित कथेसारखी ठरली. डोहाच्या बाजूला शिरीष, चंपक, कदंब यासारख्या मोठमोठ्या वृक्षांचीं दाट बनें दिसल्याने, त्या ठिकाणीं वृक्ष जगत नाहीत ही गोष्टहि खोटी ठरली. एक दिवस तर मोठा गमतीचा योगायोग जमून आला. कृष्ण व त्याचे सवंगडी उंच झाडावर चढून डोहाचे निरीक्षण करूं लागले तोंच, राजवेष घातलेला सर्पराजा कालिया आपल्या शरीररक्षकांसह डोहावर स्नानाकरितां आला. त्याच्या बरोबरचे रक्षकगण कृष्णानें मोजले, ते बरोबर शंभर भरले. कालियाच्या शंभर फणांचा उलगडा चटकन झाला, आणि कृष्णानें आनंदाने टाळी वाजविली. आतां एका गोष्टीचा उलगडा व्हावयाचा राहिला आणि ती म्हणजे तेथील विषारी हवेची. कृष्णानें आणि त्याच्या सवंगड्यांनीं त्याहि गोष्टीचा अनुभव घ्यावयाचें ठरविलें. एक दिवस कृष्ण व त्याचे सवंगडी दहावीस गाई-वासरें घेऊन तालवनाला लागून असलेल्या कालिया वनांत शिरले. त्याबरोबर एक मोठा चमत्कार त्यांच्या दृष्टीस पडला. गाई-वासरें तेथें चरूं लागतांच त्या गवतांतून एक प्रकारचा आगीचा लोळ मधूनमधून वर उसळूं लागला. ह्या अगदींच अनपेक्षित प्रकारामुळें जनावरें भेदरून हंबरत पळत सुटलीं. त्यांचा आवाज ऐकतांच, दहावीस जंगली सर्पजातीचीं माणसे त्यांच्याकडे धांवून येत आहेत असे पाहून कृष्ण व त्याचे सवंगडी जवळ असलेल्या दाट गर्द झाडींतील एका झाडावर चटकन चढून बसले. तीं सर्प जातींचीं माणसें आरडाओरड करीत आलीं. त्यांच्या जवळ तिरकमठे, परशु यांसारखीं हत्यारें होतीं. त्यानीं

त्यांच्या हातीं लागलेलीं गाई—वासरें हांकलून नेलीं व इकडे तिकडे टेहेळणी करून, आणखी कोणी नाहीं असें पाहून, तीं आलीं तशीं चालतीं झालीं. मधूनमधून आगीचे लोळ कुरणांतील गवतांतून उठतच होते व एक प्रकारचा कडवट वास चहूंकडे पसरून राहिला होता. त्या वासाच्या उग्रपणामुळे आपल्याला चक्कर येईल कीं काय अशी कृष्ण आणि त्याच्या बरोबरचे सवंगडी ह्यांना धास्ती वाटूं लागली. कुरणांतून आगीचे लोळ उठत असलेले मधून मधून दिसत, पण गवत तर जळत नव्हतें, आणि तो उग्र वास कशाचा ह्या गोष्टीसंबंधीं कृष्ण बुचकळयांत पडला. झाडावरून उतरून ते परत जाण्याच्या तयारीला लागले, तों दुसरा एक विचित्र पोषाख केलेला मनुष्य जवळच्याच झाडावरून उतरत असलेला त्यांनीं पाहिला.

त्या माणसानें कृष्ण व त्याच्या सवंगड्यांना आपण त्यांच्याजवळ येईपर्यंत थांबण्यास खुणावलें. त्याची खूण समजून कृष्ण थांबला. तो मनुष्य जवळ येतांच, त्यानें व्रज भाषेत त्यांना 'तुम्ही वृंदावनातले राहणारे काय ?' असा प्रश्न केला. कृष्णानें होय म्हणतांच 'मला तुमच्याबरोबर तुमच्या गौळवाड्यांत चार दोन दिवस राहूं द्याल काय ?' असें विचारलें. 'चला, आपण बोलत बोलत जाऊं. माझ्या इतर सवंगड्यांना विचारून मी तुम्हांला सांगतो.' असें म्हणून कृष्ण त्याला बरोबर घेऊन तालवनाकडे चालूं लागला. चालतां चालतां त्या मनुष्याची सर्व माहिती कृष्णानें काढून घेतली. रमणक-द्वीपांत राहणाऱ्या गरुड जातीचा तो मनुष्य होता. तेथील गरुड राजाचा तो दूत होता. रमणक द्वीपातील एका भागावर पूर्वी सर्पराजा कालिया राज्य करीत होता. त्याचें आणि त्याच्याजवळच्या द्वीप भागात राज्य करीत असलेल्या गरुड राजाचे युद्ध झाले. गरुड राजाच्या भीतीनें कालिया आपल्या अनुयायांसह पळाला, तो कालिंदीच्या डोहाच्या जवळ असलेल्या वनामध्यें येऊन राहिला. सर्प जातीचे लोक झाडपाले, वनस्पती, वगैरे वस्तूंपासून लोकांना भीती वाटेल अशा चमत्कारिक चिजा तयार करण्यांत फार कुशल असत. लोक भीतीनें हादरून जातील व त्यांच्याजवळ जाण्यास धजणार नाहींत, असे अद्भुत चमत्कार

ते करीत. त्या चमत्कारांचीं भयंकर वर्णनें लोकांत पसरवून आजूबाजूच्या लोकाना भयचकित करण्याच्या कामात ते वाकबगार होते. कालिया डोहाच्या विषारीपणाची अफवा ही त्याचीच कर्तबगारी होती. हा जो गरुड राजाकडून दूत आला होता, तो एका विशेष कामगिरीवर आला होता. गरुड राजाच्या दोन कन्या नाहींशा झाल्या होत्या. गरुड राजाचा वहीम ह्या सर्पराजावर होता. म्हणून त्या कन्यांचा तपास करण्याकरितां त्यानें हा दूत पाठविला होता. ह्या दूतानें केलेल्या तपासांत त्या दोन कन्या येथें ह्या सर्पराजाकडे आहेत, अशी त्याची खात्री झाली होती. म्हणून तो दूत, कालियाचे पारिपत्य करण्यासारखे शूर लोक आजूबाजूस आहेत कीं नाहींत, ह्याच्या तलासांत होता. अशा वेळीं त्याची व कृष्णाची भेट झाली. याप्रमाणे वृंदावनांतील आपल्या गौळवाड्याच्या जवळ जाईतोंपर्यंत त्यानें दूताकडून सर्व माहिती काढून घेतली. गोपवेषानें तो दूत गौळवाड्यात राहण्यास तयार असल्यास, तो राहील तितके दिवस त्याला राहूं देण्यास आपण तयार असल्याचें कृष्णाने त्याला सांगितलें. त्या दूताने ती गोष्ट कबूल केली. कृष्णानें आपल्या सवंगड्याकडून गोपाळाचा वेष आणून त्या दूताला दिला. तो दूत गोप बनला. कृष्णानें हा फार दूरच्या एका गौळवाड्यांतला गोप मुद्दाम आपल्यास भेटावयास आला आहे, असें नंदाला सांगून त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें.

सर्पांच्या सर्व युक्त्या ह्या गरुडास माहित होत्या. त्याच्याकडून कृष्णानें हळुहळु त्या समजावून घेतल्या. आपण कालियाचे पारिपत्य करुन त्याला पुनः रमणकद्वीपांतील त्याच्या गांवीं, सहकुटुंब, वृंदावनांतून घालवून देतों, असें कृष्णानें त्याला सांगतांच त्या दूतानें ह्या कामांत कृष्णाला सर्वप्रकारें साहाय्य करण्याचे वचन दिले. अग्नीसारख्या दिसणाऱ्या त्या ज्वाला कोणत्या वनस्पतींच्या मिश्रणापासून दिसतात, त्याची माहिती त्यानें कृष्णाला दिली. त्या ज्वाला प्रत्यक्ष अग्निज्वाला नव्हेत, कारण तशा त्या असत्या तर ज्या गवताच्या कुरणांत त्या दिसल्या, तें कुरण दग्ध झालें असतें. तसें कांहीं झालें नाहीं, हें कृष्णानें प्रत्यक्ष पाहिलें होतें. सर्प राहात त्याच्या आजूबाजूला सारखे वणवे लागत, ते

कालियाच्या भयंकर विषाचा परिणाम होत, असें सर्व जण समजत. ते वणवेहि असेच फसवे होते. ते वणवे नाहींसे करणें असल्यास त्याला काय युक्ति करावी, हेंहि त्या दूतानें कृष्णाला सागून टाकलें. ह्याप्रमाणें कालियाच्या विषाची भीति नाहींशी होतांच, कृष्णानें बलरामादि सर्व गोपांना आपला कालियावर चढाई करून जाण्याचा बेत सांगितला. त्याच्या भयंकर विषावर आपल्याजवळ उत्तम उपाय आहे, असें कृष्णानें सांगतांच कालियावर चढाई करून जाण्यास सर्व तयार झाले. धेनुकासुराला मारण्याकरितां जशी गोपसेना सज्ज केली होती, तशीच ह्या वेळींहि सर्व तयारी करण्यांत आली. सर्पसेना किती आहे, ह्याचा अंदाज कृष्णानें त्या दूताकडून काढून घेतला होता. चमत्कारानें सर्वांना घाबरवून सोडणारे सर्प संख्येनें कांहीं फार नव्हते; त्यांना युद्धाचा प्रसंग फारसा कधीं येत नसल्यानें, सेनेसारखी त्याच्याजवळ कांहीं विशेष अशी तयारीहि नव्हती. कालियाच्या शंभर फणा म्हणजे शंभर शरीररक्षक, हे मात्र प्राणघातक शस्त्रांनीं युक्त व मोठे लढाऊ म्हणून प्रसिद्ध असलेले सर्प त्याच्याजवळ होते. ह्या शंभर लोकांशीं युद्ध करून त्यांचा नाश केला कीं कालियाचा अवतार आटोपला, अशी स्थिति होती. ह्या शंभर सर्पांना कोणत्या स्थितींत कसें गांठावयाचें हें चतुर कृष्णानें ठरवून ठेवलें होतें. कालिया डोहावर स्नानाला येईल, तो प्रसंग चढाई करण्यास योग्य आहे, हें त्यानें ओळखलें होतें. कारण कालिया स्नानाला वा जलविहार करायला डोहांत उतरला कीं ते शंभर रक्षक आपलीं शस्त्रें नदीकिनारीं ठेवून कालियाच्या आसपास डोहांत उतरून पाण्यांत पोहत राहात. कित्येक वर्षांत कोणताहि शत्रु तेथें येऊं न शकल्यामुळें ते अगदीं निर्धास्त असत. हा प्रसंग चढाई करण्यास अगदीं योग्य आहे, ही गोष्ट त्या गरुड दूतालाही एकदम मान्य होऊन त्यानें कृष्णाच्या चतुरपणाची स्तुति केली. कालिया स्नानाला नक्की कोणत्या वेळीं येतो हें पाहण्याकरितां सतत चार दिवस टेहेळणी करून ती वेळ निश्चित करण्यांत आली, आणि ती वेळ साधण्याकरितां एक दिवस आपली गोपसेना घेऊन कृष्णाची स्वारी निघाली. बलराम मुद्दामच पाठीमागें राहिला. कृष्ण गेल्यानंतर कांहीं वेळानें

कालियाला मारण्याकरितां कालिया-डोहावर सगळ्या गोपबालकांसह कृष्ण गेला आहे, ही बातमी सांगून सर्व मोठी गोपमंडळी घेऊन, त्यानें कालिया-डोहावर यावयाचें. म्हणजे ही कुमक एकदम आली, असें पाहून शत्रूंनीं घाबरून जावें, असा तो डाव होता.

गोपसेनेसह कृष्ण कालिया-डोहाच्या जवळ गर्द झाडींत दबा धरून बसला. आगीचे लोळ मधून मधून दिसतच होते. अशा गोष्टीला न भिण्याबद्दल त्यानें गोपाळाना अगोदर सांगून ठेवलें होतें. तालवनांतले भयंकर गर्दभ नाहींसे झाले ही गोष्ट माहीत नसल्यानें त्या बाजूनें कोणी शत्रु आपल्यावर येतील, अशी सर्पांना कल्पनाहि नव्हती. ठरीव वेळीं कालिया जलविहार करण्याकरितां आला. त्याच्या रक्षकांनीं आपलीं शस्त्रास्त्रें नदीकांठीं एके ठिकाणीं ठेवून, नेहमींप्रमाणें ते सर्व डोहांत उतरून लाबवर कालियाच्या पाठीमागें पोहत गेले. ही संधि कृष्णानें साधली. त्यानें आपल्या गोपसेनेसह एकदम त्या शस्त्रांवर झडप घालून, शस्त्रांच्या रक्षणाकरितां ठेवलेल्या दहापांच रक्षकांचीं मस्तकें छाटून टाकलीं व तीं शस्त्रें आपल्या ताब्यांत घेतलीं. मग एकदम नदींत पोहत असलेल्या रक्षकांवर बाणांचा व दगडांचा वर्षाव सुरू केला. कालियासह सर्व सर्प रक्षक गोंधळून जाऊन त्याना बाणांचा व दगडांचा मारा चुकविता चुकविता पुरेवाट झाली. त्यांतले कोणी नदीतीर गांठून वर येऊं लागले त्यांच्यावर भाले–बर्च्या यांचा मारा सुरू झाला. कालियासह सर्व सर्प हैराण झाले. ह्या धुमश्चक्रींत निम्म्यापेक्षां अधिक सर्परक्षक मृत्युमुखीं पडले. त्यांचा आरडाओरडा ऐकून जवळच्या सर्पवस्तींतून सर्पलोक धांवत आले, तों नंदराजासह सर्व गोपाळांना बरोबर घेऊन आलेल्या बलरामानें त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्यांना पळतां भुई थोडी केली. शेंकडों सर्प मृत्युमुखीं पडले. कालिया दीन होऊन शरण आला. सर्पस्त्रियांनीं दीन होऊन आपल्या पतींचे प्राण वांचविण्याकरितां रामकृष्णांची विनवणी करायला सुरुवात केली. बायकामुलांसह सर्व सर्पवस्ती उठवून कालियानें तेथून पुनः परत आपल्या रमणक द्वीपाला निघून जावें व त्या दोन गरुड राजकन्या ह्या गरुड दूताच्या स्वाधीन कराव्या, त्या अटीवर कालियाला

जीवदान देण्याचें कृष्णानें मान्य केलें. कालियानें सर्व अटी मान्य केल्या. त्याला परत जाण्यांत गरुडराजाची धास्ती वाटत होती. कृष्णानें कालियाची ती केविलवाणी स्थिति पाहून, त्या गरुडदूताला त्याच्या राजाजवळ, कालियाला त्रास न देण्याबद्दल आपल्या वतीने विनंति करण्यास सांगितलें. गरुड-राजकन्या परत मिळवून देण्याचे कामीं कृष्णानें केलेल्या मदतीची सर्व हकिगत सांगून, कृष्णाची विनंति गरुडराजाकडून मान्य करविण्याचें वचन त्या गरुडदूतानें दिलें. तें वचन त्यानें खरें केलें, व गरुड राजा कृष्णाचा एकनिष्ठ मित्र झाला, ही गोष्ट पुढील कथानकांत येणारच आहे. असो. कालिया त्याच दिवशीं आपल्या सर्व अनुयायांसह तेथून आपला तळ हलवून रमणक द्वीपाकडे चालू झाला, आणि तें समृद्ध वन नंदराजाच्या ताब्यांत आलें.

कृष्णाचा पराक्रम, त्याचें साहस, त्याचें चातुर्य, कार्य पार पाडण्याची त्याची कुशलता पाहून, नंदादि सर्व गोपाळांना पराकाष्ठेचें कौतुक वाटलें. सर्वांनीं रामकृष्णांची खूप स्तुति केली. त्या दिवशीं त्याच वनांत आनंदानें राहण्याचा बेत करून सर्व मडळी मौजेने तेथे राहिली. रात्रीं भोजनोत्तर गाण्यानाचण्याचे कार्यक्रम सुरू झाले. सर्व गोपमंडळी आनंदानें बेहोष झाली. पण एकाएकीं सर्पवस्तीच्या सर्व बाजूंनीं प्रचड वणवा लागल्याचें सर्वांनी पाहिलें. रात्रीची वेळ, अगदीं परकें ठिकाण, आणि सर्व बाजूंनीं भयंकर आग, हा देखावा पाहून सर्वांच्या तोंडचें भीतीनें पाणी पळालें. सर्व जण दीन होऊन कृष्णाच्या तोंडाकडे पाहूं लागले. कृष्णानें सर्वांना धीर दिला, व सर्वांना रिकाम्या झालेल्या सर्पांच्या वसतिस्थानांत जाऊन निर्धास्त निजण्यास सांगितलें. कृष्णाच्या आतांपर्यंतच्या पराक्रमाच्या कृत्यांनीं सर्वांचा त्याच्या चातुर्यावर पूर्ण विश्वास बसला होता. कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें सर्व गोप सर्पवस्तींतील सर्पगृहांत जाऊन निजले. फक्त रामकृष्ण बाहेर राहिले. ही मायावी आग नाहींशी करण्याचा प्रयोग गरुडदूतानें सांगितल्याप्रमाणें त्यांनीं करून पाहिला व तो साध्य होतांच त्यांना अत्यानंद झाला. रामकृष्णांनीं काय प्रयोग केला हें पुढें एका प्रसंगीं वाचकांना वाचावयास सांपडणार आहे. असो. प्रहरा दोन प्रहरांनीं

सर्व आग शांत करून रामकृष्ण सर्पवस्तींत आले. निर्धास्त निजा, म्हणून सांगितलें असलें तरी भीतीनें जागीच असलेली गोपमंडळी रामकृष्णांच्या तोंडाकडे पाहूं लागली. रामकृष्ण हास्यमुख दिसतांच त्यांनीं त्यांना वणव्यासंबंधीं प्रश्न विचारला. बलराम हंसत म्हणाला, ह्या लबाड कृष्णानें तो सर्व वणवा पिऊन टाकला. तें ऐकून गोपमंडळी चकित झाली. ते बाहेर येऊन पाहूं लागले, अरुणोदय होत होता. वणव्याचा मागमूसही नव्हता. सर्व गोपमंडळी रामकृष्णाचा जयजयकार करीत आनंदानें वृंदावनांत परत आली. कृष्णानें कालियाला हांकून दिल्याची व वणवा पिऊन टाकल्याची वार्ता ऐकून यशोदादि गोपींना परम आश्चर्य वाटलें. त्यांनीं रामकृष्णांची दृष्ट काढली. कृष्ण हा परमेश्वरी अवतार आहे, असें गोप आतां बोलूं लागले. कृष्णाचे पराक्रम मथुरेपर्यंत पोहोंचले होतेच. आतां भयंकर विषारी कालियाला हांकलून दिल्याचा व वणवा पिऊन टाकल्याचा कृष्णाचा अद्‌भुत पराक्रम वणव्याप्रमाणेंच मथुरेंत सर्वतोमुखीं पसरून त्यानें कंसाच्या अंतःकरणास चटके दिले, व आपला जिवंत असलेला शत्रु हा कृष्णच तर नसेल ना, अशी त्याला शंका येऊन भीतीनें तो व्याकुळ झाला.

थोडा विचार केल्यावर गोकुळांतल्या ह्या कृष्णानें एवढा मोठा पराक्रम इतक्या अल्पवयांत केला, ही गोष्ट कंसाला तितकीशी खरी वाटेना. आपल्याला भीति वाटावी म्हणून ही खोटी गोष्ट मुद्दाम कोणीं तरी पसरविली असेल, असाहि त्याला संशय आला. म्हणून त्यानें आपल्या पदरचा 'प्रलंबासुर', नांवाचा प्रसिद्ध मल्ल, हा कृष्ण आहे तरी कसा हें पाहून येण्याकरितां व कालियाला घालवून दिल्यामुळें यमुना डोह खरोखर विषनिर्मुक्त झाला आहे कीं काय, याची खात्री करून घेण्याकरितां पाठविला. प्रलंबानें गोप-वेष घेतला, आणि पाहुणा म्हणून तो वृंदावनांतील गाई चारणाऱ्या गोपालांत येऊन मिसळला. त्यानें रामकृष्णांना नीट लक्षपूर्वक पाहिलें. रामकृष्णांचें शरीरसामर्थ्य त्यांच्या वयाच्या मानानें फारच आहे, हें तेथें चाललेल्या खेळांवरून तो समजला. कालियाला हांकून दिल्याची वार्ताहि खरी आहे, अशी त्यानें खातरी करून घेतली. कंसानें सांगितलेली

कामगिरी करून त्यानें निमूटपणें परत जावयाचें, पण त्याला आपल्याहि शक्तीची फार घमेंड होती. कांहीं वेळानें कुरघोडीचा खेळ सुरू झाला. गडी वांटून घेण्यांत आले. प्रलंब कृष्णाच्या बाजूला वांटला गेला. ह्या नवीन पाहुण्याकडे कृष्णानें एकदां नीट पाहिलें. हा कांहीं गोप नव्हे हें त्यानें चटकन् ओळखलें. हा कोणी तरी कपटी मनुष्य मनांत कांहीं तरी दुष्ट हेतु धरून आला आहे, असें त्यानें बलरामाच्या कानांत तितक्या गडबडींत हळूच सांगितलें. डाव सुरू झाला. ज्या बाजूवर डाव येईल त्यांनीं दुसऱ्या बाजूच्या गड्यांना आपल्या पाठीवरून कांहीं ठराविक अंतरापर्यंत धांवत घेऊन जावयाचें, असा तो खेळ होता. कृष्ण एका बाजूचा मुख्य होता. दुसऱ्या बाजूचा मुख्य, बळराम होता. कृष्णाच्या बाजूवर डाव लागला. त्याबरोबर दुसऱ्या बाजूच्या गड्यांना पाठीवरून वाहून नेण्याचें काम कृष्णाच्या बाजूच्या गड्यांना करणें आलें.

कृष्णानें सुदाम्यास, भद्रसेनानें वृषभास, पाठीवर घेतलें. तितक्यांत लगबग करून प्रलंबानें बळरामास पाठीवर घेतलें. आणि सर्व गडी मग धांवूं लागले. प्रलंबासुर जोरानें पळत सुटला. ठराविक ठिकाणीं न जाता सर्वांची नजर चुकवून बळरामाला बाजूला नेऊन त्याचा घात करावा, असें त्यानें मनांत आणलें. त्याची धांवण्याची घाई पाहून आणि भलत्याच बाजूला तो वळला असे दिसतांच बलरामानें त्याचा हेतु ओळखला. इतक्यांत मोठ्यानें खांकरून श्रीकृष्णानेहि इशारा दिला, त्याबरोबर प्रलंबाच्या पाठीवर बसलेल्या बळरामानें प्रलंबाच्या डोक्यावर, टाळूवर व कानशिलावर एका पाठोपाठ एक एवढ्या जोरानें ठोसे दिले, कीं प्रलंबासुर एकदम मूर्च्छा येऊन खालीं पडला. कृष्णाच्या इषाऱ्यानें सावध झालेले सर्व गोपाळ त्याच्यावर तुटून पडले व काठ्या–लाठ्यांच्या तडाख्यानें तो असुर गतप्राण झाला. ही बातमी समजतांच नंदादि वृद्ध गोपाळ त्या ठिकाणीं धांवत आले. त्याचा गोपवेष दूर होतांच मथुरेच्या आखाड्यांत कंसाला न आवडणाऱ्या यादवमल्लांचा कठोरपणानें प्राण घेणारा तो प्रलंबासुर नांवाचा दानवमल्ल आहे, हें त्यांनीं ओळखलें व रामकृष्णांचा पराक्रम असह्य होऊन कंसानेंच त्याला पाठविला असला

पाहिजे, अशी सर्वांची खात्री झाली. बळरामाच्या सामर्थ्याची सर्वांनीं स्तुति केली. कंसराजाची त्याच्यावर वक्रदृष्टि आहे, तेव्हा आता रामकृष्णाची विशेष काळजी घेतली पाहिजे, असें सर्वांनीं ठरविलें. कंसाची आपल्यावर वक्रदृष्टि का व्हावी ह्याचें रामकृष्णाना मोठें गूढ पडलें. नंदादिकांनाहि कंसाच्या रागाचें कारण समजलें नव्हतेंच. प्रलंबासुराचा बरेच दिवस पत्ता नाहीं, असें पाहून कंसानें त्याच्या शोधाकरिता गुप्त दूत वृंदावनात पाठविला. त्यानें बारकाईनें शोध करून प्रलंबासुराचा बळरामानें वध केल्याची, गोपाळांनीं गुप्त ठेवलेली, बातमी कंसाला नेऊन पोहोंचविली. प्रलंबासुरासारख्या भयंकर मल्लाचा बलरामाकडून वध झालेला ऐकतांच कंसाच्या अंगाचा तिळपापड झाला. आपल्याला एकाचें ऐवजीं दोन शत्रु आहेत, असें त्याला वाटूं लागलें. केवळ गाई चारणाऱ्या साध्या गोपाळाच्या हातून असें पराक्रम होणें शक्य नाहीं, असें वाटून रामकृष्ण हे खरे कोण आहेत ह्याची बारकाईनें चौकशी करण्याचें त्यानें मनात आणलें, आणि आपल्या मंत्र्याच्या सल्ल्यानें तो त्या उद्योगाला लागला.

यानंतर लवकरच वृंदावनात वर्षाकाल सुरू झाला, तेव्हा जिकडे तिकडे कृष्णमेघाचा संचार होऊं लागला. आकाशात विजा चमकूं लागल्या. गर्जना करणारे काळेभोर मेघ आकाशात वावरत असल्यानें त्यांचें खरें स्वरूप ओळखूं येईना. सत्त्वरजस्तमांनीं व्यापलेल्या आत्म्याचें शुद्ध स्वरूप जसें झाकलें जातें, तसेंच आकाशाचेंहि मूळ रूप झाकून गेलें होतें. राजा प्रजेकडून कररूपानें घेतलेलें द्रव्य पुनः तिच्या कल्याणाकरितांच लावितो, तसेंच आठ महिने जमिनीवरील उदक शोषण करून सूर्यानें पर्जन्यरूपानें तें पुन्हा तिला परत देण्यास सुरवात केली. लोकांची दैन्यावस्था पाहून त्याच्याकरितां आपले प्राण देण्यास दयाळू लोक तयार होतात तसे उदार मेघहि आपल्या विद्युद्रूपी दृष्टीनें लोकांची दुःस्थिति अवलोकन करून स्वतःचें जीवितरूप जल त्यास अर्पण करूं लागले. उन्हाच्या तापानें कृश झालेली पृथ्वी पुनः मेघवृष्टीनें पुष्ट होऊं लागली. आकाशांत मोठमोठे ग्रह दिसेनासे होऊन काजवे मात्र चोहोंकडे चमकूं

लागले. गुरुजींनीं वाचनास सुरुवात केल्यावर घोरत पडलेले शिष्य लाजून अध्ययनास आरंभ करितात, त्याप्रमाणें मेघगर्जना ऐकून बेडकांनीं शब्द करण्यास सुरवात केली. इंद्रियदमन करणाऱ्या माणसाचें शरीर व द्रव्य त्याच्या ताब्यांत असतें. पण तोच स्वच्छंदानें वागूं लागला कीं त्यास अंतरतो व दुर्मार्गाकडे वळतो, त्याचप्रमाणें इतक्या दिवस पात्रांत असलेल्या नद्या उन्मत्त होऊन चोहोंकडे धांवूं लागल्या. पावसानें बहार करतांच शेतकऱ्यांचीं तोंडें टवटवीत दिसत व त्यानें थोडा टाळा देतांच त्यांना खेद होई, पण ह्या गोष्टी आपल्या हातच्या नाहींत हें त्यांस समजत नसे. संसारांतील उपभोगेच्छा पूर्ण न झालेला अर्धवट योगी जसा पुनः इंद्रियांच्या जाळ्यात सांपडून स्वैराचार करूं लागतो, तसा गंभीर असलेला समुद्रहि नद्यांच्या संगमानें गर्जना करूं लागला. परमेश्वर-चिंतनांत निमग्न झालेले भक्त प्रापंचिक उपाधींनीं डगमगत नाहींत, त्याप्रमाणें पावसाच्या सतत वर्षावानें पर्वतहि डगमगले नाहींत. सत्त्वरजस्तमादि गुणांनीं व्याप्त अशा संसारांत निर्गुण परमेश्वरहि केव्हां केव्हा अवताररूपानें जसा शोभतो तसें गुणवान् आकाशांत ( शब्दगुणकमाकाशं ) इंद्राचें निर्गुण [ दोरी नसलेलें ] धनुष्य शोभूं लागलें. संसारानें तप्त झालेल्या साधूस भगवज्जनांची संगति लाभली असतां जसा आनंद होतो, तसाच उन्हाळ्यानें संतप्त झालेल्या मोरास मेघागमानें आनंद झाला. सकाम तप करणारा मनुष्य इच्छित वस्तु प्राप्त झाल्यावर तिच्या सहवासानें जसा सुख पावतो तसे उन्हाळ्याच्या संतापानें सुकलेले वृक्ष पर्जन्यागमनानें आनंदित झाले. वारंवार घरांत निराशाजनक प्रसंग उद्भवत असतांहि सांसारिकाचें लक्ष व्यग्र न होतां तिथेंच स्थिर होतें, त्याप्रमाणें चिखल, कांटे वगैरे पदार्थांनीं तळ्यांचें पाणी वाईट झालें, तरी भक्ष्याच्या आशेनें चक्रवाकादि पक्षी त्यांचा आश्रय सोडीनात. कलियुगांत पाखंड लोकांच्या नास्तिक वादानें वेदमार्गाचा नाश होतो त्याप्रमाणें पर्जन्यवृष्टि चालू असतां जलप्रवाहानें मोठमोठाले पूल ढांसळून पडूं लागले. राजाला उत्तम मंत्र्यांचा सल्ला मिळाला असतां तो ज्याप्रमाणें लोकहितार्थ तयार होतो, त्याप्रमाणें मेघाला वाऱ्याचें साहाय्य झाल्यानें तो लोकोपकारार्थ तयार झाला. भागवतकारांनीं वर्षा-

काळाचें असें सुंदर वर्णन केलें आहे. वर्षाकाळ उत्तम झाल्यानें अनेक प्रकारांनीं आनंददायक झालेल्या त्या वनात रामकृष्णांनीं गोपालांसह खजूर, जांभळें वगैरे पदार्थांवर हात मारीत मारीत अनेक क्रीडा केल्या. ते कधीं कधीं वनांतील वृक्षवनस्पतींकडे, कधीं कधीं पर्वतांतील गुहांकडे व पाण्याच्या झऱ्यांकडे पाहून आपली करमणूक करीत. पाऊस पडत असतां कधीं झाडाच्या ढोलींत तर कधीं पर्वताच्या दरींत बसून ते कंदमुळें खात असत. पाण्याच्या नजीक कोठेंतरी खडकावर बसून गोपानीं आणलेलीं दहींभाताचीं शिंकीं सर्व मंडळीसह रामकृष्ण आनंदानें खात असत. त्यावेळीं सभोंवारच्या कुरणांत डोळे मिटून रवंथ करीत बसलेलीं वासरें व कासेच्या भारानें चालण्याचे श्रम न झेपणाऱ्या गाई यांस पाहून रामकृष्णांना समाधान वाटे. याप्रमाणे वर्षाकालचे दिवस त्यानीं मोठ्या सुखात घालविले.

वर्षाकालचे दिवस संपल्यावर क्रमानेच शरदृऋतूस आरंभ झाला. तेव्हां आकाश निरभ्र झालें, पाणी स्वच्छ झालें, व वाराहि मंद मंद वाहूं लागला. पाण्याचा गढूळपणा नाहींसा होऊन पुनः त्यात कमळें उगवूं लागलीं. योगभ्रष्ट झालेल्या योग्यांचीं मनें पुनः परमेश्वरचिंतनानें शुद्ध होतात, तसेंच हे झालें म्हणावयाचें. परमेश्वरचिंतनानें चारी आश्रमांतील लोकांस जसें सुख होतें, तसेंच शरदृऋतूमुळेंहि झालें. या दिवसांत जिकडे तिकडे मेघ शुभ्र झाल्यानें हवा स्वच्छ होऊं लागली. कीटकांची उत्पत्ति बंद पडली. जमिनीवरील चिखल नाहींसा झाला आणि पाणी स्वच्छ दिसूं लागलें. मुनि ज्याप्रमाणे पुत्रदारादिकांचे पाश तोडून निष्पाप होत्साते जगामध्यें शोभतात, त्याचप्रमाणें मेघहि आपलें सर्वस्व [पाणी] खर्च करून शुभ्रपणानें विशेष शोभूं लागले. विद्वान गुरुजी योग्य शिष्यालाच आपली विद्या देतात, इतरांस देत नाहींत, त्याप्रमाणें पर्वतांनीं कांहीं ठिकाणीं मोठमोठे जलप्रवाह सुरू केले, व आपला इतर भाग तसाच कोरडा ठेवला. दिवसेंदिवस सरोवरांतील पाणी कमी होत चाललें तरी मूढ जलचर प्राण्यांस तें समजलें नाहीं. आपलें आयुष्य कमी होत आहे, हें तरी संसारांत गुरफटलेल्या मनुष्यास कोठें समजतें ? इंद्रियदमन न

करणारा दरिद्री कुटुंबी जशीं अनेक दुःखें भोगतो तशींच शरत्कालांतील सूर्यतापानें जलचरांस दुःखें भोगावीं लागलीं. परमेश्वराच्या ठिकाणीं चित्त स्थिर झाल्यावर योगी जसा निष्क्रिय बनतो, तसा शरदृऋतूमध्यें पाणी शांत झाल्यानें समुद्र गर्जनाहीन झाला. योगीजन प्राणांचा निरोध करून, ज्ञानाचा नाश होऊं देत नाहींत, त्याप्रमाणें शेतकरी लोक शेतांतील पाण्यास बंधारा घालून त्याचा एक थेंबहि वायां जाऊं देईनात. ईश्वराराधनेकरतां केलेल्या कर्माचें फळ जसें आपोआप प्राप्त होतें, तसे या ऋतूंत पशुपक्षी व वृक्षवेल यांसहि इच्छा नसतांना आपोआप फलप्राप्ति झाली. न्यायी राजाच्या राज्यात तस्करांवाचून इतर लोक सुखी होतात, तशीं सूर्योदयानें चंद्रविकासी कमलावाचून इतर सर्व कमलें विकसित झालीं. याप्रमाणे चोहोंकडे धनधान्याची समृद्धि झाल्यामुळें शेतकरी लोकांनीं 'नवान्नप्राशन' नांवाचा क्षेत्रदेवतेचा उत्सव मोठ्या थाटानें केला व यांत रामकृष्णहि सामील झाल्यानें त्यास विशेषच शोभा आली. मोक्ष मिळविण्यापर्यंत योग्याची तयारी झाली असली, तरी या जन्मींचें आयुष्य संपेपर्यंत तो स्वस्थ राहून पुढे जसा स्वस्थानी जातो, तसे पावसाळयामुळें ज्यांचे सर्व उद्योग जागच्याजागीं राहिले होते, असे व्यापारी, राजे, ब्राह्मण, विद्यार्थी, वगैरे आपल्या कामास लागले.

वर्षाकालाप्रमाणें भागवतकारानीं केलेल्या शरदृऋतुवर्णनाचें हें मराठींतील रूपांतर मराठीच जाणणाऱ्या वाचकांकरितां येथे दिलें आहे; संस्कृत जाणणाऱ्या वाचकांनीं मूळ देववाणींतून त्याचा आस्वाद जरूर घ्यावा. त्यांतील मौज कांहीं अपूर्व आहे. असो.

यानंतर हेमंतऋतू सुरू झाला. हेमंतऋतूंत कांहीं कांहीं रूढीनें चालत आलेलीं व्रतें, वैकल्यें करण्याचा गोप-गोपींचा परिपाठ होता. त्यांतील एक व्रत तर खरोखरीच अर्थशून्य व नीतीला विघातक असें होतें, आणि तें म्हणजे कौमार मुलींनीं मनाजोगा पति मिळण्याबद्दल 'कात्यायनीव्रत' करणें हें होय. त्या व्रतांतील मुख्य भाग म्हणजे मार्गशीर्ष महिन्यांत अरुणोदयापूर्वी यमुनेवर विवस्त्र होऊन स्नान करणें व नंतर पाण्यांतून बाहेर येऊन देवीची वालुकामय मूर्ति करून आणि तिची

पूजा करून देवाजवळ ' मनाजोगता पति दे ' अशी प्रार्थना करणें, हा होता. गोकुळांतल्या मूर्खपणाच्या व वेडगळ चालीरीति श्रीकृष्णानीं आपल्या बालमित्रांच्या साहाय्यानें मोडण्याचा बेत केला; आणि त्याप्रमाणें उपदेश, उपहास, खोड्या, अशा नानाप्रकारच्या उपायांनीं त्यानें पुष्कळ वेडगळ चाली मोडल्याहि. ही मुलींनीं यमुनेंत विवस्त्र स्नान करण्याची नीतिविघातक, घाणेरडी व दुष्ट, पशुतुल्य माणसाना कुचाळकी करण्याला सवड देणारी चाल, कृष्णानें त्या गोपमुलींचा कमालीचा उपहास करून मोडून टाकली. एकदां नेहमींप्रमाणें अरुणोदयापूर्वी त्या मुली विवस्त्र होऊन नदींत स्नानास उतरल्या असतां यमुनेच्या कांठावर ठेवलेली त्यांचीं वस्त्रे, त्यानें आपल्या बालमित्राच्या साहाय्यानें पळवून नेलीं, आणि त्यांना असहाय स्थितींत मार्गशीर्ष महिन्यांतील कडक थंडीच्या वेळीं, यमुनेच्या पाण्यांत, तास दोन तास गारठण्याची शिक्षा देऊन, उजाडल्यावर नदीवर पाणी आणण्याकरितां गेलेल्या पोक्त स्त्रियांच्या मध्यस्थीनें व त्या मुलींकडून पुनः असलें वेडगळ व्रत न करण्याची शपथ घेववून, त्यांचीं वस्त्रें त्याना परत देवविलीं. ब्रह्मचर्याच्या जोरावर एवढें अचाट शरीरसामर्थ्य कमावलेल्या व आपल्या बालमित्रांना आदर्श बनलेल्या रामकृष्णाना, ब्रह्मचर्याला विघातक व नीतिबाह्य असे आचार खपत नसत, हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं.

ह्याच मार्गशीर्ष महिन्यांत स्त्री-पुरुषांचा मिश्र नाच गोपमंडळी करीत असत त्या नाचाला ' रासक्रीडा ' असें गोंडस नांव दिलें होतें. नाच ही एक उत्कृष्ट कला आहे व शास्त्रोक्त नाच केल्यास नाचणाऱ्यास पुष्कळच शारीरिक श्रम होऊन त्याच्या अंगीं चापल्य हा गुण सहज येतो. नाचाच्या वेळीं बांसरी, मृदंग, ताल हीं वाद्यें वाजविलीं जात. वाद्यांच्या तालावर अनेक प्रकारचें नृत्य होई. स्त्रीपुरुष हातांत हात घालून फेर धरीत. कमल, शंख, चक्र, अशा नाना आकृति नाचता नाचतां तयार करीत नाना प्रकारचे गोफ विणीत. तोंडानें देवादिकांचीं सुंदर गाणीं गात. तरुण गोप-गोपींना श्रीकृष्णाबद्दल फारच आदरयुक्त प्रेम वाटत होतें. श्रीकृष्णाचा तो सर्वांमध्यें मिळून मिसळून वागण्याचा प्रेमळ

स्वभाव, त्याचें अलौकिक शरीरसौंदर्य, मधुर भाषण, नृत्य व वाद्य यांमधील नैपुण्य, चातुर्य, मेहनत करून बनविलेले पिळदार भुजदंड, भरदार छाती, मांसल गर्दन, असामान्य शरीर-सामर्थ्य, धाडसी वृत्ति व अलौकिक पराक्रम पाहून गोकुळांतील गोपगोपी त्याला देवाप्रमाणें मानूं लागले, त्याच्यावर कवनें करूं लागले, त्याचें वचन झेलूं लागले. रासाच्या प्रसंगीं कृष्णावर मुद्दाम रचलेलीं गाणीं ते म्हणत, त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालीत व त्याच्याभोंवतीं फेर धरून त्यानें वाजविलेल्या मधुर मुरलीच्या नादावर नृत्य करण्यांत ते तन्मय होत. ह्या रासनृत्यांतील विशेष म्हणजे, कृष्णाचें हुबेहुब अनुकरण करण्याची तरुण गोपाळांची अहमहमिका! हुबेहुब कृष्णासारखा वेष करून तरुण गोपाळ आपल्या तरुण पत्न्यासह त्या नृत्यांत सामील होत. त्यामुळें रासनृत्य सुरू झालें कीं शेंकडों गोपींच्या बरोबर शेंकडों कृष्ण नृत्य करीत आहेत, असा भास होई आणि सर्वांच्या सारख्या वेषामुळें मोठी मौज दिसे. भागवतकारानीं गोकुळ-वृंदावनातील ह्या रासनृत्याचें वर्णन भक्तिरसानें रंगवून अजरामर करून ठेविलें आहे. सर्वसामान्य लोकांचें लक्ष जगांतील असंख्य बाष्कळ विषयांपासून निघून कृष्णभक्तीकडे आकर्षित करावें, म्हणून रासावर भागवतकारांनीं मुद्दाम पसरलेला, शृंगाररसानें रंगाविलेला, सुंदर मनोहर पडदा, हलक्या हातानें बाजूला केला कीं रासाचें शुद्ध सात्त्विक स्वरूप दृष्टीस पडून, सात्त्विक मनाला अवर्णनीय आनंद होतो व वृंदावनातील बालकृष्णाचें शुद्ध व प्रेमळ चरित्र अंतश्चक्षूंपुढें उभें राहतें.

गोकुळ–वृंदावनांत इंद्रयागाची तयारी करण्यांत गोपाळ गुंतले. हा याग म्हणजे धर्माच्या नांवाखालीं दोन चार दिवस समारंभाच्या धामधुमींत घालवावयाचे. स्वाहाकार व पुष्कळ पक्कान्नें करून ब्राह्मण-भोजन व गोपांच्या जेवणावळी हा या समारंभाचा कार्यक्रम. कृष्णाला ह्या यागाचें स्वरूप बदलून गोपालांना प्रत्यक्ष कांहीं तरी उपयोग होईल असें ह्या यागाला निराळेंच स्वरूप द्यावयाचें होतें. हा यज्ञ कशाकरितां होणार आहे हें माहित असतांहि मुद्दाम कृष्णानें नंद आदिकरून वृद्ध गोपांस विचारिलें कीं, बाबा, ही इतकी घाई कशाकरितां करीत आहां! ह्या

यज्ञापासून काय फळ मिळणार आहे ? आणि ह्याचा उद्देश तरी काय ? एवढें मला कृपा करुन सांगा. हा तुम्हीं चालू केलेला यज्ञ शास्त्रविहित आहे कीं रूढीनें चालू झाला आहे, हें आपण प्रथम मला सांगा. नंद म्हणाला, 'कृष्णा, इंद्र हा पर्जन्याची देवता आहे, मेघ हे त्याचे अंश आहेत. लोकांच्या जीवनाकरिता ते पृथ्वीवर वर्षाव करितात, म्हणून आम्ही व इतर जाणते लोक पर्जन्यापासून उत्पन्न झालेल्या द्रव्यानें यज्ञ करून भगवान् इंद्रास संतुष्ट करीत असतो. धर्म, अर्थ आणि काम या त्रिवर्गांचा लाभ होण्याकरिता यज्ञ करून शिल्लक राहिलेल्या धान्यानें मनुष्यानें आपला निर्वाह केला पाहिजे. कितीहि कष्टानें जमिनीची मशागत केली, तरी पावसावाचून ती फलप्रद होत नाहीं, म्हणून मेघाधिपति इंद्राकरितां यज्ञ करणे अवश्य आहे. याप्रमाणें हा प्रघात परंपरेनें चालत आला आहे.' नंदाच्या भाषणाला सर्व वृद्ध गोपालांनीं मान डोलविली. कृष्ण ह्यावर आता काय बोलणार, इकडे तरुण गोपालाचें चित्त लागलें.

नंदादि वडील माणसाचें असें भाषण ऐकून त्याच्या, विशेषतः तरुण गोपालांच्या, विचाराना नवें वळण लागावें म्हणून कृष्ण बोलूं लागला. तो म्हणाला, 'बाबा, आणि गोपहो, या जगात प्राणी जन्मास येतो तो केवळ कर्मामुळें. कर्मामुळेंच त्याचा नाश होतो. सुख, दुःख, भय, किंवा कल्याण हीं सर्व कर्माच्या अधीन आहेत. कर्मामुळें फळ मिळतें असें सिद्ध झाल्यावर इंद्रादिक देवांचें मध्यें काय प्रयोजन ? इंद्र कांहीं स्वतःच्या पदरचें देतो काय ? देत असेल तर त्याचा मान राखणें जरूर आहे. नाहीं तर कर्मालाच देव मानणे बरें ! प्राणी आपापल्या कर्माप्रमाणें सुखदुःखें भोगीत असतां त्यांनीं देवादिकांची भीति बाळगं नये. देव तरी प्राक्तनाप्रमाणें फळ आम्हांस देणार ना ? मग त्यांची थोरवी ती काय ? मनुष्य हा निसर्गाचा दास बनलेला आहे. निसर्गाला सोडून त्याला एक क्षणभरहि इकडे तिकडे हालतां येत नाहीं. यच्चयावत् देव, राक्षस, मनुष्यें, स्वभावानें जखडलीं गेलीं आहेत. कर्मामुळेंच प्राण्याला लहान मोठ्या योनि भोगाव्या व सोडाव्या लागतात. तेव्हां शत्रु, मित्र, उदासीन, गुरु, ईश्वर, सर्व कांहीं कर्मच आहे. एकंदरींत कसेंहि पाहिलें तरी

कर्मालाच प्राधान्य येतें. पण कर्म देवता कशी होईल असें कोणी म्हणेल, तर ज्यापासून आपला फायदा होतो व ज्यावर आपलें सर्वस्व अवलंबून आहे तेंच आपलें दैवत पूजेला मूर्तीच असली पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. एकाच्या आश्रयानें वाढून दुसऱ्याची पूजा करणें हें चांगलें नाहीं ! यानें कल्याण कसें व्हावें ? ब्राह्मणाने वेदाध्ययनानें, क्षत्रियानें पृथ्वीसरक्षणानें, वैश्यानें व्यापार करून व शूद्राने सेवा करून आपली उपजीविका करावी. कृषि, वाणिज्य, गोरक्षण आणि व्याजबट्टा या चार प्रकारांनीं वैश्यानें उपजीविका करावी. पैकीं आम्हीं गोपानीं गोरक्षणाचा धंदा पत्करला आहे. तेव्हां आपण इंद्राला कशाकरिता खूष करावें ? त्याचा ह्या धंद्याशीं काय संबंध ? जगाच्या उत्पत्ति स्थिति-नाशाला सत्त्वरजस्तम हे गुण कारण असतात. रजोगुणानें प्राणी जन्मास येतो. याच गुणापासून मेघांचीहि उत्पत्ति आहे. वृष्टि करणें हा मेघांचा धर्मच आहे. जगाचें धारण–पोषण वृष्टीनें होतें. पर्वत मेघांना आपल्याकडे ओढून घेऊन त्यांना आपल्यावर वृष्टि करायला लावतो. आपण वनात राहणारे लोक आहों. पर्वतावर वाढलेल्या गवतानें आमच्या गाई पुष्ट होतात. पर्वतावरील वृक्ष-वनस्पति आमच्या जीवनाला उपयोगी पडतात. वेदांतील ज्ञान आपणाला ब्राह्मण-द्वारा प्राप्त होतें. गोरसावर आपण आपला चरितार्थ चालवितों. आपल्या जीवनांत इंद्राचा कांहीं संबंध येत नाहीं. म्हणून इंद्राला संतुष्ट करण्या-करितां इंद्रयाग न करितां गिरियाग करून, त्याच्या योगानें गोवर्धन, गाई व ब्राह्मण यांना संतुष्ट करणें आपलें कर्तव्य आहे. इंद्रयागाकरित जी सामग्री आणली असेल ती याच कामीं लाविली पाहिजे. सर्व स्वयं-पाक तयार करवून खीर, अनरसे, इत्यादि पक्वान्नें तयार करा सर्व गाईंच्या दुधाचा उपयोग याच कामाकडे करा, ब्रह्मवेत्त्या ब्राह्मणांकडून अग्नीचें आवाहन करा. त्यांना अनेक प्रकारच्या मिष्टान्नांनीं संतुष्ट करून त्यांना गाई दान करा. दक्षिणा वांटा. चांडाल, पतित इत्यादिकांना अन्न-दानानें संतुष्ट करा. गाईंना गवत चारा आणि गोवर्धन पर्वताची पूजा करून त्याला षड्रसयुक्त अन्नाचा बलि अर्पण करा. त्यायोगें त्याच्या आश्रयानें राहणाऱ्या पक्ष्यादिकांना संतोष होईल. नंतर भोजन करून व

उत्तम वस्त्रें व अलंकार परिधान करून गाई, ब्राह्मण व अग्नि यांना नमस्कार करा आणि गोवर्धन पर्वताला प्रदक्षिणा करण्याकरितां समारंभानें निघा. बाबा, याप्रमाणें माझें मत मी तुम्हांला विनयानें कळवीत आहें. बरें वाटल्यास तसें करा. गाई, ब्राह्मण, गोवर्धन यास या यज्ञानें संतोष होईल.'

नंदादि सर्व गोपमंडळींना कृष्णाचा हा विचार फार पसंत पडला. त्यांनीं कृष्णानें सांगितल्याप्रमाणें यज्ञाची सर्व सिद्धता केली. ब्राह्मणाचें पुण्याहवाचन झालें. वेदमंत्रांनीं अग्नीचें पूजन करून त्यात यथाविधि हवन केलें. पक्कान्नाचें भोजन घालून ब्राह्मणापासून चांडालापर्यंत सर्वांना संतुष्ट केलें. गाईंना उत्तम गवत चारून त्याचें पूजन केलें. गोवर्धन पर्वताचें मोठ्या थाटानें पूजन करून अन्नबलि त्याला अर्पण केला व नंतर सर्व गोपानीं प्रसाद म्हणून सुग्रास अन्नाचें भोजन केलें आणि ते सर्व समारंभानें गोवर्धन-प्रदक्षिणा करण्याकरिता निघाले वृद्ध गोप व गोपस्त्रिया पोषाख करून गाड्यांतून प्रदक्षिणेला निघाल्या. तरुण गोपमंडळी पायानें दौडत निघाली. हा प्रदक्षिणेचा समारंभ चार दिवस चालला होता. ह्या प्रदक्षिणेच्या निमित्तानें रामकृष्णांनीं गोवर्धन पर्वताचें आमूलाग्र निरीक्षण केलें व गोपमंडळीकडून करविलें वृद्धापकाल येईपर्यंत गोवर्धनाच्या आसपास राहिलेल्या गोपमंडळींनादेखील गोवर्धनावरील किती तरी गोष्टी अज्ञात होत्या. उत्तम हवाशीर पठारें, उत्तम जातीच्या तृणाचीं समृद्ध कुरणें, अमृतासारख्या मधुर फळांनीं बहरलेल्या वृक्षांच्या राई, नानाप्रकारच्या वनस्पतींनीं भरलेलीं वनें, निर्मळ स्वच्छ पाण्याचे अखंड वाहणारे झरे व लहानमोठ्या सुंदर गुहा, ह्या सर्व गोष्टी प्रदक्षिणेच्या निमित्तानें, गोवर्धनाभोंवतीं चार सहा दिवस सतत निरीक्षण करीत हिंडल्यामुळें सर्वांच्या दृष्टीस पडल्या. कित्येक गुहा तर पर्वताच्या पायथ्यालगत, एवढ्या मोठ्या होत्या कीं वृंदावनांतील सर्व गोपमंडळी आपलीं गाईवासरें, सामानसुमान यांसह त्यांत सहज राहूं शकतील. हीं आश्चर्यकारक स्थानें पाहून सर्व गोपमंडळींना अवर्णनीय आनंद झाला. सर्व गोकुलासह गोपमंडळींचें सर्व प्रकारानें संरक्षण करण्यास गोवर्धन पर्वत कसा समर्थ आहे, हें कृष्णानें सर्वांना दाखवून दिलें. गोवर्धन-प्रदक्षिणा मोठ्या आनंदानें करून, सर्व

गोपमंडळी वृंदावनांतील गोकुलांत परतली. ही गोवर्धनयागाची कल्पना काढल्याबद्दल सर्व गोपाळांनीं कृष्णाची मनःपूर्वक स्तुति केली. गोवर्धनयागानें, गोवर्धनाच्या प्रत्यक्ष दर्शनानें, सर्वांचीं मनें प्रसन्न झालीं. गोवर्धन पर्वतावरील ती समृद्धता आणि तीं पवित्र स्थानें आपणांला कसल्या हि आपत्तींत हात देतील, अशी त्यांची खात्री झाली. पर्वतावर हिंडण्याचा व नवीन नवीन भाग हुडकून काढण्याचा तर तेव्हांपासून तरुण गोपालाना छंदच लागला. त्या मोठमोठ्या गुहांपर्यंत आबालवृद्धांना जातां येईल, अशा वाटा तरुण गोपांनीं कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे तयार केल्या. कित्येक गुहांपर्यंत गाड्यातून जातां येईल अशा वाटा तयार झाल्या. कृष्णाच्या चातुर्यानें गोकुलाची सर्व प्रकारची होणारी उन्नति पाहून नंद–यशोदेला परमावधीची धन्यता वाटूं लागली.

गोवर्धनाचें साहाय्य घेण्याचा प्रसंग लवकरच आला. अकालीं आकाशात मेघसंचार होऊं लागला. मेघांची आकाशांत दाटी झाली. विजांचे लखलखाट होऊं लागले. भयंकर जोराच्या अतिवृष्टीला सुरवात झाली. अतिवृष्टीचा योग दिसूं लागतांच, गोकुळांतलि आपलीं घरें अतिवृष्टीपुढें टिकाव धरणार नाहींत, असें मनात येऊन सर्व गोप चिंताकुल झाले इंद्रयाग न केल्याबद्दल इंद्राचा कोप झाला, असें वृद्ध गोप बोलूं लागले. कृष्ण हंसून म्हणाला, 'आपल्यावर इंद्र रागावला ना? भिऊं नका. मी गोवर्धनाकडून तुमचें संरक्षण करवितों.' त्यानें आपल्या बरोबरीच्या तरुण गोपांना सूचना देतांच त्यांनीं गाईवासरें त्या मोठमोठ्या गुहांमध्यें नेऊन ठेवलीं.-वैरणीच्या ओझ्यांनीं कित्येक गुहा भरून गेल्या. वृद्ध गोपाल व स्त्रिया ह्यांना गाड्यांत बसवून त्या मोठमोठ्या गुहांत सामानसुमानासह वस्तीकरतां ते घेऊन गेले. सर्व गोकुळ गोवर्धनाच्या गुहांतून सामावलें. सात दिवस पर्यंत अहोरात्र मुसळधार पाऊस पडत होता. यमुनेला महापूर आला. सर्व भूमि जलमय झाली. गोवर्धनाच्या भोंवतीं गोळ्या पाण्याच्या समुद्रानें वेढा दिल्यासारखें दिसूं लागलें. वृद्ध वृद्ध गोपमंडळींनीं अशी अतिवृष्टि आपल्या साऱ्या आयुष्यांत कधीं पाहिली नव्हती. सर्व वृंदावन जलमय झालें असतां, सर्व गाईवासरें, मुलेंबाळें,

धान्य, वैरण, सामानसुमान यांसह सर्व गोपमंडळी अत्यंत निवाऱ्याच्या जागीं निश्चिंत राहत होती. हा अपूर्व चमत्कार कृष्णाच्या गोवर्धन-यागाच्या कल्पनेनें घडला होता, हें वारंवार मनात येऊन कृष्णानें गोवर्धनाच्याकडून आपलें सर्वांचें संरक्षण केलें, ह्या भयंकर प्रलयकालच्या अतिवृष्टीपासून आपलें संरक्षण करण्याकरितां गोवर्धनाचें मजबूत छत्र कृष्ण-चातुर्यानें, कृष्णकृपेनें आपल्यावर धरलें गेलें आहे असें मनांत येऊन सर्व गोप-मंडळी कृतज्ञतेनें व प्रेमानें कृष्णाला गोवर्धन-गिरिधारी म्हणूं लागले. गोवर्धन-गिरिधारीवर गोपींनीं स्वकृत कवनें करून त्या तीं गीतें प्रेमानें म्हणूं लागल्या.

सात दिवसांनीं अतिवृष्टीचा जोर कमी झाला. हळु हळू मेघ वितळूं लागले व शेवटीं अजिबात नाहींसे झाले. पर्जन्यवृष्टि पूर्णपणें थांबली. पाणी झराझर ओसरून गोवर्धनाच्या भोंवतालचा प्रचंड क्षीरसागर गुप्त झाला. अमर्याद फुगलेली यमुना पुनः मर्यादेनें आपल्या पात्रांतून वाहूं लागली. भगवान् सूर्यनारायणाच्या तेजस्वी किरणांचे दर्शन होऊन सर्व सृष्टीला आनंद झाला. वृंदावनांतील गोकुळाची जागा फारच सुंदर दिसूं लागली. गोवर्धनाच्या छत्राखालीं असलेलीं गाईवासरें व गोपबालकें गोवर्धनावरून उड्या मारीत खालीं जाण्याला उतावीळ झालीं. कृष्णाच्या चातुर्याला मान डोलावून त्याला देवाप्रमाणें मानूं लागलेली गोपमंडळी खालीं वृंदावनांत जाण्याबद्दल कृष्णाशीं बोलूं लागली. सर्व संकट नाहींसें झालें असें पाहून कृष्णानें गोवर्धनावरून खालीं उतरण्याची अनुज्ञा देतांच सर्व गोकुळ पुनः आनंदानें वृंदावनांत आलें. वृंदावनांतील गोकुळाचा संसार पुनः थाटांत सुरू झाला. अतिवृष्टीनें अनेक ठिकाणीं भयंकर हानि झाली असतांना, वृंदावनांतील गोकुळाला कृष्णानें काडीभरहि धक्का लागूं न देतां त्याचें उत्तम तऱ्हेनें सरक्षण केलें, ही वार्ता दूरपर्यंत हां हां म्हणतां पसरली. गोरस-विक्रीकरितां मथुरेसारख्या शहरांतून जाणाऱ्या गौळणी गोवर्धन-गिरिधारीवर सुंदर गाणीं म्हणून गोरसाची विक्री करूं लागल्या व गोवर्धनगिरीधारीची कीर्ति सर्वत्र पसरवूं लागल्या. सज्जनांचीं अंतःकरणें कृष्णवर्णनानें उचंबळूं लागलीं, तर कंसादि दुष्टांचीं अंतःकरणें

बेचैन झाली. इंद्राचा कोप व कृष्णाचें चातुर्य, यांच्या कथा फार दूरवर पसरल्या. महान तपस्वी ऋषि, वेदवेत्ते ब्राह्मण व देवभूमींतील नारद आपल्या शिष्यासह कृष्णाचें अभिनंदन करून त्याला आशीर्वाद देण्याकरितां गोकुळ–वृंदावनात आले. देवेंद्राचा मंगल संदेश व आशीर्वाद नारदांनीं कृष्णाला सर्वांच्या देखत सांगितला. मोठा समारंभ करून वेद-वेत्त्या ब्राह्मणांनीं, ऋषिमुनींनीं, नारदांनीं कृष्णाला मंगल आशीर्वाद दिले. कृष्णाला वैदिक मंत्रांनीं गोमातेच्या पवित्र दुधाचा अभिषेक करून,--

अहमिन्द्रो हि देवानां त्वं गवामिन्द्रतां गतः।
गोविन्द इति लोके त्वां गास्यन्ति भुवि मानवाः ॥

असा देवेंद्राचा संदेश सांगून कृष्णाला ' गोविंद ' या नामाभिधानानें भूषित करून त्याचा सर्वांनीं आनंदानें गौरव केला. गोपींनीं प्रेमानें गाइ-लेला गोवर्धनगिरिधारी आतां गोविंद ह्या नावानें सर्वांच्या मुखीं शोभूं लागला.

नंदानें आलेल्या सर्व वेदवेत्त्या ब्राह्मणांचा, ऋषिमुनींचा व ऋषिश्रेष्ठ नारदांचा यथायोग्य सत्कार केला. केलेल्या सत्काराचा आनंदानें स्वीकार करून व नंदाचा निरोप घेऊन सर्वजण आपापल्या स्थानीं गेले. गोवर्धन पर्वताच्या सहाय्यानें भयंकर अतिवृष्टींत गाईवासरें, सर्व चीजवस्त यांसह सर्व गोपमंडळींचें कृष्णानें आपल्या चातुर्यानें संरक्षण केलें, ही बातमी गोपींनीं केलेल्या गाण्यांतून, भाटकवींच्या कवित्वांतून पसरत पसरत, सर्व देशभर पसरली. श्रीकृष्णाच्या चातुर्याचें हें वर्णन वाढतां वाढतां, शेवटीं त्यानें अतिशयोक्तीचें रूप धारण करून कंसादि खलपुरुषांना भयंकर भेडसावलें. कृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून गोकुलावर धारिला आणि सर्व गोकुलाचें रक्षण केलें; ही काव्यमय कल्पना लोकांना इतकी रमणीय वाटली कीं लवकरच ती सर्वांच्या तोंडीं होऊन कृष्णाच्या पराक्रमाचें वर्णन करण्यांत नगरवासी जनांना अत्यानंद वाटूं लागला.

## प्रकरण ६ वें

# कंसवध व अलौकिक स्वार्थत्याग

असा हा पराक्रमी, चातुर्यसंपन्न व महाबलाढ्य कृष्ण आहे तरी कोण, हें पाहाण्याकरिता कंसानें वृंदावनांत पाठविलेले दूत परत येऊन कृष्णाचें हें गुणवर्णन खरे आहे, इतकेंच नव्हे, तर त्याच्या शक्तीचे वर्णन आपण ऐकतों त्यापेक्षां तो किती तरी अधिक शक्तिमान् आहे, असें ते सांगूं लागले. खरी गोष्ट म्हणजे अशी होती कीं, कंसानें पहिल्याप्रथम कृष्णाची माहिती काढण्याकरितां आपला 'प्रलंबासुर' नांवाचा महाबलाढ्य दानव मल्ल पाठविला होता व त्याची रामकृष्णांनीं हां हां म्हणतां गठडी वळली, ही बातमी कळल्यापासून दुसरा कोणताहि दूत वृंदावनांत पाऊल टाकण्यास घाबरूं लागला. राजाज्ञा पाळलीच पाहिजे म्हणून ते वृंदावनाच्या आजूबाजूला हिंडत, व ऐकींव माहिती मिळवून कंसाला ती सांगत. नुकताच जंगलांतून वृंदावनांत येऊन गाईवासरांना त्रास देऊं लागलेल्या एका भयंकर माजलेल्या जंगली बैलाचा समाचार घेऊन कृष्णानें गोपालांच्याकडून वाहवा मिळविली. वृषासुराला द्वंद्वयुद्धांत मारिल्याची ही ऐकींव हकीगत तिखटमीठ लावून एका दूतानें कंसाला सांगितली. ती ऐकून कंसाच्या हृदयानें ठाव सोडिला.

कंस आपल्या दानवमल्लांच्या व आपला पराक्रमी सासरा, मगध देशचा सम्राट् जरासंध, यांच्या सल्ल्यानें वागूं लागल्यापासून भोजमंत्र्यांचें, भोज सरदारांचें कंसाच्या दरबारांतील वजन संपुष्टांत आलें होतें. म्हणून शौरसेनी यादवांच्या जोडीला आतां भोजमंत्रिमंडळ, भोजसरदार, मनांतून त्याचें शत्रुत्व करूं लागले होते. देवकाचा हक्क बुडवून कारस्थानी भोजांनींच उग्रसेनाला गादीवर बसविला होता, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. उग्रसेनाला बंदींत टाकून कंसाला गादीवर बसविण्यांतहि ह्या भोजांनींच

दानवाच्या बरोबरीनें पुढाकार घेतला होता. कंस त्यांना मानीनासा होतांच शौरसेनी यादवांशीं त्यांनीं खलबत सुरू केलें. वृंदावनातील नंदपुत्र-कृष्णाला कंस फार भितो आहे, हें ध्यानीं येतांच कृष्णाशीं संधान बांधून कृष्णाकडून मथुरेवर स्वारी करवून कंसाची खोड मोडावी, असें त्यांनीं मनात आणलें. तितक्यात देवर्षि नारदांनीं मथुरेस येऊन, कृष्णासंबंधीं सर्व माहिती कंसाला सांगितली. देवकीचा सातवा गर्भ गळून गेला व आठवा मुलगा न होता मुलगी झाली, ह्या दोनहि गोष्टी खोट्या असून वसुदेवादि यादवांनीं, देवांच्या साहाय्यानें, तें कपटकारस्थान कसे रचिलें, याची हकिगत नारदांनीं कंसाला राग येईल, पण भीतीहि वाटेल, अशा-प्रकारें सजवून सागितली. बलराम हा देवकीचा सातवा पुत्र असून नंदपुत्र म्हणविला जाणारा कृष्ण तिचा आठवा पत्र आहे व तो भविष्य-वाणीनें सागितलेला त्याचा मृत्यु होय, ही गोष्ट नारदाच्या तोडून ऐकतांच मृत्युभयानें कंसाच्या डोळ्यापुढें काजवे चमकले. त्याला सर्वत्र अंधःकार दिसूं लागून, तो अर्धवट मूर्च्छितावस्थेंत गेल्यासारखें दिसलें. तें पाहून नारदांनीं त्याला सावध केला व थोडा धीर दिला. नारद म्हणाले, "कंसा, न कळत अपमृत्यु येतो, तेव्हां मनुष्याचा नाइलाज होतो. त्याला कांहींच करिता येत नाहीं. तशी गोष्ट तुझी नाहीं. तुझा मृत्यु कोण व कोठें आहे हें तुला आता समजलें आहे. पुरुषप्रयत्नाला आतां तुझ्या बाबतींत भरपूर वाव आहे. त्या मृत्यूचा नाश करून निर्भय होण्याची सुसंधि तुला अनायासें प्राप्त झाली असतां तूं हताश होऊन धीर सोडावास याचें मला आश्चर्य वाटतें. तुझा विधिलिखित मृत्यु कोठें आहे त्याचा शोध करून, तुला कळविण्याचें मीं वचन दिले होतें, हें तुला आठवतें ना ? तुझ्या हातांतून निसटलेल्या तुझ्या मृत्यूचा शोध लागतांच त्याचा ठावठिकाणा तुला कळवून मी माझ्या वचनांतून मोकळा झालों आहें. दानवेंद्राची मदत असणाऱ्या तुझ्यासारख्या शूर राजाला, सम्राट् जरासंधा-च्या जांवयाला, गौळवाड्यांत वाढलेल्या कृष्णाचा नाश करणें शक्य आहे असें मला वाटतें. देवांच्या मदतीनें कपटकारस्थान करून वसुदेवानें कृष्णा-ला मथुरेंतून गोकुळांत नेला. तुलाहि कपटकारस्थान करून, गोकुळांतून

त्याला मथुरेंत आणवून, त्याचा नाश करणें मुळींच अशक्य नाहीं." कंसाबरोबर इतकें बोलून नारदांनीं त्याचा निरोप घेतला. कंसहि नारदांनीं सुचविल्याप्रमाणें कृष्णाला मथुरेंत आणून त्याचा घात कसा करावा ह्या गोष्टीचा विचार करूं लागला.

नारद मथुरेंतून निघाले ते तडक गोकुळ वृंदावनांत आले. रामकृष्णांना त्यांनीं यमुनेच्या वाळवंटात गांठलें. सवंगडी गोपाळ गाई वळवून आणण्याच्या कामांत दंग होते. राम व कृष्ण बोलण्यात गढून गेले होते. मथुरेचा राजा कंस आपला द्वेष करतो आणि आपला नाश करण्याकरितां तो खटपट करीत असल्याचे, नंदबाबांचे स्नेही प्रसिद्ध यादववीर व आपण राहतों त्या जहागिरीचे जहागिरदार वसुदेव याचे निरोप वारंवार कां येतात? आपल्या जिवाची काळजी घेण्याकरितां दक्ष राहण्याबद्दल नंदबाबांना वारंवार ते कां सांगतात? जहागिरदार वसुदेवाचा आपल्यावर इतका लोभ कां? यासंबंधींच त्यांचें बोलणें चाललें होतें, इतक्यांत देवर्षि नारद त्यांच्याजवळ येऊन पोहोचले. त्यांनीं रामकृष्णांचीं कांहीं वाक्यें येतां येतां ऐकिलीं. चतुर नारदांनीं त्याचे संभाषण कशाबद्दल चाललें आहे तें चटकन् ओळखून रामकृष्णांचें त्याच्याकडे लक्ष जाताच म्हटलें, "बलरामा, कृष्णा, तुम्हांला वाटणाऱ्या गूढ गोष्टींचा खुलासा करण्याकरिताच मी आलों आहें. तुमच्या गोपाळांना इकडे न येतां परस्पर गाई घेऊन घरीं जाण्याचा तुम्ही इशारा द्या. आपण तिघेच येथें स्वस्थपणें थोडा वेळ बोलूं." रामकृष्णांनीं गोपाळांना त्याप्रमाणें इशारा देतांच, नारदांशीं एकांतांत रामकृष्णांना कांहीं बोलायचें आहे, हें ते समजले व सेनापतीची आज्ञा पाळण्याची संवय असलेल्या सैनिकांप्रमाणें सर्व गोपाळ कांहींही न विचारतां गाईवासरें घेऊन वृंदावनांतील गौळवाड्याकडे चालूं लागले. रामकृष्णांच्या संगतीनें गोपाळात आलेला तो आज्ञाधारकपणा पाहून नारदांना आश्चर्य व समाधान वाटलें. सर्व गोपाळ दूर गेले, आतां आपण तिघेच वाळवंटावर आहोत, असे पाहून नारद बोलूं लागले. ते म्हणाले, "रामा, कृष्णा, जहागिरदार वसुदेवाचा तुमच्यावर इतका लोभ कां हें तुम्हांला मोठें गूढ पडलें आहे. होय ना? तुम्हांला खरी गोष्ट

समजली म्हणजे हें गूढ सहज नाहींसें होईल. मनुष्य आपल्या पुत्रावर स्वतःच्या प्राणांपेक्षांहि अधिक प्रेम करितो. कारण, तो पुत्र त्याच्या वंशाचा विस्तार करणारा, त्याची व त्याच्या वंशाची कीर्ति दिगंत गाजविणारा होईल अशी त्याला आशा असते. वसुदेवाची सुद्धा तीच अपेक्षा आहे. आपल्या यदुकुलाचा उद्धार आपल्या पुत्रांच्या हातून व्हावा, दुष्ट कंसानें यादवांची केलेली दैना नाहींशी करून आपल्या पुत्रांनीं यादवाना ह्या जगांत पुनः पूर्वीप्रमाणें मानानें व आनंदानें राहतां येईल अशी परिस्थिति निर्माण करावी, अशी त्याची इच्छा आहे. कंसानें यादवांच्या पायांत घातलेली पारतंत्र्याची अवजड शृंखला आपल्या पुत्रांनीं तोडून टाकण्यास समर्थ व्हावें, ह्या उद्देशाने वसुदेवानें वृंदावनासारख्या स्वतंत्र जंगली वातावरणांत आपल्या पुत्रांना म्हणजे रामा, कृष्णा, तुम्हांला वाढविण्याची योजना करून ती मोठ्या कुशलतेनें पार पाडली."

"काय, नारदा, तुम्ही सांगतां तरी काय? आम्ही वसुदेवाचे पुत्र? मग नंदबाबा आमचे कोण?" नारदांच्या बोलण्यानें एकदम आश्चर्याचा धक्का बसून कृष्णानें उद्गार काढले. नारद म्हणाले, "कृष्णा, आश्चर्यचकित होण्यासारखीच ही गोष्ट आहे खरी. वसुदेवानें अत्यंत चातुर्यानें रचलेल्या ह्या यशस्वी कारस्थानाला इतिहासांत दुसरी तोड मिळणार नाहीं. कृष्णा, तूं आणि राम वसुदेवदेवकीचे पुत्र आहांत, ही गोष्ट नंदालाच काय, पण कृष्णा, तुला जन्म दिला असें मानणाऱ्या यशोदेलाहि माहित नाहीं. रामाची माता रोहिणी ही वसुदेवाची पत्नी असून, तिला कंसाच्या भयानें वसुदेवानें गुप्तपणें नंदाच्या रक्षणाखालीं ठेवली आहे, ही गोष्ट सर्वांना माहीत आहे; पण रामसुद्धां देवकीचाच मुलगा आहे ही गोष्ट रोहिणीशिवाय दुसऱ्या कोणालाच माहीत नाहीं. रोहिणीच्या साहाय्यानेंच वसुदेवानें कारस्थान रचल्यामुळें रोहिणीला ह्या सर्व गोष्टी माहीत आहेत. बायकांच्या कानांवर एखादी गोष्ट गेली कीं ती जगाला समजलीच, असें म्हणतात. बायकांच्या तोंडांत तीळ भिजत नाहीं, ह्या म्हणीला देवकी, रोहिणी, रोचना वगैरे वसुदेवाच्या चतुर मुत्सद्दी राण्या अपवाद आहेत.' इतकें बोलून नारदांनीं रामकृष्णांना, देवकीच्या

पुत्रांसंबंधीं गर्गमुनींनीं वर्तविलेलें भविष्य, कंसाचा राग, वसुदेवानें दिलेलें वचन, देवांच्या मदतीनें वसुदेवानें रचिलेलें कारस्थान, जगाच्या दृष्टीनें कंसाच्या हातून झालेल्या देवकीच्या पुत्राच्या हत्या, रामकृष्णांच्या जन्माच्या वेळचे अद्भुत कारस्थान, वगैरे गोष्टी जितक्या त्याना सांगण्यासारख्या व समजण्यासारख्या होत्या, त्या सांगितल्या. ह्या सर्व गोष्टी ऐकून रामकृष्ण विचारमग्न झाले. नारदहि त्याची विचारमग्न स्थिति लक्षपूर्वक अवलोकन करीत होते. काहीं वेळपर्यंत कोणीच काहीं बोलले नाहीं. बराच वेळ झाल्यानंतर नारदांनीं रामकृष्णांना त्यांच्या विचारतंद्रींतून भानावर आणिले. नारद पुढें म्हणाले, "कृष्णा, गर्गाचार्योनीं वर्तविलेल्या भविष्याप्रमाणें देवकीचा आठवा पुत्र, म्हणजे तूंच, कंसाचा मृत्यु आहेस. त्याच्या हातून निसटलेल्या कन्येनें, तूं जिवंत आहेस, हें त्याला आकाशात दिव्य झगझगीत अक्षरें दाखवून कळविलें व त्यावेळेपासून तो तुझ्या शोधांत होता. आतां त्याला तुझा शोध लागला असून देवकीचा आठवा पुत्र तूंच, अशी त्याची खात्री झाली आहे. तेव्हां तुझा नाश करण्याकरितां तो नाना प्रकारच्या युक्त्या योजील. कांहीं तरी कारणानें तुला मथुरेत नेऊन तुझा नाश करावा असा त्याचा बेत माझ्या कानावर आला, म्हणून तुला व रामाला सावध करावें, याकरितां शक्य तितक्या लगबगीने मी इकडे आलों. कृष्णा, रामा, तुम्हीहि शूर आहांत, चतुर आहांत. कंस तुला फार भितो आहे. तरी पण तोहि पराक्रमी असून हाडाचा अत्यंत दुष्ट आहे. तो राजा आहे. त्याच्याजवळ त्याच्यासारख्याच दुष्ट लोकांचा भरणा फार मोठा आहे. पण एक गोष्ट तुमच्या दृष्टीनें चांगली झाली आहे. त्याला राज्यावर बसविण्याची खटपट करणारे भोजसरदार व भोजमंत्री त्याचा मनातून द्वेष करूं लागले असून ते त्याच्या विरुद्ध उठाव करण्यासारख्या त्याच्या शत्रूचा शोध करीत आहेत. कंसाचा पाडाव करण्याकरिता भोजसरदारांची व भोजमंत्र्यांची तुम्हांला मदत होईल, हें मी तुम्हांला सुचवून ठेवितों. सर्व यादववीर तर तुमच्या बाजूचे आहेतच. आणखी एक सूचना तुम्हांला देऊन ठेवावी असें मला वाटतें. कृष्णा, रामा, तुमच्या हातून कंसाचा

नाश होईपर्यंत, तुम्ही वसुदेवाचे पुत्र आहांत हें वृंदावनांत नंदादि गोपाळांना कळूं देऊं नका. मथुरेंत तुमचा नाश करण्याकरितां कंसानें आपल्या दुष्ट दानवमल्लांची योजना केली तर त्यांच्याशीं झुंजण्याकरितां वृंदावनांतल्या कसलेल्या गोपाळ मल्लांची तुम्हांला जरूर लागेल. तुम्हीहि त्यांच्यासारखे गोपाळच आहांत ही त्यांची भावना तोंपर्यंत कायम असली पाहिजे. कृष्णा, रामा, येतों मी आतां. कंसाच्या हालचालींवर, त्यानें पाठविलेल्या माणसांच्यावर, फारच सावधगिरीनें लक्ष ठेवा. येथपर्यंत आलोंच आहें तो मी जाता जातां नंदालाहि भेटून जातों. म्हणजे मी तुम्हाला मुद्दाम भेटण्याकरितां आलों अशी त्याची कल्पना होणार नाहीं." इतकें बोलून राम-कृष्णांचा निरोप घेऊन नारद जावयास निघाले असें पाहातांच कृष्णानें सद्गदित होऊन, 'नारदऋषे, आमच्यावर आपले महत् उपकार आहेत' असें म्हटलें व रामकृष्णानीं दोघांनीं त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांना नमस्कार केला. नारदानीं त्याना हास्यमुखानें आशीर्वाद देऊन, तेथून प्रयाण केलें. नारदांनीं सांगितलेल्या गोष्टींचा, त्यानीं दिलेल्या सूचनांचा थोडा वेळ तेथें वाळवंटावर बसून एकमेकांशीं विचार करून, रामकृष्ण वृंदावनात घरीं गेले. तेथें नारद ऋषी आपल्याला दर्शन देऊन गेल्याचें नंदानें त्यांना सांगितलें.

यापुढें गोकुळांत रामकृष्ण अगदीं पूर्वीप्रमाणेंच वागत होते, पण आपल्या जन्मदात्या माता-पित्याची भेट घेण्याची त्यांना फार उत्कंठा लागून राहिली होती.

एक दिवस मथुरेंतील एक भोजसरदार वेष पालटून वृंदावनांत आला. त्यानें गोपाळाचा वेष घेतला होता. वनांत गाई राखण्याकरितां गेलेल्या कृष्णाला तो जाऊन भेटला. नारदांचे शब्द लक्षांत ठेवून कृष्णानें सावधगिरीनें व चातुर्यानें उलटसुलट प्रश्न विचारून चौकशी केली, व तो कंसाचा मनुष्य नसून भोज मंत्र्यांनीं पाठविलेला भोज सरदार आहे, अशी आपली खात्री करून घेतली. त्या भोजसरदारानें आपला कृष्णाच्या भेटीस येण्याचा उद्देश सांगितला. भोजमंत्री व भोजसरदार महादुष्ट व सर्वांना पीडा देणाऱ्या कंसाला सिंहासनावरून काढून टाकून त्याच्याऐवजीं,

कंसानें हक्क बुडविलेल्या देवकाला अथवा त्याच्या मुलाला मथुरेच्या सिंहासनावर बसविण्याच्या खटपटींत आहेत. त्यांना कृष्णाची व त्याच्या गोपसैन्याची मदत पाहिजे आहे. कृष्णानें मदत देण्याचें कबूल केल्यास त्याला मथुरेंत राज्यक्रान्ति झाल्यानंतर मथुरेच्या दरबारांत सरदारकीची वस्त्रें मिळून जहागिरी देण्याचें वचन भोजमंत्रिमंडळातर्फे देण्यास आपण आल्याचें त्यानें सांगितलें. कृष्णानें आपण आपल्या वडील बंधूला व गोपमित्रांना विचारून आपला काय विचार ठरेल तो मुद्दाम मथुरेला आपला मनुष्य पाठवून भोजमंत्र्यांना कळविण्याचें अभिवचन देऊन त्या भोजसरदाराची रवानगी केली. भोजसरदार गेल्यानंतर कृष्णानें रामाला एकान्तांत भेटून भोजसरदाराचें म्हणणें सांगितलें. भोजसरदारहि कंसासारखेच दुष्ट व कारस्थानी आहेत, हे त्यांना नारदांकडून कळलें होतेंच. आपलें कार्य साधण्याकरितां त्यांचा विश्वास आपण संपादन करावा असें दोघां बंधूंचें ठरलें, व त्याप्रमाणें भोजमंत्र्यांच्या म्हणण्याला आपण कबूल असल्याचे कळविण्याची त्यांनीं ताबडतोब व्यवस्थाहि केली. आपल्या गोपमित्राना ही गोष्ट कोणत्या स्वरूपांत सागून आपल्याबरोबर मथुरेला येण्याची त्यांच्या मनाची तयारी कशी करावी, या विचाराला ते लागले.

गोकुळांतून मथुरेला कृष्णाला कोणत्या निमित्तानें आणवावा याबद्दल कंसहि आपल्या दानवमित्रांच्याबरोबर विचार करीत होताच. कंसानें आपल्या केशी नामक दानवसरदाराला, वृंदावनांत जाऊन कृष्णाचा युक्तिप्रयुक्तीनें नाश करण्याकारितां पाठवून दिला. केशी दैत्य फार क्रूर, मोठा पराक्रमी व अश्वयुद्धांत प्रवीण होता. गोकुळांतील गांवढळ कृष्णाचा आपल्या अश्वाच्या साहाय्यानें आपण सहज नाश करूं, असें त्यानें कंसाला सांगितलें; आणि तो आपल्या तुफान अश्वांसह गोकुळाकडे चालता झाला. केशीच्या अश्वयुद्ध-नैपुण्यावर कंसाचा विश्वास होता, पण कृष्णाचे अनेक पराक्रम त्याच्या कानावर आले असल्यानें केशीला यश मिळेलच, अशी त्याची खात्री नव्हती. म्हणून त्यानें मल्लविद्येंत प्रवीण असलेल्या महाबलाढ्य मुष्टिक चाणूरादि पहिलवानांना बोलावून आणलें व म्हटलें, " हे वीरहो, तुम्ही मल्लविद्येंत पूर्ण प्रवीण आहां. नंदाच्या गोकुलांत वसुदेवाचे

मुलगे राम व कृष्ण हे राहात आहेत. त्यांच्यापासून मला मृत्यु आहे असें भविष्य आहे. कांहीं तरी उपायानें मी त्यांस येथें आणण्याची व्यवस्था करीत आहें. तुम्ही त्यांच्याशीं कुस्ती करून त्यांना ठार करा. एका मोठ्या पटांगणांत सर्व लोकांनीं खेळ पाहाण्यास यावें, म्हणून मी एक सुंदर जागा तयार करविणार आहें. या कुस्तींत तुम्ही यश संपादन करून लोकांकडून चांगली शाबासकी मिळविली पाहिजे, हें लक्षांत ठेवा. आजपर्यंत तुमचें कांहींहि उणें पडूं न देता तुम्हाला ऐषआरामांत पदरीं बाळगण्याचें चीज करून दाखविण्याची तुम्हांला उत्कृष्ट संधि आली आहे. रामकृष्णांना कुस्तींत ठार करून तुम्ही दिगंत कीर्ति संपादन करा व मला—तुमच्या धन्याला—निर्भय करून सोडा.''

आपल्या दानवमल्लांना असें सांगून झाल्यानंतर कंसानें, गजेंद्राप्रमाणें मस्त व डौलदार कुवलयापीड नांवाच्या आपल्या हत्तीच्या माहुतास बोलावून आणिलें व त्याला म्हटलें, "माझा तुझ्यावर मोठा भरंवसा आहे. तूं कुवलयापीडाला मस्तीला आण. आणि रामकृष्ण पटांगणाच्या तोंडाशीं येतांच तूं कुवलयापीडाला त्यांच्यावर लोट आणि त्या माझ्या शत्रूंना यमसदनाला पाठव." भोजमंत्र्यांच्यावरचा कंसाचा विश्वास उडाल्यामुळें राज्यकारभारांत त्यांच्याबरोबर काम करण्याकरितां म्हणून त्यानें आणखी महादुष्ट दानव प्रधानहि नेमिले होते. त्यानें आपल्या सर्व प्रधानांना बोलावून आपला बेत सांगितला. कंस त्यांना म्हणाला, "मथुरेच्या राज्याचे तुम्ही आधारस्तंभ आहां. माझा बेत उत्तम तऱ्हेनें पार पाडून तुम्ही राज्याला बळकटी आणा. विधिपूर्वक धनुर्याग करण्याचा बेत मी करीत आहें व तो प्रेक्षणीय धनुर्याग पाहाण्याच्या निमित्तानें रामकृष्णांना मथुरेंत आणण्याची मी व्यवस्था करणार आहें. ह्या धनुर्यागाची व तन्निमित्त कुस्तींच्या दंगलीची तुम्ही अशी उत्तम व्यवस्था ठेवा कीं तो याग पाहावयास येणाऱ्या रामकृष्णांचा नाश करण्याचा माझा बेत सिद्धीस गेला पाहिजे. येत्या चतुर्दशीस धनुर्यागाचा बेत ठरवा. भगवान शंकराकरितां यज्ञामध्यें पशूंचे बळी द्या. तो भक्तांस वरदान देण्याला समर्थ आहे. त्याच्या कृपेनें आमचे मनोरथ पूर्ण होतील." ही कंसाची आज्ञा

होतांच भोजमंत्री व दानव मंत्री यांची बैठक होऊन, पुढील सर्व व्यवस्थे-संबंधीं खल झाला. धनुर्याग व कुस्त्यांची दंगल यांची व्यवस्था करण्याचें काम क्रूर दानव प्रधानांनीं आपल्याकडे घेतलें, आणि नगररक्षणाचें व त्यासंबंधीं सैन्याची व्यवस्था करणें, वगैरे सर्व काम त्यानीं भोजमंत्र्याकडे सोंपविलें. भोजमंत्र्यांनाहि तेंच पाहिजे होतें.

देवकाला अथवा त्याच्या पुत्राला राज्य मिळवून देण्याच्या कारस्थानांत वसुदेवादि सर्व यादववीर भोजांना सहजच अनुकूल झाले होते. रामकृष्ण हे वसुदेवाचे पुत्र असून वसुदेवावर नीट नजर ठेवा, अशी त्यांना कंसाची आज्ञा होतांच भोजमंत्र्यांनीं वसुदेवाजवळ त्या गोष्टीच्या खरेपणाबद्दल चौकशी केली. मुत्सद्दी वसुदेवानें ती गोष्ट एकदम नाकारून, कंसाचा हा भलताच समज कोणीं तरी करून दिला असला पाहिजे असें सांगितलें. पण तुमच्या पुढील बेतांत यश येण्याकारितां तुम्ही कंसाज्ञेप्रमाणें माझ्यावर नजर ठेविण्याची कामगिरी करीत असल्याचा देखावा दाखवा, असेंहि त्यानें भोजमंत्र्यांस सांगून टाकलें.

धनुर्यागाची व तन्निमित्त कुस्त्यांची दंगल करण्याची कल्पना काढून कंसानें ह्या दोन समारंभांच्या जाळ्यांत कृष्णाला पकडून त्याचा नाश करण्याची तयारी जोरांत चालविली. आतां कृष्णाला धनुर्यागाचें निमंत्रण पाठवून, तो मथुरेंत येईल अशी व्यवस्था करण्याचें मुख्य व महत्त्वाचें काम राहिलें. तें कोणाला सांगावयाचें ह्याचा कंसानें विचार चालविला. प्रसिद्ध सात्वत वंशांत दुसरा वृष्णि नांवाचा एक भाग्यवान् राजा होऊन गेला. त्याचे दोन पुत्र, एक श्वफल्क व दुसरा चित्ररथ या दोन्ही पुत्रांपासून वंशविस्तार मोठा झाला. चित्ररथाच्या वंशांतील आठव्या पिढींत महान् पराक्रमी व मुत्सद्दी वसुदेव झाला. त्याच वेळीं श्वफल्काच्या कुळांतहि अक्रूर नांवाचा एक मुत्सद्दी पुरुष निर्माण झाला होता. चित्ररथाच्या वंशांत झालेल्या शूरसेनानें, मथुरेचें राज्य भरभराटीस आणून, त्याचा पुष्कळ काळ उपभोग घेतला हे आपण ह्या चारित्रांतल्या दुसऱ्या प्रकरणांत पाहिलेंच आहे. श्वफल्काला व त्याच्या पुढील पिढ्यांना हें राज्यसुख मिळालें नाहीं. त्यामुळें श्वफल्क व चित्ररथ यांच्या पिढ्यांत एक प्रकारचें

मत्सरी वैमनस्य गुप्तपणें वाढत होतें. पुढें चित्ररथाच्या कुळांतून ही राज्यलक्ष्मी अंधक कुळांत गेली. तरी ह्या दोन पिढ्यांतील वैमनस्य कांहीं नाहींसें झालें नाहीं. राजकारणी, मुत्सद्दी वसुदेवानें देवकी आदि देवककन्यांशीं विवाह करून राजकुळाशीं संबंध जोडला, तर मुत्सद्दी अशा अक्रुरानेंहि कंसाची आत्या आहुकी, हिच्याशीं लग्न करून, वसुदेवाप्रमाणेंच राजकुळाशीं संबंध जोडला. आपल्याच यादव घराण्यांतील दुसऱ्या शाखेशीं द्वेष करण्याच्या भरांत, ह्याच अक्रुरानें भोजमंत्र्यांना, उग्रसेनकंसांना राज्य मिळवून देण्याच्या कामीं मदत केली होती, हेंहि आपण दुसऱ्या प्रकरणांत पाहिलें आहे. कृष्णाचा, वसुदेवाच्या मुलाचा, नाश करण्याच्या कामांत अक्रुराचें आपल्याला साहाय्य मिळेल, अशी कंसाला खात्री होती. कांट्यानेंच कांटा काढावा; अक्रूर, वसुदेव, यांच्या घराण्यातील यादवीचा फायदा आपण करून घ्यावा, असें ठरवून कंसानें अक्रुराला बोलावून आणिलें.

राम, कृष्ण, हे वसुदेवाचे पुत्र असल्याचें आपल्याला खात्रीलायक समजलें आहे, देवकीच्या आठव्या पुत्राच्या हातून आपल्याला मृत्यु येणार हें भविष्य खरें व्हावें म्हणून वसुदेवानें देवांच्या मदतीनें कारस्थान करून ह्या पुत्रांना आपल्या हातीं लागूं न देतां गोकुळात नेऊन त्यांना वाढविलें, वगैरे गोष्टी कंसानें अक्रुराला सांगितल्या. नंतर अक्रुराचा हात मोठ्या स्नेहपूर्वक आपल्या हातांत धरून कंस म्हणाला, " हे अक्रुरा, तूं दाते लोकांत प्रसिद्ध आहेस; तुझ्याजवळ मला थोडीशी याचना करायाची आहे. परंतु त्यापूर्वी मी तुझा मित्र आहें असें तूं कबूल केलें पाहिजेस. भोजकुलांत किंवा वृष्णिकुलांत तुझ्याइतका कोणावरहि माझा विश्वास नाहीं. म्हणून माझ्या नाजूक कामांत तुझाच आश्रय करावा असें मीं ठरविलें आहे. इंद्र जसा विष्णूच्या मदतीनें आपलें काम करून घेतो, तसें तुझ्या मदतीनें मी हें काम साधणार आहें. मग सांग तर, माझा जिवलग विश्वासु स्नेही म्हणून तुझ्याजवळ मी एक याचना करूं का ?"
कंसासारखा मोठा बलाढ्य, दानवेन्द्राच्या तोडीचा पराक्रमी राजा, आपल्याला जिवलग स्नेही, विष्णूच्या तोडीचा पराक्रमी व मुत्सद्दी समजून

इतक्या लाघवीपणानें आपल्याशीं बोलत आहे, हें पाहून अक्रुराला धन्यता वाटली. त्यानें आनंदानें कंस सांगेल तें काम करण्याचे कबूल केलें.

कंस गौरवपूर्वक त्याला म्हणाला, " अक्रूरा माझी इच्छा ऐक. तूं गोकुलात जाऊन तेथें वसुदेवपुत्र रामकृष्ण आहेत, त्यास शक्य तितक्या लवकर या माझ्या रथांतून इकडे घेऊन ये. विष्णु, इंद्र आदिकरून देवांनीं त्यांजकडून मला मृत्यु आणविण्याचें ठरविलें आहे. तो त्याचा बेत सपशेल फसविण्याकारितां, तूं नंदादि गोपासह त्यांस घेऊन आलास, तर मोठी बहार होईल. कर्दनकाळासारखा भासणारा आमचा कुवलयापीड नांवाचा हत्ती मीं त्यांच्या घाताकरितां तयार ठेविला आहे. बहुतेक ते त्याच्या तडाख्यांतून वांचणार नाहींतच. जर वांचलेच तर, मीं किती तरी दुसरे उपाय योजिले आहेत. आमच्या वज्रदेही मल्लाकडून त्यांचा वध करविणें मला मुळींच कठीण नाहीं. त्यांचा नायनाट झाला म्हणजे वसुदेव व त्याचे बंधु ठार करून मी मोकळा होईन. नंदादि गोपाळांची तर माझ्या सैन्याकडून धुळधाण उडवीन. म्हणजे कोणापासून मला भय म्हणून बाळगावयाला नको. एवढेंच काय, पण याच्याहि पुढची माझी तयारी ऐकशील तर माझ्या दूरदर्शीत्वाबद्दल तुला कौतुकच वाटेल. आमचे म्हातारेबुवा वडील उग्रसेन यांचें आतां जगांत काय काम आहे ! त्यांना अजून राज्यलोभ सुटत नाहीं. ते भोज व यादव सरदारांचे मदतीनें सिंहासनावर फिरून बसण्याचें कारस्थान करीत आहेत, असें माझ्या कानीं आलें आहे. म्हणून देवक नामक त्याच्या वडील भावासह मी त्यांना रामकृष्णांच्या वाटेलाच पोंचविणार आहें. मग माझे उरलेले शत्रू माझ्यापुढें किती वेळ टिकाव धरतील ? बिचाऱ्यांना एका क्षणात चिरडून टाकीन. या शत्रूंच्या अभावीं पृथ्वीचें निष्कंटक राज्य मला उपभोगावयास सांपडेल. या कामीं माझे श्वशुर सम्राट् जरासंध मला साहाय्य करणार आहेत. शिवाय शंबर, नरक, बाण इत्यादि माझे परम मित्र मला मदत केल्याशिवाय कसे राहतील ? ते पराक्रमी राजे असून, फार दिवसांचा त्यांचा माझा स्नेह आहे. त्यांचेंहि देवपक्षाशीं हाडवैर आहेच. देवपक्षाकडील राजे जिंकल्यावर, मला कोणाची डर राहणार नाहीं. अक्रूरा,

माझ्या मनांतील हे सर्व गुप्त विचार मीं तुला कळविले आहेत. तर धनुर्याग आणि आमची सुंदर राजधानी, हीं पाहाण्याच्या निमित्तानें त्या रामकृष्णांना लवकर घेऊन ये. तूं आपल्या मधुर वाणीची त्यांच्यावर भुरळ घाल आणि त्याना इकडे घेऊन येण्याचें मुख्य व नाजुक कार्य साध. अक्रूरा, आमची पुढील सर्व कार्यसिद्धि तुजवर अवलंबून आहे हें लक्षांत ठेव." कंसानें अशा प्रकारें अक्रुराचा गौरव करून त्याला गोकुळांत जाण्यास सांगितलें, व आपल्या प्रधानमंडळीसहि सांगितलेली कामागिरी सावधपणें करण्याबद्दल फिरून सूचना दिली.

अश्वांच्या साहाय्यानें युद्ध करण्यात निपुण असलेल्या केशी नामक दैत्याला कंसानें गोकुळावर पाठविल्याची अगाऊ सूचना भोजमंत्र्यांनीं रामकृष्णांना दिली. केशीचें स्वागत करण्याला रामकृष्ण तयार होऊन राहिले. केशी दैत्याबरोबर येणाऱ्या शिकाविलेल्या तुफान घोड्याना उधळून लावण्याकरितां, सर्प राजाकडून मिळाविलेल्या, प्रचंड वणव्याचा भास उत्पन्न करण्याच्या विद्येचा, रामकृष्णानीं उपयोग करण्याचें ठरवून ठेविलें. केशी आपले शिकाविलेले शेंकडों तुफान घोडे बरोबर घेऊन व त्यांतल्याच एका तुफान घोड्यावर बसून घोड्याच्या रक्षकगणासह निघाला. गोकुळासारख्या लहान खेड्याची आपल्या इशाऱ्याबरोबर आपले तुफान घोडे नासधूस करून टाकतील व शिकविलेल्या पद्धतीनें त्यांनीं उड्या मारून आपल्या भयंकर टापांनीं दुगाण्या झाडण्याचें काम सुरू केलें, कीं त्यांच्या लत्ताप्रहारांत रामकृष्णासह सर्व गोपांचा निकाल लागेल, अशी त्याची खात्री होती. केशी आपल्या अश्वसेनेसह यमुनेचा उतार उतरून, गोकुळाच्या परिसरांत दिवस मावळण्याच्या सुमारास आला. गोकुळ दोन मैल लांब राहतांच, केशीनें आपल्या अश्वसेनेला इशारा दिला. त्याबरोबर ते घोडे इतक्या वेगानें धांवत सुटले, कीं त्यांनीं हां हां म्हणतां गोकुळ गांठलें. त्याच्या टापांनीं उधळलेल्या धुळीनें सर्व आकाश भरून गेलें. त्यांच्या खेंकाळण्यांनीं, गोकुळांतील लोकांना रामकृष्णांनीं आधींच सूचना देऊन ठेवली नसती तर, त्यांची गाळणच उडाली असती. गोकुळांत केशी अश्वसेनेसह येऊन पोहोंचला मात्र, गोकुळ भयंकर वणव्यांत सांपडल्याचा

त्याला भास झाला. वणवा पाहून घोडे बुजले व उधळले. ते मागें परतले तों आलेल्या मार्गावर व आपल्या आजूबाजूस आगीच्या ज्वाळा पाहून त्यांची भयंकर दाणादाण झाली. जीव घेऊन पळत सुटलेले ते तुफान घोडे यमुना नदींत असलेल्या खोलच खोल डोहाच्या मार्गाला लागले. केशीची शिकवणूक, त्याचे इशारे, सर्व फुकट गेलें. त्यात अंधारातून गोपाळांनीं त्याच्यावर बाणांचा वर्षाव केला. केशी बसलेल्या घोड्याच्या मर्मस्थानीं रामकृष्णाचे भाले लागताच, त्याने जमिनीवर लोळण घेतली. केशी खालीं पडताच कृष्णानें आपल्या पट्टयानें त्याचें मस्तक उडविलें अशा रीतीनें कृष्णाचे दर्शन होतें न होते तोच, केशीचा नाश झाला. अग्निभयाने उधळलेले घोडे डोहाच्या अथाग पाण्यात सापडले. त्यांचे तीर गांठण्याचे प्रयत्न, त्यांच्या पाठीमागें लागलेल्या गोपाच्या शरवर्षावानें व दगडाच्या माऱ्यानें विफल होऊन त्याना जलसमाधि मिळाली. बहुतेक अश्वरक्षकांचाहि गोपाळांनीं निकाल केला. फक्त दहा पाच रक्षक केशीच्या नाशाची बातमी सागण्याकरिता मथुरेच्या मार्गास जाऊं शकले. कृष्णानें चातुर्यानें पेरून ठेवलेल्या अग्निभासाने अशाप्रकारे गोकुळावर आलेल्या केशी दैत्याचें अरिष्ट टळले.

इकडे मथुरेत धनुर्यागाची तयारी पूर्ण झाली. कंसानें ती तयारी पाहून समाधान व्यक्त केलें. रामकृष्णांवर हल्ले करण्याच्या जागा जशा कंसाने मनानें ठरविल्या होत्या, तशाच त्या तयार झाल्या होत्या. रामकृष्ण अपघातांत सापडून ठार झाले, असें शक्य तर जगाला दाखवावें, असा कंसाचा बेत होता. समारंभाचें प्रवेशद्वार फारच भव्य व सुशोभित केलें होतें. ह्या प्रवेशद्वाराजवळ मदोन्मत्त कुवलयापीड हत्तीची योजना केली होती. रामकृष्ण जवळ येतांच त्यांच्यावर मोहरा करून त्याने एकदम कसे चालून जावयाचें, त्याचें शिक्षण माहुत त्यास देत होता. प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर एका बाजूला धनुर्यागाचा भव्य व विस्तीर्ण मंडप व दुसऱ्या बाजूला कुस्त्यांच्या दंगलीकारितां वर्तुळाकार मोठा आंखाडा तयार केला होता. आंखाड्याच्या सभोंवार दंगल पाहण्यास येणाऱ्या लोकांना बसण्याकारिता लहान मोठ्या उंच सखल जागा तयार केल्या होत्या. त्या जगांत निरनिराळ्या दर्जाच्या

लोकांकारितां सुंदर सुंदर आसनें मांडिलीं होतीं. जागोजाग कमानी बांधून त्यांवर तोरणें लटकत ठेविलीं होतीं. अनेक रंगांचीं निशाणें चोहोंकडे फडकत होतीं. हा अपूर्व समारंभ पाहण्याकारितां, मल्लविद्येची आवड असलेले फार दूर दूरचे लोक नगरांत जमले होते. कंसमहाराजांचे मांडलिक राजे आपापल्या लव्याजम्यानिशीं समारंभास आले होते. समारंभाची जय्यत तयारी झालेली पाहून, कंसाज्ञेने कंसाचा रथ घेऊन अक्रूर रामकृष्णांना आणण्याकारितां गोकुळाकडे निघाला. अक्रुराला निरोप देताना कंस म्हणाला, "अक्रूरा, तूं गोकुळास जातोस तोंच, रामकृष्णाचा माझ्या केशी दैत्यानें नाश केल्याचेंहि तुझ्या दृष्टीस पडेल. दुर्दैवानें तसें कांहीं झालें नसलें, तर युक्तीनें निमंत्रण करून रामकृष्णांना ह्या रथांतून घेऊन ये. वाटेंत तूं आपल्या चातुर्यानें त्यांचा निकाल लावलास तर फारच बहार होईल. पण तसे साधलें नाहीं तर त्यांना तूं येथें घेऊन आल्यावर त्यांचें चंदन करण्याची कशी तयारी करून ठेविली आहे, हें तूं आपल्या डोळ्यांनीं पाहिलेंच आहेस. रामकृष्णांच्या बरोबर नंदादि गोपाल येतील, अशी युक्ति जरूर कर. जा, यशस्वी होऊन ये."

कंसाचा निरोप घेऊन अक्रूर कंसाच्या खास रथांतून गोकुळाकडे जाण्यास निघाला. आपल्या ठरलेल्या मृत्यूला आपल्यापर्यंत आणण्याकरितां आपल्या स्वतःचा रथ पाठविण्याची कुबुद्धि कंसाला झाली! अटळ विधिलिखित तें हेंच! मथुरेपासून थोडा दूर जातो न जातो तोंच अक्रुराला केशी दैत्याची धुळधाण उडाल्याची हकीगत, जीव घेऊन पळत आलेल्या अश्वरक्षकांकडून कळली. अक्रुराच्या मनाला भीतीचा धक्का बसला. अक्रुरानें आतांपर्यंत इतरांप्रमाणेंच कृष्णाची कीर्ति ऐकिली होती. त्याला त्यानें प्रत्यक्ष पाहिलाच नव्हता. नंदगोपाचा एक आडदांड मुलगा, इतकीच कृष्णाबद्दल त्याची कल्पना होती. वसुदेव व वसुदेवाचें घराणें यांबद्दल परंपरागत धुमसत असलेली वैरबुद्धि, अक्रुराच्या अंगीं तर उत्कटत्वानें वास करीत होतीच. त्यांत कंसाच्या तोंडून रामकृष्ण हे वसुदेवाचे पुत्र असें कळल्यापासून रामकृष्णांबद्दलहि त्याच्या मनामध्यें द्वेषाग्नीनें संचार केला. रामकृष्णांचा नाश करणें म्हणजे आपल्या पिढी-

जात वैऱ्याला—वसुदेवाला—परमावधीचें दुःख देण्याचा आनंद उपभोगणें ही भयंकर क्रूरवृत्ति अक्रुराच्या अंतःकरणांत थैमान घालीत होती. गोकुळाकडे जातांना रामकृष्णांबद्दल त्याचे विचार काय चालले असतील, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. त्यांत केशीसारख्या भयंकर दैत्याची रामकृष्णांनीं कशी दुर्दशा केली, हें त्याच्या अश्वरक्षकांच्या तोंडून ऐकतांच, अक्रुराचें मन बेचैन झालें. आपला कार्यभाग साधणें फार कठीण आहे, असें त्याला वाटूं लागलें. रामकृष्ण प्रत्यक्ष दृष्टीस पडतांच आपल्या मनाची काय स्थिति होईल, त्यांच्या बद्दलचा आपला खरा भाव मनांतल्या-मनात दडपून टाकून व चेहऱ्यावर उसनी प्रसन्नता आणून, मानभावी-पणाचें बोलणें आपल्याला कितपत साधेल, पराक्रमाप्रमाणेंच रामकृष्णां-च्या अंगीं वसुदेवाचें चातुर्यहि उतरलें असल्यास त्यांच्या भेदक दृष्टीपुढें आपलें कपट-नाटक किती वेळ टिकेल, अशा विचारांनीं मनात काहूर माजलें असतानाच, यमुनेच्या तीरावर अक्रुराचा रथ येऊन पोहोंचला.

अक्रूर रथातून खालीं उतरला. यमुनेच्या पवित्र जलाचा नेत्रास स्पर्श करून त्यानें आचमन केलें. यमुनेला वंदन करून उतारावरून रथ पर-तीराला नेण्याकारितां तो रथाजवळ आला, इतक्यांत नारदमुनि त्या ठिकाणीं प्राप्त झाले. अक्रुरानें वंदन करून त्यांना रथांतील उच्चासना-वर बसण्याची विनंति केली. त्याच्या विनंतीप्रमाणें आसनावर बसून नारद म्हणाले, "अक्रूरा, कंसाच्या आज्ञेप्रमाणें तूं रामकृष्णांना धनुर्याग पाहण्याकारितां बोलावणें करण्यासाठीं गोकुळास चालला आहेस हें मी जाणलें. रामकृष्णांना बोलावणें करण्यांत कंसाचा हेतु शुद्ध नाहीं, हेंही मी जाणतों. रामकृष्ण हे वसुदेवाचे पुत्र आहेत, असें कंसानें तुला सांगि-तल्यावर त्यांना मथुरेला नेण्यांत वसुदेवाला दुःख होईल अशी एकादी गोष्ट तूं साधणार असल्यास त्यांत मला नवल वाटणार नाहीं. पण तुला तुझ्या हिताचे चार शब्द सांगावे, अशी माझी इच्छा आहे. माझ्या सांगण्याप्रमाणें वागण्याची तुला बुद्धि झाल्यास, तूं मोठा भाग्यवान् ठरशील. नाहींतर कंसाच्या दुष्ट संगतीनें दुर्दैव तुझ्या पाठीस लागलें आहेच. अक्रूरा, तूं वसुदेवाला आपला वैरी समजतोस. तुम्ही दोघेहि

वृष्णिकुळातील यादव. मग तुमच्यामध्यें वैर का असावें ? कंसाने आपले दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याकरिता तुला हाताशीं धरले आहे. पण तुम्हां वृष्णिकुळातील यादवाची त्याने काय दैना उडविली आहे, हे तुला कसें दिसत नाहीं, कोण जाणे ! आपसातील वैर साधण्याकरिता मतलबी भोजाच्या नादी लागून, तूं दुष्ट कंसाला अनुकूल झालास ! पण ध्यानात ठेव, स्वजनद्रोहासारखे मोठे पातक नाहीं.

" आपले काम होताच अलीकडे कंस भोजाना मानीनासा झाला आहे, हे तूं पाहतो आहेस. पण भोज एकजुटीने उभे असल्याने कंस त्याचे फारसे अहित करूं शकत नाही. उद्या तुझें काम सपतांच कंस तुला हाकलून देईल त्यावेळीं तुझी स्थिति काय होईल ह्याची तूं कल्पना कर. स्वजन-द्रोही ठरल्यामुळे तूं स्वजनाना पारखा होशील. मतलबी भोजानीं तुला त्याच्या कामापुरता, म्हणजे त्याच्या फायद्याकारिता उग्रसेनाला राज्यप्राप्ती होईपर्यंत हातीं धरला होता. ते तुला खासच दूर ढकलतील. अक्रूरा, वसुदेवाप्रमाणेच तुला लोक मुत्सद्दी समजतात. मला मात्र थोडी शंका वाटूं लागली आहे. कंसाच्या छळामुळे ठिकाठिकाणीं पांगलेला यादवसमाज मुत्सद्दी वसुदेवाच्य पाठीमागें असून एकत्र येण्याकारिता त्याच्या इशाऱ्याची वाट पाहात आहे, हे माहीत असल्यानें वसुदेवाने कंसाची एवढी आगळीक केली असतांनाहि वसुदेवाच्या जिवाला अपाय करण्याची कंसाची छाती होत नाहीं, हें तू थोडे डोळे उघडून पाहशील तर तुला दिसेल. अक्रूरा, रामकृष्णासारख्या पुत्रांना गोकुळासारख्या स्वतंत्र वातावरणात वाढविल्याने ते कसे पराक्रमी निपजतात हे सर्व जगाला दाखविणारा मुत्सद्दी, पराक्रमी वसुदेव तुझ्या कुळातला, तुझा आप्त असताना, त्याला तूं आपला वैरी समजून त्याचा घात चिंतितोस. त्याच्या मुत्सद्दीपणाला व पराक्रमाला रामकृष्णासारख्या तेजस्वी पुत्राची जोड मिळाली, तर तुम्हां यादवापुढें कंसाची व त्याच्या दुष्ट सहकाऱ्यांची कशी देमाय धरणी ठाय, अशी स्थिति होईल, हें तुला कल्पनेनें दिसत असतानाहि त्या रामकृष्णांचा घात करण्याची तूं इच्छा करावीस आणि दुष्ट कंसाला कवटाळायला धांवावेंस, हें नवल नव्हे काय ? अक्रूरा, रामकृष्णांना तूं

प्रत्यक्ष पाहिलें नाहींस. असे सुंदर मनमोहक, देखणे मुलगे पाहायलाहि मिळायचे नाहींत. कृष्णाकडे पाहाताच तर तूं इतका मोहून जाशील कीं तुझी तहानभूकहि हरपेल. प्राचीन ऋषि–मुनि आपल्या ग्रंथातून सौंदर्याची देवता म्हणून मदनाची स्तुति करतात. तो मदन कसा असेल, ह्याची कल्पना कृष्णाकडे पाहून तुला होईल. अयोध्यावासी रामाची, तुम्ही अत्यंत तेजस्वी म्हणून कीर्ति गाता. गोकुळवासी कृष्णाकडे पाहाताच तोच श्रीराम गोकुळात कृष्णरूपाने मूर्तिमंत अवतरला आहे, असा तुम्हांला भास होईल. धनुर्धर रामाच्या पाठीमागें त्याचा शरीररक्षक म्हणून त्याचा धाकटा भाऊ पराक्रमी लक्ष्मण, त्याच्या सावलीप्रमाणे हिंडत होता. कृष्णाच्या पाठीमागे त्याचा शरीररक्षक म्हणून त्याचा वडील भाऊ महाबलाढ्य बलराम, तसाच शोभतो आहे, असे तुम्हाला दिसेल. रामकृष्णाच्या सौंदर्याचे, रामकृष्णाच्या पराक्रमाचे, रामकृष्णाच्या गोड स्वभावाचें, मुक्तकंठाने वर्णन करण्याचा मोह माझ्यासारख्या सर्वसंग–परित्याग केलेल्या वनवासी तपस्व्यालाहि आवरत नाहीं. अक्रूरा, तुझ्यासारखा त्यांचा आप्त, गृहस्थाश्रमी, रसिक मनुष्य, त्यांचें दर्शन होताच अभिमानाने त्याचा भाट बनेल, ह्याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. हे रामकृष्ण तुम्हा यादवाची कीर्ति, आपल्या पराक्रमानें, आपल्या चातुर्यानें, आपल्या मुत्सद्दीपणाने व जगाला थक्क करून सोडणाऱ्या आपल्या ज्ञानाने अजरामर करतील, अशी अक्रूरा, तूं खात्री बाळग आणि ह्या वेळीं त्यांना तुझ्या हातून करवेल तितके सहाय्यच कर. तुमच्या परंपरागत निष्कारण वैराला ह्या यमुनेच्या पवित्र जलांत समाधि देऊन त्या यादव–कुलदीपक रामकृष्णावर प्रेम करायला लाग. वरकरणीं कंसाचा दूत म्हणून तूं जा. पण अतःकरणातून त्याचा हितचिंतक, पाठीराखा, भक्त बनून त्याच्यावर येणाऱ्या संकटांची खडानूखडा त्याना माहिती करून दे. त्याचें रक्षण करायला ते समर्थ आहेतच. मथुरेत जातांच पराक्रमी वसुदेवाचा मुत्सद्दीपणा त्याचे रक्षण करण्याकरिता त्यांच्या सभोंवतीं फिरत असल्याचें तू पाहाशील. मतलबी भोजाचीहि सहानुभूतिपूर्वक मदत त्यांनाच मिळालेली तुझ्या दृष्टीस पडेल. रावणान्तकासारखा कंसान्तकहि

दिगंत कीर्ति मिळवील. त्याचा पाठिराखा, भक्त, सखा, होण्याची दुर्लभ संधि अनायासें तुझ्याकडे चालत आलेली आहे. कृष्णाबरोबरच त्याचा भक्त म्हणून अक्रूरहि अजरामर होईल. 'यादव कुळाचा तुमच्यामुळें उद्धार होवो.' असा, अक्रूरा, मी तुम्हांला आनंदानें आशीर्वाद देतों."

आशीर्वाद देऊन नारद निघून गेले. तळमळीनें केलेल्या त्यांच्या उत्साहपूर्ण तेजस्वी भाषणाचा सुपरिणाम झाला. रामकृष्णांचा द्वेष्टा म्हणून यमुनेच्या ऐलतीरावर आलेला अक्रूर रामकृष्णांचा परमभक्त म्हणून यमुनेच्या पैलतीरावर आला व त्यानें रामकृष्णांना भेटण्याच्या उत्कंठेनें गोकुळाकडे आपला रथ भरधांव चालविला. अक्रूर गोकुळात पोंचण्या-पूर्वीच 'गोपमल्लांसह अक्रुराबरोबर मथुरेला अवश्य या' असा वसुदेवाचा व त्याच्या पाठोपाठ भोजमंत्र्यांचा निरोप रामकृष्णांना जाऊन पोहोंचला होता. ते गोकुळच्या प्रवेशद्वाराजवळ आपल्या गोपमित्रासह अक्रुराची वाट पाहात होते, पण वरकरणीं खेळ खेळत होते. अक्रुराचा रथ दिसूं लागतांच रामकृष्णाची जोडी, गोपमित्राना तेथेंच राहा, असें सांगून रथाकडे धांवत चालली. रथांतून अक्रुरालाहि गोपाळांचा चाललेला खेळ दिसूं लागतांच त्या मेळाव्यांतच रामकृष्ण आपणास पाहावयास सांपडतील असा विचार त्याच्या मनांत आला. 'रावणान्तक प्रभु रामचंद्र कृष्णरूपानें गोकुळांत अवतरल्याचा तुला भास होईल' हे नारदांचे शब्द त्याला आठवले, आणि क्षणमात्रात प्रभूचीं कितीतरी रूपें त्याच्या मनःचक्षूपुढें चमकून गेलीं. कृष्ण हा रावणान्तक राम असेल, तर तोच हिरण्यकशिपूला चिरून टाकणारा प्रल्हादप्रिय नारसिंह असला पाहिजे, बलिराजाला आत्मज्ञानानें मंडित करून पाताळचें राज्य बहाल करणारा तेजस्वी बटु वामनहि तोच असला पाहिजे, उन्मत्त राजे लोकांना आपल्या पराक्रमानें ताळ्यावर आणून व ब्राह्मण-क्षत्रियांना मार्गदर्शन करून, वर्णाश्रमाची घडी नीट बसविणारा भयंकर परशु धारण करणारा तेजस्वी परशुरामहि हाच असेल. सर्वसाक्षी दयाळु भगवानाचें आज रामकृष्ण यांच्या रूपानें आपल्याला दर्शन होणार ही कल्पना डोक्यांत येतांच अक्रुराच्या अंगावर रोमांच

उभे राहिले. ऋषिमुनींच्या तोंडून ऐकलेलें भगवानाचें रूप अंतःचक्षूंना दिसूं लागलें तोंच रथाकडे धांवत येणारी जोडी दृष्टीस पडतांच, आपल्या अंतःकरणांतलें रूपच बाहेर प्रगट झाल्याचा भास होऊन, अक्रूर आपल्याकडे धांवत येणाऱ्या मूर्तींकडे टक लावून पाहूं लागला. त्याच्या हातांतले घोड्यांचे लगाम सैल पडले. ती थांबण्याची सूचना समजून घोडे थांबले. रथ उभा राहिला. अहाहा! धांवत येणाऱ्या जोडीच्या सौंदर्यानें, त्यांच्या वेषानें, त्यांच्या तेजस्वी पाणीदार डोळ्यांनीं, त्यांच्या डौलदार धांवण्याच्या गतीनें, अक्रूर मोहून गेला.

कृष्णानें उत्तम उंची पीत वस्त्र, आणि बलरामानें नील वस्त्र धारण केलें होतें. शरत्कलातील कमलाप्रमाणें त्याचे नेत्र सतेज दिसत होते. कृष्णाचा वर्ण सांवळा व बलरामाचा वर्ण गोरा होता. त्यांचीं मुखें सुहास्य व प्रसन्न असून भ्रुकुटि, नाक, कान, कपोल इत्यादि अवयव जेथल्या तेथें रेंखल्याप्रमाणें भासत होते. बाहु पुष्ट व लांब, वक्षस्थल रुंदट, कंठ शंखाच्या आकाराचे, कंबर बारीक, हत्तीच्या सोंडेसारख्या मांड्या, गुडघे व पिंढऱ्या सतेज, पायाचे घोटे थोडेसे फुगीर असून, नखावर अरुणकांति विलसत होती. गळ्यांत आपादलंबी वनमाळा होत्या. मस्तकांवर पुष्प-मुगुट शोभत होते. हत्तीच्या छाव्याप्रमाणें ते पराक्रमी असावेत असें पाहतां क्षणीं वाटे. अशी ती तेजस्वी जोडी पाहून अक्रूर देहभान विसरला. नारदांनीं त्यांचें केलेलें वर्णन यथातथ्य आहे असें त्याला वाटलें. रथावरून खालीं उतरण्याकरितां तो उठणार तोंच चपल रामकृष्ण रथाच्या पुढल्या दोन्ही बाजूंनीं उडी मारून रथावर चढले, आणि अक्रूराच्या दोहों बाजूस दोघे लाडिवाळपणानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून उभे राहिले. कृष्ण सुहास्य करीत आपल्या फारच गोड गोड वाणीनें म्हणाला, "आमच्या नंदबाबांचे व वसुदेवबाबांचे जीवश्च कंठश्च स्नेही, आमच्या यादव कुलांतले आमचे परम आप्त, आमच्यावर प्राणापेक्षांहि प्रेम करणारे आमचे सुहृद अक्रूरजी, तुमचें स्वागत असो. तुम्हांला आम्ही वंदन करतों. मथुरेंत आमची देवकी माता व परमपूज्य पिताजी खुशाल आहेत ना! आमचे जातिबांधव आणि आप्तमित्र खुशाल आहेत ना! आज

आम्हाला तुमच्यासारख्या परम आप्ताचें दर्शन घडलें, हें आम्ही मोठें भाग्य समजतों. आपल्या यादव कुळाचा नाश करण्याचें हातांत कंकण बांधलेला आमचा दुष्ट मामा कंस जिवंत असेपर्यंत आमचे कोणी बांधव आम्हांला येऊन भेटतील ही आम्हाला आशाच नव्हती. अक्रूरजी, तुम्हांला पाहून आम्हाला किती किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं!'' असें म्हणून कृष्णानें व बलरामानें अक्रुराला प्रेमानें आलिंगन दिलें.

कृष्णाचें तें नितान्त मधुर आणि प्रेमळ भाषण ऐकून अक्रूर सद्गदित झाला. रामकृष्णांनीं त्याला लडिवाळपणानें आलिंगन देतांच तर त्याच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहून डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यानें रामकृष्णांना आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें. कांहीं वेळ त्याच्या तोंडांतून शब्दच फुटेना. सद्गदित कंठानें त्यानें कसेबसे शब्द उच्चारिले, "कृष्णा, रामा, तुमच्या दर्शनानें मी पुनीत झालों. तुमच्या आलिंगनानें, तुमच्या कृपास्पर्शानें, माझीं पातकें जळून गेलीं. कृष्णा, तुझें प्रेमळ मधुर भाषण ऐकून मी कृतार्थ झालों. गोकुळांत यादवकुलोद्धारक दैवी अंश निर्माण झाला आहे असें नारद म्हणाले. तुमची भेट होतांच मला त्यांच्या म्हणण्याचा अनुभव आला."

अक्रुराचें बोलणें ऐकून कृष्ण हंसून म्हणाला, "नारदमहर्षि दुसऱ्याच्या अंगीं असलेला गुणलेशहि गौरवून सांगतात; त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे तो! पण अक्रुरा, तुमचें गोकुळांत कां येणें झालें हें आम्हाला समजेल का?" अक्रूर म्हणाला, "कृष्णा, माझी तुमची पूर्वीची कांहींच ओळख नसतांना, मी अक्रूर मथुरेंत तुम्हाला भेटण्याकरितां आलों, हें ज्या सर्वज्ञतेनें तुम्हाला कळलें, त्याच दैवी सामर्थ्यानें मी कां आलों हेंहि तुम्हाला कळलें असलेंच पाहिजे. पण माझ्या तोंडून काढून घ्यावयाचें तुमच्या मनांत असेल तर सांगतों. मथुरेंत धनुर्याग व तत्संबंधीं कुस्त्यांची दंगल वगैरे मोठा समारंभ उद्यांपासून सुरू होणार आहे. 'तो समारंभ पाहण्याकरितां सर्व गोपाळांसह या' असें तुम्हांला निमंत्रण देण्याकरितां व तुम्हांला घेऊन येण्याकरितां कंसानें मला पाठविलें आहे. पण कृष्णा,

ह्या समारंभाचा उद्देश फारच वाईट असल्याकारणानें तें निमंत्रण स्वीकारून तुम्ही माझ्याबरोबर यावें, असें सांगण्याचा मला धीरच होत नाहीं. कंस महादुष्ट आहे. त्याच्या निमंत्रणावर विश्वास ठेवून मथुरेस चला, असें मी तुम्हाला सांगणार नाहीं." अक्रुराचें तें बोलणें ऐकून रामकृष्णांना हंसूं आलें. बलराम म्हणाला, "अक्रूरजी, तुम्ही गोकुळांत तर चला. आमच्या नंदबाबाच्याजवळ निमंत्रण द्या. मग आपण मथुरेला जावयाचें कीं नाहीं याचा विचार करूं. फक्त एक सावधगिरी ठेवा. मी आणि कृष्ण वसुदेव–देवकीचे पुत्र आहों, ही कंसानें तुम्हांला सांगितलेली गोष्ट मात्र नंदबाबांच्याजवळ किंवा दुसऱ्या कोणाहि गोपाळाजवळ बोलूं नका. चला." असें म्हणून बलरामानें घोड्याचे लगाम उचलले व घोड्यांना चालण्याचा इशारा दिला. घोडे भरधांव निघाले व हा हा म्हणतां गोकुळांत प्रवेशद्वाराजवळ रथ येऊन पोहोंचला. रामकृष्ण रथांत बसलेले पाहून गोपाळांनीं त्यांचा जयजयकार केला. अक्रुराकडे ते मोठ्या कुतूहलानें पाहूं लागले आणि मग नंदराजाच्या वाड्यापर्यंत जंगी मिरवणूकच निघाल्याचा भास झाला. गोपाळांचीं तीं चपल आणि पुष्ट शरीरें, त्यांचे सतेज चेहरे, त्यांची रामकृष्णाच्या ठिकाणची भक्ति पाहून अक्रुराला अचंबा वाटला. खेडवळ गौळ्यासंबंधीं त्यानें केलेली कल्पना कोठल्या कोठें पार नाहींशी झाली. वाड्यात पोहोंचतांच नंदराजानें मोठ्या आदरानें अक्रुराला रथावरून उतरून घेतला आणि मोठ्या थाटानें त्याचें आदरातिथ्य केलें. पाटावर बसवून त्यानें त्यास विधिपूर्वक अर्घ्य दिलें. पाहुण्याकारितां उत्तम स्वयंपाक करून त्याच्यासह सर्वांनीं कुशल प्रश्न विचारीत विचारीत सुग्रास भोजनविधि उरकला. नंतर पानसुपारी, अत्तर, गुलाब वगैरे झाल्यावर नंदानें म्हटलें, "अक्रुरा, तिकडे तुमचें बरें चाललें आहे ना? कंस फार दुष्ट आहे. त्याच्या कारकीर्दींत सुखाचा संभव फार थोडा, म्हणून मुद्दाम विचारलें. सर्व खरी हकिगत सांग. तूं गोकुळांत कोणत्या उद्देशानें आला आहेस तेंहि मनमोकळेपणानें सांग."

नंदाचें बोलणें ऐकून अक्रुरानें कंसाचें निमंत्रण निवेदन केलें व तो कंसाच्या दुष्टपणाबद्दल व त्या धनुर्याग समारंभाच्या पाठीमागें असलेल्या

भयंकर वाईट हेतूबद्दल आतां कांहीं सांगणार तोंच कृष्णानें त्याला न बोलण्याची खूण करून म्हटलें, "नंदबाबा, राजाकडून समारंभाकरितां आपल्याला मोठ्या आदरानें बोलावणें आलें आहे. आम्हालाहि राजधानीची शोभा पाहावयाची फार इच्छा आहे. म्हणून म्हणतों, आपण निमंत्रणाचा स्वीकार करून, तो समारंभ पाहाण्यास जाऊं या. समारंभ आटोपतांच आपण परत येऊं. कंसाचा दुष्टपणा कंसाबरोबर. आपल्याला त्याच्या राजधानींत नेहमीं थोडेंच राहावयाचें आहे!" झालें. लाडक्या कृष्णाची इच्छा कळतांच नंदानें रामकृष्णांसह सर्व गोपाळांना घेऊन मथुरेला जाण्याचें ठरविलें. सर्व गोपाळांनीं उद्यां आपापल्या घरांतील दहीं, दूध, तूप, इत्यादि व राजाला देण्यास योग्य असा इतर नजराणा घेऊन आमच्याबरोबर मथुरापुरीस निघावें अशी त्यानें सर्वांना आज्ञा दिली. रामकृष्णांबरोवर मथुरापुरीस जाण्याची नंदाची आज्ञा ऐकून, सर्व गोपाळांना मोठा आनंद झाला. नंद, राम-कृष्ण, यांच्या बरोबर पाहुणे म्हणून राजधानींत चार दिवस मोठ्या थाटांत आपल्याला मौज करण्यास सांपडणार, असें वाटून त्यांना हर्ष झाला. ज्यांना कृष्णाबरोबर मथुरेस समारंभासाठीं जाणें शक्य नव्हतें त्या गोपींना, अगदीं वृद्ध गोपाळांना, आपल्याला कांहीं काळ रामकृष्णांचा वियोग होणार, म्हणून वाईट वाटूं लागलें. रामकृष्ण व त्यांच्या बरोबरीचे गोपाळ मथुरेस गेले म्हणजे गोकुळ ओकें ओकें वाटणार, आपल्याला मुळींच करमणार नाहीं, असें वाटून गोपी अश्रू ढाळूं लागल्या. सर्वांनाच परमप्रिय असणारे राम-कृष्ण व आपलीं सोन्यासारखीं मुलें दुष्ट कंसाच्या राजधानींत जात आहेत, त्यांच्यावर कांहीं भलतासलता प्रसंग तो दुष्ट कंस आणणार नाहीं ना, असें मनांत येऊन त्या फारच व्याकुळ झाल्या. गोकुळाची नासधूस करावी म्हणून कंसाच्या दुष्ट राक्षसांनीं नुकताच कसा प्रयत्न केला हें त्यांच्या डोळ्यांपुढें होतें. गोकुळाचा नाश करूं इच्छिणारा कंस रामकृष्णांना व गोपाळांना आग्रहानें मथुरेला येण्याबद्दल बोलावणें करण्यासाठीं मुद्दाम मनुष्य पाठवितो, ह्यांत त्याचा हेतु कांहीं तरी वाईटच असला पाहिजे, असें त्या चलाख गोपींनीं ताडलें आणि मग तर त्यांना मुळींच चैन

पडेना. राम–कृष्णांना आणि गोपाळांना समारंभ पाहण्याकरितां नंदानें आपल्याबरोबर नेऊं नये म्हणून यशोदेच्या मध्यस्थीनें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न करावयाचा असें ठरवून, त्या यशोदेकडे गेल्या. त्यांनीं यशोदेला आपलें म्हणणें सांगितलें. यशोदेनें नंदाला गोपींचें म्हणणें सांगितलें. गोपींची ती बायकी भीति पाहून नंद हंसला. समारंभाच्या चार दिवसांत कंस अगर कंसाचे दुष्ट दैत्य राजधानीसारख्या ठिकाणीं आपल्यापैकीं कोणाच्याहि जिवाला धक्का लावूं शकणार नाहींत. आपण आपलें रक्षण करण्याचीं साधनें बरोबर घेऊन जात आहोंतच. शिवाय, तसा कांहीं प्रसंग आल्यास तेथील आपले मित्र, वसुदेवासारखे पराक्रमी यादव सरदार व भोज सरदार आपल्याला कांहीं इजा होऊं देणार नाहींत अशी आपली खात्री आहे, असें सांगून नंदानें गोपींना निर्धास्तपणें घरीं जाण्यास सांगितलें व प्रवासाची तयारी करण्यास सुरुवात केली. गोपींची निराशा झाली. दुःखित अंतःकरणानें त्या आपापल्या घरीं गेल्या. सर्व रात्रभर त्यांच्या मनाची तळमळ चालली होती.

रामकृष्णानीं अक्रुराला एकान्तांत नेऊन त्याच्याकडून कंसाचे सर्व बेत ऐकून घेतले. नंतर त्यांनीं आपल्या गोपमित्रांना एकत्र जमवून मथुरेंत आपल्यावर कोणता प्रसंग येण्याचा संभव आहे, त्याप्रसंगीं आपल्याजवळ कशी तयारी असली पाहिजे, आजपर्यंत आपण खेडेगांवांत व वनांत आपले पराक्रम गाजविले, आतां खुद्द राजधानींत, कंसासारख्या दुष्ट राजाशीं दोन हात करून जगाला आपला पराक्रम दाखविण्याची अमूल्य संधि आपल्याला कशी आली आहे, वगैरे गोष्टी अत्यंत उत्साहवर्धक अशा शब्दांनीं वर्णन करून गोपालांच्या मनांत पराक्रम दाखविण्याची अभूतपूर्व ईर्षा त्यांनीं निर्माण केली. भाले, बर्च्या, पट्टे, धनुष्य–बाण, गोफणी वगैरे युद्ध साहित्यांनीं भूषित होऊन तरुण गोपमल्लांची सेना तयार झाली. सूर्योदय झाल्यावर स्नान–संध्या आटोपून अक्रुरानें रथ जुंपला व रामकृष्णांना रथांत बसविलें. गोपाळांच्या गाड्या जुंपून तयार झाल्या. उत्तम प्रकारचीं वस्त्रें व शस्त्रें धारण करून तरुण गोपमंडळी गाड्यांत बसली. नंदादि पोक्त गोपमंडळी राजाला देण्याचा नजराणा घेऊन आपापल्या

गाड्यांत बसताच अक्रुरानें आपल्या घोड्यांना चालण्याची इशारत दिली. रथ निघाला. त्याच्या पाठोपाठ, धांवण्यांत घोड्यांशीं स्पर्धा करणारे, पुष्ट व झुली घातल्यामुळें डौलदार दिसणारे बैल जोडलेल्या शेंकडों गाड्या चालू झाल्या. गोपींनीं रामकृष्णांना व गोपाळांना पंचारतींनीं ओवाळलें. रामकृष्णांनीं सद्गदित होऊन सर्व गोपींना व वृद्ध गोपाळांना नमस्कार केला. वृद्धांनीं व गोपींनीं त्याना शुभाशीर्वाद दिले. "आम्ही लवकरच परत येऊं, काळजी करूं नका." असे कसे-बसे शब्द उच्चारून कृष्णानें आपले डोळे पुसतांच सर्वांच्या डोळयांतून अश्रू वाहूं लागले. गोपी तर स्फुंद-स्फुंदून रडूं लागल्या. रामकृष्णांना घेऊन जाणारा अक्रूर त्यांना क्रूरासारखा दिसला. "अक्रुरा, आमच्या रामकृष्णाना संभाळून घेऊन जा बरं! क्रूर न होतां अक्रुरा, त्यांना लवकर परत आण." असें म्हणून त्यांनीं टाहो फोडला. गोकुळातलें तें अलोट प्रेम पाहून अक्रूर अगदीं विरघळून गेला. त्यानें सर्वांना नमस्कार करून रामकृष्णाबद्दल काळजी करूं नका असें सर्वांना सांगितलें. रामकृष्णादि सर्व गोपाळांना पोहोंचविण्याकारितां गोपी गावाबाहेर दूरवर चालत आल्या असें पाहून नंदानें हात उभारून त्याना परत जाण्यास सांगितलें, आणि रथ व गाड्या जलद चालविण्याची त्यानें अक्रूरादिकांना इशारत दिली. गाड्या भरधांव चालू झाल्या. घोडयांच्या व बैलांच्या खुरानीं उडविलेला धुराळा व रथाचा ध्वज दिसेनासा होईपर्यंत गोपी तटस्थ उभ्या होत्या. नंतर डोळ्यांतील अश्रू पुसून निराश होत्सात्या त्या कशा तरी जड पावलांनीं आपापल्या घरीं गेल्या.

सर्व गोपमंडळी गोकुळाहून निघाली, ती मध्यंतरीं यमुना-तीरावर थोडा वेळ विश्रांति घेण्याकरितां थांबली. तेथें सर्वांनीं रामकृष्णांसह आनंदानें गप्पागोष्टी करीत फराळ केला. यमुनेचें अमृततुल्य जल प्राशन करून थोडा वेळ विश्रांति घेतल्यानंतर पुढील प्रवासाला सुरवात झाली. रथांत रामकृष्ण व अक्रूर असे तिघेच होते. कृष्णानें चातुर्यानें प्रश्न विचारून अक्रूराकडून मथुरानगरीची सर्व माहिती मिळविली. मथुरानगरींत विख्यात, प्रतिष्ठित व सधन लोकांपैकीं प्रमुख कोण? राजकार्य-

धुरंधर असे लोकाग्रणी कोण ? पराक्रमांत प्रामुख्यानें ज्यांचें नांव घेतलें जातें असे कोण ? कंसाच्या राजदरबारांत मंत्री किती आहेत ? कंसाला प्रामुख्यानें सल्लामसलत देणारे कोण आहेत ? दरबारात विद्वान लोक किती आहेत ? त्यांचा मानमरातब ठेवून त्यांना संतुष्ट ठेविले आहेत कीं नाहीं ? नेहमीं कंसाच्या भोंवतीं कोण लोक असतात ? मंत्रिमंडळांत व दरबारी लोकांत एकी अगर फाटाफूट कितपत आहे ? मथुरानगरींतील प्रजाजन राज्यकारभारावर व राजावर कितपत संतुष्ट आहेत ? मथुरा नगरीच्या संरक्षणाची काळजी कशी घेतली आहे ? मथुरानगरींत प्रमुख राजरस्ते किती आहेत ? राजप्रासाद किती आणि कोठें आहेत ? राजकीय पाहुण्यांची व्यवस्था कोठे केलेली असते ? धनुर्यागाच्या समारंभाची तयारी कोठें केली आहे ? समारंभाला मांडलिक राजे कोण कोण आले आहेत ? त्यांचे आणि कंसाचे मनोमन संबंध कसे आहेत ? वगैरे प्रश्न विचारून कृष्णानें स्वतःला पाहिजे असलेली सर्व माहिती मिळविली. सतरा अठरा वर्षांच्या वयाच्या रामकृष्णांची एखाद्या अनुभवी मुत्सद्दयाला शोभेल अशी चौकस बुद्धि पाहून अक्रूर थक्क झाला. त्याचा रामकृष्णांबद्दलचा आदर वृद्धिंगत होऊन त्यांच्यावर त्याचें अकृत्रिम प्रेम जडलें. एक दोन दिवसांच्या सहवासांत तो त्यांचा जिवलग मित्र व निःसीम भक्त बनला. नारदांचें वचन खरें ठरलें. असो. संध्याकाळच्या सुमारास सर्व मंडळी मथुरेला आली. मथुरेनजीक असलेल्या एका सुंदर बागेंत गोपाळांच्या गाड्यांचा तळ पडला. रामकृष्ण रथांतून खालीं उतरले. श्रीकृष्णानें प्रेमळपणें अक्रुराच्या हातांत हात घालून म्हटलें, "अक्रूरजी, तुम्ही पुढें जाऊन आम्ही आल्याचें वर्तमान कंसाला कळवा. मथुरानगरींतहि आम्ही आल्याची वार्ता युक्तीनें प्रसृत करून तुम्ही आपल्या घरीं जा. आम्ही येथें विश्रांति घेऊन उदईक तिकडे येऊं. मथुरानगरी पाहण्याची माझ्या बरोबरीच्या मंडळीस फार इच्छा आहे. मथुरानगरी पाहात पाहात, रमत रमत, आम्ही राजवाड्यांत जाऊन पोहोंचूं."

यावर अक्रूर नम्रपणें म्हणाला, 'कृष्णा ! तुम्हां उभयतांस बरोबर घेतल्यावांचून मी मथुरेंत प्रवेश करणार नाहीं. मला सोडून तुम्ही

मागे राहूं नका. ही नगराबाहेरची जागा तितकीशी सुरक्षित नाहीं. तूं, बलराम, गोपाळ व इतर मंडळी, यासह माझ्या घरीं आपली पायधूळ झाडावीस, अशी माझी फार इच्छा आहे. माझें घर सर्व प्रकारे सुरक्षित असून मथुरेंत असेपर्यंत तुम्हा सर्वांची माझ्या घरींच राहण्याची व्यवस्था करणे माझें कर्तव्य आहे. माझ्या घरीं तुमच्या येण्याने मला अपरिमित आनंद होईल. कृष्णा, घरीं पाहुणा येणे म्हणजे गृहस्थाश्रमी मनुष्यास मोठा उत्सव वाटतो. त्यातूनहि तो तुझ्यासारखा सन्मान्य असेल तर त्या आनंदास पारावारच नाहीं. तेव्हा माझी ही एवढी विनंति अमान्य करूं नकोस." अक्रूराचें भाषण ऐकून कृष्णाला समाधान वाटलें. अक्रूराच्या बोलण्यातला एक गुप्त आशयहि त्याच्या ध्यानात आला. आपली सर्वतोपरी काळजी घेणारा स्नेही आपण मिळविला ह्याबद्दल त्याला आनंद झाला. त्याने अक्रूराला थोडें एका बाजूला घेऊन म्हटले, "अक्रूरजी, मला मथुरेंत पहिल्या प्रथम कोणत्या घराला वंदन करून त्यात पाऊल टाकलें पाहिजे हे आपण जाणीत आहात. मथुरेंत पहिल्या प्रथम मी अन्य कोणाच्या घरीं पाऊल टाकण्यापूर्वी माझ्या जन्मस्थानात, माझ्या घरात माझ्या मातापित्याचें दर्शन घेण्याकरिता मीं प्रवेश करणें युक्त आहे हे तुम्हालाहि मान्य होईल. यदुकुलाचा संहार करणाऱ्या कंसाचा वध करून सूड उगविल्याशिवाय माझ्या घरीं प्रवेश करणे मला योग्य वाटत नाहीं. वसुदेवमहाराजाचा पुत्र म्हणून यदुकुलावरचे संकट दूर करणें माझे आद्य व पवित्र कर्तव्य बजावल्यानंतर मी माझ्या पूज्य मातापित्यांचें दर्शन घेऊन त्यांना संतुष्ट करीन. मग पाहिली गोष्ट म्हणजे अक्रुरजी, तुमच्या घरीं येऊन तुमचें दर्शन घेऊन मी कृतार्थ होईन. अक्रुरजी, आज रात्रीं आम्ही ह्या बागेंत सावधगिरीनें वस्ती करितों. वसुदेवमहाराज व आमचे स्नेही बनलेले भोजमंत्री व सरदार ह्यांच्या कानावर आम्ही ह्या बागेंत उतरल्याचें घाला. ते आणि तुम्ही आमच्या केसाला धक्का लागूं देणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. उद्यां मथुरानगरी पाहात पाहात धनुर्यागाच्या मंडपात येऊन कुस्त्याची दंगल पाहण्याचा आमचा मानस आहे. तुम्ही दिलेल्या सर्व सावधगिरीच्या सूचना मीं ध्यानांत ठेविल्या आहेत.

अक्रूरजी, ठिकठिकाणीं तुमचा मुत्सद्दीपणा आमचें रक्षण करण्याकरितां आमच्या पाठीशीं उभा आहे, हेहि माझ्या ध्यानात असल्याने मला पुष्कळ धीर आला आहे. जा, मीं सागितलेल्या सर्व गोष्टी करून तुम्ही निर्धास्त घरीं जा. ”

अक्रुराला मोठेपणा देऊन केलेल्या ह्या कृष्णाच्या भाषणाचा सुपरिणाम झाला. राम–कृष्ण नगरीबाहेर येऊन उतरल्याची वार्ता सर्व मथुरानगरींत हां हा म्हणता चतुर अक्रुराने पसरविली. ‘ उदईक राम-कृष्ण नगरप्रवेश करणार ’ असे सांगून कृष्णाच्या दर्शनाचे कुतूहल त्याने लोकात जागृत केले.

वसुदेव, भोजमंत्री याच्या कानांवर रामकृष्ण आल्याची वार्ता घालण्याची व्यवस्था करून अक्रूर कसाच्या भेटीला गेला. ‘ रामकृष्ण नंदादि गोपालासह मथुरेच्या बाहेर उद्यानात उतरले आहेत. उदईक त्यानीं राजदर्शनाकरिता व धनुर्याग पाहण्याकारितां नगरात यावे, असे त्याना सागून मी आलो. तुम्हीं सागितल्याप्रमाणे मीं आपली कामगिरी बजावली आहे. ’ असे सागून घरीं जाण्याबद्दल त्याने कसाचा निरोप मागितला. कामगिरी उत्तम प्रकारे केली असे म्हणून कंसाने त्याची स्तुति केली व घरीं जाऊन भोजन वगैरे उरकून रात्री पुनः भेटीला येण्याविषयी कंसाने त्याला सागितले. अक्रूर घरीं गेला. भोजन करून व थोडी विश्राति घेऊन तो राजवाड्यात गेला. तेथे प्रधानमंडळीशीं कंसाचे खलबत चालले होते. अक्रूर तेथे जाताच कंस प्रधानांना म्हणाला, “अक्रुरजींनीं मीं सागितलेली कामगिरी माझ्या मनासारखी पार पाडली. येथपर्यंत आपण योजिलेल्या गोष्टी ठीक जुळून आल्या. आता तुमच्या चातुर्याची परीक्षा आहे. आज रात्रींच उद्यानात रामकृष्णाचा घात करावा असा माझा बेत होता. पण रामकृष्णादि गोपमंडळी आल्याची बातमी नगरात वाऱ्यासारखी पसरली असून त्या पराक्रमी गवळ्यांना पाहण्याकरिता तरुण नागरिकाची उद्यानाकडे रीघ लागली आहे, असे नगरात हिंडणाऱ्या दूतानीं येऊन मला नुकतेच सागितलें. म्हणून रामकृष्णाचा नाश करण्याची कामगिरी आपण ठरविल्याप्रमाणे कुवलयापीडाकडून अगर आपल्या चाणूर

मुष्टिकादि बलाढ्य मल्लाकडूनच बिनबोभाट पार पाडली पाहिजे. ' अप-घातात सापडून तीं गवळ्याचीं पोरें मेलीं ' असे लोकाना दिसले पाहिजे. तेव्हा आता तुमच्यावर सोपवलेली कामगिरी दक्षतेने पार पाडून तुम्ही मला निर्भय करा. तुमची तयारी आपल्या योजनेप्रमाणे झाली आहे ना?" कंसाचे भाषण ऐकून प्रधान मंडळींनीं आपण तयारींत असल्याचें सागितलें. दानव प्रधानांनीं धनुर्याग व कुस्त्याची दंगल यांची व्यवस्था अगदीं ठरल्याप्रमाणे केली होती. भोजमंत्र्यानीं सर्व सेना आपल्या हातीं ठेवून नगररक्षणाची व्यवस्था वरकरणीं कंसाच्या सागण्याप्रमाणें ठेविली होती. खरोखर त्याच्या व्यवस्थेचा उपयोग कंसापेक्षां रामकृष्णानाच व्हावयाचा होता. ह्या भयंकर फितुरीची कल्पना कसाला अगर दानव प्रधानांना नव्हती.

त्या रात्रीं मथुरेतील हजारो तरुण श्रीकृष्ण व बलराम याना पाहून, भेटून व त्याच्याशीं बोलून गेले. आपल्यासारख्याच तरुण रामकृष्णानीं गोकुल-वृदावनात मोठमोठ्या पराक्रमाच्या व चातुर्याच्या गोष्टी केल्या. शकटासुर, तृणावर्त, वत्सासुर, अघासुर, धेनुकासुर वगैरे अजस्र प्राण्याचा त्यानीं वध केला. हजारो सर्पांचा नाश करून कालियासारख्या भयकर सर्पराजाला यमुना प्रदेशातून रमणक द्वीपाकडे हाकून लावण्याचे परा-क्रमाचे कृत्य त्यानीं केलें. गोवर्धनयाग घडवून आणून, गोवर्धनाच्या सहाय्याने गोकुल-वृंदावनातील सर्व गोपाळ, गाई, वासरे वगैरे असख्य जीवाचें अतिवृष्टिपासून रक्षण केले. आपल्या चातुर्याने थोरामोठ्यांनाहि चकित करून गोवर्धनगिरिधारि, गोविंद ही नामाभिधानें मिळाविलीं. प्रलंबासुर केशीसारख्या कंसाच्या मर्जीतल्या महाबलाढ्य दानवाचा धुव्वा उडविला. अशा कितीतरी गोष्टींचीं वर्णने मथुरेतल्या तरुणानीं ऐकल्यामुळे, त्या रामकृष्णांचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याचा योग येताच त्यांनीं तो साधला. मोठमोठ्या मल्लांनाहि धाक दाखवितील असे ते रामकृष्णांचे कमावलेले पुष्ट देह, त्याचे नयनमनोहर चेहरे, त्यांचे मोहिनी घालणारें मधुर भाषण, यानीं मथुरेंतले तरुण मंत्रमुग्ध झाले व त्यानीं रामकृष्णांना आपल्या हृदयसिंहासनावर बसवून ते त्यांचे भक्त, अनुयायी बनले. थोडक्यांत

सांगावयाचें म्हणजे कृष्णानें पहिल्याच भेटींत मथुरेतल्या सर्व तरुणाना आपलेसे केलें. आपल्या घरीं जाताच तरुणानीं कृष्ण-रामाचे वर्णन करून आपापल्या वडील माणसांच्या मनात त्याच्याबद्दल कुतूहल निर्माण केले. प्रातःकाल होताच रामकृष्णाना पाहण्याकरिता स्त्रीपुरुषाच्या झुंडीच्या झुंडी उद्यानाकडे जाऊं लागल्या. जे जे त्यांना पाहून येत ते ते त्याच्या प्रसन्न हंसऱ्या चेहऱ्याची, त्यांच्या मोहक सौंदर्याची, त्याच्या कमाविलेल्या शरीराची, त्याच्या मधुर भाषणाची व त्याच्या कर्णोपकर्णी पूर्वी ऐकलेल्या पराक्रमाची, अतिशयोक्तिपूर्ण स्तुति करीत. लवकरच गोकुळचे रामकृष्ण मथुरेंत सर्वांच्या तोंडीं झाले. जो तो त्यांना पाहाण्याकरिता उद्यानाकडे धावूं लागला. रामकृष्णाना पाहावयास जाणाऱ्या त्या अलोट जनसमुदायाची जाण्यायेण्याची व्यवस्था करिता करिता नगररक्षक मेटाकुटीस आले. कंसाच्या कानीं हा सर्व प्रकार जाताच मथुरेतल्या आपल्या प्रजाजनाचे ते कृष्णप्रेम पाहून तो मनातल्या मनांत अतिशय चिडला. त्याने उद्यानाकडे जाण्याची लोकाना मनाई करण्याची आज्ञा सोडली. रामकृष्ण दोन प्रहरीं मथुरेत धनुर्याग पाहण्याकरिता येतील, त्यावेळीं त्यांचे दर्शन घ्या; आतां त्याना थोडा वेळ निवान्त राहूं द्या, असे काहीं तरी सांगून नगररक्षकांनीं नगराबाहेर जाणाऱ्या लोकाना परत फिरविले. त्याचा परिणाम म्हणजे दोन प्रहरीं रामकृष्णाचे दर्शन घेण्याच्या उत्कठेनें धनुर्यागमंडपाकडे जाणारे रस्ते माणसानीं फुलून गेले.

दुपारीं बलराम आणि गोप यासह मथुरेची शोभा व धनुर्यागाचा समारंभ पाहण्याकरिता श्रीकृष्ण राजमार्गातून चालू लागला, तेव्हा मथुरेची ती अपूर्व शोभा पाहून गोपमंडळी हर्षभरित झाली. मथुरेची वेस स्फटिक मण्यांनीं तयार केली होती. ती इतकी उंच होती कीं तिकडे पाहताना डोळे फिरून जात. मोठमोठाल्या वाड्याचे दरवाजे सोन्यानें मढविलेले असून त्यांजवर सुंदर तोरणें लटकाविलीं होतीं. व्यापारी लोकाचीं घरे आणि मोठमोठ्या मार्गावरील चौक हे जणूं काय सोन्यानें मढवून काढले आहेत असे वाटे. शिल्पीजनांचीं दुकानें आणि बैठकीच्या जागा पाहण्यासारख्या होत्या. पक्षी, पारवे, मोर यांना घराच्या बाहेरील,

बसावयास केलेल्या जागा स्फटिक, पाच, मरकत इत्यादि रत्नांच्या बनविल्या होत्या. राजमार्ग, पेठातील रस्ते, चौक वगैरे सर्व सुवासिक पाण्यानें गारेगार करून टाकिले होते. काहीं ठिकाणीं कुंकुमाचे सडे टाकिले होते, व त्यावर फुले, अक्षता, मंगलकारक वृक्षाचे पल्लव आणि लाह्या पसरल्या होत्या. मुख्य दरवाजाच्या दोहो बाजूंस तादुळाच्या राशींवर स्वच्छ पाण्यानें भरलेले निर्मल घट ठेवून त्यावर दहीं व चदन चर्चिले होतें. त्याच्या सभोंवार फुलाच्या माळा असून घटाच्या तोंडावर आंब्याचीं कोवळीं कोंवळीं पाने ठेविलीं होतीं. लाब लाब तोरणें लावून उंच उंच गुढ्या उभारल्या होत्या. असो. अशा रीतीनें शृंगारलेल्या नगरींत मल्लाप्रमाणें दिसणाऱ्या तेजस्वी गोपमंडळीनीं वेष्टिलेले श्रीरामकृष्ण राजमार्गाने जाऊं लागले असता, त्यांना पाहण्याकरिता दुतर्फा लोक उभे राहिले होते त्याच्या पुढून श्रीकृष्ण आपल्या गोपमंडळींसह जाऊं लागला तेव्हा कृष्णाच्या नांवाचा ते जयजयकार करू लागले. कित्येक वाड्याच्या सौधावरून श्रीकृष्णावर फुलें, लाह्या, अक्षता वगैरे मंगल पदार्थ उधळले जात होते अशा रीतीनें रामकृष्णाची मिरवणूक चालली असतां, समोरून कसमहाराजांचे खास शिंपी व धोबी कंसमहाराजाकरिता नवीन शिवलेले व धुऊन शुभ्र केलेले उंची कपडे गाड्यांतून घेऊन चालले होते. आपण कंसमहाराजांचे खास शिंपी व धोबी आहों, अशा गर्वाने ते नेहमीं धुंद असत व सामान्य माणसांचा धिक्कार करीत. समोरून येणारे त्याचे कपड्यानीं भरलेले गाडे पाहाताच लोकांनीं रामकृष्णाची मिरवणूक जाईपर्यंत त्यांना थांबण्यास सांगितलें. त्याबरोबर ते एकदम उसळले व म्हणाले, "अरे जा, गवळ्यांच्या मिरवणुकीला आम्ही कस्पटाप्रमाणें समजतों. गाई राखणाऱ्या ह्या गुराख्यांना आम्ही जाईपर्यंत रस्त्याच्या एका बाजूला अदबीनें उभे राहण्यास सांगा." गवळी, गुराखी असे तुच्छतेने उच्चारलेले शब्द गोपाळाच्या कानीं गेले मात्र, दोन गोपाळ झटकन पुढें होऊन त्यांनीं त्या उन्मत्त शिंप्याला व धोब्याला गाडीतून खाली ओढलें व त्यांच्या कानशिलांत असे तडाखे दिले कीं ते रस्त्यावर धाडकन पडले. त्याबरोबर त्यांचे सोबती घाबरून पसार झाले. ह्या माजलेल्या पशूंची

भली खोड मोडली असें म्हणत म्हणत लोकांनीं त्यांना लाथा बुक्क्याचा इतका प्रसाद दिला कीं त्यानीं परलोकची वाट धरली. कृष्ण व गोपाळ याच्या सान्निध्यानें लोकहि धीट झाले. कृष्णानें गाडींतले उंची कपडे बाहेर काढविले आणि गोपाळांना ते परिधान करण्याबद्दल आज्ञा केली. रामकृष्ण स्वतःहि त्यातल्या पोपाखानीं भूषित झाले. उरलेले सर्व कपडे लोकांनीं लांबविले.

कंसाच्या सुदामा नावाच्या खास माळयाच्या घरावरूनच ती मिरवणूक जावयाची होती. त्याच्या कानावर शिंपी व धोब्याची दुर्दशा जातांच लोकाच्या चिथावणीने बलाढ्य गोपाळ आपल्यावरहि तोच प्रसंग आणतील, असें वाटून तो सावध झाला. शहाणपणानें तो आपण होऊन रामकृष्णाना सामोरा गेला आणि मोठ्या आदरानें त्यानें कंसाकरितां खास तयार केलेल्या पुष्पहारानीं रामकृष्णाना अलंकृत करून सर्व गोपाळाच्या गळयातहि जवळ असलेले पुष्पहार घातले, व पानसुपारी, अत्तर, गुलाब देऊन सर्वांना संतुष्ट केलें. रामकृष्णाना नम्रतेने नमस्कार करून त्याच्या पुढे हात जोडून तो उभा राहिला. कृष्णानें त्याच्याकडे पाहून हंसत हंसत म्हटलें, 'सुदाम, तूं केलेल्या ह्या आदरसत्कारानें आम्ही संतुष्ट झालों. आमच्या हातून तुझे कल्याण झालेले तुझ्या अनुभवास येईल.''

मिरवणूक पुढे चालू झाली. विद्वान ब्राह्मण आपापल्या दाराशीं श्रीकृष्णाचा आदरसत्कार करण्याकारिता उत्सुकतेनें उभे होते. रामकृष्ण त्यांच्या घरासमोर येताच त्यानीं विधिपूर्वक, पंचामृतानें त्याचे पाय धुऊन गंध, अक्षता, पुष्पमाला ह्यांनीं त्याचें पूजन केलें व स्वतःच्या ऐपतीप्रमाणें नजर–नजराणेहि दिले. असा सर्वांकडून आदर–सत्कार घेत घेत धनुर्यागाच्या मंडपाशीं रामकृष्ण आले. आपल्या शेंकडो गोपमित्रासह ते एकदम मंडपांत शिरले. मंडपांतली शोभा अपूर्व होती. खुद्द कंस महाराजांच्या हातन ज्या धनुष्याचा याग व्हावयाचा होता तें तेथें ठेविलेले होतें. त्याची गंधपुष्पांनीं पूजा केली होती. त्याच्या रक्षणाकरिता पुष्कळ सशस्त्र पहारेकरी उभे होते. तें धनुष्य इतकें प्रेक्षणीय होतें कीं, त्याकडे पाहताच प्रत्यक्ष इंद्रधनुष्याचा भास होई. तें धनुष्य पाहून

कृष्णाला मोठा आनंद झाला. तें उचलून पाहण्याकरितां तो पुढें झाला तों पहारेकऱ्यानीं त्याला उचलण्याची उमेट शब्दानीं मनाई केली. कृष्णानें त्याना न जुमानता धनुष्याला हात घालून तें उचललें व त्याला गुण चढवून तें इतकें आकर्ण ओढलें कीं, तडातड असा मोठा आवाज होऊन त्याचे दोन तुकडे झाले. पहारेकरी कृष्णाच्या अंगावर धावून गेले मात्र, त्या धनुष्याच्या मोडक्या तुकड्यानींच कृष्णानें व बलरामानें त्याना झोडपून काढण्यास सुरवात केली. शेकडों गोपाळांच्या हातातले दाडपट्टे त्याच्यावर चालू होताच ज्यांनीं पळ काढला, तेवढेच पहारेकरी सुटले. बाकींचे सर्व धनुर्यागाला बळी पडले. विजयी कृष्ण, बलराम व गोपाळ यासह, मंडपातून बाहेर पडून कंसमहाराजांना भेटण्या-करितां राजप्रासादाच्या मार्गाला लागला. हजारों लोक त्याचा जय-जयकार करीत त्याच्या पाठोपाठ चालूं लागले. धनुर्भंगाची व पहारे-कऱ्याना ठार करून श्रीकृष्ण राजप्रासादाकडे आपल्या भेटीला येत असल्याची भीषण वार्ता कळताच कंस क्रोधानें थरथर कांपूं लागला. क्रोध व भीति याच्या योगानें त्याच्या तोंडातून शब्द बाहेर फुटेना. ह्या अन-पेक्षित प्रकारानें त्याच्या भोंवतीं असणारें दानव-मंडळ भेदरून गेलें. भोजमंत्र्यानीं कंसाच्या देखत सर्व सेना सज्ज करण्याची आज्ञा दिली, आणि कंसाला निर्धास्त राहावयास सागून निवडक भोज-सरदारासह कृष्णावर चालून जाण्याच्या ईर्षेनें बाहेर पडल्यासारखें त्यांनीं दाखविलें. तें पाहून कंसाला थोडा धीर आला. भोजमंत्री व भोजसरदार कृष्णावर चालून जात आहेत असें पाहून कंसानें आपल्या दानव सरदाराना बोलावून आणून आपल्या वाड्याभोंवतीं कडेकोट बंदोबस्त ठेवण्यास सांगितलें. घटकाभरानें कंसाचे गुप्त दूत, कृष्ण आपल्या गोपमंडळीसह उद्यानाकडे परत गेल्याचें सांगत आले. तें ऐकून कंसाच्या जिवांत थोडा जीव आला.

भोजमंत्री, कांहीं भोज सरदार व अक्रूर तितक्यांत कंसाला येऊन भेटले. त्यांनीं कृष्णाला कसा परत फिरविला ह्याची हकीगत मोठी रंग-वून सांगितली. भोज मंत्री म्हणाले, "कृष्ण व त्याचे गोपाळ ह्यांचा आम्ही आतांच धुव्वा उडवून देणार होतों; परंतु आपलेच मथुरेंतले

हजारों प्रजानन, विशेषतः हजारों तरुण, त्या कृष्णाच्या पाठीमागें त्याचा जयजयकार करीत येत होते. आम्ही त्यावेळीं कृष्णावर आपली अजिंक्य सेना घातली असती तर आपल्याच प्रजाजनांची कत्तल झाली असती. म्हणून आम्ही अगोदर आमच्या सेनेची केवढी तयारी आहे याची त्याला चांगली जाणीव होईल अशा तऱ्हेनें सर्व सेना त्यांच्या नजरेसमोरून नेली आणि आतां सायंकाळचा समय झाला आहे, राजाधिराज कंस-महाराजांना भेटण्याची वेळ ही नाहीं, उदईक कुस्त्यांची दंगल झाल्या-नंतर तुम्ही त्यांची भेट होईल असें सागून त्याला आम्हीं परत पाठविलें. आज रात्रीं अक्रुराच्या आधिपत्याखालीं एक सैन्य-विभाग उद्यानाला गराडा देऊन बसणार आहे. उदईक त्याला कुस्त्यांची दंगल पाहण्याच्या निमित्तानें दंगलीच्या प्रवेशद्वाराशीं त्या सेनेच्या देखरेखीखालीं आणा-वयाचें आणि कुवलयापीड व चाणूर–मुष्टिकादि दानव मल्ल ह्यांच्या स्वाधीन करावयाचें अशी योजना केली आहे." अशा कांहीं तरी थापा मारून कंसाची भीति त्यानीं दूर करण्याचा प्रयत्न केला. पण कंसाची भीति नाहींशी होण्याऐवजीं थोडीशी वाढलीच. कृष्णाला अद्याप त्यानें कधीं समक्ष पाहिलेंच नव्हतें. भविष्याप्रमाणें देवकीचा आठवा पुत्र त्याचा मृत्यु होता. कृष्ण हा देवकीचा आठवा पुत्र आहे, हें त्याला नारदाच्या तोंडून खात्रीलायक समजल्यापासून मृत्यूच्या धास्तीनें गोकुळ,कृष्ण हे शब्द सुद्धां त्याला तापदायक वाटत. तो कृष्ण आपल्याच बोलावण्यानें मथुरेंत आला, त्यानें आपली यत्किंचितहि भीति न बाळगतां आपल्या खास शिंप्या-धोब्याला सहज स्वर्गाची वाट दाखवून आपला पोषाक हरण केला, धनुर्यागाच्या रक्षणाकरितां नेमलेल्या शेंकडों पहारेकऱ्यांना ठार मारून धनुर्भंग करण्याचें भीषण कृत्य त्यानें बिनदिक्कत केलें. आतां तो उद्यां कुस्त्यांची दंगल पाहण्याकरितां प्रत्यक्ष आपल्यासमोर येऊन बसणार ! आपण केलेल्या सर्व योजना फुकट जाऊन, तो मृत्यु आपल्या पुढें साक्षात् उभा राहिला तर आपली काय स्थिति होईल, या धास्तीनें कंस बेचैन झाला. भोजमंत्री, अक्रूर, इतर दानव-सरदार, दानवमल्ल कृष्णाचा आम्ही उद्यां खास निकाल लावतों, असें प्रतिज्ञेवर सांगत होते, तरी

नानाप्रकारच्या संकटांतून अचानक सुटून पराक्रम गाजविलेला कृष्ण, त्यांच्याकडून नाश पावेल असें त्याला कांहीं केल्या वाटेना. कंसाच्या प्रासादाभोंवतीं कडेकोट बंदोबस्त ठेवून मंत्रिमंडळ आपापल्या घरोघर गेलें.

इकडे रामकृष्ण आणि सर्व गोपाळ उद्यानांत गेल्यावर त्यांनीं आपण केलेल्या पराक्रमाची हकीगत, नंदादि वृद्ध गोपाळाच्या कानांवर घातली. नंद राजा आणि वृद्ध गोपाळ यांना वसुदेवाचा खास दूत गुप्तपणें येऊन भेटून गेलाच होता. कंसाचे रामकृष्णासंबंधीं चाललेले सर्व डावपेंच त्यानें नंदाला नीट समजावून देऊन ते रामकृष्णांच्या कानांवर घालण्यास सांगितलें होतें. कुस्तीच्या दंगलीच्या प्रवेशद्वारांत पहिलें संकट कुवलयापीडाचें होतें. त्यातून रामकृष्णानीं कसें पार पडावें, आपण तेथ काय तजवीज केली आहे वगैरेसंबंधीं सर्व गोष्टी रामकृष्णाना नीट समजावून देण्यास सांगून वसुदेवाचा दूत परत गेला होता. वसुदेवाच्या आज्ञेने वसुदेवाच्या खास आचाऱ्यानीं त्या दिवशीं रात्रीं उद्यानांत गोपाळाकरता खीर वगैरे पक्वान्नांचें भोजन तयार केलें होतें. सर्व मंडळींनीं आनंदाने गप्पागोष्टी करीत सुग्रास भोजनावर यथेच्छ हात मारल्यावर दुसऱ्या दिवशीं सर्व योजना नंदाकडून नीट समजावून घेऊन, रामकृष्णादि सर्व गोपाळानीं ती रात्र सुखनिद्रेंत घालविली.

कंसाला ती रात्र काळरात्रीसारखी वाटली. भीतीनें त्याच्या छातींत धडकी भरली होती. बिछान्यावर तो तळमळ तळमळ करीत पडला होता. थोडा डोळा लागल्यासारखा होतांच, त्याला अनेक प्रकारचीं दुष्ट स्वप्नें पडत होतीं. आपण भणंग भिकारी होऊन नग्न स्थितींत हिंडत आहों, आपण प्रेताला कवटाळीत आहों, आपल्याला अभ्यंग स्नान घालून कोणीतरी आपल्या गळयांत जास्वंदीच्या लाल फुलांच्या माळा घालीत आहे, आपण गाढवावर बसून चाललों आहों, आपण विष भक्षण करीत आहों, अशा प्रकारच्या दुष्ट स्वप्नांनीं त्याला अगदीं भंडावून सोडिलें. जागृतावस्थेंतहि त्याला अशींच अशुभ चिन्हें भेडसावूं लागलीं. आरशांत आपलें प्रतिबिंब पाहात असतां एकदम त्याला स्वतःचें मस्तक दिसेनासें होई. दिव्याकडे पाहातांच एका दिव्याच्याऐवजीं दोन दिवे

दिसत. स्वतःच्या सांवलींत बारीक बारीक भोकें आहेत, असें त्याला वाटे. कानांत बोटें घातलीं असता जो एकप्रकारचा आवाज निघतो, तो त्यास ऐकूं येईनासा झाला. ह्या अशुभ चिन्हांमुळें, आपण उद्यां खास मरणार, कांहीं केल्या आतां आपण यांतून वांचणें शक्य नाहीं, असें ठरवून तो दुःख करूं लागला. मनुष्य कितीहि वाईट स्थितींत असला, आपण लवकरच हें नश्वर विश्व सोडणार असें त्यास पक्कें वाटत असलें तरी मरेपर्यंत धडपड करण्याची त्याची साहजिक प्रवृत्ति असते. कंसाचीहि स्थिति बहुतेक अशीच झाली. आपल्या मल्लाच्याकडून रामकृष्णांचा उद्या निकाल लावावयाचाच त्याच्या हातूनहि ती कामगिरी झाली नाहीं, तर आपल्या प्रचंड सेनेकडून रामकृष्णादि सर्व गोपाळांना ठार करून वसुदेव उग्रसेनादिकांचाहि नाश करून, सर्व वसुधरा शत्रुरहित करून टाकावयाची, असें त्यानें ठरविलें.

सूर्योदय होताच मल्लक्रीडेची कडेकोट तयारी झाली. पहिलवानांनीं तालमीच्या आखाड्याची पूजा केली. नगारा वगैरे वाद्यें सुरू झालीं. मोठमोठ्या प्रेक्षक मंडळीस बसण्याकरितां मूल्यवान् आसनें ठेविलीं होतीं. अनेक रंगाचीं निशाणें चोहोंकडे फडकूं लागलीं. मल्लविद्येची आवड असलेले लोक तर हा अपूर्व समारंभ पाहण्यास दूरदूरच्या गावांहून आले होतेच, पण ज्याना विशेष गोडी वाटत नव्हती अशीहि माणसें रामकृष्णांना पाहावयाला सांपडेल या आशेनें जमलीं होतीं. बहुतेक नगरवासी जन हजर होते. सर्व जातींचीं, सर्व दर्जाचीं माणसें ह्या ठिकाणीं दृष्टीस पडूं लागलीं. राजे लोक मुद्दाम शृंगारलेल्या आसनांवर आपापल्या इतमामाप्रमाणें बसले. सर्वांचे चेहरे आनंदानें प्रफुल्लित झाले. कंस महाराजांची स्वारी प्रधान–मंडळासह सभामंडपाच्या मध्यभागीं उच्चासनावर विराजमान झाली. त्यांच्या उजव्या डाव्या हातास मोठमोठे मानकरी, सरदार, सेनापति, लढवय्ये, योद्धे, जहागिरदार, दरबारी विद्वान् पंडित, बसले होते. कंसानें या समारंभामुळें आपणास आनंद वाटत आहे, असें वरकरणीं दाखविण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्याच्या मनाला मुळींच समाधान नव्हतें. ठरल्यावेळीं रणवाद्यें सुरू झालीं. त्यांतच मल्लांच्या

उत्तेजनपर शब्दांची भर पडली. मुख्य पहिलवान केव्हां येतात, याची सर्वजण उत्कंठेनें वाट पाहूं लागले, तोंच आपल्या वस्तादजींना पुढें करून चाणूर, मुष्टिक, कूट, शूल, तोशल इत्यादि बडे बडे वीर मल्ल मूल्यवान् वस्त्रालंकार धारण करुन गर्वानें सभामंडपात शिरले. त्याबरोबर प्रेक्षकांनीं त्याच्या नांवांचा जयघोष करून त्यांचा सत्कार केला. नगारा वाजूं लागतांच, आपला पराक्रम दाखविण्याची वेळ जवळ आली असें पाहून मल्लांचे बाहू स्फुरण पावूं लागले. इतक्यांत कंसाच्या निमंत्रणावरुन आलेले नंदादि वृद्ध गोप आपापले नजराणे घेऊन पुढें सरले. कंसापुढें नजराणे ठेवून व त्याला नमस्कार करून ते आपल्याकरितां नेमलेल्या ठिकाणीं जाऊन बसले.

श्रीकृष्ण बलरामासह आणि शस्त्रें धारण केलेल्या आपल्या शेंकडों गोपांच्यासह समारंभ पाहण्याकरितां उद्यानांतून निघाला. ही सर्व मंडळी समारंभाच्या प्रवेशद्वाराशीं पोहोंचतात तोंच एका मोठ्या थोरल्या हत्ती· वर बसलेला महात त्या हत्तीला आपल्यावर चढाई करण्यास सांगत आहे, असें श्रीकृष्णानें पाहिलें. प्रवेशद्वाराजवळ त्या कुलवयापीड हत्तीला कृष्णाच्या अंगावर घालणार आहेत असा इशारा अक्रुरानें गोकुळांतच श्रीकृष्णास दिला होता. धनुर्भंग झाला त्या रात्रीं वसुदेवाच्या दूताकडून नंदाच्या-मार्फत तो इशारा रामकृष्णांसह सर्व गोपाळाना मिळाला. त्याचा प्रतिकार कसा करावयाचा तेंहि त्या दूतानें सांगून ठेविलें होतें. हत्ती मोहरा करुन आपल्यावर चालून येत आहे असें पाहतांच कृष्णानें सर्व गोपाळांना ‘सावध’ असें मोठ्यानें ओरडून तयार राहण्याचा इषारा दिला, आणि महातास उद्देशून म्हटलें, “अरे अविचारी मनुष्या! जरा थांब. आम्हांला आंत जाण्याला आधीं मार्ग मोकळा करून दे. चल दूर सर. असें न करशील तर तुला आणि तुझ्या हत्तीला आतांच्या आतां यमसदनास जावें लागेल, हें पक्कें लक्षांत ठेव.” पण ह्या भाषणानें महाताचा उद्योग थांबला नाहीं. त्यानें हत्तीला पुनः एकदां खूप जोरानें श्रीकृष्णावर लोटिलें. प्रलयकालच्या मृत्यूप्रमाणें दिसणारा तो भयंकर गजराज इतक्या जोरानें आणि त्वेषानें श्रीकृष्णावर धांवून आला कीं कृष्ण आतां कांहीं

त्याच्या तडाख्यांतून सुटत नाहीं, असें सर्वांना वाटून सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. पण इतक्यांत कोणा अज्ञात इसमानें श्रीकृष्ण व हत्ती याच्यामध्यें एक पांच वर्षांचा लहान बालक आणून उभा केला. हत्तीचा तो उग्र अवतार पाहून तें बालक मोठ्यानें ओरडलें. त्याबरोबर महाताचें व हत्तीचें लक्ष एकदमच त्या मुलाकडे गेलें. महातानें घाबरून ह 'ला आवरण्याची पराकाष्ठा केली. हत्तीहि मुलाकडे लक्ष जाताच कृष्णावर धावून जाण्याचा वेग एकदम आवरण्याच्या प्रयत्नांत धाडकन् जमिनीवर कोसळला. तें बालक, त्या महाताचा एकुलता एक लाडका मुलगा असून हत्तीच्या अत्यंत परिचयाचें होतें. महाताचे तें बालक पुढें येतांच एकदम खालीं बसून सोंडेनें त्या मुलाला आपल्या पाठीवर घेण्याची त्या हत्तीला संवय झाली होती. मुलाला वाचविण्याकरिता महातानें हत्तीला आवरण्याचा प्रयत्न केला. मुलाला पाहाताच नेहमींच्या संवयीनें आपला वेग एकदम थांबवून हत्तीनें बसण्याचा प्रयत्न केला तों त्याचा परिणाम तो कोसळण्यांत झाला. त्या धक्क्यानें महात दूर फेंकला गेला आणि एका गोपाळाच्या पट्टयानें त्याचें शिर धडावेगळें झालें. त्या अज्ञात इसमानें मुलाला झटकन् उचलून नेलें. हत्ती उठूं लागताच श्रीकृष्णानें चलाखीनें आपला भाला हत्तीच्या गंडस्थळावर इतक्या जोरानें मारला कीं, हत्ती कासावीस होऊन चीत्कार करूं लागला. पाठोपाठ बलरामाचा भाला हत्तीच्या गंडस्थळात रुतून बसला. हत्ती प्राणातिक वेदनेनें ओरडला. गोपाळांच्या भाले-बर्च्यांच्या आघातांनीं तो रक्तानें न्हाऊन निघाला. शेवटीं कृष्णाच्या भाल्यानें त्यानें गडबडा लोळून प्राण सोडिला. खालीं पडण्यानें व दंड्यांच्या भयंकर तडाख्यानीं खिळखिळे झालेले हत्तीचे दोन दात उपटून काढून कृष्णानें एक आपल्या हातांत घेतला व दुसरा बळरामाच्या हातांत दिला. हत्तीचे उपटलेले दात खांद्यांवर टाकून, विजयी रामकृष्ण रंगमंडपांत येऊन दाखल झाले त्यांच्या अंगावर हत्तीच्या रक्ताचे व मदाचे बिंदु पडले होते. तोंडावर घाम आल्यानें ते आधिकच शोभत होते. शेंकडों गोपमल्ल त्यांच्या पाठीमागें शिस्तींत उभे होते. कृष्णाचें तेज तर त्या वेळीं नुसतें ओसंडत होतें. कुवलयापीडासारख्या प्रचंड हत्तीला

लोळविल्याची वार्ता कानांवर येते न येते तोंच ती श्यामसुंदर तेजस्वी मूर्ति रंगमंडपांतील प्रेक्षकांसमोर येऊन उभी राहिली. त्या वेळीं कृष्णाकडे सर्वांची दृष्टि खिळून गेली. तीं कृष्णाची एकच मूर्ति पण हजारों प्रेक्षकांना ती निरनिराळ्या प्रकारची भासली. कमी अधिक वयोमानामुळें व भक्तिद्वेषादि विकारांमुळें ती प्रत्येकास निरनिराळी कशी भासली त्याचें उत्कृष्ट वर्णन पुढील श्लोकात केलें आहे.

> मल्लानामशनिर्नृणां नरवरः स्त्रीणां स्मरो मूर्तिमान् ।
> गोपानां स्वजनो सतां क्षितिभुजां शास्ता स्वपित्रोः शिशुः ।।
> मृत्युर्भोजपतेर्विराटविदुषां तत्त्वं परं योगिनाम् ।
> वृष्णीनां परदेवतेति विदितो रङ्गं गतः साग्रजः ।। १ ।।

(भा. द. सां. अ ४३, श्लोक १७)

पाहिलवानांना हें आपले प्राण घेणारें वज्र आहे असें वाटलें. तो सामान्य जनांना राजाप्रमाणें पूज्य वाटला, तरुण युवतींना मदनाप्रमाणें सुंदर, गोपाळांना आपला खेळगडी, दुष्ट राजांना आपला शास्ता, देवकी-वसुदेवादिकांना मुलासारखा, कंसाला प्रत्यक्ष मृत्यूसारखा, अज्ञजनांस पराक्रमशाली, योगिजनांना परब्रह्म, आणि वृष्णिकुलांतील लोकांना श्रेष्ठ देवतेसारखा तो दिसला. कंस मूळचा अत्यंत उग्र व धीर स्वभावाचा होता, तरी कुवलयापीडाला व त्याच्या महाताला यमसदनीं पाठवून तशा स्वरूपांत रामकृष्णांना रंगमंडपांत आलेले पाहून त्याला अतिशय भय वाटलें. तो क्रोधानें लाल होण्याऐवजीं अतिशय निस्तेज दिसूं लागला. काय बोलावें व काय करावें हें त्याला सुचेना. ह्या कृष्णानें मथुरेंत पाऊल टाकल्यापासून मथुरेच्या लोकांवर विलक्षण छाप पाडून, आपला आजपर्यंतचा राजेपणाचा दरारा लोकांच्या मनांतून नाहींसा केला. याचा नाश करण्याच्या आपल्या सर्व योजना यानें उधळून लावून आपल्या योजना ज्यांच्या कानांवर होत्या त्यांच्या दृष्टीनें आपणाला तुच्छ करून टाकलें. आजपर्यंत आपल्या मर्जीतल्या कोणत्याहि गोष्टीकडे कानाडोळा करून पाहण्याची कोणाची छाती नव्हती. पण ह्या कृष्णानें आपल्या मर्जीतला

कोणताहि मनुष्य दृष्टीस पडतांच त्याची दैना करून त्याला यमसदनास पाठविण्याचा निश्चयच केलेला दिसतो. आज तर आपल्या अत्यंत आवडत्या कुवलयापीडाचा व त्याच्या महाताचा नाश करून दरबारी मंडळी व मांडलिक राजे यांच्या समक्ष आपला बोजवारा उडवून आपली परमावधीची नाचक्की ह्यानें केली. कृष्णाला रंगमंडपांत येऊन उभा राहिलेला पाहतांच कंसाच्या मनांत असे नाना प्रकारचे विचार येऊं लागले. कंसाच्या विरुद्ध आपापल्या घरीं एकमेकाशीं बोलणें मोठें धोक्याचें समजलें जात होतें. चव्हाट्यावर कंसमहाराजांच्या विरुद्ध शब्द उच्चारणें म्हणजे मृत्यूला आपण होऊन बोलावण्यासारखें लोक समजत. मग प्रत्यक्ष कंसमहाराजाच्या समोर त्याची आगळिक करण्याची कोणाची छाती नव्हती, हें निराळें सांगण्याची जरुरी नाहीं. कंसाची परमावधीची आगळिक करून आज त्याच्यासमोर रंगमंडपात विजयी वीर म्हणून उभे राहून रामकृष्ण त्याला जणूं काय आव्हानच देत आहेत, असा देखावा दृष्टीस पडताच आतां काहीं तरी भयंकर प्रकार होणार असें सर्वांना वाटूं लागलें.

पराकाष्ठेचे क्रूर दानवमंत्री व दानवसरदार आणि महामुत्सद्दी भोजमंत्री व महाप्रतापी भोजसेनापति कंसाच्या दोन्ही बाजूंना हजर असतांना रामकृष्ण अद्याप जिवंत उभे आहेत असें पाहून दुष्ट लोक मनातल्या मनांत चडफडत होते. महाक्रूर कंसाची अरेरावी संपुष्टांत आल्याचें हें चिह्न आहे असे वाटून सज्जन आनंदित झाले होते. रामकृष्ण गोपालांसह रंगमंडपांत येतांच थांबविण्यांत आलेली मल्लक्रीडा पुनः सुरू करण्याचा इषारा म्हणून रणवाद्यांना सुरवात झाली. मल्लक्रीडा पाहण्याकारितां आसनांवर जाऊन बसा, असें रामकृष्णांना अगर गोपालांना त्यांच्याजवळ जाऊन सांगण्याचा कोणासच धीर होईना. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यानंतर मल्लाग्रणी चाणूर ओरडून म्हणाला, ' अरे गवळ्यांच्या पोरानों ! अरे रामा, अरे कृष्णा, तुम्ही बलाढ्य आहां, वीर आहां, असें आमच्या कंसमहाराजांनीं अनेकाच्या तोंडून ऐकलें आहे. तेव्हां तुमचा पराक्रम प्रत्यक्ष अवलोकन करावा, म्हणून मुद्दाम अक्रुराबरोबर

निमंत्रण पाठवून त्यांनीं तुम्हांस येथें आणविलें आहे. शरीरानें, मनानें व वाणीनें राजाचें प्रिय इच्छिणाऱ्या प्रजा कल्याण पावतात; याविरुद्ध वर्तन केल्यास दुःख पावतात, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे, हें तुमच्या लक्षांत आलें असेलच. कृष्णा, मी तुला कुस्ती खेळण्याचें आव्हान देत आहें. मनांत भीति न धरतां माझ्या आव्हानाचा स्वीकार करून माझ्याबरोबर कुस्ती खेळ व आपलें काय बळ असेल तें दाखव रामानें मुष्टिकाशीं युद्ध करून आपल्या पराक्रमाचे काय दिवे लावावयाचे, ते लावून दाखवावे. ह्या गवळ्यांच्या पोरांशीं खेळण्याकरितां जोडीदार मी देतों. त्यांच्याहि खेडवळ पराक्रमाचा तमाशा लोकांच्या दृष्टीस पडेल. आतां भ्याडपणानें कांकूं न करितां कुस्त्यांना तयार व्हा. तुमच्या पराक्रमाच्या ऐकलेल्या कथा कशा फोल आहेत हें मला आमच्या राजाधिराज कंसमहाराजांना दाखवावयाचें आहे.' असें गर्वानें व उद्धटपणानें बोलून त्यानें आपलें दंड थोपटले. तें पाहून कंसाला थोडी आशा वाटूं लागली. त्यावर कृष्ण काय उत्तर देतो, इकडे सर्वांचें लक्ष लागलें. चाणूर-मुष्टिकांसारख्या धिप्पाड व मोठ्या बलाढ्य, कसलेल्या मल्लांनीं रामकृष्णांसारख्या पंधरासोळा वर्षांच्या मुलांना कुस्तीचें आव्हान द्यावें हें सर्व प्रेक्षकांना फार चमत्कारिक वाटलें. शस्त्रास्त्रांनीं युद्ध करण्यांत कुशल असणाऱ्या रामकृष्णाना द्वंद्व-युद्धात चिरडून टाकावें असा त्या राक्षसमल्लांचा दुष्ट हेतु सर्वांच्या ध्यानात येऊन रामकृष्णांनीं हें कुस्तीचें आव्हान स्वीकारूं नये असें सर्वांना वाटलें.

कृष्णानें आपल्या गोपमित्रांशीं थोडा विचार करून बोलायला सुरुवात केली. कृष्ण म्हणाला, "चाणुरा, आम्ही कंसमहाराजाची प्रजा आहों व त्यांची इच्छा पुरी करणें हें आमचें कर्तव्य आहे, असें तूं दैत्य, धर्मशास्त्राचा आधार दाखवून बोलूं लागला आहेस, हें पाहून, ही तुझी स्वतःची अक्कल नसून तुला बोलविणारा कोणीतरी निराळा आहे, हें आम्हीं ओळखिलें आहे हें नीट ध्यानांत धर. पाहिजे तितकें आणि पाहिजे तें खायला घालून मुद्दाम माजविलेल्या रेड्यासारख्या नर-पशूबरोबर अविचारानें द्वंद्व खेळणें ह्याला कोणीहि पराक्रम म्हणत नाहींत, हें तुझ्यासारख्या मल्ल

व पराक्रम कशाला म्हणतात हें माहित नसणाऱ्या माणसाला कळणें शक्य नाहीं ! तुझ्यासारख्या माजावलेल्या मल्लानें माझ्यासारख्या लहान मुलाला कुस्तीचें आव्हान दिलें ह्यांतच तुझी अक्कल सर्वांना कळून आली असेल. लहान मुलांना कुस्तीचें आव्हान देऊन तूं मल्ल-विद्येला व आपल्या वस्तादजींना खालीं मान घालायला लावण्याचा मूर्खपणा बिनदिक्कत केलास आम्ही खेडवळ लोक. रानात गाई चारण्या एवढेंच आम्हांला ठाऊक. शहरातील पहिलवानासारखे आम्हांला कुस्त्यातील डावपेंच येत नाहींत. तथापि तुमच्या आग्रहावरून आम्ही कुस्तीस तयार होत आहों. मात्र आम्ही मुलें आहों म्हणून मुलांबरोबरच आमची कुस्ती झाली पाहिजे हें तुम्ही विसरता कामा नये. 'जोडीदाराबरोबर मल्लयुद्ध झालें नाहीं,' असें लोकांनीं म्हणूं नये व तुमच्या वस्तादजींस अधर्म-युद्धाचा दोष लागूं नये असें आम्हांला वाटते." चाणुरादिकाचा पाणउतारा होऊन त्यांना लाज वाटेल आणि त्यांचें अवसान खचेल असें कृष्णाचें मर्मभेदक पण प्रसंगोचित भाषण ऐकून अपमानित झालेला चाणूर चिडून म्हणाला, "अरे गवळ्याच्या पोरा, कुवलापीडासारख्या, हजार हत्तींचें दळ असलेल्या आमच्या गजराजाला तूं सहज मारिलेंस असें लोकांना भासविण्याकरितां गजदंत खांद्यावर टाकून येथें आढ्यतेनें प्रेक्षकांसमोर उभा राहिला आहेस, आणि भ्याडपणानें कांहीं तरी सबब सांगून कुस्तीचें आव्हान नाकारीत आहेस. पण ध्यानात ठेव, तुला आम्ही आज रंगणांत खेंचून तुझी हड्डी नरम केल्याशिवाय राहणार नाहीं." एवढें चाणूर म्हणाला मात्र. आपल्या अंगावरचा कपडा झटकन् काढून कृष्ण विजेसारखा आंखाड्यांत उतरून दंड थोपटून उभा राहिला. रामानें व शेंकडों गोपांनीं त्याचें अनुकरण करून आंखाड्यात चलाखीनें उड्या घेऊन दंड थोपटले. त्यांच्या दंड थोपटण्याच्या आणि आव्हानाचा स्वीकार केल्याच्या गर्जनांनीं तो प्रचंड आंखाडा इतका दणाणून गेला कीं, सर्व प्रेक्षक भयचकित झाले व मल्लांचें निम्में अवसान नाहींसें झालें.

कृष्ण गर्जना करीत म्हणाला, "चाणुरा, मुष्टिका, असे पुढें या. कोण

कोणाची हड्डी नरम करतो हें सर्व लोकांना दिसूं द्या. गोपाल हो, ह्या ऐतखाऊ मल्लाना रंगणात खेंचा. स्वकष्टानें पोट भरणाऱ्या खेडवळांचा हिसका, राजाच्या मेलेल्या अन्नावर पोसलेल्या ह्या ऐदी मल्लांना कळूं द्या." कृष्णाच्या चलाखपणानें, आवेशयुक्त भाषणानें व त्या सर्व देखाव्यानें, चाणूरमुष्टिक मनात कचरले. पण त्यांना आतां आंखाड्यात उतरण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. ते आंखाड्यांत उतरले. गोपालांनीं पुढें दिसेल त्या मल्लाला आखाड्यात खेंचण्यास सुरुवात केली. चाणुरानें कृष्णाशीं आणि मुष्टिकानें रामाशीं हातास हात मिळविले. त्यांनीं प्रतिपक्षावर चढाई करण्याचा प्रयत्न चालविला. गोपाळापैकीं बऱ्याच गोपाळानीं मिळालेल्या मल्लाबरोबर द्वंद्वाला सुरुवात केली. जोडीदार न मिळाल्यामुळें पुष्कळ गोपाळ उत्तेजनपर शब्द मोठ्यानें उच्चारीत आवेशानें आरोळया देत उभे राहिले. त्या प्रचंड आखाड्यात अनेक कुस्त्या एकदम सुरू झाल्या. प्रत्येकाला आपला जय व्हावा असें वाटत असल्याने जो तो दुसऱ्यास जिंकण्याकरिता अटोकाट प्रयत्न करूं लागला. आखाड्यात धिम्मेपणानें दंडाला दंड, मस्तकाला मस्तक, छातीला छाती भिडवून डावपेंच करीत खेळण्याची संवय असणाऱ्या कंसाच्या मदोन्मत्त धुडाना चलाख गोपाळाच्या खेळण्याच्या पद्धतीनें गोंधळून सोडिलें. प्रतिपक्षाच्या हातीं न लागतां त्याला मुष्टिप्रहार चारता यावेत म्हणून ते त्याच्याभोंवतीं विजेच्या चपलतेनें गरगर फिरत राहून त्याला स्वतःभोंवतीं भोंवळ येईतों गरगर फिरायला लावीत. कित्येकदा त्या प्रतिपक्षी धुडाना तें फिरणें असह्य होऊन भोंवळ येऊन ते फिरण्याचे थांबले कीं लाथाबुक्क्यांनीं गोपाळ त्याना कासावीस करीत. कृष्णाच्या चपलतेमुळें त्याच्यावर प्रेक्षकांची नजर ठरेना. चाणुराला तर जग फिरायला लागलें असें वाटूं लागलें. एकदां कृष्ण आपल्या हातांत आला असें वाटून दांतओंठ खाऊन त्याला विळखा घालण्याचा त्यानें प्रयत्न केला तों कृष्ण त्याच्या मिठींतून एकदम वर उसळला. कृष्णानें पुरुषभर उंच उडी मारिलेली पाहून त्याला धरण्याकरितां चाणूर वर पाहतो तों बहिरीससाण्याप्रमाणें त्याच्यावर झडप घालून चाणुराच्या नाकावर व तोंडावर त्यानें इतके झपाझप प्रहार केले कीं चाणुराचें नाकाड फुटून

त्याचे दांत पडले व तो रक्तानें न्हाऊन निघाला, आणि घाबरा होऊन ताडवृक्षासारखा खालीं कोसळला. त्याबरोबर त्याच्या वक्षस्थळावर कृष्णाच्या वज्रमुष्टीचे असंख्य प्रहार झाल्यामळें त्याला रक्ताच्या गुळण्या-वर गुळण्या येऊं लागल्या व शेवटीं कृष्णाचे प्रहार असह्य होऊन त्यानें रक्तात लोळण घेऊन तडफडत आपली इहलोकींची यात्रा संपविली. ह्याच वेळेला रामानें मुष्टिकाचीहि गठडी वळली. प्रेक्षकानीं टाळयांचा कडकडाट करून रामकृष्णाच्या नावांचा जयजयकार केला. गोपाळांसमोरचे मल्ल पटापट पडूं लागले. रामाच्या अंगीं तर इतका आवेग संचारला होता कीं तोशल नांवाच्या दैत्य मल्लाला त्यानें तगडी धरून उभा चिरला. या प्रमाणें चाणूर, मुष्टिक, शल, तोशल वगैरे अनेक मल्लाचे एका मागून एक वध झाल्यावर उरले सुरले किरकोळ पहिलवान जीव बचावण्या-करिता वाट सापडेल तिकडे पळत सुटले.

सर्व मल्लांचा निःपात झाला तरी रामकृष्णाच्या व गोपाळांच्या अंगीं संचारलेला रणावेश उतरेना. त्यानीं दांडपट्टे, भाले, बर्च्या, धनुष्यें वगैरे आपलीं शस्त्रें हातात घेऊन रणवाद्यांच्या तालावर, रणनाच करावयास सुरुवात केली. सर्व प्रेक्षक 'शाबास शाबास' असें म्हणून त्यांची तारीफ करूं लागले. जितके प्रयत्न करावे तितक्या सर्वांत आपणांस अप-यशच येत आहे असें पाहून कंस पराकाष्ठेचा संतापला. एकदम त्यानें सर्व वाद्यें बंद करण्याची आज्ञा दिली व आपल्या अधिकारी लोकास उद्देशून म्हटलें, "पहाता काय ! ह्या नंदाच्या दुराचारी पोरांना व सर्व गवळयांना आत्तांच्या आत्तां गावाबाहेर हांकलून द्या. उशीर लावला तर खबरदार ! गोपांचें सर्व धन हरण करा. दुष्ट नंदाच्या मुसक्या बांधा. दुर्बुद्धि वसुदेवाला बिलकूल विचार न करतां ठार करा. उग्रसेन माझा बाप असला तरी त्याची गय करूं नका. हा शत्रूला फितूर झाला आहे. त्याच्या साथीदारांसह त्याचाहि शिरच्छेद करा." याप्रमाणें चीड उत्पन्न करणारें कंसाचें असंबद्ध भाषण श्रवण करून श्रीकृष्णाच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली. तो कोणाकडून तरी काहीं आगळिक होण्याची वाट पाहूं लागला.

कंसानें संतापून एवढें भाषण केलें तरी त्याचे अधिकारी कांहींच हालचाल करीनात, हें पाहून कंसाच्या रागाचा पारा परमावधीला पोहों-चला. त्याची विचारशक्ति नाहींशी झाली. तो सिंहासनावर ताडकन उभा राहिला. त्यानें आपलें खड्ग उपसलें व ओरडून म्हणाला, 'फितूर, फितूर! सर्वच निमकहराम फितूर झाले! आता ह्या कंसाचें सामर्थ्य पाहा. ह्या सर्व अरिष्टाचा जनक व फितुरांचा नायक वसुदेव त्याचा हें खड्ग शिर-च्छेद करतें आहे, तो चमत्कार पाहा.' असें म्हणून वसुदेव, ज्या बाजूला बसला होता त्या बाजूला सिंहासनावरून उडी मारण्याकरितां तो वळला मात्र, शेकडों यादववीरांच्या व भोज सरदारांच्या तरवारी त्याचा प्रति-कार करण्याकरितां म्यानांतून बाहेर पडल्या. तें पाहून दानववीर त्यांच्या-वर धांवले. शस्त्रांचा खणखणाट सुरू झाला. इतक्यांत कृष्णानें पटकन कंसाच्या सिंहासनावर उड्डाण केलें. अकस्मात आपला शत्रु सिंहासनावर चढलेला पाहून कंस घाबरला व मोठ्यानें ओरडला. तितक्यांत दानव सेनापति दानव सैन्यासह मंडपांत घुसला. मंडपांतले दानव सरदार आत घुसलेलें दानव सैन्य कंसाच्या मदतीला धांवलें. यादववीर व भोजसरदार त्यांच्यावर तुटून पडले. प्रेक्षक तर जीव घेऊन केव्हांच पसार झाले होते. कंसाच्या हातांतलें खड्ग कृष्णानें आपल्या खड्गानें उडवून देऊन त्याला सिंहासनावरून खालीं ढकलला. यादववीर, भोजसरदार, ह्यांनीं पराक्र-माची शिकस्त केली. त्यांच्या मदतीला गोपालांचे दाडपट्टे चालू होतांच दानव सैन्यांतील सैनिकांचीं मुंडकीं भराभर उडूं लागलीं. सिंहासनावरून खालीं पडलेल्या कंसाची मानगूट धरून कृष्ण त्याला क्रोधानें म्हणाला, "मूर्खा, पाहा. तुझ्या दानव सैनिकांचीं मुंडकीं कशीं उडत आहेत तीं नीट पाहा, ही भयंकर हत्या तुझ्या दुष्टपणामुळें होत आहे. तुझे सर्व अपराध आठव. वसुदेवमहाराजांच्या लहान अर्भकांचीं-माझ्या भावांचीं मस्तकें दुष्ट दानवांच्या हातून उडालीं असें ऐकतांच तुला जो आनंद झाला, त्याचा परिणाम म्हणून हीं हजारों दानवांचीं मुंडकीं नाचत आहेत, तीं डोळे आहेत तोंपर्यंत नीट पाहा. गोकुळाचा नाश करण्या-करितां तूं भयंकर दैत्य पाठविलेस. गोकुळाची धुळधाण उडण्याच्या ऐवजीं

तुझ्या मथुरेची धुळधाण उडविण्याकरितां हे पराक्रमी गोपालांचे पट्टे विजे-सारखे चमकत आहेत. नीट पाहा. ज्यांचा नाश झाल्याबद्दल तूं समाधान मानीत होतास, ते माझे भाऊ सर्व जिवंत असून हिमाचलाच्या पाताल प्रदेशांत सुखानें वावरत आहेत, ही नारदानीं सांगितलेली हकिगत ऐकून आतां केवढा मोठ्यानें आक्रोश करावयाचा असेल, तो प्राण आहेत तों करून घे. ज्यांच्या जिवावर उठण्याची तुला शरम वाटली नाहीं ते दयार्द्र अंतःकरणाचे वसुदेव, नंद, उग्रसेन, तुजबद्दल रदबदली करायला येण्याचे पूर्वीच तुला मी यमसदनाला पाठवितों. ज्यांच्या जिवावर तूं उड्या मारीत होतास, त्या जरासंधाला, नरकासुराला, बाणासुराला कंठरवानें हांका मार. ईश्वराचें नाव तुझ्या मुखांतून येणार नाहींच. माझ्याकडे तरी नीट पाहा." असें म्हणून आपल्या हातून सुटण्याची धडपड करणाऱ्या कंसाचें मस्तक श्रीकृष्णानें आपल्या खड्गानें उडविलें.

तें पाहून यादववीरांनीं, भोजानीं व गोपाळांनीं कृष्णाचा जयघोष केला. कंसाचे कंकादि आठ भाऊ त्याचा सूड घेण्याकरितां रामकृष्णांवर धांवले. पण रामानें आपल्या परशूनें त्यांचीं खांडोळीं करून त्याना कंसाच्या भेटीला पाठवून दिलें. बहुतेक दानवांचा निकाल लागला होता. उरले सुरले जीव घेऊन मंडपाच्या बाहेर पळाले. मथुरेच्या वेशीच्या बाहेर पडतांच नगररक्षणाकारितां खड्या असलेल्या भोज सैन्यानें त्यांचा निकाल लावला. कंसवधाची ही वार्ता मथुरा नगरींत हां हां म्हणतां पसरली. कृष्णाच्या नांवाचा जयघोष सर्व शहरभर सुरू झाला. राजप्रासादांत कंसाच्या स्त्रिया आक्रोश करूं लागल्या. देवकीच्या प्रासादांतील स्त्रियांच्या नेत्रांत आनंदाश्रू आले. वसुदेवाचा वाडा आनंदानें भरून गेला. देवकी पुत्र-दर्शनाकरितां उतावीळ झाली.

रंगमंडपांत कंसाचा वध केल्यानंतर विजयी रामकृष्णांनीं पहिल्या प्रथम नंदाच्या पायांवर मस्तक ठेविलें. नंतर वसुदेवाचे पायांवर मस्तक ठेवतांच त्यांच्या व वसुदेवाच्या अंगावर हर्षरोमांच उभे राहिले. वसुदेवानें दोघांना आपल्या हृदयाशीं घट्ट धरलें. आपल्या आनंदाश्रूंनीं रामकृष्णांना त्यानें स्नान घातलें. तो सद्गदित होऊन म्हणाला, "आतां अगोदर आपल्या

मातेला भेटा." रामकृष्ण आनंदानें निघाले. निघतांना त्यांनीं भोजमंत्री भोज सेनापति, भोज सरदार व सैनिक ह्यांना कृतज्ञतेनें प्रणाम केला. "तुमच्या मदतीनें हें सर्व कार्य आम्हांला करतां आलें. तुम्हींच हा आनंद-दायक प्रसंग घडवून आणलात. यापुढेंहि मथुरेच्या राज्याचें रक्षण करण्याचें कार्य तुम्हांलाच केलें पाहिजे. मथुरेच्या राज्याचे आधारस्तंभ तुम्हीच आहां." असें सद्गदित कंठानें म्हणून कृष्णानें सर्व भोजांचीं मनें आपलींशीं करून घेतलीं. कृष्णाच्या नम्रपणामुळें, भोज त्याचे जिवलग मित्र बनले. वसुदेवानें आपल्या दोन्ही पुत्रांचे हात धरून सर्व गोपालांसह त्यांना आपल्या वाड्यांत नेलें. वाड्यांत शिरताना मंगल वाद्यें वाजूं लागलीं. वाड्यांतल्या स्त्रिया पंचारती घेऊन रामकृष्णाना ओवाळण्याकरितां उभ्या होत्या. रामकृष्णाना पाहतांच नोकरानीं त्याच्यावरून भात ओवाळून टाकला. नारळ ओवाळून ते फोडले. त्याच्या पायांवर उष्णोदक घालून त्यांना आत येण्याची विनंति केली वसुदेवाच्या सर्व स्त्रियानीं रामकृष्णांच्या भालप्रदेशीं मंगल तिलक व अक्षता लावून त्यांना पंचारतीनें ओवाळलें, व त्यांच्या मुखांत लोणी-साखर घातली. रामकृष्णांनीं आपल्या सर्व सापत्न मातांच्या चरणांना पाहिल्याप्रथम वंदन केलें व 'माताजी, तुमच्या कृपेनें आमचें रक्षण करून आम्हांला तुमचें पुण्यदर्शन घडाविलें' असें म्हणून त्यांना पुनःपुनः प्रणाम केला. सर्व मातांनीं त्याच्यावर मंगल आशीर्वादांचा अंतःकरणपूर्वक वर्षाव केला. आपापल्या पुत्रांइतके रामकृष्ण त्यांना आवडूं लागले. सर्व सापत्न मातांचे आशीर्वाद मिळाविल्यानंतर त्यांनीं देवकीच्या चरणांवर आपलीं मस्तकें ठेविलीं. अहाहा! माता-पुत्रांच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. देवकीमातेनें दोन्ही पुत्रांना आपल्या हृदयाशीं धरून त्यांना आपल्या पवित्र आनंदाश्रूंनीं अभिषेक केला. त्यावेळचा आनंद काय वर्णावा! कृष्ण लाडिकपणानें म्हणाला, "आई. आम्हीं जन्माला आल्यापासून तुला दुःखच दिलें, पण त्यांत आमचा कांहीं दोष नाहीं यापुढें तुला नित्य सुखांत असलेली पाहावयाचें हें एकच आमचें ध्येय राहील. आमच्यावर अनंत संकटें आलीं. पण तीं सर्व नाहींशीं झालीं. आम्हांला आश्चर्य वाटें कीं आमचें रक्षण कोण करितो.

आता त्याचा उलगडा झाला. आई, तुझें प्रेम आमच्या पाठीशीं नित्य उभें होतें ! तेंच आमचें रक्षण करीत होतें ! " कृष्ण असें म्हणत असताना माता व दोन पुत्र यांच्या डोळ्यातून वाहणाऱ्या आनंदाश्रूंचा त्रिवेणी संगम झाला. देवकी वसुदेवाकडे कृतज्ञतेनें पाहात पाहात रामकृष्णांना म्हणाली, "लाडक्यानो, माझें प्रेम तुमचें रक्षण करीत होतें, ही तुमची पवित्र भावना तुमच्यासारख्या मातृवत्सल पुत्राच्या ठिकाणीं असणें स्वाभाविक व योग्यहि आहे. पण बाळांनो, तुमच्या परमपूज्य पितृदेवतेचा मुत्सद्दीपणा तुमचें रक्षण करण्याकरिता तुमच्या भोंवतीं अहोरात्र खडा पहारा करीत होता, हें मी सारखी पाहात होतें." प्रिय पत्नीचें भाषण ऐकून वसुदेवाच्या नेत्रातून टपटप आनंदाश्रू गळूं लागले. त्रिवेणीसंगमाचा पवित्र प्रवाह आनंदाश्रुसरोवराला मिळून मथुरेंतील सर्व भूमि पावन झाली.

उग्रसेनाची स्थिति मोठी चमत्कारिक झाली होती. आपल्या दुष्ट पुत्राच्या जाचानें त्रस्त झालेले आपले असंख्य प्रजाजन कंसवध करून कृष्णानें सुखी केले, ह्याबद्दल त्याच्या एका डोळ्यातून आनंदाश्रू येत होते, तर पुत्राच्या वियोगाने स्वाभाविक येणारा दुःखाचा उमाळा त्याच्या दुसऱ्या डोळ्यातून दुःखाश्रुरूपाने बाहेर पडत होता. उध्वस्त झालेल्या रंगमंडपात, रक्तानें माखलेल्या, धुळींनें भरलेल्या, कंसाच्या शवाजवळ त्याच्या स्त्रिया शोक करीत होत्या. कंसाच्या आठहि भावाच्या बायका आपल्या पतींच्या मरणाबद्दल आक्रोश करीत होत्या. ते त्यांचें दुःख पाहून उग्रसेनाच्या अंतःकरणांत कालवाकालव होत होती. आपल्या सर्व पुत्रांचा अंत्यसंस्कार करण्याकरितां आता विजयी कृष्णाची अनुज्ञा घ्यावी लागेल, असें जाणून उग्रसेनानें ती मिळविण्याकरिता, व कंसाला तो राजा असल्यामुळें त्याच्या ऐश्वर्याला शोभेल असा त्याचा अंत्यसंस्कार होणें योग्य असल्यामुळें, कृष्णाकडे त्यासंबंधीं परवानगी मागण्यासाठीं मध्यस्थ म्हणून अक्रुराची योजना केली. अक्रूरानें वसुदेवाच्या वाड्यांत येऊन मातापित्यांच्या सांनिध्यांत सुखगोष्टी करीत बसलेल्या कृष्णाला उग्रसेनाचें म्हणणें सांगतांच कृष्णाचें अंतःकरण कळवळलें. कंसाबद्दल त्याच्या

पित्याचा व त्याच्या स्त्रियांचा चाललेला शोक अक्रूरानें कृष्णाच्या कानावर घालतांच आपल्या कट्टया शत्रूबद्दलहि त्या दयाघनाच्या डोळयांत अश्रू आले. त्यानें अक्रूरामार्फत उग्रसेनाला निरोप पाठविला कीं, 'महाराज, माझी परवानगी मागण्याचें कांहींच कारण नाहीं. कंसमहाराजांच्या ऐश्वर्याला शोभेल, असा त्यांचा व त्याच्या भावाचा अंत्यसंस्कार अवश्य झाला पाहिजे. आपल्याला पुत्रशोक देण्याचा मीं घोर अपराध केला आहे. पण असंख्य जनांचें हित साधण्याकरिता मीं हें कृत्य केलें, असें जाणून मला, आपल्या लेंकराला, आपण क्षमा करावी.' कृष्णाचा हा नम्रपणा पाहून तसल्या दुःखांतहि उग्रसेनाला कृष्णाबद्दल आदर वाटूं लागला. मग त्यानें आपल्या पुत्राचे अंत्यसंस्कार यथाविधि करविले.

यानंतर लवकरच कृष्णानें उग्रसेनाची भेट घेतली. मातामह देवक, पिता वसुदेव, स्नेही अक्रूर, भोजमंत्री व सेनानी ह्या सर्वांस त्यावेळीं मुद्दाम कृष्णानें बोलावून आणिलें होतें. त्या सर्वांदेखत उग्रसेनाला साष्टांग नमस्कार घालून व हात जोडून कृष्ण म्हणाला, "महाराज! आजपासून मी आपल्याला यादवाचें आधिपत्य दिलें आहे. हे भोजमंत्री पूर्ववत् आपल्याला सल्लामसलत देऊन राज्यकारभार चालविण्यास मदत करतील. आपण आपल्या इच्छेप्रमाणें प्रजाजनांवर राज्य चालवा. मी नात्यानें आपला नातू असलों तरी आपल्या प्रजाजनांपैकीं एक आहें, असें समजून मला आपण प्रजेचें हित साधण्याकरिता कोणतीहि आज्ञा करावी, मी ती शिरसावंद्य मानून आपल्या उपयोगीं पडण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करीन." इतकें सांगितल्यावर श्रीकृष्णानें उग्रसेनाला पुनः राज्याभिषेक करविला. आपल्या अलौकिक पराक्रमानें एवढें अफाट राज्य प्राप्त करून घेतलें असतां, त्याचा यत्किंचितहि लोभ न धरितां, तें यादवांचें राज्य म्हणून उग्रसेनाच्या हवालीं करण्यांत कृष्णाचा मुत्सद्दीपणा व अलौकिक स्वार्थत्याग पाहून सर्वांना तो देवाप्रमाणें वंद्य वाटला. उग्रसेनाला तर फारच गहिंवर आला. त्यानें कृष्णाला प्रेमभरानें आलिंगन देऊन म्हटलें, "कृष्णा, तुझ्या आज्ञेनें मी राज्याचा अधिकार स्वीकारतों, पण एका अटीवर. मी नुसता नांवाचा राजा म्हणून सिंहासनावर बसेन. राज्य सुरळीत

चालविण्याची सर्वतोपरी जबाबदारी तूं घेतली पाहिजेस." उग्रसेनाचें हें भाषण ऐकून श्रीकृष्ण हंसून म्हणाला, "माझे आजोबा देवकमहाराज, ह्यांच्या सल्ल्यानें त्यांचे पुत्र मदतीला घेऊन मी राज्य चालविण्याची जबाबदारी पत्करितों. तुम्ही निर्धास्त असा. माझे परमपूज्य पराक्रमी पिताजी वसुदेव दरबारांत असतांना तुम्हाला कोणत्याहि शत्रूपासून धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. माझे वडील बंधु बलराम मला साहाय्य देण्यास तयार असल्यावर मला कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं." कृष्णाचें भाषण ऐकून मोठमोठ्या मुत्सद्दी पुरुषांनींहि माना डोलाविल्या. कृष्णाचा मुत्सद्दी-पणा तसाच अलौकिक होता. त्यानें किती गोष्टी साधल्या पाहा. देवकाला स्वतला राज्यलोभ फारसा कधींच नव्हता. उग्रसेनाला आतां एकहि मुलगा नसल्यामुळें त्याच्या पाठीमागें राज्याचे वारस देवकाचे पुत्रच होते. वसुदेवाच्या सल्ल्याशिवाय आता दरबारातलें एकहि पान हालणार नाहीं, अशी परिस्थिति निर्माण झाली होती. भोजमंत्री पूर्ववत् अधिकारी असल्यामुळें त्यांचीहि कांहीं तक्रार नव्हती. एका उग्रसेनाला गादीवर बसाविण्यांत उग्रसेन, देवक व त्याचे मुलगे, सर्व सत्ताधारी वसुदेव महाराज व बंधु बलराम या सर्वांना कृष्णानें संतुष्ट केले. स्वतः श्रीकृष्णानें मथुरेच्या राज्याचा लोभ धरला असता तर स्वतःच्या वाडिलांना व वडील बंधु बलराम याला बाजूला ठेवून, राज्य बळकाविल्याचा दोष त्याच्यावर येऊन, यादवांमध्यें दुफळी झाली असती. देवकाच्या मुलाचा राज्यावरचा हक्क बुडाविल्यामुळें यदुकुलापैकीं अंधक घराण्याचें शत्रुत्व कायमचे मागें लागलें असतें. यदुकुलापैकीं भोज घराण्यांतल्या लोकांनीं आणखी काय काय कारस्थानें केलीं असतीं कोणाला ठाऊक! श्रीकृष्णाच्या निर्लोभीपणानें, स्वार्थत्यागानें, असे कितीतरी अनर्थ टळले. कंसाच्या भीतीनें देशत्याग करून चोहोंकडे पांगलेले आपले ज्ञातिबांधव, कृष्णानें आदरानें निमंत्रण करून आणविले. त्यांत यदु, वृष्णि, अंधक, मधु, दाशार्ह, कुकुर इत्यादि घराण्यांतील यादव राजे, सरदार, जामिनदार, असे अनेक लोक होते. ते बिचारे परदेशीं राहून काळजीनें क्षीण झाले होते. त्यांचें मृदु शब्दांनीं शांतवन करून, व कंसानें बळकाविलेली त्यांची दौलत त्यांच्या स्वाधीन

करून, त्यांनीं आतां सुखानें आपापल्या ठिकाणीं कालक्रमणा करावी, सर्वांनीं एकोप्यानें राहून आपलें बळ वाढवावें, आणि आपली सर्वांगीण उन्नति करावी, असें त्यांना आग्रहपूर्वक सांगितलें. अशा रीतीनें ज्ञाति-बांधवांना संतुष्ट राखून, त्याना योग्य मार्गदर्शन करण्याचा कृष्णानें प्रयत्न केला. त्याचे उत्तम फळ पुढें दिसून आलें. यादव कुलातील सर्व घराण्यांची प्रचंड संघटना होऊन सर्व यादव कुल आर्यावर्तात अत्यंत प्रबळ व अजिंक्य म्हणून गाजलें.

रामकृष्णाबरोबर मथुरेंत आलेल्या नंदादि गोपालाना उग्रसेन-वसु-देवानें चार महिने आग्रहानें ठेवून घेतलें होतें. कृष्ण हा आपला पुत्र नसून वसुदेव–देवकीचा पुत्र आहे, हें नंदाला मथुरेंत कंसवधानंतर कळून आलें होतें. तो मनातून खट्टू झाला होता. पण कृष्णावर त्याचें अकृत्रिम प्रेम होतें व तें तसें कायम राहील अशी कृष्णानें आपली वाग-णूकहि ठेविली होती. प्रात:कालीं मुखमार्जनविधि आटोपतांच कृष्ण पहिल्या प्रथम नंदबाबांच्या पायांवर मस्तक ठेवून त्याचा आशीर्वाद घेई आणि मग वसुदेव–देवकी याचें दर्शन घेत असे. आपल्या गोपमित्राशीं तर तो गोकुळांतल्याप्रमाणेंच मिळून मिसळून वागे. चार महिने झाल्यावर गोपाळांना वारंवार घरची आठवण होऊं लागली. नंदादि प्रौढांनाहि आपलें घर दिसूं लागलें. नंदाला गोकुळात जाण्याची उत्सुकता होऊं लागली व संकटहि वाटूं लागलें. यशोदेसारख्या प्रेमळ मातेला, आपला एकुलता एक पुत्र, पण तोहि आपला पुत्र नसून देवकीचा पुत्र आहे, ही भयंकर वार्ता कळवावयाची होती. ही वार्ता कळल्यावर तिची स्थिति काय होईल ! आपल्याला वृद्धपणीं झालेली मुलगीहि वसुदेवानें केलेल्या कारस्थानांत नाहींशी झाली. आपला पुत्र म्हणून ज्याला आपण पंधरा सोळा वर्षें तळहातावरच्या फोडाप्रमाणें वागविलें, ज्याच्यावर आपण प्राणापेक्षांहि अधिक प्रेम केलें, तो पुत्र दुसऱ्याचा म्हणून आपल्याला अंतरला व आपल्याला झालेली मुलगी राजकारस्थानाला बळी पडून आपल्याला नाहींशी झाली, ह्या भयकर वेदनेनें यशोदा तळमळूं लागेल, तेव्हां तिचें समाधान करणें अशक्य आहे असें वाटून, नंद मनांतल्या

मनांत झुरूं लागला. नंदाची ही मनस्थिति कृष्णानें ओळखली. नंद व यशोदा यांचें समाधान कसे करतां येईल हें त्यालाहि मोठें कोडे पडलें. कृष्णानें वसुदेव–देवकीजवळ बोलतांना ही गोष्ट काढली. नंद व यशोदा यांचें समाधान आपल्याला करिता आलें नाहीं, तर मला मथुरा सोडून गोकुळात नंदयशोदेजवळ राहणेंच अवश्य होणार आहे. पंधरा सोळा वर्षे ज्यांनीं पुत्र म्हणून माझें अत्यंत प्रेमानें पालन पोषण केलें, त्यांना दुःखांत ठेवून, मी चैनींत, राजविलासात राहूं लागलों तर कृतघ्न ठरेन. कृतघ्न मनुष्याला यशाचा, कीर्तीचा लाभ कधींच होणार नाहीं. त्याला मनाची शांतताहि प्राप्त होणार नाहीं. मी कृतघ्न ठरण्यापेक्षा कृतज्ञ होऊन गोकुळवृंदावनासारख्या खेड्यात नंद-यशोदेची सेवा करीत राहाणे अधिक पसंत करतों.' कृष्णाची ही कृतज्ञता पाहून वसुदेव व देवकी याना आपल्या पुत्राबद्दल धन्यता वाटली. वसुदेवानें, 'ह्या गोष्टीला कांहीं तरी तोड काढूं. कांहीं काळजी करूं नको.' असें हंसत हंसत सांगितलें.

ह्या गोष्टीला चार दिवस झाले. एक दिवस वसुदेवाच्या वाड्याजवळ एक रथ येऊन उभा राहिला व त्यातून वसुदेवाच्या दोन स्त्रिया रोहिणी व रोचना, रोचनेची मुलगी व नंदाची स्त्री यशोदा अशा चौघीजणी उतरल्या. देवकीनें हास्यमुखानें पुढें येऊन त्यांचें स्वागत केलें. त्यांना मोठ्या आदरानें तिनें अंतःपुरांत नेलें. रोहिणी व रोचना त्या ठिकाणच्या मालकिणींपैकींच होत्या. यशोदेला मात्र तेथील सर्व गोष्टी अपरिचित होत्या. देवकीनें तिला मोठ्या प्रेमानें आपल्याजवळ बसविले व गोकुळचे कुशलवर्तमान विचारलें. यशोदेचें रूपसौंदर्य, तिची शालीनता, प्रौढ वयाला शोभणारा तिचा भारदस्तपणा पाहून देवकीला आनंद झाला. ती तिला प्रश्न विचारीत होती, यशोदा उत्तराहि देत होती. पण तिचे डोळे चार महिन्यांत न दिसलेल्या आपल्या लाडक्या पुत्राला पाहण्याला सारखे इकडे तिकडे वळत होते. देवकीनें ती गोष्ट ओळखली. रोहिणी, रोचना याच्याजवळ तर सर्व वाटभर यशोदा कृष्णासंबंधींच बोलत होती. त्याना तिची मनःस्थिति माहीत होतीच, अशा स्थितींत खरा प्रकार समजतांच तिची स्थिति काय होईल ही कल्पना डोळयांपुढें उभी राहून देवकीच्या

व रोहिणी-रोचना यांच्या डोळ्यांत पाणी आलें. इतक्यांत वसुदेव व नंद बोलत बोलत तेथें आले. त्यांना पाहातांच चौघीहि उभ्या राहिल्या. पुढचा प्रसंग ओळखून रोहिणी, रोचना, देवकी व वसुदेव बाजूच्या दालनांत गेले. यशोदेनें हास्यमुखानें नंदाला विचारिलें, ' आपला लाडका कृष्ण कोठें दिसत नाहीं तो? गुलाम माझी आठवण तरी काढीत होता का?' यशोदेचा हा स्वाभाविक प्रश्न ऐकून नंद गुदमरल्यासारखा झाला. त्याच्या कंठांतून शब्द फुटेना. डोळे पाण्यानें भरून आलें. नंदाची ती स्थिति पहाताच यशोदेला धक्का बसल्यासारखें झालें. ती म्हणाली, ' हें काय? आपली एकाएकीं अशी काय स्थिति झाली? सांगा ना? आपला लाडका श्याम कोठें आहे? त्याचा वडिल भाऊ रामहि कोठें दिसत नाहीं? बोला, महाराज बोला. आपल्या डोळ्यांत कधीं न येणारे अश्रू पाहून माझा जीव घाबरा होतो आहे. आपला लाडका मोहन–'

' आपला लाडका कृष्ण! श्याम! आतां कुठला आपला?' नंद एकदम उद्गारला. यशोदे, मन शांत ठेव. भयंकर गोष्ट मीं ऐकली व कशी तरी सहन केली. ती गोष्ट ऐकण्याची आतां तुझी पाळी आहे.' यशोदा रडकुंडीला येऊन म्हणाली, 'म्हणजे महाराज, म्हणतां तरी काय? आपल्या लाडक्या कृष्णाची खुशाली चटकन् सांगा.' नंद म्हणाला, 'कृष्ण खुशाल आहे. राम खुशाल आहे. कंसवध करून त्यांनीं दिगंत कीर्ति मिळविली आहे, राजैश्वर्य त्यांच्या पायावर लोळण घेत आहे.' यशोदेच्या चेहऱ्यावर हास्य दिसूं लागलें. ती म्हणाली ' होय ना? राम, कृष्ण खुशाल आहेत, हें ऐकून माझा जीव खालीं पडला. माझा कृष्ण खुशाल असला म्हणजे—" नंद एकदम म्हणाला, " थांब यशोदे, आतां तो तुझा कृष्ण नाहीं, आणि माझाहि कृष्ण नाहीं. आतां तो वसुदेव-देवकीचा कृष्ण आहे. आतां तो गोकुळचा कृष्ण नाहीं. आतां तो मथुरेचा कृष्ण आहे. आतां तो गाई चारणारा गोपाळ नसून, राज्यधुरा वाहणारा राजपुत्र आहे. त्याला आतां नंदनंदन न म्हणतां लोक ' वासुदेव ' म्हणतील. तो यशोदातनय नसून देवकीतनय आहे." यशोदा म्हणाली, "आपण काय म्हणतां तें मला समजत नाहीं. लोक कृष्णाला कांहींहि

म्हणोत. पण तो माझा–यशोदेचा मुलगा नाहीं असें ते म्हणूं लागले तर मला कसें खरें वाटेल? लोकांनीं कांहीं म्हटलें तर त्यांच्या तोंडाला आपल्याला हात लावतां येणार आहे थोडाच. मी कृष्णाची माता नव्हे! पूर्ण नऊ महिने नऊ दिवस त्याचें ओझें वाहून त्याला मीं जन्म दिला. ती मी त्याची माता नव्हे? तर कोण? काय तरी बाई चमत्कार!"

'चमत्कार तर खराच!' रोहिणी आंत येत येत म्हणाली. तिच्या पाठोपाठ रोचना, रोचनेची मुलगी, देवकी, वसुदेव, रामकृष्ण आंत आले. रोहिणी पुढें म्हणाली, 'यशोदामाई, मी जशी रामाची माता असून रामाला जन्म दिला नाहीं. तशाच तुम्हीहि कृष्णाची आई असून कृष्णाला जन्म दिला नाहींत. हें सत्य आहे.' यशोदा म्हणाली, 'काय तुम्हीं रामाला जन्म दिला नाहीं? मग कोणीं दिला?' 'देवकीबाईनीं' रोहिणीनें उत्तर दिलें. यशोदा—'आणि माझ्या ह्या कृष्णाला?' 'देवकीबाईनींच' रोहिणी म्हणाली. यशोदा––'मग मीं जन्म कुणाला दिला? तुम्ही होतां ना त्यावेळीं तिथे? कृष्णजन्माचे पेढे तुम्हींच आपल्या हातानीं वांटलेत. रोहिणी––'यशोदामाई! मी त्यावेळीं तुमच्याजवळ होतें म्हणूनच मला माहीत आहे, तुम्हीं नऊ महिने नऊ दिवस उदरांत वाहिलेला श्यामसुंदर कृष्ण नसून ती गौरवर्ण सुंदर कन्या होती. किती सुंदर म्हणून सांगूं? तिच्या सौंदर्याला उपमा म्हणजे एक कृष्णाच्याच सौंदर्याची.'

"छे छे! माझा तुमच्यावरहि विश्वास बसत नाहीं. त्या मुलीच्या ठिकाणीं हा कृष्ण कसा आला? आणि ती मुलगी कोठें गेली?" यशोदेनें विचारलें.

नंद म्हणाला, "यादवाच्या कारस्थानाला बळी पडली. यशोदे, यादवानीं तुझ्याजवळ आणून ठेविलेला कृष्ण, योग्य वेळ येतांच यादवांच्याकडे गेला. आपण कन्येला तर अगोदरच मुकलों होतों. यशोदे, तूं मृतवंध्या ठरलीस. तुला, 'आई' म्हणणारी कन्या काळानें उचलली, आणि 'आई' म्हणणारा पुत्र यादवांनीं नेला. आपण उभयतां निपुत्रिक झालों."

यशोदेच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहूं लागले. ती कपाळाला हात लावून म्हणाली, "हायरे दैवा! काय ऐकतें मी हें! मला आई म्हणणारें आतां कोणीच नाहीं?" ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली व

म्हणाली, "निष्ठुर दैवा, तो नुसता भासच ठरला. मला 'आई' म्हणून लडिवाळपणानें हाक मारणारा माझा लाडका..." आतां मात्र कृष्णाला राहावेना. तो धांवत यशोदेजवळ गेला. तिच्या गळ्याला त्यानें घट्ट मिठी मारली व लडिवाळपणानें तो म्हणाला, "आई, आई, रडूं नकोस. तुला आई म्हणणारा तुझा लाडका मुलगा, हा मी तुझ्याजवळ असतांना, तुला कोणीं कांहीं सांगितलें तरी तूं ऐकूं नकोस. मला माझ्या यशोदामातेपासून दूर करण्याची शक्ति काळाला नाहीं. मग यादवाना कोठून असेल ? नंदबाबा, चला, मला घेऊन गोकुळात चला. तुमच्या दोघाच्या डोळ्यातून अश्रू गळत असताना, मी येथल्या राजैश्वर्यात लोळणें शक्यच नाहीं. 'तूं वसुदेव-देवकीचा पुत्र आहेस' असें म्हणून, बाबा, आई, आपण माझ्यावरची माया कमी करूं नका. मातापितरांनीं काहीं कारणानें दूर केलेला मुलगा स्वतःच्या प्राणापेक्षाहि अधिक मानून, त्याचा सांभाळ, पालनपोषण करणारे, खऱ्या आईबापांहूनहि काकणभर अधिकच वंद्य आहेत, असें मला वाटतें. नंदबाबा, आई, तिकडे तुम्ही सुखासमाधानात राहात असतांना, तुमच्या कृपाछत्राखालीं तेथें राहण्यांत मला जें सुख वाटेल तें सुख तुम्ही तिकडे दुःखी कष्टी राहून मी येथें मातापितराच्या सान्निध्यांत व राजैश्वर्यात लोळत राहिलों, तरी मला होणार नाहीं. माझ्या करितां यादवाच्या राजकारणाला तुमची कन्या बळी पडली असेल, तर मला तुमच्याजवळच राहिलें पाहिजे. येथें राहणेंच शक्य नाहीं."

कृष्णाचें हें भाषण ऐकून वसुदेव प्रसन्न मुद्रेनें म्हणाला, "कृष्णा तूं जसा शूर, उदार, स्वार्थत्यागी आहेस तसा नीतिनिपुणहि आहेस, हें पाहून मला धन्यता वाटते. नंदराजा माझा जिवलग सखा आहे. त्याच्या मदतीनें कंसाच्या कारकीर्दीतील सर्व संकटांतून आम्ही निभावून गेलों. त्याची, माझ्या जिवलग स्नेह्याची, एकुलती एक कन्या, तिला माझ्या-यादवांच्या-राजकारणाला मी बळी जाऊं देईन हें कधीं तरी शक्य आहे का ? नंदा, यशोदे, तुम्ही न समजून कां होईना, माझ्या कृष्णाला ज्या आत्मीय भावनेनें वाढविलात, त्याच आत्मीयतेनें, पण समजून, कृतज्ञतेनें माझ्या पत्नीनें तुमच्या कन्येला वाढविली, आणि ती सुद्धां कोठें तरी

नगरासारख्या भलत्या सलत्या ठिकाणीं नाहीं, तर अगदीं पवित्र वातावरणांत, गोकुळ-वृंदावनात, खुद्द तुमच्या सान्निध्यांत, अगदीं तुमच्या देखरेखीखालीं. असे चाकित होऊन पाहूं नका. कंसाला संशय येईल म्हणून मीं अगर देवकीनें कृष्णाची पंधरा वर्षांत नुसती दृष्टभेटहि घेण्याचा प्रयत्न केला नाहीं. रोहिणीचा मुलगा म्हणून माझ्या रामाची सर्व जबाबदारी घेऊन, तुम्ही त्याला कृष्णाचा वडील भाऊ मानून, कृष्णाच्या बरोबर अत्यंत लडिवाळपणानें वागविलेंत, म्हणून नात्यानें खरोखरच सख्खे भाऊ असलेल्या रामकृष्णामध्यें बंधुप्रेम दृढ झालें. त्या रामकृष्णाच्याच बरोबर, नंदा, यशोदाताई, माझें बोलणे सावधानतेनें व विश्वासानें ऐका, त्या माझ्या रामकृष्णांबरोबरच माझी कन्या समजून, तुम्ही आपल्या कन्येचें मनःपूर्वक कोडकौतुक करून तिला वाढविलें. तिच्या मातेला काहीं व्यथेमुळें दूध येईना असें समजतांच अत्यंत वत्सलतेनें कृष्णाच्या बरोबर तिलाहि यशोदाताईनें आपलें स्तन्य पाजविलें. कृष्णाला आपल्या जन्मदात्या मातेचें स्तन्य मिळण्याचें भाग्य लाभलें नाहीं. तुमची कन्या मात्र आपल्या कृतक मातेला दूध नाहीं म्हणून आपल्या जन्मदात्या मातेचें स्तन्य भरपूर पिऊन पुष्ट झाली. कृष्णाला तर तिचा इतका लळा लागला कीं बाळपणीं खाणें, पिणें, खेळणें, भागडणें तिच्याशिवाय त्याचें होत नसे. जणूं काय जुळीं भावंडेंच ! तीं एका आईचें दूध पीत, एका पाळण्यात निजत, एका ताटात जेवत, गळयात गळा घालून नाचत, हंसत, खिदळत. यशोदाताई, तूं व माझी पत्नी रोचना, राधे कृष्ण, राधेकृष्ण, म्हणून चुटक्या वाजवूं लागलांत, म्हणजे राधा कृष्ण दोघें नाचत. दुडदुड धांवत येत. रोचनेच्या मुखांतून मला कळलेली ही माझी माहिती ऐकीव आहे—तें बालकाचें कौतुक प्रत्यक्ष पाहण्याचें भाग्य तुम्हांला लाभलें आहे."

वसुदेवाचें भाषण ऐकून यशोदेला पराकाष्ठेचा गहिंवर आला. ती एकदम म्हणाली, " काय वसुदेवदादा ! राधा ही माझी मुलगी ! तरीच माझ्याकडे तिचा इतका ओढा बरें का ? रोचनामाईच्या पेक्षां माझ्याच अंगावर खांद्यावर ती अधिक लोळलीं खेळली. सदान् कदा ती माझ्या

जवळ जवळ असायची. रोचनामाईच्या कडेवरून माझ्याकडे आनंदानें झेप घ्यायची. माझ्याकडून रोचनामाई घेऊं लागल्या कीं कुरकुर करायची. त्या गोष्टीचा रोचनामाईंना अतिशय आनंद वाटायचा, त्या थट्टेनें हंसत हंसत नेहमीं म्हणायच्या देखील, ' यशोदाबाई, ही राधा तुमचीच मुलगी आहे, माझी नव्हे.' मला आश्चर्य वाटे, कीं आपली मुलगी दुसऱ्या बाई-जवळ आनंदाने जाते व आपल्याजवळ येण्याबद्दल कुरकुरते, ह्यात आईला आनंद कसा वाटतो ? "

रोचनेने जवळ बसलेल्या राधेला प्रेमभरानें कुरवाळलें व म्हटलें, ' मला माहीत होते, ह्या चिमुरडीला मी आई म्हणून अशी किती जरी कुरवाळली तरी ही आपल्या खऱ्या आईकडे धावत जाणारच. ती माझ्या जवळ कायमची थोडीच राहणार आहे ? जा राधे, माझ्या लाडक्या छकुले, जा, तूं आपल्या खऱ्या आईकडे जा. तिच्या मांडीवर आता हक्कानें मनमुराद लोळ. तुझ्या आईची आणि तुझी ताटातूट करण्याचे पातक मी ह्यापुढें करणार नाहीं. बाळे, तुझी आई यशोदामाई ! मी तुला संभाळणारी नुसती दाई ! लाडके, मला विसरू नको ह ?" असे म्हणून रोचनेनें तिचे पटापट मुके घेतले. राधेने हुंदके देत देत रोचनेच्या गळ्याला मिठी मारली. इकडे यशोदेजवळ बसलेल्या कृष्णाला हुंदके आवरेनात. तो झट-कन् उठला, व राधेजवळ गेला. रोचनेच्या गळ्याभोवतीं तिची पडलेली मिठी त्याने सोडविली, तिच्या गळ्यात प्रेमानें आपले हात घातले आणि तिला आपल्या हृदयाशीं धरून तिला यशोदेच्या मांडीवर बसवीत म्हटलें, 'राधे, माझे लाडके बहिणी बैस, तूं आपल्या हक्काच्या मांडीवर बैस. पण मला मात्र तुझ्या मातेजवळून दूर ढकलून देऊं नकोस. आई, ह्या तुझ्या राधेला जवळ घे, पण मला दूर करूं नकोस. माझ्यावरची तुझी माया कमी झालीशी दिसली, तर माझे प्राण मला जड होतील. आई, माझे तूं किती लाड केलेस. आतापर्यंत राधा-कृष्णांत भेदभाव तुला दिसला नाहीं. ह्यापुढेहि आई......"

कृष्णाचा कंठ सद्गदित होऊन त्याला पुढे बोलवेना. त्यानें यशोदेच्या गळ्याला मिठी मारली. अहाहा ! ते दृश्य अपूर्व होतें. यशोदेच्या

एका मांडीवर बसून तिच्या गळयांत मिठी मारून हुंदके देत असलेली, केतकीसारख्या गौरवर्णाची सुंदर राधा, आणि दुसऱ्या मांडीला टेकून, यशोदेच्या कंठात मिठी घालून, हुंदका आवरत नसलेला श्यामसुंदर श्रीकृष्ण आणि राधाकृष्णांना दोन्ही हातानीं कवटाळून डोळयांतून गालावर अश्रुबिंदूंची धार लागलेली परम पवित्र यशोदामाता ! त्याच्या एका बाजूला अश्रू पुशीत उभ्या राहिलेल्या रोहिणी, रोचना आणि त्रैलोक्य-सुंदर देवकी. दुसऱ्या बाजूला उभे असलेले, आपल्या शेल्याच्या पदरानीं आपले अश्रू लपविणारे नंद, वसुदेव ! हा देखावा अनिमिष नेत्रानीं पाहात यशोदेपुढें गुडघे टेकून बसलेला पराक्रमी सौंदर्यशाली राम !

मातृप्रेम, पितृप्रेम, अपत्यप्रेम, भ्रातृप्रेम, निःस्वार्थी प्रेम, अशा सर्व स्वरूपात मूर्तिमंत प्रेम त्या ठिकाणीं अवतीर्ण झालें होतें. धन्य ते लोक कीं ज्यांच्या दिव्य दृष्टीला त्या अपूर्व प्रेममय देखाव्याचें दर्शन झाले असेल, होत असेल व यापुढेहि होत राहील. काहीं क्षण तें प्रेम-दृश्य निःशब्द राहिले. मग कृष्णाने आपल्या मधुर वाणीने ती शातता बोलकी केली. कृष्ण म्हणाला, "आई, नंदबाबा, माझे प्राणच, केवळ माझे स्वरूपच, अशी ही माझी लाडकी बहीण राधा गोकुळांत तुमच्याजवळ असली म्हणजे मी तेथे असल्यासारखेच तुम्हा सर्वांना वाटेल. यादव कुळातील पराक्रमी निःस्वार्थी पुरुषाचे अनुकरण करीत जनहित साधण्याचें माझे कर्तव्य आहे. ते कर्तव्य मी कोठेहि करीत असलों, तरी गोकुळाचें स्मरण मला अखंड राहील. माझ्या लाडक्या गोपालाचें स्मरण होताच मी आनंदाने नाचेन. तसेच माझ्या नावाशी आपलें नाव निगडित करून सर्व गोपालहि गोकुळात 'गोपाळकृष्ण, गोपालकृष्ण' असें माझे नाव उच्चारून क्रीडा करतील. माझेच केवळ स्वरूप अशी ही माझी अत्यंत लाडकी बहीण, राधा, त्याच्या दृष्टीस पडतांच 'गोपालकृष्ण' ह्या माझ्या नावाबरोबर 'राधाकृष्ण, राधाकृष्ण' असें म्हणत ते नाचतील. आणि मग तुम्हा सर्वांना मी तेथे असल्याचाच भास होईल." कृष्णाचें इतके भाषण होतें न होतें तोंच कृष्णाला शोधीत आलेले पण तो देखावा दृष्टीस पडताच बाहेर उभे राहून तटस्थपणें पाहात असलेले, कृष्णाचे जिवलग

स्नेही अक्रूर व सर्व गोपाल, 'गोपालकृष्ण, राधाकृष्ण, गोपालकृष्ण, राधाकृष्ण' असा घोष करीत आत शिरले, व कृष्णाला सर्वजण कडकडून भेटले. त्यावेळीं उसळलेली ती प्रेमगंगा आमच्या चित्तांत अवतीर्ण होऊन आम्हांला पावन करो; असें म्हणून हें प्रकरण पुरें करून श्रीकृष्णचरणीं अर्पण करितों.

---

## प्रकरण ७ वें

# विद्या, पराक्रम आणि विवाह

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं नंद, यशोदा, राधा व गोपाळ मंडळी, यांच्या पाठवणीदाखल वसुदेवानें मोठा समारंभ केला. त्यावेळीं सर्वांचा वस्त्रालंकारादिकानीं गौरव केल्यानंतर, वसुदेवानें नदादिकांना उद्देशून भाषण केलें. वसुदेव म्हणाला,

"नंदा, जनहित साधण्याकरितां राजकारणाचे अनेक डाव खेळावे लागतात. ते खेळत असतांना अनेकाशीं अनेक प्रकारांनीं वागावें लागतें. सुहृज्जनांची प्रतारणा केल्याचा दोषहि पत्करण्याचा प्रसंग येतो. तुझीच गोष्ट पाहाना. तुमच्याशीं मला केवढी प्रतारणा करावी लागली! मी एका गोष्टीकरितां मात्र फार जपलों. मीं कोणाहि सुजहृज्जनाचें नुकसान होऊं दिलें नाहीं. तुमच्या कन्येला तुमच्यापासून थोडी बाजूला करून तुमच्याकडून माझ्या मुलाचें लालनपालन करविलें. पण तुमच्या कन्येलाहि

तितक्याच कोडकौतुकानें वाढविली. यशोदाताई, ह्या कामांत मला माझ्या दोन चतुर पत्न्यांनीं, रोहिणी व रोचना ह्यांनीं—कमालीचें साहाय्य केलें. त्यांच्या मनाच्या मोठेपणाला व शारीरिक कष्टाला तोड सांपडणें कठीण. सवतीच्या मुलांचें रक्षण व्हावें म्हणून नऊ महिने नऊ दिवस गरोदरपणाचें सोंग टिकविणें व नंतर पंधरा वर्षें मुलांच्या रक्षणाची जबाबदारी आत्मीयतेनें पार पाडणें, हें काम किती अवघड आहे, ह्याची तुम्हांला आतां कल्पना येईल. मनुष्याच्या प्रयत्नाला दैवाचीहि अनुकूलता लागतेच. तीहि मला मिळाल्यामुळें हातीं घेतलेलीं कामें सिद्धीस गेलीं. कंसरूपानें जगावर आलेलें एक मोठेंच संकट नाहींसें झालें. माझ्या कामांत साहाय्य केल्याबद्दल मी तुमचा अत्यंत ऋणी आहें. तुम्हांला जो त्रास झाला, त्याबद्दल कार्याकडे लक्ष देऊन, तुम्ही मला क्षमा करावी, ही तुम्हा सर्वांना प्रार्थना आहे."
अशाप्रकारें आदर-सत्कारांनीं, मृदु भाषणांनीं सर्वांना संतुष्ट करून वसुदेवानें सर्वांना निरोप दिला. निरोप देताना व घेतांना सर्वांनाच वियोगदुःख जाणवलें. नंदादि सर्वजण गोकुळाला रवाना झाले. रामकृष्ण आता मथुरावासी झाले.

काहीं दिवसांनीं वसुदेवानें आपले कुलोपाध्याय गर्गाचार्य यांच्याकडून रामकृष्णाचा, क्षत्रियांना उचित असा, यथाविधि उपनयन-संस्कार करविला. त्या वेळीं पुष्कळ विद्वान् ब्राह्मणांसहि अगत्यपूर्वक निमंत्रणें देऊन आणविलें होतें. विद्वान् लोकास त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें सोन्याचीं, रुप्याचीं व इतर धातूंचीं भांडीं अर्पण केलीं. कोणाला वस्त्रादिकांनीं अलंकृत करून सवत्स धेनू अर्पण केल्या. बलराम-श्रीकृष्णांच्या जन्मकालीं वसुदेवानें 'ब्राह्मणांस मी अमुक अमुक दान देईन' असे पुष्कळ नवस केले होते. पण कंसाच्या भीतीनें वसुदेवाला उघडपणें ते पार पाडतां आले नाहींत. आतां सर्व सत्ता हातीं आल्यावर, त्यानें ते नवस पूर्ण केले. गर्गाचार्यांसारख्या विद्वान व सदाचारी ब्राह्मणाकडून रामकृष्णांना गायत्री मंत्राचा उपदेश झाला. उभयतांनीं ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा धारण केली. नंतर गुरुगृहीं अध्ययन करण्याकरितां त्यांना वसुदेवानें पाठविलें. अवंती नगरींत राहणारे सांदीपनि नामक एक सुशील, पवित्र विद्वान् ब्राह्मण होते.

त्यांचें अन्तेवासित्व रामकृष्णांनीं पतकरिलें. आपण राजपुत्र आहों, तेव्हां गुरूच्या घरीं असलेल्या इतर शिष्यांहून आपण अधिक आहों असले कुत्सित विचार रामकृष्णांना शिवले देखील नाहींत. उलट इंद्रियनिग्रह करून देवाप्रमाणें गुरुजींच्या सेवेंत अंतर पडूं न देतां, अध्ययन करून ते आदर्श शिष्य झाले. त्यांची वागणूक पाहून गुरुजी त्यांच्यावर नेहमीं संतुष्ट असत. त्यांची बुद्धि प्रखर होती. "षडंगमिश्रिता वेदा धर्मशास्त्रं पुराणकं । मीमांसा तर्कमपि च एता विद्याश्चतुर्दश" ह्या चौदा विद्यांचें अध्ययन गुरुजींच्या जवळ त्यांनीं करण्यास सुरवात केली. 'शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदसां चितिः । ज्योतिषामयनं चैव षडंगो वेद उच्यते ।' वेदग्रंथांचें बिनचूक व यथार्थ ज्ञान व्हावें म्हणून शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष, हीं सहा वेदांगें प्रथम शिकावीं लागतात.

याच्या नंतर ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या चार वेदांचें अध्ययन करायचें असतें. नंतर धर्मशास्त्र, पुराणें, मीमांसा व तर्क यांचें अध्ययन झालें म्हणजे चौदा विद्या पूर्ण झाल्या. सांदीपनि गुरुजींनीं त्यांना उपनिषदांसह साङ्ग वेद शिकविले, तसेंच मंत्रदेवतापूर्वक धनुर्वेदांचें ज्ञान देऊन स्मृति–ग्रंथ त्यांना पढविले. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदान्त यांचें अध्ययन झाल्यावर संधि, विग्रह, यान, आसन, द्वैध आणि आश्रय ही राजनीति त्यांना उपदेशिली. सांदीपनी सारखे गुरुजी आणि रामकृष्णांसारखे शिष्य, मग विद्येला काय तोटा? शिष्यांनीं आपल्या अलौलिक बुद्धिमत्तेनें गुरुजींस थक्क करून सोडलें. कोणताहि विषय एकवार समजावून दिला कीं तो ताबडतोब त्यांस पाठ होत असे. याप्रमाणें मुख्य विद्याध्ययनानें बुद्धि सुसंस्कृत झाल्यानंतर रामकृष्णांनीं चौसष्ट कलाहि आत्मसात् केल्या.

ह्याप्रमाणें रामकृष्णांनीं गुरुजींच्याकडून सर्व विद्या संपादन केल्या. राजकारण-पटु, व्यवहारचतुर आणि श्रीमद्भगवद्गीतेसारख्या तत्वज्ञान सांगणाऱ्या अपूर्व ग्रथाचे जनक म्हणुन गाजलेल्या श्रीकृष्णांनीं विद्या–संपादन करण्याकरितां किती परिश्रम केले हें समजावें म्हणून रामकृष्णांच्या विद्या-संपादनाची हकीगत अधिक विस्तारानें सांगितली.

'तुमची विद्या पूर्ण झाली, आतां तुम्ही स्वगृहीं जाऊन पुढचा गृहस्थाश्रम स्वीकारा.' असे गुरुजींनीं सांगताच रामकृष्ण त्यांच्यापुढें हात जोडून उभे राहिले व म्हणाले, "महाराज, आपण प्रसन्न होऊन आम्हाला विद्यासंपन्न केलेंत. आता आम्हीं आपल्याला गुरुदक्षिणा काय द्यावी तेवढें कृपा करून सागा." आपल्या शिष्यांनीं लहानपणापासून केलेल्या पराक्रमाची हकिगत गुरुजींच्या व गुरुपत्नीच्या कानावर होतीच. रामकृष्णाची योग्यता गुरुजी ओळखत होते. त्याची बुद्धि किती प्रखर व चतुर आहे, ह्याचा तर त्याना अनुवभच होता. त्यांच्या जवळ काय मागावयाचें हे गुरुजीनीं व गुरुपत्नीनें ठरवून ठेविलें होतें. 'गुरु-दाक्षिणा मागा' म्हणताच, गुरुजी म्हणाले, 'प्रभास तीर्थावर आम्ही यात्रेकरितां गेलों असतां आमचा मुलगा नाहींसा झाला आहे त्याचा शोध करून त्याला आणून द्या.'

'ठीक आहे. आपल्या कृपेनें आमच्या हातून आपलें कार्य होईल.' असें म्हणून रामकृष्ण प्रभास तीर्थावर गेले. तेथें त्यानीं गुरुपुत्राचा तपास चालविला. तेथें त्यांची व कालिया डोहावर भेट झालेल्या गरुडेश्वराच्या दूताची अकस्मात् भेट झाली. त्यानें गरुडांचा राजा गरुडेश्वर तेथें आल्याचे सांगितलें व त्याची भेट घेण्याचा त्यानें रामकृष्णाना आग्रह केला. हे गरुड लोक समुद्र–कांठच्या प्रदेशाचे व समुद्रात असलेल्या लहान लहान बेटांचे पूर्ण माहितगार होते. गरुड राजाच्या साहाय्यानें गुरुपुत्राचा शोध लागल्यास पहावें असें त्यांनीं ठरवून ते गरुड-दूताबरोबर गरुडेश्वराकडे गेले. गरुडेश्वराच्या दोन कन्या कालियाकडून परत देवाविण्याच्या कामीं कृष्णानें केलेल्या मदतीची जाणीव गरुडेश्वराला होती. कृष्णाच्या पराक्रमाचें व त्याच्या उदार आणि उमद्या स्वभावाचें गरुडदूताने केलेलें वर्णन ऐकिल्यापासून कृष्णाची भेट घेण्याला तो उत्सुकहि होता. गरुडेश्वरानें रामकृष्ण येतांच त्यांची अर्घ्य–पाद्यादिकांनीं पूजा केली. कुशल प्रश्न विचारून त्यांच्याशीं तो मोठ्या आदरानें बोलूं लागला. गरुडेश्वर म्हणाला, "कृष्णा, तुम्हीं कंसवध करून माथुर देशाचे प्रजाजन जुलमी राजाच्या त्रासापासून सोडविले ही तुमची कीर्ति ऐकल्यापासून समुद्र–कांठच्या आह्मां सर्व लोकांना मोठा आनंद झाला, व एक आशाहि वाटूं

लागली. येथून जवळच असलेल्या समुद्र-कांठच्या एका प्रदेशाला पंचजन ह्या नांवानें येथील लोक ओळखतात. त्या प्रदेशावर राज्य करणारा पंचजन ह्याच नांवाचा एक महादुष्ट दानव आहे. तो अस्त्रविद्येमध्यें मोठा कुशल आहे. अस्त्रविद्या आम्हांला मुळींच येत नसल्यामुळें तो आमच्या लोकांना नेहमीं फार त्रास देत असूनहि त्याचा प्रतिकार करणें आम्हांला अशक्य झालें आहे. कंसाचा वध करून कंसाच्या पदरीं असलेल्या दानवांचा तुम्हीं पूर्ण नाश केल्याचें ऐकून तो तुम्हांला मात्र फार भीत आहे. तो आम्हा गरुड लोकांना जसा छळतो तसाच तो तुमच्या लोकांनाहि मधुन मधून उपद्रव देत असतो. तो लवकरच एक नरमेध करणार असून त्याकरिता त्यानें आज सात आठ वर्षें ब्राह्मण ब्रह्मचारी पळवून आणण्याचें काम सुरू केलें आहे. त्याला लागणारी ब्रह्मचाऱ्यांची संख्या आता पुरी होत आली असून तो नरमेध आतां लवकरच होणार आहे, असें माझ्या ऐकिवांत आहे. ही गोष्ट तुम्हांला सांगण्याकरितां आम्ही मथुरेला येण्याच्या बेतांत होतों, तोंच देवाने पाठविल्याप्रमाणे तुम्ही येथें धांवून आलांत. आम्ही सर्व जण तुम्हांला तुम्ही सांगाल ती मदत करण्याला तयार आहों. तर आतां त्या बिचाऱ्या ब्राह्मण ब्रह्मचाऱ्यांचे प्राण वांचवून आमच्या पाठीमागचाहि त्या दानवांचा त्रास नाहींसा करावा, अशी तुम्हांला प्रार्थना आहे.'"

गरुडेश्वराचें हें भाषण ऐकून रामकृष्णांना जी माहिती मिळायला पाहिजे होती ती अनायासेंच मिळाली गुरूंनीं नुकत्याच शिकविलेल्या मंत्रदेवतापूर्वक धनुर्विद्येचाहि प्रयोग करून पाहाण्याची संधि अनायासें चालून आली हें पाहून शूर रामकृष्णांना आनंद झाला. कृष्ण गरुडेश्वराला म्हणाला, "आमच्या गुरूच्या पुत्राचा शोध करण्याकरितां आम्ही येथें आलों आहों. तुमच्या सांगण्यावरून, त्या दुष्ट पंचजन दानवानेंच त्याला पळवून नेलें असेल असें दिसतें. तेव्हां पंचजनाला ठार मारून त्याच्याकडून आमच्या गुरुपुत्राला व इतर ब्रह्मचाऱ्यांना सोडविणें आमचें कर्तव्यच आहे. तुमचाहि तो शत्रु आहे. तुम्ही ससैन्य त्याच्यावर चालून जा. तुमच्या मदतीला आम्ही आहों. त्यांच्या अस्त्रविद्येचें आम्ही कांहीं

चालूं देणार नाहीं. दानवांना आम्हीं पाहिलें आहे. तुम्ही गरुड लोक शरीरसामर्थ्यानें दानवांच्या पेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहांत. चला आपण त्यांचा धुव्वा उडवूं. "

हें कृष्णाचें बोलणें गरुडेश्वराला पसंत पडलें. तो रामकृष्णांना घेऊन रमणक द्वीपाजवळ असलेल्या आपल्या राजधानीस गेला. तेथें त्यानें आपली गरुडसेना सज्ज केली आणि तो त्या सेनेचें आधिपत्य कृष्णाला देऊन पंचजनावर चालून गेला. पंचजन असावध होता. गरुड आपल्यावर चालून येतील ह्याची त्याला कल्पनाच नव्हती. आपल्या अस्त्रविद्येच्या जोरावर तो सर्प–गरुडासारख्या समुद्रकांठीं राहणाऱ्या अडाणी जंगली माणसांवर वर्चस्व गाजवीत असे. गरुड आपल्यावर चालून आले आहेत हें पाहून शें–पन्नास दानवांना बरोबर घेऊन तो निःशंकपणें त्यांच्यावर धांवून गेला व त्यानें आपला पांचजन्य नांवाचा, आपल्या मेघ-गंभीर नादानें शत्रूचें धैर्य नाहींसा करणारा, भयंकर दिव्य शंख वाजविला. त्या शंखाच्या नुसत्या आवाजानें गरुड सेनेची दाणादाण झाली. गरुड-सेनेच्या आघाडीसच रामकृष्ण होते. त्यांनीं आपल्या धनुष्याचा टणत्कार केला व पांच दिव्य अग्निमुखी प्रखर बाण पंचजनावर टाकिले. गरुड-सेनेंतून दिव्य बाण सुटलेले पाहून दानव भयचकित झाले. मथुरेंतील पळून आलेल्या दानवांपैकीं दोन चार दानव पंचजनाबरोबर आलेले होते. रामकृष्णांना पाहतांच, 'कृष्ण रे कृष्ण' अशी किंचाळी फोडून व गलित-धैर्य होऊन त्यांनीं पळायला सुरवात केली. इतर दानवांनीं त्यांचें अनु-करण केलें. पंचजन घाबरला, गोंधळला. त्यानें आपल्या बरोबरीच्या दानवांना परत फिरण्याबद्दल सांगितलें. पण प्राणभय फार कठीण आहे. ते पळपुटे दानव पाठीमागें परतूनहि पाहीनात.

पंचजनाच्या त्या गोंधळलेल्या स्थितींत राम-कृष्णांनीं त्याला गांठलें. त्यानें रामकृष्णांवर बाण टाकण्यास सुरवात केली. पण कृष्णानें एका बाणानें त्याचें मस्तक उडविलें, आणि त्याची प्रचंड गदा व त्याचा पांचजन्य शंख हरण केला. तें पाहून गरुडसैन्यानें जयघोष केला. गरुडे-श्वरानें पंचजनाच्या राजधानीच्या गांवाला आपल्या सैन्याचा वेढा दिला.

पंचजन मारला गेल्यामुळें सर्व दानव गर्भगळित होऊन गरुडेश्वराला शरण आले. 'बंदींत ठेविलेल्या सर्व ब्राह्मणांना सोडून देऊन व सर्व संपत्ति आमच्या स्वाधीन करून तुम्ही सर्व दानव निमूटपणें हा देश सोडून जात असाल तरच तुम्हाला जीवदान देतों.' असें गरुडेश्वरानें त्याना सागतांच ते सर्व त्या गोष्टीला कबूल झाले.' त्यांनीं सर्व ब्राह्मणकुमार गरुडेश्वराच्या पुढें आणून उभे केले व त्याची आज्ञा घेऊन आपल्या बायकामुलासह ते तो प्रदेश सोडून चालते झाले.

रामकृष्णांच्या पराक्रमानें व दराऱ्यानें आपली बिलकूल हानी न होतां आपल्या प्रबळ शत्रूनें गिळंकृत केलेला सर्व प्रदेश आपल्याला मिळाला, हें पाहून गरुडेश्वराला अत्यानंद झाला. त्यानें बंदींतून मुक्त झालेले सर्व ब्राह्मणकुमार रामकृष्णाना दाखविले. त्यात त्याना त्याच्या गुरूचा पुत्र मिळाला. त्यांनीं सर्व ब्राह्मणकुमारांचें गरुडेश्वराकडून वस्त्रालंकारादिकानीं पूजन करविलें व त्याना 'स्वगृहीं जाऊन मातापितराना आणि आपल्या गुरुजनांना भेटून आनंदित करा,' असें सांगून निरोप दिला. नंतर ते गुरुपुत्राला घेऊन अवंतीला निघाले. गरुडेश्वरानें रामकृष्णाचें यथाविधि पूजन करून त्यांना दानवांच्या कडून मिळालेलीं बहुमोल रत्नें व असंख्य धन नजराणा म्हणून दिलें व 'तुम्ही आज्ञा कराल त्या वेळेला तुमच्या सेवेला आपल्या सर्व बळानिशीं हजर होऊं' असें त्यानें नम्रपणानें सांगितलें. गरुडेश्वराचा निरोप घेऊन रामकृष्ण गुरुगृहीं आले. त्यांनीं गुरुदक्षिणा म्हणून गुरुपुत्राला गुरूच्या स्वाधीन करून, बरोबर आणिलेलें सर्व धन व हरण करून आणिलेला तो पांचजन्य शंख आणि प्रचंड गदा हीं सर्व गुरूपुढें ठेविलीं.

आपला पुत्र आपल्याला पुनः प्राप्त झाला हें पाहून सांदीपनि गुरुजी व त्यांची पत्नी याना अत्यानंद झाला. त्यांनीं रामकृष्णाच्या आग्रहावरून त्या सर्व धनाचा स्वीकार केला, पण तो दिव्य पांचजन्य शंख कृष्णाच्या हातात व ती प्रचंड गदा रामाच्या हातांत देऊन त्यांनीं उत्तमोत्तम आशीर्वाद दिले. सांदीपनि गुरुजी आपला वरद हस्त रामकृष्णांच्या मस्तकांवर ठेवून म्हणाले, "माझ्या लाडक्या शिष्यांनों, तुम्हीं आज आम्हांला

आम्हीं मागितली ती दक्षिणा देऊन संतुष्ट केलें. आतां तुम्ही आनंदानें आपल्या घरीं जा. सर्व जगांत तुमची पवित्र कीर्ति दुमदुमत राहील. मीं दिलेली विद्या नेहमीं तुमच्याजवळ ताजी-तवानी राहील. इहलोकींच काय, पण परलोकींहि ती तुमच्या उपयोगीं पडेल."

याप्रमाणें गुरुजींचा निरोप घेऊन आपल्या मेघ-गंभीर शब्द करणाऱ्या वायुवेग-रथांत रामकृष्ण आरूढ झाले आणि लवकरच मथुरेस पोहोंचले. त्यांना पाहून त्यांच्या मातापितरांना, इष्टमित्रांना व सर्व नगरवासी जनाना परमानंद झाला. हरवलेला ठेवा पुष्कळ दिवसांनीं पुनः मिळाला, असेंच सर्वांना वाटलें. उग्रसेन महाराजांनीं विद्याविभूषित होऊन आलेल्या रामकृष्णांच्या आगमनाप्रीत्यर्थ मोठा उत्सव केला. राजदरबार भरवून दरबारांत त्यांचा मोठ्या थाटानें सत्कार केला. 'रामकृष्णांच्या रूपानें यादवांच्या राज्याचें रक्षण करणारी दिव्यशक्ति आज मथुरेंत प्राप्त झाल्यामुळें मी निर्धास्त झालों' असे त्याच्याबद्दल गौरवपर उद्गार काढून त्यांनीं रामकृष्णांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें.

आपण विद्याविभूषित झालेले पाहून वसुदेवाला, देवकीला व सर्व मथुरावासी जनाना परमानंद झाल्याचें पाहून कृष्णाला नंद-यशोदेची व गोकुळवासी जनांची आठवण झाली. त्यांना आपण व बलराम विद्याविभूषित झाल्याची आनंददायक वार्ता सांगून आपलें कुशल कळविण्याकरितां आपल्याशीं अत्यंत प्रेमळपणानें वागणारा आपला प्रिय सखा उद्धव याला गोकुळांत जाण्याची कृष्णानें विनंति केली. त्यानें त्याप्रमाणें गोकुळांत जाऊन रामकृष्णांचें कुशल तेथील लोकांना सांगतांच त्यांना जो परमानंद झाला, त्याचें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य होतें. आनंदाच्या भरांत कृष्णाच्या पराक्रमावर रचलेलीं सुंदर गाणीं म्हणत गोपी सुंदर नृत्य करूं लागल्या व गोपाळमंडळी 'गोपाळकृष्ण', 'राधाकृष्ण', 'गोपाळकृष्ण' 'राधाकृष्ण' असा मुखानें घोष करीत देहभान विसरून नाचूं लागली. नंद-यशोदेच्या आनंदाला तर पारावर नाहींसा झाला. त्यांनीं रामकृष्णांबद्दल विचारलेल्या प्रश्नांना उत्तरें देतां देतां उद्धवाला पुरेवाट झाली. गोपगोपींनींहि त्याला रामकृष्णांबद्दल अनेक प्रश्न विचारिले. 'रामकृष्णांना

आमची कधीं आठवण होते काय' अशासारखे प्रश्न विचारतांना गोपाळांचे कंठ दाटून येत असत. 'रामकृष्ण तुमची आठवण वारंवार काढतात. तुमच्याबरोबर गोकुळांत राहात असतांना घडलेल्या गोष्टी सांगत असतांना ते इतके तल्लीन होतात कीं त्यावेळीं बाकीच्या सर्व गोष्टी ते विसरतात.' ह्याप्रमाणें कृष्णाच्या त्यांच्यावरील प्रेमाचें वर्णन करून व त्या सर्वांना रामष्कृणांनीं सांगितलेले निरोप सांगून उद्धवानें सर्व गोपाळमंडळींचें समाधान केलें.

रामकृष्णांनीं विद्याविभूषित झाल्यानंतर गुरुदक्षिणा म्हणून, नाहींसा झालेल्या गुरुपुत्राला परत आणण्याकरितां पंचजन नावाच्या दैत्याला कसा ठार केला, ह्याचें रसभरित वर्णन उद्धवानें आपल्या वक्तृत्वपूर्ण मधुरवाणीनें करतांच सर्व गोप गोपाळकृष्णाच्या नावाचा जयघोष करीत नाचूं लागले. याप्रमाणें कृष्णाच्या गोष्टी गोप-गोपींना सांगण्यांत व त्यांनीं सांगितलेल्या ऐकण्यांत उद्धवानें कृष्णाच्या त्या प्रेमळ भक्तात बरेच दिवस वास्तव्य केलें व त्यांचें समाधान केलें. नंतर आता परत जाण्यास हरकत नाहीं असें मनांत आणून त्यानें नंद, यशोदा व सर्व गोपी-गोपाळ यांचा मोठ्या कष्टानें, गोड शब्दांनीं निरोप घेतला, आणि रथ सज्ज करण्याच्या तयारीस तो लागला. त्यावेळीं नंद-यशोदेला रडूं कोसळलें. पण विचार करून त्यांनीं मन आवरून धरिलें, आणि बलराम-श्रीकृष्णांच्या अनेक आवडीच्या वस्तु त्याच्याजवळ दिल्या. नंदानें वसुदेव, उग्रसेन यांनाहि देण्याकरितां बहुमोल नजरनजराणे दिले. इतर गोप-गोपींनींहि श्रीकृष्णाला देण्याकरितां पुष्कळ वस्तु उद्धवाजवळ दिल्या, आणि रामकृष्णांना अनेक निरोप सांगितले. सर्वांचा पुनः निरोप घेऊन उद्धव मथुरेस आला. रामकृष्णांना भेटून नमस्कार करून त्यानें सद्गदित कंठानें गोकुलवासी जनांचें निःसीम प्रेम त्यांना निवेदन केलें व ते लोक खरोखर धन्य आहेत असें म्हटलें. नंतर त्यानें वसुदेव व उग्रसेन राजा यांच्या गांठी घेऊन आणलेले नजरनजराणे त्यांना समर्पण केले.

'कंसाला मारल्यानंतर व माझीं अवश्य कर्तव्यें पार पाडल्यानंतर मी स्वस्थपणें तुझ्या घरीं येईन' असें श्रीकृष्णांनीं अक्रुराला वचन दिलें होतें,

तें पाळण्याकरितां, आणि दुसरेंहि एक काम त्याच्याकडून करविण्याकरितां बलराम व उद्धव यांसह कृष्ण अक्रूराच्या घरीं गेला. ते आलेले पाहून अक्रूराला परम संतोष झाला. झटकन् उठून तो त्यांना सामोरा गेला व आनंदानें त्याना आलिंगन देऊन 'आलात, बरें झालें' असें म्हणून त्यानें त्यांचें अभिनंदन केलें. अक्रूर हा रामकृष्णाचा चुलता, पण ह्यावेळीं तो आपलें मोठेपणाचें नातें विसरला. त्याने मोठ्या आदरानें त्यांना आसनावर बसविलें व गंध-फुलें, वस्त्रालंकारानीं त्यांचे पूजन केलें, आणि प्रेमातिशयानें तो बोलूं लागला, "रामा, कृष्णा तुम्ही चाणूर, मुष्टिक इत्यादि अनुयायासह कंसाचा निःपात केला ही फार चागली गोष्ट झाली. आतां सर्व जगाला सुख मिळेल. त्या दुष्टाच्या त्रासानें तुमच्या कुळाला वाईट दिवस आले होते. मी चुकलों, तुमच्या कुळाला असें म्हणणें हें गैर आहे. तुमच्या शौर्यानें आमच्या सर्व यादव कुळाचा आतां उत्कर्ष होईल. नारदांनीं तुमची योग्यता मला सांगितली आहे. सज्जनांचें दुष्टांपासून रक्षण करण्याकरितां ईश्वरी तेज तुमच्या रूपाने अवतीर्ण झाले आहे, असें नारदानीं मला सांगितलें तें मला पूर्णपणें पटलें व अनुभवालाहि आलें. कृष्णा, आज तूं माझ्या घरीं आलास, यामुळें माझें घर पवित्र झालें असें मला वाटतें. आज सोन्याचा दिवस उगवला असें मी समजतों." याप्रमाणें अक्रूरानें आपली केलेली स्तुति ऐकून ह्याच्या मनांत आपणाबद्दल मोठा आदर असून आतां आपण सांगूं तें कार्य हा आनंदानें करील अशी कृष्णाची खात्री झाली. तो स्मितपूर्वक अक्रूराला म्हणाला, "अक्रूरजी, तुम्ही आमचे चुलते आहां. यामुळें आम्हीं तुम्हांला वाडिलांप्रमाणें मान दिला पाहिजे. तुम्ही सर्वथैव आमच्या हिताची काळजी घेत आहांच. मी तुम्हांला आपल्या सर्व आप्तांत श्रेष्ठ समजतों. म्हणूनच माझ्या वडिलांची एक इच्छा पूर्ण करण्याकरितां एक नाजुक व विश्वासाचें काम मी तुमच्यावर सोंपविणार आहे. माझी आत्या कुंती ही माझ्या वडिलांची अत्यंत आवडती बहीण आहे. पंडुराजा मरण पावल्यावर कुंती ही आपल्या मुलांसह धृतराष्ट्राकडे हस्तिनापुरास राहूं लागली. प्रथम प्रथम आंधळ्या धृतराष्ट्रानें कुंतीसह पांडवांशीं मायाळूपणाचें वर्तन ठेविलें.

पण पुढें स्वतःच्या दुष्ट पुत्रांच्या लोभांत गुंतून त्या म्हाताऱ्यानें त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आपल्या पुत्रांनीं त्यांची चालविलेली दुर्दशा निमूटपणें पाहाण्याचें ठरविलें आहे, असें माझ्या वडिलांच्या कानीं आल्यापासून त्यांना चैन पडत नाहीं. पांडवांचें कल्याण करण्याकरितां मी कांहीं तरी करावें असें त्याचें म्हणणें आहे. पांडवांच्या सुस्वभावासंबंधीं पुष्कळ गोष्टी माझ्या कानावर आल्यावेळेपासून माझाहि ओढा त्यांच्याकडेच आहे. तेव्हां मी तुमच्यावर नाजूक व फार महत्त्वाची कामगिरी सोंपविणार आहें. ती अशी कीं तुम्हीं उशीर न लावितां हस्तिनापुरास जावें आणि तेथें कांहीं दिवस राहून पांडवांची जी कांहीं बरी वाईट हकिगत असेल ती नीट समजावून घेऊन इकडे यावें. म्हणजे आपण पुढें काय करावयाचें तें ठरवूं. कुंती तुमची चुलत बहीणच आहे. तिच्या व तिच्या मुलांच्या हितसंबंधांत तुम्ही जितकें आपलेपणानें लक्ष घालाल, तितकें दुसरें कोणी घालणार नाहीं. म्हणून ही कामगिरी मी मुद्दाम तुमच्यावर सोंपवीत आहें. तुम्ही तेथें गेलांत म्हणजे पांडवाच्या पाठीमागें आम्ही सर्व यादव आहोंत ह्याची जाणीवहि त्या आंधळयाला होईल." कृष्णानें सांगितलेली कामगिरी करण्याचें अक्रुरानें मान्य केलें. हस्तिनापुरास गेल्यावर काय करावयाचें, कोणाला भेटावयाचें ह्यासंबंधीं वसुदेव, बलराम, कृष्ण यांच्याबरोबर चर्चा करून अक्रूर हस्तिनापुरास गेला.

त्या नगराची शोभा पाहून त्यास फार आनंद झाला. तेथें अनेक देवालयें, धर्मशाळा, विहिरी आणि तळीं होतीं. त्यांवरून पुरुवंशांतील राजांनीं प्रजेच्या सुखाकरितां किती परिश्रम केले होते हें व्यक्त होत होतें. राजवाड्यांत पोहोंचल्यावर भीष्म, विदुर, कुंती, राजा धृतराष्ट्र यांची त्याला भेट झाली. नंतर तो पांडवांस भेटला. तसेंच बाल्हीक, सोमदत्त, गुरु द्रोण, कृपाचार्य, कर्ण, दुर्योधन, अश्वत्थामा इत्यादिकांस भेटून त्यांच्याशीं त्याचे कुशल प्रश्नहि झाले. लहान थोर मंडळीशीं जसें वागावयास हवें तसें वागून प्रत्येकाची त्यानें कुशलवार्ता विचारली. कांहीं जणांनीं मथुरेंत 'रामकृष्ण खुशाल आहेत ना ?' अशी त्यास पृच्छा केली. दुर्योधनादि कौरव पांडवांशीं फार दुष्टपणानें वागतात. अस्थिर बुद्धीच्या धृतराष्ट्राला

ते मुळींच जुमानीत नाहींत. पांडवाचा नाश करण्याविषयीं कर्णादिकाचा दुर्योधनास सारखा सल्ला चालू असतो वगैरे गोष्टी त्याच्या कानावर आल्या व कांहीं त्यानें प्रत्यक्ष पाहिल्या. ह्या सर्व गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून आपली खात्री करून घेण्याकारिता तो बरेच दिवस हस्तिनापुरात राहिला.

एकदां विदुर व कुंती बोलत बसलीं असता अक्रूर तेथें गेला. तेव्हां त्या दोघांनींहि अगदीं मोकळया मनानें त्यास आपलें सुखदुःख सांगितलें. पांडवाचें तेज, सामर्थ्य, शस्त्रनैपुण्य, शौर्य, विनय इत्यादि पाहून प्रजा त्यांच्यावर प्रेम करते, पण दुष्ट कौरवाना ती गोष्ट सहन होत नाहीं असें विदुरानें सांगितलें. पाडवांचा नाश करण्याच्या प्रयत्नांत कौरव सारखे गुंतलेले असतात. त्यांनीं भीमाला विष खाऊं घालण्यासारखें अघोर कृत्यहि केलें, असें विदुर व कुंती ह्या दोघानींहि अक्रुराला सागितलें. अक्रुराचें कुंतीशीं चुलत भावाचें नातें होतें हें मागें सांगितलें आहेच. त्याच्याशीं बोलत असतांना तिला माहेरच्या माणसाची आठवण झाली, तेव्हां तिच्या डोळ्यांस पाणी आलें. ती अक्रुराला म्हणाली, 'माझे आईबाप, बहिणी, भाऊ, भाचे याना माझें कधीं स्मरण तरी होतें काय? वसुदेवदादाचा मुलगा श्रीकृष्ण फार पराक्रमी व स्वजनांचें रक्षण करण्याकरिता तत्पर असतो, असें मीं ऐकलें आहे. त्याला कधीं आमची आठवण होऊन आमची भेट घ्यावी असें वाटतें काय? बलरामहि कृष्णाप्रमाणेंच पराक्रमी आहे. तो ह्या दीन आत्येची कधीं आठवण करतो का? शत्रूकडून माझे व माझ्या मुलांचे हाल होत आहेत. इतरांकडून अपमान झाला तर कदाचित् चालेल, पण भाऊबंद पावलोपावलीं अपमान करूं लागले म्हणजे जीव अगदीं नकोसा होतो. एका-पेक्षां एक दुष्ट असलेले दुर्योधनादि शंभर धृतराष्ट्रपुत्र माझ्या मुलांशीं किती दुष्टाव्यानें वागतात हें तुला मीं सागितलें आहेच. वसुदेवदादा, श्रीकृष्ण, बलराम यांच्या कानांवर ह्या सर्व गोष्टी घाल. श्रीकृष्णाचा पराक्रम ऐकल्यापासून त्याचा आधार माझ्या मुलांना मिळाला तर बरा असें मला वाटूं लागलें आहे." हें ऐकून अक्रूर म्हणाला, "श्रीकृष्ण तर

तुमची काळजी घेईलच. पण कुंती, आम्ही सर्व यादव तुमचे पाठराखे म्हणून तुमच्या पाठीमागें उभे आहों हें समजून तूं काळजी करूं नकोस. आतां मी तुझा निरोप घेतों. धृतराष्ट्राला कृष्णाचा निरोप आहे तेवढा जातां जातां त्याला सांगून मी मथुरेस जातों. मी येथील सर्व हकिगत श्रीकृष्णास सांगितल्यावर कुंती, तुझ्या पुत्रांना व तुला भेटण्याकरितां तो येथें खात्रीनें येईल. तोंपर्यंत तुम्ही येथें सर्वजण धैर्यानें राहा." नंतर अक्रूर धृतराष्ट्राचा निरोप घेण्याकरितां राजदरबारीं गेला. दरबारांत धृतराष्ट्राची भेट होतांच भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, दुर्योधन वगैरेंच्यादेखत तो त्याला म्हणाला, "राजा धृतराष्ट्रा, आतां मी मथुरेस परत निघालों आहें. आज सांगूं, उद्यां सांगूं, म्हणतां म्हणतां श्रीकृष्णानें दिलेला निरोप तुला सांगावयाचा राहिला तो आज सांगतों. कंसाचा वध केल्यानंतर श्रीकृष्णानें ठिकठिकाणीं पसरलेल्या यादवांना पुनः एकत्र आणून, यादवांची प्रचंड संघटना करून मथुरेस महाबलाढ्य यादवराज्य निर्माण केलें आहे हे तुझ्या कानांवर आलें असेलच. श्रीकृष्ण हा तुझे पुतणे पांडव यांचा आतेभाऊ आहे. त्या श्रीकृष्णाचा निरोप ऐक. कृष्णाचे शब्द जसेच्या तसेच तुला सांगतों. कृष्ण म्हणाला, 'राजा धृतराष्ट्रा, तुझा वडील भाऊ पंडुराजा मरण पावल्यामुळेंच तूं सिंहासनावर बसला आहेस हें ध्यानांत ठेवून पृथ्वीचें पालन न्यायानें करशील आणि सुस्वभावानें प्रजेचे मन राखून सर्वांशीं समभावानें वागशील तर तुला कीर्ति प्राप्त होऊन अंतीं तुझें कल्याणच होईल. पंडुराजाच्या पाठीमागें राज्याचे खरे वारस पांडव आहेत. पण दुर्दैवाने त्यांच्या अगदीं बालपणींच ते पितृसुखाला आंचवले. त्यामुळें तूं अंध असूनहि भीष्मादि तुझ्या वडील माणसांनीं तुला सिंहासनावर बसविलें हें योग्यच झालें. आतां तुझें कर्तव्य म्हणजे पांडव व तुझे स्वतःचे मुलगे यांना सारख्याच दृष्टीनें वागविणें हें आहे. ह्या तुझ्या कर्तव्यांत तूं चुकशील तर तूं लोकांमध्यें निंदेला पात्र होऊन तुला व तुझ्या पुत्रांना अनेक शत्रु निर्माण होतील आणि मग तुझ्या दुःखाला पारावार राहणार नाहीं. म्हणून मुद्दाम सांगतों कीं, आपलीं मुलें व पांडव यांमध्यें विषमता ठेवूं नको. शिवाय हें लक्षांत ठेव कीं, या जगांत अतिलोभ हा

हितकारक नसतो. जगामध्यें केव्हांहि, कोणाचा कोणाशीं नित्य संबंध नसतो. अधिक काय सांगावें, स्वतःचा देहसुद्धां जेथल्या तेथें राहतो. तोहि आपणाबरोबर येत नाहीं. मग बायकापोरें कोठून येतील ? प्राणी एकटाच जन्मास येतो व एकटाच मृत्युवश होतो. आपल्या पापपुण्याचें फळ तो एकटाच भोगतो. मुलांबाळांसाठीं आपण अन्यायानें द्रव्यार्जन करणें म्हणजे पापाची शिदोरी बरोबर घेऊन नरकाची वाट धरणें आहे, हें प्रत्येकानें लक्षात ठेविलें पाहिजे. म्हणून राजा धृतराष्ट्रा, तुझ्या कल्याणाकरितां तुला मी सांगतों आहे कीं तूं सर्वांना समभावानें वागव. आणि मुलांच्या अगर कोणाच्याहि दुष्ट सल्लयाला बळी पडूं नकोस." कृष्णाचा निरोप सांगून अक्रुरानें धृतराष्ट्राचा निरोप घेतला. कृष्णाचा निरोप ऐकून भीष्मद्रोणादि वडील माणसांना बरें वाटलें. आंधळा धृतराष्ट्र मनांत चमकला व दुष्ट पुत्राच्यापुढें आपलें काहीं चालणार नाहीं असें मनांत येऊन हताश झाला. कर्ण-दुर्योधनांच्या कपाळाला मात्र आंठ्या पडल्या.

अक्रुरानें मथुरेत येतांच वसुदेव, राम, कृष्ण यांना हस्तिनापुरातील परिस्थितीचें इत्थंभूत वर्णन करून सांगितलें. पांडवांच्या दुःस्थितीबद्दल सर्वांना खेद झाला. कृष्णानें स्वतःच हस्तिनापुरास जाऊन पांडवांना भेटावें व त्यांना धीर द्यावा असें सर्वांनीं ठरविलें. पण लवकरच मथुरेवर जरासंधाची स्वारी होणार हें चिन्ह दिसूं लागल्यामुळे, तो बेत पुढें ढकलणें त्यांना भाग पडलें.

अस्ति व प्राप्ति या नांवाच्या कंसाच्या दोन भार्या मगध देशाचा सम्राट् जरासंध ह्याच्या कन्या होत्या. पतिनिधनाचें दुःख असह्य झाल्यामुळें त्या माहेरीं जरासंधाकडे राहावयास गेल्या. त्यांनीं आपल्या पित्याला आपल्या वैधव्याचें सर्व कारण निवेदन केलें. तें ऐकून जरासंध अतिशय खवळला. कंसाच्या नाशाला प्रत्यक्ष कारण झालेल्या कृष्णाला ठार मारण्याचा तर त्यानें निश्चय केलाच, पण वसुदेवानें केलेल्या कारस्थानानेंच कंसाचे सर्व प्रयत्न विफल होऊन त्याचा नाश झाला, म्हणून यादवांचें समूळ उच्चाटन करून यादवरहित पृथ्वी करण्याचा मोठा प्रयत्न करण्याचें त्यानें ठरविलें आणि ताबडतोब तो त्या प्रयत्नाला लागला. कृष्णानेंहि यादवांचें प्रचंड

सैन्य सुसज्ज केलें. यादव विस्कळित असून दैन्यावस्थेंत दिवस कंठीत आहेत, वसुदेवादि थोड्या यादव जहागिदारांचें सैन्य मथुरेंत असेल, अशी जरासंधाची कल्पना होती. माथुरदेशाचें कंसाच्या वेळीं किती सैन्य होतें हेंहि त्याला माहीत होतें. म्हणून त्यानें मथुरानगरीचा विध्वंस करून मथुरेंतल्या सर्व यादवाचा निःपात करण्याला अगदीं पुरेसें एक अक्षौहिणी सैन्य घेऊन तो मथुरा नगरीवर चालून येण्यास निघाला. एका अक्षौहिणींत २१८७० रथ, २१८७० हत्ती, ६५६१० घोडे व १०९३५० पायदळ इतकें सैन्य असतें. एवढें प्रचंड सैन्य मथुरानगरीचा व तींतील यादवांचा चुराडा करण्यास अगदीं भरपूर आहे, असें जरासंधाला वाटलें. तो आपण निश्चित विजय मिळविणार या खात्रीनें मथुरानगरीवर चालून आला. यादवांची प्रचंड सघटना झाली असून आपल्यापेक्षांहि थोडें अधिकच त्यांचें सैन्य आहे व मथुरेच्या भोंवतालचा कोट कृष्णानें कल्पनातीत मजबूत केला आहे याची त्याला दाद नव्हती. आपलें प्रचंड सैन्य पाहाताच मथुरेचा राजा उग्रसेन आपल्याला शरण येऊन आपल्या पुत्राला मारणाऱ्या कृष्णाला आपल्या स्वाधीन करील, असें त्याचें मनोराज्य चाललें होतें. पण मथुरानगरी जवळ येतांच त्याचें मनोराज्य एकदम ढांसळून पडलें. मथुरानगरीजवळ जरासंधाचें सैन्य येतांच मथुरेच्या तटावरून उल्हाट यंत्राचा एवढा भाडिमार झाला कीं, जरासंधाच्या अर्ध्या सैन्याचा हां हा म्हणतां फडशा पडला. उल्हाट यंत्रांतून सुटणाऱ्या अग्निगोलकांचा प्रतिकार कसा करावा, हें जरासंधाच्या सैन्याला समजेना. निम्में सैन्य गारद झालेलें पाहून बकिच्या सैन्याचा धीर खचला व तें परत फिरलें. जरासंधाचें सैन्य परत फिरतांच यादवांची प्रचंड सेना त्याच्यावर तुटून पडली व जरासंधाच्या सैन्याची भयंकर कत्तल करून जरासंधाचा यादवांनीं पूर्णपणें पराजय केला. बलरामानें जरासंधाला जिवंत पकडलें व त्याची मानहानि करून 'जा, तुला सोडून देतों, पुन्हां यादवांच्या वाटेस जाशील तर खबरदार' अशी त्याला तंबी देऊन सोडून दिलें. जरासधाला सोडून देण्यांत दाखविलेल्या मुत्सद्दीपणामुळें रामकृष्णांचा उमदा स्वभाव सर्व लोकांना दिसला व यादवांचा दरारा फार वाढला. अपमानित झालेला

जरासंध खिन्न अंतःकरणानें मगध देशाला परत गेला. कृष्णानें आपल्या सैन्याला शाबासकी दिली. पण एका विजयानें त्यांनीं फुशारून जाऊं नये, डिंवचलेला सम्राट् जरासंध स्वस्थ बसणार नाहीं, तो फिरून दुप्पट तयारीनें चालून येईल, त्यावेळीं आपण त्याला तोंड देण्याला यापेक्षांही मोठ्या संख्येनें सुसज्ज असलें पाहिजे, असा कृष्णानें त्यांना इशारा देऊन ठेविला.

पाहिल्याच मोठ्या विजयानें उत्साह वृद्धिंगत झालेल्या यादव-सैन्याला कृष्णानें सांगितलेली गोष्ट पटली. यादव–सैन्य फार मोठ्या प्रमाणांत वाढविण्याच्या उद्योगाला यादव सरदार लागले. ह्या यादव सरदाराना सैन्य जमविण्याच्या बाबतींत मार्गदर्शन करण्याचें काम रामकृष्णांकडेच होतें, आणि ते त्या कामाला अत्यंत योग्य असे होते. आतापर्यंत यादवांची झालेली संघटना ठिकठिकाणीं पसरलेल्या प्रमुख यादवाना बोलावून आणून केली होती. पण यापुढें जरासंधाने केवढेंहि मोठें सैन्य आणिलें तरी त्याच्या सैन्याशीं टक्कर देईल असें प्रचंड सैन्य तयार करावयाचें तर परमुलुखात गेलेले आणि त्या ठिकाणीं उदरभरणासाठीं स्थायिक झालेले सर्वच्या सर्व यादव मथुरेच्या यादवराज्यांत जमाविणें अवश्य होतें. मगधदेशचा जरासंध राजा आपल्या अफाट सैन्यबलाच्या जोरावर 'सम्राट्' ह्या पदवीला प्राप्त झाला होता. मगधदेशांत पाहिजे तितकें सैन्य तयार करता येईल अशी भरपूर लोंकवस्ती होती. मगधदेश अत्यंत सुपीक असल्यानें, लोकसंख्येची कितीहि वाढ झाली तरीदेखील, खाण्यापिण्याची कोणालाहि ददात नव्हती. मगध देशाच्या तोडीचा मथुरा देश बलाढ्य करायचा म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें परमुलुखांतील एकूण एक यादवांना मथुरा देशात आणून लोकसख्येची वाढ करणें अवश्य होतें. त्याचबरोबर इतक्या अफाट लोकसंख्येची खाण्यापिण्याची भरपूर सोय करायला पाहिजे होती. आणि हेंच काम मोठें कठीण होतें. रामानें तें काम आपल्या हातीं घेतलें. त्यानें तें इतक्या हिरीरीनें आणि यशस्वी रीतीनें केलें कीं तें पाहून सर्वांनीं तोंडात बोटच घातलें. गोकुळ-वृंदावनांत सर्व लहानपण गेल्यामुळें शेतीची व्यवस्था रामाच्या

डोळ्यांसमोर होती. आतां मथुरेसारख्या देशाची राजसत्ता हातीं आल्यावर रामानें सर्व देशभर शेतीची वाढ झपाट्यानें चालविली. जमीन कुदळीने खणून गोकुळांत गोप जमीन लागवडीस आणीत. मोठ्या प्रमाणावर सुलभ रीतीनें जमीन लागवडीस तयार करण्याकरितां जमीन नांगरण्याची, मध्यंतरी लुप्त झालेली, प्राचीन वेदकालीन पद्धत रामानें आपल्या कल्पनेनें नवीन स्वरूपांत सुरू केली. त्यानें उत्तम नागर तयार करविले. त्यांना बैल जोडून त्यांच्या शक्तीनें नांगरण्याची कला आपल्या कल्पनेनें काढून त्यानें लोकांना शिकविली. हजारों नांगर देशांत काम करूं लागले. माथुर देशातील यमुनाकांठची सर्व जमीन लागवडीस तयार केली गेली, व खंडोगणती धान्याची निपज व्हावयाला लागून देश समृद्ध होऊं लागला. कंसभीतीनें देशत्याग करून पोटासाठीं परमुलुखात वणवण करीत हिंडणाऱ्या यादवांचा ओघ आतां समृद्ध स्वदेशाकडे आपोआप वळला आणि माथुर देश संख्याबलानें व संपत्तीनें मगध देशाशीं स्पर्धा करण्याच्या मार्गाला लागला. नांगराच्या जोरावर रामानें देश बलाढ्य केला. कुदळीनें जमीन खणूनं व जमिनीची मशागत करण्याकरितां कुटुंबांतील मंडळींसह सर्व वेळ खपून जेमतेम आपल्या कुटुंबापुरतें धान्य उत्पन्न करणारा शेतकरी आता रामाच्या नांगराच्या जोरावर देशाकरितां खंडोगणती धान्याची निपज करूं लागला. शेतकरी जेमतेम आपल्या कुटुंबाकरितां धान्य पिकवीत असे, तेव्हां तें खाण्याला योग्य करण्याकरितां वाटोळ्या दगडानीं भरडून तो तयार करी. पण आतां खंडोगणती धान्य त्यावरील टरफलापासून निराळें करण्याकरितां कांहीं निराळी कल्पना काढणें जरूर होतें व तीहि कल्पना रामानेंच काढून सर्वांना चकित केलें. दगडांचीं मोठीं जातीं, दगडांचीं उखळें व धान्य कुटण्याकरितां लांकडी गोल मुसळें रामानें कल्पकतेनें तयार करविलीं. हजारों नांगर-मुसळांच्या जोरावर रामानें देशाचें बल अपरंपार वाढविलें. सर्व यादव त्याला आनंदानें व अभिमानानें बलराम (समर्थ, शक्तिमान्, देशाला बलाढ्य करणारा), हलधर (नांगर धारण करणारा), हलायुध (नांगर हेंच ज्याचें शस्त्र आहे असा), मुसली (मुसळ धारण करणारा) अशा नांवांनीं संबोधूं लागले.

यादवांची सेना शिकवून तयार करण्याचें काम शस्त्रास्त्र-विद्येंत पारंगत असलेल्या श्रीकृष्णानें झपाट्यानें चालविलें. यादवांचीं मोठमोठीं बलाढ्य चक्रें लवकरच तयार झालीं. 'चक्र' ह्या संस्कृत शब्दाला अनेक अर्थ आहेत. १. चक्र म्हणजे सेना, सेनाविभाग; २. चक्र म्हणजे संघटना; ३. चक्र म्हणजे अनेक खेड्यांचा संघटित समूह. ह्या सर्व अर्थांनीं युक्त अशीं, श्रीकृष्णानें आपल्या चातुर्यानें, कोणत्याहि बलाढ्य शत्रूशीं टक्कर देण्याला समर्थ अशीं यादवांचीं असंख्य चक्रें बनविलीं. हीं सर्व चक्रें तयार करणारा, हीं सर्व चक्रें कुशलतेनें चालविणारा, पराक्रमी, चतुर सेनाध्यक्ष म्हणून श्रीकृष्णाला सर्व यादव मोठ्या अभिमानानें 'चक्रधर' म्हणूं लागले. असंख्य यादव–सैन्यापैकीं रणांगणावर अवश्य लागणाऱ्या सर्व उत्तम गुणांनीं युक्त अशा यादव–योद्धयांची अत्यंत कुशलतेनें निवड करून श्रीकृष्णानें आपलें एक खास चक्र, आपलें एक खास सेनापथक, युद्धशास्त्रांत इतकें तरबेज केलें कीं, त्या चक्राला, त्या सेनापथकाला, अपयश म्हणून कधीं शिवलें नाहीं. कोणत्याहि विकट, निर्वाणीच्या प्रसंगीं ह्या खास सेनापथकाचा श्रीकृष्ण उपयोग करी आणि तें खास चक्र आपल्या प्रचंड सामर्थ्यानें व युद्धशास्त्राच्या अलौकिक नैपुण्यानें, केवढ्याहि बलाढ्य शत्रूचा हां हां म्हणता धुव्वा उडवी व विजयी होऊन श्रीकृष्णाकडे परत येत असे. ह्या विजयी चक्राकडे दृष्टि जातांच शत्रूंच्या हृदयांत धडकी भरून त्यांना पळतां भुई थोडी होई. ह्या खास सेनापथकाचें, ह्या खास चक्राचें दर्शन स्वजनांना अत्यंत आनंद देई, म्हणून कृष्णाच्या ह्या खास चक्राला 'सुदर्शन चक्र' असें अन्वर्थक नांव पडलें. कृष्णाच्या ह्या सुदर्शन चक्राचा पराक्रम पुढें इतिहासांत फार गाजला. पुढील चरित्रांत आपल्याहि तो दृष्टीस पडेलच.

त्यावेळीं जरासंधाचें वर्चस्व गंगानदीच्या उत्तरेकडील सर्व राजांनीं मान्य केलेलें असून तो सम्राट् ह्या पदवीला पोंचलेला होता. त्याच्या प्रचंड सैन्याचा नाश करून त्याला यादवसेनापति बलरामानें जिवंत पकडलें व श्रीकृष्णाच्या सल्ल्यानें सोडून दिलें. ही झालेली मानहानि जरासंध विसरणें शक्यच नव्हतें. यादवहि ही गोष्ट समजून होते व त्यांनीं

जरासंधाकडून होणाऱ्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्याकरितां कशी आणि केवढी प्रचंड तयारी चालविली होती हें वर सांगितलें आहेच. जरासंध कृष्णासकट सर्व यादवांना धुळीला मिळविण्याच्या ईर्षेनें आपल्या मांडलिक राजांची मदत घेऊन मोठ्या सैन्यानिशीं माथुर देशावर एकदां नव्हे, दोनदां नव्हे, लागोपाठ पंधरा वेळां चालून गेला. पण प्रत्येक वेळीं यादव सैन्याच्या युद्धनैपुण्याचा नवीन मासला त्याच्या अनुभवास येऊन त्याला पळ काढवा लागला. जरासंधाच्या सैन्याची कल्पनातीत हानि झाली व विजयी यादव सैन्यानें माथुर देशाची मर्यादा किती तरी वाढविली. सर्व आनर्त देश यादवांनीं जिंकला. पण आनर्त देश आपल्या राज्याला न जोडतां आनर्त देशाचा राजा कायम ठेवून त्याला कृष्णानें मथुरेच्या राज्याचा मांडलिक बनविलें. आनर्त देशच्या प्रसिद्ध रेवत राजानें आपली सुंदर कन्या रेवती हिचा बलरामाशीं मोठ्या थाटानें विवाह करून मथुरेच्या राज्याशीं आपला नात्याचाहि संबंध जोडला. आनर्त देशाच्या राजाला मांडलिक केल्यानंतर यादवांची दृष्टि पश्चिम समुद्रकांठच्या सुंदर प्रदेशावर गेली. त्यांनीं तो प्रदेश पादाक्रांत केला. तो सुंदर प्रदेश काबीज होतांच यादवांना अतिशय आनंद झाला. तेथील नारळांचीं, एलांचीं, पुन्नागांचीं व केतकीचीं वनें पाहून यादवांचीं अंतःकरणें प्रसन्न झालीं. या प्रदेशांत आपण एक सुंदर शहर वसवावें अशी श्रीकृष्णाला इच्छा झाली. शहर कोठें वसवावें ह्याचा तो विचार करूं लागला. कुशस्थली ह्या नांवाचा एक सुंदर हवाशीर प्रदेश त्याला आढळला. त्या प्रदेशाचा विस्तार फार मोठा असून तो सर्व रेताड, तांबड्या मातीचा होता. त्याच्या चारी बाजूंना समुद्राचें वेष्टण होतें ह्या प्रदेशावर श्रीकृष्णाच्या आज्ञेनें 'द्वारका' नांवाची अत्यंत सुंदर व संपन्न नगरी वसविण्यांत आली. ही नगरी बारा योजनें लांब व बारा योजनें रुंद एवढी विस्तीर्ण होती. तिच्या चारहि बाजूंस समुद्र असल्यानें ती स्वाभाविकतः सुरक्षित होतीच पण श्रीकृष्णानें समुद्राला लागून नगरीच्या चारहि बाजूंस मोठा मजबूत तट बांधून तिची सुरक्षितता आणखी वाढविली. द्वारकेची रचना विश्वकर्मा ह्या नांवाच्या त्यावेळच्या एका अत्यंत कुशल शिल्पज्ञाकडून करविण्यांत आली होती. नगरींत चारी

बाजूंना मोठमोठे राजमार्ग होते. नगरवासी जनांकरितां जागोजाग विश्राम-गृहें तयार केलीं होतीं. लहान लहान रस्तेसुद्धा स्वच्छ व शोभिवंत दिसत असून चोहों बाजूंना रस्ते फुटणारे चौक कितीतरी होते. मथुरेंतल्या बहुतेक सर्व यादव रहिवाशांनीं आपल्याकरितां द्वारकेंत घरें बांधिलीं होतीं. श्रीमान् लोकांचीं घरें जणूं काय सोन्यानें मढविलीं आहेत अशीं दिसत. राजप्रासाद तर इतके भव्य व शोभिवंत होते कीं त्याकडे पाहात असतांना मनुष्य तहानभूक विसरे. ठिकठिकाणीं रम्य उपवनें करण्यांत फार चातुर्य दाखविलें होतें. धार्मिक लोकांनीं लोकोपकारार्थ मनोहर देवालयें बांधिलीं होतीं. देवळांचे कळस सोन्याचे होते. या कामीं त्यांनीं अगणित द्रव्य खर्चिलें होतें. गोशाला, अश्वशाला, गजशालाहि मोठ्या प्रेक्षणीय होत्या. मथुरेंतलें सर्व राजैश्वर्य येथें दिसत होतें. जरुर पडल्यास मथुरेंतल्या यच्चयावत् लोकांना मथुरा सोडून द्वारकेंत जाऊन राहता येईल, अशी व्यवस्था झाली होती. गांवात चारी वर्णांचे लोक राहण्यासाठीं विशेष रचना केली होती.

जरासंधानें मथुरेवर वारंवार स्वाऱ्या केल्यानें मथुरेचें फार नुकसान होऊं लागलें. प्रत्येक वेळीं जरासंधाचा पराभव होऊन हात चोळत त्याला पळ काढावा लागला, पण युद्धाच्या ज्वाळांनीं मथुरानगरी हैराण झाली. नेहमीं युद्धाकडे जनतेचें लक्ष्य वेधलें गेल्यानें व्यापार, उद्योगधंदे मंदावूं लागले. यापुढें मथुरेनजीक युद्ध होऊं देणे श्रेयस्कर नाहीं असें श्रीकृष्णाला वाटूं लागलें. मथुरेवर स्वाऱ्या करण्यात कंसवधाबद्दल श्रीकृष्णावर सूड उगवावा एवढा एकच जरासंधाचा हेतु दिसत होता. जरासंधाला भिऊन आपण पळत आहोंत अशी हूल दाखवून जरासंधाला आपल्या पाठीवर घ्यावा व दूर कोठें तरी नेऊन त्याच्याशीं सामना द्यावा आणि त्याचा नाश करावा असें श्रीकृष्णानें मनाशीं ठरविलें.

पंधरा वेळां झालेल्या पराभवानें जरासंधहि फार चिडला. आतां एकदां मोठ्या प्रयत्नानें प्रचंड सैन्य जमा करून श्रीकृष्णाचा कांटा निश्चयानें काढून टाकावयाचाच असा त्यानें बेत केला. आतांपर्यंत तो आपल्या मांडलिक राजांपैकींच कांहींजणांना मदतीला घेऊन स्वाऱ्या करीत होता.

त्याचा अनेकवार पराभव झाल्यानें मांडलिकांच्या दृष्टीनेंहि त्याला फारच कमीपणा आला होता. ह्या खेपेस त्यानें आपल्या मित्रराजाना श्रीकृष्णाच्या विरुद्ध उठविण्याचा प्रयत्न केला. श्रीकृष्णाच्या वाढत्या बळाचीं अतिशयोक्तिपूर्ण वर्णनें त्यांना ऐकवून पुढें मागें त्यांनाहि जाचक होणाऱ्या श्रीकृष्णाचा नाश करण्याकरितां त्यांनीं तयार व्हावें म्हणून त्यानें सर्वांच्याकडे आपले दूत पाठविले. जरासंधाची ही युक्ति सफळ झाली व त्याचे मित्रराजे आपापल्या सैन्यासह कृष्णावर स्वारी करण्याकरितां त्याच्या मदतीला धांवून आले. याप्रमाणें काशी, विदेह, मद्र, त्रिगर्त, दरद, शाल्व, करुष, विदर्भ, चेदि इत्यादि देशांचे राजे ससैन्य जरासंधाला येऊन मिळाले. ह्या अनेक राजाच्या एकत्रित झालेल्या प्रचंड सैन्यासह जरासंध मथुरेवर स्वारी करण्याकरितां मगध देशाहून निघाला तोंच आपल्याला भिऊन श्रीकृष्ण व बलराम दक्षिण दिशेकडे पळून जात आहेत, असें त्याच्या कानावर आलें. आपल्या अफाट सैन्याला भिऊन श्रीकृष्ण पळून चालला आहे, हें ऐकून आपल्या सामर्थ्याबद्दल सर्वांना अभिमान वाटला व आतां ह्या पळपुट्या कृष्णाला गाठून त्याला सहज ठार करतां येईल, असें वाटून ते मथुरेचा मार्ग सोडून दक्षिण दिशेकडे कृष्णाचा माग काढीत निघाले.

श्रीकृष्ण व बलराम मथुरा सोडून निघाले. श्रीकृष्णानें आपल्याबरोबर फक्त आपलें चक्र घेतलें होतें. ते नाना देश व रम्य स्थलें पाहात पाहात दाक्षिण देशांतील करवीर नगराच्या अनुरोधानें चालूं लागले. वाटेंत वेण्णानदीच्या कांठीं अतिशय वृद्ध झालेले तपस्वी परशुराम त्यांना भेटले. रामकृष्णांनीं त्यांस वंदन करून आपली सर्व हकिगत त्यांना सांगितली आणि त्यांना आपलें शिकवून तयार केलेलें पथक दाखविलें. मगधदेशच्या दुष्ट जरासंधाला व त्याच्या मित्र-राजांना अडचणीच्या प्रदेशांत नेऊन त्यांचा नाश करण्याचा रामकृष्णांचा बेत ऐकून रणांगणांत अजिंक्य ठरलेल्या त्या कसलेल्या योद्धयाला अत्यंत कौतुक वाटलें. श्रीकृष्णाचें तें सुदर्शन चक्र पाहून परशुरामाला फार समाधान वाटलें. परशुरामानें रामकृष्णांना त्यांच्या बेताला योग्य असें एक ठिकाण सुचविलें. " करवीर नगरापासून दक्षिणेकडे बऱ्याच दूर अंतरावर क्रौंचपुर ह्या नांवाचें एक रम्य नगर आहे.

तेथें यदूच्या वंशांतील एक यादव राजा राज्य करीत आहे. त्याचा तुम्हाला फार उपयोग होईल. क्रौंचपुराजवळ गोमंत ह्या नांवाचा एक अत्यंत दुर्गम पण वनशोभेनें नटलेला असा सुंदर पर्वत आहे. त्यावर तुम्ही जाऊन राहा. त्या पर्वतावर चढण्या-उतरण्याला एकच एक सुलभ मार्ग आहे. तो मार्ग तुम्हाला क्रौंचपूरचा राजा दाखवील. त्या पर्वताला वेढा देण्याचा जरासंधानें प्रयत्न केला कीं तुमचें साधलेंच म्हणून समजा. पुढून तुमचें हें अप्रतिम सुदर्शन चक्र व पाठीमागून क्रौंचपूरचा तुमचाच यादव राजा त्या सैन्यावर तुटून पडला कीं तें सैन्य कितीहि मोठें असो, त्याचा धुव्वा उडवून तुम्ही विजयी झालांच म्हणून समजा." असें सांगून क्रौंचपूरचा मार्ग परशुरामानें त्यांना दाखविला व आशीर्वाद देऊन त्यानें रामकृष्णांना आनंदानें निरोप दिला. परशुरामानें दाखविलेल्या मार्गानें आपल्या सुदर्शनासह जाऊन रामकृष्णांनीं क्रौंचपूर गांठलें. पराक्रमी रामकृष्णांची कीर्ति क्रौंचपूरच्या राजाच्या कानावर गेली होतीच. त्यानें आपल्या वंशांतील त्या पराक्रमी योद्ध्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. त्यांचा बेत ऐकून त्यांना सर्व तऱ्हेचें साहाय्य देण्याचें आनंदानें कबूल करून गोमंत पर्वतावर चढून जाण्याचा गुप्त मार्ग त्यानें दाखविला. युद्धाला सुरवात होतांच आपल्या सुदर्शनाचा उपयोग रामकृष्णांनीं कसा करावा व आपण त्याना कशा तऱ्हेनें उपयोगी पडूं, हें त्यानें त्यांना नीट समजावून सांगितलें. रामकृष्ण आपल्या सुदर्शन पथकासह त्या भीषण दिसणाऱ्या पर्वतावर चढून गेले. वर गेल्यावर त्या पर्वताच्या रम्य वनश्रीनें त्यांना मोहून टाकलें. त्यांना आपण आपल्या लहानपणाच्या वृंदावनांतच आलों आहोंत असा भास होऊं लागला आणि ते तेथें ज़रा-संधाची वाट पाहात आनंदानें राहूं लागले.

मथुरेवर चाल करण्याचें सोडून जरासंध रामकृष्णांचा मार्ग काढीत दक्षिण दिशेकडे निघाला. तोहि करवीर नगराजवळ येतांच त्याला राम-कृष्ण गोमंत पर्वतावर गेल्याचें समजलें. करवीरास शृगाल ह्या नांवाचा एक यादव राजाच राज्य करीत होता. पण तो स्वभावानें अतिशय दुष्ट असल्यानें त्याला दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नसे. तो आपल्या प्रजेला

व प्रत्यक्ष आपल्या पुत्रांनाहि अत्यंत त्रासदायक झाला होता. रामकृष्ण यादव वंशातीलच आहेत, हें माहित असतांनाहि जरासंधाला त्यांचें राहण्याचें ठिकाण त्यानें सांगून टाकलें. जरासंधाची अफाट सेना गोमंत पर्वताजवळ आली. तो डोंगराळ व अत्यंत अडचणीचा प्रदेश पाहून जरासंध व त्याचे मित्रराजे गोंधळले. क्रौंचपूरच्या राजाजवळ त्यांनीं रामकृष्णांचा तपास केला. त्याने ते गोमंत पर्वतावर गेले आहेत असें अगदीं सरळपणानें सांगितलें. जरासंधादि राजानीं त्याला त्या दुर्गम भीषण पर्वतावर चढण्याचा मार्ग विचारला. तो मात्र त्यानें असा सांगितला कीं त्या वाटेनें जातांच त्यांच्या त्या अफाट सैन्याला त्या पर्वताच्या भोंवतीं हिंडायला लागून तें भयंकर अडचणीच्या जागीं सांपडावें व त्या सैन्याचे पुष्कळ विभाग होऊन एका विभागाचा दुसऱ्या विभागाला उपयोग होऊं नये. क्रौंचपूरच्या राजानें सांगितलेल्या मार्गानें तें अफाट सैन्य चालूं लागलें. जवळ जवळ अर्ध्या अधिक पर्वताला वळसा घातला तरी तो वर चढण्याचा रस्ता दिसेना. हजारों हत्ती, हजारों घोडे, हजारों रथ, लक्षावधि पायदळ अशा दऱ्या-खोऱ्यांत सांपडलें कीं, त्यांना धड पुढें जातां येईना आणि मागें परतायलाहि अतिशय अडचण पडूं लागली. गोमंत पर्वताजवळ येतांच त्या बाजूला जसा मैदानी मार्ग होता, तसाच पर्वताच्या चारी बाजूंना असेल, असें त्याना क्रौंचपूरच्या राजानें वर चढण्याच्या मार्गाचें वर्णन केलें, त्यावरून वाटलें होतें. त्या मार्गापर्यंत जाऊन हत्ती, घोडे, रथ उभे करून निवडक पायदळाला वर चढायला सांगायचें असा जरासंधादि सेनानायकांचा बेत होता. पण तो सर्व फसला. ते अशा अडचणीच्या जागीं आले कीं त्यांच्या रथाना पुढेंहि जातां येईना आणि मागेंहि फिरणें अवघड जाऊं लागलें. पायदळाचा पुढें जाण्याचा मार्गच हत्ती, घोडे, रथ ह्यांनीं बंद केला. इतक्यांत त्यांच्या समोर असलेल्या पर्वताच्या बाजूला व मागच्या टेकड्यांवरील वृक्षांच्या दाट वनाला आग लागली. आणि मग जो काय गोंधळ उडाला, तो सांगतांच येत नाहीं. ही आग लावण्याची कामगिरी क्रौंचपूरच्या सैन्यानें करून रामकृष्णांना इषारा देतांच श्रीकृष्णाचें प्रख्यात सुदर्शन पथक

पर्वतावरून खालीं येऊन हत्ती व घोडेस्वार यांच्या पथकांवर तुटून पडलें. जरासंधाच्या सैन्याचे असे विभाग पडले होते कीं एकाची दुसऱ्याला मदत होईना. कृष्णाच्या सुदर्शनानें एकेका विभागाचा पूर्णपणें निकाल लावण्याचें काम झपाट्यानें सुरू केलें. पुढून-मागून आगीच्या ज्वाळा व डाव्या-उजव्या बाजूंनीं बाणांचा वर्षाव व पर्वतावरून ढकललेल्या मोठमोठ्या दगडांचा मारा ह्यांनीं हजारों हत्ती व हजारों घोडेस्वार गारद झाले. ही भयंकर स्थिति पाहून रथ्यानीं व पायदळानें मागच्या मागें पळ काढण्याला सुरवात केली. मैदानांत समोरासमोर बाणांनीं युद्ध करणाऱ्या क्षत्रिय योद्धयांना त्या डोंगराळ मुलखानें दगा दिला. त्यात पर्वताच्या निर्भय जागावर उभे रहून रामकृष्णानीं गुरूकडून शिकलेली आपली मंत्रयुक्त अस्त्रविद्या अशी प्रगट केली कीं, मल्लयुद्ध व शस्त्रविद्या ह्यांत गाजलेल्या रामकृष्णांनीं अप्रतिम धनुर्धारी म्हणून ह्या युद्धांत कीर्ति मिळविली. हजारों हत्ती, हजारों घोडे, हजारों माणसें मरून त्यांच्या रक्त-मांसाचा भूमीवर चिखल झाला. मृत्यूकडून असें भयंकर तांडवनृत्य करवून पुनः श्रीकृष्णाचें सुदर्शनचक्र श्रीकृष्णाजवळ येऊन उभे राहिलें. जरासंधादि राजानीं हतशेष सैन्यासह लज्जित होऊन जीव बचावण्याकरिता पळ काढिला. श्रीकृष्णाचें सुदर्शन त्यांचा पाठलाग करून त्यांची लांडगेतोड करायला उत्सुक होतें. पण श्रीकृष्णाने तें आवरून धरलें. श्रीकृष्णानें त्या पळणाऱ्या राजांचा पाठलाग केला नाहीं. सर्व पराजित राजे अवशिष्ट सैन्यासह गेल्यानंतर श्रीकृष्ण व बलराम आपल्या सुदर्शन पथकासह क्रौंचपूरच्या राजाला जाऊन भेटले. त्यानें केलेल्या मदतीबद्दल त्यांनीं त्याचे उपकार मनःपूर्वक बोलून दाखविले. त्यानेंहि रामकृष्णांच्या धनुर्विद्येची व श्रीकृष्णाच्या सुदर्शनाची मुक्तकंठानें स्तुति केली. आपल्या यादव कुळांत रामकृष्णांसारखीं दैदीप्यमान रत्नें जन्माला आलीं, असें बोलून दाखवून अभिमानानें त्यानें त्यांचें अभिनंदन केलें. क्रौंचपूरच्या राजाचा निरोप घेऊन विजयी रामकृष्ण मथुरेकडे जावयास निघाले. वाटेंत आपल्या वंशांतला यादव राजा म्हणून करवीर नगराच्या शृगाल राजाची त्यांनीं भेट घेतली. रामकृष्णांनीं संपादन केलेला अपूर्व विजय पाहून त्याच्या मत्सरी स्वभावानें

पेट घेतला. “ गोमंत पर्वतावर भित्रेपणानें लपून बसून, भागुबाईपणानें, रणमैदानांत न उतरतां पर्वताच्या आश्रयानें बायकी युद्ध करून तुम्हीं शत्रूंचा पराभव केला.” असें म्हणून त्यानें रामकृष्णांची निर्भर्त्सना केली. इतकेंच नव्हे तर, “ छाती असेल तर माझ्याशीं समोर उभा राहून युद्ध कर व आपला पराक्रम दाखव. मी एकटा तुझ्याशीं धर्मयुद्ध करून तुला यमसदनाचा मार्ग दाखवितों.” असें म्हणून त्यानें धनुष्याचा टणत्कार केला व तो श्रीकृष्णासमोर उभा राहिला, आणि त्याच्यावर बाण सोड-ण्यास त्यानें सुरवातहि केली. कृष्णानें तिरस्काराने त्याच्याकडे पाहून एकाच तीक्ष्ण बाणानें त्याचें मस्तक तोडून त्याच्या त्रस्त प्रजेला त्या दुष्ट राजाच्या जुलमापासून सोडविलें. ह्या दुष्ट शृगालानेंच त्या नगरीचें करवीर हें नांव बदलून आपल्या नांवानें शृगालपूर असें म्हणण्याची लोकांवर सक्ति चालविली होती. शृगालपूरचें मराठींत कोल्हापूर असें रूपांतर झालें. हल्लीं त्या नगरीचीं करवीर व कोल्हापूर हीं दोनहि नावे प्रचारांत आहेत. असो. श्रीकृष्णानें राजपुरोहिताकडून शृगालाच्या मुलाला करवीरच्या सिंहा-सनांवर बसवून यथाविधि राज्याभिषेक केला व मथुरेकडे प्रयाण केलें.

विजयी रामकृष्णांनीं मथुरेंत प्रवेश केला तेव्हां मथुरेंतील नगरवासी लोकांना अतिशय आनंद झाला. जरासंधासारख्या सम्राटाला अनेक राजांची मदत मिळाली असतांहि पराक्रमी राम-कृष्णांनीं त्या सर्वांशीं युद्ध करून विजय संपादन केला याबद्दल मथुरेंतील लोकांना अत्यंत अभि-मान वाटणें स्वाभाविक होतें. त्यांनीं विजयोत्सव मोठ्या थाटानें साजरा केला. आतां माथुर देश निर्भय झाल्यानें शेती, व्यापार, उद्योगधंदे यांची भरभराट झाली.

विदर्भ देशाच्या भीष्मक राजाची अत्यंत रूपवती कन्या रुक्मिणी हिचें कुंडिनपुरांत स्वयंवर होणार आहे, अशी बातमी मथुरेस आली. भरतखंडांतील सर्व क्षत्रिय राजांना स्वयंवराचें निमंत्रण गेलें, पण भीष्म-काचा मुलगा रुक्मी हा जरासंधाचा परम स्नेही असल्यानें, त्यानें जरा-संधादि अनेक राजांचा पराभव करणाऱ्या श्रीकृष्णाला निमंत्रण मुद्दामच दिलें नाहीं. जरासंधाबरोबर पराभव पावून पळालेल्या राजांत स्वतः भीष्मक

आणि त्याचा पुत्र रुक्मी हे दोघेहि होतेच. श्रीकृष्णाच्या पराक्रमाची कीर्ति रुक्मिणीच्या कानावर गेली होती. ती रूप, गुण, वीर्य, संपत्ति इत्यादि गुणांनीं संपन्न असलेल्या श्रीकृष्णावर अनुरक्त असून स्वयंवराच्या वेळीं त्यालाच वरण्याचा तिनें निश्चय केल्याची अंतःस्थ वार्ता भीष्मक व रुक्मी यांना समजली होती. म्हणून त्यानीं श्रीकृष्ण राजा नाहीं, ह्या सबबीवर निमंत्रणाच्या यादींत त्याला मुद्दामच वगळला होता. बुद्धि, औदार्य, सौंदर्य, शील इत्यादि गुणानीं व नानाविध शुभलक्षणानीं युक्त असलेल्या रुक्मिणीचें वर्णन श्रीकृष्णाच्या कानीं गेल्यापासून ही आपली भार्या होण्यास योग्य आहे असें त्यालाहि वाटत होतें. निमंत्रण नसलें तरी स्वयंवराचे ठिकाणीं जाऊन स्वयंवरास जमलेल्या सर्व राजे लोकांसमक्ष कन्येचें जबरदस्तीने हरण करण्याचा क्षत्रियांस अधिकार आहे, हे मनांत आणून श्रीकृष्ण आपल्या अजिंक्य सुदर्शन पथकासह कुंडिनपुरास येऊन दाखल झाला. तेथे स्वयंवराकरितां आलेल्या जरासंधादि अनक राजांचे तळ कुंडिनपुराभोंवतीं पडलेले त्यानें पाहिले. कृष्ण ससैन्य आल्याचें पाहून सर्व राजे· लोकांत भयंकर खळबळ उडाली आणि सर्वांच्यावर भीतीची छाया पसरली. कन्येसाठीं आता संग्राम झाल्याशिवाय राहात नाहीं असें सर्वांना वाटलें. निमंत्रणाशिवाय आल्यामुळे कृष्णाचें भीष्मकाकडून स्वागत झालें नाहीं. पण एवढ्या पराक्रमी पुरुषाचा अपमान होणें बरें नाहीं, असें वाटून कृष्णाच्या पराक्रमाबद्दल अत्यंत आदर वाटणाऱ्या क्रथकैशिक राजानें त्याचें स्वागत करून त्याला आपल्या शिबिरांत उतरून घेतलें. तें पाहून इतर सर्व राजांनीं भीष्मकाजवळ तक्रार करून त्याला सांगितलें, "कृष्ण हा राजा नसल्यानें आमच्या बरोबरीचा नाहीं. त्याला स्वयंवरात येऊं द्याल तर आम्ही त्याला घालवून देऊं. त्यामुळें तुमचा व त्याचा दोघाचाहि अपमान होईल. प्रसंग आला तर आम्ही कृष्णाशीं युद्ध करून त्याचा नाशहि करूं." कृष्णापुढें पराभूत होऊन पळालेल्या त्या राजांच्या त्या वल्गना ऐकून भीष्मकाजवळ बसलेल्या क्रथकैशिकाला हंसूं आलें. त्यानें त्या राजांची गंमत करण्याचेंच ठरविलें. कृष्ण आमच्या बरोबरीचा राजा नाहीं ही त्यांची हरकत काढून टाकण्याकरितां दुसऱ्याच दिवशीं क्रथ-

कैशिकानें श्रीकृष्णाला विधियुक्त राज्याभिषेक करून आपलें राज्य त्याच्या स्वाधीन केलें. कृष्णाच्या राज्याभिषेक-समारंभाकरितां त्यानें सर्व राजांना निमंत्रण केलें. भीष्मक त्याचा आप्त असल्यानें त्याला समारंभाला जावेंच लागलें. शिवाय कृष्णाबद्दल सर्व राजांच्या मनांत भीतीनें खळबळ उडालेली पाहून, असा पराक्रमी, सर्वगुणसंपन्न जामात आपल्याला मिळाल्यास बरा, असें त्याला वाटूं लागलें होतें. बाकी कोणीहि राजा त्या समारंभाला गेला नाहीं. कृष्ण राजा नाहीं ही आपली हरकत नाहींशी होतांच आतां स्वयंवरांत कृष्ण हजर असतांना रुक्मिणी त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाला वरणारच नाहीं व कृष्णाशीं युद्ध करण्याचें तर आपल्यापैकीं कोणाचें सामर्थ्य नाहीं, अशी त्यांची खात्री असल्यानें, भीष्मकावर संतापल्याचा देखावा दाखवून सर्व राजे कुंडिनपुर सोडून चालते झाले. अर्थात् स्वयंवर राहित झालें. श्रीकृष्णहि मथुरेस परत जावयास निघाला. निघतांना त्यानें क्रथकैशिकाच्या चातुर्याबद्दल व सौजन्याबद्दल त्याचे मनःपूर्वक आभार मानून त्याचें राज्य त्याला विधियुक्त समारंभानें परत दिलें. ह्यावेळीं क्रथकैशिक व भीष्मक ह्यांनीं कृष्णाचा मोठा गौरव करून आदरानें त्याला निरोप दिला.

कृष्ण जेथें तेथें आपल्या आड येतो, आपला अपमान करतो, पण त्याचें कोणत्याहि प्रकारें पारिपत्य करण्याचें आपल्याला सामर्थ्य नाहीं, असें पाहून अत्यंत चिडलेल्या सम्राट जरासंधानें अत्यंत निंद्य व आर्यराष्ट्राचा घात करणारी गोष्ट करण्याचें मनांत आणिलें. त्याचें उदाहरण पुढें दुबळ्या राष्ट्रद्रोही राजांनीं गिरवून देशाचा अनेक वेळां घात केला, असें पुढील इतिहासांत दिसेल. श्रीकृष्णाच्या चातुर्यानें व दूरदर्शीपणानें जरासंधानें केलेलें निंद्य कृत्य सफल झालें नाहीं ही गोष्ट निराळी. कालयवन नांवाचा एक महाबलाढ्य राजा भरतखंडाबाहेर राज्य करीत होता. तो भरतखंडांत येण्याचें कांहीं तरी निमित्त पाहातच होता. त्या कालयवनाला कृष्णाचा नाश करण्याकरितां सम्राट जरासंधानें पाचारण केलें. जरासंधानें केलेल्या निमंत्रणाचा कालयवनानें अत्यंत आनंदानें स्वीकार केला. प्राचीन ग्रंथकार असें लिहितात कीं एक कोटि सैन्य घेऊन तो जरासंधाच्या मदतीला

धांवून आला. ही भयंकर वार्ता मथुरेंत येतांच सर्व लोक पराकाष्ठेचे घाबरले. पण हिमाचलाप्रमाणें धीरोदात्त श्रीकृष्णानें त्याना धीर दिला. कृष्णाचा दूरदर्शीपणा, त्याचें राजकारणपटुत्व व चातुर्य हीं सर्व कसाला लागण्याची हीच वेळ होती. पुढें येणाऱ्या संभवनीय, असंभवनीय संकटांची कल्पना करून त्यांतून सुटण्याची तजवीज करून ठेवील तोच खरा राजकारणपटु, चतुर, मुत्सद्दी. श्रीकृष्णानें कालयवन जरासंधाच्या मदतीला येत आहे, ही भयंकर वार्ता ऐकतांच मथुरेंतल्या सर्व लोकाना त्यांचीं बायकामुलें, चीजवस्त यांसह आपल्या सैन्याच्या देखरेखीखालीं द्वारकेंत सुखरूप नेऊन पोंचविलें. द्वारकेसारखी अत्यंत विस्तीर्ण व परमावधीची सुरक्षित नगरी अशा संकटकालीं उपयोगीं पडावी, म्हणून आगाऊच तयार करून ठेविली होती. चतुर कृष्णानें मोठ्या दूरदर्शीपणानें केवढ्याहि प्रचंड सैन्याचा सहज नाश करतां येईल अशी एक योजना करून ठेविली होती. मथुरेपासून दहा योजनें दूर एक मोठा डोंगर होता. त्यामध्यें 'मुचुकुंद गुहा' ह्या नावाची एक प्रशस्त गुहा होती. त्या गुहेत कृतयुगांतला एक महापराक्रमी व तपस्वी मुचुकुंद नांवाचा राजा इंद्रवरानें निद्रिस्त असून त्याची निद्रा मोडण्याचा कोणीं प्रयत्न केल्यास तो त्याला जाळून भस्म करतो, अशी सर्व लोकांची समजूत करून दिली गेली असल्याकारणानें तिकडे फिरकण्याचें कोणीहि धारिष्ट करीत नसे. लोकाचा उगीच नाश होऊं नये म्हणून तिकडे कोणाला जाऊं देऊं नये अशी कृष्णानें आपल्या सुदर्शन पथकाला आज्ञा केली असल्यामुळें त्या गुहेसंबंधीं लोकांचा समज फारच दृढ झाला होता. त्या गुहेंत निद्रिस्त असलेल्या त्या पुण्य-पुरुषाला लोक दुरूनच नमस्कार करीत. खरोखर ती गुहा म्हणजे भयंकर स्फोटक द्रव्यांनीं भरलेलें तें फार मोठें कोठार होतें. डोंगरावरच्या इतर बारीकसारीक गुहाहि स्फोटक द्रव्यांनींच भरलेल्या होत्या. तो सर्व डोंगर ज्वालामुखी पर्वताप्रमाणें भयंकर होऊन राहिला होता.

मथुरा नगरीवर एका बाजूनें कालयवनानें चालून जावयाचें व दुसऱ्या बाजूनें जरासंधानें हल्ला करावयाचा, आणि त्या दोन प्रचंड सैन्यांच्या

कार्त्रींत मथुरानगरी धरून तिची व तिच्याबरोबर सर्व यादवांसह श्रीकृष्णाची धुळधाण करावयाची, असा कालयवन व जरासंध यांचा संकेत ठरला होता. पण जरासंधाचा अंतःस्थ बेत थोडा निराळा होता. तो श्रीकृष्णाच्या यादव सैन्याला, विशेषतः त्याच्या अजिंक्य सुदर्शन चक्राला, फार भीत होता. म्हणून कालयवनाला तोंडीं देऊन त्याच्या अफाट सैन्यापुढे मथुरेची दुर्दशा झाल्याची वार्ता आपल्याला येऊन पोहोंचेपर्यंत आपण दुसऱ्या बाजूस दूर अंतरावर उभें राहावयाचें व आतां विजय मिळेल अशी खात्री होतांच, मथुरेवर चालून जाऊन ऐन वेळीं जयाचे धनी आपण व्हावयाचें, असा त्याचा हेतु असल्यानें, तो आस्ते आस्ते चाल चालत होता. कालयवन मात्र झपाट्यानें मथुरेवर निघाला. कृष्णाला त्याच्या चतुर हेरांकडून त्या दोघांचा संकेत व जरासंधाचा अंतःस्थ हेतूहि समजला. मथुरेच्या तटावरून कालयवनाची सेना दिसूं लागताच, कृष्णानें त्याला हूल दाखविण्याची जय्यत तयारी केली. कालयवनाच्या दृष्टिपथांत मथुरा येतांच मथुरेच्या वेशींतून कृष्णाचें तडफदार सुदर्शन पथक अत्यंत चपळाईनें बाहेर पडून कालयवनाच्या सैन्यासमोरून मुचुकुंद गुहा असलेल्या डोंगराकडे धांवत सुटलें. कालयवनानें कृष्ण आपल्या सैन्यासह पळून चालला आहे, अशी कल्पना करून त्या पळणाऱ्या सैन्याचा पाठलाग करण्याची आपल्या सैन्याला आज्ञा केली. कृष्णाच्या सैन्यापैकीं दोनचार लोक मुद्दामच त्याच्या सैन्याच्या हातीं सांपडले; त्यांनीं कृष्ण पळून जात आहे, अशी कबुली देतांच कालयवन आपल्या सैन्यापैकीं निवडक सैन्य बरोबर घेऊन कृष्णाला गाठण्याकरितां त्याच्या सैन्याच्या पाठीस लागला. सुदर्शन पथकानें त्याला हूल दाखवीत दाखवीत त्या डोंगराजवळ नेलें, व एकदम तें त्या डोंगरांतील गुहांत शिरल्यासारखें दाखवून नाहींसें झालें. त्या डोंगरांत आपल्या लोकांसह श्रीकृष्ण निश्चित लपून बसला आहे, अशी कालयवनाची खात्री होऊन, त्यानें आपल्या सैन्याचा त्या डोंगराला गराडा दिला, व हजारों सैनिक त्या डोंगरावर कृष्णाच्या शोधार्थ चढले. अशा रीतीनें कालयवनाचें निम्मे-अधिक सैन्य डोंगर रोंखून धरण्यांत गुंतलें. डोंगराच्या सर्व बाजू आणि

सर्व डोंगर सैनिकांनीं फुलून निघाल्यासारखा दिसूं लागला. आता श्रीकृष्ण आपल्या हातून सुटत नाहीं अशी कालयवनाची खात्री झाली. त्यानें स्वतः निवडक लोक बरोबर घेऊन डोंगराच्या गुहा शोधण्यास सुरुवात केली. तो त्या मुख्य गुहेंत शिरला मात्र. गुहेच्या आंतून कोणींतरी रणशिंग फुंकलें आणि निमिषार्धात एवढा प्रचंड स्फोट झाला कीं दहा योजने लांब असलेल्या मथुरेतलीं घरें हादरलीं, आणि मग एका पाठोपाठ एक असे अनेक स्फोट झाले. डोंगरावरचे दगड व झाडें आकाशांत उडत आहेत असें फार लांबून दिसत होतें. डोंगराच्या सभोंवार गराडा घातलेल्या व वर चढलेल्या सैनिकांच्या केव्हांच ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. यादवांच्या सैन्याने कालयवनाच्या उरलेल्या सैन्यावर निकराचा हल्ला केला. इतक्यात सुदर्शन पथकहि त्यांच्या मदतीला प्रगट झाले. आणि मग परमुलखांत एकदम सर्व प्रकारें गोंधळून गेलेल्या कालयवनाच्या सैन्याची धुळधाण झाली. त्याचे अपरिमित युद्धसाहित्य, शस्त्रें व संपत्ति यादवांच्या हातीं लागून श्रीकृष्णाच्या आज्ञेनें ती सर्व द्वारकेकडे रवाना झाली. जरासंध पूर्वेकडून मथुरेवर चाल करण्याकरितां प्रवर्षण पर्वतापर्यंत येतो न येतो तोंच त्याला कालयवनाचा पूर्ण नाश झाल्याचें वृत्त कळलें, त्याबरोबर त्याचा एकदम धीर खचला. मथुरेवर स्वारी करण्याचें अवसान पार नाहींसें झाल्यामुळें त्यानें मगध देशाचा मार्ग धरिला.

द्वारका नगरींत आतां सर्व यादव स्थिरस्थावर होऊन निर्भयपणें राहूं लागले. द्वारका नगरी आतां धन-धान्य, व्यापार, उद्योगधंदे वगैरे सर्व बाबतींत श्रेष्ठ ठरून भरतखंडात मान्यता पावावी या इच्छेनें रामकृष्णानीं उद्योग आरंभिले. द्वारकानगरींत कोणींहि अनाथ, दुःखी, रोगग्रस्त, अन्नहीन, वस्त्रहीन व भिक्षावृत्तीवर राहणारा असू नये, ह्याविषयीं त्यांनीं अत्यंत दक्षता बाळगली. द्वारकेंतील सर्वांचें जीवन सुखमय होईल, अशीं व्यवस्था त्यांनीं लावून दिली. द्वारकेत अगदीं लहान मुलें मुद्दाम त्यांच्याकरितां तयार केलेल्या रमणीय बागांतून मोकळ्या जागेंत हंसत, खिदळत, उडत, बागडत निकोप प्रकृतीनें आनंदानें खेळत असलेलीं दिसत. विद्यार्थिदशेंतलीं मुलें विद्यार्जनांत, व शरीरसामर्थ्य कमाविण्याच्या खेळांत

मग्न असत. तरुण द्रव्य मिळविण्याच्या निरनिराळ्या व्यवसायांत व सैनिकी शिक्षणानें स्वसंरक्षणक्षम होऊन देशाचें सामर्थ्य व प्रतिष्ठा वाढविण्याच्या उद्योगांत गढून गेलेले दिसत. उतारवयाचे लोक जनहित साधणारीं कार्यें करण्यांत व अगदीं वृद्ध ईशचिंतनांत आणि मुलांनातवंडाना उत्तम वळण लावण्यांत आपला काल घालवितांना दिसत. सदाचरणी गुरूंच्या आश्रमांतून अध्ययनाचे घोष चाललेले ऐकूं येत. देव-मंदिरांत धार्मिक प्रवचनें श्रद्धावान स्त्रीपुरुष एकाग्रतेनें ऐकत. व्यापारी पेठा सर्व तऱ्हेच्या मालांनीं भरलेल्या व सौदा पटविणाऱ्यांनीं व सौदा करणाऱ्यांनीं गजबजलेल्या असत. गोशाळा दुभत्या गाईंनीं संपन्न दिसत. अश्वशाळेंत व गजशाळेंत जातिवंत जनावरें पाहून मन आनंदून जाई. राजदरबार राजकारणपटु मुत्सद्द्यांनीं आणि विद्वान पंडितांनीं मंडित असल्यामुळें न्यायदानाचीं व लोकहिताचीं कामें दक्षतेनें चालत. राम-कृष्ण आपला सर्व वेळ वरील सर्व गोष्टी व्यवस्थित चालविण्याच्या कामांत खर्च करूं लागल्यामुळें द्वारकानगरींत सर्वत्र आनंद नांदूं लागला. बळरामाचें लग्न होऊन तो गृहस्थाश्रमी झाला होता. आतां श्रीकृष्णानें गृहस्थाश्रम स्वीकारावा म्हणून त्याच्या पाठीमागें त्याच्या मातापितराचा—देवकी-वसुदेवाचा-लकडा लागला होता. तो योग एकदम जमून येणार असें दिसूं लागलें.

एक दिवस एक तेजस्वी ब्राह्मण विदर्भ देशाहून द्वारकेंत कृष्णाच्या भेटीला आला. द्वारपाळांनीं त्याला राजमंदिरांत नेऊन श्रीकृष्णास भेटविलें. ब्राह्मणांचें संरक्षण करणाऱ्या श्रीकृष्णानें त्या ब्राह्मणाचें मोठ्या आनंदानें स्वागत करून आसन, अर्घ्यपाद्यादिकांनीं त्याची पूजा केली, व त्याला सुग्रास भोजन घातलें. भोजन झाल्यावर तो ब्राह्मण स्वस्थपणें बसला असतां त्याला श्रीकृष्ण म्हणाला, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, तुझें मन नेहमीं संतुष्ट असून तुझ्या धर्मकृत्यांत कांहीं अडचण येत नाहीं ना ! ब्राह्मण आपल्या धर्मापासून न ढळतां अल्पस्वल्प जें काहीं मिळेल तेवढ्यावर जर संतोषानें राहील तर त्याचा तो धर्म त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करतो. असे संतुष्ट, सुशील, अखिल प्राणिमात्राशीं मैत्रीनें वागणारे अहंकाररहित व शांत ब्राह्मण सर्वांना वंदनीय आहेत. हे ब्राह्मणश्रेष्ठा, मी तुला मनःपूर्वक वंदन

करतों. तुझा द्वारकेंत येण्याचा हेतु काय? तुझें काम मला कळलें तर मी तें अवश्य करीन." तें ऐकून ब्राह्मण म्हणाला, "विदर्भ देशची राजकन्या रुक्मिणी हिनें तुला देण्याकरिता एक पत्रिका दिली आहे. ती वाचून जर तिला देण्याकरितां कांहीं निरोप सांगितलास तर तिला मी तो निरोप पोंचवीन. मला स्वतःला कांहींच नको आहे. ती शीलसंपन्न सद्गुणी राजबाला सुखी व्हावी एवढीच माझी इच्छा आहे." इतकें सांगून त्यानें रुक्मिणीची पत्रिका श्रीकृष्णाला दिली. श्रीकृष्णानें ती उघडून वाचली. रुक्मिणीनें त्या पत्रिकेंत प्रारंभीं स्वयंवर मोडल्यापासूनची सर्व हाकिगत लिहिली होती. श्रीकृष्णाच्या भीतीने आतां स्वयंवराचा बेत न करितां तिचा भाऊ रुक्मी यानें जरासंधाच्या आग्रहानें चेदि देशाच्या शिशुपालाला तिला देण्याचें भीष्मक राजाच्या इच्छेविरुद्ध निश्चित केल्याचें कृष्णाला कळवून पुढें तिनें लिहिलें होते, "हे भुवनसुंदरा श्रीकृष्णा, तुझे गुण, तसेंच पाहणाऱ्याच्या नेत्रांना आनंद देणारें तुझें रूप, याचें वर्णन ऐकून माझें मन तुझ्याठिकाणीं आसक्त झालें आहे. हे मुकुंदा, पुरुषश्रेष्ठा, धैर्यशाली कुलीन आणि गुणादिकांनीं युक्त अशी कोणती कन्या विवाहसमयीं, कुल, शील, रूप, विद्या, वय, संपत्ति आणि प्रभाव यांनीं संपन्न असणाऱ्या तुला वरणार नाहीं? हे श्रीकृष्णा, मीं तुला पति म्हणून वरलें असून शरीरहि तुला अर्पण केलें आहे. यास्तव तूं येथें सत्वर येऊन मला आपली भार्या करून घे. हे कमलनयना, सिंहाच्या वांट्याला ज्याप्रमाणें कोल्ह्यानें स्पर्श करणें योग्य नाहीं, त्याप्रमाणे मी तुझ्यासारख्या वीर पुरुषाचाच वाटा असल्यामुळें मला त्या शिशुपालाचा स्पर्श घडतां कामा नये. दान-धर्म, नियम, व्रतें इत्यादि करून व देव, ब्राह्मण व गुरु यांची पूजा करून श्रेष्ठ अशा भगवंताची जर मीं आराधना केली असेल, तर तो श्रीकृष्ण येथें येऊन माझें पाणिग्रहण करो व त्या शिशुपालाचा मला स्पर्श न होवो. श्रीकृष्णा, तूं अजिंक्य आहेस. तेव्हां विवाहाच्या आदल्या दिवशीं गुप्तपणें सेनापतींना बरोबर घेऊन विदर्भ देशांत यावें आणि शिशुपाल-जरासंध यांच्या सैन्याचें मर्दन करून राक्षसविधीनें मला वरावें. मी अंतःपुरांत राहात असल्यामुळें बांधवांना मारल्यावांचून माझें पाणिग्रहण

कसें करतां येईल, अशी शंका, श्रीकृष्णा, तुला येत असेल, तर मी उपाय सांगतें. विवाहाच्या आदल्या दिवशीं आमच्या कुलदेवीची मोठी यात्रा भरावयाची असते, व त्यावेळीं नवऱ्यामुलीला नगराबाहेर पार्वती देवीच्या दर्शनास जावयाचें असतें. ती संधि साधून तुम्हीं माझें हरण करावें. हे कमलनयना, श्रीकृष्णा, जर तुझी कृपा माझ्यावर होणार नाहीं, तर व्रतोपवासानीं कृश होऊन मी प्राणांचा त्याग करीन, आणि असें करता करतां शेंकडों जन्मानीं तरी तुझी कृपा मी संपादन करीनच करीन."

रुक्मिणीची ही प्रेम-पत्रिका श्रीमद्भागवतांत ५२ व्या अध्यायात दिली आहे, ती वाचकांनीं मुळांतूनच अवश्य वाचून पाहावी. ही पत्रिका वाचून पाहातांच श्रीकृष्णानें कुंडिनपुरास जाऊन रुक्मिणीचें हरण करण्याचा निश्चय केला. ब्राह्मणाचा हात धरून तो हंसत हंसत म्हणाला, "ह्या पत्रिकेवरून रुक्मिणीचें मनोगत मला पूर्णपणे कळून आनंद झाला. माझें मन रुक्मिणीच्या ठिकाणीं आसक्त झाल्यामुळे माझीसुद्धां अवस्था तिच्या सारखीच झाली आहे. रुक्मीनें केवळ द्वेषानें, तिच्याशीं होणारा माझा विवाह मोडला आहे. म्हणून आतां लांकडें घांसून ज्याप्रमाणें त्यांतून अग्नीची ज्वाला काढून घ्यावी, त्याप्रमाणें युद्धात त्या राजांचा मी पराभव करून माझ्या ठिकाणीं निष्ठा ठेवणाऱ्या त्या रुक्मिणीला घेऊन येतों." इतकें बोलून त्यानें आपला रथ जोडण्याची आज्ञा दिली. रथ जोडून तयार होतांच आपल्या सुदर्शन पथकाला आपल्या मागोमाग येण्याला सांगून श्रीकृष्ण त्या ब्राह्मणासह रथांत बसला व कुंडिनपुराला त्वरेनें निघाला. सुदर्शन पथक त्याच्या मागोमाग चालूं लागलें. बलरामाला ही हकिगत समजतांच रुक्मिणीकारितां श्रीकृष्णावर सर्व राजे तुटून पडतील व युद्धाचा घनघोर प्रसंग खास उद्भवेल हें मनांत आणून यादवांची प्रचंड सेना बरोबर घेऊन कृष्णाच्या मदतीला तो धांवून गेला.

भीष्मकाच्या मनांत आपली मुलगी शिशुपालाला द्यावयाची नव्हती पण रुक्मीनें आपल्या अलौकिक चातुर्यानें भीष्मकाचें मन वळवून त्याची त्या विवाहाला संमति मिळविली होती. भीष्मकाची रुक्मिणी ही एकच कन्या असल्यामुळें तिचा विवाह अत्यंत थाटांत व्हावा, अशी त्याची

इच्छा होती. म्हणून तो स्वतः लग्नसमारंभावर देखरेख करूं लागला. राजाची इच्छा ओळखून नगरवासी जनहि समारंभास शोभा आणण्यास झटूं लागले. त्यांनीं आपापल्या घरापुढील जागा व रस्त्यावरील चौक स्वच्छ झाडून काढून त्यावर चंदनाचे सडे घातले, रंग वगैरे देऊन घरें श्रृंगारलीं, घरोघर तोरणे बांधलीं व गुढ्या उभारल्या, जिकडेतिकडे निशाणें फडकूं लागलीं. अगुरुचंदनाचा वास चोहोंकडे दरवळूं लागला. भीष्मकानें देव व पितर यांची षोडशोपचाराने पूजा करून ब्राह्मणांना सुग्रास भोजन दिलें, व यथापद्धति पुण्याहवाचन केले. मुलीला मंगलस्नान घालवून उत्तम वस्त्रें भूषणे लेवविलीं. सामवेद व यजुर्वेद यातील मंत्रानीं विद्वान ब्राह्मणाकडून, लग्नात विघ्न येऊं नये म्हणून, वधूचा रक्षणमंगल नामक विधि त्यानें करविला. पुरोहितास अथर्ववेदातील मंत्रानीं ग्रहांच्या शांति करण्यास सांगितलें. भीष्मक राजाला सर्व शास्त्रविधि व कुलाचार चांगले माहीत होते, म्हणून त्यानें कोणत्याहि गोष्टीची कमतरता पडू दिली नाहीं. शिशुपालाच्या बापानेंहि मुलाला हा विवाह कल्याणप्रद होवो या हेतूनें सर्व मंगलकारक गोष्टी करविल्या. नंतर रथ, गज, अश्व, पदाति इत्यादि चतुरंग सैन्य सज्ज करून सुवर्णध्वज फडकावीत तो नवऱ्यामुलास घेऊन कुंडिनपुराला यावयास निघाला. इकडे भीष्मकाला, जावईबुवा येताहेत असें समजताच, त्यानें आपल्या राज्यातील सर्व प्रमुख मंडळीसह सामोरे जाऊन यथाविधि सीमांतपूजन करून वाजतगाजत मोठ्या समारंभानें नवऱ्यामुलाला, मुद्दाम शृंगारलेल्या वरमंदिरांत आणिलें. लग्नसमारंभाकरिता शाल्व, जरासंध, दंतवक्र, विदूरथ, पौंड्रक इत्यादि चैद्य पक्षाचे शेंकडों राजेलोक आपापल्या सैन्यानिशीं कुंडिनपुरास येऊन दाखल झाले.

इकडे श्रीकृष्णाची चातकासारखी वाट पाहाणारी रुक्मिणी अगदीं अधीर होऊं लागली. रात्रहि संपत आली. लग्नाचा दिवस उजाडण्याला आतां फारच अल्पावधि राहिला. अजून श्रीकृष्ण येत नाहीं. त्या ब्राह्मणाचाहि पत्ता नाहीं. कुमारिकेनें अशा रीतीनें पत्र लिहिणे अगदीं अयोग्य आहे असें तर श्रीकृष्णाला वाटलें नसेल ना ? ही मुलगी उद्धट आहे असें वाटून श्रीकृष्णानें आपला येण्याचा बेत रहित तर केला नसेल ना ?

असे नानाप्रकारचे तर्कवितर्क करतां करतां तिची श्रीकृष्णाच्या ठिकाणीं तंद्री लागली. इतक्यांत शुभ शकुन होत आहेत असे वाटून तिला धीर वाटूं लागला. आणि खरोखरीच तो ब्राह्मण तिच्यापुढे येऊन हंसत हंसत उभा राहिला व " श्रीकृष्णाला घेऊन आलों. कांहीं काळजी करूं नको " असे त्यानें शब्द उच्चारिले. रुक्मिणीच्या आनंदाला आता सीमा उरली नाहीं. नंतर तिनें ब्राह्मणाला नाना प्रकारचे प्रश्न विचारून निघाल्यापासून परत येईपर्यंतची हकीगत विचारून घेतली. अशी सुदर कामगिरी केल्या-बद्दल ब्राह्मणाचें कसें उतराई व्हावें, हें तिला सुचेना, तेव्हां तिनें अतिशय नम्रपणें त्याच्या पायांवर मस्तक ठेवून त्याला नमस्कार केला. ब्राह्मणानें संतुष्ट होऊन तिला शुभाशीर्वाद दिला.

लग्नाच्या मुहूर्ताला आतां फार थोडा अवधि राहिला होता. विदर्भ देशाच्या राजघराण्यांतील कुलाचाराप्रमाणें नववधूला अंबिकेच्या दर्शना-करितां नेण्याची तयारी झाली. नववधूनें पायीं जाऊन देवीचें दर्शन घेऊन यावयाचें, अशी प्रथा होती. पोक्त ब्राह्मण सुवासिनी वस्त्रालंकारांनीं भूषित होऊन वधूला घेऊन देवीच्या मंदिराकडे निघाल्या. त्यांचे रक्षण करण्या-करितां त्यांच्याबरोबर हत्यारबंद योद्धे पायीं चालत होते. पुढें मगल वाद्यें वाजत होतीं. मिरवणूक देवीच्या मंदिराशीं येतांच वधूच्या पायांवर उष्णोदक घालून तिच्यावरून दासींनीं निंबलोण उतरून टाकले. राज-स्त्रियानीं तिला ओवाळलें व राजपुरोहिताच्या पत्नीने तिचा हात धरून तिला देवीजवळ नेलें. रुक्मिणीनें मनोभावाने देवीची पूजा केली. तिनें सुवासिक फुलाचा सुंदर गेंदेदार हार देवीच्या गळ्यांत घातला, आणि भक्तियुक्त अंतःकरणानं देवीला नमस्कार करून, कृष्णाची प्राप्ति व्हावी म्हणून तिची प्रार्थना केली. पुजाऱ्याने तोच हार देवीचा मंगल प्रसाद म्हणून तिला देऊन इष्ट वराच्या कंठांत हा आनदाने घाल म्हणून सांगि-तलें. ' देवी मातोश्री, तुझ्या कृपेनें हा हार माझ्या हातून श्रीकृष्णाच्या गळ्यांत पडो. ' असें म्हणून तिनें देवीला, सुवासिनी स्त्रियांना, ब्राह्मणांना नमस्कार केले आणि परत जाण्याकरितां ती देवीच्या मंदिराच्या बाहेर आली, तों एकाएकीं गरुडचिह्नांकित रथ तेथें येऊन उभा राहिला.

त्यांतून मनमोहक श्यामसुंदर श्रीकृष्ण खालीं उतरून स्मित हास्य करीत रुक्मिणीपुढें उभा राहिला. रुक्मिणीनें त्याच्या गळयांत तो हार चटकन घातला. नारदऋषि व गर्ग–महामुनि एकदम तेथें प्रगट होऊन त्यांनीं कृष्णाच्या हातांत दिव्य पुष्पाचा हार देतांच कृष्णानें तो रुक्मिणीच्या गळयात घातला. गर्ग–नारदानीं वधूवरांवर मंगल अक्षता टाकून टाळी वाजविली. मंगल वाद्यांचा गजर झाला. श्रीकृष्ण रुक्मिणीला घेऊन रथांत बसले, आणि रथ चालूं लागला. त्याच्या पाठोपाठ एक रथ आला त्यांत गर्ग–नारद बसताच तो विद्युद्वेगानें चालता झाला.

हा सर्व प्रकार इतक्या झटकन् झाला कीं, कांहीं वेळपर्यंत हें काय झालें, हेंच कोणाच्या ध्यानांत येईना. नंतर 'रुक्मिणीला नेली,' अशी एकदम ओरड झाली. संरक्षक योद्धे त्या रथांचा पाठलाग करण्याकरितां धावूं लागले. गरुडचिह्नांकित रथात घालून रुक्मिणीला पळविली हें भीष्मक व रुक्मी ह्याच्या कानांवर जाताच हें कृत्य श्रीकृष्णाचेंच आहे असें ते दोघेहि समजले. भीष्मक मनांत हर्षित झाला पण वरकरणीं रागावून कृष्णाचा पाठलाग करण्याबद्दल त्यानें सेनापतीला आज्ञा दिली. रुक्मीनें क्रोधानें दांतओंठ खात अंगांत कवच चढविलें व कृष्णाला मारून रुक्मिणीला परत आणण्याची घोर प्रतिज्ञा करून त्यानें आपल्या रथात उडी मारली. लग्नसमारंभाकरितां मंडपांत जमलेले जरासंध, दंतवक्रादि राजे ही बातमी कानावर जातांच स्तंभितच झाले. नंतर तेहि भानावर येऊन रुक्मीच्या मदतीला ससैन्य धांवले. कृष्णाचा रथ त्यांना दिसतो न दिसतो तोंच बलरामाबरोबर आलेल्या प्रचंड यादवसैन्यानें त्यांना अडविलें आणि त्यांच्यावर भयंकर शरवृष्टि सुरू केली. समारंभाच्या आनंदांत मग्न असलेल्या राजे लोकांच्या सैन्याच्या अंगांत रणावेश चढण्याच्या पूर्वीच त्यांचा फडशा पडण्यास सुरुवात झाली. कृष्णानें आपला रथ मागें वळवून आपल्या सुदर्शन चक्राला सूचना करतांच तें विद्युद्वेगानें जरासंधादि राजांच्या सैन्यावर तुटून पडलें. अनेक वेळां सुदर्शनाच्या भीतीनें हाय खाल्लेले ते राजे लोक प्राणभयानें ससैन्य मागें परतले. रुक्मीनें तें दृश्य पाहातांच सर्वांना भित्रेपणाबद्दल अद्वातद्वा बोलून तो एकटाच श्रीकृष्णावर

चालून गेला. श्रीकृष्णानें आपलें धनुर्विद्येंतील अप्रतिम कौशल्य ह्या वेळेस थोडक्यांत दाखवून त्याने रुक्मीचें धनुष्य तोडलें. रुक्मीनें जीं जीं आयुधें हातात घेतलीं त्यांचा त्यांचा, क्षणाचाहि विलंब न लावता, त्याने नाश केला व 'आतां शहाणपणानें परत फीर' असें त्याला ओरडून सांगितलें. पण रुक्मी हट्टाला पेटलेला पाहून त्याने त्याच्या रथाचे घोडे मारले. सारथ्याला ठार केला व रथाचें चक्र मोडून त्याचा रथ खालीं पाडला. तेव्हा रुक्मीने रथांतून खालीं उडी टाकून हातांत खड्ग घेतलें व "कृष्णा, गवळ्या, मी पादचारी लढत असतां भित्र्यासारखा रथावर बसून माझ्यावर बाण टाकू नकोस. छाती असेल तर खड्ग घेऊन खालीं उतर. तुझ्या पराक्रमाचा गर्व मी झाडून टाकून माझ्या बहिणीच्या देखत तुला कंठस्नान घालून मी तिला घेऊन जातों, पाहा." असें म्हटले. हें आव्हान ऐकतांच कृष्णानें खड्ग उपसून रथांतून उडी टाकली व सिंहाप्रमाणें रुक्मीवर झडप घालून त्याच्या हातांतल्या खड्गाचे आपल्या खड्गानें तुकडे केले, आणि त्याला खालीं पाडून त्याचे केस धरून त्याला आपल्या रथाजवळ फर फर ओढत आणिलें. "पाहा आतां, वायफळ बडबड करणाऱ्या मूर्खा, तुझें मस्तक तुझ्या बहिणीच्या देखत छाटून, कोण पराक्रमी हे प्रत्यक्षच दाखवितो." असे म्हणून तो आतां रुक्मीच्या कंठावर खड्ग चालविणार तोंच रथातून उडी टाकून रुक्मिणीनें श्रीकृष्णाचे पाय धरिले, आणि 'कृपा करा, नाथ, माझ्याकडे पाहून माझ्या भावाला जीवदान द्या.' असें तिनें काकुळतीने म्हटले. रुक्मिणीची ती घाबरलेली मुद्रा पाहून कृष्णाला त्याहि स्थितींत मौज वाटली अंगात चढलेला रणावेश त्यानें कष्टानें आवरला. त्यानें आपले खड्ग म्यान केलें व रुक्मिणीला आश्वासन देऊन रथांत जाऊन बसण्यास सांगितलें. नंतर त्यानें रुक्मीच्या अंगावरच्या वस्त्रानें त्याचे हातपाय बांधले व आपल्या खड्गानें त्याची अर्धी मिशी काढून त्याला विरूप केलें. इतक्यांत शत्रुसैन्याला पूर्णपणें हाकलून देऊन बलराम तेथें येऊन पोहोंचला व रुक्मीचे पांच पाट काढीत असलेल्या श्रीकृष्णाला त्यानें थांबविलें. तें दृश्य पाहून रथांत बसलेल्या रुक्मिणीला किती वाईट वाटत आहे, हें त्यानें जाणलें व कृष्णाच्या हातून रुक्मीला सोडवून त्यानें त्याचे हातपाय सोडून

त्याला बंधमुक्त केलें. बलराम श्रीकृष्णाला म्हणाला, “ कृष्णा, काय हा तुझा वेडेपणा. अरे प्रत्यक्ष आपल्या मेव्हण्याला विरूप करतांना आपल्या कृतीनें आपल्या नवपरिणीत पत्नीला काय वाटेल याचा तूं कांहींच विचार केला नाहींस. रुक्मीसारख्या शूराला असा विद्रूप करणें म्हणजे त्याचा प्राण घेण्यापेक्षांहि त्याची हानि करण्यासारखें आहे, हे तुझ्या लक्षात कसे आले नाहीं? ह्या असल्या खुनशी कृत्यानें तूं स्वत.ला व आपल्या शूर कुळाला थोडेंसे लांछनच लाविलेंस. रुक्मिणी, रुक्मी, कृष्णाच्या ह्या अविचाराबद्दल मी दिलगिरी दाखवितो, ती तुम्ही मान्य करून आमच्यावर रागावूं नका. दैवात असेल तें चटकन् होऊन जातें, असें समजून कृष्णावरहि, रुक्मी, तूं रागावूं नकोस. तू आता मन शात ठेवून घरीं जा व आमच्या विनंतीला मान देऊन वडील, मातोश्री व बंधू याना घेऊन लग्नसमारंभाकरतां द्वारकेत ये. आतां तुम्ही सर्व आमचे आप्त झालात. तुमचा आम्हीं सर्व प्रकारें मानमरातब राखला पाहिजे. तुम्ही आमचें अभीष्ट चिंतिलें पाहिजे. असे आपलें दोन्ही पक्षांचे कर्तव्य आहे. ” इतकें बोलून रुक्मीला रथात बसवून त्याला बलरामाने परत पाठविले.

बलरामाच्या ह्या भाषणानें रुक्मिणी आनंदित झाली. बलरामाचें बोलण्याचें चातुर्य पाहून कृष्णालाहि फार बरें वाटलें. विजयी राम-कृष्ण रुक्मिणीला घेऊन ससैन्य द्वारकेस आले. द्वारकेंत द्वारकावासी जनांनीं अपूर्व उत्सव केला. अमरावतीलाहि लाजवील अशी सर्व द्वारकानगरी लोकांनीं शृंगारली. श्रीकृष्ण-रुक्मिणीचा विवाहसमारंभ तर इतक्या थाटाचा झाला कीं पुढें तो कैक वर्षे लोकांच्या ध्यानांत राहिला. त्या वेळीं झालेलें अन्नदान, दाक्षिणाप्रदान, विद्वत्सत्कार, आप्तेष्टांनीं केलेले आहेर व त्यांची केलेली पाठवणी, रोषणाई, शोभेचें दारूकाम, अनेक वाद्यांचे, नृत्यांचे व गाण्यांचे जलसे, ह्या सर्वच गोष्टी फारच बहारीच्या, अवर्णनीय व यादवांच्या वैभवाला साजतील आणि त्यांच्या दातृत्वाची कीर्ति दिगंत गाजवतील अशाच झाल्या.

आणि बिचारा शिशुपाल! जरासंधादि राजांनीं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. अनुकूल काल येईतों वाट पाहून मग श्रीकृष्णाची

खोडकी मोडण्याच्या त्यांनीं वल्गना केल्या व परमावधीची मानहानि झालेले ते राजे शिशुपालाला चेदि देशाला पोंचवून आपापल्या देशाला गेले. त्यांच्या त्यांच्या देशांत लोकांना त्यांच्याबद्दल काय वाटलें असेल व त्यांचें स्वागत कसें झालें असेल हें सांगण्याची जरूरी नाहीं !

---

## प्रकरण ८ वें

# स्यमंतक, पतितोद्धार व भीषण राजसूय

प्रसिद्ध सात्वत वंशांतील दुसऱ्या वृष्णीच्या चित्ररथ व श्वफल्क ह्या दोन पुत्रांपैकीं पहिल्याच्या घराण्यात वसुदेव व दुसऱ्याच्या घराण्यांत अक्रूर हे झाले. त्यांच्यामध्यें पिढिजाद वैमनस्य कोणत्या कारणाकरितां होतें व वसुदेव-अक्रूर यांच्या वेळीं तें वैमनस्य नाहींसें होण्याचा योग कसा आला, हें सहाव्या प्रकरणांत आपण पाहिलें. ह्याच वृष्णीचे निम्न व शिनि या नांवांचे दोन भाऊ होते. त्यांचींहि घराणीं पुष्कळ वाढलीं. निम्न याच्या पुढच्या पिढींत सत्राजित् ह्या नांवाचा एक प्रसिद्ध पुरुष झाला व शिनीच्या पिढींत सात्यकी नांवाचा एक अत्यंत पराक्रमी व भारतीय युद्धांत आपल्या शौर्यानें प्रसिद्धीस आलेला वीर पुरुष जन्मास आला. हे दोन पुरुष रामकृष्णांचे समकालीन होते. राम-कृष्णांच्या चरित्राशीं ह्या दोघांचाहि घनिष्ठ संबंध कसा आला तें आतां पाहूं.

श्रीकृष्णानें द्वारकानगरी वसविल्यानंतर बहुतेक सर्व प्रमुख यादव आपापल्या परिवारासह त्या सुंदर नगरींत राहावयास आले. सत्राजितानेंहि द्वारकानगरींत एक सुंदर वाडा बांधिला आणि तेथें तो सपरिवार राहूं लागला. यादवांच्या राजदरबारांत तो एक मोठा मानकरी होता. सत्राजित हा सूर्योपासक होता. त्यानें सूर्यनारायणाला प्रसन्न करून घेण्याकरितां मोठी खडतर तपश्चर्या केली होती. त्याच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन सूर्यनारायणानें त्याला मोठ्या कृपेनें स्यमंतकमणि ह्या नांवाचें एक बहुमोल रत्न दिलें. तें आपल्या देवघरांत ठेवून तो त्याची नित्य पूजा करी. असें सांगतात कीं, तें रत्न इतकें तेजस्वी होतें कीं, त्याचा देवघरांत सूर्यासारखा झगझगीत प्रकाश पडे. स्यमंतकाचा आणखी एक विशेष म्हणजे प्रत्येक दिवशीं त्यापासून आठ भार सुवर्ण उत्पन्न होत असे. त्या स्यमंतकाच्या योगानें सत्राजित एखाद्या राजासारखा धनाढ्य झाला. कोणत्याहि शुभप्रसंगीं, समारंभाच्या वेळीं, खास राजदरबार भरे त्या प्रसंगीं, सत्राजित तो स्यमंतक मणि आपल्या कंठांत घालून जात असे. त्यावेळीं त्या रत्नाचे तें अलौकिक तेज पाहून सर्वजण दिपून जात. पुष्कळांच्या मनांत त्या मण्याबद्दल लोभ उत्पन्न होई. पण तो सूर्यनारायणाचा प्रसाद असल्यानें त्याचा अपहार करण्याची कोणाची छाती होत नसे. एक दिवस स्यमंतक गळ्यांत घालून सत्राजित राजदरबारांत बसला असतांना त्याच्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत, कित्येकांच्या डोळ्यांत त्या मण्याबद्दलचा लोभ स्पष्ट दिसत आहे, असें पाहून, ह्या मण्याचा अपहार करण्याचें कोणातरी दुष्ट मनुष्याच्या मनांत येऊन ह्या मण्याकरितां सत्राजिताच्या प्राणावरहि बेतेल असें श्रीकृष्णाला वाटलें. म्हणून त्यानें सत्राजिताजवळ त्या मण्यासंबंधीं गोष्ट काढली. श्रीकृष्ण म्हणाला, ‘ सत्राजिता, हा बहुमोल मणि आपल्या राजाच्या कंठांत शोभेल व तेथें तो सुरक्षितहि राहील. ह्या मण्याच्या लोभानें कोणीतरी तुझा घातहि करण्यास मागेंपुढें पाहाणार नाहीं. म्हणून तूं हा स्यमंतकमणि उग्रसेन महाराजांना अर्पण कर. ह्याच्यापासून प्रत्येक दिवशीं उत्पन्न होणारें आठ भार सुवर्ण तुला मिळत जाईल, ह्याबद्दल मी हमी घेतों. असें केल्यानें तुझा संपत्तीचा

झरा कायम राहून राजदरबारांत तूं सर्वश्रेष्ठ होशील.'' श्रीकृष्णाचा हा उत्तम सल्ला सत्राजितासारख्या लोभी मनुष्याला पसंत पडला नाहीं. सत्राजिताला सत्यभामा नांवाची एकुलती एक कन्या होती. हें कन्यारत्नहि अप्रतिम सुंदर होतें. ह्या कन्येला पुष्कळांनीं मागणी घातली होती. पण सत्राजिताच्या पसंतीला मात्र त्यापैकीं कोणीच आला नाहीं. मागणी घालणाऱ्यांचा दुहेरी हेतु स्पष्टच होता. कन्यारत्नाबरोबर स्यमंतकाचा वारसाहि आपणाकडे येईल असे त्याना वाटत होते. सत्यभामेला मागणी घालणाऱ्यापैकीं कांहीं फार पराक्रमी व धनाढ्य सरदार होते व काहीं जवळचे आप्तवर्गीयहि होते. शेवटीं ह्या सर्व लोकापैकीं त्यातल्या त्यात दोघांना पसंत करून त्यापैकीं कोणाला मुलगी द्यावयाची, याचा सत्राजित विचार करीत होता. ते दोघे म्हणजे एक आपल्याला भोज म्हणविणारा प्रसिद्ध यादव सरदार शतधन्वा, व दुसरा वाचकाच्या परिचयाचा मुत्सद्दी अक्रूर, हे होत. त्यापैकीं अक्रूर मोठा मुत्सद्दी म्हणून गाजलेला होता. राजदरबारांत त्याचें फार वजन होतें आणि अलीकडे तो कृष्णाचा स्नेही, भक्त, म्हणून ओळखला जात होता. त्यालाच मुलगी द्यावी असें सत्राजिताने ठरविलेंहि होतें.

एकदां सत्राजिताचा भाऊ प्रसेन हा आपल्या गळ्यामध्यें तो तेजस्वी माणि घालून घोड्यावर बसला व मृगया करण्याकरिता फार दूरवरच्या एका निबिड अरण्यांत गेला. तेथें तो गैरसावध असतां, अकस्मात एका सिंहानें त्याच्यावर झडप घालून त्याला व त्याच्या घोड्याला ठार मारिलें, आणि तो दिव्य मणि घेऊन तो सिंह उड्या टाकीत आपल्या गुहेकडे चालला. त्याच वनांत रामायणकालीन अस्वल जातीचा बलाढ्य राजा जांबवान राहात होता. त्याच्या दृष्टीस तो सिंह पडतांच त्यानें त्याची शिकार केली. सिंह मरून पडतांच तो त्याच्याजवळ गेला. सिंहाच्या तोंडांत तो अलौकिक तेजस्वी माणि पाहून जांबवानाला आश्चर्य वाटलें. त्यानें तो माणि पर्वतावरच्या आपल्या निवासस्थानीं नेऊन मुलाच्या पाळण्यावर खेळण्यासारखा टांगला. पुष्कळ दिवस झाले तरी आपला भाऊ मृगयेहून परत येत नाहीं, तेव्हां त्याचा नाश झाला असावा असें वाटून

सत्राजितास दुःख झालें. त्याच्याबरोबर तो अलौकिक स्यमंतकहि नाहींसा झाल्याचें पाहून तर त्याच्या दुःखाला सीमाच राहिली नाहीं. कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें आपण तो मणि उग्रसेन राजाला देण्याचे नाकारिलें म्हणून स्यमंतकाचा अपहार करण्याच्या इच्छेनें श्रीकृष्णानेच आपल्या भावाचा नाश केला असला पाहिजे, असें तो उघड बोलूं लागला. द्वारकेंतल्या लोकांतहि ह्या गोष्टीची चर्चा चालू होऊन जो तो कृष्णाकडे संशयित मुद्रेनें पाहूं लागला. कंसाला मारून मथुरेचे एवढें मोठे राज्य ज्याने मिळविलें, व ते निःस्पृहपणें पुनः कंसाच्या बापाला–उग्रसेनाला–देऊन टाकलें, त्या उदारधी श्रीकृष्णाला आपल्यावर येऊं पाहाणारा हा घाणेरडा आरोप सहन झाला नाहीं. त्यानें त्या मण्याचा शोध लावण्याचा निश्चय केला व कांहीं प्रमुख नागरिक बरोबर घेऊन तो प्रसेनाचा मार्ग काढीत काढीत त्या गहन अरण्यात गेला. तेथे प्रसेन आपल्या घोड्यासह एका सिंहाकडून ठार मारला गेला, असें त्यांना आढळून आलें. पुढें त्या सिंहाच्या पावलांच्या अनुरोधाने ते पर्वतपठारावर जातात तोच त्या ठिकाणीं सिंहहि मारला गेलेला त्यांना सांपडला. सिंहाला मारणाऱ्याचा तलास लावीत लावीत ते एका मोठ्या काळोख्या गुहेच्या तोंडाशीं आले. त्या गुहेंत धाडसी श्रीकृष्ण एकदम शिरला. बरोबरचे लोक भीतीनें बाहेरच बसून राहिले. त्या अंधारातून बराच वेळ चालून गेल्यानतर उजेड असलेली थोडी मोकळी जागा त्याला दिसली व लगेच पुढें दुसरी अधारी गुहा दिसूं लागली. एका पाठोपाठ एक अशा पांच गुहा त्याला लागल्या. आपण कोणातरी प्रबळ जंगली माणसाच्या निवासस्थानीं आलों आहों असें श्रीकृष्ण समजला आणि तें खरे ठरले. सहाव्या गुहेत त्याला एकदम लख्ख प्रकाश दिसला. तो स्यमंतक मण्याचा प्रकाश श्रीकृष्णानें ओळखला व एकदम पुढें जाऊन पाळण्यावर टांगलेल्या स्यमंतक मण्याला त्यानें हात घातला.

कृष्णाला पाहून पाळण्याजवळ उभ्या असलेल्या एका बाईनें घाबरून किंचाळी फोडली. ती ऐकून आंतून जांबवान बाहेर धांवून आला. वृद्ध जांबवानाचें व श्रीकृष्णाचें द्वंद्वयुद्ध सुरू झालें. श्रीकृष्ण हा सामान्य मनुष्य

असेल असें समजून जांबवान पहिल्या प्रथम त्याच्याशीं बेफिकीरपणें लढत होता. पण लवकरच त्याचा दम खचूं लागला. श्रीकृष्ण हा कोणी तरी द्वंद्व-युद्ध जाणणारा कसलेला मल्ल असून आपणासारख्या वृद्ध मनुष्याच्या जिवाला अपाय न होता आपली नुसती दमछाट होऊन आपण त्याला शरण जावें ह्या हेतूनें तो मल्लविद्येतले तसल्या प्रकारचे पवित्रे करून लढतो आहे हें त्यानें ओळखलें, आणि त्यानें मध्येंच एकदम थांबून श्रीकृष्णाला त्याचें नांव विचारिलें. श्रीकृष्णानें तावडतोब आपलें नाव सांगून स्यमंतक मणि चोरल्याचा आपल्यावर आळ कसा आला आहे वगैरे सर्व हकिगत त्यानें त्याला सांगितली. कंसाला मारणारा श्रीकृष्ण हा रावणाला मारणाऱ्या रामाच्या तोडीचा पराक्रमी धनुर्धर असून ईश्वराचा अवतार आहे, अशी जंगली लोकांमध्यें श्रीकृष्णाची कीर्ति अगोदरच पसरली असल्याकारणानें रामभक्त जांबवानाच्या कुळांत जन्मून रामाला देवाप्रमाणें पूज्य मानणाऱ्या त्या अस्वलांच्या राजानें श्रीकृष्णाबरोबरचे द्वंद्वयुद्ध एकदम थांबवून त्याचा आदरसत्कार केला. आपलें कुलदैवत मूर्तिमंत रामच श्रीकृष्ण-रूपानें आपल्याला दर्शन देण्याकारितां आले आहे, अशी त्या जंगली अस्वल-राजाची भावना झाल्यानंतर, श्रीकृष्णाची त्यानें भक्तियुक्त अंतःकरणानें पूजा केली. जांबवानाला जांबवती ह्या नांवाची एक फार सुंदर कन्या होती. श्रीकृष्णाची पूजा केल्यावर तो नम्रपणें श्रीकृष्णाला म्हणाला, "कृष्णा आमच्या रामाप्रमाणेंच तूं पराक्रमी सर्वगुणसंपन्न आहेस. मूर्तिमंत रामच आज माझ्या घरीं तुझ्या रूपानें प्राप्त झाले, असें मला वाटत आहे. कृष्णा. देवा, मी तुझ्याबरोबर लढलों, हा माझा अपराध तूं पोटांत घालून तूं माझ्या पूजेचा स्वीकार केलास. आतां आणखी एक प्रार्थना करावयाची आहे. ही माझी सुंदर मुलगी जांबवती मीं तुला अर्पण करावी व वर-दक्षिणा म्हणून हा स्यमंतकमणि तुला द्यावा अशी माझी इच्छा आहे. माझ्यासारख्या जंगली मनुष्याची एवढी इच्छा तूं पुरवलीस तर मी धन्य होईन." जांबवतीच्या सौंदर्याकडे पाहून श्रीकृष्णाला परम आश्चर्य वाटलें. जंगली माणसांतही असें सुंदर रत्न निर्माण व्हावें, हें खरोखरच आश्चर्य आहे, असें तो मनांत म्हणाला, व ह्या कन्येचा स्वीकार केला तर पुढें-

मागें ह्या जंगली अस्वलराजाच्या सैन्याचा आपल्यास उपयोग होईल, गरुडेश्वराप्रमाणेंच जांबवनाशीं आपला अत्यंत घरोबा निर्माण झाल्यास इतर जंगली राजेहि आपल्याला वश होतील, असा राजकारणाच्या दृष्टीनें पोक्त दूरदर्शी विचार करून कृष्णानें जांबवानाची विनंति मान्य केली. दुसऱ्या दिवशींच त्यांच्या शास्त्राप्रमाणें उत्तम दिवस असल्यानें श्रीकृष्ण जांबवतीचा थाटानें विवाहसमारंभ करण्याचा त्यानें बेत ठरविला. अगदीं बाहेरच्या गुहेच्या तोंडाशीं कृष्णाबरोबर आलेल्या द्वारकेंतील प्रमुख नागरिकाना जांबवानानें मोठ्या आदराने आंत बोलावून आणिलें व ठरविल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं त्यानें विधिपूर्वक कृष्णाला जांबवती स्यमंतकमण्यासह अर्पण केली. अस्वलराजाचा तो मोठा परिवार, त्याचा तो दरबारी थाट, व आपल्याप्रमाणेंच त्याची धर्मावरील निष्ठा पाहून कृष्ण व द्वारकेंतले नागरिक यांना परम समाधान वाटलें. चार दिवस मोठ्या आदरानें जांबवानानें कृष्ण व त्याचे नागरिक यांना मोठ्या थाटाचा पाहुणचार देऊन संतुष्ट केलें. आणि नंतर द्वारकेपर्यंत त्या सर्वांना सुखरूप पोहोचवण्याकरितां आपले पराक्रमी शंभर सरदार बरोबर देऊन कृष्ण–जांबवती ह्यांची मोठ्या थाटानें त्याने पाठवणी केली.

इकडे द्वारकेंत, कृष्ण त्याच्या बरोबरच्या लोकासह पांच सात दिवस परत आला नाहीं. त्यामुळें सर्व लोक हवालदिल झाले. सत्राजितानें कृष्णावर भलताच आरोप केल्यानें हा प्रसंग उद्भवला, असे म्हणून सर्वांनीं सत्राजिताची निंदा करण्यास सुरवात केली. आपण चूक केली, असें वाटून सत्राजितहि खेद करूं लागला. कृष्णाच्या शोधाकरितां जाण्यास बलराम व कृष्णाचें खास सुदर्शन पथक तयार झालें. इतक्यांत कृष्णानें जांबवतीला घेऊन आपल्या सर्व लोकांसह द्वारकेंत प्रवेश केला. सर्वांना मोठा आनंद झाला. राजस्त्रियांनीं व रुक्मिणीनें जांबवतीचें स्वागत केलें. कृष्णाबरोबर गेलेल्या नागरिकांनीं तिकडे घडलेली सर्व हकिगत सांगितली. राजदरबार भरवून कृष्णानें सर्वांच्या देखत स्यमंतक मणि सत्राजितास अर्पण केला. सत्राजित अत्यंत लज्जित झाला. त्यानें खालीं मान घालून मुकाट्यानें तो मणि घेतला. कृष्णाची क्षमा कशी मागावी, हें त्याला

सुचेना. काहीं वेळानें तो पश्चात्ताप करीत घरीं गेला. घरीं गेल्यावर त्याचें मन त्याला सारखें टोंचीत राहिलें. 'आतां लोक आपल्याला नेहमीं क्षुद्र, अदूरदृष्टि, धनलुब्ध, मूर्ख असें म्हणून हिणविणार! काय करावें म्हणजे आपण या दोषांतून मुक्त होऊं?' असा तो मनाशीं सारखा विचार करूं लागला. कांहीं वेळानें त्याचा बेत ठरला. तो कृष्णाकडे गेला व आपली अत्यंत रूपवती मुलगी सत्यभामा हिचा भार्या म्हणून स्वीकार करण्याबद्दल त्यानें त्याला विनविलें. श्रीकृष्णानें त्याची इच्छा पाहून त्याची विनंति मान्य केली. लवकरच श्रीकृष्ण आणि सत्यभामा याचा विवाहसमारंभ द्वारकेंत मोठ्या थाटाने झाला. वरदक्षिणा म्हणून सत्राजितानें तो स्यमंतक माणि कृष्णाला दिला. कृष्णानें तो माणि तसाच सत्राजिताकडे देऊन म्हटलें, 'हा माणि तुझ्याकडेच राहूं दे. तूं सूर्यभक्त आहेस तूं आहेस तोंपर्यंत हा सूर्यप्रसाद तुझ्याजवळच राहणे योग्य आहे. पुढेमागें वारसाहक्काने तो आमचाच होणार आहे.' अशा रीतीने तो स्यमंतक पुनः सत्राजिता-जवळच राहिला.

सत्यभामा श्रीकृष्णाला देऊन सत्राजिताने श्रीकृष्णाचा राग घालविला व तो त्याचा परम आप्त झाला. पण त्यामुळें भोज सरदार शतधन्वा व मुत्सद्दी अक्रूर त्याचे वैरी झाले. शतधन्व्याला सत्यभामा देण्याचें सत्राजितानें नाकारिलें म्हणून शतधन्वा त्याचे शत्रुत्व करीतच होता. अक्रुराला सत्यभामा देण्याचें ठरविलें असतांना ती सत्राजितानें श्रीकृष्णाला दिली म्हणून अक्रूरहि आतां सत्राजितावर मनातल्या मनात जळफळूं लागला. सत्राजिताचा नाश करून त्याच्या जवळून तो स्यमंतक माणि काढून घ्यावा असें ठरवून दोघेहि योग्य संधीची वाट पाहूं लागले, आणि तशी संधीहि त्यांना लवकरच मिळाली. कृष्णाचे आतेभाऊ पांडव, हे मधुन मधुन द्वारकेस येऊन राहात असत. पांडव द्वारकेस येणार असा त्यांचा निरोप आल्यामुळें श्रीकृष्ण त्यांची वाट पाहात होता. इतक्यांत भलतीच वार्ता द्वारकेंत येऊन पोहोंचली. वारणावतीस ज्या गृहांत धृतराष्ट्रानें पांडवांना ठेविलें होतें, त्या घराला रात्रीच्या वेळीं आग लागून कुंतीसह पांडव त्यांत जळून मेल्याची बातमी ऐकून श्रीकृष्ण व बलराम यांना

अतिशय दुःख झालें. आपल्या अभागी बहिणीचा तिच्या मुलांसह असा शेवट झालेला ऐकून वसुदेवाला फार वाईट वाटलें. दुखवट्यासाठीं तुम्ही हास्तिनापुरास जाऊन या व पांडवांच्या नाशाला कोण कारण झालें, तें नीट समजावून घ्या. म्हणजे त्याच्या मृत्यूबद्दल सूड तरी घेतां येईल, असें वसुदेवानें रामकृष्णांना सांगितलें. राम–कृष्ण हस्तिनापुरास गेले. कपटी धृतराष्ट्रानें पांडवाना मुद्दाम वारणावतीस पाठवून त्यांच्यासाठीं मुद्दाम बांधिलेल्या एका जतुगृहांत त्याना राहावयास सांगितलें. रात्रीच्या वेळीं त्या वाड्याला आग लागून कुंतीसह पांडवांचा नाश झाला. हें सर्व कारस्थान दुर्योधन कर्णादि दुष्टाच्या सल्लयाने आंधळ्या धृतराष्ट्रानें रचिलें, हेंहि त्यांना हस्तिनापुरात समजलें. जनरीत म्हणून, धृतराष्ट्रानें चालविलेल्या कुन्ती–पांडवाच्या अंत्यक्रिया होईपर्यंत आठ दहा दिवस ते हास्तिनापुरास राहिले. इकडे राम–कृष्ण द्वारकेंत नाहीत ही संधि सत्राजिताचा नाश करण्यास चागली आहे, असे अक्रूर, कृतवर्मा व शतधन्वा यांनीं ठरविलें. सत्राजिताला ठार मारून स्यमंतक मणि शतधन्व्यानें हरण करावा व रामकृष्णांशीं युद्धाचा प्रसग आल्यास अक्रूर–कृतवर्म्यांनीं त्याला मदत करावी, असे ठरलें. त्याप्रमाणें रात्रीच्या वेळीं सत्राजित आपल्या वाड्यांत निद्रिस्त असतां शतधन्वा चोरासारखा वाड्यांत शिरला व त्यानें सत्राजिताच्या शयनमंदिरात प्रवेश करून त्याचा देह आपल्या खड्गानें छिन्नविछिन्न केला, आाणि त्याचा स्यमंतक मणि घेऊन तो पळाला. सत्राजिताच्या स्त्रियानीं रडून आकांत केला. सत्यभामा त्यावेळीं माहेरींच होती. तिनें आपल्या पित्याच्या भयंकर मरणाची हाकीगत श्रीकृष्णाच्या कानांवर घालण्याकरितां दूत पिटाळला. राम–कृष्णांच्या कानांवर ही उद्वेगजनक वार्ता पडतांच ते ताबडतोब द्वारकेस आले.

राम-कृष्ण येतांच शतधन्वा घाबरला. ठरल्याप्रमाणें आपल्याला मदत करण्याबद्दल त्यानें अक्रूर व कृतवर्मा याना सांगितलें. पण त्या दोघानींहि कृष्णाबरोबर प्रत्यक्ष लढण्याचें आमचें सामर्थ्य नाहीं, असें सांगून त्याला ऐनवेळीं तोंडघशीं पाडलें. मुत्सद्दी अक्रुरानें तर त्याला पळून जाण्याचा सल्ला दिला. “ मणि माझ्याजवळ देऊन ठेव. मी तो छपवून ठेवतों. तूं

मात्र पळून जा. कृष्णाच्या हातीं सांपडूं नकोस. नाहींतर कंसाची जी स्थिति झाली ती तुझी होईल." असें सांगून अक्रुरानें तो छपविण्याच्या मिषानें स्यमंतक हस्तगत करण्याचा आपला बेत तडीस नेला. अक्रूर आणि कृतवर्मा दोघेहि सत्राजिताला मारण्याकरितां आपल्याला हरेस घालून आपण स्वत: बाजूस राहिले, असें मूर्ख शतधन्व्याला कळून येतांच तो पुष्कळ चडफडला, पण उपयोग काय? अक्रुराच्या सांगण्याप्रमाणें मणि अक्रुराच्या हवालीं करून त्याला जीव वांचविण्याकरितां पळून जाणें भाग पडलें. तो द्रुतगतीनें जाणाऱ्या आपल्या घोड्यावर बसून पळून चालला. शतधन्व्याचा घोडा रोज शंभर मैल पळणारा होता. शतधन्व्याच्या पलायनाची हकिगत राम-कृष्णास कळतांच ते आपल्या रथात बसून त्याचा पाठलाग करीत निघाले. शेवटीं मिथिला नगरीजवळ येतात न येतात तोंच शतधन्व्याचा घोडा अतिश्रमानें खालीं पडला व मेला. शतधन्वा प्राणभयानें पायींच पळूं लागला. पायीं पळणाऱ्या शत्रूच्या पाठीमागें दोघांनीं रथांत बसून लागणें बरें नाहीं असें कृष्णानें पाहून रथांतून उडी टाकली आणि शतधन्व्याचे पाठीमागें धावत जाऊन त्याला गांठलें. द्वंद्वयुद्धात श्रीकृष्णानें त्याचा शिरच्छेद केला. नंतर त्यानें त्याच्याजवळ स्यमंतक मण्याचा शोध केला, पण स्यमंतक त्याच्याजवळ नव्हताच, तो त्याला कोठून मिळणार? श्रीकृष्ण परत रथाजवळ येऊन बळरामास ती हकिगत सागूं लागला. शतधन्व्याला मारला पण मणि मिळाला नाहीं, हें ऐकतांच बलरामाच्या मनांत कृष्णाबद्दल अंदेशा आला. त्यानें स्पष्टच सांगितलें, 'कृष्णा, शतधन्व्याला मारला पण मणि मिळाला नाहीं, ह्या बोलण्यावर कोणाचाहि विश्वास बसणार नाहीं. तेव्हां काय पाहिजे तें कर आणि मणि मिळविण्याचा प्रयत्न कर. मणि मिळेपर्यंत मी तर कांहीं द्वारकेंत परत येणार नाहीं. मणि मिळाला असें समजेपर्यंत मी मिथिला नगरींत जनकराजाकडे राहतों.' बलराम द्वारकेस येत नाहीं, त्याच्या मनांत आपल्याबद्दल संशय आला, हें पाहून कृष्णाला वाईट वाटलें. सत्राजिताला मारण्याच्या कामीं शतधन्व्याला साहाय्य करणारे कोण कोण आहेत त्यांचा तपास करण्याचा निश्चय करून श्रीकृष्ण द्वारकेस परत आला.

‘ शतधन्व्याला मारिलें पण मणि मात्र मिळाला नाहीं ’ असें त्यानें द्वारकेंतल्या लोकांना व सत्यभामेला सांगितलें. ‘ शतधन्व्याचे साथीदार कोण आहेत त्यांचा मी आतां तलास लावतों आणि त्यांचा नाश करून मणि आणतों व सत्राजिताच्या मरणाचा सूड पूर्णपणें उगवतों. ’ असें सांगून त्यानें सत्यभामेचें समाधान केलें. सत्राजिताचा पारलौकिक उत्तरविधि त्याच्या आप्तांसह श्रीकृष्णानें यथाविधि पार पाडला. आतां श्रीकृष्ण आपला शोध लावून आपला नाश करणार आणि मणि परत घेणार असें वाटून अक्रूर व कृतवर्मा दोघेहि काशीला पळून गेले व तेथें काशिराजाच्या रक्षणाखालीं राहिले.

काशिराजा हा अक्रुराचा मामा होता. स्यमंतक मण्यापासून रोज अक्रुराला आठ भार सुवर्ण मिळे, म्हणून अक्रुरानें, केलेल्या पापाचें क्षालन करण्याकरितां काशीस पुष्कळ दानधर्म केला, आणि यज्ञयागहि पुष्कळ केले. त्याच्या दानधर्मांनीं आणि यज्ञयागांनीं काशींतले लोक संतुष्ट होऊन त्याला ‘ दानपति ’, ‘ यज्ञपति ’ असें संबोधूं लागले. अक्रूर व कृतवर्मा एकाएकीं काशीला निघून गेले, असें समजताच कृष्णाच्या मनांत थोडी शंका आलीच होती. आतां अक्रुराच्या दानधर्माची कीर्ति त्याच्या कानावर येतांच अक्रुराजवळ स्यमंतक मणि आहे, अशी श्रीकृष्णाची खातरी झाली. आतां मणि मिळविण्याकरितां काशीनगरीवर स्वारी करून अक्रुराला पकडून आणिला पाहिजे. काशिराजाचा व अक्रुराचा नाश हा मणि आपल्या हातून करविणार. दुर्दैवी मण्यानें इतक्यांतल्या इतक्यांत कितीजणांना आपला तडाखा दाखविला. त्यानें प्रसेनाचा जीव घेतला, वनराजाला ठार मारिलें, अस्वलराजाला द्वंद्वयुद्धांत खिळखिळा केला. ज्यानें सूर्योपासना करून मणि प्राप्त करून घेतला, त्या सूर्योपासक सत्राजिताचाहि अंत केला, शतधन्व्याला धुळीला मिळविला. आतां अक्रुरावर पाळी आली. आणखी किती जणांचे हा प्राण घेणार कोणाला ठाऊक! अक्रूर हा त्याला मिळणाऱ्या द्रव्याचा सद्व्यय तरी करितो आहे. तेव्हां तो मणि त्याच्या जवळ राहिला तरी चालेल. बलरामाच्या मनांतला माझ्याबद्दलचा किंतु अक्रुराचा नाश न करितां काढून टाकतां आला

तर पाहावें. असें मनाशीं ठरवून कृष्णानें एक हुषार दूत काशीला पाठविला, आणि अक्रूराला पुढें लिहिल्याप्रमाणें निरोप दिला. "अक्रूरा, स्यमंतक मणि तुजजवळ आहे हें मला कळलें आहे. ह्या स्यमंतक मण्यानें किती जणाचे प्राण घेतले हे तूं जाणतोस. मी यादव सैन्यासह काशीवर चाल केली म्हणजे तुझ्या कृत्यामुळे तुझ्या मामाच्या प्राणांवर केवढें संकट येणार आहे, काशीच्या निरपराध लोकांचे प्राण किती धोक्यांत पडणार आहेत, त्याचा तूं नीट विचार कर, आणि माझ्या म्हणण्याप्रमाणें वागून आपल्यासह असंख्य जीवाचा नाश थांबविण्याचा शहाणपणा कर. मला स्यमंतकाचा लोभ नाहीं. मी तो जांबवानाकडून मिळवून सत्राजिताला परत दिला हें तूं पाहिलें आहेस. आतां लोक, मण्याचा मीं अपहार केला असा माझ्यावर आळ खास घेणार नाहींत. पण आमच्या घरींच मोठी भानगड उत्पन्न झाली आहे. शतधन्व्याला मारूनहि मला मणि मिळाला नाहीं, हें मीं सांगतांच बलरामाच्या मनांतच मजबद्दल संशय उत्पन्न होऊन मणि प्रत्यक्ष दिसेपर्यंत द्वारकेंत न येण्याच्या निश्चयानें तो मिथिलानगरींत जनकराजाकडे राहिला आहे. त्या मण्यामुळें आम्हां भावाभावात वितुष्ट पडल्यासारखें झालें आहे. आमच्या ह्या वितुष्टाचा फायदा घेऊन द्वारकेच्या बाहेर राहिलेल्या बलरामाजवळून गदायुद्धाचें अपूर्व ज्ञान माझा व पांडवाचा वैरी दुर्योधन यानें मिथिलेस जाऊन मिळविलें. आतां ह्यापुढे माझ्यापासून माझ्या परमप्रिय बंधूनें दूर राहून आमच्या शत्रूंच्या उपयोगी पडावें, हें मला सहन होत नाहीं. तेव्हां आतां मणि त्याच्या दृष्टीस पाडण्याकरितां तुमचा नाश करणें मला भाग पडणार आहे. तरी तुमचा नाश होऊं नये म्हणून तूं स्वतः मिथिलेस जाऊन 'द्वारकेंत चला, मणि कोणाजवळ आहे तें दाखवितों.' असें सांग आणि बलरामाला द्वारकेंत घेऊन ये व माझ्या समक्ष तो मणि त्याला दाखव. मी तो मणि तुलाच देईन अशी खात्री बाळग. मात्र मी जवळ नसताना रामाला तुझ्याजवळ मणि असल्याचें सांगू नकोस. तुझें कृत्य शीघ्रकोपी रामाला समजलें तर त्या क्षणींच तूं त्याच्या रागाला बळी पडशील. मी जवळ असल्यावर रामाचा

राग मी शांत करीन. मी सांगतों त्याप्रमाणें वागलास तर सर्व सुरळीत होईल, हे जाणून काय करावयाचें असेल तें कर.'' हा निरोप दूतानें अक्रुराला कळविताच तो कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें मिथिलेस जाऊन व बलरामाचें मन वळवून त्याला द्वारकेस घेऊन आला. नंतर भर दरबारांत कृष्ण जवळ असतांना अक्रुरानें तो माणि आपल्याजवळ कसा आला हें प्राजळपणानें सागून कृष्णाच्या हातांत ठेविला. अक्रुराचें दुष्ट कृत्य कानांवर पडताच बलराम उसळलाच. पण कृष्णानें आपण अक्रुराला अभय दिल्याचें सांगून त्याला शात केला व "आता तो दुर्दैवी स्यमंतक दानधर्म करणाऱ्या अक्रुराजवळच काहीं दिवस राहूं दे.'' असें युक्तीनें सागून श्रीकृष्णानें तो माणि अक्रुराजवळ दिला. कृष्णाचें ते औदार्य पाहून सर्वांनीं त्याची मनःपूर्वक स्तुति केली.

पांचाल देशाचा राजा द्रुपद ह्यानें आपली कन्या द्रौपदी हिचा स्वयंवर माडला. तें आमंत्रण श्रीकृष्णास मिळताच तो बलरामासह पांचाल देशची राजधानी जी कांपिल्य नगरी त्या नगरीस गेला. ह्या स्वयवरास जाण्याचा श्रीकृष्णाचा हेतु स्वयंवरांत भाग घेण्याचा नव्हता. कुंतीसह पांडव जतुगृहदाहांत जळले नसून ते सुखरूप आहेत व ते कांपिल्य नगरीच्या आसपास कोठें तरी गुप्तपणें राहिले आहेत असा गुप्तसंदेश विदुराकडून श्रीकृष्णाला नुकताच मिळाला होता. हा निरोप मिळाल्यामुळेंच स्वयंवराचे निमंत्रण येताच स्वयंवराच्या निमित्तानें कांपिल्य नगरीस जाण्याचा व तेथें पांडवाचा शोध करण्याचा श्रीकृष्णानें निश्चय केला. ह्या स्वयंवराकरितां दुर्योधनादि कौरव कर्णासह आले होते. जरासंध, शिशुपाल, दंतवक्रादि राजे हजर होतेच. विराट, गांधार, पंचनद, सिंधु, मद्र, काशीनगर वगैरे भारतांतील बहुतेक देशांतील, किंबहुना पुढें भारतीय युद्धांत उभयपक्षांत हजर असलेले, सर्व राजे स्वयंवराकरितां कांपिल्य नगरींत जमा झाले होते. भारताच्या वाचकांना ह्या स्वयंवरासंबंधीं सर्व माहिती आहेच. वर टांगलेल्या फिरत्या मत्स्ययंत्राचें तापलेल्या तेलांत पडलेलें प्रतिबिंब पाहून मत्स्यभेद करण्याचा फारच कठिण असा पण इतक्या जमलेल्या राजांपैकीं कोणीच जिंकूं शकला नाहीं. कर्णाला, तो क्षत्रिय

नसल्यानें, मत्स्यभेद करूं दिला नाहीं. श्रीकृष्ण 'पण' जिंकण्याला समर्थ होता, परंतु त्यानें त्यांत भाग घेतला नाहीं. शेवटीं कोणीहि क्षत्रिय उठत नाहीं असें पाहून ब्राह्मणसमुदायांत, ब्राह्मण वेषांत बसलेला अर्जुन उठला व त्या मत्स्ययंत्राकडे गेला. ब्राह्मणातून उठलेल्या त्या वीराकडे सर्व लोक आश्चर्यानें पाहूं लागले. कृष्णाच्या दृष्टीला तो वीर पडतांच त्यानें स्मित केलें व आनंदानें बलरामाच्या कानींत 'दादा, हा कोण ओळखलात काय?' असें हळूच म्हटलें. बलरामानें चटकन् म्हटले, 'अर्जुन तर नव्हे?' 'होय तोच.' कृष्णानें उत्तर दिलें. अर्जुन मत्स्ययंत्राजवळ गेला. तेथे ठेविलेल्या अजस्र धनुष्याला त्यानें नमस्कार केला आणि नंतर त्यानें तें सहज लीलेनें उचललें. त्या तेलाच्या कढईत प्रतिबिंब पाहून मत्स्ययंत्रांतील मत्स्याचा भेद त्यानें एका बाणांतच केला आणि तो पण जिंकला. द्रौपदीनें मोठ्या आनंदानें त्या यशस्वी वीराला माळ घातली. ऋषिमंडळातून उठलेल्या त्या अज्ञात वीराला तें कन्यारत्न पचूं द्यावयाचें नाहीं असे ठरवून कन्येचें जबरदस्तीनें हरण करण्याचें दुर्योधनादि कौरव, कर्ण, जयद्रथ, जरासंध, शिशुपालादि राजांनीं ठरवून त्याप्रमाणें आपल्या सैन्याला इशारा देऊन ते उठलेहि पण ऋषिसमुदायांतच बसलेला महाबलाढ्य भीम खांद्यावर गदा टाकून त्या विजयी वीराच्या पाठीमागे येऊन उभा राहिला. भीमाला सर्वांनीं एकदम ओळखलें. इतक्यांत राजमंडळांतून श्रीकृष्ण व बलराम हे झटकन जाऊन भीमार्जुनांस कडकडून भेटले व त्यांनीं अर्जुनाचें आनंदानें अभिनंदन केलें. भीमार्जुन व राम-कृष्ण ह्यांना पाहतांच राजेलोकांचीं तोंडें पाषाण्यासारखीं झालीं. आतां ह्या यादव-पांडवांपैकीं चार रणसिंहांना डिवचणें म्हणजे मृत्यूला आव्हान देण्यासारखें आहे, असें समजून युद्धाच्या हिरीरीनें उठलेल्या राजे लोकांचे भुजदंड शिथिल झाले व त्यांच्या पायांनीं पळून जाण्याचा पराक्रम करून दाखविला. पुढें कुंतीच्या सांगण्याप्रमाणें द्रौपदीचें पांचहि पांडवांशीं थाटानें लग्न झालें. श्रीकृष्ण बलरामांनीं यादवांच्या वैभवाला साजेल असा बहुमोल अहेर केला.

आंधळ्या धृतराष्ट्राच्या कानांवर ही गोष्ट जातांच पांडवांना जाळून

टाकण्याचें आपलें कारस्थान आतां उघडकीला येऊन आपली छीः थूः होईल अशी त्याला धास्ती वाटली. यादव–पांडव एकत्र झाल्यानंतर आपल्या पुत्रांची धुळधाण उडणार ह्या भीतीनें तो घाबरा झाला. त्यानें भीष्म, द्रोण, विदुर ह्यांच्या सल्ल्यानें पांडवांना अर्धें राज्य देण्याचें ठरवून पांडवाना आणण्याकरितां विदुराला पाठविलें. विदुराच्या सांगण्याला मान देऊन पांडव परत आले. आंधळया म्हाताऱ्यानें राज्याची वांटणी करतानाहि अत्यंत लोभीपणा दाखविला. गंगेकाठचा समृद्ध मुलुख त्यानें आपल्या पुत्रांना दिला व यमुनाकांठचा जंगली भाग पांडवांच्या वाट्याला घातला. वैभवांनीं नटलेलें हस्तिनापुर कौरवांच्या वांट्यास गेलें. खांडववनाशेजारचें खांडवप्रस्थ नांवाचें कुग्राम पांडवांच्या राजधानीचें ठिकाण झालें. पुढें लवकरच पांडवांनीं श्रीकृष्णाच्या सल्ल्यानें इंद्रप्रस्थ नगराची आंखणी केली. त्या नगराभोंवतीं त्यानीं मोठमोठे खंदक खणले व गगनचुंबित अशी तटबंदी केली. त्या नगराच्या वेशीचीं द्वारें द्विपक्ष गरुडाप्रमाणें दिसतील अशीं केलीं. नगरांत अनेक मोठमोठ्या इमारती असून मेघसमूहाप्रमाणें भासणाऱ्या उच्च गोपुरांनीं त्याचें रक्षण केलें होतें. त्या गोपुरांवर मोठ्या बंदोबस्तानें मोठमोठाल्या शक्ति व अनेक शस्त्रास्त्रें नगराच्या बंदोबस्ताकरितां ठेविलीं गेलीं. ठिकठिकाणीं अनुभविक व लढाऊ लोकांच्या चौक्या रक्षणार्थ ठेविल्या. तोफा, दुसरीं युद्धोपयोगी यंत्रें व मोठमोठालीं लोखंडी चक्रें ठिकठिकाणीं ठेविलीं असल्यामुळें त्या नगराला फारच शोभा आली होती. सर्व शहरभर मोठमोठाले रस्ते, सारख्या प्रमाणांत राखले होते. अशा प्रकारचें तें उत्कृष्ट नगर व युधिष्ठिरासारखा न्यायी राजा पाहून तेथें मोठमोठाले वेदवेत्ते ब्राह्मण आवडीनें राहावयास आले. त्याप्रमाणें छप्पन देशांतल्या भाषा जाणणारे अनेक भाषाकोविद व अलोट संपत्ति मिळवूं पाहाणारे दूरदूरचे व्यापारी तेथें येऊन राहिले. नानातऱ्हेच्या शिल्पांत निपुण अशा कारागीरांनीं तेथें येऊन वसति केली. अशा प्रकारें इंद्रप्रस्थ नगर द्वारकेप्रमाणें शोभूं लागलें.

इंद्रप्रस्थ-नगरींत पांडवांच्या सहवासांत श्रीकृष्णानें चार महिने आनंदांत घालविले. ह्यावेळीं यमुनानदीच्या कांठीं असलेल्या एका निबिड

अरण्यांत एक महान तपस्वी राहात होता. यमुनेच्या काठीं असलेल्या अरण्यांत राहाणारे जंगली लोक ह्या तपस्व्याला ईश्वराचा अवतार समजत असत आणि ह्याचें वचन अत्यंत आदरानें झेलत. त्या तपस्व्याची कालिंदी नांवाची एक सुंदर कन्या होती. कालिंदीला तर ते सर्व लोक मनुष्यरूप धारण करणारी पवित्र यमुनानदीच समजत अरण्यांत कृष्णार्जुन मृगया करण्याकरितां गेले असतां, श्रीकृष्णाला पाहून कालिंदी मोहित झाली. त्या तपस्व्यानेंहि तिला श्रीकृष्णाला देऊं केली. कृष्णानें कालिंदीशीं विवाह करून त्या भागांत राहाणाऱ्या सर्व लोकांचा आदर संपादन केला. पुढें श्रीकृष्णाचा पांचवा विवाह अवंतीच्या राजाची मुलगी मित्रविंदा हिच्याशीं झाला. मित्रविंदा ही कृष्णाची आत्या राजाधिदेवी हिची मुलगी. राजाधिदेवीचे मुलगे विंद व अनुविंद हे दुर्योधनाचे स्नेही असल्यानें आपल्या बाहेणीनें श्रीकृष्णास वरूं नये असे त्यांचें मत होतें. पण जेव्हां अवंतीच्या राजानें आपल्या कन्येचे स्वयंवर आरंभिलें तेव्हां श्रीकृष्ण तेथे गेला असता मित्रविंदेनें त्यालाच माळ घातली. विंदअनुविंदांनीं स्वयंवराकरितां जमलेल्या त्याच्या पक्षाच्या राजांच्या मदतीनें श्रीकृष्णाशीं युद्ध करण्याचा प्रयत्न केला पण श्रीकृष्णापुढे त्याचें कांहीं चालले नाहीं.

कोसल देशाचा नग्नजित् नामक एक राजा होता. त्याची कन्या सत्या अथवा नाग्नजिती ही अत्यंत रूपवती होती. त्या राजानें तिच्या लग्नाकरितां एक विलक्षण पण लाविला होता. त्याच्याजवळ मोठे माजलेले असे सात जंगली बैल होते. त्यांच्या पुढें जाण्याची कोणाहि मनुष्याची हिंमत नव्हती. त्या बैलांच्या पुढें एकट्यानें जाऊन जो कोणी त्यांना वेसण लावून आपल्या ताब्यांत आणील त्या पराक्रमी पुरुषाला आपली मुलगी सत्या माळ घालील असें राजानें घोषित केलें होतें. हा पण जिंकण्याचा पुष्कळ राजांनीं प्रयत्न करून पाहिला, पण कोणालाच यश आलें नाहीं. गोकुळांत लहानाचा मोठा झालेल्या श्रीकृष्णानें जेव्हां हा पण ऐकला तेव्हां रानावनांत गाई-बैलांना वठणीवर आणण्याची कला माहिती असल्यामुळें त्यानें तो पण जिंकण्याचा निश्चय करून आपल्या यशस्वी पथकासह कोसल देशास प्रयाण केलें. श्रीकृष्णास पाहातांच राजाला मोठा

आनंद झाला. त्यानें आपला पण श्रीकृष्णास सांगितला. गोपवेष घेऊन कृष्ण त्या मत्त बैलांच्या समोर जाऊन उभा राहिला. त्यानें आपल्या हातांतला दंडा अशा कांहीं विशेष प्रकारानें फिरविला व तोंडानें चुचकारण्याचा शब्द काढला कीं ते बैल एकदम त्याच्या पुढें गरिबीनें उभे राहिले. नंतर त्यांना वेसण घालून त्यानें त्याना ओढीत राजापुढें आणिलें. श्रीकृष्णाचें तें मत्त पशूंना वठणीवर आणण्याचें अपूर्व कौशल्य पाहून सर्व लोक चकित झाले. नग्नजितानें आपली कन्या सत्या श्रीकृष्णाला मोठ्या आनंदानें विवाह-समारंभ करून अर्पण केली. नग्नजिताने श्रीकृष्णाला एक हजार गाई, एक हजार घोडे, पांचशें हत्ती आंदण म्हणून दिले. याशिवाय सोनें, रुपें, हिरे, माणकें वगैरे संपत्ति तर पुष्कळच दिली.

केकय देशच्या राजाची पत्नी श्रुतकीर्ति हीहि श्रीकृष्णाची आत्याच होती. तिची मुलगी भद्रा ही विवाहायोग्य होताच केकय देशच्या राजानें श्रीकृष्णाशीं तिचा विवाह मोठ्या थाटानें केला. त्यावेळींहि आदण म्हणून श्रीकृष्णाला अपार संपत्ति मिळाली.

मद्र देशाच्या पराक्रमी राजाची मुलगी लक्ष्मणा परम लावण्यवती आणि शुभ लक्षणांनीं युक्त अशी होती. स्वयंवरांत श्रीकृष्णाला तिनें माळ घातली. ह्या विवाह-समारंभांत मद्रदेशाधिपतीनें श्रीकृष्णाला हजारों जातिवंत घोडे, महाबलाढ्य हत्ती, शेंकडों रथ व अपरंपार युद्धसाहित्य आंदण म्हणून अर्पण केले. असो. ह्याप्रमाणें श्रीकृष्णाचे आठ विवाह झाले. कृष्णाच्या आठ पत्न्यांचीं नांवें पुढील श्लोकांत ग्रथित केलीं आहेत.

> रुक्मी जांबवती भामा सत्या भद्रा च लक्ष्मणा ।
> कालिंदी मित्रविंदा चेत्यष्टौ पट्टमहास्त्रियः ॥

श्रीकृष्णाच्या आठहि विवाहांचें वर दिलेलें वर्णन वाचकांनीं लक्ष्यपूर्वक वाचावें व वरील श्लोक म्हणत असतांना प्रत्येक स्त्रीचें नांव उच्चारतांच तिचें विवाहवर्णन डोळ्यांसमोर उभें राहील, व हे विवाह करण्यांत सुद्धां राजकारण, चातुर्य, शौर्य, उदारपणा, स्वार्थत्याग, लोकसंग्राहक वृत्ति

वगैरेसारख्या जगाला मार्गदर्शन करणाऱ्या किती तरी गोष्टी श्रीकृष्णानें केल्या आहेत हें ध्यानांत येऊन आनंद होईल.

एकदां इंद्रप्रस्थ नगरात देवर्षि नारद पांडवाना भेटण्याकरिता गेले. सत्यप्रतिज्ञ युधिष्ठिर सद्धर्मानें वागणाऱ्या आपल्या महाबुद्धिवान बंधूंच्या मदतीनें यथान्याय प्रजेचें पालन करीत आहे हें पाहून नारदांना आनंद वाटला. पांडवांचें बंधुप्रेम कायम टिकावें, कोणत्याहि कारणानें त्यांच्या बंधुप्रेमामध्यें विक्षेप उत्पन्न होऊं नये म्हणून त्यांना नारदांनीं पुष्कळ उपदेशपर कथा सांगितल्या. बंधुप्रेमामध्यें बिघाड उत्पन्न होण्याला मुख्यतः दोन गोष्टी कारण होतात असा ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध लोकाचा अनुभव आहे. त्या दोन गोष्टी म्हणजे एक द्रव्य आणि दुसरी स्त्री. पैकीं द्रव्याच्या बाबतींत पांडव मोठे विचारी होते. कलह न होता जेवढें मिळेल तेवढ्यावर संतोष मानण्याची त्यांची वृत्ति होती. द्रव्याच्या बाबतींत भाऊबंदांशीं, प्रत्यक्ष शत्रूंशींहि, भांडण्याची त्यांची इच्छा नव्हती, मग ते आपसात भांडणार नाहींत हें सांगण्याची जरूरच नाहीं. आतां राहिली दुसरी गोष्ट म्हणजे स्त्री ! द्रौपदी ही पांच पांडवांची धर्मपत्नी होती. तिच्या बाबतींत त्यांच्यामध्यें वितुष्ट येण्याचा संभव होता. तें वितुष्टहि त्यांच्यामध्यें येऊं नये, पांडव हे सर्व गोष्टींत अलौकिक ठरावेत, अशी नारदांची इच्छा असल्यामुळें द्रौपदीशीं वागण्यांत त्यांच्यामागें कांहीं तरी धर्माचरण लावून द्यावें ह्या हेतूनें नारदांची स्वारी या वेळीं पांडवांची भेट घेण्याकारितां आली होती. धर्माचरण म्हणून एखादी गोष्ट करण्याची पांडवांनीं एकदां प्रतिज्ञा केली म्हणजे धर्मभीरु पांडव प्राण गेला तरी त्या प्रतिज्ञेपासून ढळणार नाहींत अशी नारदांची खात्री होती. देवर्षि नारद आल्याचें युधिष्ठिरानें द्रौपदीस कळविलें. तें ऐकतांच द्रौपदी शुचिर्भूत होऊन शांत चित्तानें, पांडवांसह नारद बसले होते, तेथें आली. ती धर्मनिष्ठ सती त्या देवर्षींचे चरण वंदून व कुलाङ्गनेच्या शालीनतेनें हात जोडून त्या महर्षींपुढें अत्यंत नम्रभावानें उभी राहिली. तिचा विनय पाहून प्रसन्न झालेल्या त्या सत्यवाक् ऋषिश्रेष्ठानें तिला अनेक आशीर्वाद दिले, व अंतर्गृहांत जाण्यास सांगितलें. द्रौपदी गेल्यावर पाडवांना नारद म्हणाले, " ही

कीर्तिमती पांचालकन्या तुम्हां पांचांची एकच धर्मपत्नी आहे, याकरितां जेणेंकरून तिजमुळें तुमच्यांत भेदभाव निर्माण होणार नाहीं, असेंच आचरण तुम्ही परस्परांशीं ठेवा. नाहीं तर तुमची गति सुंदोपसुंद बंधूंसारखी होईल. ते सुंदोपसुंद परस्परांवर निःसीम प्रेम करीत. आपल्या अलौकिक तपश्चर्येच्या योगानें ब्रह्मदेवापासून वर मिळवून ते त्रैलोक्यात कोणालाहि अवध्य झाले होते. एकाचा आनंद तो दुसऱ्याचा आनंद, एकाचें दुःख तें दुसऱ्याचें दुःख, असें ते सर्वदा वागत. त्याचें बसणे-उठणे, खाणेंपिणे, फिरणें वगैरे सर्व कांहीं एकत्रच होत होतें. अशी त्यांची एकमेकांवर प्रीति असतांहि तिलोत्तमेसाठीं त्यानीं एकमेकांचा घात केला. ही बोधपर कथा तुमच्या कानीं आलीच असेल. म्हणून या द्रौपदीसाठीं ज्या योगानें तुम्हां बंधूंत मागेंपुढें वैमनस्य उत्पन्न होऊं शकणार नाहीं, असला कांहीं उपाय वेळींच योजून ठेवा.'' ते सर्व बंधु परस्पर प्रेमबद्ध असल्यानें नारदांचा उपदेश त्यांना इष्टच वाटला, व त्या महात्म्या पांडवानीं नारदमहर्षीसमक्षच असा नियम केला कीं "इत–उत्तर आम्हांपैकीं कोणीहि बंधु द्रौपदीच्या समवेत एकांतांत बसला असतां जो दुसरा बंधु त्याशीं नजरानजर करील, त्यानें ब्रह्मचर्यव्रत धारण करून बारा वर्षें वनवास वा तीर्थयात्रा कराव्या.'' हा नियम ऐकून नारदांना आनंद झाला. हा नियम करण्यांत पांडवांनीं दाखविलेल्या दूरदर्शीपणाची स्तुति करून नारद स्वस्थानीं गेले.

धर्माचरणी पांडवांनीं हा नियम आमरण अक्षरशः पाळला म्हणून द्रौपदीसंबंधानें आपसात बेबनाव होण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधींच आला नाहीं. या नियमाचा प्रखरपणा अनुभवण्याचा प्रसंग एकदां अर्जुनावर आला. कोणा एका धर्माचरणी ब्राह्मणाच्या यज्ञीय धेनू चोरांनीं हरण केल्या. आपलें गोधन चोरानीं नेलेलें पाहातांच तो ब्राह्मण अत्यंत क्रुद्ध होऊन इंद्रप्रस्थास आला व राजद्वारीं येऊन मोठमोठ्यानें ओरडून म्हणूं लागला कीं, "हे पांडवहो, धांवा धांवा, तुम्ही धर्मरक्षक, गोब्राह्मण-प्रतिपालक राजे राज्य करीत असतांना आम्हां यज्ञयाग करणाऱ्या ब्राह्मणांचें गोधन हरण करण्याला चोरट्यानीं धजावें, ही गोष्ट फार वाईट आहे.

प्रजांपासून उत्पन्नाचा षष्ठांश घेऊन जो राजा भयापासून त्यांचें रक्षण करीत नाहीं, त्याचे माथीं त्याच्या प्रजांचीं सर्व पातकें येऊन पडतात, असें शास्त्र आहे. धेनु म्हणजे ब्राह्मणांचें सर्वस्व. ती गेल्यानें ब्राह्मणांच्या सर्व धर्मक्रिया तात्काळ बंद पडतात. धर्मक्रियांच्या लोपापासून होणारीं पातकें, पांडवहो, तुम्हांला भोंवतील. म्हणून धावा आणि त्या नीच, दुष्ट चोरट्याचें पारिपत्य करून माझ्या धेनू मला परत मिळवून द्या, आणि मला धर्माचरण करण्याला मदत करा." ब्राह्मणाचा तो आर्तस्वर कानीं पडतांच महाधनुर्धर अर्जुनानें 'भिऊं नको, आलों' असे म्हणून त्या ब्राह्मणाला आश्वासन दिलें व आपलें शस्त्र घेण्याकरितां लगबगीनें तो आयुधागाराकडे निघाला. आयुधागारात पाऊल टाकतो तोंच त्याचा ज्येष्ठ बंधु धर्म व द्रौपदी त्या ठिकाणीं एकांतात बसलेलीं त्याला आढळलीं. त्याला बंधूची अमर्यादा करून आत जातां येईना आणि शस्त्रांवांचून बाहेरहि पडतां येईना. दुःखित प्रजाजनाचें रक्षण करून स्वतः वनवास पतकरणें कीं दुःखित प्रजाजनांची उपेक्षा करून स्वतःचा वनवास चुकविणें, असा मोठा बिकट प्रश्न अर्जुनापुढें उभा राहिला. थोडा विलंब झाला तर चोरांचा पत्ता लागणें अशक्य होऊन त्या ब्राह्मणाच्या गाई परत मिळणार नाहींत, तेव्हां अधिक विचार न करिता प्रजारक्षणरूपी धर्म पाळून स्वतः वनवास पत्करणेंच अधिक श्रेयस्कर असा मनाचा झटकन निश्चय करून त्यानें शस्त्रागारांत जाऊन शस्त्रें घेतलीं व चोरांचा पाठलाग करून त्याना मारून ब्राह्मणाच्या गाई ब्राह्मणास परत दिल्या, आणि स्वतः वनवासास जाण्याची तयारी केली. नियमांतील शब्दांचे श्लेषार्थ काढून धर्मराजानें अर्जुनाला वनवासाला जाण्याचें कारण नाहीं, असें परोपरीनें सांगून पाहिलें, पण अर्जुन प्रतिज्ञाभंग करायला तयार झाला नाहीं. हाच पांडवांचा मोठेपणा.

अर्जुनानें प्रतिज्ञेप्रमाणें बारा वर्षें वनवास आणि तीर्थयात्रा केल्या. ह्या तीर्थयात्रेंत अर्जुनानें अनेक राजेलोकांशीं परिचय करून घेतला. त्यांतील कित्येक त्याचे परम स्नेही झाले व पुढें भारतीय युद्धाचे वेळीं ते पांडवांच्या बाजूनें लढले. ह्या तीर्थयात्रेंत असतांना कौरव्य नांवाच्या एका नागराजानें

उलूपी नांवाची आपली सुंदर कन्या अर्जुनाला दिली. ह्या महाबलाढ्य नागराजाशीं आप्त-संबंध जोडल्यामुळें त्याची पुढें युद्धप्रसंगीं पांडवांना मोठी मदत झाली. महेन्द्र पर्वताजवळ असलेल्या मणिपूरच्या चित्रवाहन नावाच्या प्रबल राजानें आपली फारच सुंदर एकुलती एक कन्या 'चित्रांगदा' अर्जुनाला दिली. चित्रांगदेपासून अर्जुनाला बभ्रुवाहन नांवाचा पुत्र झाला. मणिपूरचें राज्य पुढें ह्या बभ्रुवाहनालाच त्याच्या आजानें दिलें व मणिपूरच्या वैभवसंपन्न राज्याचा अधिपति केला. हा बभ्रुवाहन अर्जुनासारखाच मोठा पराक्रमी झाला. उत्तर, पूर्व, दक्षिण या दिशाकडील सर्व तीर्थयात्रा करून अर्जुन पश्चिम-समुद्राच्या तीरावरील अनेक क्षेत्रें पाहात पाहात प्रभास क्षेत्रीं आला. श्रीकृष्णाच्या कानावर अर्जुन प्रभास क्षेत्रीं आल्याचें वर्तमान येतांच तो त्याला भेटण्याकरिता द्वारकेहून आला. दोघाची भेट होतांच त्याना परमानंद झाला. ह्यावेळीं वनवासाची मुदतहि संपत आली होती. राम-कृष्णाची भगिनी सुभद्रा हिला बलराम दुर्योधनाला देऊं इच्छित आहे अशी वार्ता श्रीकृष्णानें अर्जुनाला सांगितली. ती ऐकून अर्जुनाला खेद झाला. अर्जुनाचे मनोगत ओळखून श्रीकृष्ण म्हणाला, 'सख्या अर्जुना, माझ्या मनांत सुभद्रा तुला द्यावी असें आहे. बलरामाचा बेत आपण युक्तीनें उधळून देऊं. द्वारकेजवळ समुद्रकाठीं असलेल्या रैवतक पर्वतावर महोत्सव सुरू आहे. तो पाहाण्याकरितां यादव राजघराण्यातील स्त्रिया येणार आहेत. सुभद्रा त्यांच्याबरोबर तेथें येणारच. त्या वेळीं तूं सुभद्रेचें हरण कर. बलरामदादांचा राग मी शांत करीन. तूं काळजी करू नको." कृष्णाचें हें भाषण ऐकून अर्जुनाला आनंद झाला. त्यानें कृष्णाच्या सांगण्याप्रमाणें रैवतक पर्वतावर जाऊन सुभद्रेचें हरण केलें. तिला रथांत घालून तो जाऊं लागला. बलरामाच्या कानांवर ही गोष्ट जातांच तो चवताळला. यादव योद्ध्याना उद्देशून तो म्हणाला, "चला, अर्जुनाचा पाठलाग करा. चला माझ्याबरोबर, चला. अर्जुनाला आपल्या पराक्रमाचा फार गर्व झालेला दिसत आहे. मी त्याचा गर्व हां हां म्हणतां उतरवतों, पाहा." बलरामाच्या आज्ञेनें यादव सेना सज्ज झाली, पण कृष्णाची कांहींच हाल-

चाल दिसेना. तें पाहून बलराम म्हणाला, "कृष्णा, हें आहे तरी काय ? यादवांना तुच्छ समजून अर्जुन, सुभद्रेचें जबरदस्तीनें हरण करून निःशंकपणानें जात आहे हें पाहून तुला त्वेष येत नाहीं, हें आश्चर्य आहे." श्रीकृष्ण गंभीरपणें म्हणाले, " दादा, तुमच्याप्रमाणेंच अर्जुनाच्या या उद्धटपणाचा मला राग येतो. पण थोडा विचारहि करावासा वाटतो. सुभद्रेला योग्य असा वर अर्जुनाशिवाय माझ्यातर कोणी दृष्टीपुढें येत नाहीं. प्रतिज्ञापालन करण्याकरितां अर्जुन तीर्थयात्रा करीत कोठें गेला ह्याचा पत्ता नसल्यामुळें सुभद्रेला दुसऱ्या कोणाला देण्याचा आपला बेत चालला असतांना मीं त्यांत मोडता घातला नाहीं. पण सुभद्रेच्या सुदैवानें अर्जुन एकाएकीं येथें येऊन आपण होऊन सुभद्रेचें हरण करीत आहे. त्यानें नम्रपणानें येऊन सुभद्रेबद्दल आपल्याजवळ मागणी घातली असती तर बरें झालें असतें, पण याचना करण्यापेक्षां पराक्रमी क्षत्रियानें आपल्या पराक्रमाच्या जोरावर वधूचें जबरदस्तीनें हरण करणें प्रशस्त आहे, असें धर्मशास्त्र सांगतें. दादा, आपल्या पराक्रमापुढें नम्र होऊन दुर्योधनानें सुभद्रेला मागणी घातली आहे, म्हणजे सुभद्रेला देण्याबद्दल आपली याचना केली आहे. अर्जुनानें स्वतःच्या अलौकिक पराक्रमावर विश्वासून सुभद्रेचें हरण करून तिला रथांतून चालविलें आहे. दुर्योधनाच्या याचक वृत्तीपेक्षा अर्जुनाची क्षात्रवृत्ती मला जास्त आनंद देत आहे. अर्जुन आपला आतेभाऊ असल्यामुळें त्याच्या धाडसाबद्दल माझ्याप्रमाणेंच आपणालाहि मनांतून अभिमानच वाटत असेल. आपण दाखविलेल्या उसन्या रागाला हे यादव सरदार फसले आणि अर्जुनाशीं युद्धाला तयार झाले. अर्जुनाच्या प्रखर आणि तीक्ष्ण शरसंधानाचा ह्यांना अद्याप अनुभव नाहीं व द्रौपदीस्वयंवराचे वेळीं हे तेथें नसल्यानें अर्जुनाच्या कौशल्यपूर्ण अपूर्व शरसंधानाची ह्यांना कल्पनाहि नाहीं. अर्जुनासारखा योग्य पति आपल्या लाडक्या बहिणीला मिळाल्याबद्दल आपल्या मनांत होणारा आनंद मी जाणतों, म्हणून मी स्वस्थ आहें." कृष्णाचें चातुर्यपूर्ण भाषण ऐकतां ऐकतां बलरामाचा राग वितळत चालला होताच, व शेवटचें वाक्य ऐकतांच तर बलरामाला हंसूंच आलें. त्यानें हंसत हंसत कृष्णाचा हात धरून म्हटलें,

" कृष्णा, लबाडा, आपल्या लहानपणीं, गोकुळांत असतांना तूं जितका लबाड होतास तितकाच लबाड अजूनहि आहेस. गोड गोड बोलून दुसऱ्याचा राग घालवावा व आपल्या मनासारखें त्याच्याकडून करवावें ही कला तुलाच साधली आहे. बरें आतां एवढें तरी कर, अर्जुनाला सुभद्रेसह मोठ्या सन्मानानें द्वारकेंत आण. मोठ्या थाटानें, आपणा यादवांना वैभवाला शोभेल असा आपण त्याचा विवाहसमारंभ करूं. पराक्रमी यादव-पांडवाचा हा नवीन होणारा निकट आप्तसंबंध यादव-पांडवांच्या शत्रूंच्या अंतःकरणात धडकी उत्पन्न करील. जा, जा, कृष्णा, अर्जुनाला लवकर घेऊन ये. त्याच्या स्वागताची मी तयारी करतों." बलरामदादाचें हें भाषण ऐकून कृष्ण मनापासून हंसला व 'जशी दादाची आज्ञा' असें म्हणून आपल्या रथावर चढला. पुढें अर्जुन सुभद्रा विवाह फारच थाटाचा झाला. आंदण म्हणून रामकृष्णानीं अगणित संपत्ति व अपार युद्धसाहित्य अर्जुनाला दिलें. ह्या विवाहाचें वर्णन ऐकून जरासंध-शिशुपालादि कृष्णद्वेष्टे राजे व दुर्योधनादि पांडवद्वेष्टे कौरव, बलरामाच्या म्हणण्याप्रमाणें, खरोखर भयभीत झाले.

तीर्थयात्रा करीत हिंडण्याची मुदत संपल्यामुळें आतां अर्जुन सुभद्रेला घेऊन इंद्रप्रस्थनगरास आला. त्याच्याबरोबर श्रीकृष्णहि इन्द्रप्रस्थास आपली आत्या कुंती हिला भेटण्याकरिता व कांहीं दिवस पांडवांच्या संगतींत आनंदानें घालविण्याकरिता आला. येताना त्याने आपलें सुदर्शन चक्रनामक विजयी पथक इंद्रप्रस्थास आपल्याबरोबर आणलें. आपला बंधु अर्जुन बारा वर्षांच्या दीर्घ कालानंतर प्रतिज्ञापूर्ती करून आलेला पाहून धर्म, भीम, नकुल, सहदेव ह्यांना परमानन्द झाला. कुंतीमातेच्या आनंदाला तर पूर्ण भरती आली. त्यांत अर्जुनाबरोबर श्रीकृष्ण आलेला पाहून तर सर्वांना दुधात साखर पडल्याप्रमाणें झालें. त्या वेळीं कृष्णार्जुनांच्या आगमनानें सर्व इंद्रप्रस्थनगर नवचैतन्यानें भरून गेलें. नगरवासी जनांनीं अनेक प्रकारचे समारंभ करून कृष्णार्जुनांचा सन्मान केला. अर्जुनानें तीर्थयात्रेंत अनुभवलेले सर्व प्रसंग आपल्या युधिष्ठिरादि बंधूंना विस्तारानें सांगितले. अर्जुनानें अनेक राजांशीं सख्यत्व जोडलेलें

ऐकून त्या पराक्रमी वीरांना आनंद झाला. अर्जुनानें आपल्या तीन लग्नांची हकिगत सांगण्यास सुरवात केली तेव्हां द्रौपदी सानंद रोषानें अर्जुनाकडे पाहूं लागली. सुभद्रा दुर्योधनाला देण्याचें बलरामदादांनीं ठरविलेलें असतां त्यांचा बेत उधळून लावण्याकरितां पांडवांच्यावर अत्यंत प्रेम करणाऱ्या श्रीकृष्णानें सुभद्रेचें हरण करण्याचा आपल्याला कसा सल्ला दिला, बलरामदादांचा राग शांत करण्याची कामगिरी त्यानें कशी केली, भोळ्या दादांचा राग शांत झाल्यानंतर विवाह समारंभ कसा थाटानें केला वगैरे रसभरित वर्णन कृष्णाकडे पाहात पाहात अर्जुन गमतीनें करूं लागला तेव्हां सर्वांची हंसतां हंसतां पुरेवाट झाली. द्रौपदीचा राग तर कोठल्या कोठें नाहींसा झाला. विवाहवर्णन संपण्याच्या वेळीं अर्जु-नानें नेत्रकटाक्षानें सुभद्रेला खूण करतांच सुभद्रेनें कुंती, धर्म, भीम, याना शालीनतेनें नमस्कार करून त्यांच्याकडून आशीर्वाद मिळविले. आणि ती जेव्हा द्रौपदीला नमस्कार करण्याकरितां नम्रपणानें खालीं वांकली, तेव्हां द्रौपदीनें तिला वर उचलून प्रेमभरानें आलिंगन दिलें. द्रौपदी तिला म्हणाली, "तूं माझ्या आवडत्या कृष्णदादाची बहिण म्हणजे माझीहि बहिणच आहेस, हो." सुभद्रा हंसली. कृष्ण हंसला. सर्वांच्याच मुखांवर निर्मळ हास्य दिसूं लागलें.

इंद्रप्रस्थनगरांत कृष्णार्जुनांचे असे आनंदांत दिवस जात होते. एक दिवस कृष्णार्जुन यमुनेवर पोहण्याकरितां गेले. यमुनेच्या शीतल आल्हाद-दायक पाण्यांत मनमुराद पोहल्यानतर दोघेहि यमुनेच्या वाळवंटांत स्वस्थ-पणानें बसले. त्यावेळीं त्यांची दृष्टि समोरच दिसणाऱ्या खांडववनावर गेली. कृष्ण अर्जुनाला म्हणाला, "हें खांडववन केवढें प्रचंड आहे व क्रूर रानटी लोकांनीं आणि हिंस्र श्वापदांनीं तें किती भरलेलें आहे, तुला माहीत आहे ? तुमच्या राज्यालगत असलेल्या ह्या खांडववनाकडे दुर्यो-धनादिकांनीं आजपर्यंत मुळींच लक्ष दिलें नाहीं. नारद ऋषींनीं मला एकदां ह्या वनासंबंधीं हकिकत सांगितली आहे. यमुनेसारख्या पवित्र नदीच्या कांठावर हें वन असल्यानें ह्यांत पूर्वी मोठमोठे यज्ञयाग करणारे कर्मठ तपस्वी ब्राह्मण राहात होते. त्यांच्या यज्ञीय धेनूंचीं खिल्लारें ह्या वनांत

कितीतरी होतीं. ज्यांच्या वास्तव्यानें भूभागाला पावित्र्य येतें व तो भूप्रदेश यज्ञ।करितां प्रशस्त समजला जातो, अशा मृगाचे अनेक कळप ह्या वनांत दृग्गोचर होत. अनेक आश्रमांतून वेदाध्ययनाचे घोष चाललेले ऐकूं येत. ठिकठिकाणीं यज्ञकुंडांत जळत असलेल्या हविर्द्रव्याच्या पावित्र धूमानें व सुगंधानें वातावरण भरलेलें असे. अशा ह्या पवित्र खांडववनांत देवेंद्राच्या कृपेनें, सर्पराजानें राहाण्यास जागा मिळविली. सर्प ही जंगली जात अत्यंत दुष्ट असून त्याना कोणीहि आपल्या जवळ थारा देत नाहीं. देवेंद्राचा स्नेह संपादून सर्पराज तक्षक खांडववनांत राहावयास लागल्यापासून त्यानें येथें सर्पांची मोठी वसाहत केली. खाडववनांत मिळणारा उंची मध, आणि वनांतील उत्तमोत्तम फळफळावळ देवेंद्राला देऊन तक्षक त्याला प्रसन्न ठेवूं लागला. हळू हळू त्यानें ऋषींच्या आश्रमांना त्रास देण्यास सुरवात केली. आश्रममृगांची सर्पांनीं शिकार चालविली. यज्ञीय धेनूंना पळवून नेण्याला त्यानीं सुरवात केली. दर्भ, समिधा, कंद-मुळें व सर्पण आणण्याकरिता ऋषींचे शिष्य गेले असताना त्यांना सर्प अपाय करूं लागले. ऋषींनीं तक्षकाविरुद्ध आपली तक्रार राजा दुर्योधनाकडे नेली, पण खांडववन देवेंद्राच्या ताब्यात आहे व तक्षक देवेंद्राचा आश्रित म्हणून त्याच्या वाटेस जाण्याचें दुर्योधनानें टाळलें. सर्पांच्या त्रासाला कंटाळून बहुतेक सर्व ऋषींनीं आपले आश्रम आतां वनांतून हलविले आहेत. यमुनेच्या कांठीं असलेली ही पावित्र यज्ञभूमि कांहीं झालें तरी सोडायची नाहीं, अशा निश्चयानें आतां तेथें अग्नीसारखा तेजस्वी आणि नांवानेंहि 'अग्निदेव' असणारा महान् तपस्वी ब्राह्मण एकटाच राहिला आहे. नारद सागत होते, त्या ब्राह्मणाला घालवून देण्याचे तक्षकाचे आटोकाट प्रयत्न चालले आहेत. ब्राह्मण अत्यंत तपःसंपन्न व सिद्धमंत्र असल्यामुळें तक्षक उघडपणें त्याच्या वाटेस जाऊं शकत नाहीं. त्या ब्राह्मणानें कंटाळून आपण होऊन निघून जावें म्हणून सर्पांनीं त्याची सर्व प्रकारांनीं अडवणुक चालविली आहे. नारदांनीं सांगितलेली ही हकिगत ऐकून, अर्जुना, माझ्या मनांत पुष्कळ वेळां येतें कीं, खांडववनाकडे आपण एकदां लक्ष द्यावें. आमच्या लहानपणीं आम्हीं कालिया सर्पाची जशी

वृंदावनांतून हकालपट्टी केली, तशी येथून तक्षकाची त्याच्या सर्व ज्ञाती-सह हकालपट्टी करून हें वनंच नाहींसें करावें. आमच्या बलरामदादांच्या मदतीनें ह्या वनाचें सुपीक क्षेत्र बनवून तें तुमच्या राज्याला जोडून घ्यावें. ही गोष्ट करतांना देवेंद्राशीं युद्धप्रसंग करण्याची वेळ येईल. पण त्यामुळें यादव-पांडव एक झाल्यावर ते देवेंद्रालाहि भारी आहेत, हें सर्व जगाला कळेल. तक्षकाशीं भांडण उकरून काढण्याला कांहीं तरी निमित्त शोधलें पाहिजे." कृष्णाच्या ह्या म्हणण्याला अर्जुनानें आनंदानें रुकार दिला. इतक्यांत कृष्णाला भांडण उकरून काढण्याला पाहिजे असलेलें निमित्तच कृष्णार्जुनांचा शोध करीत तेथें आलें.

कोणी एक ब्राह्मण एकाएकीं त्याच्यापुढें येऊन उभा राहिला. त्याचें शरीर मोठ्या तालवृक्षाप्रमाणें असून त्याचें तेज अग्नींत तापलेल्या सुवर्णा-प्रमाणें होतें. त्याचे केंस ज्वालेप्रमाणें पिंगट वर्णाचे असून त्यानें वल्कलें धारण केलीं होतीं. असा तो तेजानें मूर्तिमंत अग्नीप्रमाणें दिसणारा ब्राह्मण कृष्णार्जुनांजवळ येऊन उभा राहातांच कृष्णार्जुन आदरानें उठून उभे राहिले व त्यांनीं त्या ब्राह्मणाला नमस्कार करून त्याला बसावयाला आसन दिलें. ब्राह्मण आसनावर बसतांच कृष्णार्जुन त्याच्या समोर बसले. ब्राह्मण एकदम बोलूं लागला, "यादवेंद्र श्रीकृष्ण व धनुर्धरेंद्र अर्जुन, हे माझ्या समोर बसलेले आहेत असें मी समजूं ना ? देवेंद्रासंबंधीं तक्रार मला तुमच्या पुढें करावयाची आहे. तुम्ही यमुनातीरावर आलां आहांत असें मला आतांच नारदमुखांतून समजतांच खांडववनांतून मी तुमच्याकडे धांवत आलों." कृष्ण म्हणाला, "होय ब्राह्मणश्रेष्ठा, मी कृष्ण आणि हा अर्जुन, आम्ही दोघेहि आपल्या सेवेला हजर आहों. आपलें कुशल आहे ना ? आपलीं धर्मकृत्यें निर्भयपणें यथाविधि चाललीं आहेत ना ? आपलें नामाभिधान व आपण कोठून आला हें आम्हाला कळविण्याची कृपा करावी. आपण तपस्वी धर्मनिष्ठ वेदवेत्त्या ब्राह्मणांनीं यज्ञकुंडांत प्रज्वलित ठेविलेला अग्नि आम्हां क्षत्रियांच्या मनगटांस सामर्थ्य देतो." ब्राह्मण म्हणाला, "आमच्या यज्ञकुंडांतील प्रज्वलित अग्नि ह्या सर्पांच्या अघोर कृतीनें निस्तेज होत चालला आहे आणि ह्यांना तो उन्मत्त देवेंद्र साहाय्य

करतो आहे; हीच माझी तक्रार मी तुम्हांपुढें मांडणार आहें. माझें नांव ' अग्निदेव '. माझा आश्रम ह्या समोर दिसणाऱ्या खांडवारण्यांत आहे. कृष्णा, ही मूळची तपोभूमि, ह्या क्रूर सर्पांनीं ती तपोभूमि उध्वस्त करून तिचें भयंकर अरण्यांत रूपातर केलें आहे. माझ्याशिवाय सर्व ब्राह्मण सर्पांच्या त्रासाला कंटाळून खांडवभूमि सोडून चालते झाले. माझ्या तपः-सामर्थ्यानें मी ह्या तक्षकाचा नाश करीन, पण आत्मज्ञान मिळविण्या-करिता आजपर्यंत केलेल्या धर्माचरणाचें फळ त्या कामीं खर्ची पडेल. दुष्टांचा नाश करण्याचें काम तुम्हां क्षत्रियाचें ! तें मी करूं लागलों तर परधर्मा-चरण केल्याचा दोष मला लागेल. शिवाय ह्या कामीं देवेंद्राशीं वैर करावें लागून देव-ब्राह्मणांमध्यें वितुष्ट उत्पन्न केल्याचें पातक मला लागून तें पातक सत्त्वगुणाला निस्तेज करून जगाचा घात करील." कृष्ण म्हणाला, " ब्राह्मणश्रेष्ठा, आम्हालाहि देवेंद्राशीं लढावें लागेल. तुम्हां ब्राह्मणांचें तेज आम्हांला साहाय्य असलें म्हणजे आम्हांला कोणाशीं लढण्याची धास्ती वाटत नाहीं.' अर्जुन म्हणाला, " मला अस्त्रविद्या उत्तम येते. पण माझ्या हस्तचापल्यापुढें टिकेल असें कणखर धनुष्य जर मला मिळेल तर-" अग्निदेव म्हणाला, " अर्जुना, तक्षकाच्या मदतीस स्वतः देवेंद्र आला तर तुम्हांला कशाची जरूर लागेल, त्याचा आगाऊ विचार करून मी येथें आलों आहें चंद्रानें वरुणाला दिलेलें अत्यद्भुत गांडीव धनुष्य व ज्यांतील बाणांचा केव्हांच क्षय होत नाहीं असे दोन अक्षय्य भाते, अर्जुना, तुला देण्याकरितां मीं मुद्दाम वरुणाला प्रसन्न करून त्याच्यापासून आणिले आहेत. देवेंद्रासारख्याशीं लढण्याचा प्रसंग आला तर तुझा रथ कांहीं उपयोगाचा नाहीं हें जाणून अर्जुना, वरुणानें आपण होऊन तुला देण्याकरितां एक दिव्यरथ दिला आहे त्या रथाचे घोडे गंधर्वलोकांतील असून ते पांढरे शुभ्र आहेत. ते वेगांत वायूची बरोबरी करतील असे आहेत. त्या रथावरील ध्वजदंडावर सिंह-व्याघ्राप्रमाणें भयंकर आकृतीचा एक वानर आहे. श्रीकृष्णा, इंद्राच्या वज्राची बरोबरी करील अशी कौमो-दकी नामक भयंकर गदा वरुणानें तुला देण्याकरितां माझ्याजवळ दिली आहे. चला, माझ्या बरोबर माझ्या आश्रमांत चला. तुमच्याकरितां

आणलेल्या वस्तू मी तुम्हाला अर्पण करतों. माझ्या आश्रमापर्यंत आलांत म्हणजे खाडववनाचें तुम्हांला निरीक्षणाहि करता येईल." ब्राह्मणाचें भाषण ऐकून कृष्णार्जुन त्याच्या म्हणण्याप्रमाणें खांडववनांतील आश्रमात जाण्याकरितां निघाले. जातांना वाटेंत अग्निदेवानें त्यांना खांडववनांत राहाणाऱ्या निरनिराळ्या रानटी क्रूर जातींसंबंधीं माहिती सांगितली. ह्या रानटी जातींना तेथून पूर्णपणें हांकलून देऊन ती तपोभूमि यज्ञयागादि धर्मकृत्यें करण्याला व सर्वसामान्य माणसाना वसति करून राहाण्याला योग्य करावयाची, म्हणजे जवळजवळ सर्व खांडववन अग्निनारायणाला अर्पण करून सर्व प्रदेश कृषिकर्म करता येण्यासारखा केला पाहिजे. त्या-दृष्टीनें खांडववनाचें निरीक्षण करावयाला अग्निदेवानें कृष्णार्जुनाला सांगितलें. खाडववन पाहात पाहात कृष्णार्जुन अग्निदेवाच्या आश्रमांत जाऊन पोहोंचले. तेथें त्यानें कपिध्वज असलेला व शुभ्र घोडे जोडलेला तो दिव्य रथ, अतुल गांडीव धनुष्य व दोन अक्षय्य भाते ह्या वस्तु अर्जुनाला दिल्या आणि वज्रतुल्य कौमोदकी गदा श्रीकृष्णास अर्पण केली. खाडवदाह करावयाचा ठरल्यामुळें अग्निदेवानें आपल्या शिष्यांना आश्रम रिकामा करून यज्ञसाहित्य व धर्मग्रंथ घेऊन इंद्रप्रस्थास धर्मराजाकडे जावयास सांगितलें. इंद्रप्रस्थास जाणाऱ्या शिष्यांबरोबर, श्रीकृष्णानें आपल्या सुदर्शन चक्रास पाडवसैन्यातील एक पथक घेऊन ताबडतोब येण्याबद्दल निरोप पाठविला.

कृष्णार्जुन खांडववनाशेजारीं आले असून त्यानीं चालविलेल्या हाल-चालीची वार्ता सर्पराज तक्षकाच्या कानांवर जातांच तो घाबरला. कालिया सर्पाला वृंदावनांतून हांकून देणाऱ्या कृष्णाच्या नावाची त्याला पूर्वी-पासूनच दहशत बसली होती. कृष्णार्जुनांविरुद्ध, पांडवाचे प्रतिस्पर्धी जे कौरव, त्यांच्याकडून मदत मिळाविण्याकरितां तो कुरुक्षेत्राकडे एकदम चालता झाला. आपल्या मदतीला धांवून येण्याबद्दल देवेंद्राकडेहि त्यानें सर्प पिटाळले. तक्षकानें दुर्योधनादिकांची भेट घेऊन आपल्या मदतीस येण्याबद्दल त्यांची फार विनवणी केली. परंतु कृष्णार्जुनांच्या पराक्रमाची पूर्ण कल्पना असल्यामुळें, कौरवांनीं तक्षकाला मदत देण्याचें नाकारलें.

पांडवांचा पराभव करून आपल्या मित्राला त्यांच्या हातून सहज सोडवूं अशा घमेंडींत थोडें अमर सैन्य घेऊन देवेंद्र निघाला. कृष्णाचें सुदर्शन चक्र व पांडवांच्या सैन्यांतील एक पथक येऊन पोहोंचतांच कृष्णार्जुनांच्या आज्ञेनें पांडव–पथकानें खांडव वनांतून बाहेर पडण्याच्या सर्व जागा रोखून धरल्या. अग्निदेवासह कृष्णार्जुन त्या दिव्य रथावर चढले, आणि कृष्णानें आपल्या सुदर्शन चक्राला खांडववन सर्व बाजूंनीं पेटवून देण्याची इषारत दिली. कृष्णार्जुनानीं आपले दिव्य शंख फुकून सर्पराज तक्षकाला युद्धाला आव्हान दिलें. तक्षक तर अगोदरच कुरुक्षेत्राकडे चालता झाला होता. तक्षकाचा मुलगा अश्वसेन सर्पांच्या सैन्याची जुळवाजुळव करून कृष्णार्जुनांबरोबर लढण्याकरिता खांडववनाच्या बाहेर जाण्याच्या जागीं यायला निघाला तोंच खांडवाला चोहोंबाजूंनीं आग लागल्याचें भयंकर दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें. अर्जुनाच्या गांडीव धनुष्याचा टणत्कार ऐकताच सर्पांच्या सैन्याचा धीर खचून तें एकदम गडबडलें. गांडीव धनुष्यापासून होणाऱ्या शरवृष्टीनें तर त्याची दाणादाण झाली. चोहोंकडून आगीचा भडका तर असा झाला कीं, सर्पसैन्याला शत्रूवर चालून जाण्याला, अथवा आपला बचाव करण्याकरितां बाहेर पळून जाण्याला मार्गच दिसेना. त्यांतूनहि जे आगींतून बाहेर पडण्याचा मार्ग मोठ्या शर्थीनें काढीत होते ते खांडववनाभोंवतीं तडफेनें फिरणाऱ्या सुदर्शन चक्राच्या सपाट्यात सांपडत. तें अरण्य दग्ध होऊं लागतांच हजारों हिंस्र प्राणी भयंकर किंकाळ्या फोडीत चोहोंबाजूंनीं बाहेर पडूं लागले. त्यांतील कित्येकांचीं शरीरें अर्धवट जळलीं होतीं; कित्येकाचे डोळे फुटले होते, तर पाहिजे तेथून उल्का टाकिल्यामुळें कित्येकांचीं अंगें होरपळून फुटून गेलीं होतीं. इतक्यांत देवेंद्राची कुमक सर्पांना आली. आणि मग देवांच्या अस्त्रविद्येचा चमत्कार दिसूं लागला. देवेंद्राच्या पर्जन्यास्त्रानें, भडकलेला अग्नि शात होऊं लागला हें पाहातांच अर्जुनानें वाय्वास्त्र सोडून पर्जन्यास्त्र विच्छिन्न करून टाकलें. पण एवढ्या अवकाशांत तक्षकाचा पुत्र अश्वसेन आपल्या कांहीं निवडक सर्पयोद्ध्यांसह खांडववनाबाहेर निसटला. तें अग्निदेवाच्या ध्यानीं येतांच त्यानें श्रीकृष्णाला

" अश्वसेन निसटला रे निसटला " असें ओरडून सांगितलें. कृष्णाच्या सुदर्शनानें त्याचा पाठलाग करून त्याचे बहुतेक सर्व योद्धे मारले पण त्या धुमश्चक्रींत अश्वसेन मात्र सुटला. दानवांचा अत्यंत कुशल शिल्पी ' मयासुर ' हा त्या अरण्यांत राहात होता. तो घाबरून कसाबसा वनाच्या बाहेर येऊन एकदम ' अर्जुना, माझें रक्षण कर, अर्जुना, माझें रक्षण कर, अर्जुना, माझें रक्षण कर. ' असे ओरडत अर्जुनला शरण गेला. अर्जुनानें त्याला अभय दिलें म्हणून तोहि वांचला. तक्षक व तक्षकाचा पुत्र अश्वसेन दोघेहि अरण्यांतून सुखरूप सुटलले ऐकून देवेंद्रानें युद्ध थांबविलें. कृष्णार्जुनांशीं युद्ध करण्याची त्याची मुळींच इच्छा नव्हती. उलट तो यादवपांडवांचा हितचिंतक होता. सर्पराज तक्षक त्याचा आश्रित होता म्हणून त्याला सोडविण्याकरितां तो आला होता. तो सुटला असें समजतांच त्यानें युद्ध थांबवून कृष्णार्जुनांची भेट घेतली. कृष्णार्जुनांच्या अस्त्रविद्येनें आपण संतुष्ट झाल्याचें त्यानें सांगितलें अर्जुनाला पुढें केव्हांतरी देवांची दिव्य अस्त्रविद्या देण्याचें कबूल करून त्यानें कृष्णार्जुनाचा निरोप घेतला. सर्प आदि जगली क्रूर जातींचा नाश होऊन त्यांची वसाहत नाहींशी झाली, व हिंस्र पशु-पक्षी खांडव दाहात जळून गेल्यानें ती सर्व भूमि तपोधनांना राहाण्यास योग्य झाली, हें पाहून ' अग्निदेव 'हि संतुष्ट झाला. त्यानें कृष्णार्जुनांस आनंदानें युद्ध थांबविण्यास सांगून, उरल्यासुरल्या निस्तेज झालेल्या जंगली लोकांना पळून जाण्यास सवड द्या, असं सांगितलें. तपस्वी अग्निदेवाच्या मनात कोणाबद्दल तसा द्वेष नव्हताच. तपश्चर्येला, धार्मिक कृत्यांना येणारीं विघ्नें नाहींशीं व्हावींत, एवढ्याच उद्देशानें त्यानें कृष्णार्जुनांना सर्प व त्यांचा पाठिराखा देवेंद्र यांच्याशीं युद्ध करण्याच्या भरीस घातलें होतें. कृष्णार्जुनांच्या शौर्यानें संतुष्ट होउन त्यानें त्यांना अनेक मंत्रसिद्ध अस्त्रें दिलीं व ' असेंच तुमच्या हातून धर्मरक्षण होत जावें, असा आशीर्वाद देऊन आपल्या आश्रमाची स्थापना करण्याकरितां तो निघून गेला. खांडववन जळून खाक झाल्यानें एक मोठा सुपीक प्रदेश पांडवांच्या राज्याला जोडला जाऊन लोकांच्या उत्तम वसाहती त्या ठिकाणीं झाल्या आणि लोकसंख्या व कृषिकर्म ह्या दृष्टीने

इंद्रप्रस्थ राज्याची भरभराट झाली.

असो. यानंतर श्रीकृष्ण इंद्रप्रस्थनगरांत दोन महिने राहून परत द्वारकेस गेला. द्वारकेंत जातो तोंच त्याला देवेंद्राच्या मातेचीं—अदितीचीं—कुंडलें, आसामचा——त्यावेळच्या प्रागूजोतिषाचा——राजा नरकासुर, यानें पळवून नेलीं असल्याची वार्ता समजली व त्या कुंडलाचा शोध करण्याबद्दलचा देवेंद्राचा निरोपहि त्याला मिळाला. नरकासुर हा अत्यंत दुष्ट राक्षस होता. त्यानें मनुष्य, दानव, यक्ष, गंधर्व इत्यादि जातींतल्या हजारों सुंदर सुंदर मुली पळवून आणून आपल्या बंदींत ठेविल्या होत्या. ह्या त्याच्या अत्यंत नीच कृत्याबद्दल श्रीकृष्णाच्या मनात त्याच्यावर स्वारी करण्याचें होतेंच. देवेंद्राचा निरोप मिळताच यादवाचें एक अक्षौहिणी प्रबळ सैन्य व आपलें खास सुदर्शनचक्र, त्यानें आपल्या बरोबर घेतलें. राक्षसाच्या प्रदेशाचा व त्याच्या युद्धाचा पूर्ण माहितगार असा आपला परम भक्त गरुडराजा, यासहि त्यानें गरुडसैन्यासह बरोबर घेतले होतें. अस्वलाचा राजा जाम्बवान यानें आपल्या अस्वलाच्या सैन्यापैकीं एक निवडक व बलाढ्य पथक श्रीकृष्णाच्या मदतीकरिता पाठविलें. ही स्वारी सपल्यावर अदितीचीं कुंडलें पोंचविण्याकारिता इन्द्रलोकीं जाण्याचा आपला बेत श्रीकृष्णानें बोलून दाखविताच, सत्यभामेनें त्याच्याबरोबर जाण्याचें ठरविलें. सत्यभामा ही कृष्णाची अत्यंत आवडती स्त्री असल्यानें त्यानें तिच्या म्हणण्याला मान्यता देऊन तिला आपल्याबरोबर घेतलें. यादव, गरुड, अस्वल यांची मिळून सर्व प्रकारें महान बलाढ्य झालेली सेना नरकसुरावर चालून गेली. राक्षसासारख्या भिन्न संस्कृतीच्या भयंकर लोकांशीं त्यांच्या प्रदेशात जाऊन श्रीकृष्णानें घनघोर युद्ध केलें. युद्धांत नरकासुराचा वध करून त्याच्या बंदींत पडलेल्या हजारों मुली त्यानें मुक्त केल्या. ही गोष्ट आश्विन वद्य १४ स झाली. नरकासुरानें अनेक देशांतून लुबाडून आणलेल्या बहुमोल रत्नानीं आपलें भांडागार भरून ठेविलें होतें. कृष्णानें तीं सर्व रत्नें हस्तगत केलीं. त्या भांडागारात त्याला अदितीचीं कुंडलेंहि मिळालीं. आर्तत्राणाचें पवित्र कार्य उरकतांच नरकासुराच्या राज्याचा अपहार करण्याचें मनांतहि न आणिता उदारधी श्रीकृष्णानें

नरकासुराच्या भगदत्त नांवाच्या ज्येष्ठ पुत्रास प्राग्ज्योतिषपूरच्या गादीवर बसविलें. भगदत्तानें आपल्या राज्यारोहणप्रसंगीं अगणित धन, ऐरावत कुळांतील सुंदर दिसणारे शेंकडों बलाढ्य हत्ती, व नानाविध बहुमोल वस्तू नजर करून श्रीकृष्णाला संतुष्ट केलें. श्रीकृष्णानें त्या सर्व मुली, रत्नें आणि नजर मिळालेली संपत्ति आपल्या विश्वासु सेनापतीच्या ताब्यांत देऊन सेनेची द्वारकेस रवानगी केली. मुली सोडवून द्वारकेंत आणल्याची वार्ता दूतांच्या करवीं देशोदेशीं पोंचविण्याची व्यवस्था केली आणि अदितीचीं कुंडलें घेऊन तो अमरावतीस जाण्याकारितां निघाला.

श्रीकृष्णाबरोबर त्याची आवडती स्त्री सत्यभामा, परम भक्त गरुडेश्वर व खास सुदर्शन पथक हीं होतीं. हिमप्रदेशांतील देवेंद्राच्या अमरावती नगरींत गेल्यावर श्रीकृष्णाचें देवेंद्रानें स्वागत केलें. कृष्णानें अदितीला भेटून तिचीं कुंडलें तिला दिलीं, तेव्हां अदितीला अत्यानंद झाला. हिमगिरीवरील देवराज्यांतील प्रेक्षणीय स्थळें, रमणीय सरोवरें, नंदनवनादि उपवनें व दिव्य वनस्पति असलेलीं गहन काननें श्रीकृष्णानें अवलोकन केलीं. ह्या त्याच्या निरीक्षणांत तुळस ही दिव्य वनस्पति त्याला सांपडली. त्यानें तुळस ही वनस्पति व पारिजातक वृक्ष ह्या दोन स्वर्गीय वस्तु देवलोकाहून निघतांना इकडे आणण्याकरितां बरोबर घेतल्या. देवेन्द्राचा निरोप घेऊन श्रीकृष्ण द्वारकेस जाऊं लागला तेव्हां वाटेंत ठिकठिकाणीं लोकांनीं त्याच्या विजयाबद्दल त्याचा उत्सवपूर्वक सत्कार केला. नरकासुरासारख्या महाबलाढ्य व दुष्ट राक्षसाचा वध करून श्रीकृष्णानें सर्व लोकांना महान संकटांतून मुक्त केलें होतें. द्वारकेंत तर विजयी श्रीकृष्णाचें अपूर्व स्वागत झालें. नरकासुराच्या बंदींतून सोडवून आणलेल्या हजारों सुंदर मुली द्वारकेंत राजप्रासादांत होत्या. त्यांना सोडवून आणल्याची बातमी त्यांच्या नातेवाइकांना कळावी व त्यांनीं आपापल्या मुलींना आनंदानें घेऊन जावें म्हणून श्रीकृष्णानें देशोदेशीं जासूद पाठविल्याचें मागें लिहिलेंच आहे. पण नरकासुरासारख्या दुष्ट राक्षसानें हरण करून नेलेल्या आपल्या मुली धर्मभ्रष्ट व पतित झाल्या, आतां त्या आपल्याला मेल्यासारख्याच झाल्या, अशा वेडगळ समजुतीनें मुलींची चौकशी करण्याकरितां

द्वारकेकडे कोणीच फिरकेना. हें पाहून श्रीकृष्णाला अतिशय खेद वाटला. आपल्याला पातित, धर्मभ्रष्ट, समजून आपले जन्मदाते आईबाप, भाऊ बहिणी व आतेष्ट आपली नुसती विचारपूसहि करायला येत नाहींत हें पाहून मुलींना तर परमावधीचें दुःख झालें. आपण अशा प्रकारें मृततुल्य झालों असें वाटून त्यांचे जीव त्यांना नकोसे झाले. त्यांची ती दैन्यवाणी स्थिति पाहून श्रीकृष्णाचें हृदय कळवळलें. धर्मभ्रंष्टतेबद्दलच्या व पतितत्वा-बद्दलच्या लोकांच्या असल्या वेडगळ कल्पना नाहींशा करण्याचा निश्चय करून त्यानें मोठमोठ्या वेदवेत्त्या पंडितांना, धर्मरहस्य जाणणाऱ्या तपस्वी जनांना, द्वारकेंत एका यागाच्या निमित्तानें बोलावून आणलें. त्यांच्याशीं धर्म-चर्चा केली. कृष्णानें आपल्या अपूर्व धर्मज्ञानानें व बुद्धिचातुर्यानें त्या सर्वांना चकित केलें. त्या सर्व मुलींची हाकिगत त्यांना सांगून त्या मुलींचा अपराध कांहींहि नसतांना, नरकासुराच्या दुष्टपणानें त्या मुलींच्या वर आलेल्या भयंकर प्रसंगानें त्या धर्मभ्रष्ट आणि पतित झाल्या असें समजणें हें देश, काल, धर्म, विवेक, माणुसकी ह्या सर्वच दृष्टींनीं किती विघातक आहे, हें आपल्या अलौकिक वक्तृत्वानें त्यानें त्या विद्वज्जनांपुढें नीट मांडलें. त्याबरोबर त्या धर्मरहस्य जाणणाऱ्या सज्जनांनीं त्या मुली धर्मभ्रष्ट झाल्या नाहींत, असा आपला निर्णय दिला. असुराच्या बंदींत असताना अवशस्थितींत त्या मुलींच्या हातून जो धर्माचाराचा लोप झाला तो त्यांचा दोष वैदिक मंत्रांनीं जाईल असें त्यांनीं सांगतांच, श्रीकृष्णानें त्या यज्ञप्रसंगांत त्या वेदवेत्त्या पंडितांकडून त्या सर्व मुलींना शुद्ध करून घेण्याचा विधि करविला. इतकेंच नव्हे तर ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें राजकुळांतले, सरदार कुळांतले, त्यांच्या त्यांच्या जातीचे तरुण, सुंदर, तेजस्वी वर शोधून त्यांचे लग्नविधिहि मोठ्या थाटानें करून त्या सर्व कन्यकांचे संसार थाटून दिले.

अशा प्रकारें पवित्र गृहस्थाश्रम स्वीकारलेल्या त्या हजारों जोडप्यांचा पालनकर्ता-पाति श्रीकृष्ण सर्वांना आदर्श धर्मज्ञ म्हणून वंदनीय झाला. अवशस्थितींत पतित झालेल्यांना पावन करून घेण्याची सुरवात श्री-कृष्णानें करून, परधर्मीयांच्या कारवाईनें आपला समाज घटूं लागला तर

काय करावें हें लोकाना दाखवून दिलें. श्रीकृष्णाचें हें आदर्श कृत्य चिरस्मरणीय व्हावें अशी योजना पुढील आर्यांनीं करून ठेविली. आश्विन वद्य चतुर्दशीस नरकासुराला मारून पतिताचा उद्धार केला, तो दिवस दिवाळीच्या सणांतील पहिला दिवस ठरवून दिला आहे. त्या दिवशीं पहाटेस, नरकात पडलेल्या, पतित झालेल्या प्राण्याना दीपदर्शन करवून त्याचा उद्धार केल्यानंतर मग लोकांनीं मंगल स्नान करावें आणि करवावें असा परिपाठ लावून दिला आहे. नरकचतुर्दशीस पहाटे घराच्या बाहेर अगदीं घाणेरड्या ठिकाणीं देखील दीपज्योति प्रज्वालित करून ठेवण्याची चाल म्हणजे वेदमंत्रयुक्त अग्निकार्यानें, श्रीकृष्णानें केलेल्या पतितोद्धाराचें स्मारक आहे. फटाके वाजविणें, अभ्यंग स्नान करणें-करविणें, गोड गोड पक्वान्नें करून श्रीकृष्णाला नैवेद्य दाखवून इष्टमित्रांसह फराळ करणें, हा उत्सव समारंभ, पतितांचें शुद्धिकरण करून त्याना त्याचें समाजातलें स्थान फिरून मिळवून दिल्याचें द्योतक आहे.

नरकासुराच्या वधानंतर अदितीचीं कुंडलें देण्याकरिता देवलोकीं श्रीकृष्ण गेला व परत येताना हिमनग-प्रदेशातून तुळस ही दिव्य व बहुगुणी वनस्पति घेऊन आला. तुळस ह्या वनस्पतीच्या शोधानें श्रीकृष्णानें वैद्यकीय संशोधनात मोठीच भर घातली. रासायनिक मात्रा वगैरे औषधामध्यें सुवर्णाच्या बरोबरीनें तुळस ही कामगिरी करते. ताजी तुळस अत्यंत गुणदायी आहे. कार्तिक महिन्यात लावलेली तुळस उत्तम पोसते व ती एक वर्ष टवटवीत, तजेलदार आणि रसदार असते. म्हणून दरवर्षीं कार्तिक महिन्यात तुळशीचे नवीन रोप लावण्याची चाल चतुर पुरुषानीं एका धार्मिक विधींत गोंवून टाकली. त्या विधींत तुळशीच्या संशोधकाचें स्मरण जागृत राहील अशी व्यवस्था करून ठेविली आहे. प्रत्येक वर्षीं कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीकृष्णाशीं तुळशीचा विवाह केला जातो, ही गोष्ट आपणां सर्वांना माहित आहे. तुळशीच्या विवाहाचें रहस्य हें आहे. पुढें श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं तुळशीपासून सुवर्ण निर्माण करतां येतें हा शोध लाविला. गंडकी शिळेमध्यें एक प्राणी असतो, त्याला तुळशीचें खाद्य दिलें तर गंडकी शिळेपासून सुवर्ण मिळूं शकतें हा तो शोध होय. शाळि-

ाम-पंचायतन पूजा श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं प्रचारांत आणली. शाळि-
ाम ही विष्णूची, श्रीकृष्णाची मूर्ति कल्पून त्यावर विष्णुसहस्रनाम म्हणून
नेत्य सहस्र तुलसीदल वाहणाऱ्या भक्तावर लक्ष्मीकान्त प्रसन्न होतो,
सः भक्तः अचलाम् श्रियम् आप्नोति' असें त्या पूजेचे फळ आहे.
ीमदाद्यशंकराचार्यांच्या चरित्रांत ह्या गोष्टींची अधिक चर्चा करणे
पयुक्त होईल.

ह्यावेळीं यादवांच्या राज्यानें जवळ जवळ उत्कर्षाचें शिखर गाठले
ोतें. उग्रसेन हा यादवांचा सिंहासनाधिष्ठित राजा होता, पण खरा सत्ता-
ीश श्रीकृष्ण होता. आतांपर्यंत वाचलेल्या चरित्रावरून श्रीकृष्णाच्या
गचे अलौकिक गुण किती प्रभावी होते, हे आपण पाहिलें लहानपणीं
ोकुळ-वृंदावनांत मिळविलेलें अतुल शरीरसामर्थ्य, गोपाळांशीं त्याची
मळ वागणूक, सर्व प्रकारची नवीन नवीन माहिती मिळविणारी त्याची
ौकस बुद्धि, कोणत्याहि संकटाला धैर्यानें तोंड देण्याचें प्रसंगावधान,
सुर, दैत्य अशांसारख्या अनेक दुष्टांचा कधीं शक्तीनें, तर कधी
ुक्तीनें नाश करण्यांत त्यानें दाखविलेलें चातुर्य, सर्प-चमत्कार उलगड-
यांत त्याची दिसलेली शोधक बुद्धि, तितक्या लहान वयांत, गोवर्धन-याग
रण्याबद्दल नंदादिकांना त्यानें दिलेला पोक्त सल्ला, अक्रुरासारख्या द्वेष
रणाऱ्या माणसाला आपला निःसीम भक्त बनविण्यात त्यानें दाखविलेला
चतुरपणा, कंसवधाच्या प्रसंगीचे दिसून आलेलें त्याचें अप्रतिम शौर्य, आपण
ाज्याचा स्वीकार न करतां उग्रसेनाला सिंहासनावर बसविण्यांत दाख-
वेलेली दूरदृष्टि, नंदादिकांच्या पाठवणीच्या वेळीं दिसून आलेली कृत-
ता, गुरुगृहीं अल्पकाळांत साङ्गवेद, योगशास्त्र, धनुर्विद्या इत्यादि मिळवि-
यांत दिसलेली कुशाग्रबुद्धि, लहानपणीं केलेल्या गोपांच्या संघटनेप्रमाणेंच
सर्व यादवांना एकत्र आणण्यांत दाखविलेली राजकार्यपटुता, यादवांमध्यें
ुद्धशास्त्राच्या जोरावर प्रचंड सामर्थ्य उत्पन्न करून व अनेक प्रकारच्या
ात्रुनाशक युद्धसाहित्याची योग्य रचना करून जरासंधासारख्या बलाढ्य
सम्राटाचा अनेक वेळा पराभव करण्यांत दाखविलेलें युद्धनैपुण्य, काल-
यवनाशीं केलेलें गनिमी युद्ध, द्वारका नगरी बसावण्यांत दाखविलेली दूर-

दृष्टि व मुत्सद्दीपणा, रुक्मिणी-हरणाच्या वेळीं मोठमोठ्या राजे लोकांशीं धडाडीनें दिलेला सामना, स्यमंतक मण्याच्या बाबतींत दिसून आलेली निःस्पृहता व निष्कलंक चारित्र्य राखण्याकरितां केलेला अट्टाहास, पूर्व-समुद्रापासून पश्चिम-समुद्रापर्यंत व हिमनगापासून दक्षिणेस गोमंत पर्वता-पर्यंत स्वसामर्थ्याचा बसविलेला दरारा, देवेंद्रानेंहि मदतीची याचना करावी एवढें कमाविलेलें सामर्थ्य, समाजधारणा करण्याकरितां शुद्धि-करणाची कल्पना मोठमोठ्या विद्वानांना पटवून देण्यात प्रकट केलेलें धर्म-शास्त्र-नैपुण्य, वगैरे किती तरी गोष्टी पाहून श्रीकृष्णाच्या ठिकाणीं ज्ञान ऐश्वर्य, शक्ति, बल, वीर्य, तेज हे सहा गुण उत्कटत्वानें वास करीत होतें हें स्पष्ट दिसून येतें. हे सहा गुण अंगीं असणाऱ्या अलौकिक पुरुषाला साहाजिकच ईश्वरत्व प्राप्त होऊन भगवान् ही पदवी शोभून दिसते. श्रीकृष्णाला सर्व लोक आतां भगवान म्हणून संबोधूं लागले. आपणहि यापुढें नुसतें श्रीकृष्ण न म्हणता भगवान् श्रीकृष्ण असेंच म्हणूं.

मथुरा व द्वारका ह्या दोन नगरांत विस्तीर्ण अशा यादव-राज्याचा राज्यकारभार चालत असे. उग्रसेन राजा बहुतेक मथुरेंतच राहून राज्य-कारभार करी. मधून केव्हां तरी तो द्वारकेंत येऊन राही. भगवान् श्री-कृष्ण नेहमीं द्वारकेंत राहून राज्यकारभार चालविण्याच्या कामांत उग्र-सेनाला मदत करी, त्यामुळें राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें द्वारकेंतूनच हलत, असें म्हटलें तरी चालेल. भगवान् श्रीकृष्णानें आपल्या आवडीप्रमाणें द्वारकानगरीची फार सुंदर रचना केली होती. सोन्याची द्वारका म्हणून लोक तिचा उल्लेख करीत, इतकी ती वैभवानें नटली होती. द्वारका म्हणजे प्रतिवैकुंठ होतें.

अशा ह्या भू-वैकुंठांत राहून प्रचंड यादव राज्याची धुरा भगवानानें यशस्वीपणानें वाहिली. द्वारकेंत राहाणाऱ्या भगवान् कृष्णाचा गृहस्थाश्रम, गृहस्थाश्रमी लोकांना आदर्श म्हणून पुढें ठेवण्यासारखा अनुकरणीय होता. भगवान् कृष्णाची पट्टराणी रुक्मिणी असून राजकारण वगैरे गोष्टी साधण्याकरितां त्यानें आणखी सात विवाह केले होते. सत्यभामा आदि सात स्त्रियांशीं झालेले विवाह केव्हां आणि कोणत्या कारणानें करावे लागले,

तें सविस्तर वर्णन मागें येऊन गेलें आहे. रुक्मिणीच्या पोटीं श्रीकृष्णाला प्रद्युम्नादि दहा पुत्र व चारुमती ह्या नावाची एक सुंदर कन्या झाली. प्रद्युम्न तर मदनासारखा सुंदर होता असें त्याचें वर्णन आहे. सत्यभामेला सहा पुत्र व चार कन्या झाल्या. जांबवतीला सांबादि पराक्रमी चार पुत्र व दोन कन्या झाल्या. कालिंदी वगैरे इतर स्त्रियांनाहि पुत्र व कन्या झाल्या. ह्याप्रमाणें भगवंताचें मंदिर मुलाबाळांनीं नेहमीं गजबजलेलें असे. भगवंताची दिनचर्या श्रीमद्भागवतकारांनीं श्रीशुकाचार्यांच्या मुखानें सविस्तर वर्णन केली आहे. शुकाचार्य म्हणतात, " दररोज पहांट होऊन कोंबडे आरवूं लागले, मंदार वृक्षाच्या राईवरून गार वारा वाहूं लागला आणि जागे झालेले पक्षी किलबिल शब्द करूं लागले कीं श्रीकृष्ण जागृत होई. त्या वेळीं भाट पहाटेचे राग आळवून स्तुति करीत. त्या पवित्र ब्राह्ममुहूर्तावर श्रीकृष्ण शयनावरून उठे, व लगेच उदकानें हात पाय धुऊन शांत चित्तानें थोडा वेळ आत्मस्वरूपाचें ध्यान करी. नंतर शौच–मुखमार्जन विधि आटोपून निर्मळ जलांत बुडी मारून शास्त्रनियमानुसार स्नानविधि उरकीत असे. नंतर स्वच्छ धुतलेलीं वस्त्रें नेसून संध्योपासना करीत असे. श्रीकृष्ण काण्व-शाखेचा असल्यानें सूर्योदयापूर्वी अग्नीला आहुति देऊन मौनव्रतानें गायत्री मंत्राचा सहस्रजप करीत असे. त्यानंतर उगवत्या सूर्याला अर्घ्य समर्पण करून तो देव, ऋषि आणि पितर यांचें विध्युक्त तर्पण करी. लगेच देवपूजा करून वेदवेत्त्या वृद्ध ब्राह्मणांना अगत्यानें बोलावून आणून त्यांचे पूजन करी. नंतर ज्यांच्या शिंगांना सोन्याचीं टोपणें असून गळ्यांत उत्तम मण्यांच्या माळा घातल्या आहेत, ज्या स्वभावानें शांत असून पुष्कळ दूध देणाऱ्या आहेत, अशा नुकत्याच व्यालेल्या सवत्स गाई ब्राह्मणांना दान देत असे. गाईंबरोबरच वस्त्रें, हरिणाजिनें व तीळ यांचेंहि दान करी. गोप्रदानाचा हा विधि झाल्यावर कपिला गाय, ब्राह्मण, देवता, वृद्ध वडील मंडळी व गुरु यांचें दर्शन घेई. वडील मंडळींचा आशीर्वाद मिळवून तो पीतांबरादि वस्त्रें, कौस्तुभमणि आदि करून भूषणें, उत्तम प्रकारच्या माळा आणि उट्या यांनीं स्वतःला भूषित करी. नंतर तुपांत व आरशांत तो आपलें प्रतिबिंब पाहात असे. अंतःपुरांतील स्त्रिया, घरांतील

लहान-मोठीं मुलें यांची मोठ्या प्रेमळपणानें विचारपूस करून त्यांच्याशीं त्यांच्या कर्तव्याला पोषक अशा उपदेशपर गोष्टी बोलून त्यांच्यापैकीं कोणाला कांहीं वस्तु पाहिजे असतील तर त्या देऊन संतुष्ट करी. नतर घरांतील नोकर-चाकरांशीं हंसत हंसत बोलून त्यांचें कांहीं म्हणणें असेल तर तें ऐकून घेई व त्यांच्या योग्य व इष्ट मागण्या असल्यास त्या पुरवून त्या सर्वांना तो आनंदित करी. त्यानंतर आपलें दर्शन घेण्याकरिता आलेल्या नगरांतील सर्व वर्णांच्या प्रजाजनांना तो दर्शन देई. त्यांची तो स्वतःच्या मुलांप्रमाणें सर्व विचारपूस आत्मीय भावनेने व कळकळीने करीत असे. त्यांच्या गरजा, त्यांच्या उणीवा ध्यान त आणून त्या तो नाहींशा करीत असे. नंतर मित्र व मंत्रि यांच्याशीं थोडा वेळ सल्ला-मसलत होई. इतक्या गोष्टी झाल्यानंतर चार सुंदर घोडे जोडलेला उत्तम रथ दरवाज्याशीं तयार असे त्यांत सात्यकि, उद्धव यांना घेऊन तो बसे आणि यादवांच्या प्रसिद्ध दिव्य सुधर्मा-राजसभेत तो जाई. राजसभेत जाऊन श्रीकृष्ण आपल्या उच्चासनावर विराजमान झाला कीं यादवांमधील थोर थोर मंडळींनीं परिवेष्टित असलेला तो भगवान आकाशांत दिव्य ताऱ्यांच्या मध्यभागीं असलेल्या चंद्राप्रमाणें शोभून दिसे. राजसभेत नानाप्रकारच्या राजकीय कामांसंबंधी विचार होई हें राजकीय काम दोन प्रहरपर्यंत चाले. नतर श्रीकृष्ण घरीं परत येत. अतिथि, अभ्यागत, परठिकाणांहून भेटावयास आलेले आप्त-इष्ट, मित्र व घरची सर्व मंडळी यांसह आनंदानें गप्पागोष्टी करीत भोजन झाल्यानंतर थोडा वेळ विश्रांति घेऊन वेदवेत्त्या शास्त्रज्ञांच्या कडून वेद, शास्त्र, इतिहास, पुराणें यांचें घरच्या स्त्रिया व मुले यांच्यासह श्रवण करी. त्याविषयासंबंधीं थोडा वेळ द्विजगुरुयांशीं त्याची चर्चा होई. त्यानंतर व्यापारधंदा, उद्योग करणाऱ्यांच्या भेटी होत. नंतर शस्त्रास्त्रविद्या जागृत राहावी, युद्धशास्त्रांतील धनुष्य, बाण, खड्ग, गदा, अश्व, गज, रथ, वगैरेसंबंधीं सर्व प्रकारचा व्यायाम आलटून पालटून आपण स्वतः करी व पुत्र, योद्धे व सेनापति, यांच्याकडून करवी. नतर सायंकाल होतांच सायंसंध्यावंदनादि करून भोजन होई. भोजनोत्तर पुत्रकन्यांच्या बरोबर, यांच्या दिनचर्येंत घडलेल्या गोष्टींसंबंधीं प्रेमळपणें विचारपूस आणि उपदेश

वगैरे करून त्यांना निद्रासुख घेण्याला तो अनुज्ञा देत असे. नंतर कारभारी व उपाध्या यांच्या बरोबर दुसऱ्या दिवशीं कर्तव्य असणाऱ्या कार्यासंबंधीं भाषण होई. त्यानंतर शांतपणें इतर राजेलोकाकडून आलेल्या प्रतिनिधींच्या भेटी, वडील बंधु बलरामासमक्ष तो घेत असे. विग्रह, संधि इत्यादींसंबधीं बलरामाशीं विचार-विनिमय केल्यानंतर हात पाय धुऊन शुचिर्भूत होऊन तो एकाग्र चित्तानें आत्मस्वरूपाचें चिंतन करी आणि रात्रीच्या द्वितीय प्रहरात निजावयास जाई." भगवंताची ही दिनचर्या प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुषाला अत्यंत उद्बोधक आहे.

एकदां सुधर्मा-सभेंत भगवान् श्रीकृष्ण बसला असताना सभेच्या रक्षकानीं कोणीएक तेजस्वी ब्राह्मण मगधदेशाहून आल्याची वर्दी दिली. भगवंतानें त्या ब्राह्मणाला आपल्यापुढें घेऊन येण्यास सांगितलें. ब्राह्मण येताच श्रीकृष्णानें त्याला आदरानें बसावयास आसन दिलें व त्याच्या येण्याचें कारण विचारलें. ब्राह्मण म्हणाला, "भगवंता, मगध देशाच्या सम्राट् जरासंधानें पूर्वी दिग्विजय केला असता, जे राजे त्याला नम्र होऊन शरण आले नाहींत, अशा श्यायेंशीं राजाना बंदिवान करून आपल्या राजगृह नामक राजधानीजवळील गिरिव्रज नावाच्या किल्ल्यात त्यानें ठेविलें आहे. जरासंध अतिशय उन्मत्त झाला आहे. आणखी चौदा राजे मिळून राजाची शंभर संख्या झाली कीं तो लवकरच पुरुषमेध करणार असून त्या यज्ञात त्या राजाना बळि देणार आहे. दुष्ट जरासंधाचा हा भयंकर मनोदय ऐकून प्राणभयानें ते सर्व राजे दीन होऊन तुला शरण आले आहेत. जरासंधावर स्वारी करून त्यांना सोडवील असा सर्व आर्यावर्तात एकटा तूंच समर्थ आहेस, असें त्यांना वाटत आहे आणि तें खरेंहि आहे. त्या, सर्वस्वी हताश झालेल्या राजांच्या जवळ तुला निरोप पाठविण्यालाहि कांहीं साधन नाहीं. त्यांची ती दैन्यावस्था व त्यांच्यावरील तें भयंकर प्राणसंकट पाहून माझें अंतःकरण कळवळलें. ते तुला शरण आले आहेत. तूं वाचवशील तरच ते वांचतील, हें सांगण्याकरितां मी येथें धांवत आलों. द्वारकाधीशा, श्रीकृष्णा, त्या दीन राजांचे प्राण वांचव, एवढेंच तुझ्याजवळ माझें मागणें आहे." त्या निःस्पृह परोपकाररत ब्राह्मणाचें तें कळवळ्याचें भाषण ऐकून

आपण त्याला काय उत्तर द्यावें, ह्या विचारात श्रीकृष्ण पडला. त्यानें आपले सल्लागार सात्यकि व उद्धव यांकडे पाहिलें व त्यांच्याशीं तो कांहीं बोलणार तोंच दिव्य ब्रह्मवीणेचा झणत्कार सर्वांच्या कानांवर आला. अत्यंत दैदीप्यमान आणि पिंगट जटा धारण करणारा असा देवर्षि नारद, सूर्य उगवावा त्याप्रमाणें, त्या राजसभेंत प्राप्त झाला. नारदाला पाहताच कृष्णासह सर्व सभासद एकदम उठून उभे राहिले. सर्व सभासदासह त्याने नारदांना वंदन केलें. नारदांना मोठ्या आदरानें आसनावर बसवून भगवंताने त्यांची यथाविधि पूजा केली आणि गोड शब्दांनीं त्यांचें येणे कोठून झालें असे त्याना विचारिलें. नारद हंसून म्हणाले, "कृष्णा, मी इंद्रप्रस्थ नगरीहून आलो, हे ऐकून तुला आनंद होईल. तुझें आणि पांडवाचें एकमेकावरील निर्मळ प्रेम पाहून मला फार आनंद होतो. पाडवांच्या मनांत कांहींहि करावयाचें आले तरी त्यांना पाहिल्याप्रथम, कृष्णा, तुझी आठवण होते. पांडवांनीं आपल्या सामर्थ्याच्या व तुझ्या मुत्सद्दीपणाच्या जोरावर इंद्रप्रस्थाचें वैभव एवढें वाढविलें आहे कीं त्यांच्या राज्याचा विस्तार आणि त्यांची अफाट संपत्ति पाहून दुर्योधनादि सर्व कौरव आजच दिपून गेले आहेत. पांडव हे इतके बलशाली झाले आहेत कीं त्याना चक्रवर्तिपद मिळविणे ही गोष्ट सहज साध्य आहे. त्यांनीं त्याकरितां आतां विलंब न लावतां राजसूय यज्ञ करावा असें मीं त्यांना सुचविलें मात्र – 'कृष्णाला विचारिलें पाहिजे. त्याच्या अनुमती-शिवाय कोणतीहि नवीन गोष्ट करावयाची नाहीं असा आमचा निर्धार आहे.' असें चटकन् धर्मराजा म्हणाला. कृष्णा, त्यांची तुझ्यावरची निष्ठा पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगूं! कृष्णा, पाडवांनीं तुझा सल्ला विचारला तर तूं त्यांना राजसूय यज्ञ करून चक्रवर्तिपद मिळाविण्या-बद्दल सांगशील, अशी माझी खातरी आहे. पाडवांच्यासारखे धर्मशील पुरुष चक्रवर्ति-पदावर असण्यांत सर्व जगाचें हित आहे." "आणि तेवढ्याकारितां जरासंधासारख्या खलपुरुषांना सम्राट् पदावरून खालीं ओढून काढणें अवश्य आहे असेंच ना आपलें म्हणणें?" भगवंतानें मंद स्मित करीत म्हटलें, "नारदा, तुम्हांसारख्या, केवळ जगाच्या

हिताची काळजी सतत वाहणाऱ्या, दयाळु पुरुषाला असें वाटणारच. हा पाहा तुमच्यासारखाच परोपकाररत तपस्वी ब्राह्मण, मला तेंच काम सांगण्यास आला आहे.'' श्रीकृष्णाने नारदांना त्या ब्राह्मणाच्या येण्याचे कारण सांगितलें. नारदांना तें ऐकून बरें वाटलें. त्यांनीं कृष्णाला जरा एका बाजूला घेऊन, कोणाला ऐकायला जाणार नाहीं इतक्या हलक्या आवाजांत म्हटलें, '' कृष्णा, तूं राजनीतिनिपुण आहेस. तुला सांगायला नकोच, पण एक गोष्ट सुचवून ठेवावी असे वाटतें. एकट्या जरासंधाजवळ दहा अक्षौहिणी सैन्य आहे, ही गोष्ट दृष्टिआड करून चालावयाचें नाहीं. प्रत्यक्ष स्वारी करून रणकंदन माजविण्यापेक्षां कांहीं तरी युक्ति योजून हें काम साधलें पाहिजे. तू शक्ति-युक्तींचा सागर आहेस.'' याप्रकारें नारदांचे श्रीकृष्णाशीं आणखीहि पुष्कळ बोलणे झाल्यावर नारदांनीं श्रीकृष्णाचा निरोप घेतला.

'' कांहीं काळजी करूं नका. तुमच्या मुक्ततेकरितां आम्ही येत आहों.'' असें जरासंधाच्या बंदींत पडलेल्या राजांना अभय—वचन देऊन त्या ब्राह्मणालाहि भगवंताने निरोप दिला. नंतर बळराम, उग्रसेन याच्याशीं सल्लामसलत करून भगवान् श्रीकृष्णाने धर्मराजाच्या हातून राजसूय यज्ञ करविण्याचा निश्चय करून आपल्या बायकांमुलांसह राजसूय यज्ञ—समारंभाकरितां इंद्रप्रस्थास जाण्याचें ठरविलें. इतक्यात धर्मराजाचा इंद्रसेन नामक दूत भगवंताला बोलावण्याकरिता द्वारकेत येऊन दाखल झाला. जशी धर्मराजाला भेटण्याची उत्कट इच्छा भगवंताच्या मनात उत्पन्न झाली होती, तशीच धर्मराजालाहि श्रीकृष्णदर्शनाची उत्कंठा लागून राहिली होती. भगवान् श्रीकृष्ण आपल्या सर्व मंडळींसह द्वारकेहून जो निघाला तो आनर्त, सौवीर, मरु, हे देश ओलांडून आणि वाटेंत लागणारे पर्वत व नद्या उतरून, तसें कित्येक गांवें, नगरें, गौळवाडे आणि खाणींचे प्रदेश हे टाकून पुढें चालला. त्यानंतर लागणाऱ्या दृषद्वती व सरस्वती ह्याहि नद्या त्यानें ओलांडल्या, व पांचाल देश व मत्स्यदेश यांवरून इंद्रप्रस्थास येऊन पोहोंचला. तो आलेला ऐकताच राजा युधिष्ठिराला परमानंद झाला, आणि आपले भाऊ, उपाध्याय, मित्रमंडळी समागमें घेऊन तो मोठ्या

आदरानें गाण्याचा ध्वनि, वाद्याचा गजर, आणि ब्राह्मणांचा वेदघोष यांच्या कडकडाटांत श्रीकृष्णाला नगराबाहेर सामोरा आला. श्रीकृष्णाला पाहतांच पांडवांचीं हृदयें प्रेमानें उचंबळून आलीं. सर्वांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. धर्म, भीम, अर्जुन ह्यांनीं क्रमानें भगवंताला गाढ आलिंगन दिलें. नकुल–सहदेवांनीं त्याला वंदन केलें. नंतर श्रीकृष्णानें ब्राह्मणांना व वृद्ध मंडळींना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें नमस्कार केला. नंतर पडघम, वीणा, पणव, गोमुख इत्यादि वाद्यांच्या घोषांत प्रेमळ मित्रांनीं वेष्टिलेला श्रीकृष्ण शृंगारलेल्या इंद्रप्रस्थनगरात प्रवेश करता झाला. राजप्रासादापर्यंत जाईतों वाटेंत असंख्य नागरिकांनीं आपापल्या घरासमोर श्रीकृष्णाचा सत्कार अह-महमिकेनें मोठ्या थाटानें केला. राजप्रसादात पोहोंचताच श्रीकृष्णानें आपली आत्या कुंती व दुसऱ्या वडील स्त्रियां यांना नमस्कार केला. द्रौपदी व सुभद्रा यांनीं नमस्कार करताच श्रीकृष्णानें स्मित करून त्यांना आशीर्वाद दिला. नंतर द्रौपदीनें रुक्मिणी, सत्यभामा, भद्रा, जांबवती, कालिंदी, मित्रविन्दा, शैब्या, नाग्नजिती ह्या कृष्णस्त्रियांचा सत्कार केला. त्यांना वस्त्रें, माळा व इतर शृंगार अर्पण केले. कृष्णाचे पुत्र, कन्या, सुना, जावई यांचें सर्वांनीं कौतुक केलें. ह्याप्रमाणें पांडवांच्या मंदिरात जिकडे तिकडे आनंदी-आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं पांडवांसह श्रीकृष्ण सुखासनावर बसले असतां धर्मराजानें नम्रपणें राजसूय यज्ञ करण्यासंबंधीं गोष्ट काढली. त्याबरोबर श्रीकृष्ण म्हणाले, "धर्मा, राजसूय यज्ञ करण्याची कल्पना आम्हां सर्वांत पसंत आहे. तुझ्यासारख्या धर्मशील, निर्मळ अंतःकरणाच्या शूर भूपतीनें चक्रवर्ति होण्याची इच्छा करावयाची नाहीं तर कोणीं करावयाची ? शस्त्रास्त्र–विद्या-पारंगत अद्भुत पराक्रमी सिंहासारखे चार भाऊ तुझ्या पाठीशीं उभे असतांना तुला चक्रवर्ति होणें व राजसूय यज्ञ करणें मुळींच अशक्य नाहीं." धर्मराज म्हणाला, " कृष्णा, तुझ्यासारखा आमचा पाठीराखा आहे म्हणूनच आमची कोणतीहि इच्छा पुरी होणें शक्य आहे. कृष्णा, तूं आमचा सखा आहेस. सार्वभौम राजाच्याच हातून सिद्धिस जाणारा श्रेष्ठ यज्ञ, म्हणजे राजसूय यज्ञ. तो मीं करावा असें माझे सुहृद मला सांगत आहेत पण राजसूय यज्ञ करण्याला मी खरोखरीच पात्र आहें काय ? आणि

राजसूय करणें आम्हांला श्रेयस्कर आहे काय? हें तूं सांग. कित्येक विनयशील पुरुष दुसऱ्याचे दोष केव्हांहि सांगत नाहींत. कित्येक पुरुष स्वार्थासाठीं मुद्दाम प्रियच बोलत असतात; आणि कित्येक तर प्रिय बोलणें हेंच आपलें कर्तव्य समजतात; ह्यामुळें एखादें कार्य केवळ लोकमतासच अनुसरून केल्यानें तें करणाऱ्याला खरोखरीच हितप्रद होईल असें म्हणतां येत नाहीं. म्हणून भगवंता, असले हे त्रिविध हेतू एकीकडे ठेवून कामक्रोधांनीं अविकृत राहून आम्हांला निश्चित श्रेयस्कर असलेली गोष्ट सांगायला तूंच एक समर्थ आहेस."

श्रीकृष्ण म्हणाले, "धर्मा, राजसूय यज्ञ करण्यास ज्या ज्या गुणांची आवश्यकता असते, ते सर्व गुण तुझ्या ठिकाणीं आहेत. म्हणून तूं राजसूय यज्ञ करावास हें अगदीं उचित आहे. आता एका गोष्टीचा मी उल्लेख करणार आहें तिकडे अवधान दे. मगध देशचा पराक्रमी जरासंध राजा हल्लीं सार्वभौम पदावर आरूढ आहे. तो दहा अक्षौहिणी सैन्याचा अधिपति आहे. त्या सैन्याच्या जोरावर त्यानें सर्व पृथ्वी पादाक्रांत केली असून मोठमोठाल्या प्रतापशाली राजांनाहि आपलें सार्वभौमत्व कबूल करावयास लाविलें आहे. शिशुपाल, वक्रदंत, करभ, मेघवाहन, असे प्रतापशाली राजे व पश्चिमेस मुरु देशावर सत्ता चालविणारा महाबलाढ्य यवनाधिप, हे सर्व त्याचे आज्ञांकित झाले आहेत. राजा धर्मा, तुझ्या पित्याचा परमस्नेही वृद्ध भगदत्त राजा, चेदि देशांतील प्रसिद्ध पौंड्रक राजा, माझा सासरा भीष्मक हे सुद्धां त्याच्या बाजूला आहेत. जरासंधाचा जांवई कंस, ह्याचा मीं नाश केला म्हणून क्रुद्ध होऊन त्यानें आमच्यावर सतरा वेळां स्वारी केली. मीं व बलराम ह्यांच्या देखरेखेखालीं तयार झालेल्या प्रचंड यादवसेनेनें त्याला सतरा वेळां तोंड दिलें. कधीं समोरासमोर तर कधीं गनिमी काव्यानें लढून आम्हीं पराभव त्याच्या गळीं बांधला. पण त्याच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांना कंटाळून आम्हां प्रमुख यादववीरांना मथुरा सोडून लांब द्वारकेला जाऊन राहावें लागलें. असा हा महापराक्रमी राजा जरासंध जिवंत आहे, तोंपर्यंत तुझा राजसूय यज्ञ सिद्धीस जाईल, असें मला वाटत नाहीं. राजा धर्मा, त्या जरासंधानें आतां

एक महाभयंकर दुष्ट कृत्य करण्याचें मनात आणिलें आहे. त्याला शरण न गेलेले दयाऐशीं राजे त्यानें आपल्या राजधानीजवळ गिरिव्रज नामक किल्ल्यात बंदिवान करुन ठेविले आहेत. आणखी चौदा राजे त्याच्या बंदींत सांपडले कीं त्या शंभर राजाना, तो पुरुषमेध नांवाचा यज्ञ करून त्यांत बळी देणार आहे. म्हणून धर्मा, माझा विचार असा आहे. भीम, अर्जुन आणि मी, याना तूं त्याच्याबरोबर युद्ध करण्याची परवानगी दे. युद्धात आम्ही पतन पावलों तर आम्हाला उत्तम लोकाची प्राप्ति होईल. आणि आम्हीं जिंकलें तर त्या सर्व राजाचा जीव वाचेल व तुला सार्वभौमत्व प्राप्त होईल आणि तुझा राजसूय यज्ञ तडीस जाईल." श्रीकृष्णाचें भाषण ऐकून धर्मराज म्हणाला, "कृष्णा, सार्वभौमपदाची इच्छा धरून केवळ स्वार्थाकरिता मी तुम्हास जरासंधाशीं युद्ध करण्यास पाठवीन असे तुम्हांस वाटतें तरी कसे ! भीम आणि अर्जुन हे माझे दोन नेत्र आहेत आणि श्रीकृष्णा, तूं तर माझें मनच आहेस. मन-नेत्र-विरहित मी झाल्यास माझ्या जीविताची अवस्था काय होईल ? जरासंधाचें तें अगाध व दुर्धर सैन्य व त्याचे साहाय्यकर्ते पराक्रमी राजे याच्याशीं गाठ पडल्यावर प्रत्यक्ष यमालाहि जय मिळणें कठिण आहे. हा महान् अनर्थ आपण होऊन अंगावर ओढवून घेण्यापेक्षां मी राजसूय यज्ञाचा विचारच सोडून देतों. आणि आता ह्यापुढें माझ्या हातून अधिक काही होईल असें मला वाटत नसल्यानें राज्यावर भीमाला बसवून मीं माझे सर्व प्रापंचिक व्यवसाय थांबवून परमार्थ साधण्याच्या मार्गास लावावे असें मला वाटतें."

ह्याप्रमाणें युधिष्ठिराचें भाषण ऐकून अर्जुनानें आपलें तें श्रेष्ठ गांडीव धनुष्य, अक्षय्य बाण-भाते, रथ, ध्वज, सभा व श्रीकृष्ण ह्यांकडे अवलोकन केलें आणि तो युधिष्ठिराला म्हणाला, "हे वीरपुंगवा, असें विनाकारण हताश होणें तुला उचित नाहीं. धनुष्य, शस्त्रबाण, उत्साह, सैन्य, कार्याकार्यविवेक, यश व प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण हीं सर्व दुःप्राप्य असताहि आपल्या इच्छेनुरूप आपल्याला प्राप्त झालीं आहेत. सत्कुलामध्यें जन्म मिळणें ही गोष्ट अत्यंत प्रशंसनीय आहे, असें विद्वान् लोक प्रतिपादितात; पण माझ्या मतानें उत्साहासारखी एकहि अन्य वस्तु प्रसंशनीय नाहीं; ह्यासाठीं

उत्साह हाच मला अतिशय आवडतो. उत्साहहीन पुरुष उत्तम कुलांत जन्माला आला असला तरी त्याच्या हातून काय होणार आहे ? महाराज, ज्या पुरुषाचा कल सदासर्वकाळ शत्रूंना जिंकण्याकडे असतो, तोच खरा खरा क्षत्रिय समजावा. बाकीचे सगळे गुण विद्यमान आहेत पण त्याबरोबर उत्साह मात्र नाहीं, तर त्या गुणाचा काहीं उपयोग नाहीं. इतर सर्व गुण उत्साही, पराक्रमी पुरुषाचें तेज वाढवितात. निरुत्साही पुरुषाला त्या गुणाचा कांहीं उपयोग नाहीं. जयप्राप्तीचीं मुख्य कारणें निर्धाराचा प्रयत्न व दैवाची अनुकूलता हीं आहेत. दैन्य व मोह ह्या दोहोंच्या योगानें बलवानाला अपजय येतो. प्रस्तुतकालीं राजसूय यज्ञाकरितां जरासंधाचा वध व त्यानें कोंडलेल्या राजाचें संरक्षण हीं जर आम्हाला करितां आलीं तर ह्याहून दुसरें तें कोणतें महत्कार्य आहे बरें ! राजेश्वरा, आपण कार्याला आरंभच केला नाहीं, तर आपल्याजवळ जयसाधने नाहींत हें निश्चितच ठरेल. परंतु वास्तविकपणें आपणापाशीं तर जयसाधने भरपूर आहेत; तेव्हां आपण शत्रुनाशाचा प्रयत्न करण्यास लागावें हेंच योग्य होय. राजा, गाडीवासारखें धनुष्य, भीमदादाचें बल व श्रीकृष्णासारखा मंत्री असल्यावर आपणास कोणतेंहि कार्य अवघड नाहीं. साम्राज्य मिळविणें शक्य असल्यामुळें आपण शत्रूंशीं युद्ध करावयास प्रवृत्त व्हावें, हेंच अवश्य होय. सर्वसंगपरित्याग करून काषायवस्त्रें धारण करण्याची पाळी आल्यास तीं पुढेहि धारण करतां येतील." अर्जुनाचे बोलणें संपतांच भीम म्हणाला, "राजा, कोणत्याहि कार्यास प्रवृत्त न होणारा राजा वारुळाप्रमाणें नाश पावतो व बलवानाचा आश्रय करून राहणारा निरुत्साही राजा प्रयत्न करावयाचा सोडून देईल तर तोहि तसाच अस्तंगत होतो. राजा, श्रीकृष्णाजवळ राजनीति, माझ्या अंगीं बळ व धनंजयाच्या ठिकाणीं विजयश्री अशीं तीन दिव्य साधनें आपणापाशीं आहेत. म्हणून आम्हांस आज्ञा दे. तीन अग्नि जसे इष्टिरूप कार्य सिद्धीस नेतात, तसे आम्ही तिघे जरासंध-हननरूपी कार्य सिद्धीस नेऊं."

भगवान् म्हणाले, "राजा धर्मा, जरासंधाच्या सैन्यबळाला तूं भीत असशील तर मी तें सैन्यबळ युक्तीनें बाजूला सारणार आहें हें निश्चित

समज. मला राजनीति उत्तम अवगत आहे, असें तुम्ही म्हणतां आणि ती गोष्ट खरी आहे असें तुमच्याहि अनुभावाला येईल. राजा, साम्राज्याचें लक्षण मुख्यतः पांच प्रकारचें आहे. ( १ ) निग्रह करण्यास योग्य असे जे शत्रु असतील त्यांस जिंकून वश करून घेणें, ( २ ) प्रजेचें उत्तम पालन करणें. ( ३ ) तपश्चर्यादिक धार्मिक कृत्यें आचरणे. ( ४ ) राष्ट्रांतील नीतिमत्ता वाढविणें. ( ५ ) अर्थवृद्धि घडवून आणणें. युधिष्ठिरा, ह्या पांचहि लक्षणांनीं युक्त असें सार्वभौमपद तुला मिळवावयाचे आहे. जरासंधाला ह्या पांच गोष्टींपैकी एकहि गोष्ट साधली नाहीं. त्यानें शत्रूंना युद्धांत जिंकलें पण त्याला त्याना वश करिता आलें नाहीं. उलट मूर्खपणानें तो त्यापैकीं कांहीं राजांचे पुरुषमेधांत बळी देणार आहे. त्यामुळे त्याचे शत्रु वाढतच आहेत. त्याची प्रजाहि त्याच्या उन्मत्तपणामुळें त्याच्यावर संतुष्ट नाहीं. पुरुषमेधासारखा अघोर विधि करून त्यानें आजपर्यंत केलेल्या तपश्चर्यादि धार्मिक कृत्यांवर बोळा फिरविण्याच्या तो विचारांत आहे. दुसऱ्या राजांच्या संपत्तीचा बळजबरीनें अपहार करण्याचें कांम त्यानें स्वतःच चालू ठेविलें असल्यानें, त्याचे अनुकरण करून अमात्यादि सर्व लोक राष्ट्रांत अनीतिमत्ताच वाढवीत आहेत. परमुलुखावर सतत स्वाऱ्याच करण्याचें त्यानें धोरण ठेविल्यामुळें, स्वतःच्या राष्ट्राची अर्थाभिवृद्धि करण्यास त्याला फुरसतच कोठें आहे ? अशाप्रकारें सर्व तऱ्हेनें सार्वभौमपदाला जरासंध नालायक ठरल्यामुळें, राजा धर्मा, त्याचा नाश करण्याला प्रस्तुतचा काल अगदीं योग्य आहे. त्याचें सैन्यबळ अगाध असल्यानें युद्धांत त्याचा नाश करणें अशक्य आहे हें मी जाणतों. म्हणून त्याच्या उन्मत्त दुराभिमानाला युक्तीनें डिंवचून मी त्याला द्वंद्वयुद्धांत ओढणार आहें. भीम, अर्जुन व मी अशा तिघांनीं त्याला आमच्यापैकीं कोणाशींहि द्वंद्वयुद्ध करण्याबद्दल आव्हान दिलें तर बाहुबलानें चढून गेलेल्या त्या जरासंधाला माझ्याशीं वा अर्जुनाशीं द्वंद्वयुद्ध करण्यांत अपमान वाटेल व भीमाशींच द्वंद्वयुद्ध करण्याच्या हट्टाला पेटून तो आपला नाश करून घेईल, असाच मी त्याला तीक्ष्ण शब्दानें डिंवचीन. महाबाहु व महाबलवान भीमसेन जरासंधाचा खचित नाश करील. राजा

धर्मा, जर तूं माझें हृदय जाणत असशील आणि माझ्यावर तुझा विश्वास असेल तर भीम व अर्जुन याना माझ्याबरोबर दे. आम्ही तिघे जरासंधाला जिंकून येतों." युधिष्ठिर म्हणाला, "देवा, तुझें म्हणणें अगदीं योग्य व सयुक्तिक आहे. तूं पुढाकार घेतल्यावर विजयश्री आमच्याकडेच वळणार अशी आमची खात्री आहे. भीमार्जुनांनीं तुझ्या अनुरोधानें वागावें. तुझें दूरवरचें धोरण, अर्जुनाची जयशालिता, व भीमसेनाचें अगाध बळ ह्या सर्वांचा एका काळीं संयोग होऊन आमचे मनोरथ सिद्धीस जातील."

ह्याप्रमाणें युधिष्ठिराचें भापण श्रवण करून ते तिघे महाबलाढ्य भ्राते म्हणजे, श्रीकृष्ण व भीमार्जुन, मगध देशास जाण्यासाठीं निघाले. निघताना त्यानीं मृगचर्म, दंड, कमडलु, शुभ्र वस्त्रे, माळा इत्यादि धारण करून ब्रह्मनिष्ठ स्नातक ब्राह्मणाचा वेष घेतला. ते कुरु देशाहून निघाले ते कुरु जागल देशातून रमणीय अशा पद्मसरोवराप्रत गेले. नंतर त्यांनीं कालकूट पर्वत ओलाडला पुढें मार्गात गंडकी, सदानीरा, शरयू ह्या नद्या लागल्या. पुढें ते कोसल देशांत शिरले. तो देश आक्रमण करून ते मिथिला व माला देशात गेले. पुढें त्यानीं चर्मण्वती व गंगा नदी उतरून पूर्व दिशा धरली. लवकरच ते मगध देशास पोहोंचले. त्या देशात प्रवेश केल्यावर त्याना पुढें गोरथ पर्वत लागला. त्या पर्वतावर चढताच मगध देशाची राजधानी राजगृह तथा गिरिव्रज नगर त्याच्या दृष्टीस पडलें. ते तिघे गिरिव्रज नगरींत प्रवेश करण्यासाठीं पुढें चालूं लागले व लवकरच त्या नगरीसमीप प्राप्त झाले. त्या नगरीच्या सभोंवतीं मोठ्या पर्वताचा वेढा असल्यामुळें ती दुर्गम होती. ते नगरीच्या समीप आल्यावर पर्वतासारख्या उंच बुरुजाजवळील नगरद्वार त्यानीं टाकलें; व मगध देशांतील लोकांना अत्यंत पूज्य व प्रिय अशा चैत्यक पर्वताजवळ गेले. ह्या चैत्यक पर्वतावरील, बैलाच्या आकाराच्या एका मासाहारी दैत्याला बृहद्रथ राजानें (जरासंधाच्या बापानें) मारून त्याच्या कातड्याच्या तीन नौबती केल्या होत्या. त्या नौबती तयार करण्यांत अशी एक गोष्ट साधली होती कीं त्या एकदां वाजविल्या असतां एकसारखा आठ दिवस त्यांचा शब्द चालू राही. त्या नौबती चैत्यक पर्वताच्या बाजूच्या नगरद्वारावर ठेविल्या होत्या आणि

त्या तेथें नित्य वाजत असत. चैत्यक पर्वतावरून ते भ्राते त्या नगरद्वारावर गेले व तेथें ठेविलेल्या नौबती त्यांनीं फोडून टाकिल्या; त्या वेळीं नगर-रक्षकांनीं त्यांच्यावर हल्ला केला पण त्या रक्षकाना आपल्या बाहुबलाने लोळवून ते तडक राजप्रासादांत गेले. त्यावेळी करकरीत तिन्ही-सांज झाली होती. त्या तीन ब्राह्मणांना पाहातांच जरासंधाने त्यांना उत्थापन दिलें, आणि त्यांची आता तो अर्घ्य-पाद्यादिकानी पूजा करणार तोंच श्रीकृष्ण एकदम त्याला म्हणाला, "राजा, हे दोघे अनुष्ठान करीत असल्यामुळें मध्यरात्रीच्यापूर्वी त्यांना बोलावयाचें नाहीं. मध्यरात्र उलटून जातांच ते तुझ्याशीं भाषण करूं शकतील. त्यावेळींच तूं आमची पूजा वगैरे काय करावयाची असेल ती कर. तूर्त आम्ही तोंपर्यंत कोठें राहावें तें सांग." जरा-संधानें त्याना यज्ञशाळेत राहावयास सांगितलें व तो आपल्या महालांत निघून गेला. मध्यरात्र उलटून जातांच जरासंधराजा यज्ञशाळेंत गेला. राजाला पाहातांच ते तिघे उभे राहिले व 'राजा, तुझें कल्याण होवो.' असें म्हणाले. राजानें त्यांच्याकडे निरखून पाहून त्यांना बसा म्हणून सागि-तलें. त्यानें आपल्याबरोबर अर्घ्य-पाद्यादि पूजासाहित्य आणले होते. त्याची पूजा घेण्याचें त्या तिघां ब्राह्मणांनीं एकदम नाकारलें. तेव्हा राजा म्हणाला, "तुम्हांला पाहाताच मला संशय आला होता, आता माझी खात्रीच झाली. तुम्ही खरे ब्राह्मण नसून क्षत्रिय आहात व हें तुम्हीं ब्राह्म-णाचें सोंग आणलें आहे. तुमच्या दंडावर धनुष्याच्या दोरीच्या खुणा उमटलेल्या आहेत. तुम्ही माझ्या नगरांत भलत्याच मार्गानें प्रवेश केलात. माझी पूजा स्वीकारण्याची तुम्हांला लाज वाटत आहे. सांगा, तुम्ही खरे कोण आहांत? तुम्ही स्नातक ब्राह्मणांचा वेष घेतला आहे पण स्नातकव्रत-धारी ब्राह्मण समावर्तनादि कारणांवाचून गंधपुष्पें, माला वगैरे बाह्यालंकार धारण करीत नाहींत हें तुम्हाला माहित नाहींसें दिसतें, म्हणून तुमचें हें सोंग चटकन् उघडकीला आलें. बोला, तुम्ही खरे कोण आहांत?"

श्रीकृष्ण गंभीर वाणीनें म्हणाला, "राजा, आम्ही खरोखरच स्नातक ब्राह्मण म्हणजे स्नातकव्रतानें ब्रह्मचिंतन करणारे पुरुष आहों. ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य ह्या तिघांसहि स्नातकव्रताचें प्रतिपालन करण्याचा

अधिकार आहे. क्षत्रिय स्नातकानें पुष्पमाला धारण कराव्यात असा धर्मच आहे. आमचें बाहुबल तुला पाहावयाचें असल्यास तुझी इच्छा आज पूर्ण होईल. मित्रगृहीं योग्य मार्गानें, व शत्रुगृहीं आडमार्गांनें प्रवेश करावा ही रीतच आहे. आम्ही तुझ्या घरीं भलत्या मार्गाने का आलों हें निराळे सांगण्याचें कारण नाहीं." जरासंध म्हणाला, "तुम्ही माझे वैरी आहात असे सागतां. मीं तर तुमच्याशी कधी वैर केलेलें मला आठवत नाहीं." श्रीकृष्ण म्हणाला, "तूं आमचें काहीं अहित केल्यानें आमचा वैरी झाला आहेस असें आम्ही म्हणतच नाही. खरा क्षत्रिय हा धर्मरक्षक असतो. तूं अधर्माचरणाने आम्हा अस्सल क्षत्रियांचें वैर संपादन केलें आहेस. जरासंधा, क्षत्रिय राजाना रुद्र देवतेला बळी देण्याचे अघोर कृत्य करून सर्व रणशूर क्षत्रिय जातींना काळिमा लावण्याचे तूं मनात आणलें आहेस. ह्या भयकर अधर्माचरणाबद्दल तुला आम्ही आमच्या बाहुबलाने शिक्षा करण्याकरितां ह्या ठिकाणीं आलों आहों. तूं आपल्या अवाढव्य सेनेच्या जोरावर अनेक दुष्कृत्यें आजपर्यंत केली आहेस. तुला आम्ही आज द्वंद्वयुद्धाचें आव्हान देण्याकरितां आलो आहों. मल्लयुद्धात आपण अजिंक्य आहों अशी तू फुशारकी मारताना अनेकांनी ऐकलें आहे. आज तुझा तो गर्व झाडून टाकून अवाढव्य सेनेच्या जोरावर बंदींत टाकलेल्या राजाना सोडविण्याकरितां आम्ही आलो आहों. आमच्यापैकीं कोणा पाहिजे त्याच्याशीं तूं द्वंद्वयुद्ध कर. आम्ही कोणी सामान्य आहों असें तूं समजूं नकोस. हे दोघे पराक्रमी पंडुराजाचे पुत्र महाबलाढ्य भीमार्जुन आहेत व मी त्यांचा मामेभाऊ शूर-कुलोत्पन्न वसुदेवपुत्र कृष्ण आहें." हें ऐकताच जरासंध उसळून म्हणाला, "तूं कृष्ण काय! मला शंका आलीच होती. शूरकुलोत्पन्न पण माझ्या भीतीनें द्वारकेस पळून गेलेला भेकड कृष्ण तूं! मला द्वंद्वयुद्धाचे आव्हान देतोस? शरम वाटली पाहिजे तुला असें करतांना! कोल्ह्यानें सिंहाला युद्धाचें आव्हान देण्यासारखाच प्रकार हा! हा अर्जुन, कुंतिभोजाच्या कन्येचा कोंवळा पोर, माझ्या फुंकराबरोबर उडून जाईल. हा माझ्यापुढें दंड थोपटून उभा राहणार ही तर गोष्ट अगदींच हास्यास्पद आहे. हा भीम माझ्यापुढें कांहीं वेळ टिकाव

धरूं शकेल असा आहे. द्वंद्वयुद्धच खेळायचें झालें तर ह्याच्याशीं खेळण्यात मला कमीपणा तरी वाटणार नाहीं. पण ब्राह्मणवेष घेऊन आलेले भ्याड तुम्ही. माझ्या क्रोधाचा पारा चढला नाहीं तोंपर्यंत जीव घेऊन पळा. जगात तुम्हाला आणखी कांहीं दिवस काढावयाचे असतील तर येथें उभे राहण्याचा वेडेपणा करूं नका." हें ऐकून कृष्ण म्हणाला, "ह्या पोकळ दिमाखाच्या गोष्टी ऐकून घेण्याकरता आम्ही आलों नाहीं. नुसत्या दिमाखाच्या गोष्टी आम्हांला भेडसावतील व तुझा जीव वाचवतील असें समजूं नकोस. सिंहाचा आव आणणाऱ्या तुझ्यासारख्या क्षुद्र बुद्धीच्या बुढ्या कोल्ह्याला ठार मारण्याचाच आमचा इरादा आहे असें नाहीं. तूं बंदींत टाकलेल्या राजांना सन्मानानें मुक्त करून त्यांचीं राज्यें त्यांना परत कर, आणि आपला जीव वाचव. त्या गोष्टीला आमची ना नाहीं. धर्मरक्षक क्षत्रिय ह्या नात्यानें आम्ही येथें आलों आहों." जरासंध यावर संतापून म्हणाला, "मग हा कपटी ब्राह्मणवेष कशाकरिता घेतलात? गवळ्याचा पोर म्हणून तुझ्या बापानें तुला गोकुळांत गवळ्याकडून वाढविला म्हणून तं कंसाच्या हातून वांचलास. माझ्या पुढून तर तूं जीव घेऊन पळूनच गेलास. वाचाळा कृष्णा, तुला मी तुच्छ समजतों. अर्जुनाला—कुंतीच्या ह्या कोंवळ्या पोराला—मी जीवदान देतों. चल भीमा, माझ्यापुढें दंड थोपटून तूं उभा राहा. तुझा नकशा मी हा हा म्हणता उतरवतों." जरासंधाचें एवढें भाषण ऐकतांच भीमानें ब्राह्मण वेष फेकून दिला व लंगोट कसलेला, बलभीम रुद्राचा अवतारच कीं काय असा तो दंड थोपटून जरासंधापुढें उभा राहिला. ते दोघे वीर द्वंद्वाला तयार होताच जरासंधाच्या पुरोहितानें, क्षत्रियधर्मास अनुसरून, युद्धापूर्वीचें स्वस्ति-पुण्याहवाचन करून त्याला युद्धास आज्ञा दिली. श्रीकृष्णानें भीमाला स्वस्तिवाचन वगैरे करून युद्धाला सुरवात करण्यास सांगितलें.

ह्या प्रसिद्ध ऐतिहासिक द्वंद्वयुद्धांतील योद्ध्यांचीं वयें ध्यानांत ठेविण्यासारखीं आहेत. भीमाचें वय पन्नास असून जरासंध हा ऐशीं वर्षांचा तरुण होता! हें द्वंद्वयुद्ध कार्तिक शुद्ध प्रतिपदेस सुरू झालें व तें अविश्रांतपणें त्रयोदशीपर्यंत चाललें. पहिले कांहीं दिवस बाहुयुद्धांतील मर्यादा संभाळून

दोघेहि मल्ल युद्ध करीत होते. पण नंतर एकमेकांचा प्राण घेण्याच्या इराद्यानें वाटेल तशा हुलकावण्या, वाटेल त्या ठिकाणीं मुष्टिप्रहार, हातपाय, मान मुरगळण्यासारखे प्रकार सुरू होऊन दोघांनींहि युद्धमर्यादा सोडली. चतुर्दशीस रात्रीं जरासंध थकला, त्याला भयंकर ग्लानि येऊन तो माघार घेण्याच्या बेतात आला. जरासंधाची ती अवस्था पाहून श्रीकृष्णानें पर्यायानें सुचविण्याकरिता भीमाला म्हटलें, "भीमा, ग्लानि येऊन खालीं पडणाऱ्या शत्रूचे आता तूं अधिक हाल करूं नकोस. आतां कालावधि न करिता त्याच्या जीवितयात्रेतून त्याला सोडीव. हाच काल युद्ध संपविण्याला योग्य आहे." असे म्हणून त्यानें भीमाला एकप्रकारची खूण केली. त्याबरोबर भीमानें सर्व अवसान एकवटून, खालीं पडणाऱ्या जरासंधाचे पाय धरून त्याला गरगर फिरवून ताडकन खालीं आपटलें व त्याच्या एका पायावर आपला पाय ठेवून दुसरी तंगडी धरून अशी वर ओढली कीं त्याच्या शरीराच्या दोन चिरफाळ्या झाल्या. भीमाचें तें भयंकर कृत्य पाहून हजारों प्रेक्षकांच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला. जरासंधाचा वध केल्यानंतर भीमाच्या तोंडाकडे पाहाण्याचीहि कोणाची छाती होईना. आतां हा खवळलेला काळ व त्याच्याजवळ उभे असलेले कृतांतासारखे कृष्णार्जुन आणखी कोणाची वाट लावतात कोण जाणे, असें वाटून दुर्जनांनीं तेथून पलायन आरंभिलें. जरासंधाच्या त्या भग्नदेहाकडे त्याचा पुत्र सहदेव दुःखानें पाहात उभा राहिला. श्रीकृष्णानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून व ममताळूपणानें त्याच्याशीं बोलून त्याला अभय दिलें. नंतर जरासंधाचा रथ जोडवून त्या रथात ते त्रिवर्ग बसले, आणि बंदिवान केलेल्या राजांना सोडविण्याकरितां ते गेले. बंदिवान राजांना सोडवून त्यांच्यासह ते गिरिव्रजाबाहेरील सपाट प्रदेशावर येऊन उभे राहिले. तेथें गिरिव्रजांतील प्रमुख ब्राह्मण व जरासंधाचे दरबारांतील मोठमोठे मुत्सद्दी व योद्धे यांनीं कृष्ण-भीमार्जुनांची पूजा केली. सर्व राजांनींहि त्यांची पूजा करून "आम्ही तुमचे दास आहोंत. आम्हांला कांहीं आज्ञा करावी." अशी विनंति केली. "धर्मशील धर्मराजाला तुम्ही साम्राज्यपद मिळविण्याच्या कामीं मनापासून साहाय्य करा." एवढेंच श्रीकृष्णानें त्याना

सांगितलें. इतक्यांत जरासंधाच्या देहाची सर्व शास्त्रोक्त व्यवस्था करून जरासंधपुत्र सहदेव, पुरोहित, अमात्य व स्वजन ह्यांसह तेथें आला. त्यानें त्या त्रिवर्गाची पूजा करून त्यानें पुष्कळ बहुमोल रत्नें श्रीकृष्णापुढे ठेविलीं, आणि हात जोडून तो उभा राहिला. श्रीकृष्णानें सहदेवास तेथल्या तेथेंच मगध देशाचा अधिपति म्हणून राज्याभिषेक करविला, आणि सहदेवाची आणि भीमार्जुनांची मैत्री करून दिली. नतर सहदेवानें फारच आग्रह केल्यावरून त्यांनीं त्या रत्नांचा स्वीकार केला आणि सहदेवाचा निरोप घेऊन ते त्रिवर्ग त्या सर्व राजाच्यासह इंद्रप्रस्थास आले. विजयी त्रिवर्गाचें व त्या राजाचें धर्मराजानें अपूर्व स्वागत केलें. नंतर त्या सर्व राजाच्या भेटी घेऊन धर्मराजानें त्याचा यथोचित सत्कार केला. त्यानें त्याना कांहीं दिवस इंद्रप्रस्थ नगरींत ठेवून घेतलें व नंतर त्यांना आपापल्या देशीं जाण्यास निरोप दिला. नंतर दिग्विजय करण्याकरितां पांडवांना अनुज्ञा देऊन भगवान श्रीकृष्ण राजसूय यज्ञास येण्याचें कबूल करून आपल्या मंडळींसह द्वारकेस जाण्यास निघाले. धर्मराजानें श्रीकृष्णास निरोप देतांना गाढ आलिंगन दिलें व पुन: परत येण्याबद्दल त्याला आग्रहानें सांगितलें. सर्व पांडवानीं श्रीकृष्णास प्रदक्षिणा घालून मोठ्या प्रेमानें वंदन केले आणि श्रीकृष्णाची स्वारी द्वारकेच्या मार्गास लागली.

द्वारकेंत गेल्यावर भगवंताचा द्वारकावासी जनांनीं अपूर्व सत्कार केला. जरासंधाचा वध झाल्याचें ऐकून पुंड्रदेशाचा राजा पौंड्रक वासुदेव संतापला. त्यानें श्रीकृष्णास युद्धाचें आव्हान दिलें. तो सैन्य घेऊन द्वारकेवर चाल करण्याकरिता निघाला. श्रीकृष्णहि यादव सैन्यासह त्याच्याशीं युद्ध करण्याकरितां निघाला. दोन्ही सैन्यांची गाठ काशीजवळ झाली. काशीच्या राजानें पौंड्रक वासुदेवास मदत केली. त्यावेळीं घनघोर युद्ध झालें, त्यांत पौंड्रक वासुदेव व काशीचा राजा हे दोघे मारले गेले. याप्रमाणें विजय मिळवून यादवसैन्यासह श्रीकृष्ण द्वारकेस आला.

जरासंधाचा वध करून त्याचें साम्राज्य संपुष्टांत आणल्यानें पांडवांना दिग्विजय करणें सुलभ झालें. धर्मराजाची आज्ञा घेऊन भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे चार भाऊ चार दिशांना दिग्विजयार्थ निघाले. भीमानें

पूर्व दिशेच्या सर्व राजांना जिंकून त्यांच्याकडून करभार घेतला. सहदेवानें दक्षिण दिशेकडील राजाच्याकडून करभार घेऊन त्यांना धर्मराजाचें सार्वभौमत्व मान्य करायला लाविलें. नकुलानें पश्चिम दिशा जिंकली आणि गांडीवधारी महाधनुर्धर अर्जुनानें उत्तर दिशेस पांडवांचें आधिपत्य प्रस्थापित केलें. ह्याप्रमाणें त्या चार बंधूंनीं दिग्विजय करून विपुल संपत्ति इंद्रप्रस्थास आणली, आणि पृथ्वीवरील सर्व राजांकडून युधिष्ठिराचें सार्वभौमत्व मान्य करविलें. धर्मराजा आतां अतुल वैभवानें शोभूं लागला. धर्मराजानें राज्यकारभार अगदीं धर्मशास्त्राप्रमाणें चालविला. तो आपल्या प्रजेपासून शास्त्रात सांगितल्याप्रमाणें कर घेई. गोरक्षण, कृषिकर्म, व्यापार इत्यादि सर्व व्यवसाय आपल्या राज्य त नीट चालले आहेत कीं नाहीं हें तो वारंवार पाही. युधिष्ठिराच्या राज्यांत सत्याचरणाचा मोठा गौरव केला जाई. मांडलिक राजांशीं तो इतक्या सरळपणाने वागे व त्यांचें हित करण्यांत तो इतका दक्ष असे, कीं सर्व राजे त्याला आपला सुहृद् समजत; व त्याच्याबद्दल मनात अत्यंत आदरभाव बाळगीत. धर्मराजाचें अनुकरण करून सर्व मांडलिक राजे आपापल्या राज्याचा कारभार दक्षतेनें चालवीत व परस्परांशीं स्नेहभावानें वागत. त्यामुळे युद्धादिकाच्या योगें प्रजांचा नाश होऊन उद्भवणारी राष्ट्रीय आपत्ति अजिबात नाहीशी झाली. युधिष्ठिराच्या उत्कृष्ट राज्यव्यवस्थेमुळे त्याच्या साम्राज्यांत सर्वत्र सुबत्ता होऊन प्रजाजन निर्भयपणें आपापल्या कामांत निमग्न राहूं लागले. राज्यांतले सर्व विद्वान व धार्मिक लोक, तसेंच सर्व आप्तसुहृद् अशा धर्मराजाला राजसूय यज्ञ करण्याला सांगूं लागले. परम सुहृद् अशा श्रीकृष्णाकडे दूत पाठवून त्याची संमति मिळतांच धर्मराजानें राजसूय यज्ञ करण्याचा निश्चय केला. धर्मराजाजवळ धन, संपत्ति, धान्यादिकांचा संग्रह, वस्त्रादिकांचा पुरवठा व इतर अनेक वस्तूंची इतकी समृद्धि झाली होती, की राजसूय यज्ञासारखा सर्वश्रेष्ठ यज्ञ केला तरच त्या सर्व साधन-संपत्तीचा योग्य उपयोग होईल असें वाटूं लागलें होतें. त्यानें राजसूय यज्ञाचें पहिलें निमंत्रण भगवान् द्वारकाधीशाला पाठविलें. निमंत्रण पोहोंचतांच द्वारकेच्या संरक्षणाची सर्व व्यवस्था करून भगवंताची स्वारी सहकुटुंब यज्ञ समारंभा-

करितां इंद्रप्रस्थास दाखल झाली. भगवान् श्रीकृष्ण म्हणजे प्रत्यक्ष उत्सवमूर्तिच ! उत्सवमूर्ति हजर होतांच यज्ञसमारंभाच्या तयारीचीं चक्रें जोरानें फिरूं लागलीं. धौम्य गुरूंनीं यज्ञासाठीं लागणारी सामुग्री आणायला सांगितलें. त्यांप्रमाणें सहदेवानें सर्व सामग्री तयार करतांच कृष्णद्वैपायन, व्यासादि सर्व यज्ञकोविदांना धौम्यांनीं बोलावून आणिलें. कृष्णद्वैपायनांनीं त्या यज्ञांत स्वतः ब्रह्मत्व स्वीकारिलें. धनंजय गोत्रांतील विप्रोत्तम मुनि सुसाम, हे उद्गाते झाले. वेदवेदाङ्ग-पारग याज्ञवल्क्य ऋषि मुख्य अध्वर्यु झाले. धौम्य व पैल यांनीं होतृकर्म पत्करलें, आणि ह्या सर्वांचे वेदवेदाङ्गनिपुण शिष्य व पुत्र हे होत्रग झाले. नंतर त्या सर्व ब्रह्मवर्योनीं पुण्याहवाचन करून यज्ञ-कर्माचा संकल्प केला, आणि यज्ञशालेकरितां उत्कृष्ट भूमीचें यथाशास्त्र पूजन केलें. पुढें शिल्पी लोकांना आज्ञा झाल्यावर त्यांनीं देवांच्या मंदिराप्रमाणें विशाल अशी यज्ञशाला, पत्नीशाला आदि करून गृहें बांधलीं. नंतर यज्ञाकरितां अनेक देशांहून येणाऱ्या, सर्व विद्यांत निष्णात व वेदवेदाङ्गांत प्रवीण अशा सहस्रावधि ब्राह्मणांना राहण्याकरितां मंदिरें बांधण्यांत आलीं. तीं सर्व गृहें, विपुल अन्नाच्छादनांनीं संपन्न करण्यांत आलीं. यज्ञसमारंभाकरितां येणाऱ्या राजेलोकांना राहण्याकरितां मनोहर निवासस्थानें तयार केलीं होतीं. तीं सर्व स्थानें सुंदर वस्तूंनीं शृंगारलेलीं, भक्ष्यभोज्य पदार्थांनीं सुसमृद्ध, वापी, वृक्ष यांनीं सुसंपन्न, सर्व प्रकारच्या सुखसोयींनीं युक्त, अशीं होतीं. ह्याप्रमाणें सर्व सिद्धता होतांच युधिष्ठिरानें देशोदेशींचे राजे, विद्वान् ब्राह्मण, शूर क्षत्रिय, संपन्न वैश्य, सन्मान्य शूद्र, ह्यांना बोलावण्याकरितां शीघ्रगामी दूत पाठविले.

भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदुर, कृप, अश्वत्थामा, सर्व भ्राते, भावजया, भ्रातृपुत्र-कन्या व इतर प्रेम करणारे आप्त यांना बोलावून आणण्याकरितां युधिष्ठिरानें मुद्दाम नकुलाला हास्तिनापुरास पाठविलें. युधिष्ठिराच्या निमंत्रणाला मान देऊन शतावधि यज्ञवेत्ते विद्वान् पुरुष उल्हसित चित्तानें त्या समारंभासाठीं प्राप्त झाले. धर्मराजानें मिळविलेलें अपूर्व वैभव, त्याची ती अमरावती-तुल्य इंद्रप्रस्थनगरी, शिल्पकलेची परमावधि अशी निरुपम मय सभा, इत्यादि अवर्णनीय गोष्टी दृष्टीस पडतील व यज्ञदीक्षा घेतलेल्या युधि

ष्ठिराचें पवित्र दर्शन घडेल म्हणून देशोदेशांहून क्षत्रिय योद्धे, नानाविध महान् महान् रत्नें घेऊन इंद्रप्रस्थास आले. धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण, महामति विदुर, कृप, अश्वत्थामा, दुर्योधनादिक सर्व भ्राते, गांधारराज सुबल, शकुनि, अचल, वृषक, रथिश्रेष्ठ कर्ण, शल्य, वाल्हीक, कुरुकुलोत्पन्न सोमदत्त, भूरि, भूरिश्रवा, सिंधुदेशाधिप जयद्रथ, पुत्रासहित द्रुपद, शाल्व राजा, प्राग्ज्योतिषाधिप भगदत्त, समुद्रतीरीं अनूप देशांत वास करणारे म्लेच्छ राजे, पर्वतदेशीय भूप, बृहद्बल राजा, वंग, कलिंग, आकर्ष, कुंतल, मालव, आंध्र, द्राविड व सिंहल ह्या देशांचे राजे, काश्मीर देशाचा राजा, महापराक्रमी कुंतीभोज राजा, गौरवाहन राजा, बाल्हीक राजे, पुत्रासह वर्तमान विराट राजा, बलाढ्य शिशुपाल, तसेच वसुदेव, बलराम, अनिरुद्ध, सारण, कंक, प्रद्युम्न, गद, सांब, चारुदेष्ण वगैरे महारथी यादव आणि मध्य देशांतील राजे धर्मराजाचा यज्ञसमारंभ पाहण्याकरितां इंद्रप्रस्थास आले होते. धर्मराजानें त्यांचें उत्तमप्रकारें आदरातिथ्य केलें; आणि नंतर त्याच्याकारितां तयार केलेल्या रमणीय निवासस्थानात ते जाऊन राहिले.

भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा दुर्योधनादि भ्राते, विदुर व संजय ह्यांना धर्मराज म्हणाला, “ आपण सर्वांनीं ह्या यज्ञात माझ्यावर सर्व प्रकारें अनुग्रह करावा. हें माझें विपुल धन आपलेंच आहे. आपण यजमानाप्रमाणें ह्याचा यथायोग्य विनियोग करून आलेल्या पाहुण्यांच्या आदरातिथ्यांत कांहीं कमीपणा न येईल अशी व्यवस्था ठेवावी. ” अशी विनंति करून त्यानें त्या सर्वांना यथायोग्य अधिकारावर नेमिलें. भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे यज्ञांतल्या व समारंभांतल्या सर्वच गोष्टी उत्तम तऱ्हेनें पार पाडाव्या म्हणून जिवापाड झटत होतेच. हस्तिनापुराहून आलेल्या मंडळींना विशेष कामगिरी सांगितली होती. भक्ष्य-भोज्यासंबंधीं कामावर दुःशासनाची योजना झाली होती. ब्राह्मणांचें स्वागत करण्याचें काम अश्वत्थामा करीत होता. संजय हा राजे लोकांच्या आदरातिथ्यांत लक्ष घालीत होता. कोणतीं कामें झालीं व कोणतीं कामें राहिलीं तीं पाहून त्यांसंबंधीं सूचना करण्याचें काम भीष्म-द्रोण करीत होते. उत्तम सुवर्ण व रत्नें ह्यांची पारख करणें, व दक्षिणा वगैरे अर्पण करणें ह्या कामावर

कृपाचार्य होते. राजे लोकांच्याकडून आलेले अहेर जामदारखान्यात ठेवणें, खजिन्यांत द्रव्य ठेवणें, व खजिन्यांतून द्रव्य काढून देणें, ह्या कामावर दुर्योधनाची योजना झाली होती. खर्च करण्याच्या कामावर धर्मवेत्ता विदुर होता. पूजेच्या वेळीं वेदवेत्त्या ब्राह्मणाचें पादप्रक्षालन करण्याचे काम भगवान् श्रीकृष्ण स्वतः करीत होते. ह्या प्रकारें सर्व कामें व्यवस्थित होऊन दीक्षा घेतलेल्या धर्मराजाच्या हातून यज्ञविधि यथाशास्त्र चालू झाला. नतर योग्य वेळीं यज्ञविधि यथासाङ्ग होऊन युधिष्ठिरानें सहा अग्नींना आहुति देऊन तो राजसूय यज्ञ शेवटास नेला. पुष्कळ दक्षिणा देऊन त्यानें ब्राह्मणाना संतुष्ट केले. यज्ञसमारंभासाठीं आलेल्या लोकाच्या इच्छा परिपूर्ण करुन त्यांना विपुल भक्ष्य-भोज्यादि पदार्थ अर्पण केले. मंत्र, शिक्षा व अनुष्ठान ह्यांत विशारद असलेल्या ऋत्विजानीं इडा, सोम व घृत ह्यांच्या आहुति देऊन वैश्वानराची तृप्ति केली, आणि त्याच्या योगे त्या यज्ञांत देव संतुष्ट झाले. त्याप्रमाणेच अन्न, दक्षिणा, व विपुल धन ह्यांच्या योगें ब्राह्मण व इतर सर्व लोकहि तृप्त झाले. राजसूय यज्ञाच्या अंगभूत असलेल्या सोमयागाच्या दिवशीं महान् महान् सत्पात्र ब्राह्मण, नारद-प्रमुख महात्मे धर्मवेत्ते, राजे लोकांसह अंतर्वेदीमध्यें स्थित असतां जणूं काय ब्रह्मसभेंत देव व देवर्षीच स्थित आहेत अशी शोभा दिसूं लागली. तो महान् क्षत्रिय-वीरांचा प्रचंड समुदाय पाहून त्यांचा आपसांत कलह उत्पन्न झाला तर केवढा भयंकर अनर्थ होणार आहे, तें भावष्यकालचें चित्र नारदांच्या डोळ्यांसमोर उभें राहून ते थोडे चिंताग्रस्त झाले. त्यांच्या तोंडून चटकन् उद्गार निघाले, " कलहाचें बीजारोपण ज्यांत झालें नाहीं असा राजसूय यज्ञ आजपर्यंत कोणींच कधीं पाहिला नाहीं." जवळच बसलेल्या श्रीकृष्णानें हे नारदांचे उद्गार ऐकून स्मित हास्य करीत म्हटलें, " आणि म्हणूनच तुम्हीं राजसूय यज्ञ करण्याचा सल्ला धर्मराजाला दिलात. होय ना ? " नारद हंसून म्हणाले, " तुझ्यासारख्या ईश्वरी तेजानें संपन्न असलेल्या भगवताच्या खास नजरेखालीं झालेला राजसूय ह्या गोष्टीला अपवाद ठरतो कीं काय हें मला पाहावयाचें होतें ! "

यज्ञानुष्ठान आटोपल्यानंतर भीष्मानें युधिष्ठिराला म्हटलें, " हे धर्मा,

आचार्य, ऋत्विज, आप्त, स्नातक, मित्र, व राजा हे सहाजण पूजार्ह आहेत. हे प्रत्येक संवत्सरास आले तरी त्यांची पूजा करावी, असें शास्त्र आहे. मग हे तर तुझ्या घरीं किती तरी वर्षांनीं आले आहेत. तेव्हां ह्यांतील प्रत्येकाची पूजा करणें तुझें कर्तव्य आहे. धर्मराजा, ह्या सर्वांत जो वरिष्ठ असेल त्याची पूजा तूं आधीं कर.' भीष्माच्या म्हणण्याप्रमाणें सर्वांची पूजा करावी असें धर्मराजानें ठरविलें. तो म्हणाला, "हे पितामह, आपलें म्हणणें योग्य आहे. ह्या सर्वांची पूजा मी करितों. ह्या सर्वांपैकीं वरिष्ठ कोण हे ठरविण्याला आपणच योग्य आहां. आपण विचार करून त्याचा नामनिर्देश करा, म्हणजे आपल्या म्हणण्याप्रमाणें त्याची पूजा आधीं करून ह्या पूजनविधीला सुरुवात करतां येईल." युधिष्ठिराचें भाषण ऐकून त्या अनुभवी वृद्ध पितामह भीष्मांनीं युधिष्ठिरानें विचारिलेल्या गोष्टींचा नीट विचार केला व 'यादवश्रेष्ठ भगवान् श्रीकृष्ण हाच सर्वांत पूज्यतम आहे' असा आपला निर्णय धर्मराजाला सांगितला. भगवान् श्रीकृष्णच अग्रपूजेला योग्य आहेत, असे भीष्मांनीं सांगितल्यावर धर्मराजाच्या आज्ञेनें सहदेवानें त्या सभेंत श्रीकृष्णाची यथाविधि पूजा केली आणि श्रीकृष्णानें यथाशास्त्र त्या पूजेचा अंगिकार केला. सहदेवानें श्रीकृष्णाची अग्रपूजा केली, ही गोष्ट शिशुपालाला सहन झाली नाहीं. तो रागानें लाल झाला आणि सभेंत उभा राहून म्हणाला, "धर्मा, ह्या सभेंत मोठमोठे राजे उपस्थित असतांना त्यांना बाजूला ठेवून तूं ह्या राजा नसलेल्या कृष्णाची प्रथम पूजा केलीस ही तुझ्या हातून अत्यंत निंद्य गोष्ट झाली. ह्या मतिभ्रष्ट झालेल्या म्हाताऱ्या भीष्मानें कृष्णाचा मोठेपणा व्यर्थ वाढविण्याकरितां हें अधर्माचरण करण्याचा तुला सल्ला दिला, आणि त्वां मूर्खानें कांहींहि विचार न करता ही तुमच्या कौरव-कुळाला लांच्छनास्पद होणारी गोष्ट केलीस. काय म्हणावें तुला ! ह्या कृष्णाची तूं योग्यता तरी काय पाहिलीस ! हा सामान्य राजाहि नाहीं. हा वृद्ध असल्यामुळें तुला पूज्य वाटला असें म्हणावें तर ह्याचा बाप वसुदेव येथे उपस्थित आहे ! धर्मा, तुम्हां पांडवांचा सासरा श्रेष्ठ द्रुपद राजा येथें असतांना तुम्ही पांडव कृष्णाला अग्रपूजा अर्पण करतां, आणि तो त्या पूजेचा

स्वीकार करितो, ह्यांत तुम्हां दोघांच्याहि हातून हा भयंकर प्रमाद झाला आहे. अरे, द्रोणाचार्यांच्या पूर्वी कृष्णाची पूजा करण्याची दुर्बुद्धि तुला कशी झाली? तुमचा आजा इच्छामरणी भीष्म येथें असतांना त्याच्यापेक्षांहि हा कृष्ण तुला पूज्य वाटला! हा तुमच्या कुळाचा आचार्य कृप, व सर्वशास्त्रपारंगत अश्वत्थामा हे तुला कृष्णापेक्षां कमी वाटले! पांडुराजाप्रमाणें तेजस्वी भीष्मक राजा, रुक्मी, मद्रदेशाधिपति शल्य, राजाधिराज दुर्योधन हे सर्वच कृष्णापुढें तुला तुच्छ वाटले काय? भार्गवरामाचा पट्टशिष्य महाबलाढ्य कर्ण अग्रपूजेच्या वेळीं तुझ्या दृष्टीपुढें आला नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे! कृष्ण हा राजा नसला तरी मोठा वेदवेत्ता ऋषि आहे, असें का तुला वाटलें? ह्या सभेंत उपस्थित असलेले कृष्णद्वैपायन, व्यास व नारदऋषि ह्यांच्यापेक्षांहि हा कृष्ण योग्यतेनें मोठा आहे, अशी तुझी समजूत झाली कीं काय? योग्यायोग्य न पाहातां तुझ्या आवडत्या कृष्णाचीच जर तुला पूजा करावयाची होती तर त्वां हे राजे येथें बोलावून आणून त्यांचा अपमान तरी करावयाचें काय प्रयोजन होतें? ह्या कृष्णाच्या भीतीनें आम्ही राजे तुला करभार द्यायला तयार झालों असें तर तूं नाहीं ना समजलास? ह्या कृष्णाला आम्ही सर्व राजे लोक कस्पटाप्रमाणें तुच्छ मानितों, हें ह्या भरसभेंत मी तुला स्पष्ट सांगतो आहें तें तूं ध्यानांत ठेव. राजसमूहाचा अपमान करून तूं आपला नीचपणा प्रगट केलास व धर्मात्मा म्हणून आजपर्यंत मिळाविलेला सर्व लौकिक व्यर्थ घालविलास. कृष्णा, तुलाहि मी बजावून ठेवतों. राजसमूहासमोर निर्लज्जपणें अग्रपूजेचा स्वीकार करून राजे लोकाचें वैर तूं संपादन केलें आहेस. राजसमूहाच्या क्रोधाला तोंड द्यायला आतां तयार राहा. निर्जन स्थानीं चुकून पडलेल्या हविर्भागाचा अंश मिळाल्यामुळें कुत्र्याला जसा आनंद होतो, तसा ह्या चुकून घडलेल्या अग्रपूजेच्या योगानें तुला आनंद होत असेल. पण अपमानानें क्रुद्ध झालेल्या राजे लोकांचा बडगा तुझ्या पाठींत बसेल तेव्हां तुझा हा आनंद साफ मावळेल. कृष्णा, धर्मराजाच्या ह्या अयोग्य वर्तनानें त्याची नीच मनोवृत्ती प्रगट झाली, ह्या थेरड्या भीष्माचें खरें स्वरूप निदर्शनास आलें, आणि तुझीहि अक्कल कळली. आम्हां

राजेलोकांची योग्यता तुम्हां क्षुद्रांना कळत नाहीं. तुमचीहि आम्हांला पर्वा नाहीं. बसा, तुम्ही मूर्ख अहंमन्य लोक स्वतःच्या भोंवतीं स्वतःच दिवे ओंवाळीत खुशाल बसा." असे रागानें जळफळत बोलून शिशुपाल सभेंतून बाहेर जाऊं लागला. त्याच्या बरोबर बाहेर जाण्यास कित्येक राजेहि उठले.

तें पाहून धर्मराजानें आपल्या आसनावरून उठून व धांवत जाऊन शिशुपालाचा हात धरून त्याला परतविलें आणि त्याला शांतपणें म्हटलें, "शिशुपाल राजा, असें एखाद्याबद्दल निष्कारण निष्ठुर भाषण करून त्याचा अपमान करणें तुझ्यासारख्या राजाला शोभत नाहीं. महाबलाढ्य व अनुभवी भीष्माला भगवान् श्रीकृष्णाचें स्वरूप यथार्थ कळलें आहे, म्हणूनच भगवंताला अग्रपूजेचा मान देण्यास त्यानें सांगितलें. तुझ्यापेक्षा वयोवृद्ध राजे ह्या सभेत पुष्कळ आहेत, त्यांना श्रीकृष्णाची अग्रपूजा केल्याबद्दल यत्किंचितहि वैषम्य वाटत नाहीं. तूंहि थोडा विचार कर." इतक्यांत भीष्म एकदम म्हणाले, "धर्मा, तूं शिशुपालाचें सांत्वन करण्याच्या भरीस पडूं नकोस. सर्व लोकात श्रेष्ठ असणाऱ्या भगवान श्रीकृष्णाची पूजा ज्यास सहन होत नाही, त्या खलपुरुषाचें सांत्वन करून तरी काय उपयोग ? श्रीकृष्ण हा आम्हांसच नव्हे तर सर्व जगास वंदनीय आहे. येथे जमलेल्या सर्व राजांना तर त्याची योग्यता माहीत असलीच पाहिजे. श्रीकृष्णानें आपल्या पराक्रमाने ज्यास जिंकले नाहीं असा एकहि राजा मला ह्या यज्ञमंडपात दिसत नाहीं. रणांगणावर श्रीकृष्णाच्या तेजानें, हा निरर्गल प्रलाप काढणारा शिशुपालहि अनेक वेळां फजित झाला आहे ! बलवान क्षत्रियांमध्यें हा भगवान जसा सर्वश्रेष्ठ आहे तसा ज्ञान्यांमध्येंहि हा श्रेष्ठ आहे असें मोठमोठ्या ज्ञानवृद्धांनीं मला सांगितलें आहे. मी म्हणतों हें खरें असल्याचें येथें उपस्थित असलेले नारदव्यासादि ज्ञानी पुरुषच सांगतील. तेव्हां सर्व प्रकारें विचार केला तरी अग्रपूजेच्या बहुमानास श्रीकृष्णच योग्य आहे, असें माझें ठाम आहे. धर्मा, हे शिशुपालादि कांहीं अविचारी राजे श्रीकृष्णावर व आमच्यावर जळफळून सभात्याग करूं पाहात आहेत; त्यांना तो बेलाशक करूं दे.

ह्यांच्या हातून आमचें कांहींहि वांकडें होणार नाहीं ह्याची तूं खात्री बाळग. कोल्ह्या-कुत्र्यांनीं एकत्र जमून केवढीहि ओरड केली तरी सिंहाला त्याची दिक्कत वाटत नाहीं." इतकें भाषण करून आपल्या भाषणाचा शिशुपालादि कृष्ण-विरोधी राजे लोकांवर काय परिणाम होतो, हें पाहात भीष्म स्वस्थ बसले. तोंच शिशुपालादि कृष्णद्वेष्ट्या राजांना उद्देशून सहदेव म्हणाला, "श्रीकृष्णाचा निष्कारण हेवा करणारे शिशुपालादि राजे लोकहो, भगवान् श्रीकृष्णाची जी मीं अग्रपूजा केली ती तुमच्यापैकीं ज्यांना सहन होत नसेल त्या सर्व राजांच्या मस्तकांवर हा मी आपला डावा पाय ठेवून तुम्हांला युद्धाचें आव्हान देत आहें. जो राजा, भगवान् वासुदेवाविरुद्ध भाषण करील त्याला मी यमसदनीं पाठविण्याचा निश्चय केला आहे. भगवंतानें शिशुपालासारख्या क्षुद्र, मत्सरी राजाचे शब्द ऐकून घेतले असले तरी आम्ही पांडव भगवंताची निंदा करणाऱ्याची जीभ छाटून टाकल्याशिवाय राहाणार नाहीं, हें सर्व कृष्णद्वेष्ट्यांनीं चांगलें ध्यानांत ठेवावें."

सहदेवाच्या आव्हानाचा स्वीकार करण्यास कोणीच पुढें आला नाहीं हें पाहून भीष्म शिशुपालादि राजांकडे पाहून तिरस्कारानें हंसले व म्हणाले, "तुम्ही कृष्णद्वेष्टे लोक बोलण्यांतच शूर असून कृति करण्यांत भ्याड आहां हें पराक्रमी सहदेवानें उघडकीला आणिलें, हें पाहून मला समाधान वाटतें. हा दुष्ट शिशुपाल निंदा करीत असतांना भगवान् स्वस्थ बसला, ह्याला अनेक कारणें आहेत. भगवंतानें लहानपणापासून पराक्रमाचीं अलौकिक कृत्यें केलीं, त्यानें शत्रूंशींहि जी उदारपणाची वर्तणूक केली, वायफळ बोलण्यापेक्षां त्यांनीं एकदम कृतीच करून आपलें तेज कसें दाखविलें, वगैरे सर्व गोष्टी ज्यांना माहीत आहेत त्यांना भगवंताच्या स्वस्थ बसण्याचें आश्चर्य वाटणार नाहीं. आणखी एक बलवत्तर कारण आहे तें सर्वांच्या माहितीकरितां मी सांगून ठेवितों. हा दुष्ट शिशुपाल श्रीकृष्णाच्या हातूनच मरणार आहे असें भविष्य ऐकून ह्याची माता, म्हणजे भगवान् श्रीकृष्णाची आत्या, अत्यंत कष्टी झाली. तिनें भगवानाची आपल्या मुलाला न मारण्याबद्दल प्रार्थना केली तेव्हां भगवानानें तिला,

ह्या शिशुपालाचे शंभर अपराध होईपर्यंत त्याला हात न लावण्याचें वचन दिलें आहे. त्याचे ते अपराध भरण्याची भगवान् वाट पाहात आहे." हें भीष्माचें भाषण ऐकताच शिशुपाल एकदम उसळून म्हणाला, " हे घेरड्या कुलकलंका भीष्मा, कृष्णाचें – ह्या गवळ्याचें– मलतेंच स्तोम माजविण्याकारितां तूं भाटासारखी त्याची खोटीनाटी स्तुति चालविली आहेस, ह्याबद्दल तुला लाज वाटली पाहिजे. ह्याच्या लहानपणच्या पराक्रमाच्या ऐकीव गोष्टी माझ्यासारख्याला भेडसावतील असें तुला वाटतें तरी कसें ! ह्यानें लहानपणी काय म्हणे पाखरें मारलीं. ज्या बिचाऱ्याना युद्ध म्हणजे काय हें माहीत नाहीं असले थोडे बैल आणि गाढवें यानें मारलीं. बावळट गोपाळानीं त्या पशुपक्ष्यांना आपल्या कल्पनेनें असुर बनवलें आणि असुर मारल्याबद्दल ह्याची स्तुतिस्तोत्रे गायला सुरुवात केली. ह्याच त्याचा लहानपणचा पराक्रम !.प्रत्यक्ष अन्नदात्या, रक्षणकर्त्या राजाला – कंसाला – आपल्या मामाला यानें ठार मारलें हा ह्या धर्मात्म्याचा कृतज्ञपणा ! जरासंधाला कपटानें मारविलें हें ह्याचे देवत्व ! श्रीकृष्ण मोठा ज्ञानी आहे अशी तूं माझ्यापाशी बढाई मारितोस, जणूं काय मला त्याची ओळखच नाहीं असे तू समजतोस. भोजदेशाधिपति कंसाचा जो केवळ यःकश्चित् गुरें चारणारा दास, त्याची स्तुति करून आम्हा राजे लोकांचा अपमान तूं करतोस! भीष्मा, तूं खरोखरच आम्हा राजे लोकांकडून वधार्ह आहेस. माझा मृत्यु गवळ्याच्या हातून आहे, असें सांगणाऱ्या मूढा, भीष्मा, तुझें जीवितहि निःसंशय ह्या क्रुद्ध झालेल्या राजांच्या व माझ्या इच्छेवर अवलंबून आहे. " हें शिशुपालाचें भाषण ऐकताच भीष्म म्हणाले, " मूर्खा, तुला आणि तुझ्या बाजूच्या ह्या राजांना मी कस्पटाप्रमाणें मानितों, पण उत्तरास प्रत्युत्तर करीत बसणें मला आवडत नाहीं. हा मी तुम्हा सर्वांच्या मस्तकांवर पाय देऊन उभा आहें, आणि आम्हीं ज्याची अग्रपूजा केली तो भगवान् श्रीकृष्णाहि ह्या ठिकाणीं आहे. ज्याची बुद्धि मरणाकडे अधिक धाव घेत असेल, त्यानें मला व ह्या माधवाला युद्धाकारितां आव्हान द्यावें. " हें भीष्माचें भाषण ऐकतांच पराक्रमी शिशुपाल चिडून म्हणाला, "कृष्णा, हा मी तुला युद्धाचें

आव्हान देतों. तूं आज माझ्याशीं युद्ध कर म्हणजे आज तुझा आणि राजा नसलेल्या तुझी अग्रपूजा करून सर्व राजांचा अपमान करणाऱ्या पाडवांचा नायनाट करून टाकितों.” इतके बोलून तो दुष्ट शिशुपाल गर्जना करीत उभा राहिला.

तें पाहून श्रीकृष्ण शांतपणें तेथे असलेल्या सर्व राजांना उद्देशून म्हणाला, “ राजेहो, यादवकुलांतील स्त्रीच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला व यादवांच्या नेहमीं वाइटावर असलेला हा दुष्ट शिशुपाल आमचा मोठा हाडवैरी आहे. आम्ही सारे यादव प्राग्ज्योतिषपुरावर स्वारी करण्यांत गुंतलों असतांना आम्ही नाहीं अशी संधि पाहून ह्या यादवांच्या भाच्यानें यादवांची द्वारकानगरी जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. मागें एकदां रैवतक पर्वतावर कांहीं यादव उत्सवानिमित्त जमले असतां ह्यानें अचानक ससैन्य तेथें छापा घालून त्या निःशस्त्र यादवांचा अमानुष वध केला. बभ्रुनामक यादवाची स्त्री सौवीर देशाला चालली असतां ह्या नरपशूनें बलात्कारानें तिचे हरण केलें. विशाला देशाच्या राजाची भद्रा नामक कन्या करुष देशच्या राजाला दिली असतां ह्या नराधमाने त्या राजाचा वेष धारण करून कपटानें तिला पळवून नेले. आपल्या मातुलघराण्याचा निष्कारण हेवादावा करणाऱ्या ह्या दुष्टाचीं अशाप्रकारचीं अनेक दुष्कृत्यें मीं वचनबद्ध असल्यामुळें आजपर्यंत निमुटपणें सहन केलीं. आज माझ्याविरुद्ध चाललेलें त्याचें वर्तन तुमच्या समक्षच होत आहे. ह्यानें अत्यंत गलिच्छ शब्दांनीं माझा पाणउतारा केलेला तुम्ही आपल्या कानांनीं ऐकला आहे. ह्या दुष्टाचे शंभरच काय, पण असंख्य अपराध मीं सहन केले अशी तुमची खात्री झाली ना ! माझ्या आत्याबाईला दिलेल्या वचनांतून मी आज तुमच्या समक्ष मुक्त झालों, ह्याबद्दल मला संतोष वाटतो. ” हें कृष्णाचें भाषण ऐकताच शिशुपाल तिरस्कारानें हंसून त्याला म्हणाला, “ मग आतां माझ्यापुढं युद्धाला उभा राहून काय पराक्रमाचे दिवे लावावयाचे असतील ते लावून दाखव ना ! ” ही त्याची दर्पोक्ति ऐकून भगवान् क्रुद्ध होऊन म्हणाला, ‘ कुत्र्याला मारण्याकरितां सिंहाला जागचें उठावें लागत नाहीं. त्याची गर्जनाच तें काम करूं शकतें. ” भगवान् श्रीकृष्णानें हे

शब्द उच्चारून क्रुद्ध मुद्रेनें आपल्या सभोंवार पाहिलें मात्र, त्याचें सुदर्शन चक्र विद्युल्लतेप्रमाणें यज्ञमडपात घुसलें व क्षणार्धांत शिशुपालाचें मस्तक अस्मानांत उडालेलें पाहून सर्व राजे स्तिमित झाले. शिशुपालाचा शिरच्छेद करून व तत्पक्षीय राजांवर विलक्षण जरब बसवून, श्रीकृष्णानें सूचना देताच, सुदर्शन चक्र आलें तितक्याच वेगानें यज्ञामंडपाभोंवतीं फिरून चालतें झालें. शिशुपालाचा वध होताच दुर्जन जागच्या जागीं हात चोळीत बसले. कोणाची एक चकार शब्द बोलण्याची छाती झाली नाही. एका शिशुपालाचा झटकन् वध करून सर्व राजे लोकावर भयंकर जरब बसविण्याच्या अद्भुत कृतीनें श्रीकृष्णानें त्या दिवशीं तेथें होणारें भयंकर रणकंदन थांबविलें.

धर्माज्ञेनें शिशुपालाचा अत्यंविधि झाल्यानंतर सर्व राजेलोकासमक्ष धर्मराजानें शिशुपालाच्या पुत्राला चेदि देशाचा राजा म्हणून राज्याभिषेक केला. नंतर धर्मराजाच्या आज्ञेनें भीम, अर्जुन, नकुल, सहदेव यानीं सर्व राजाचें, देवर्षि-महर्षींचें, वेदवेत्त्या ब्राह्मणाचें व आप्त–सुहृदाचे यथाविधि पूजन केलें. नंतर सर्वांसह धर्मराजानें अवभृत स्नान केल्यावर राजसूय यज्ञ मोठ्या थाटानें समाप्त झाला. जमलेल्या सर्व राजानीं नंतर मोठ्या समारंभानें युधिष्ठिरास साम्राज्यपदावर बसवून यथाविधि अभिषेक केला, व त्यास् अनेक नजराणे अर्पण केले; आाणि आपापल्या देशास परत जाण्याकरितां धर्मराजाची परवानगी मागितली. धर्मराजाने राजाचा यथायोग्य सन्मान करून त्यांना आनंदानें निरोप दिला. कुरु देशाच्या सीमेपर्यंत त्या सर्वांना आदरानें पोहोंचाविण्याकरिता भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, धृष्टद्युम्न, अभिमन्यु, द्रौपदीपुत्र वगैरे राजघराण्यांतील मंडळी गेली होती. नंतर भगवंतानें द्वारकेंत परत जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्याला निरोप देण्याचें धर्मराजादि पांडवांच्या जिवावर आलें. त्यांनीं त्याला आणखी कांहीं दिवस राहण्याचा पराकाष्ठेचा आग्रह केला, पण गोविंदानें, पुनः बोलवाल त्यावेळीं येईन, वगैरे सांगून त्याचें समाधान केलें व परत जाण्याकरितां कसाबसा निरोप मिळाविला. भगवान् श्रीकृष्ण धर्मराजादि बंधूंना बरोबर घेऊन कुंतीकडे गेले, आाणि आनंदानें तिच्या पायांवर मस्तक

ठेवून तिला म्हणाले, ' आत्याबाई, तुझ्या पुत्रांना सार्वभौमत्व प्राप्त होऊन ते वैभवसंपन्न झाले आहेत, तेव्हा आतां सर्वांनीं आनंदांत राहावें. तुमची अनुज्ञा घेऊन मी आज द्वारकेस जावयास निघालों आहें.'' श्रीकृष्णाचें भाषण ऐकून कुंतीच्या डोळ्यात आनंदाश्रु आले. तिचा कंठ प्रेमाने दाटून आला. '' कृष्णा, पांडवांचें सर्व वैभव तुझ्यामुळें आहे, एवढें ध्यानात ठेवून त्यांच्यावर सतत कृपादृष्टि ठेव.'' एवढेंच कसेबसें बोलून तिने त्याला आशीर्वादपूर्वक निरोप दिला. द्रौपदी, सुभद्रा ह्यांना विचारून श्रीकृष्ण आपल्या सर्व मंडळीसह निघाले. त्याची सर्व मंडळी त्यांच्या-करितां तयार ठेविलेल्या रथात जाऊन बसली. गरुड-चिन्हांकित ध्वज असलेल्या सुंदर रथात कमलनयन भगवान् श्रीहरि बसतांच द्वारकेकडे रथ चालू झाले, तेव्हा सम्राट् धर्मराजा आपल्या बंधूंसहवर्तमान श्रीहरीच्या रथापाठीमागें पायानीं चालू लागला. बरेंच लांब गेल्यावर भगवंतानें रथ जरा उभा केला व तो दयाळु भगवान् सद्गदित अंतःकरणानें युधिष्ठिराला म्हणाला, '' बरेच लांब आलांत. आतां परत वळा. धर्मा, तुम्ही पांडव म्हणजे माझे पंचप्राण आहां. मी अधिक काय सांगूं ? राजसूय यज्ञानें सम्राट्पदाचा वैभवसंपन्न मुकुट तुझ्या मस्तकावर ठेवला, पण त्याचबरोबर त्यानें क्षत्रियांत कलहाचें बीजारोपणहि करून ठेविलेलें मला स्पष्ट दिसतें. त्या बीजाचा वृक्ष न होऊं देण्याची दक्षता बाळगा, व प्रजेचें पुत्रवत् पालन करून तुम्ही सर्व बंधू एकविचारानें आनंदांत राहा.'' इतकें सांगून माधव-पांडवांनीं परस्परांचा निरोप घेतला, आणि ते आपआपल्या स्थानांस निघून गेले. अशा प्रकारें सर्व सुहृदांची पाठवणी झाल्यानंतर पांडवांच्या जवळ आणखी कांहीं दिवस प्रमुख मंडळींपैकीं फक्त दोनच व्यक्ति राहिल्या. एक दुर्योधन व दुसरा सुबलपुत्र शकुनि, ह्या दोघांना आग्रहानें ठेवून घेण्याची बुद्धि पांडवांना झाली. बुद्धिः कर्मानुसारिणी !

नंतर शुभमुहूर्त पाहून युधिष्ठिरानें मंगलकारक व कल्याणप्रद असें पुण्याहवाचन करवून बंधू व अमात्यांसहवर्तमान ती यज्ञभूमि सोडून आपल्या सर्वोत्तम नगरांत प्रवेश केला. इंद्रप्रस्थ नगरींत असतांना दुर्यो-धन व शकुनि त्या आश्चर्यकारक मयसभेंत राहात होते. त्या सभेमध्यें

शिल्पकारानें असे अद्भुत चमत्कार करून ठेवले होते कीं तसे चमत्कार सर्व पृथ्वीवर कोठे पाहावयास सांपडणार नाहींत. पाणी असेल त्या ठिकाणीं जमिनीचा भास व्हावा, जमिनीच्या ठिकाणीं पाणी असल्यासारखें वाटावें. दरवाजाच्या ठिकाणीं भिंतीचा भास होई तर भिंतीच्या ठिकाणीं दरवाजा दिसे. असे भ्रांतिचमत्कार तेथें कितीतरी प्रकारचे होते. दुर्योधन-शकुनीची ह्या मयसभेत किती तरी वेळां फजिती झाली. जमीन असें समजून जात असतां पाण्यांत पडून त्यानीं गटंगळ्या खाल्या. तें पाहून भीम हसला. तेव्हा जवळ असलेले हुजरेहि हंसले. राजा दुर्योधन त्या वेळी अपमानित झाला. पण त्याने आपल्या चेहऱ्यावर त्यावेळीं कांहींही विकार दाखविले नाहींत. एकदा पुढें दरवाजा आहे असें वाटून त्यातून पलीकडच्या दालनात तो जाऊं लागला, तो ताडकन् भिंतीवर डोकें आपटल्यानें तो मागे सरला. भीमाच्या हंसण्याचा ध्वनि त्याच्या कानीं येतांच तो गोरामोरा झाला. अशी कितीतरी वेळा फजिती झाल्याने दुर्योधनाला फार वाईट वाटलें. त्या मयसभेंतल्या रत्नखचित जमिनी, इंद्रनील मणि, पाचूंचीं छते, सुवर्णाचे स्तंभ, स्फटिकाचे दरवाजे पाहून पांडवांच्या त्या वैभवाने दुर्योधन मनांत जळफळूं लागला. राजसूय यज्ञाच्या वेळीं जामदारखान्याची व्यवस्था त्याच्याकडेच असल्यानें पांडवांची संपत्ति पाहून तो दिपलाच होता. सार्वभौमपदावर धर्मराज बसलेला पाहून मत्सरानें ग्रस्त होऊन तो मनांतल्या मनांत जळत होताच. त्यांत ह्या मयसभेच्या ऐश्वर्याच्या दर्शनाची भर पडताच त्याचा पराकाष्ठेचा तडफडाट झाला. पांडवांची ती अगणित संपत्ति, तें अपूर्व वैभव पाहून त्याला इंद्रप्रस्थनगरींत अधिक दिवस राहाणें अशक्य झालें, इतका त्याच्या अंगाचा तिळपापड होत होता. म्हणून धर्मराजाचा निरोप घेऊन ते दोघे हास्तिनापुरास जाण्यास निघाले. धर्मराजानें त्यांना प्रेमानें सन्मान करून त्याना निरोप दिला. हास्तिनापुरास जातांना वाटेंत पांडवांच्या वैभवाबद्दलचेच विचार दुर्योधन-शकुनींच्या डोक्यांत घोळत होते. पांडवांच्या संपत्तीचा कपटानें अपहार कसा करतां येईल, पांडवांना त्यांच्या वैभवापासून खालीं कसें ओढतां येईल ह्यासंबंधींच सर्व वाटभर दुर्योधन-शकुनि दुष्ट विचार

करीत चालले होते. त्या मत्सरग्रस्त मामा-भाच्यांचे दुष्ट विचारच भारतीय युद्धाला कारण झाले. त्यांच्या पापी बुद्धीनें भारतीय युद्धात असंख्य क्षत्रियाचा भयंकर संहार झाला. क्षत्रिय जातीच्या मुळावर आलेल्या ह्या दुष्ट जोडीनें पुढें कसा आणि केवढा अनर्थ केला, तें ह्या चरित्रात संक्षेपानें वाचकांना कळणारच आहे.

---

## प्रकरण ९ वें

# द्यूत, वनवास व युद्धप्रस्थान

कंस, पंचजन, जरासंध, कालयवन, पौंड्रक-वासुदेव, शिशुपाल, वक्रदंत, शाल्व व रुक्मी हे महाबलाढ्य वीरपुरुष श्रीकृष्णाचे हाडवैरी होते, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. ह्यांपैकीं कंस, पंचजन, पौंड्रक-वासुदेव व शिशुपाल यांचा श्रीकृष्णानें स्वतः वध केला, कालयवनाला गनिमी युद्धांत अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पाडला आणि जरासंधाला भीमाकडून मारविला यासंबंधीं सर्व हकिगत आतांपर्यंत वाचकानीं वाचली आहेच. राजसूय यज्ञात शिशुपालाला भरसभेंत, आर्यावर्तातील बहुतेक सर्व राजे उपस्थित असतांना त्यांच्या देखत, श्रीकृष्णानें आपल्या सुदर्शन चक्रानें ठार मारलें. कोणींहि त्याचा प्रतिकार केला नाहीं कीं निषेधदर्शक एक चकार शब्द काढला नाहीं. ही गोष्ट शिशुपालाचा परमस्नेही शाल्व देशाचा शाल्व राजा, ह्याला फार लागून राहिली. सर्व राजे आपआपल्या देशीं परत गेले. धर्मराजाच्या

चातुर्यपूर्ण धोरणामुळे शाल्वाला इतर राजांशीं यासंबंधीं बोलण्याला शेवट-पर्यंत संधिहि मिळाली नाहीं. त्यामुळें तो आपल्या देशाला गेल्यावर त्यानें शिशुपालाबद्दल कसा सूड घ्यावा ह्याचा विचार चालविला. कांहीं तरी विशेष प्रकारचे, शत्रूजवळ नसलेलें, आयुध किंवा युद्धसाधन आपल्याजवळ असल्याशिवाय द्वारकेवर स्वारी करणे अशक्य आहे, असें जाणून त्यानें आपल्या एका दानव स्नेह्याच्या मदतीनें सौभ नामक एक आकाशयान तयार केले. दानवाची मायावी विद्याहि त्याने संपादन केली. श्रीकृष्ण बलरामासह द्वारकेतून आनर्त देशाला गेला आहे ही संधि साधून त्याने आपल्या बलाढ्य सैन्यासह येऊन द्वारकेवर हल्ला चढविला. द्वारका नगरी बेटावर होती. त्या बेटाच्या भोंवतीं समुद्राचा स्वाभाविक वेढा होताच. शिवाय नगरीच्याभोंवतीं खंदक असून त्यापलीकडे नगरीची उंच तटबंदी होती. तटावर मोठमोठ्या तोफा ठेविलेल्या होत्या. तटावर अनेक मोर्चे बांधिलेले होते व त्यावर शत्रूंनीं सोडलेल्या तोफांच्या गोळयासहि हाणून पाडणारी शक्तिसज्ञक आयुधे ठेविलीं होतीं. नगरीचे रक्षण करण्याकरिता युद्धात पराक्रम गाजविलेले यादव सैन्य होतें. तोमर, अंकुश, शतघ्नी, लांगल, भृशुंडी, पाषाणाचे गुंड, धनुष्ये, परशु, लोखंडाच्या ढाली, अग्न्युत्पादक द्रव्ये भरलेले गोळे उडविण्याचीं शृंगाकार यंत्रे इत्यादिक युद्धसाहित्याचा त्या सैन्याजवळ भरपूर सांठा होता. अशा त्या सुसज्ज नगरीवर शाल्वाची बलाढ्य सेना चालून आली. प्रद्युम्न, साम्ब इत्यादि महारथी वीरांनीं त्याच्या सैन्याशीं यशस्वी तऱ्हेने सामना दिला. परंतु जेव्हा सौभ–आकाशयान द्वारकेवर घिरट्या घालून वरून पाषाण, शस्त्रे, अग्निगोळे यांचा वर्षाव करूं लागलें, तेव्हां यादव सैन्याचा गोंधळ उडाला. द्वारका नगरींतील घरें, उपवनें यांचाहि फार नाश झाला. पुष्कळ यादव योद्धे मारले गेले. प्रद्यु-म्नहि शाल्वाचा बाण असह्य होऊन रथांत मूर्छित होऊन पडला. त्याबरोबर त्याचा रथ सारथ्यानें सुरक्षित ठिकाणीं नेला. शाल्वाच्या सैन्यांत जयघोष सुरू झाला. थोड्या वेळानें प्रद्युम्न सावध होऊन शाल्वाच्या सैन्यावर त्यानें अशीं भयंकर अस्त्रें सोडलीं कीं, त्याच्या सैन्याची दाणादाण झाली. इतक्यांत आनर्त देशास गेलेले राम–कृष्ण परत आले. श्रीकृष्णाबरोबर

नेहमीं असणारें त्याचें भयंकर सुदर्शन चक्रहि होतें. शाल्वानें द्वारकेची भयंकर हानि केलेली पाहून श्रीकृष्ण व बलराम हे खवळले. श्रीकृष्णाच्या दिव्य अस्त्राचा मारा सौभात बसलेल्या शाल्वाला सहन होईना. म्हणून त्यानें सौभ समुद्रांत दूरवर नेलें. इकडे श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्रानें शाल्वाच्या सैन्याची धुळधाण उडविली एकट्या बलरामानें शाल्व सैन्यातले हजारों योद्धे मारले. आपल्या सैन्याची ती दुर्दशा पाहून शाल्वानें आपलें सौभ आकाशयान द्वारकेवर आणलें व मायावी युद्ध सुरू केलें. पण श्रीकृष्णाच्या अस्त्राच्या पुढें त्याच्या मायावी युद्धाची माला चालेना. शेवटीं श्रीकृष्णानें आपल्या वज्रमुख नावाच्या दिव्यास्त्राचा प्रयोग करताच त्याचें आकाशयान खालीं कोसळलें व शाल्व खालीं पडला. त्याबरोबर श्रीकृष्णानें त्याच्यावर धावून जाऊन त्याचा शिरच्छेद केला. उरलेसुरलेले शाल्व सैन्यांतले लोक शाल्व देशाला पळून गेले.

शाल्वाचा वध झाल्याचें कळतांच त्याचा परमस्नेही करुष देशाचा राजा वक्रदंत व त्याचा भाऊ विदूरथ द्वारकेवर चाल करून आले. पण अग्नीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें त्यांची स्थिति झाली. श्रीकृष्णाच्या गदेनें वक्रदंताचा बळी घेतला व त्याच्या खड्गानें विदूरथाचें मस्तक तोडून टाकलें. वक्रदंत व विदूरथ हे श्रीकृष्णाचे शिशुपालाप्रमाणेंच आतेभाऊ होते. श्रीकृष्णानें आपल्या नेहमींच्या उदारपणानें शत्रूंच्या राज्याचा लोभ न धरतां, शाल्व देशाच्या गादीवर शाल्वाच्या मुलाला व करुष देशाच्या गादीवर वक्रदंताच्या मुलाला राज्याभिषेक करविला. याप्रमाणें रुक्मीशिवाय श्रीकृष्णाच्या सर्व हाडवैऱ्यांचा नाश झाला. रुक्मी हा श्रीकृष्णाच्या आवडत्या रुक्मिणी-पट्टराणीचा भाऊ असल्यानें रुक्मिणीवरच्या प्रेमामुळें श्रीकृष्णानें त्याचा नाश करण्याचें कधींच मनांत आणलें नाहीं. आणि बहिणीवरच्या प्रेमामुळें तोहि श्रीकृष्णाच्या वाटेस कधीं गेला नाहीं. असो.

तिकडे पांडवांच्यावरहि ह्याच वेळीं संकटपरंपरा येत होती. युद्ध करून पांडवांची साम्राज्यलक्ष्मी हरण करणें अशक्य आहे, असें पाहून दुर्योधन, दुःशासन, शकुनि व कर्ण ह्या चांडाळ-चौकडीनें कपटद्यूतानें त्यांच्या साम्राज्याचा अपहार करण्याचें ठरविलें. अंधळ्या धृतराष्ट्राचेंहि त्यांनीं ह्या

गोष्टीला अनुमोदन मिळविलें. पाडवांना काहीं तरी निमित्तानें हस्तिनापुरास बोलावून आणून धर्मराजाला द्यूत खेळायला लावावे असे ठरवून धृतराष्ट्रानें आपल्याकरितां ' तोरणस्फटिका ' नांवाचें एक प्रचंड सभागृह बाधविले. आणि तें पाहाण्याकरिता पाडवानीं सहकुटुंब अवश्य यावें, म्हणून मुद्दाम त्याने विदुराला पाठविलें. विदुरानेहि ती कामगिरी मुक्काम पत्करली, कारण त्याच्या मनात धर्मराजाला तेथे द्यूत न खेळण्याची सूचना द्यावयाची होती. विदुराने इंद्रप्रस्थास जाऊन धर्मराजाला ' धृतराष्ट्राच्या बोलावण्याप्रमाणें जायचें असेल तर जा, पण तेथे द्यूत खेळण्याचे मात्र निश्चयानें नाकार, असे सांगितलें. धृतराष्ट्राच्या बोलावण्याला मान देऊन धर्मराज दुसरे दिवशीं सकाळीं आपले सर्व बंधू, सेवक व द्रौपदी आदिकरून सर्व स्त्रिया बरोबर घेऊन हस्तिनापुरास जाण्यास निघाला. कोणत्या कुमुहूर्तावर तो इद्रप्रस्थाहून निघाला कोणास ठाऊक ! पुढे अत्यंत दीर्घकालपर्यंत त्याला इंद्रप्रस्थास यावयास मिळाले नाहीं. हस्तिनापुरास पोहोंचल्यावर त्यानें धृतराष्ट्र, गाधारी, भीष्म, द्रोण, कृप याची भेट घेऊन त्याचे आशीर्वाद मिळविले. दुर्योधनादि बंधू, भावजया, जयद्रथादि आप्त ह्या सर्वांनी पाडव, द्रौपदी वगैरे सर्वांचे फारच आनंदाने स्वागत केले. ह्याप्रमाणें सारे कुरुवंशज एकत्र जमले असताना, गप्पागोष्टी, मेजवान्या, गाणे, बजावणे, ह्यामध्यें सर्वांनाच दोन दिवस मोठे आनंदात गेले. तिसऱ्या दिवशीं प्रातःकालीं सर्व आह्निक आटोपून युधिष्ठिरादि सर्व पांडव त्या ' तोरणस्फटिका ' नावाच्या रमणीय सभेंत गेले. तेथें जमलेल्या सर्व राजेलोकांनीं व द्यूतकारानीं त्याचा मोठा आदरसत्कार केला. नंतर पाडवांनीं राजाच्या भेटी घेतल्या. वयोमानाप्रमाणें कोणाला प्रणाम, कोणाला आलिंगन, कोणाला आशीर्वाद वगैरे देऊन स्वागत झाल्यानंतर चित्रविचित्र पसरलेल्या मनोहर बैठकीवर आपआपल्या योग्यतेनुसार ते स्थित झाले. अशा प्रकारें पांडव व सर्व राजे आपापल्या जागेवर बसले तेव्हा सुबलपुत्र शकुनीनें युधिष्ठिराला म्हटलें,—" राजा, सभेमध्यें हा पट पसरला असून आम्ही सारे तुझीच मार्गप्रतीक्षा करीत आहों. तर आतां फासे टाकून द्यूताला प्रारंभ होऊं द्या. " शकुनीचे हे शब्द कानांवर

पडतांच इंद्रप्रस्थनगरींत विदुरानें केलेली सूचना धर्मराजाच्या मनासमोर उभी राहिली. त्यानें द्यूत खेळणें किती घातक आहे त्याचें वर्णन करून द्यूतकारांची निर्भर्त्सना केली. शकुनीनें युद्ध, विद्या वगैरे दुसऱ्याला जिंकण्याचीं साधनेंहि द्यूतासारखींच आहेत असें सांगून द्यूताचे समर्थन केलें, व युद्धाचें अगर द्यूताचें आव्हान खऱ्या क्षत्रिय राजानें स्वीकारलेंच पाहिजे असें शास्त्रहि सांगितलें आणि दुर्योधनातर्फे द्यूताचें आव्हान धर्मराजाला दिले. जगाचा असा नियमच आहे कीं, वीज चमकली म्हणजे डोळे दिपून जाऊन ज्याप्रमाणें झांपड पडते, त्याप्रमाणें मनुष्यावर दुर्दैवाचा फेरा आला म्हणजे त्याची बुद्धि कुंठित होऊन तोहि पाशांत बद्ध झाल्यासारखा दुर्दैवाच्या आधीन होतो. 'आव्हान' हा शब्द ऐकतांच युधिष्ठिर द्यूत खेळावयास तयार झाला. द्यूताला प्रारंभ होण्याची वेळ होते न होते तोंच दुसरेहि अनेक निमंत्रित राजे धृतराष्ट्राबरोबर सभेंत आले. त्यांच्याबरोबर भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, महाविवेकी विदुर हेहि आले. ते बसल्यानंतर वरकरणी मित्रभावानें द्यूतास आरंभ झाला.

पाहिल्या प्रथम युधिष्ठिरानें, महासागराच्या भोंवऱ्यामध्यें सापडलेलें बहुमोल रत्न ज्यांच्या मध्यभागीं बसविलें आहे असा बावनकशी सोन्यामध्यें गुंफलेला फार मोठ्या किंमतीचा रत्नजडित हार पणास लावला. दुर्योधनानेंहि त्या हाराच्या जोडीला आपला रत्नहार पणास लावला. अक्षविद्येंत निष्णात व कपटपटु अशा शकुनीनें दुर्योधनाकरितां फासे हातांत घेतले. त्यानें ते टाकण्याचा अवकाश कीं लगेच तो ओरडून म्हणाला "हं, हा हार जिंकला! चला पुढें." युधिष्ठिरानें आणखी द्रव्य पणाला लावलें. तेंहि तो हरला शकुनीनें प्रत्येक डाव जिंकला. युधिष्ठिरानें अगणित संपत्ति पणास लावली, आणि शकुनीनें आपल्या कपटविद्येच्या जोरावर ती जिंकली. ह्या द्यूताचें सविस्तर वर्णन करण्याचें ह्या प्रस्तुत चारित्रांत कांहीं कारण नाहीं. ईर्षेला चढलेल्या युधिष्ठिरानें सुवर्णानें भरलेल्या हजारों उत्तमोत्तम पेट्या, हजारों सुंदर रथ, घोडे, हत्ती, दास, दासी, ब्राह्मणांना दान दिलेल्या गाई व जमिनीखेरीज बाकी सर्व सिंधू नदीच्या

पूर्वेपासून पर्णा नदीपर्यंतचा भूमीचा भाग व त्यावरील बैल, घोडे, शेळया, मेंढ्या, असंख्य धेनू असें हें अपरंपार पशुधन पणाला लावलें, आणि गमावलें. धृतराष्ट्र व त्याचे पुत्र आनंदानें बेहोष होऊन टाळया वाजवूं लागले. तें पाहून विदुरानें मध्येंच द्यूत थांबवून युधिष्ठिराची कान उघाडणी करण्याचा प्रयत्न केला. धृतराष्ट्र दुर्योधनादिकांची, कपटानें पांडवांच्या सर्वस्वाचा अपहार करण्याच्या निंद्य कृत्याबद्दल अत्यंत कठोर शब्दांत त्यानें निर्भर्त्सना केली. पण पालथ्या घड्यावर पाणी ! कांहींहि उपयोग झाला नाहीं. युधिष्ठिरानें सर्व राज्य गमाविल्यानंतर आपल्या भावानाहि पणाला लावलें, शेवटीं आपणा स्वतःला पणास लावून तो डाव हरला. परंतु द्रौपदीला पणाला लावण्यापूर्वी युधिष्ठिर स्वतः जिंकला गेला, हें दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनि, ह्या चाडाळ-चौकडीला रुचलें नाहीं. पांडवांची पूर्ण दुर्दशा करण्याचा आपला डाव फसला असें त्याना कळलें. पण सत्यासत्याची, धर्माधर्माची पर्वा न करणारे ते दुष्ट खल धर्माला खोट्या इरेला घालण्याच्या इच्छेनें ओरडून म्हणाले, "धर्मा, आणखी थोडी तुझी संपत्ति तुझ्या नजरचुकीनें राहिली. तुझी बायको द्रौपदी पणाला लावावयाची राहिली. पाहा, तिच्या तरी पुण्याईनें तुला जय मिळून तूं दास्यांतून मुक्त होतोस कीं नाहीं!" धर्माजवळ आतां विचार म्हणून कांहीं पदार्थ उरलाच नव्हता. त्यानें अविचारानें द्रौपदीला पणाला लाविलें आणि ती जिंकली गेली. पांडवांच्या फाजितीला आतां पारावार राहिला नाहीं. 'द्रौपदी आमची दासी झाली, द्रौपदी आमची बटीक झाली, तिला खेंचून ह्या सभेंत घेऊन या.' असें ओरडून कौरवांनीं एकच गिल्ला केला. हे अपवित्र शब्द ऐकून भीष्म-द्रोणादि सज्जनांनीं 'हरहर' असे उद्गार काढून कानांत बोटें घातलीं. दुर्जनांनीं आनंदानें टाळयाचा कडकडाट केला. सिंहासारखे पांडव, पण आतां गोगलगाय बनून लज्जेनें खालीं माना घालून बसले.

कौरवांच्या स्त्रिया जेथें बसलेल्या होत्या तेथें त्यांचा आश्रय घेण्याकारितां द्रौपदी धांवत गेली. तिला तेथून आणण्याचें कोणाचें धैर्य होईना. शेवटीं कर्णाच्या चिथावणीनें दुःशासनानें आपल्या स्त्रीच्या व भावजयांच्या

आरडाओरडीला व प्रतिकाराला न जुमानिता, द्रौपदीला तिच्या वेणीला धरून फरफरा ओढीत कौरवसभेंत आणलें. सज्जनांनीं डोळे मिटून माना खालीं घातल्या. 'द्रौपदी आमची दासी झाली' असें फिरून सर्व कौरव ओरडले. हे शब्द ऐकताच द्रौपदीने सर्व धैर्य एकवटून एकदम म्हटलें, "द्रौपदी दासी झाली हे ह्या दुष्टाचे शब्द बरोबर आहेत काय सांगा. तुम्ही धर्मशास्त्रनिपुण गुरु, आचार्य, कुरुकुळातील वृद्ध वृद्ध पूज्य पुरुष, ह्या ठिकाणीं बसला आहात. धर्मराज स्वतः जिंकले गेल्यानंतर त्यांना मला पणाला लावता येईल काय? बोला, मी दासी झाले असें यांचें म्हणणे धर्मशास्त्राला धरून आहे का सांगा!" द्रौपदीचें हें भाषण ऐकून सर्व स्तब्ध बसले. कोणीच बोलेना हें पाहून कौरवांपैकींच एक विकर्ण उठून उभा राहिला आणि त्याने निर्भीडपणे सांगितले, 'जिंकल्या गेलेल्या धर्माला, द्रौपदीला पणाला लावता येत नाहीं. ती दासी झाली नाहीं. तिला दासी झाली असें म्हणणे हा नीचपणाचा कळस आहे.' पण कौरवांच्या निर्लज्जपणाचा कळस अद्याप दिसायचाच होता. 'पांडव दास झाले, द्रौपदी दासी झाली. ह्या भिकारड्यांच्या अंगावरचीं मौल्यवान वस्त्रे हिसकावून घ्या!" अशी ओरड कौरवांनीं करताच, पांडवांनीं चटकन आपल्या अंगावरचीं वस्त्रे फेकून दिलीं. 'दुःशासना, द्रौपदीच्या अंगावरचे वस्त्र फेडून घे,' असे कर्ण-दुर्योधनांनीं म्हणताच दुःशासनाने तिच्या वस्त्राला हात घातला. आता मात्र कौरवांच्या निर्लज्ज-पणाचा कळस झाला. प्रसिद्ध शंतनूच्या कुळातील पुण्यश्लोक युधिष्ठिराच्या महान् पतिव्रता स्त्रीवर आलेला हा दुर्धर प्रसंग पाहून मूर्तिमंत लज्जाहि काळवंडली. द्रौपदीने फोडलेला हंबरडा ऐकून कौरवांच्या स्त्रियांनींहि रडून आकांत केला. भीष्म द्रोणादि मंडळींनीं आपले डोळे पुसले. कृतांतासारखा भीम, धनुर्धर अर्जुन, महारथी नकुळ-सहदेव, पण ह्या वेळेस सर्व दिङ्मूढ झाले. दीन झालेल्या द्रौपदीची लाज राखून दुष्ट दुःशासनाचें पारिपत्य करील असा त्या अनेक राजांच्या सभेंत कोणी एकहि वीर दिसला नाहीं. उलट कर्ण दुःशासनाला जोरानें म्हणाला, "त्या दासीची एक क्षणभरहि गय करूं नकोस. फेड, तिचें लुगडें फेड, आणि या राजसभेंत, एक नव्हे

दोन नव्हे, पाच पुरुषाशीं स्त्री म्हणून राहणाऱ्या ह्या दुराचारी स्त्रीला नग्न कर." कर्णाचे हे शब्द ऐकतांच दुःशासनाने द्रौपदीच्या लुगड्याला जोराचा हिसका दिला. त्याबरोबर भीम एकदम उसळला आणि दात ओठ खात म्हणाला, "काय करूरे! धर्माने मी बांधला गेलों आहे. आणि माझ्या हातून ह्याच वेळीं घोर अविचार होऊं नये म्हणून हा धनुर्धर पार्थ मला मागे खेंचतो आहे. पण ऐका, ह्या सभेंतले सर्व लोकहो, हे माझे, ह्या भीमाचे शब्द, या भीमाची घोर प्रतिज्ञा ऐकून ठेवा. द्रौपदीच्या केंसाला आणि लुगड्याला हात लावणाऱ्या ह्या दुष्टाचे–ह्या दुःशासनाचे पापी हात आणि नीच हृदय रणांगणावर मी आपल्या गदेने फोडून टाकीन आणि ह्याच्या नरडीच्या रक्ताचा घोट घेईन. ह्या दुष्टाच्या रक्ताने माखलेल्या हाताने द्रौपदीचे हे सुटलेले केस बांधीन. जर माझ्या हातून हे न झाले, तर मला अनंत जन्म नरकवास घडो. भीमाची ही घोर प्रतिज्ञा ऐकून सभेंतल्या सर्वांच्या अंगावर काटा उभा राहिला. कौरवांच्या अंगाला दरदरून घाम सुटला; दुःशासनाच्या डोळयांपुढे तर काजवे चमकले, आणि लुगडे धरलेला त्याचा हात क्षणभर लुळा पडला. नीच कर्ण, त्याची ती अवस्था पाहून त्याला उत्साह आणण्याकरितां म्हणाला, "दुःशासना, पुढे रणांगणावर काय होते ते पाहूं. आज ह्या द्रौपदीला नग्न करून तिच्या ह्या पांच नवऱ्यांचा दुबळेपणा सर्व जगाला दाखीव." झालें. कर्णाचे हे भाषण ऐकतांच दुःशासनाने द्रौपदीच्या लुगड्याला हिसड्यावर हिसडे देऊन भरसभेंत तो ते फेडूं लागला. तेव्हां त्या निर्वाणीच्या प्रसंगाला आपल्याला कोणीच उपयोगी पडत नाहीं असे पाहून तिने भगवान् श्रीकृष्णाला कळवळून हाक मारली. ती म्हणाली,

"हे गोविंदा! द्वारकानिवासी कृष्णा! हे गोपीजनप्रिया, केशवा, हे नाथा, हे लक्ष्मीपते, हे व्रजनाथा, हे दुःखविमोचना! हे जनार्दना, ह्या कौरवसागरामध्यें मी बुडत आहें. यांतून माझा उद्धार कर! हे कृष्णा, हे योगेश्वरा, हे सर्वान्तर्यामी विश्वंभरा, ह्या कुरुवंशामध्ये नाश पावत असलेल्या मज शरणागतेचें तूं रक्षण कर.'' असे म्हणून ती आपल्या हातांनीं लुगडें सुटूं न देण्याची पराकाष्ठा करीत असतांना तोडाने 'कृष्णा,

कृष्णा धांव.' असें मोठ्यानें म्हणून रडूं लागली. "कृष्णा धांव, तुझ्या खलनाशक सुदर्शनचक्रासह लवकर धावत ये." असे तिनें मोठ्यानें शब्द उच्चारिले मात्र—अहाहा, काय चमत्कार सांगावा! ह्या पवित्र भारतभूमीचें नांव अत्यंत उज्ज्वल करणाऱ्या पातिव्रत्यरूपी धर्माच्या तेजानें व सुदर्शन चक्रधारी श्रीकृष्णाच्या नावाच्या उच्चारानें, ती सर्व सभा मोहित होऊन तेथें अपूर्व चमत्कार झाला. द्रौपदीनें कृष्णाच्या नावानें सारखा टाहो फोडतांच, राजसूय यज्ञात अग्रपूजेनंतर श्रीकृष्णाची निंदा करणाऱ्या शिशुपालाची सुदर्शनचक्राने एकदम काय अवस्था केली त्याचें भयंकर दृश्य सर्वांच्या डोळ्यांसमोर उभें राहून, आतां कृष्णभक्त द्रौपदीचा छळ चालला असतांना तोच भयंकर प्रकार पुनः घडणार असें सर्वांच्या मनांत एकदम येऊन, सर्वांच्या तोंडून 'हा हा हा हा' असा शब्द स्वाभाविकपणें एकदम निघून त्याच्याच त्या एकवटलेल्या हाहाकाराच्या प्रचंड नादानें सभेंतल्या सर्वांच्या पोटांत धडकी भरली. राजसूय यज्ञात एका शिशुपालाचेंच मस्तक उडालें. आज सर्व कौरवाचीं मस्तकें सुदर्शन उडविणार, असें वाटून कौरवांच्या बाजूला बसलेले सर्व राजे एकदम उठले आणि स्वतःवर तो प्रसंग येऊं नये म्हणून प्राणभयानें ते पांडव-द्रौपदीच्या बाजूला धांवत सुटले. जिकडे तिकडे एकच गोंधळ झाला. दुःशासनानें चालविलेल्या हिसकाहिसकींत जर द्रौपदीचें वस्त्र सुटलें तर तिचें नग्न शरीर दृष्टीस पडून त्या पापाचें प्रायश्चित कोणालाच भोगायला लागूं नये; तिला आपलें शरीर झटकन् झांकतां यावें, म्हणून त्या समयश राजसमूहानें तिच्यावर अत्यंत मौल्यवान भरजरी शाली, शेले, दुपेट्याचा वर्षाव केला. दुःशासन पराकाष्ठेचा गोंधळून द्रौपदीच्या लुगड्याचा हात सोडून स्वस्थ बसला. इतक्यांत सभेच्या बाहेर एकाएकीं कोल्हे ओरडूं लागले, गर्दभानीं आपला कर्कश ध्वनि सुरू केला, आणि कावळ्यासारख्या अभद्र, अमंगळ पक्ष्यांनीं एकच कलकलाट केला. सभेंतला तो गोंधळ आणि बाहेर चाललेला तो घोर अभद्र ध्वनि ऐकून भीष्म, द्रोण, कृप, विदुर, यांनीं सभेंत, व राणीवशांत बसलेल्या गांधारी, कुंती, यांनीं अरिष्ट-शांत्यर्थ 'स्वस्ति स्वस्ति' असे मंगल शब्द मोठ्यानें उच्चारायला सुरवात

केली. राजे लोकांनींहि त्याचेंच अनुकरण करून 'स्वस्ति स्वस्ति' असा घोष चालविला. अंधळा धृतराष्ट्र, तो सर्व प्रकार काय चालला होता हें न दिसल्यामुळें फारच घाबरला. त्यानें विदुराला हांक मारण्याचा सपाटा चालविला. विदुरानें धृतराष्ट्राजवळ जाऊन एकदम म्हटलें, "राजा, तुझ्या मूर्ख कुलकलंक पुत्रानीं, कर्ण-शकुनीसारख्या नीचाच्या नादीं लागून चालविलेली द्रौपदीची विटंबना अजून तरी थांबीव. आणि पांडवाचा कैवारी भगवान् श्रीकृष्ण आपल्या सुदर्शनासह येथे येण्याचे पूर्वी पांडवाना मुक्त करून आपले व आपल्या पुत्राचे प्राण वांचीव. हा अभद्र, घोर ध्वनि आणि हा सभेंतला गोंधळ ह्या गोष्टी तुम्हाला लवकरच प्राप्त होणारा मृत्युयोगच सुचवीत आहेत."

विदुराचे हे शब्द ऐकतांच धृतराष्ट्र घाबऱ्या घाबऱ्या सिंहासनावरून उठून उभा राहिला व हात वर करून मोठ्यानें ओरडून म्हणाला, "हे मूर्खा दुर्योधना! झाला, तुझा सर्वस्वी घात झाला! तुझ्या मस्तीनेंच तूं ठार बुडालास. भरसभेंत, कुरुवंशातच उत्पन्न झालेल्या पांडवाच्या धर्मपत्नीशीं, महान् पातिव्रता द्रौपदीशीं, बाचाबाच करीत बसला आहेस! केवढा हा तुझा अधमपणा!" धृतराष्ट्राचें हें भाषण ऐकून सर्व सभा एकदम शांत झाली धृतराष्ट्र पुढें म्हणाला, "विदुरा, मला द्रौपदीजवळ घेऊन चल. माझ्या मूर्ख पोरानीं केलेल्या आगळिकीबद्दल माझ्या त्या आवडत्या सुनेचें मी स्वतः सांत्वन करितों." विदुरानें धृतराष्ट्राचा हात धरून त्याला द्रौपदीजवळ नेऊन उभा केला. धृतराष्ट्र जवळ येऊन उभा राहिलेला पाहातांच द्रौपदीनें आपलें वस्त्र सावरलें व 'मामंजी, मी तुम्हांला नमस्कार करतें' असें हुंदके देत देत ती म्हणाली. धृतराष्ट्रानें सांत्वन-पूर्वक तिला म्हटलें, "बाई पांचाली, तूं मोठी धार्मिक व पतिव्रता असल्या-मुळें तूं मला माझ्या सर्व सुनांहून आवडती आहेस. माझ्या पुत्रांनीं, तुझ्या अज्ञ दीरांनीं, केलेली आगळीक तूं उदार अंतःकरणानें विसरून जा, असें माझें तुला सांगणें आहे. तुझें आजचें धीरोदात्त वर्तन पाहून मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुला काय पाहिजे असेल, तो वर माझ्या-पासून मागून घे." द्रौपदी म्हणाली, "हे भरतवंशजाश्रेष्ठ, तुम्ही मला वर

देतों म्हणतां त्याअर्थी सर्वस्वी धर्मानें वागणारा हा वैभवशाली युधिष्ठिर दास नसावा, एवढेंच तुमच्यापाशीं माझें मागणें आहे." धृतराष्ट्र म्हणाला, "हे कल्याणि, तूं म्हणतेस त्याचप्रमाणें होईल. भद्रे, तुला दुसरा वर देण्याबद्दलहि माझें मन उतावीळ झालें आहे. माग बाळे, दुसरा पाहिजे तो वर मागून घे." द्रौपदी म्हणाली, "हे राजा, तर मग भीमसेन व अर्जुन, नकुळ व सहदेव हेहि आपल्या रथ-धनुष्यासह दास्यत्वातून मुक्त होऊन स्वतंत्र व्हावेत, हाच वर मी मागतें." धृतराष्ट्र म्हणाला, "हे महाभाग्यवती द्रौपदी, हेंहि सर्व तुझ्या इच्छेप्रमाणें घडेल. परंतु हे आनंदवल्लरि, केवळ ह्या दोन वरानीं तुझा यथायोग्य सत्कार मीं केला असें मला वाटत नाहीं. ह्याकरिता तूं माझ्यापासून तिसरा वर मागून घे. कारण तूं माझ्या सर्व सुनामध्ये श्रेष्ठ व धर्मानें वागणारी आहेस." द्रौपदी म्हणाली, "हे भगवन, जगामध्यें लोभ फार वाईट आहे. धर्माच्या नाशाला कारण तोच. ह्याकरिता तिसरा वर, मी क्षत्रियाची स्त्री असल्यानें, मला मागता येत नाहीं. वैश्याला एक वर, क्षत्रिय स्त्रियाना दोन वर, राजाना तीन व ब्राह्मणांना शंभर वर मागण्याचा अधिकार आहे. माझे पति संकटातून मुक्त झाले हें कांहीं थोडें झालें नाहीं. तेवढे पुरे. आता हे राजा, ते आपल्या पवित्र आचरणाने आणि लोकोत्तर शौर्यानें भाग्याला चढतील." धृतराष्ट्रानें दिलेल्या वरानें सर्व पांडव दास्यमुक्त झाले.

सुदर्शन-चक्रधारी भगवान् श्रीकृष्णाची ह्या वेळीं सर्व राजसमूहावर केवढी जरब बसली होती हें स्पष्ट झालें. सुदर्शन-चक्रधारी श्रीकृष्णाच्या नुसत्या नामोच्चारानें द्रौपदी दुर्धर प्रसंगांतून सुटली व पांडवांच्या पायातील दास्यशृंखला गळून पडल्या. धृतराष्ट्रानें धर्मराजाला मोठ्या प्रेमानें जवळ बोलावून म्हटलें, "धर्मा, तूं मूर्तिमंत धर्म आहेस. आमच्या सर्व कौरवकुळाचें अभिमानाचें स्थान तूं आहेस. तूं आतां तुझे बंधु, भार्या द्रौपदी व सर्व परिवार यांसह सुखानें इंद्रप्रस्थास जा व साम्राज्यसुखाचा उपभोग घे. दुर्योधन, दुःशासन यांचे अपराध तूं मनांत ठेवूं नकोस. तुला मातृतुल्य गांधारी व पितृतुल्य असणारा वृद्ध व अंध असा मी, ह्या आम्हांकडे तूं लक्ष दे." धृतराष्ट्राची आज्ञा घेऊन आपल्या सर्व मंडळीसह रथांत

बसून पांडव इंद्रप्रस्थास जाण्यास निघाले.-

पांडव इंद्रप्रस्थास चालले असें पाहातांच दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनी ही चांडाळचौकडी धृतराष्ट्राकडे धावत गेली. दुर्योधन म्हणाला, " अहो बाबा, हें काय केलेंत ! ह्या पाडवांना तुम्हीं जाऊ दिलेत. आता शेपटीवर पाय पडल्यानें चिडलेल्या सर्पाप्रमाणें ते आमचा नायनाट केल्याशिवाय राहाणार नाहींत. आम्ही द्रौपदीचा छळ केला ही गोष्ट ते कांहीं झालें तरी विसरणार नाहींत. म्हणून आमचें कल्याण व्हावें अशी आपली इच्छा असेल तर, युधिष्ठिराला परत बोलावून त्याला आमच्याशीं पुनः एकदांच व एकच डाव द्यूत खेळण्यास सांगा. जो हरेल त्यानें बारा वर्षें वनवास करावा, व तेरावें वर्ष अज्ञातवासात घालवावें. हा पण आम्हीं जिंकला तर पांडव बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास करून परत येतील. तोपर्यंत तेरा वर्षांच्या अवधींत आम्ही हवे तेवढे मित्र जुळवू, आणि शत्रूला कधींहि हार जाणार नाहीं, अशा अफाट सैन्याची कडेकोट तयारी करून आपलें राज्य अगदी निर्भय करून टाकूं शकुनीच्या अक्षविद्येच्या जोरावर हा पण आम्हीच जिंकूं, ह्याबद्दल खात्री बाळगा, आणि पाडव आमच्याबरोबर पुनः एकवार द्यूत खेळतील असें करा. असें केलें तरच आम्ही तुमचे पुत्र पाडवाच्या हातून जिवंत राहूं " चंचल वृत्तीच्या धृत-राष्ट्राला पुनः पुत्रप्रेमाचा उमाळा आला. त्यानें पाडवाना परत बोला-वण्याकारितां प्रातिकामी नामक सारथ्याला पाठविलें. हें पाहाताच भीष्म, विदुर, महारथी विकर्ण, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, कृपाचार्य, भूरिश्रवा, ह्या सर्वांनीं पुनः द्यूताच्या फंदात न पडण्याबद्दल धृतराष्ट्राला परोपरीनें सागितलें, पण त्या अंधळ्यानें कोणाचे ऐकले नाहीं. गाधारीनेही त्याला पुष्कळ सांगून पाहिलें. शेवटीं तर तिनें " पुनः द्यूत खेळूं देण्यानें, तेरा वर्षांनीं सर्व पुत्रांच्या मृत्यूला तुम्ही निश्चित कारण होणार आहां. " असें स्पष्ट सांगितलें, तरी त्याचा काहीं उपयोग झाला नाहीं. विनाशकाल प्राप्त झाला असतां पुरुषाची बुद्धि नष्ट होते हेंच खरें धृतराष्ट्राचा निरोप ऐकतांच हस्तिनापुरापासून बऱ्याच लांबीवर गेलेला युधिष्ठिर पुनः परत फिरला, व द्यूत खेळण्यास तयार झाला. एकदां शकुनीच्या कपटद्यूतानें

पक्का होरपळून निघाला असतां धर्मज्ञ युधिष्ठिर पुनः द्यूत खेळण्याला कां तयार झाला त्याचें विवेचन करण्याचे हें स्थळ नाहीं. वनवासाचा पण लावून युधिष्ठिर द्यूत खेळला आणि हरला. पांडवांच्या नाशिबीं वनवास आला. पांडव द्रौपदीसह वनवासास निघाले. कुंतीला विदुरानें आपल्या घरीं आदरानें ठेवून घेतलें व तिच्याबद्दल कांहींहि काळजी न करण्याविषयीं पांडवाना सांगितलें. सुभद्रा अभिमन्यूसह द्वारकेला माहेरीं गेली. पांडवांच्या इतर स्त्रिया आपापल्या पुत्राना बरोबर घेऊन आपापल्या माहेरीं गेल्या. द्रौपदीपुत्र द्रुपदराजाकडे आजोळीं गेले. आजिनें परिधान करून पांडव द्रौपदीसह वनांत जाण्यास त्या सभेंतून निघाले तेव्हां त्यांच्याकडे पाहून त्यांची दुःशासनानें फार निंदा केली. त्याना तो वाटेल तसे अपशब्द बोलला. पांडव शांतपणें ऐकून घेत आहेत असें पाहून दुःशासन द्रौपदीला उद्देशून म्हणाला, " द्रौपदी ! तुझ्या बापाने तुला ह्या मूर्ख पाडवांना देऊन तुझ्या जन्माचें मातेरें केलें. आतां तरी तूं शहाणपणानें ह्या भिकारी, दुर्बळ पांडवांचा त्याग करून आम्हां कौरवांपैकीं कोणालाहि नवरा म्हणून पसंत कर. ह्या वैभवसंपन्न राजाधिराज दुर्योधनाकडे पाहा. त्याची अर्धांगी होण्याचें ठरवून तूं त्याच्या मांडीचा आश्रय घे." दुःशासन हे शब्द बोलतांच दुर्योधनानें मोठ्यानें उपहासपूर्वक हंसून द्रौपदीला आपली मांडी थोपटून दाखविली. त्याबरोबर आतापर्यंत आवरून धरलेला भीमाचा क्रोध एकदम उसळला. त्याचे डोळे क्रोधानें लाल झाले. संतप्त झालेला भीमसेन ओरडून म्हणाला, "नीचा दुर्योधना, भयंकर माजलेल्या रणकंदनांत तुझी हीच मांडी मी जर ह्या माझ्या गदेनें न फोडीन तर ह्या भीमसेनाला त्याच्या पूर्वजांना मिळालेली सद्गति कधींहि मिळणार नाही. आणि दुष्टा दुःशासना, आमच्या काळजाला घरे पाडणारी तूं आतां जी बडबड केलीस ती तुझी भयंकर चूक झाली हें, युद्धांत तुझें काळीज मी खरोखरीच फोडूं लागलों म्हणजे तुला कळेल. तुम्हां सर्व कौरवांना आणि तुमच्यापुढें लांगूलचालन करून तुमच्या बाजूनें बोलणाऱ्या सर्वांना ह्या गदेनें हाडें चूर्ण झाल्यानें यमसदनाचा रस्ता धरावा लागेल." अर्जुन म्हणाला, 'भीमा, आजपासून चौदाव्या वर्षी दुर्योधनाची मांडी फोडून

त्याला तूं धुळींत लोळवशील, ह्या दुरात्म्या दुःशासनाचें वक्षःस्थळ फोडून मृगराज सिंहाप्रमाणें त्याचें रक्त प्राशन करशील; ह्या तुझ्या प्रतिज्ञे-प्रमाणें दुर्योधनादि सर्व धृतराष्ट्रपुत्र तुझ्या गदेला खास बळी पडतील. माझीहि एक प्रतिज्ञा ही सभा ऐकून ठेवूं दे. ह्या मत्सरानें भरलेल्या, आमचें शक्य तितकें वाईट करण्याविषयीं ह्या दुष्ट कौरवबंधूंना भर देणाऱ्या ह्या दुरात्म्या कर्णाचा शिरच्छेद मी तुझ्या आज्ञेनें करीन. कर्ण आणि कर्णाचे अनुयायी ह्याचा संग्रमात मीं वध केल्यानंतर जे जे कौरव-पक्षीय राजे युद्धात माझ्यासमोर येतील त्या सर्वांना मी यमसदनाला पाठ-वीन. आजपासून चौदाव्या वर्षी आमचें राज्य आम्हाला दुर्योधनानें सत्कारपूर्वक दिलें नाहीं तर भयंकर रणकंदन करून आम्ही इतक्या गोष्टी निःसंशय घडवून आणूं." सहदेव म्हणाला, "इतक्या अनर्थाला कारण असा जो हा फांसे हातात धरणारा शकुनि तो माझ्या तीक्ष्ण बाणाला बळी पडलेला सर्वांना दिसेल." नकुलाने प्रतिज्ञा केली,—"द्रुपदकन्येला व आम्हा पांडवांना अनुलक्षून ह्या दुष्टानीं जी मर्मभेदक भाषणे केलीं तीं ऐकून ज्याना ज्याना आनंदाच्या गुदगुल्या झाल्यासारख्या मला दिसल्या त्या सर्वांना टिपून काढून मी समरंगणात यमसदनाची वाट दाखवीन." पांडवांच्या ह्या प्रतिज्ञा ऐकून सभेंतील सर्व लोक हवालदिल झाले. आपण मृत्यूच्या मुखात शिरत आहों, असें सर्वांना वाटलें.

युधिष्ठिरानें सर्व बंधू व द्रौपदी याच्यासह भीष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा वगैरे मान्यवराना भेटून त्याचा निरोप घेतला. सर्वांनीं एक शब्दहि न बोलतां मनांत पांडवाचें कल्याण चिंतिलें व त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना आशीर्वाद दिले. नतर विदुराच्या घरीं जाऊन पांडवानीं विदुराला व कुंतीला नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यावेळीं कुंतीनें केलेला विलाप ऐकून पाषाणालाहि द्रव आला असता. पांडवानीं आपल्या आईचें कसेंबसें सात्वन केलें आणि ते हास्तिनापुराच्या बाहेर पडले. अशा प्रकारें पांडवांच्या वनवासास प्रारंभ झाला. पांडवांच्या हातून सर्व धर्म-कृत्यें वनांतहि उत्तम तऱ्हेनें व्हावींत म्हणुन त्याचे पुरोहित धौम्य महा-मुनि त्यांच्याबरोबर वनात गेले. धर्मनिष्ठ पांडवांचा नित्य सहवास घडावा

व दुर्योधन–दुःशासन–कर्णासारखे दुष्ट ज्या ठिकाणीं वास्तव्य करतात त्य दूषित वातावरणात राहावें लागूं नये म्हणून अनेक वैराग्यसंपन्न विद्वान ब्राह्मण हस्तिनापुराचा त्याग करून वनांत गेले.

पाडव महावनांत वनवासाकरितां गेले ही मनाला अत्यंत उद्विग्न आणणारी दुःखकारक वार्ता एकाएकीं कानावर येताच भगवान् श्रीकृष्ण द्वारकेहून निघाले व महावनात पाडवांना भेटण्याकरिता गेले. त्याच्या बरोबर वसुदेव, बलराम वगैरे यादव व अंधक, भोज, याचे वंशजहि होते तसेच पांचाळ देशचा युवराज धृष्टद्युम्न, चेदिदेशाचा अधिपति धृष्टकेतु, व केकय देशाचे पराक्रमी अधिपति पाडवांना भेटण्याकारिता वनात गेले भगवान् श्रीकृष्ण व ते सर्व क्षत्रियश्रेष्ठ राजे युधिष्ठिरादि पांडवाना भेटून त्यांच्या भोवतीं बसले. भगवान् श्रीकृष्ण खिन्न होऊन म्हणाले, " दुर्योधन कर्ण, दुरात्मा शकुनि व दुःशासन ह्यांच्या रक्ताची तहान भूमीला लागलेली दिसत आहे. कारण, लवकरच ह्या चाडाळचौकडीला त्यांच्या अनुयायी राजांच्यासह युद्धात ठार मारून आम्हीं सर्वजणानीं मिळून धर्मराजाल फिरून राज्याभिषेक करण्याचा निश्चय केला आहे. पांडवहो, तुम्ही काहीं काळजी करू नका. आम्ही दूर आहों असे पाहून ज्या दुष्टानीं तुम्हाल द्यूतात फसवून कपटानें राज्यभ्रष्ट केलें, त्यांचा आम्ही हां हां म्हणतां कस निकाल लावून तुम्हांला राज्यावर बसवितों ते पाहा तर खरें. जो आपणाशी कपटाचे वर्तन करील त्याचा नाश करणें हा क्षत्रियांचा धर्मच आहे.' श्रीकृष्णाचे हें भाषण ऐकतांच द्रौपदीला आनंद झाला. श्रीकृष्ण संतापले आहेत असे पाहून अर्जुन त्यांचा राग शांत करण्याकरितां म्हणाला " आम्हां पांडवांचा परम सखा भगवान् श्रीकृष्ण क्रुद्ध झाल्यावर कोणत पामर जिवंत राहूं शकेल ? आम्हां पांडवांचें नेहमींच हित पाहाणार श्रीकृष्ण व आमचे हे सहृद, आप्त असे सर्व राजे, तेरा वर्षांनंतर आम्ही धर्मबंधनांतून मुक्त होतांच, आम्हांला साहाय्य करून आमच्या हातून आमच्या शत्रूंचा पूर्णपणें नाश करवून, आम्हीं हस्तिनापुरांत कौरवसभेंत केलेल्या प्रतिज्ञा पार पडलेल्या खचित पाहातील अशी आमची खात्री आहे. भगवंता, तुझ्या ह्या भयंकर क्रोधाला आणखी तेरा वर्षेंपर्यंत कृप

करून आंवरून धर, आणि चवदाव्या वर्षी त्याचा योग्य उपयोग करून आम्हां पांडवांना सत्यप्रतिज्ञ कर. बलराम, धृष्टद्युम्न, धृष्टकेतु, केकयाधिपति आदिकरून क्षत्रियश्रेष्ठ नरसिंह हो, आम्ही शब्दपाशांत गुंतलों आहों, तोंपर्यंत आणखी तेरा वर्षे आमच्या शत्रूंना क्षमा करा."

हे शब्द ऐकतांच द्रौपदी रागाने उसळून म्हणाली, "क्षमा करा! ह्यांनीं क्षमा केली तेवढी ह्याच्या शत्रूंना पुरेशी नाहीं झाली! तुम्हीहि आणखी त्यांना क्षमा करा. माझ्या– ह्या द्रौपदीच्या– झालेल्या छळाकडे कोणीच लक्ष देऊं नका! अरेरे, कृष्णा, पांडवाची भार्या, तुझी मैत्रीण आणि धृष्टद्युम्नाची भगिनी अशा मजसारख्या स्त्रीला भरसभेमध्यें ओढून नेणाऱ्या नीचाना क्षमा करणें तुम्हांला योग्य वाटत असेल तर बेलाशक क्षमा करा! मी रजस्वला, एकवस्त्रा असताना, मला त्या दुष्ट दुःशासनाने कौरवाच्या भरसभेंत ओढून नेलें, आणि वाटेल ते घाणेरडे शब्द बोलून माझी कौरवानीं व त्या कर्णाने थट्टा आरंभली. पांडव, पाचाल, यादव हे जिवंत असताना त्यांनीं मला दासी करून माझा उपभोग घेण्याचें मनात आणिलें! भीष्म व धृतराष्ट्र याच्या देखत त्या निर्लज्ज कौरवानीं माझा अपमान केला! पण त्याना काय दोष द्यावयाचा! जे श्रेष्ठ प्रतीचे योद्धे, आणि महाबलवान् असून ज्यांनीं आपल्या धर्मपत्नीचा छळ चाललेला आपल्या डोळ्यानीं पाहिला, त्या पांडवांनाच सर्व दोष दिला पाहिजे. श्रीकृष्णा, धिक्कार असो त्या भीमसेनाच्या सामर्थ्याला आणि गांडीव धारण करणाऱ्या अर्जुनाला! हलकट लोकांनीं माझा छळ केला तरी त्यांनीं सहनशीलता स्वीकारली! सामर्थ्य जरी कमी असलें तरी भर्त्यांनीं स्वस्त्रीचे रक्षण केलें पाहिजे, हा सज्जनानीं आचरण केलेला असा शाश्वत धर्ममार्ग आहे. स्त्रीचें संरक्षण केलें म्हणजे संततीचें संरक्षण केल्यासारखें होतें. आणि संततीचें संरक्षण झालें म्हणजे आपलेंच संरक्षण झाल्यासारखें झाले. भर्त्याचा आत्माच भार्येच्या ठिकाणीं पुत्ररूपानें जन्म पावतो. म्हणूनच तिला जाया असें म्हणतात. स्त्रीनेंहि पतीचें संरक्षण एवढ्याकरितांच केलें पाहिजे. मी ह्यांची जाया आहे म्हणूनच ह्यांनीं माझें संरक्षण केलें पाहिजे होतें. मला पांच पुत्र झाले आहेत, आणि ते सर्व ह्यांच्यासारखेच महा-

रथी आहेत. अशी मी ह्यांची जाया असतांना माझें संरक्षण करण्याचें सोडून, ते ह्या धृतराष्ट्राच्या दुष्ट व दुबळ्या पोरांविषयीं काय म्हणून क्षमा धरून बसले आहेत कोण जाणे ! त्यानीं अन्यायानें राज्य हिरावून घेतलें, सर्वांना दास केलें, आणि रजस्वला, एकवस्त्रा असता भरसभेत मला ओढून नेलें ह्याहून आणखी करावयाचें तें काय उरलें ? कृष्णा, भीम, अर्जुन आणि तूं ह्यांवाचून दुसऱ्याला जें गाण्डीव धनुष्य सज्जहि करिता यावयाचें नाहीं, तें असून तरी काय उपयोग ? धिक्कार, धिक्कार असो ह्या भीमा-अर्जुनांना कीं हे विद्यमान असतां ह्यांच्या भार्येचा छळ करणारा दुर्योधन एक क्षणभर देखील जिवंत राहूं शकतो ! कृष्णा, मोठ्या कुलात माझा जन्म झाला असून मी महात्मा पंडूची स्नुषा, आणि सिंहासारख्या पांडवांची भार्या असता ह्या पाचहि पाडवाच्या देखत त्या नीचाने माझे केस धरले आणि तो निर्लज्ज माझें वस्त्र ओढीत असता तो अधम कर्ण मला नाहीं नाहीं तें बोलला ! ह्या वेळीं हे पतिहि माझे नव्हेत, पुत्रहि माझे नव्हेत, बंधुहि माझे नव्हेत, पिताहि माझा नव्हे, आणि श्रीकृष्णा, तूंहि माझा नव्हेस ! म्हणूनच त्या हलकटानीं माझा इतका छळ केला तरीहि कांहींच न झाल्याप्रमाणें तुम्ही माझी उपेक्षा करीत आहात." असें म्हणून द्रौपदी मोठ्यानें रडूं लागली.

तें पाहून भगवान् श्रीकृष्णाचें अंतःकरण कळवळलें. ते म्हणाले, "द्रौपदी, रडूं नकोस. ज्यांच्यावर तुझा क्रोध आहे, त्या तुझ्या सर्व शत्रूंच्या स्त्रिया, आपले पति भीमाच्या गदेनें व अर्जुनाच्या बाणांनीं ठार होऊन रक्तकर्दमांत भूमितलावर पडले आहेत असें पाहून, रडून रडून आकांत करतील. पांडव पुनः सम्राट्पदावर चढून तू सम्राज्ञी होशील. द्रौपदी, माझें हें बोलणें कालत्रयींहि असत्य होणार नाहीं."

अर्जुन म्हणाला, "द्रौपदी, भगवंतानें जसें सांगितलें तसेंच होईल. तूं अगदीं स्वस्थ राहा." धृष्टद्युम्नानेंहि आपल्या बहिणीचें सांत्वन केलें. श्रीकृष्ण म्हणाले, "धर्मा, त्या कपटी शकुनीच्या सल्ल्यानें तुम्हांला द्यूताचें आव्हान कौरवांनीं दिलें त्यावेळीं मी द्वारकेंत असतों, तर तुमच्यावर हा प्रसंगच मीं येऊं दिला नसता. मी शाल्वाशीं युद्ध करण्यांत गुंतलों होतों,

त्यामुळें कौरवाचे हे दुष्ट बेत माझ्या कानांपर्यंत येऊन पोहोंचले नाहींत. असो. झालें ते झालें! आता बोलून तरी काय उपयोग! तुम्हीं सत्य-प्रतिज्ञ आहा. तेरा वर्षानंतर शत्रूंचा नाश करण्याच्या प्रतिज्ञा तुम्ही बोलून गेला. नाहीं तर ह्याच वेळीं त्या दुष्टाचा नाश करून मी मोकळा झालों असतो. पांडवहो, शांतपणाने व धैर्यानें हें वनवास--दुःख सहन करा. तुम्ही दुसरी कसलीहि काळजी करूं नका. तुमची माता कुंती हिचा संभाळ करण्यात महात्मा विदुर दक्ष राहील. सुभद्रा, अभिमन्यु द्वारकेसच माझ्याजवळ असल्यानें त्याची काळजी तुम्हाला नको. अभिमन्यु हा अस्त्रविद्येत प्रतिअर्जुन होईल अशी मी काळजी घेईन. द्रौपदीचे पुत्र पांचाल देशात धृष्टद्युम्नाच्या देखरेखीखालीं आपली शस्त्रास्त्रविद्या वाढवतील. नकुलाची स्त्री करेणुमती ही पुत्रासह तिचा भाऊ चेदिदेशाधिपति धृष्टकेतु याच्या छत्राखालीं राहून आपल्या पुत्राचे उत्तम तऱ्हेनें संगोपन करील. धृष्टकेतु आपल्या भाचाला पांडवाच्या कुळाला साजेल असेंच सर्व प्रकारचें शिक्षण देईल. सहदेवाचे श्यालक केकयदेशाधिपति हे आपल्या भगिनीची व भाच्यांची सर्व काळजी घेतील. पांडवहो, तुम्हीं आपला वनवासाचा काळ तपाचरणानें देवताना प्रसन्न करून घेऊन, उत्तमोत्तम दिव्य अस्त्रे संपादन करण्यांत घालवावा असे माझें मत आहे. तुम्हाला हा वनवास कल्याण-कारक होवो, असें मी इच्छितों." अशा प्रकारचीं पांडवाना धीर देणारीं भाषणें करून श्रीकृष्णानें पांडवांचा निरोप घेतला. भेटावयास आलेले आप्तवर्गीय व सुहृद् राजेहि युधिष्ठिराचा निरोप घेऊन आपापल्या देशाना निघून गेले.

पांडवांनीं आपलीं वनवासाचीं बारा वर्षे देवतांच्यापासून दिव्य अस्त्रें संपादन करण्यांत व मार्कंडेयासारख्या अनेक विद्वान तपोनिधींच्या कडून ज्ञान संपादण्यांत घालविलीं. पांडवाच्या वनवासाची अत्यंत बोधप्रद हकिगत भारतांतील वनपर्वांत श्रीमद्व्यासमहर्षींनीं फारच सुंदर वर्णन केली आहे. वनवासाचीं बारा वर्षे झाल्यानंतर पांडवांनीं तेराव्या वर्षी एक वर्ष अज्ञातवास मत्स्य देशाचा राजा विराट याच्या नगरांत त्याच्या सान्निध्यात घालविला. धर्मराजा 'कंक' नांव धारण करून ब्राह्मणाच्या वेषानें विराट

राजाच्या पदरीं त्याच्याशीं फाशाने द्यूत खेळण्याकरिता राहिला. भीमसेन आपणास उत्तम पाकनिष्पत्ति करता येते असे सागून विराटाच्या पाकशालेत 'पौरोगव बल्लव' असे नाव धारण करून राहिला. अर्जुन विराटाच्या घरी राजकन्याना गीत, वाद्य, नर्तन शिकविण्याकरिता तृतीयप्रकृति पंढक बनून 'बृहन्नला' नाव धारण करुन स्त्रीवेषानें राहिला. नकुल 'ग्रंथिक' नांव धारण करून विराटाच्या अश्वशाळेवर अधिकारी म्हणून राहिला. सहदेव 'तंतिपाल' नाव धारण करून विराटाच्या गोशाळेवरचा अधिकारी झाला. द्रौपदी 'सैरंध्री' म्हणून विराटराजाची पत्नी सुदेष्णा हिच्याकडे वेणीफणी करण्याच्या कामाकरिता राहिली. अशारीतीने वेष बदलून विराट राजाकडे सर्व पांडव गुप्तपणे राहिले, व त्यानी आपल्या अज्ञातवासाचे वर्ष कोणाकडूनहि ओळखले न जातां पुरे केले. विराट राजाचा शालक महाबलाढ्य कीचक हा मत्स्य देशाचा सेनापति असतांना त्याचा बाजूच्या सर्व राजांना मोठा दरारा होता. सैरंध्रीच्या अप्रतिम लावण्यावर मोहित होऊन कीचकाने तिच्यावर पापी नजर टाकताच भीमाने कोणाला कळूं न देता त्याचा वध केला, आणि कीचकाला एका गंधर्वाने मारले अशी भुमका उठविली गेली. दुर्योधनाच्या गुप्त हेरांनीं ही बातमी हस्तिनापुरास नेताच विराट राजाला आता कोणाचा आश्रय नसल्यामुळे तो दुर्बळ झाला असेल, अशा समजुतीने, विपुल धान्यानें समृद्ध अशा मत्स्य देशावर स्वारी करून, तेथील नानाप्रकारचीं रत्ने वगैरे संपत्ति व बहुविध उत्तमोत्तम लक्षावधि गाई हरण करण्याचा विचार, कौरव व त्रिगर्त यांनी केला. त्रिगर्तराज सुशर्मा याने दक्षिणेकडून व कौरवांनीं उत्तरेकडून एकदम मत्स्य देशावर चालून जावे, असे ठरले. ते त्याप्रमाणें चालून गेले. कंक, बल्लव, ग्रंथिक, तंतिपाल हे युद्धकला जाणतात असे एका वर्षाच्या परिचयाने विराटराजाला समजले होते. त्रिगर्तराज सुशर्म्यानें दक्षिणेकडून चाल करताच विराटानें कंक, बल्लव, ग्रंथिक, तंतिपाल याच्या साहाय्याने त्रिगर्तांच्या सैन्याची धुळधाण उडविली. बल्लव सुशर्म्याला ठार मारणार इतक्यांत तो शरण आल्यानें बल्लवाने कंकाच्या संमतीनें त्याला सोडलें, म्हणून तो वांचला. उत्तरेकडून

चालून आलेल्या कौरवांच्या सैन्याचा प्रतिकार करण्याकरिता विराट-राजाचा पुत्र उत्तर, ह्या सैरंध्रीच्या सांगण्यावरून, बृहन्नलेला सारथी म्हणून घेऊन गेला. कौरवांचें अफाट सैन्य पाहून उत्तर घाबरला. पण त्याला बृहन्नलेनें धीर दिला. उत्तर तरी देखील युद्धाला तयार होईना, तेव्हां बृहन्नलेने आपण अर्जुन असल्याचे त्याला सांगितले. विराटनगरींत प्रवेश करताना एका शमीच्या झाडावर लपवून ठेवलेल्या आपल्या अस्त्रातून त्यानें आपलें गांडीव धनुष्य काढून घेतलें. उत्तरानें अर्जुनाचें सारथ्य केलें. अर्जुनानें एकट्यानें अलौकिक पराक्रम करून भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, दुर्योधन, दुःशासन, अशा मोठमोठ्या योद्धयाना 'दे माय धरणी ठाय' केले, आणि कौरवाचा पूर्णपणें पराभव केला. अर्जुन अज्ञातवास संपण्याच्या अगोदरच प्रगट झाला असें वाटून दुर्योधनाला त्या पराभवाचाहि आनंद झाला. पण भीष्मानी व द्रोणाचार्यांनीं ज्योतिर्गणितानें हिशेब करून अज्ञातवासाचें वर्ष पूर्ण झाल्यावरच अर्जुन प्रगट झाला, असें सांगितलें.

असो. नंतर विराटराजाने आपली मुलगी उत्तरा हिला अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु ह्याला देण्याचे ठरविले. त्याप्रमाणे द्वारकेस भगवान् श्रीकृष्णाकडे कळवून अभिमन्यूसह सर्व मंडळींना घेऊन श्रीकृष्णांनीं विराट-नगरीला यावें असें निमंत्रण देण्याकरिता विराटराजाचे अमात्य व पुरोहित गेले. पांडव योग्य काळीं प्रगट झाले आणि अभिमन्यूला उत्तरा देण्याचे विराटराजानें ठरविलें, हे ऐकून भगवान् श्रीकृष्णांना आनंद वाटला, आणि ते सर्व मंडळींसह मत्स्यदेशास येण्यास निघाले.

बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास संपवून पांडव प्रगट झाले. ह्या तेरा वर्षांच्या दीर्घ कालांत द्वारकेंत भगवान् श्रीकृष्णानें योगशास्त्र व तत्त्वज्ञान यांचा सखोल अभ्यास केला. वेदविद्याविभूषित असे मोठमोठे तपस्वी ऋषिमहर्षि याना मुद्दाम आदरानें बोलावून आणून त्यांच्याशीं वेदान्तर्गत कर्म, उपासना व ज्ञान, ह्या कांडत्रयीबद्दल मनमुराद चर्चा केली. त्यातील रहस्य उकलण्याची शिकस्त केली. वेदार्थपारंगत अनेक विद्वानांच्या साहाय्यानें ऋग्वेदांतील प्रत्येक ऋचेचा रहस्यपूर्ण अर्थ त्यानें ग्रहण केला;

यजुर्वेदांतील यज्ञक्रिया लक्षपूर्वक अवलोकन करून त्यांतील रहस्य हस्तगत केले. सामवेदांतील सामगानाचे सूक्ष्मावलोकन करून त्यातील रहस्य जाणिले. श्रीकृष्णानें घोर आंगिरससारख्या अनेक आत्मवेत्त्या पुरुषांकडून सर्व उपनिषदांचे सार आत्मसात् केलें. मल्लविद्याविशारद, व्यवहारचतुर, राजकारणपटु, वेदवेदाङ्गविभूषित, शस्त्रास्त्रविद्यापारंगत, रणधुरधर, म्हणून सर्वत्र गाजलेले भगवान् श्रीकृष्ण आतां योगिश्रेष्ठ म्हणून ब्रह्मनिष्ठांमध्ये मान्यता पावूं लागले.

पांडवांना राहाण्याकरिता विराटराजाने आपल्या राज्यातील उपप्लव्य नावाची एक सुंदर नगरी दिली ही नगरी कौरवांच्या राज्याच्या सीमेजवळ होती. ह्या नगरींत अभिमन्यूचा विवाह मोठ्या थाटाने करण्याचें ठरले. विवाहाचें निमंत्रण पांडवांनीं व विराटराजाने आपल्या सर्व आप्तसुहृदांना पाठविलें. सुभद्रा व अभिमन्यु ह्यांना घेऊन भगवान् श्रीकृष्ण उपप्लव्य नगरीस आले. त्याच्याबरोबर बलराम, कृतवर्मा, सात्यकी, अनाधृष्टि, अक्रूर, प्रद्युम्न, सांबादि श्रीकृष्णाचे पुत्र व मोठमोठे यादव वीर आले. लग्नसमारंभात पांडवाना काहीही उणीव पडूं नये, म्हणून भगवंतानें द्वारकेहून सर्व साहित्य व विपुल संपत्ति आणली होती. पांडवाचे उत्तमोत्तम रथ व निवडक सैन्य घेऊन इंद्रसेनादिक एकनिष्ठ सेवक दूरदेशी जाऊन राहिले होते, ते लग्नसमारंभाकरितां प्राप्त झाले. यादवानी येतांना हत्ती, घोडे, रथ, पायदळ वगैरे सर्व प्रकारचे राजवैभव आणले होतें. युधिष्ठिरावर प्रेम करणारे काशिराज व शैब्य हे राजे आपल्या राजवैभवानिशी आले. द्रुपदराजा आपले पुत्र, अपराजित शिखंडी, शस्त्रधर श्रेष्ठ धृष्टद्युम्न व द्रौपदीचे वीर पुत्र, यासह प्रचंड सेना घेऊन आला. पांडवाचा पुष्कळच आप्तवर्ग लग्नसमारंभाकरितां उपस्थित राहिला होता. फार काय, रीतीप्रमाणें निमंत्रण जातांच सर्व कौरवहि लग्नसमारंभाकरिता लग्नाचे दिवशीं वधुवराना मंगल आशीर्वाद देण्याकरिता उपस्थित राहिले. वृष्णि, अंधक व भोज ह्या कुळांतील महान् महान् वीर निमंत्रण पोहोंचतांच तेथे आले. ह्याप्रमाणे पांडवांचे सर्व आप्त, सुहृद व साहाय्यकर्ते उपप्लव्य नगरींत जमले. विराटराजाने त्या सर्वांचा यथाविधि मोठा

आदरसत्कार केला. त्या सर्वांच्या देखत वाङ्निश्चयादि विधि मोठ्या थाटाने केले. भगवान् श्रीकृष्णानें पांडवांना बहुमोल रत्नें व वस्त्रें यांचा आहेर केला; नंतर मत्स्याधिपति विराट व पांडव ह्यामध्यें विवाहसमारंभ यथाविधि सुरू झाला. शंख, दुंदुभि, संबळ, आडंबर वगैरे मंगल वाद्यें वाजूं लागलीं. भक्ष्य, भोज्य, पेय ह्यांची रेलचेल झाली. गवई, नट, भाट, सूत, मागध इत्यादि मंडळी स्तुतिपाठ गाऊं लागले. मत्स्यकुलातील सुंदर स्त्रिया रत्नाभरणांनीं व शृंगारभूषणांनीं अलंकृत होऊन महाराणी सुदेष्णे-सह तेथे आल्या. त्या सर्व स्त्रिया अत्यंत रूपसंपन्न होत्या, पण त्या सर्वांना द्रौपदीनें आपल्या रूपानें व कांतीने मागे टाकलें. राजकन्या उत्तरा अलंकार घालून उभी राहिली. तिच्याभोंवती गराडा घालून त्या सर्व स्त्रिया उभ्या राहिल्या. नंतर अर्जुनाने व युधिष्ठिरादि सर्व बंधूंनीं विराटतनयेचा स्नुषा म्हणून स्वीकार केला. ह्याप्रमाणे त्या सुंदर उत्तरेचा पतिग्रह केल्यावर युधिष्ठिराने भगवान् श्रीकृष्णाला पुढाकार देऊन महाधनुर्धर अभिमन्यूचा उत्तरेशीं विवाह करविला. विराटराजाने वायुतुल्य वेगवान सात हजार घोडे, दोनशें निवडक हत्ती, चारशे सुंदर रथ, बलाढ्य सैन्य व विपुल धन अभिमन्यूला दिलें. विराटराजाने अग्नीमध्ये यथाविधि हवन, ब्राह्मणाचे पूजन, व मानकऱ्याचा सत्कार केल्यावर विवाहसंस्कार पूर्ण झाला. धर्मराजानेहि श्रीकृष्णाने आणलेलें धन, हजारों गाई वगैरे ब्राह्मणाना देऊन पुष्कळ दानधर्म केला; स्वादिष्ट भक्ष्य, भोज्य, पेय वगैरे पदार्थांनीं त्याने सर्वांना संतुष्ट केलें. अशाप्रकारें आनंदी आनंद होऊन ती नगरी उत्सवानें गजबजून गेली. लग्नविधि आटोपताच लग्नसमारंभाकरिता आलेले कौरव व तत्पक्षीय लोक परत गेले. पांडव व त्यांच्या पक्षाचे राजे आणि यादव उपप्लव्य नगरीत उत्सवात दंग होऊन चार दिवस राहिले.

अशा रीतीनें अभिमन्यूचा विवाह झाल्यानंतर एक दिवस प्रातःकाळीं पांडव व तत्पक्षीय यादव विराटराजाच्या नगरांत राजसभेस गेले. ती सभा हिऱ्यांनीं व रत्नांनीं नटविली असल्यामुळें फारच चित्तवेधक झाली होती. त्या सभेत सुंदर पुष्पांचा घमघमाट सुटला होता. तेथे बसण्याकरितां नयनमनोहर आसने मांडली होती. अशा त्या सभेत सर्व राजे जमल्यावर

सर्व राजांना मान्य असे वृद्ध द्रुपद व विराट प्रथम आसनावर बसले. भगवान् कृष्ण युधिष्ठिरासह विराटाचे जवळ बसले. बलराम सात्यकीसह द्रुपदाचे सन्निध बसला. द्रुपदाचे सर्व पुत्र, भीमार्जुन, नकुल-सहदेव, प्रद्युम्न-सांबादि भगवंताचे पुत्र, विराटपुत्रासह अभिमन्यु, शौर्यानें, बलानें व रूपानें आपापल्या पित्याप्रमाणें असलेले द्रौपदीचे पाच पुत्र, वगैरे सर्व महारथी योद्धे सोन्याच्या उंची आसनांवर बसले. थोडा वेळ आपापसांत मौजेचीं, यदृच्छेचीं संभाषणें झाल्यानंतर पांडवांचे इष्ट कार्य साधण्याकरिता भगवान् श्रीकृष्णानें अर्थगांभीर्य यानीं युक्त असें उत्कृष्ट भाषण सुरू केलें. भगवान् म्हणाले, "वीरहो, ह्या युधिष्ठिराला शकुनीनें फाशाचे खेळात लबाडीनें कसें जिंकिलें, आणि त्याचें राज्य हरण केलें, आणि वनवासाची प्रतिज्ञा त्याच्याकडून कशी करविली, हें सर्व आपणांस माहीत आहेच. सत्यनिष्ठ पांडवांनीं, अंगीं सर्वांना युद्धांत जिंकण्याचें सामर्थ्य असतांहि, केलेल्या प्रतिज्ञेला स्मरून तेरा वर्षे वनवासरूपी व्रत कसें पाळलें, विशेषतः हें शेवटलें वर्ष ह्याच राजधानींत छपून राहून किती संकटानें व धैर्यानें काढलें हेंहि आपण जाणत आहां. आता पांडवांचें, त्यांच्या वांट्यास आलेलें वाडिलार्जित व स्वसंपादित राज्य त्यांना मिळणें योग्य व न्याय्य आहे. तेव्हां आता आपण सर्व मिळून ज्यांत धर्मराज व दुर्योधन या उभयतांचें कल्याण आहे असा योग्य व श्रेयस्कर उपाय योजा. धर्मराजाची बाजू अशी आहे कीं अधर्मानें देवाचेंहि राज्य मिळत असेल तर त्याला त्याची इच्छा नाहीं. तेंच धर्मार्थांना संभाळून त्याला एकादें गांव मिळालें तरी तो संतुष्ट आहे. दुर्योधनानें धर्मराजाला कांहीं युद्धांत जिंकलें नाहीं; केवळ कपट-द्यूतांत हरवून त्याला असह्य क्लेश दिले. तरी पण धन्य त्या धर्माची, कीं तो दुर्योधनाचें कल्याणच चिंतीत आहे. माझें म्हणणें काय आहे तें मी आतां आपल्याला सांगतों. आजपर्यंत पांडव हे सत्याला धरून वागले आहेत. आतां यापुढें कौरव जर त्यांच्याशीं गैर वागतील, तर ते त्यांचा नाश केल्यावांचून राहाणार नाहींत. पांडव थोडे, ते कौरवांचें काय करणार? अशी कोणास शंका येईल, तर कौरव त्यांना वृथा क्लेश देत आहेत, असें यापुढें दिसल्यास पांडवाचे आप्तस्नेही त्यांना मिळतील,

आणि ते दुर्योधनादि कौरवांचा वध करतील, हें सर्वांनीं निश्चित समजावें. दुर्योधनपक्षाचा लोभीपणा प्रसिद्ध आहे. त्याचें म्हणणें काय आहे हें आम्हांला कळलेलें नाहीं म्हणून माझें म्हणणें असें कीं आपण कोणी तरी धर्मशील, पवित्र, कुलीन, विद्वान, चतुर, सावध व बाणेदार असा दूत उभयपक्षांचा सलोखा करून धर्माला अर्धराज्य देवविण्याकरितां कौरवा-कडे पाठवावा."

ह्याप्रमाणें धर्मार्थयुक्त गोड व निःपक्षपाताचें श्रीकृष्णानें भाषण केल्यावर बलरामानें त्या भाषणाचा गौरव करून स्वतःचें मत म्हणून सांगण्यास सुरवात केली. बलराम म्हणाला, "सभ्यहो, उभयपक्षांना कल्याणकारक असें श्रीकृष्णानें धर्मार्थांना धरून केलेले भाषण अगदीं योग्य आहे. शूर पाडव राज्याचा एकार्ध दुर्योधनाला वगळून एकार्धच काय ते मागत आहेत. तेव्हा दुर्योधनहि त्याना अर्धे राज्य देऊन अर्ध्यांत सुखानें राहील, असें मला वाटतें. कौरव सरळ बुद्धीनें अर्धे राज्य देत असतील तर पांडवानींहि त्यावर संतुष्ट राहाणेंच योग्य आहे. तेव्हां उभय-तांचें सख्य करण्याकरितां कोणीं तरी तिकडे जावें हें मला मान्य आहे. जाणाऱ्या मनुष्यानें भीष्म, धृतराष्ट्र, द्रोण, अश्वत्थामा, विदुर, कृप, शकुनी, कर्ण, बलवान धृतराष्ट्रपुत्र, आणि ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध व धार्मिक असे हस्तिनापुरांतील संभावित लोक ह्यांना एकत्र बोलावून आणून, व त्यांना नम्रपणें प्रणाम करून धर्मराजाचा अभिप्राय सर्वांना स्पष्ट कळेल असा सांगावा. त्यानें काहीं झालें तरी, कपटद्यूतानें कौरवानीं राज्य हरण केलें, असें म्हणुन त्यांना चिडवूं नये. कौरवांनीं एका अर्थी आपल्या अंगच्या हिकमतीनेंच पांडवांचें राज्य हरण केलें आहे, असें मला वाटतें. धर्माला द्यूताचें ज्ञान नसतांना, विदुरासारख्यांच्या म्हणण्याला न जुमानतां त्यानें आपण होऊन द्यूतांत पटाईत अशा शकुनीशीं पण लावून खेळ मांडला. त्याचें प्रायश्चित्त त्याला मिळालें. फांसा आपल्या उलट पडूं लागला हें स्पष्टपणें दिसूं लागल्यावरसुद्धां हट्टाला पेटून मूर्खपणानें धर्म खेळला. म्हणून तो सर्वस्व हरला. ह्यांत शकुनी व कौरव दोषी कसे ? आणि त्यांनीं राज्य हरण केलें त्यांत गैर काय झालें, तेंच मला समजत

नाहीं. धर्मराज सर्वस्वी दोषी आहे असें मला वाटतें. म्हणून जाणाऱ्या दूतानें दुर्योधनाशीं नमूनच भाषण करावें आणि सामोपचारानें काय करणें तें करून कौरव-पांडवांचें युद्ध न होईल असें करावें. युद्धानें पांडवांचा कांहीं फायदा न होता तें त्यांना व सर्वांनाच अनर्थकारक होईल."

बलरामानें धर्मराजाला निष्कारण दोष देऊन व दुर्योधनादिकांच्या कृत्यांचें समर्थन करून, दुर्योधनापुढें दूतानें नम्रपणें आपलें म्हणणें मांडावें असें म्हणतांच सात्यकी अत्यंत संतप्त झाला व तो रागानें म्हणाला, "कांहीं जरूर नाहीं दुर्योधनापुढें नम्रपणानें याचना करण्याची ! पांडवांचे वाडिलार्जित राज्यापैकीं अर्धराज्य व स्वसंपादित सर्वच्या सर्व साम्राज्य त्यांना परत मिळालेंच पाहिजे. श्रीकृष्णानें 'अर्धराज्य' असें म्हटलें तें वाडिलार्जित राज्यापैकीं अर्धराज्य ! पांडवांच्या स्वसंपादित साम्राज्याशीं कौरवांचा काय संबंध आहे ? धर्मराज स्वतः होऊन द्यूत खेळला नाहीं. त्यानें त्या भिकारड्या कपटी द्यूतकाराला आपल्या घरीं बोलावून द्यूताला आव्हान दिलें असें नसून, तो कपटी शकुनी, मत्सरी कर्ण, दुर्मति दुर्योधन व अंतर्बाह्य आंधळा धृतराष्ट्र ह्यांनीं दुष्ट मसलत करून कांहीं तरी निमित्तानें इंद्रप्रस्थाहून हस्तिनापुरास राजा युधिष्ठिराला बोलावून आणून त्याला कपटद्यूतांत ओढिलें, आणि त्याचें सर्वस्व कपटानें हरण केलें, हें सर्व जगाला माहीत असतांना, हा कौरवपक्षपाती बलराम, 'धर्म आपण होऊन शकुनीशीं पण लावून द्यूत खेळला' असें धडधडीत असत्य सांगतो आणि सरळ, निष्पाप व शूर धर्मराजाला सर्वस्वी दोषी ठरवून त्या भ्याड, कपटी शकुनी-कर्ण-दुर्योधनादिकांच्या नीच कृत्याचें समर्थन तुम्हां वीरांच्या सभेंत निर्धास्तपणें करूं शकतो; आणि तुम्ही तें निमूटपणें ऐकून घेतां ह्याचाच मला संताप येतो ! बलरामा, आतां माझें मत मी स्पष्टपणें सांगतों. प्रतिज्ञेप्रमाणें सर्व नियम कसोशीनें पाळून वनवास पुरा केलेल्या युधिष्ठिराला आतां दुर्योधनापुढें नम्र होण्याची मुळींच जरूर नाहीं. कौरव-पांडवांमध्यें आतां न्यायानें सलोखा होत असेल तरच तो घडवून आणावा. श्रीकृष्णाच्या म्हणण्याप्रमाणें दूत पाठवावा. पण त्या दूतानें पांडवांचें स्वसंपादित सर्व राज्य व त्यांचें वाडिलार्जित अर्धराज्य त्यांना परत देण्याबद्दलचा ह्या

राजसभेचा निरोप निर्भयपणें कौरवांना सांगावा. त्यांची गोड शब्दांनीं समजूत घालीत बसण्यात त्या दूताने व्यर्थ कालक्षेप करूं नये. कौरवांनीं आमचें म्हणणें ऐकलें नाहीं तर त्यांची समजूत रणांगणावर आमच्या तीक्ष्ण बाणांनीं आम्ही घालूं. निरोप पाठविणाऱ्या ह्या राजसभेंत, महातेजस्वी द्रुपद व विराट, सुदर्शन चक्रधारी भगवान् श्रीकृष्ण, गांडीव-धन्वा दिव्यास्त्रसंपन्न अर्जुन, गदापाणि अजिंक्य भीमसेन, यम व काल ह्याप्रमाणें भासणारे नकुल—सहदेव, तारुण्यानें मुसमुसणारे महारथी द्रौपदी-पुत्र व अप्रतिम धनुर्धारी अभिमन्यु, अग्निप्रमाणें प्रखर तेजस्वी धृष्टद्युम्न, कालसूर्याप्रमाणें तळपणारे गद, प्रद्युम्न व सांब; आणि रणोत्साहानें खवळून गेलेला हा मी सात्यकि हे सर्व उपस्थित होते असें त्या दूतानें कौरवांना जरूर सांगावें."

महाराज द्रुपदाला सात्यकीचे बोलणें आवडलें. तो म्हणाला, "सात्यके, तूं म्हणतोस त्याप्रमाणें ह्या दुष्ट कौरवांची समजूत रणांगणावरच घालावी लागेल. दुर्योधन गोडीनें राज्य देईल असें मला वाटत नाहीं. पोरवेडा धृतराष्ट्र पुत्राच्या इच्छेबाहेर जाऊं शकणार नाहीं. कौरवांचे अन्नाचे ओशाळे भीष्म, द्रोण, निःस्पृहपणानें बोलणार नाहींत. कर्ण, शकुनी, हे तर हाडाचेच दुष्ट व मूर्ख आहेत. पण शिष्टाचार म्हणून श्रीकृष्णाच्या म्हणण्याप्रमाणें दूत म्हणून ह्या माझ्या उपाध्याय विद्वान ब्राह्मणाला धृतराष्ट्राकडे पाठवा. भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, दुर्योधन ह्यांना काय निरोप सांगावयाचा असेल तो त्याला सांगा. तो निर्भयपणें आपलें कार्य करून येईल. तो दूत तिकडे जाऊं द्या. आपण इकडे सैन्याची जुळवाजुळव करायला सुरवात करूं. पहिली प्रार्थना येईल ती मान्य करण्याची भले लोकांची रीत आहे. म्हणून राजेलोकांच्याकडे आपलें बोलावणें प्रथम पोंचविण्याची त्वरा करा. विराटराज, राजेलोकांच्याकडे दूत पाठविण्याची ही कामगिरी शक्य तितकी त्वरित केली पाहिजे. आधीं शल्य, धृष्टकेतु, जयसेन व सर्व कैकेय यांच्याकडे चलाख दूत पाठवा. तसेच पूर्वसमुद्रवासी भगदत्त, उग्र व तेजस्वी हार्दिक्य, अंधक, शूर, दीर्घव्रत, रोजमान यांना बोलवा. राजा सेनाबिंदु, सेनाजित्, प्रातिविंध्य, चित्रवर्मा, बाल्हीक, चैद्य,

सुबाहु, महारथी पौरव, शक, पल्हव, दरद देशांतील राजे, सुरारि, राजा कर्णवेष्ट, नील, वीरधर्मा, रुक्मी, वायुवेग, एकलव्य, कारुषक राजे, कांबोज ऋषीक आणि पश्चिमानूप ह्या तीन देशांतील राजे, पंचनद देशांतील राजे, क्राथपुत्र दुर्धर्ष, डोंगराळ मुलुखांतील राजे, परपुरंजय, शाल्वपुत्र कुमार आणि कलिंगाधिपति वगैरे राजाच्याकडे त्वरित दूत पाठवावेत." वृद्ध व अनुभवी द्रुपदराजानें आणखीहि कित्येक राजांचीं नांवें सांगितलीं. द्रुपद राजाचें भाषण ऐकून श्रीकृष्ण म्हणाले, "सोमकांमधील धुरंधर द्रुपदराजाचें भाषण धर्मराजाचा हेतु सिद्धीस नेणारें आहे. योग्य न्याय व्हावा अशी आपली इच्छा आहे त्या अर्थी द्रुपदराजा म्हणतो तसेंच प्रथम केलें पाहिजे. कौरव-पांडव ह्या दोघांशीं आमचें नातें समानच असून ते दोघेहि स्वतंत्र वागणारे आहेत. त्यांनाहि पांडवांनीं विवाहाला आणलें होतें. आम्हांलाहि आणलें होतें. आणि द्रुपद आपणहि आहां. विवाह झाला. आतां आपण आनंदानें घरोघर परत जाऊं. वयानें व ज्ञानानें आपण येथील सर्व राजांत अत्यंत वृद्ध आहां. आम्ही सर्व आपल्या शिष्यासारखे आहों यांत संदेह नाहीं. भीष्म व धृतराष्ट्र आपल्याला बहुमान देत असतात. द्रोण व कृप तर आपले स्नेहीच आहेत. ह्यास्तव पांडवाच्या कल्याणाचा काय तो निरोप आपणच पाठवा. आपण म्हणाल त्यास आम्ही कबूल आहों, हें खास समजा. कुरुश्रेष्ठ जर न्यायबुद्धीनें सख्य करील तर भाऊबंदाची गोडी राहिल्यामुळें कुलक्षय होणार नाहीं. पण दुर्मति दुर्योधनानें उद्दाम-पणानें जर आपलें म्हणणें ऐकलें नाहीं, तर कौरवांना ताळ्यावर आण-ण्याला आपली युद्धाची तयारी झालेली असूं द्या."

भगवंताचें हें भाषण सर्वांना मान्य झालें. नंतर विराटराजानें सर्व यादवांसह बलराम-श्रीकृष्णांचा मोठा सन्मान केला. नंतर श्रीकृष्ण आपल्या सर्व मंडळीसह पांडवांचा व विराटाचा निरोप घेऊन द्वारकेस गेले. नंतर विराट व द्रुपद यानीं सर्व राजांच्याकडे सैन्यासह पांडवांना साहाय्य करण्यास येण्याबद्दल निमंत्रणें पाठविलीं. आणि लवकरच पांडव, विराट व द्रुपद ह्यांच्या शब्दास मान देऊन बोलाविलेले राजे मोठ्या आनंदानें ससैन्य युद्धाच्या जय्यत तयारीनें उपप्लव्य नगरीस येऊन पोहोंचले. जिकडे

तिकडे चतुरंग सैन्याचे तळ पडलेले दिसूं लागले. पांडवांच्याकडे मोठें सैन्य गोळा झालें ही बातमी हेरानीं हस्तिनापुरास नेताच कौरवांनींहि युद्धाकरितां स्नेही राजाकडे निमंत्रण पाठविण्यास सुरवात केली. त्यांनीं पांडव वनवासांत असल्यापासूनच युद्धाची तयारी चालविली होती. युद्धाचेवेळी आपल्या उपयोगी पडणारे कोण कोण राजे आहेत, तें पाहून त्यांच्याशीं त्यांनी स्नेह करून ठेविला होता. हस्तिनापुरात कौरवांचे स्नेही राजे बहुतेक सर्व जमा झाले. इतक्यात द्रुपदराजानें आपला ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध पुरोहित कौरवाकडे पाठविला. तो कौरवाच्या सभेंत गेल्यावर त्या विद्वान ब्राह्मणाचा भीष्म, धृतराष्ट्र, द्रोण, विदुर, यानीं यथोचित सत्कार केला.

ब्राह्मण म्हणाला, "राजा धृतराष्ट्रा, विराटराजाच्या मत्स्यपुरींत पांडवाच्या हितचिंतक राजमंडळाची मोठी सभा झाली. त्या राजसभेनें पांडवांच्या वतीनें तुमच्याशीं बोलणें करण्याकरिता माझी योजना केली आहे." असें बोलून, त्या राजसभेंत कोण कोण जमलेले होते त्यांचीं नावें व त्याचे पराक्रम वगैरे सर्व गोष्टींचें वर्णन करून ब्राह्मण पुढे म्हणाला, "राजा, अशा त्या महान् राजसभेनें जो निरोप तुला देण्याकरितां मज-जवळ दिला आहे तो सावधान चित्तानें ऐक, आणि मग तुला काय करणें असेल तें कर. त्यांच्या म्हणण्याचा आशय मी तुला सांगतों. राजा, दुर्योधनादि तुझ्या पुत्रांनीं पांडवाचा लहानपणापासून अत्यंत छळच केला. अनेक वेळां त्याचा प्राणघात करण्याचाहि कौरवानीं प्रयत्न केला. राजा, तूंहि तुझ्या दुर्मति पुत्रांच्या ह्या निंद्य वर्तणुकीला आळा घालण्याचा प्रयत्न केला नाहींस. खरोखर कुरु राज्याचे मालक पांडवच आहेत, ह्या गोष्टीकडे तूं कानाडोळाच केलास. निदान आपल्या पुत्रांच्या बरोबरीनें राज्याचा अर्धा हिस्सा तरी पांडवांना देऊन तूं आपल्या मनाचा मोठेपणा दाखवायला पाहिजे होतास. पण खांडव-प्रस्थासारख्या वन्य प्रदेशाची मालकी पांडवांच्याकडे देऊन तूं त्याची बोळवण केलीस. कलहाचा मना-पासून तिटकारा असल्यामुळें धर्मनिष्ठ पांडव तूं दिलेंस तेवढ्यांत संतुष्ट राहिले. त्यांनीं इंद्रप्रस्थ नगरीची स्थापना करून आपल्या बळावर आपल्या

राज्याचा विस्तार केला. दिग्विजय करून विपुल संपत्ती मिळविली. राजसूयासारखा श्रेष्ठ याग करून त्यांनीं स्वपराक्रमानें साम्राज्य संपादन केले. तुझ्या क्षुद्रबुद्धि, दुष्ट पुत्रांना त्याचें वैभव पाहवलें नाहीं. पराक्रमानें त्यांचें वैभव प्राप्त करून घेण्याची कुवत तुझ्या नेभळ्या पुत्रांच्या अंगी नसल्यामुळे कपटद्यूतात निष्णात असलेल्या सुबलपुत्र शकुनीच्या साह्यानें त्यांनीं सरळ, निष्पाप युधिष्ठिराला तुझ्या संमतीने कपटद्यूतांत ओढलें, आणि त्यांच्या राज्याचा अपहार केला. निर्लज्जपणें भर सभेंत साध्वी द्रौपदीची विटंबना केली. पण धर्मनिष्ठ पांडवांनीं अतुल सहनशीलता दाखवून त्यांच्या माथीं कपटाने लादलेला बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास पूर्ण केला. राजा, तूं आणि तझ्या पुत्रानीं, त्यांचा इतका छळ केला, तरी ते कुरुवंशश्रेष्ठ पाडव तुमचीं सर्व पापकर्में विसरून तुमच्याशीं साम करूं इच्छीत आहेत. राजा धृतराष्ट्रा, त्यांना त्यांनीं स्वपराक्रमाने मिळविलेलें राज्य व त्याच्या वाडिलार्जित राज्याचा अर्धा वांटा देऊन तूंहि आतां त्यांच्याशीं सख्य कर. ह्यातच तुझें आणि तुझ्या निर्बुद्ध पुत्राचें हित आहे. तुम्हीं निमूटपणे त्याचा भाग त्यांना दिला नाहीं तर मात्र युद्धाचा प्रसंग येईल. महाबलाढ्य भीमसेनाची प्रचंड गदा तुमच्या दृष्टीसमोर असणारच. त्याच्या अचाट कृत्यांबद्दल माझ्यासारख्यानें तुम्हांला सांगण्याची गरज नाहीं. उत्तर-गोग्रहणप्रसगीं तुम्हा सर्व कौरवांना पळवून लावण्याचा पराक्रम ज्या एकट्या धनुर्धरानें केला त्या गांडीवधारी अर्जुनाची आठवण तुम्हांला करून देण्याची आवश्यकता नाहीं, असें मला वाटतें. महारथी बालिष्ठ जावळे भाऊ नकुल-सहदेव युद्धात तुमच्यावर तुटून पडले तर काय होईल हेंहि तुम्ही जाणत आहांत. अशा महापराक्रमी पांडवांच्या साहाय्याला सात अक्षौहिणी झुंजार सेना जय्यत तयार आहे. त्यांचा पाठीराखा द्वारकाधीश सुदर्शन-चक्रधारी महातेजस्वी भगवान् श्रीकृष्ण त्यांच्याजवळ उभा आहे. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत आणून, राजा धृतराष्ट्रा, पाडवांच्या म्हणण्याप्रमाणें वागून तूं आपल्या पुत्रांचें रक्षण कर, एवढेंच तुला सांगण्याची कामगिरी त्या राजसभेंत माझ्यावर सोंपविली आहे. राजा, माझी कामगिरी मीं केली. आतां

पांडवांना जें काहीं देणें असेल तें देऊन, तूं आपल्या पुत्रांचें रक्षण करण्याच्या कामांत दिरंगाई करूं नकोस, असें माझें तुला आग्रहाचें सांगणें आहे. भीष्म, द्रोण, विदुर, कृप, अश्वत्थामा आदि करून सर्व सामान्य सभासदांनी मी सांगितलेल्या गोष्टींचा विचार करून, राजा धृतराष्ट्राला योग्य तो सल्ला द्यावा, म्हणजे युद्धात होणारा कुरुकुळाचा नाश टळेल, असें मला वाटतें." इतकें भाषण करून ब्राह्मण स्वस्थ बसला. त्याने निर्भीडपणें केलेलें भाषण सभेतील सर्व सज्जनांना आवडलें.

त्या वेळीं महातेजस्वी भीष्म, त्या द्रुपद-पुरोहिताचा गौरव करून समयाला उचित असें बोलले. भीष्म म्हणाले, "ब्रह्मन्, धर्मनिष्ठ पांडव, कौरवांनीं केलेले सर्व अपराध विसरून कौरवांशीं सख्य करण्याची इच्छा करीत आहेत, त्यांना श्रीकृष्णाचा पाठिंबा व इतर राजेलोकांचें भरपूर साहाय्य मिळालें असतानाहि ते कौरवांशीं युद्ध करूं इच्छीत नाहींत, ह्या गोष्टी सुदैवानें फार चांगल्या आहेत. आपण कौरवांसंबंधीं जें काहीं बोलला तें सर्व खरें बोलला, यांत शंका नाही. मात्र एवढेंच कीं, आपण निःस्पृह ब्राह्मण असल्यामुळें आपलें भाषण कौरवांना झोंबेसें तिखट होतें. हें सर्व राज्य वास्तविक पंडुराजाच्या मुलांचेंच आहे. पांडवांनीं स्वपराक्रमानें मिळविलेलें साम्राज्य कर्ण, शकुनि ह्या निर्बुद्ध आणि मत्सरी माणसांच्या सल्ल्यानें दुर्योधनानें कपटद्यूतांत हरण केलें, हीहि गोष्ट अगदीं सत्य आहे. पणात ठरल्याप्रमाणें खडतर वनवास पूर्ण करून आलेले पांडव, वाडिलार्जित राज्यापैकीं आपला अर्धा वाटा व स्वसंपादित साम्राज्य परत मागत आहेत, ही गोष्ट अगदीं न्याय्य अशीच आहे. धृतराष्ट्रानें आपल्या पुत्रांच्या नादीं लागून त्यांची मागणी मान्य केली नाहीं तर भीमार्जुन कौरवांना युद्धात धूळ चारून आपलें सर्व वैभव परत मिळवितील ह्यांत मुळींच शंका नाहीं. पुत्रनाश टाळावयाचें धृतराष्ट्राच्या मनात असल्यास त्यानें शहाणपणानें पांडवांचें म्हणणें मान्य करून त्यांच्याशीं सलोखा करणें अवश्य आहे, असें माझें मत आहे." भीष्म एवढें बोलत आहेत तोंच कर्ण रागानें उसळून म्हणाला, "ब्रह्मन्, आपण बोलतां यांतील अमुक एक गोष्ट कोणालाहि माहीत नाहीं, अशी नाहीं; मग पुनः पुनः तेंच तेंच

बोलण्यांत अर्थ काय? कौरवांनीं कपट केलें असें आपण म्हणतां, त्यांत काहीं अर्थ नाहीं. शकुनीनें धर्मराजाला दुर्योधनासाठीं उघड उघड द्यूतात जिंकिले, आणि कराराप्रमाणें युधिष्ठिर आपखुशीनें अरण्यांत गेला, त्यांत कौरवांकडे कसा दोष येतो हेंच मला समजत नाहीं. कराराप्रमाणें अज्ञातवासाचें एक वर्ष पुरें भरण्याच्या आंत पांडव प्रगट झाले असल्यानें त्याना पितृधनाचा अर्धा वांटा मागताच येत नाहीं. पराक्रमाच्या जोरावर अधर्मानें राज्य मिळविण्याची ते धडपड करतील तर युद्धांत आम्हां कुरुवीरांशीं गांठ पडतांच त्यांचा मूर्खपणा त्यांना कळून येईल. हा मी कर्ण एकटाच पांडवांची धुळधाण करण्यास समर्थ आहें." हें ऐकून भीष्म रागानें म्हणाले, "हे राधापुत्रा, तुझ्या ह्या नुसत्या बडबडीला घेऊन काय करावें? एकट्या अर्जुनानें ज्या वेळीं उत्तर गोग्रहणप्रसंगीं सहा महारथ्यांना पराजित केलें, त्या वेळच्या त्याच्या युद्धनैपुण्याची आठवण तूं इतक्यांत विसरलास? फजितखोरा, तुझें सामर्थ्य अजून दृष्टीस पडावयाचें का राहिलें आहे? अर्जुनाकडून तूं कितीदा तरी जिंकला गेला आहेस. त्या त्या वेळीं तुझ्या कर्तबगारीचा प्रकाश आम्हीं पाहिलाच आहे! धृतराष्ट्रा, तूं ह्या मूर्खाच्या नादीं न लागतां, हा थोर ब्राह्मण तुला जें करावयाला सांगत आहे, तें तूं दिरंगाई न करता करावें असें माझें मत आहे. असें केलेंस तरच कुरुवंशाचा नाश होणार नाहीं, हें निश्चित समज." भीष्म रागावले असें पाहातांच धृतराष्ट्रानें त्यांचा राग घालविण्याकरितां कर्णाची निंदा करून त्याला म्हटलें, "कर्णा, शांतनव भीष्म म्हणत आहेत तेंच बरोबर आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें केलें तर आमचें, पांडवांचें, इतकेंच नव्हे तर, सर्व जगताचेंहि हित होईल. ब्रह्मन्, पांडवांच्या वतीनें आपण सांगितलेला निरोप ऐकून आम्हांला आनंद झाल्याचें राजमंडळप्रमुख द्रुपदराजाला व विराटराजाला कळवा. आपल्या म्हणण्याचा विचार करून मी लवकरच संजयाला पांडवांच्याकडे पाठवितों." असें म्हणून द्रुपदाच्या पुरोहिताचा उत्तम सत्कार करून धृतराष्ट्रानें त्याला परत पाठविलें. आणि पांडवांशीं युद्ध टाळण्याकरितां कसें बोलावयाचें तें संजयाला पढवून त्याला उपप्लव्य नगराला पांडवांना भेटण्याकरितां पाठवून दिलें.

अर्जुन श्रीकृष्णाला बोलाविण्याकरितां द्वारकेला जाण्यास निघणार आहे ही बातमी हेरानें आणत च कौरव आणि तत्पक्षीय जमलेल्या राजेलोकांच्यामध्यें एकदम खळबळ उडाली. कंस, कालयवन, जरासंध, शिशुपाल, वक्रदंत, नरकासुर अशा महान् महान् बलाढ्य जगप्रसिद्ध योद्धयांचा नाश करून आर्यावर्तांतील सर्व राजांच्यावर श्रीकृष्णानें आपला भयंकर दरारा बसविला याचें वर्णन मागें केलेलेंच आहे. तो भगवान् श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूनें लढू लागला तर आपण सर्व मेलोंच, असें राजेलोकाना वाटून ते घाबरले. सर्वांनी दुर्योधनाशीं बराच वेळ सल्लामसलत केली व कृष्णाला अगोदर निमंत्रण देऊन आपल्या बाजूला ओढून घ्यावा, नाहीं तर निदान बलराम–कृष्णामध्यें फूट तरी पाडावी, ह्या उद्देशानें दुर्योधन द्वारकेकडे त्वरेने गेला, आणि अर्जुनाच्या अगोदर तो द्वारकेला पोहोंचलाहि. द्वारकेंत जातांच दुर्योधन तडक श्रीकृष्णाच्या मंदिरांत गेला. श्रीकृष्ण निजलेले आहेत असे पाहून ते उठण्याची वाट पाहात तो त्यांच्या उशाशीं असलेल्या एका उच्चासनावर बसून राहिला. इतक्यांत अर्जुनहि तेथें दाखल झाला. तो श्रीकृष्णाच्या पायाशीं नम्रतेनें उभा राहिला. दुर्योधन आंत आला तेव्हांच श्रीकृष्ण त्याला कसें टाळावें या विचारांत झोपेचें सोंग घेऊन पडून राहिले होते. अर्जुन आला असे पाहाताच ते झटकन उठून बसले व अर्जुनाकडे पाहून एकदम म्हणाले, " अर्जुना, तूं मला तुमच्या बाजूला बोलाविण्याकरिता आलास. होय ना ? अरे मी तुमचाच आहें " हें ऐकून दुर्योधन म्हणाला, " कृष्णा, थांब. अर्जुनाच्या पूर्वी मी येथें आलों आहे. न्यायाने तूं आमच्याकडेच आलें पाहिजेस. न्यायी, धर्मानें वागणारा, सदाचार व परंपरागत रूढी ह्यांना मान देणारा, असा तुझा लौकिक आहे. " दुर्योधनाचें हें चातुर्यपूर्ण भाषण ऐकून श्रीकृष्ण मनापासून हसले व म्हणाले, " दुर्योधना, तुं प्रथम आलास हें तुझें म्हणणें मी मान्य करितों. पण मी ह्या अर्जुनाला प्रथम पाहिलें हेंहि तितकेंच खरें आहे, व तें तुलाहि मान्य असणारच. तेव्हां तूं पहिल्यानें आलास म्हणून व अर्जुन मला पहिल्यानें दिसला म्हणून मी तुम्हां उभयतांचा सारखाच बांधलेला झालों. म्हणून साह्य करावयाचे तर आतां दोघांनाहि

साह्य केलें पाहिजे. मी तुम्हांला साहाय्य करण्याकरितां दोन गोष्टी तुम्हापुढें मांडितों. त्या दोन गोष्टी म्हणजे एक मी व दुसरी जीमध्यें यादवापैकीं निरानिराळ्या दहा कुळातील प्रत्येकीं शंभर प्रमाणें एक हजार योद्धे आहेत अशी लढाऊ सेना! माझ्यासंबंधीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. मी आतां वृद्धहि झालों आहें, आणि ह्या तुमच्या आपसांतील युद्धांत हातात शस्त्र घेऊन लढण्याची माझी इच्छा नाहीं. म्हणून मी ज्याच्या वाट्याला जाईन त्यांना युद्धात चार युक्तीच्या गोष्टी सांगेन त्याच्याकरितां प्रत्यक्ष हातांत शस्त्र घेऊन लढणार नाहीं. तेव्हा लढणारी सेना आणि बिनलढणारा एकटा मी, ह्यापैकीं कोणतीहि एक गोष्ट तुम्ही मागून घ्या. मात्र लहानाची समजूत पाहिल्या प्रथम करावी असें धर्मशास्त्र सांगतें. म्हणून ह्या दोन वाट्यातील कोणताहि वांटा अर्जुना, पाहिल्याप्रथम तूं मागून घे. उरलेला दुसरा वाटा, तुझ्यापेक्षा वयानें मोठा म्हणून ज्यास्त समजूतदार असलेला असा दुर्योधन घेईल." श्रीकृष्णानें एवढें म्हणताच अर्जुनानें क्षणभरहि विचार न करतां, 'कृष्णा, तूंच मला पाहिजेस.' असें म्हटलें. दुर्योधन लगेच म्हणाला, "कबूल! हातात शस्त्र धरून युद्ध न करणारा तूं पांडवाच्याकडे बेलाशक जा. तूं युद्धात हातात शस्त्र धरिलें नाहींस म्हणजे माझें कांहींच म्हणणें नाहीं. एक हजार लढाऊ सेना माझ्याकडे येऊं दे."

दुर्योधनानें सैन्य पसंत केलेलें पाहून श्रीकृष्ण मनांत हंसला पण वरकरणीं अर्जुनाला म्हणाला, "अर्जुना, भाग उचलण्याची पाहिल्या प्रथम तुला संधि दिली असतांना तूं वेड्यासारखा मलाच मागून घेतलास. असो. दुर्योधनाच्या मनाप्रमाणें त्याला लढाऊ यादवसेना मिळाली. तो आनंदी झाला, तूंहि आनंदी झालास, ठीक झालें. राजा दुर्योधना, तूं सेना घेऊन जा." नंतर दुर्योधनानें श्रीकृष्णाचा आनंदानें निरोप घेतला व तो बलरामाकडे गेला. त्यानें कृष्णाकडे घडलेली हकीगत बलरामाला सांगितली आणि बलरामाला आपल्या बाजूला मिळून मदत करण्याबद्दल प्रार्थना केली. बलराम दुर्योधनाच्या मूर्खपणाला मनांत हंसला व कृष्णाचे विरुद्ध पक्षांत जाण्याचें टाळण्याकरितां तो म्हणाला, "दुर्योधना, तूं माझ्याकडे

पाहिल्या प्रथम आल्यानें तुझ्याकडेच मीं येणें शिष्टसंमत आहे. पण तुमच्या ह्या आपसांतील लढाईंत कोणाच्याच बाजूला न जाता तुमचें युद्ध चालू असेपर्यंत तीर्थयात्रा करीत हिंडावयाचें, असा मीं संकल्प केला आहे " बलरामाचे हें उत्तर ऐकून दुर्योधनाला आनंद झाला. श्रीकृष्ण ज्या बाजूला, त्याच बाजूला बलराम जाईल असें त्याला वाटत होतें. श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूला असला तरी तो हातांत शस्त्र धरणार नाहीं व बलराम तर तीर्थयात्रेलाच जाणार, ह्यामुळे कौरवपक्षीय राजेलोकांच्या मनातील भीतीचें कारण नाहींसे झालें. हातात शस्त्र न धरणारा कृष्ण पांडवाच्याकडे गेला, त्यामुळे पांडवाचा कांहींच फायदा नाहीं. उलट लढाऊ एक हजार यादवसेना कौरावांना मिळाली. हा आपण द्वारकेस येण्यापासून आपला मोठाच फायदा झाला असें त्या अदूरदर्शी व श्रीकृष्णाच्या सामर्थ्याविषयीं पूर्ण अज्ञानी असलेल्या दुर्योधनाला वाटलें. तो श्रीकृष्ण-बलरामाचा निरोप घेऊन आनंदानें हस्तिनापुरास गेला. श्रीकृष्ण युद्धात हातांत शस्त्र धरणार नाही व बलराम युद्धांत हजरहि असणार नाहीं हें ऐकून कौरवपक्षात आनंदी आनंद झाला. दुर्योधनानें द्वारकेस जाऊन मोठ्या चातुर्यानें ही गोष्ट घडवून आणली म्हणून कर्ण, शकुनी आदिकरून सर्वांनीं दुर्योधनाची वाहवा केली. दुर्योधन गेल्यानंतर श्रीकृष्णानें अर्जुनाला विचारिलें, " अर्जुना, मी तर युद्ध करणार नाहीं; असें असता तूं जें मला पत्करिलेंस तें काय हेतु मनात धरून ? " अर्जुनानें उत्तर दिलें, " सख्या भगवंता, तूं स्वतः लढणार नसलास तरी कौरवांच्या सर्व सैन्याचा नाश करण्यास समर्थ आहेस. मीहि एकटा त्यांना मारीन हें माझें सामर्थ्य आहे. पण तूं जगतांत नावाजलेला यशस्वी आहेस. तेव्हा यश येणें, तें तुला येईल. आणि आम्हांला तर यशाची गरज आहे, म्हणून मीं तुला मागून घेतलें आज फार दिवसांपासून माझा हेतु हा आहे कीं, तूं माझें सारथ्य करावें. एवढा माझा हेतु तूं ह्या युद्धांत पुरवावा म्हणजे आम्हांला सर्व कांहीं मिळालें." श्रीकृष्ण म्हणाले, " ठीक आहे. मी तुझें सारथ्य आनंदानें करीन." भगवान् श्रीकृष्ण लगेच पार्थाला घेऊन उपप्लव्य नगरीस गेले, त्यांच्याबरोबर अनेक यादव मुत्सद्दी व योद्धे होते.

भगवंताचें आवडतें सुदर्शन चक्रहि भगवंताबरोबर होतें हें सांगण्याची जरूर नाहीं.

ह्याच वेळेला कौरवाच्या मतानें अत्यंत फायदेशीर अशी आणखी एक गोष्ट घडून आली. पांडवांचा– नकुल-सहदेवांचा–मामा मद्रदेशाधिपति शल्यराजा आपल्या मोठ्या सैन्यासह पांडवांच्या निमंत्रणावर त्यांना साहाय्य करण्याकरितां निघाला. शल्य आपला मामाच असल्याकारणानें तो आपल्याकडेच येणार अशी खात्री असल्यामूळें पांडवांनीं त्याला फक्त निमंत्रण पाठविण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. दुर्योधनादि कपटी चांडाळ-चौकडीनें पांडवाच्या ह्या निष्काळजीपणाचा फायदा घ्यायचा, असें ठरवून शल्यराजाच्या प्रत्येक मुक्कामावर त्याची एवढी बरदास्त ठेविली कीं शल्य अत्यंत खूष होऊन आपली ही उत्तम व्यवस्था आपल्या लाडक्या भाच्यानीं ठेविली आहे असें वाटून एकदम बोलून गेला, "माझी इतकी उत्तम व्यवस्था ज्यांनीं ठेविली आहे त्यांची मी पाहिजे ती इच्छा पूर्ण करीन." हे शब्द चाकरांनीं दुर्योधनास सांगताच तो शल्यापुढें हात जोडून उभा राहिला व म्हणाला, "मामा, ही आपली व्यवस्था ठेवणाऱ्याची इच्छा पूर्ण करण्याचा आपला संकल्प ऐकून मी आपणासमोर येऊन उभा राहिलों आहें." दुर्योधनाला पाहून व त्याचे शब्द ऐकून एक क्षणभर शल्य गोंधळला. पण आपल्या शब्दाला प्राणापेक्षांहि अधिक मानणारा तो त्या काळचा क्षत्रिय राजा असल्यामुळें आपल्या मनोवृत्ति सांवरून चटकन् म्हणाला, "राजा दुर्योधना, ज्या अर्थी ही सर्व व्यवस्था तूं ठेविली आहेस असें म्हणतोस, त्या अर्थी तुझी इच्छा पूर्ण करण्याला माझ्या शब्दानें मी बांधील झालों आहें. सांग तुझी इच्छा काय आहे?" दुर्योधन म्हणाला, "माझ्या बाजूनें आपण पांडवांशीं युद्ध करावें व मी सांगेन त्यावेळीं माझ्या सैन्याचें सेनापत्य स्वीकारावें एवढीच माझी इच्छा आहे.'' शल्य म्हणाला, "ठीक आहे, मी तुझ्या बाजूनें लढतों. दुर्योधना तूं आतां जा. मी शत्रुदमन युधिष्ठिराला आतां भेटावयास जातों व त्याला भेटून तुझ्याकडे परत येतों. कांहींहि असलें तरी पुरुषश्रेष्ठ युधिष्ठिराला मला भेटलेंच पाहिजे.'' दुर्योधन म्हणाला, "बरें आहे.

आपण पांडवांना भेटून त्वरित परत या. आम्हां सर्वांची भिस्त आपणावर आहे. आपण आम्हाला दिलेलें वरदान विसरूं नका."

नंतर शल्य उपप्लव्य नगरास जाऊन पांडवांना भेटला. पांडव वनवासांतून सुखरूप परत आल्याबद्दल त्यानें मनःपूर्वक अभिनंदन करून आपलें समाधान व्यक्त केलें. तो म्हणाला, "युधिष्ठिरा, ह्या युद्धात कौरवाचा पूर्ण निःपात करून तूं साम्राज्याच्या सिंहासनावर अधिष्ठित होशील असा मी तुला आशीर्वाद देतों. राजा, तुझ्या बाजूने लढण्याकरिता मी आलों. पण दुर्दैवाने त्या दुष्ट दुर्योधनाला साहाय्य करण्याला वचनबद्ध झालों." असें म्हणून शल्यानें घडलेला वृत्तान्त सांगितला. युधिष्ठिराने शल्याचे म्हणणें ऐकून आपले बंधू व श्रीकृष्ण यांच्याशीं थोडा वेळ सल्लामसलत केली. मग शल्याला तो म्हणाला, "मामा, क्षत्रियाच्या सत्य बाण्याला अनुसरून आपण केलें तें बरोबर झालें. आपण त्या बाजूला असलां तरी मनातून आमचें हित चिंतणार हे उघड आहे. पण माझी एक विनंति आहे ती आपण मान्य करावी. माझ्या कानावर असे आलें आहे कीं कर्णाला अर्जुनाशीं लढण्याचा प्रसंग येताच आपल्याला कर्णाचें सारथ्य करण्याबद्दल दुर्योधन विनंति करील. त्या वेळीं मामा, कर्णाच्या रथावर बसून आपण कर्णाचा तेजोभंग होईल असें सारखें बोलावे आणि युद्धातहि इतर वेळेस कोठें कर्णाशी बोलण्याचा प्रसंग आल्यास त्याचा तेजोभंग होईल असेंच भाषण करावें. ही माझी विनंति आपण मान्य केली म्हणजे आपण आम्हाला मोठेंच साहाय्य केले असें होईल." युधिष्ठिराची ही विनंति शल्यानें आनंदानें मान्य केली आणि तो पांडवांचा व श्रीकृष्णाचा निरोप घेऊन दुर्योधनाकडे गेला.

द्रुपदाचा पुरोहित कौरवांच्याकडून परत आल्यावर त्यानें तेथें घडलेली हकिगत सांगितली व संजय धृतराष्ट्राचा निरोप घेऊन आपल्या पाठोपाठ येत असल्याचें त्यानें कळविलें. त्याप्रमाणें संजय आला व त्याला अत्यंत लोभी व पोरवेड्या अंधळ्या धृतराष्ट्रानें पढवून ठेविल्याप्रमाणें तो बोलूं लागला. युधिष्ठिरादिकांचें कुशल विचारल्यावर धृतराष्ट्र पांडवांच्या शौर्याची व औदार्याची किती वाखाणणी करीत असतो, त्याला त्याच्या

दुष्ट पुत्राचें वर्तन कसे आवडत नाहीं, तो पांडवाचें राज्य पाडवाना देण्यास तयार असतांना त्याचें दुर्योधनादिकांच्या हेकेखोरपणामुळें कसें चालत नाहीं, वगैरे सर्व गोष्टी तो पढविल्याप्रमाणें उत्तम तऱ्हेनें बोलला. आणि धृतराष्ट्राचा युधिष्ठिराला खास निरोप म्हणून त्यानें सांगितला तो असा : "धर्मा, तुमची मागणी मान्य करण्याचें माझ्या मनांत असूनहि दुष्ट दुर्योधनाच्या हट्टामुळें मला तुम्हाला तुमचा भाग देणें अशक्य झालें आहे. आजपर्यंत तूं जशी अतुल सहनशीलता दाखवून माझ्या पुत्राचा नाश केला नाहींस, तसाच यापुढेंहि कुलक्षय होण्याचा प्रसंग तूं येऊं देऊं नकोस. तुम्हीं युद्ध केलें तर माझ्या पुत्रांचा नाश निश्चित होईल, हें मी जाणतों. युधिष्ठिरा, मला पुत्रनाशाचें दुःख होऊं नये, म्हणन तूं युद्ध करूं नकोस. तुझे भ्राते तुझ्या आज्ञेंत आहेत. तुम्ही सर्वच धर्मशील आहांत. म्हणून तूं मनात आणशील तर भयंकर कुलक्षय करणारें युद्ध टळेल."

हा निरोप ऐकून युधिष्ठिर म्हणाला, "आमच्या पूज्य पितृव्याच्या निरोपाचा मला अर्थच कळत नाहीं. आमचा भाग आम्हांला तो देऊं शकत नाहीं, तरीहि आम्हीं युद्ध करूं नये, असा त्याच्या म्हणण्याचा आशय दिसतो. अन्यायानें गिळंकृत केलेल्या दुसऱ्याच्या वैभवाचा उपभोग घेण्याचा आपल्या पुत्राचा हट्ट राजा धृतराष्ट्र पुरविणार. मग आम्हीं आमची जीवितयात्रा कशी चालवावी असें त्याचें म्हणणें आहे?" यावर, पढविलेला पोपट बोलतो तसें संजय बोलला, "हे पंडुपुत्रा, तुझें कोणतेंहि करणें सदा धर्माला धरून असतें, अशी तुझी प्रसिद्धी आहे. जीवित हें मोठ्या वेगानें निघून जाणारें व अशाश्वत असें आहे इकडे लक्ष्य देऊन, क्रोधानें तू कौरवाचा नाश करूं नको. हे अजातशत्रो, कौरव जर युद्धावांचून तुला स्वभाग देत नाहींत असें झालें तर माझें म्हणणें, तूं अंधक आणि वृष्णि यांच्या राज्यांत भिक्षा मागून निर्वाह करावा व ईश्वराराधनेंत आपला काळ घालवून परलोकसाधन करावें हेंच उत्तम. तुझ्यासारख्याला राज्यभोगापेक्षा क्षमाच अधिक भूषणावह आहे." हें संजयाचें भाषण ऐकून श्रीकृष्णाला हसूं आलें. ते म्हणाले, "संजया, भिक्षा मागून उदरनिर्वाह करण्याला तूं रणधुरंधर क्षत्रियश्रेष्ठांना सांगतोस

हें तुझें अपूर्व धर्मज्ञान पाहून मला आश्चर्य वाटतें. राजा धृतराष्ट्रानें पढविलेले शब्द तुझ्या मुखातून बाहेर पडत आहेत, हें मी जाणतों. म्हणूनच तुझ्या बोलण्याला मी फारशी किंमत देत नाहीं, आणि तुझ्यावर रागावतहि नाहीं. दोन पक्षांमध्यें शम करण्याची तुमची ही तऱ्हा मोठी अजब आहे. युधिष्ठिराला शातता धारण करण्याचा धर्मोपदेश करणाऱ्या आंधळ्या धृतराष्ट्राला, कौरवसभेंत अधर्म करणाऱ्या दुःशासनाला चार शब्द सागण्याचें सुचलें नाहीं, साध्वी द्रौपदीला तो सूतपुत्र कर्ण, दुर्योधनाची बटीक वगैरे पाहिजे ते अभद्र शब्द बोलला, त्यावेळीं त्या सूतपुत्राला धर्मोपदेश करून ताळ्यावर आणण्याचा त्याने प्रयत्न केला नाहीं. आपल्या मूर्ख पोराना फुकटचे वैभव प्राप्त करून देणाऱ्या दुष्ट शकुनीच्या कपटद्यूतानें त्या अंधळ्याला आनंदाच्या कशा गुदगुल्या झाल्या, हें मी तेथें नसतांनाहि जाणतों. ह्या सर्व गोष्टीचे माप त्याच्या पदरात घालून, धर्मशील पाडवाना त्याच्या वडिलार्जित राज्याचा अर्धा भाग व त्याचे स्वपराक्रमार्जित साम्राज्य देण्याची बुद्धि त्याला होते कीं काय हें पाहाण्याकरिता, कृष्ण हस्तिनापुरास येत आहे असें त्या धृतराष्ट्राला साग. संजया, मी तेथें आल्यावर मी सागेन त्याप्रमाणे धृतराष्ट्र व त्याचे पुत्र वागतील तरच त्याचें कल्याण होईल. माझ्या म्हणण्याचा त्यांनी अव्हेर केला कीं युद्धार्थ सज्ज झालेल्या भीमार्जुनादिकाच्या हातून कौरवाचा नाश झालाच असें समज." श्रीकृष्णाचे हे शब्द ऐकून संजयाने पाडवाचा निरोप घेतला व स्वतः श्रीकृष्ण शिष्टाई करण्याकरिता हस्तिनापुरास येत आहेत असें धृतराष्ट्राला कळविण्याकरितां तो हस्तिनापुरास गेला. हस्तिनापुरास जातांच संजायानें पांडवांकडची सर्व हकिगत धृतराष्ट्राला सांगितली. पाडवांनीं राज्याचा भाग मिळाला नाहीं तर युद्ध करून सर्वच राज्य मिळविण्याचा केलेला निश्चय ऐकून धृतराष्ट्र मनांत चरकला. श्रीकृष्णाचें भाषण जसेंच्या तसेंच संजयानें सांगताच आपल्या पुत्रांचा नाश अगदीं जवळ आला, हें तो समजला. स्वतः श्रीकृष्ण शिष्टाई करण्याकरितां येत आहेत हें ऐकून त्याच्या व दुर्योधनादि कौरवांच्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाली. धृतराष्ट्रानें श्रीकृष्णाचा उत्तम प्रकारें सन्मान करून

त्याला संतुष्ट करण्याबद्दल आपल्या पुत्रांना व मंत्रिजनांना आज्ञा केली, श्रीकृष्णाचा अपूर्व सत्कार करून आपला कार्यभाग साधितां येतो कीं काय हें पाहाण्याचें त्या म्हाताऱ्यानें ठरविलें. हस्तिनापुरांत श्रीकृष्णाच्या स्वागताची तयारी जोरात चालू झाली.

श्रीकृष्ण शिष्टाई करण्याकरिता उपप्लव्य नगरीहून निघाले तेव्हां धर्म, भीम, अर्जुन, नकुल, सहदेव व सात्यकि वगैरे योद्धयांनीं आणि साध्वी द्रौपदीने त्यांना आपापले मनोगत सागितले. धर्मानें सांगितलें, "श्रीकृष्णा, राजा धृतराष्ट्राला मी पूर्णपणें ओळखतों. मनाचा खोटा आणि धनासाठीं प्राण देणारा तो म्हातारा हट्टी पुत्राच्यापुढे आपलें कांहीं चालत नाहीं, अशी सबब सांगून, न्यायानें आम्हाला मिळणाऱ्या राज्याचा अपहार करूं पाहातो. कौरवांना व कौरवपक्षीयांना ठार करून त्याच्यापासून राज्य हिसकून घेण्याला, भगवंता, आम्ही समर्थ आहों. पण कौरव हे द्रव्यलोभामुळें आमचें शत्रुत्व करीत असले तरी ते आमचे बंधु आहेत. त्या सर्वांचा आमच्या हातून वध होऊन आम्हाला पातक लागूं नये म्हणून आम्हा पाच भावांना, अविस्थल, वृकस्थल, माकन्दी, वारणावत हीं चार गांवें व पाचवें त्याला वाटेल तें गांव अशीं पांच गावें धृतराष्ट्रानें संतोषानें दिलीं तर कृष्णा, आमच्याकारिता कौरवाशीं शम करून तूं युद्धाचा प्रसंग न येईल असें कर. सख्या कृष्णा, तूं कशीहि हिताची गोष्ट सांगितलीस तरी धृतराष्ट्र अगर दुर्बुद्धि दुर्योधन तुझें ऐकणार नाहींत, तुझ्यासारख्या सर्वोत्तमाचा ते अपमानच करतील. म्हणून एकदां वाटतें, तूं त्यांच्याकडे जाऊच नयेस. दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनि ही चौकडी इतकी दुष्ट आहे कीं मूर्खपणानें ते तुला अपाय करण्याचें देखील मनांत आणतील." श्रीकृष्ण म्हणाले, "युधिष्ठिरा, ते दुष्ट माझें ऐकणार नाहींत, हें मी समजून आहें. पण आपण आपलें कर्तव्य केलें म्हणजे कोणालाहि आपल्याला बोल लावितां येणार नाहीं. कुलक्षय व असंख्य वीरांची प्राणहानि होऊं नये, म्हणून तुम्ही प्रबल असतांहि जें अल्पस्वल्प मिळेल तेवढ्यावर शम करावयास तयार आहां, आणि ते दुष्ट, दुर्बळ असूनहि आपल्या लोभीपणामुळें असंख्य प्राणांची होळी करायला तयार झाले आहेत, ही गोष्ट

मी स्पष्टपणें दाखविली म्हणजे तत्पक्षीय लोकच त्याची छि:थू: करतील. धर्मराजा, ते माझा घात करतील, ही भीति तुला नको. तेथें आहेत तेवढे राजे एकजुटीने जरी मजवर घसरले तरी मी क्षणांत तितक्याची धुळधाण उडवीन. मीं बेतच केला आहे कीं, तेथें जर का माझ्याशीं ते यत्किंचित् गैर वागले तर तेथल्या तेथेच सर्व कौरवाची वाट लावून तुम्हांला युद्ध करण्याचें कारणच उरूं द्यावयाचे नाही. तेव्हां त्या कामीं तूं अगदीं निश्चिंत राहा. धर्मा, मी तेथे जाणें निरर्थक होणार नाहीं. कदाचित् आपले मनाप्रमाणें सामहि होईल. निदान आपण लोकापवादातून तरी मुक्त होऊं." इतकें भाषण करून श्रीकृष्णाने भीमाकडे पाहिलें व त्याला त्याचें काहीं म्हणणें असल्यास तें त्याने सांगावे, असें म्हटलें. त्यावेळीं मोठी आश्चर्याची गोष्ट घडली.

कौरवाच्या बाबतीत युधिष्ठिरानें आपल्या स्वभावाप्रमाणें नरमाईचे शब्द उच्चारिले कीं ज्याच्या अंगाचा तिळपापड व्हावयाचा, कौरवांचें नुसतें स्मरण झालें, कीं क्रोधाने डोळे लाल होऊन ज्याचा हात गदेकडे वळायचा, दुर्योधनादि कौरवाना समरंगणात गांठून आपल्या गदेनें ठार करण्याच्या प्रतिज्ञेचा ज्याच्या तोडातून अनेक वेळां उच्चार व्हावयाचा, कौरवांसंबंधीं ज्याचे बोलणें नेहमीच उग्र व क्रोधयुक्त असावयाचें, तो महाबलाढ्य भीम, श्रीकृष्णाला आपले मनोगत सांगतांना राजा धर्माप्रमाणें अत्यंत विवेकी आणि शात दिसला. भीम म्हणाला, "हे मधुसूदना कृष्णा, युगांतसमयीं धर्माचा ऱ्हास होण्याचा काळ आला म्हणजे वैभवदीप्तीनें भडकलेल्या राजकुळात कुलांगार कलिपुरुष उत्पन्न होऊन, ज्ञाति, बांधव, सुहृद्, या सर्वांचा सत्यानाश करून टाकीत असतात. याप्रमाणें ज्यांनी आपापल्या कुलाचा भयंकर नाश केला असे मुदावर्तादि आजपर्यंत इतिहासप्रसिद्ध अठरा कुलागार राजे होऊन गेले. आतांहि द्वापरयुगाचा शेवटच आला आहे; तेव्हा कालप्रेरणेनें असला हा पापबुद्धि नीच दुर्योधन आमच्या ह्या कुरुकुलांत कुलांगार तर निपजला नसेल ना? केशवा, ह्या कुलांगाराकडून राजकुलाग्रगण्य असें कुरुकुल दग्ध होणार नाहीं, अशी काहीं तरी तजवीज कर. आमच्या ह्या भरतकुलाचा नायनाट

न व्हावा म्हणून कौरवांशीं आम्हीं तिन्हाइतांप्रमाणें उदासीन राहावें असें जरी तेथें ठरवून आलास, तरी चालेल. कलहापायीं कुलक्षय केल्याचा डाग कुरुकुलाला लागूं नये एवढीच युधिष्ठिराप्रमाणें माझीहि इच्छा आहे. धनुर्धर अर्जुनहि अत्यंत दयाळु असल्यामुळें कुलक्षयकारक युद्धाची इच्छा तो करणार नाहींच." पूर्वी कधींहि ऐकिलें नाहीं इतकें सौम्यपणाचें भाषण भीमाच्या तोंडून ऐकतांच श्रीकृष्णाला एखादी प्रचंड शिला पिसाप्रमाणें हलकी होऊन वाऱ्यावर उडूं लागावी किंवा अग्नि हाताला थंडगार लागावा त्याप्रमाणें आश्चर्य वाटलें. तो भीमाला म्हणाला, "भीमा, पांडवांना व येथें तुमच्या निमंत्रणावरून जमलेल्या पाडवपक्षीय असंख्य योद्धयाना निराशासमुद्रांत बुडविणारें तुझें हें नेभळें भाषण ऐकून एखाद्या पर्वतानें वाऱ्याच्या झुळकीनें स्थानभ्रष्ट होण्याइतकें मला आश्चर्य वाटतें. अस्सल क्षत्रिय कुळांत जन्माला आलेल्या तुझ्यासारख्या योद्धयाला युद्धाची भीति वाटायला लागून, कौरवापुढें पदर पसरून, शमाची याचना करण्याची बुद्धि व्हावी, ह्यापेक्षा दुसरी विपरीत गोष्ट ती कोणती? युद्धांत होणारा क्षय भीमाला भेडसावूं लागला, युद्धात वाहणाऱ्या रक्ताच्या नद्या भीमाच्या डोळ्याला अंधेरी आणू लागल्या, युद्धाच्या भीतीनें भीमाचे भुजदंड मलूल होऊन त्याच्या हातातून भीषण गदा गळून पडली, हें ऐकून दुर्योधन–दुःशासनादिकांचे चेहरे प्रफुल्लित होऊन ते तुमच्या प्रतिज्ञांची कशी टवाळी करतील तें चित्र मला कल्पनेनें दिसूं लागलें आहे. भीमा, सभेत साध्वी द्रौपदीची विटंबना करणाऱ्या दुःशासनाचें वक्षःस्थळ फोडून त्याचें रक्तप्राशन करण्याची प्रतिज्ञा तूं इतक्यांत विसरलास? भरसभेंत द्रौपदीला आपली मांडी उघडी करून दाखविणाऱ्या दुर्योधनाची मांडी गदेनें फोडून टाकण्याची फुसकी प्रतिज्ञा करण्याच्या भानगडींत तूं का पडलास हेंच मला समजत नाहीं." हें श्रीकृष्णाचें भाषण ऐकताच तो तापट व मानी भीमसेन एकदम उसळून म्हणाला, "कृष्णा, कृष्णा, माझ्या बोलण्यातला भाव न समजतां तूं हें काय भलतें भलतें बोलत सुटला आहेस! एकदां युद्धाचा रामरट्टा चालूं होऊं दे. मग माझा प्रभाव तुलाच काय, सर्व जगाला दिसेल. घनघोर युद्धात रथ, हत्ती, स्वार, मोठे-

मोठे क्षत्रिय वीर यांचा नाश करून निवडक योद्धयांना ओढओढून लोळवितांना मी तुझ्या दृष्टीस पडलों म्हणजे तुझा माझ्याबद्दलचा गैरसमज दूर होईल. दुःशासनाच्या वक्षःस्थलातील रक्ताच्या चिळकांड्या आणि मांडी फुटलेल्या दुर्योधनाचें ओरडणें, मी मी म्हणणाऱ्या रणधुरंधरांची भीतीनें गाळण उडवतील. भरतवंशजांचा उच्छेद न व्हावा एवढ्याच-साठीं माझ्या अंतःकरणात दया उत्पन्न होऊन मी तुला शम करण्यास सांगितलें. भीतीनें नाही." हें बोलतांना भीमाला चढलेला आवेश पाहून श्रीकृष्णाला बरें वाटलें. अर्जुन म्हणाला, "मित्रा, धर्म-भीमानीं आपलें मनोगत तुला सांगितले. मी त्याच्याबाहेर नाहीं. सामादिसारख्या मृदु उपायानें आमचे म्हणणें कौरवाना मान्य करायला लावण्याचा प्रयत्न कर. त्यानीं नाहीं ऐकले तर युद्धासारखा क्रूर उपाय योजण्याची आमची सिद्धता झाली असल्याचे त्याना सांगून ये. थोडक्यांत सागायचें म्हणजे तुला रुचेल तसें तूं कर. तूं जें करशील तें आम्हां पांडवाच्या हितावेंच असेल अशी माझी खात्री आहे." नकुलानें आपलें मत अर्जुनाप्रमाणेंच असल्याचें सांगितलें. पाडवांच्यापैकीं सहदेवानें व योद्धयापैकीं सात्यकीनें मात्र स्पष्टच सांगितले, "कृष्णा, साम करण्याच्या खटपटींत तूं पडूंच नको. किंबहुना साम न होतां युद्धच जुंपेल असें कर." द्रौपदीनें सागितलें, "कृष्णा, माझी झालेली विटंबना दृष्टिआड करूं नकोस. साम होत असला तरी तो मोडून काढ, आणि कौरवांना रणांगणांत खेंचून आण. हे धर्मात्मे भीमार्जुन, धर्मराजाप्रमाणें मूर्तिमंत दयेचे पुतळे बनून, कौरवांचा वध कर-ण्यास तयार नसतील, तर माझे वृद्ध वडील द्रुपदराज, माझा भाऊ महारथी धृष्टद्युम्न, तसाच दुसरा भाऊ पराक्रमी शिखंडी, देवेन्द्रालाहि अजिंक्य असा बाळ अभिमन्यु, त्याचे श्वशुर महारथी विराट, माझे पांच महारथी पुत्र, आणि महारथी सात्यकी हे सर्व वीर रणांगणामध्यें कौरवांचा समा-चार घेण्याला खंबीर आहेत. कृष्णा, कौरवांचें मन वळविण्यांत आपलें सुंदर वक्तृत्व मुळींच खर्च न करितां, तुझ्या चातुर्यपूर्ण वक्तृत्वानें, खोट्या धर्मभावनेनें निरुत्साही बनलेल्या व वैराग्यानें पछाडलेल्या ह्या भीमार्जुनांचा क्रोधाग्नि कौरवांना जाळीत सुटेल असें कर. पाडवांचा असह्य अपमान

करणारे हे दुष्ट कौरव रणांगणांत पडलेले पाहिल्याशिवाय माझा संताप शांत होणार नाहीं. कृष्णा, तुला शिष्टाचार म्हणून कौरवाच्याकडे सामाच्या निमित्तानें जायचे असेल तर जा. पण युद्धाग्नीचा भडका उडेल असे मात्र करून ये." तिच्या म्हणण्याप्रमाणेच होईल, असें द्रौपदीला आश्वासन देऊन भगवानानें सर्व पाडवांना उद्देशून म्हटलें, "पांडवहो, तुमची सर्वांचीं मते मीं समजावून घेतलीं. आतां तेथें गेल्यावर प्रसंगाला उचित तें सर्व करून मी येतों. तुम्हांला कमीपणा येईल असा साम मी करणार नाहीं. माझाहि कल युद्धाकडेच आहे. मी तेथें जात आहें त्यात माझे अनेक हेतु आहेत. तुम्हांला तुमचें सर्व वैभव परत मिळाले तर साम करावा, साम नाहीं झाला तर त्याच्या पक्षांत फूट पडेल अशी योजना करावी. त्यांच्या युद्धाच्या हालचाली काय आहेत त्यावर दृष्टि टाकावी. युद्धासंबंधीं त्यांची तयारी कितपत आहे हें पाहिलेलें असलें म्हणजे तुम्हाला योग्य त्या सूचना मला करतां येतील." इतकें बोलून श्रीकृष्ण सात्यकीसह रथात बसले. त्याच्याबरोबर त्याचें प्रिय सुदर्शनचक्रहि होतेच. शिवाय एक सहस्र बलाढ्य यादववीर त्यांचे शरीरसंरक्षक म्हणून त्याच्याबरोबर चालले होते.

संजय परत येऊन त्यानें पांडवांच्याकडील वर्तमान सागून, श्रीकृष्ण स्वतः शिष्टाईकरिता येणार आहेत, असें सागताच धृतराष्ट्राने श्रीकृष्णाच्या स्वागताची उत्तम तयारी केली. भगवन्तासारख्या अत्यंत धोरणी, राजकारणपटु व जगज्जेत्या पुरुषाला भुरळ पाडण्याचा आपल्या कोत्या बुद्धीनें त्यानें घाट घातला. त्यानें पुढें काय करावे ह्याबद्दल विदुराचा सल्ला विचारिला. विदुरानें धृतराष्ट्राला सर्व प्रकारचा कुटिल मार्ग सोडून अगदीं सरळपणानें पांडवांशीं वागून सुखी होण्याबद्दल नानाप्रकारानीं उपदेश केला. हा सुंदर उपदेश 'विदुरनीति' *ह्या नावानें महाभारत-ग्रथांत ग्रथित* केला आहे. 'विदुरनीति' म्हणजे रावापासून रंकापर्यंत सर्व प्रकारच्या माणसांच्या स्वभावाची व व्यवहाराची उत्तम छाननी करून दुष्ट स्वभावामुळें व नीच व्यवहारामुळें मनुष्य कसा गोत्यांत येऊन दुःखी होतो, आणि सरळ स्वभावानें उत्तम व्यवहार केल्यामुळें तो स्वतः सुखी होऊन आपल्या भोवतालचें जग आनंदानें कसें भरून टाकतो, याचें फारच

उद्बोधक वर्णन आहे. विदुरानें अशा रीतीनें धृतराष्ट्राला जगात ज्याच्या योगानें सुखानें राहातां येईल अशा उत्तम व्यवहाराचा उपदेश केल्यानंतर मुद्दाम सनत्कुमारासारख्या ब्रह्मनिष्ठ मुनीस पाचारण करून त्या तपस्वी ब्राह्मणश्रेष्ठाकडून धृतराष्ट्राला शाश्वत समाधान देणाऱ्या आत्मज्ञानाचा उपदेश करविला. हा उपदेश म्हणजेच प्रसिद्ध 'सनत्सुजात-संहिता' होय. अशा प्रकारें उत्तमोत्तम उपदेश श्रवण करण्याचे भाग्य लाभूनसुद्धां तो दुर्दैवी अंधळा राजा शेवटपर्यंत मोहग्रस्तच राहिला. याप्रमाणें एकप्रकारें युद्धप्रस्थानच ठेविले गेलें.

---

## प्रकरण १० वें

# श्रीकृष्णशिष्टाई व भारतीय युद्धाची नांदी

श्रीकृष्ण हस्तिनापुराजवळ येताच भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, बाल्हिक, सोमदत्त, अश्वत्थामा आदिकरून सर्व प्रसिद्ध योद्धे, दुर्योधनाशिवाय करून बाकी सर्व धृतराष्ट्र-पुत्र व नगरवासी प्रमुख शिष्ट, समारंभानें नगराबाहेर त्याला सामोरे गेले. हा स्वागतसमारंभ अपूर्व असाच झाला. नंतर हस्तिनापुरच्या राजमार्गातून भगवन्ताची थाटाची मिरवणूक निघाली. राजमार्गांत मुंगीला रीघ नाहीं अशी गर्दी झाली होती. राजमार्गाच्या दुतर्फा असलेले सात सात मजली भव्य वाडे श्रीकृष्णाच्या दर्शनाकरिता स्त्री-पुरुषांनीं फुलून गेले होते. श्रीकृष्णावर सारखा पुष्पवर्षाव होत होता.

मिरवणुक राजप्रासादापर्यंत पोहोंचेतों शेंकडों ठिकाणीं श्रीकृष्णाचा रथ थांबवून नगरवासी लोकांनीं सत्कारार्थ भगवन्ताची पूजा केली. राजवाड्यात जातांच श्रीकृष्णानें धृतराष्ट्राकडे जाऊन त्याची भेट घेतली. धृतराष्ट्रानें तेथें श्रीकृष्णाकरितां उत्कृष्ट आसन ठेविलें होतें. त्यावर श्रीकृष्ण बसतांच, धृतराष्ट्राच्या पुरोहितांनीं त्याचें मधुपर्कानें यथाविधि पूजन करून गाय, सुवासिक पुष्पें, पवित्र जल देऊन त्याचें आतिथ्य केलें. भीष्म-द्रोणादिकांशीं बोलून व भोंवतीं जमलेल्या कौरवांशीं थट्टेचीं भाषणे करून श्रीकृष्ण विदुरगृहीं जाण्याकरितां निघाले, तेव्हां कौरवांनीं त्याला राजवाड्यांतच राहून पाहुणचार घेण्याचा फारच आग्रह केला. परंतु श्रीकृष्णानें, "ज्या कार्याकरितां मी पांडवांचा दूत म्हणून येथें आलों आहें, तें शिष्टाईचे कार्य माझ्या मनासारखें झाल्यानंतर मी तुमच्या पाहुणचाराचा मोठ्या आनंदानें स्वीकार करीन." असें त्यांना सांगितलें व तो विदुरगृहीं गेला. तेथें कुंतीची भेट होतांच भगवन्ताला अत्यानंद झाला. आपल्या आतेचें गोड शब्दांनीं सांत्वन केल्यानंतर श्रीकृष्णानें विदुराच्या पंक्तीला बसून गप्पा-गोष्टी करीत अनेक पक्वान्नांनीं युक्त असें सुग्रास भोजन केलें. भोजनोत्तर रात्रौ विदुराशीं भगवन्ताचा सुखसंवाद झाला. हस्तिनापुरांतील सर्व परिस्थिति श्रीकृष्णानें विदुराकडून समजावून घेतली, आणि राजसभेंत काय बोलावयाचें ते मनाशीं ठरवून तो झोंपीं गेले. सूत मागधांच्या स्तुतिपाठानें व शंख-दुंदुभी यांच्या गजरानें दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं श्रीकृष्ण जागे झाले. त्यानीं आपला प्रातर्विधि आटोपून प्रातःस्नान केलें. नंतर जपजाप्य केल्यावर त्यांनीं अग्नीला आहुति दिली. उभे राहून सूर्योपस्थान केल्यानंतर त्यांनीं आपला संध्याविधि समाप्त केला. इतक्यांत दुर्योधन व शकुनि त्यांच्याकडे येऊन म्हणाले, "कृष्णा, धृतराष्ट्र, भीष्मप्रमुख सर्व कौरव, द्रोण-कृपादि सर्व सभासद व सर्व राजे सभेंत आले असून, सर्व लोक तुझी प्रतीक्षा करीत आहेत." हें त्यांचें भाषण ऐकून श्रीकृष्णानें गोड शब्दांनीं त्यांच्याशीं बोलून, 'तुम्ही पुढें व्हा, तुमच्या पाठोपाठ मी आलोंच.' असें सांगितलें. त्याप्रमाणें श्रीकृष्णाला सभेंत येण्याचें निमंत्रण करून दुर्योधन व शकुनि राजसभेकडे

गेल्यानंतर श्रीकृष्ण राजसभेंत जाण्याकरितां आपल्या रथावर चढले. त्यांच्याबरोबर धर्मज्ञ विदुरहि त्याच रथांत बसला. रथरक्षणार्थ सुदर्शनचक्र व एक हजार निवडक यादववीरांनिशीं सात्यकि हे रथाबरोबर निघाले. सभास्थानाशीं श्रीकृष्णाची स्वारी येऊन पोहोंचतांच शंख, वेणु, दुंदभी वगैरे वाद्यांच्या गजरांनीं दशदिशा भरून गेल्या. सभाद्वाराशीं दुर्योधन व कर्ण स्वागतार्थ उभे होते. त्यांनीं केशवाला सन्मानपूर्वक रथावरून उतरवून सभेमध्यें नेलें. सभेंत शिरताना श्रीकृष्णाच्यापुढें दुर्योधन व कर्ण चालले होते. त्यांच्या पाठोपाठ विदुर व सात्यकि यांच्या हातांत हात घालून भगवान् चालले होते. त्यांच्या मागें त्यांचें शरीररक्षक सुदर्शन आणि यादव-सरदार होते.

श्रीकृष्ण सभास्थानांत आले असें समजताच त्यांच्या सत्कारार्थ राजा धृतराष्ट्र, भीष्म-द्रोणादि मंडळीसह, आपल्या आसनावरून उठून उभा राहिला. त्याबरोबर सभेंतले सर्व राजेहि उभे राहिले. धर्मज्ञ भगवानानें मस्तक लववून त्या सर्वांनीं केलेल्या सन्मानाचा स्वीकार केला. नंतर धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण व कृप यांच्याशीं हंसत हंसत चार शब्द बोलून इतर प्रमुख राजाशींहि, कोणाबरोबर दोन शब्द बोलला, कोणाकडे पाहून नुसता हंसला, तर कोणाकडे त्यानें नुसतीच दृष्टि टाकली. ह्याप्रमाणें भगवान् ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणें त्या सर्व राजाशीं कुशल गोष्टी करीत व सर्वांनीं केलेल्या सन्मानाचा स्वीकार करीत उभा असतां, त्या दिवशीं त्या सभेंत होणारें भगवन्ताचें वक्तृत्वपूर्ण भाषण ऐकण्याच्या उद्देशानें नारदप्रभृति प्रसिद्ध ऋषी, महर्षी, त्या सभेंत येऊन दाखल झाले. भीष्मानें त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना आसनावर बसविल्यावर भगवान् श्रीकृष्ण त्यांच्याकरितां मुद्दाम मांडलेल्या सुंदर रत्नखचित सुवर्णासनावर बसले. त्यांच्या एका बाजूस एका सुंदर आसनावर सात्यकि बसला व दुसऱ्या बाजूस ठेविलेल्या शुभ्राजिनाच्छादित सुंदर आसनावर विदुर बसला. कर्ण व दुर्योधन श्रीकृष्णापासून बरेचसे जवळ एकाच आसनावर बसले. सर्व राजेहि आपापल्या असनावर अधिष्ठित झाले. सर्वांची दृष्टि मध्यभागीं बसलेल्या भगवन्ताचे मुखावर खिळून बसली. त्यांच्या मनोवृत्ती भगवन्ता-

कडे लागून राहिल्यामुळें सभेंत जिकडे तिकडे शांतता झाली. थोड्या वेळानें सर्वांचे कान तृप्त करणाऱ्या आपल्या अमृततुल्य गंभीर वाणीनें भगवान् स्मितहास्यपूर्वक भाषण करूं लागले.

ते म्हणाले, " हे भरतश्रेष्ठा राजा धृतराष्ट्रा, तुझ्या पुत्राचा पांडवाशीं समेट करून तूं आपला कुलक्षय व असंख्य वीरांची निष्कारण होणारी प्राणहानि होऊं देऊं नकोस, एवढेंच तुला सांगण्याकरिता मी येथें आलों आहें. असें करण्यांत तुझें हित कसें हें तूं जाणतोसच. सर्व राजकुलांत श्रेष्ठ असें हें तुझें कुरुकुल तुझ्या पुत्रांच्या अयुक्त वर्तनानें आपला नांवलौकिक घालवीत आहे, इकडे तुझें लक्ष्य नाहीं, कीं समजून उमजून तूं आपल्या पुत्रांच्या अशा वर्तनाकडे दुर्लक्ष्य करीत आहेस, ह्या गोष्टीचा विचार तुझा तूंच कर. तुझे दुर्योधनादि पुत्र, धर्मार्थादि पुरुषार्थांना झुगारून देऊन, अतिशय द्रव्यलोभामुळे आपल्या सख्या चुलतभावाशी अत्यंत दुष्टाव्यानें वागून, माणुसकीला लाज आणणारें निंद्याचरण करीत आहेत. हें त्याचें पातक तुझ्या कुळाचाच नव्हे, तर पृथ्वीवरील तुझ्या सर्व स्नेही राजकुलांचाहि संहार करील, हें मी आज तुला स्पष्ट सांगूं इच्छितों. तुझ्या दुष्ट पुत्रांनीं चेतविलेल्या ह्या कलहाग्नीनें तुम्हां सर्वांची राखरांगोळी होऊं नये अशी जर तुझी खरोखर इच्छा असेल तर अजूनहि पांडवांशीं सख्य करून हा भडकलेला कलहाग्नि विझविणें तुला शक्य आहे. धर्मनिष्ठ पांडवांशीं सख्य करणें ही गोष्ट अत्यंत सुलभ आहे. तू आणि मी, दोघे मिळून ही गोष्ट सहज करूं शकूं. तूं आपल्या पुत्रांच्या दुष्ट बुद्धीला लगाम लाव, कीं क्षमाशील पांडवांना सख्य करण्याकडे मीं वळविलेंच असें समज. पांडवांना तूं आपलेसें करून घेतल्यावर, तुम्हां कौरवांकडे वक्र दृष्टीनें पाहाण्याची प्रत्यक्ष देवेंद्राचीहि छाती होणार नाहीं, मग पृथ्वीवरील इतर राजे लोकांची काय कथा ? भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, विविंशति, अश्वत्थामा, विकर्ण, सोमदत्त, बाल्हिक, सिंधुराज जयद्रथ, कालिंग, कांबोजनृप-सुदक्षिण, युधिष्ठिर. भीम, अर्जुन, नकुल सहदेव, महातेजस्वी सात्यकि व महारथी युयुत्सु असले योद्धे ज्याच्या पाठीशीं उभे आहेत, त्याच्याशीं युद्ध करण्याचें कोण मनांत आणील ? द्यूतापूर्वी पांडव

ज्या स्थितींत होते ती स्थिति तूं त्यांना प्राप्त करून दे, आणि त्यांच्याशीं तूं आपल्या पुत्रांसह प्रेमळपणानें वाग आणि मग पाहा; जगज्जेते पांडव सर्व भूपतींच्या शिरोभागीं तुला नेऊन बसवतील. पांडवांशीं सख्य करितांच तूं पूर्ण सुखी होशील. पण जर कां ह्यावेळीं तुझ्या अदूरदर्शी व दुष्टांच्या संगतीला लागलेल्या मूर्ख पुत्रांच्या नादीं लागून, पांडवांशीं तूं समेट केला नाहींस, तर भयंकर संहार करणारें युद्ध अटळ आहे, हें तूं खास समज. युद्ध म्हटलें म्हणजे त्याचा परिणाम अगदींच अनिश्चित असतो. युद्धात तुझ्या पुत्रांचाच जय होईल असें धरून का तूं चालतो आहेस? आणि राजा, तूं थोडा विचार करून मला सांग, तुझ्या आयुष्यांतला शेवटचा प्रहरहि संपत आला आहे. आता युद्धांत तुझ्या पुत्रानीं पांडवांना मारिलें, किंवा पांडवांनीं तुझ्या पुत्रांना मारलें, व युद्धार्थ जमलेले हजारों राजे आणि योद्धे आपापसांत लढून रणांगणावर पडले, तर त्यांत तुला कोणतें सुख मिळणार आहे? राजा धृतराष्ट्रा, तूं आपल्याला भूपाल म्हणजे भूमीवरील सर्व प्रजाचा पालन करणारा म्हणवितोस. ह्या घनघोर संग्रामांत होणारी प्रजेची भयंकर प्राणहानि तुला थांबविणें शक्य असूनहि जर तूं थांबविली नाहींस, आणि तुझ्या स्वतःच्या पुत्रांना तुझी आज्ञा मानण्याला भाग पाडण्यास तूं समर्थ झाला नाहींस, तर तुला प्रजांचा पालनकर्ता अथवा तुझ्या स्वतःच्या प्रजेचा पिता तरी कसें म्हणावें, हेंच मला समजत नाहीं. राजा धृतराष्ट्रा, आतां पांडवानीं तुला देण्याकरितां जो निरोप मजजवळ दिला आहे तो मी तुला त्यांच्याच शब्दांत जशाचा तसाच सांगतों. पांडव म्हणाले, 'राजा, तूं आमचा पितृव्य, आम्हांला पितृतुल्य आहेस. लहानपणापासून तूं आमच्यावर वडिलांच्याप्रमाणेंच प्रेम केलेंस. आम्हीहि तुला वडिलांच्यासारखाच मान देत आलों. आमचे वडील पंडुराज, त्यांची तूं आम्हांला आठवणहि होऊं दिली नाहींस. राजा, तुझ्या वचनाचा आम्हीं नेहमीं आदरच केला. कपटद्यूतांत आम्ही होरपळून निघालों असतांहि तूं सांगितलेंस, तूं आज्ञा केलीस, म्हणून तसल्या विषम स्थितींतहि तुझ्या आज्ञेचा अनादर होऊं नये म्हणून तूं सांगितलेल्या अटीवर आम्ही निमूटपणें द्यूताचा शेवटचा डाव खेळलों,

आणि अपेक्षेप्रमाणें शकुनीच्या कपटविद्येची सरशी होऊन आम्ही तो डाव हरलों; आणि बारा वर्षें दुर्धर वनवास भोगून व तेरावें वर्ष महाकष्टप्रद अज्ञातवासांत काढून तूं ठरवून दिलेली अट आम्हीं अगदीं कसोशीनें पाळली. आम्हीं वनवास कसा पार पाडला ह्याला शेंकडों विद्वान ब्राह्मण साक्षी आहेत, आणि अज्ञातवासाचें वर्ष किती हालअपेष्टेंत काढलें ह्याला राजा विराट आणि विराटनगरींतले सर्व लोक साक्षी आहेत. 'बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास भोगून आल्यानंतर तुमचें राज्य तुम्हाला परत देईन.' ह्या तुझ्या वचनावर पूर्ण विश्वास ठेवून हा प्रदीर्घ कालावधि आम्हीं सर्व प्रकारच्या संकटांना मोठ्या धैर्यानें तोंड देऊन काढला. आम्हीं तुझी अट कसोशीनें पाळली. आतां तूं आपल्या वचनाला जागून आमचें राज्य आम्हांला परत दे, आणि आम्हा बालकांवर कृपादृष्टि ठेव, एवढीच नम्र प्रार्थना आम्ही तुझ्या चरणीं करीत आहों. धर्माधर्म तूं जाणत आहेस. आम्ही तुझे बालक तुला अधिक तें काय सांगणार!' राजा, तुझ्या बालकाचा तुला हा असा निरोप आहे.

"ह्या सभासदाना उद्देशून त्यांनीं असें सांगितलें आहे, 'सभासदहो, आपणांसारखे धर्मज्ञ सभासद राजाला योग्य सल्ला देऊन आम्हाला न्याय मिळवून देतील ह्याची आम्हांला खात्री आहे. धर्मज्ञ सभासद सभेंत बसलेले असतांना धर्माची अधर्माकडून जर हेटाळणी झाली, असत्यानें सत्यावर जर मात केली, तर धर्मशास्त्र त्या सभासदांना दोषी ठरवितें व धर्म त्या सभासदांचा सर्वनाश करतो. ह्याकारितां आपणांसारख्या धर्मज्ञ सभासदांनीं आपल्यादेखत अधर्म होऊं देऊं नये अशी आपणांस विनंति आहे.' राजा धृतराष्ट्रा, आणि मान्यवर सभासदहो, धर्मनिष्ठ पांडव धर्माला संमत असेंच बोलतात आणि धर्माला संमत असलेल्या मार्गानेंच चालतात. त्यांनीं तुम्हांला सांगितलेला निरोप सत्य, न्याय व धर्म यांना धरूनच आहे. राजा, सत्य व धर्म म्हणून जगांत कांहीं तुझ्या ओळखीचे पदार्थ असतील तर धर्मनिष्ठ धर्माला प्राण समजणाऱ्या पांडवांचा निरोप ऐकून, 'तुमचें राज्य मीं तुम्हांला परत दिलें आहे, तें घेऊन सुखानें नांदा.' असें एकच उत्तर तुला त्यांना देणें योग्य आहे. पांडवांच्या पक्षपातानें मी

हें तुला सागत आहें असें समजूं नकोस. ह्या सभेंत जमलेले सर्व राजे तुझें हितचिंतन करणारे आहेत. मीं म्हटलें हें खरें आहे, कीं खोटें आहे ते, कोणाचीहि भीति मनात न बाळगतां, धर्माला स्मरून त्यांनीं सांगावें, असें माझें त्यांना सांगणें आहे.-राजा, तुलाहि मी स्पष्ट सांगतों. धर्माकडे डोळेझांक करून, आणि पुत्रप्रेमानें वेडा होऊन कांहीं भलतें सलतें उत्तर देऊन शात आणि क्षमाशील पाडवाना क्रोध आणशील, तर त्या जगज्जेत्या शूरांच्या क्रोधाला तुझे सर्व पुत्र व हे जमलेले क्षत्रियराजे खासच बळी पडतील. राजा, शहाणपणा करून पांडवांचा वडिलार्जित राज्याचा वांटा त्यांना देऊन टाक, आणि तुझ्या पुत्रांना व ह्या क्षत्रियांना मृत्युमुखांतून वांचव राजा, अजातशत्रु धर्मराज नेहमीं धर्माला धरून चालतो व बोलतो हें ध्यानात ठेव. तो क्षमाशील, खरा थोर पुरुष व शांतीचा सागर आहे. राजा, मी आता याहून अधिक स्पष्ट बोलतों. तूं आपलें पूर्ववृत्त आठव. दुष्ट पुत्रांचें प्रिय करण्याकरिता तूं पांडवाना जाळलेस, विष भक्षण करविलेंस, इंद्रप्रस्थास घालवून दिलेंस. त्यांनीं स्वपराक्रमानें मिळविलेलें, कपटद्यूतानें हरण केलेंस. साध्वी द्रौपदीला सभेमध्यें फरफरा ओढीत आणलेली कळूनहि तूं गप्प बसलास. शकुनीकडून त्यांचें सर्वस्व हरण करवून भयंकर वनवास त्यांच्या माथीं मारलास. धर्मनिष्ठ पाडवांनीं क्षात्रधर्मापासून एक रेंसभरहि पाऊल मागे घेतलें नाहीं. राजा, अजून तरी सावध हो. तुमच्या ह्या कलहाग्नींत आपल्या कुलाबरोबर सर्व जगाची राखरांगोळी करण्याचें घोर पातक करूं नकोस. पांडवांचा न्याय्य भाग त्यांना देऊन टाक व पुढला सर्व अनर्थ टाळ. धर्मानें वागलास, तर राजा, पांडव तुझी सेवा-चाकरी करण्यास तयार आहेत. अधर्मानें वागुन असत्यभाषी होशील तर मात्र घनघोर युद्ध करून ते आपल्या हक्काचें राज्य मिळविण्यासहि तयार आहेत. नीट विचार करून उत्तर दे." भगवन्ताच्या ह्या सडेतोड भाषणाची सर्व राजेलोकांनीं मनांतल्या मनांत स्तुति केली, पण कौरवांच्या भिडेनें कोणीच उघड बोलूं शकला नाहीं.

श्रीकृष्णाच्या भाषणानंतर सर्व राजमंडळ स्तब्ध होऊन आपल्या मनाशींच विचार करीत बसलें. कोणीच बोलत नाहीं हें पाहून जामदग्न्य ऋषि

राजा धृतराष्ट्राला उद्देशून बोलले. त्यांनीं दंभोद्भव नावाच्या एका उन्मत्त क्षत्रियराजाची गोष्ट सांगितली. त्या राजानें पृथ्वीवरचे सर्व क्षत्रिय राजे जिंकले तरी त्याची युद्धाची रग काहीं नाहींशी झाली नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, ह्या चारहि वर्णांना युद्धाचें आव्हान देत पृथ्वीवर उन्मत्तपणानें तो हिंडूं लागला. शेवटीं गंधमादन पर्वतावर तपश्चर्या करीत असलेल्या नर-नारायण ऋषींनाहि त्यानें युद्धाचें आव्हान दिलें. नर-नारायण ऋषींनीं पुष्कळ वेळ त्या मूर्खाची उपेक्षाच केली. परंतु तो मूर्ख जेव्हां ऐकेनाच, तेव्हा मात्र त्या दोन ऋषींपैकीं नर ऋषीनें त्याला त्याच्या सैन्यासह युद्धाला सिद्ध होण्यास सांगितलें. तो मदोन्मत्त राजा आपल्या सर्व सैन्यासह युद्धास तयार होऊन त्या ऋषीवर बाणांचा वर्षाव करूं लागला. तें पाहून नर ऋषीने एका दर्भाच्या काडीवर ऐषिकास्त्राचा प्रयोग करून ती काडी सैन्यावर सोडली. त्या बरोबर सर्व सैनिकांचे नाक, कान, डोळे काड्यांनीं भरून जाऊन त्यांची हालचाल बंद झाली. ती अपूर्व अस्त्रविद्या पाहून दंभोद्भवाचा गर्व नाहींसा झाला. त्याचा युद्धाचा कंडु एकदम शमला. तो नर-नारायण ऋषींना शरण गेला. ही गोष्ट धृतराष्ट्राला सांगून जामदग्न्य म्हणाले, "राजा, मीं असें ऐकलें आहे कीं, ते नर-नारायण ऋषीच अर्जुन-कृष्ण रूपानें अवतीर्ण झाले आहेत. ही अवताराची गोष्ट ऐकीव आहे असें तुला वाटेल, परंतु नर-नारायण ऋषींनीं अर्जुनाला आपली अस्त्रविद्या दिली असल्याचें मला प्रत्यक्ष माहीत आहे. अशा ह्या कृष्ण-साहाय्य असलेल्या व अस्त्रविद्येमध्यें पराकोटीला पोहोंचलेल्या अर्जुनाच्या बाणांना, आपल्या पुत्रांचे निष्कारण बळी द्यावयाचे कीं काय ह्याचा विचार कर, एवढेंच मला तुला सुचवावयाचें आहे." त्यानंतर कण्वऋषीनें, मत्त झालेल्या गरुडाचा गर्व भगवान् विष्णूनें कसा उतरविला ह्यासंबंधीं फार प्राचीन काळीं घडलेला एक वृत्तान्त सांगितला, आणि त्या विष्णूचाच श्रीकृष्ण हा अवतार आहे असें सुचविलें. जामदग्न्य ऋषीनें अर्जुन हा नर-ऋषीचा अवतार आहे असें सांगितलें. कण्वानें भगवान् विष्णु श्रीकृष्णरूपानें अवतीर्ण झाले आहेत, असें सूचित केलें.

तें ऐकून दुर्योधनानें कपाळाला आंठ्या घातल्या. कर्णाकडे पाहून तो मोठ्यानें हंसला. नंतर मुनींच्याकडे पाहून तो तुच्छतेच्या स्वरानें म्हणाला, "कृष्ण हा नारायण ऋषीचा वा भगवान् विष्णूचा अवतार, आणि अर्जुन हा नर ऋषीचा अवतार, अशा भाकड कथा सागून मला भेडसाविण्याचा हा तुमचा प्रयत्न व्यर्थ आहे. ईश्वरानें मला जे कार्य करण्याकरिता जन्माला घातलें आहे, तें कार्य ईश्वरेच्छेनेच माझ्या हातून घडणार आहे. ह्या तुमच्या बडबडीचा कांहींहि उपयोग होणार नाहीं." दुर्योधनानें दोघा मुनींच्या भाषणाचा असा अवमान करिताच भीष्म संतापले. तपस्व्याचा क्रोध मुद्दाम आपल्यावर ओढवून घेण्याच्या उपद्व्यापाबद्दल त्यानीं तीव्र शब्दांनीं दुर्योधनाची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न केला. पण हट्टी दुर्योधनावर भीष्माच्याहि शब्दाचा काही परिणाम झाला नाहीं. तें पाहून नारद म्हणाले, "दुर्योधना, अभिमानाने मनुष्य अधोगतीला जातो व हेकेखोरपणामुळे तो आपल्यावर प्राणसंकट ओढवून घेतो. तूं ऐक वा ऐकूं नकोस. आपल्या दुष्कृतीनें अधोगतीला जाऊं पाहाणाऱ्या दुर्दैवी माणसाकडे पाहून आम्हा ऋषींच्या अंतकरणात जो कळवळा उत्पन्न होतो, तो त्या माणसाला चार हिताचे शब्द आम्हांला सागायला लावतो. दुरभिमानानें ययातिसारख्या पुण्यवान् राजाला स्वर्गभ्रष्टतेचें दुःख कांहीं काल अनुभवावें लागलें. गालवासारख्या सच्छिष्याची हेकेखोरपणामुळें अत्यंत दुर्दशा झाली. जेथें अशा थोर थोर लोकाची ह्या दुर्गुणानीं त्रेधा उडाविली, तेथें तुझ्यासारख्या पापाचरणी व गुरुजनाचा अवमान करणाऱ्या दुरभिमानी, हट्टी माणसाची काय अवस्था होईल, ह्याची कल्पनाच करवत नाहीं. दुर्योधना, तूं आपल्याला केवढाहि बलाढ्य वा शहाणा समजत असलास तरी पाडवाशीं सख्य करण्यासंबंधीं श्रीकृष्णानें सांगितलेल्या गोष्टींचा तूं विचार करच असें तुला माझें आग्रहानें सांगणें आहे." नारदांच्या भाषणाचाहि दुर्योधनावर काहीं परिणाम झाला नाहीं. धृतराष्ट्र म्हणाला, "नारदा, तुम्हा सर्वांचा उपदेश मला पटला. त्याप्रमाणें दुर्योधनानें वागावें अशी माझीहि इच्छा आहे. श्रीकृष्णा, धर्म व न्याय यांनीं युक्त असें जें तूं बोधकारक भाषण केलेंस ते आम्हांला

हितकारक आहे, ही गोष्ट मला पटली. ह्या मूर्ख दुर्योधनाला कोणतेंच हितकारक भाषण पटत नाहीं, त्याला मी तरी काय करूं? ह्याला सांगतां सांगतां आम्ही सगळे थकलों. मी, गांधारी, भीष्म, द्रोण, विदुर यांनीं दुर्योधनाला अनेक प्रकारें सांगून पाहिलें. आतां कृष्णा, तूं एकदां दुष्ट संगतीनें वाईट मार्गाला लागलेल्या ह्या माझ्या उन्मत्त पुत्राची कान-उघाडणी करून पाहा. तुला त्यांना शुद्धीवर आणण्यांत यश आलें तर तूं मला संकटांतून सोडविल्यासारखे होईल. माझी एवढी विनंति तूं मान्य कर. माझी माझ्या पुत्राच्यावर कांहींहि सत्ता चालत नाहीं हें तू समक्ष पाहतोच आहेस.

अंधळ्या धृतराष्ट्राचें भाषण ऐकून भगवान् मनात जें काय समजावयाचे ते समजून चुकले. पुत्राच्या पुढें आपलें कांहीं चालत नाही असें म्हणून हा म्हातारा मोकळा होऊं पहातो, हे श्रीकृष्णानीं ओळखून दुर्योधनाला आपल्याला जें सांगावयाचें तें सांगण्याला हा प्रसंग बरा आहे असें पाहून, त्यांनीं धृतराष्ट्राचे विनंतीला मान दिलासे करून दुर्योधनाला उपदेश करण्याच्या निमित्ताने म्हटले, "दुर्योधना, तुला कोणी कांहींहि म्हटलें, तरी तूं खरोखर कसा आहेस हें मी जाणतों. भरतकुलासारख्या अत्युच्च कुलांत तुझा जन्म झाला असून तूं विद्यासंपन्नहि आहेस. असें असून, नीचकुलोत्पन्न, निर्दय, दुष्ट व निर्लज्ज माणसाच्या हातूनच जीं कृत्यें घडावींत, तीं तुझ्या हातून घडत असलेलीं दिसतात. हें विपरीताचरण तुझ्याकडून वारंवार कां होत असतें ह्याचा तूं शांतपणे आपल्याशीं विचार केलास, तर तुझें तुलाच कळून येईल कीं पांडवांशी अकारण वैर करणाऱ्या क्षुद्र बुद्धीच्या नीच लोकांनीं तुझें मन दूषित केल्याकारणानें हे निंद्य प्रकार तुझ्याकडून होत असतात. धृतराष्ट्र, भीष्म, द्रोण, विदुर, कृप, सोमदत्त, बाल्हिक, अश्वत्थामा, विकर्ण, संजय आणि विवंशति ह्या सर्वांना पांडवांशीं सख्य करण्यांत नुसत्या कुरुकुलाचेंच नव्हे तर सर्व राजकुलांचे कल्याण आहे, असें वाटत असतांना तुझ्या मनांत पांडवांच्याबद्दल अनिष्ट अढी बसण्याचें कारण, तूं आपल्या नीच सल्लागाराच्या शिकवणीनें चालतो आहेस हेंच होय. हे भारता, जो सज्जन आणि

सुहृद अशा स्वकीय आप्तांचें वचन न ऐकतां दुष्ट परकीयांच्या सल्ल्याप्रमाणें वागतो, त्याच्यावर अनर्थ–परंपरा कोसळते. पांडवासारखे अतुल पराक्रमी वीर तुझे बंधु व साहाय्यकर्ते असताना, त्याच्याशीं द्वेष करून मूर्ख व हलक्या माणसांवर तूं आपल्या रक्षणाची भिस्त ठेवली आहेस, याला काय म्हणावें? पांडवांची योग्यता तुला कळत नाहीं? ज्याचा तूं लहानपणापासून छळ केलास, तरी जे तुला आपला समजून तुजशीं सख्य करूं इच्छितात, त्याच्याशीं तूं, मत्सरी माणसाच्या नादीं लागून, अत्यंत कपटानें वागलास, पण ते तुझ्याशीं सरळच वागत आहेत, हें पाहून तरी दुष्टांची संगति सोडून पांडवांशीं सख्य कर. दुर्योधना, तुझा हाडाचा दुष्ट भाऊ दुःशासन, मत्सरी कर्ण, आणि त्याचा साथीदार कपटी शकुनी, ह्याच्यावर सर्व मदार ठेवून तूं आपला उत्कर्ष साधूं पहातोस, हें पाहून तुझी कींव येते. धर्म, अर्थ, पराक्रम यापैकीं कोणत्याहि एका तरी गोष्टीत हे तिघे किंवा या तिघांपैकीं कोणी पांडवांशीं बरोबरी करील, असें तुला वाटते काय? संग्रामात एकटा भीम खवळला, तर त्याच्या तोंडाकडे डोळा वर करून पहाण्याची या तिघांची छाती नाहीं. देवेंद्रालाहि न जुमानता सर्व खांडववनाचा दाह करून सर्प, दानव, व राक्षस याना वनातून हाकलून देणारा पराक्रमी अर्जुन, संग्रामात गांडीव चाप सज्ज करून उभा राहिला असतांना, त्याला यशस्वी तऱ्हेनें तोंड देईल असा एक तरी वीर तुझ्या पक्षात दिसतो काय? तुझी सारी भिस्त कर्णावर आहे. पण उत्तरगोग्रहणप्रसंगीं एकट्या अर्जुनाने भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, ह्या एकवटलेल्या योद्धयाची काय दैना केली हे तूं इतक्यांत खास विसरला नसशील. कर्णाची अर्जुनाशीं युद्ध करण्याची नालायकी सिद्ध करण्याला हें एकच उदाहरण पुरेसें आहे. ज्यानें युद्धांत प्रत्यक्ष महादेवाला स्वपराक्रमानें संतुष्ट करून त्याच्यापासून दिव्यास्त्रांची प्राप्ति करून घेतली, त्या नरवीर अर्जुनाशीं लढण्यास तुझ्या सैन्यापैकीं कोणी समर्थ होईल, ही गोष्ट मनातसुद्धां आणूं नकोस. म्हणून हे राजा, दुर्योधना, पांडवांशीं युद्ध होऊन तुझे भाऊ, पुत्र, ज्ञातिबांधव व स्नेही यांचे बळी तुझ्या हेकेखोरपणामुळें पडले, अशी अपकीर्ति करून घेऊं नकोस.

तुझ्या नांवाच्या पाठीमागें कुलांगार अशीं अक्षरें लागूं नयेत व तुझ्या कुळाबरोबर असंख्य क्षत्रिय वीर तूं पेटविलेल्या कलहाग्नींत दग्ध होऊं नयेत, म्हणून मी इतकें जीव तोडून तुला सांगत आहें. तुला चक्रवर्ती सम्राट होण्याची इच्छा असली, तर पांडवांशीं सख्य केल्यानेंच ती पुरी होईल. पांडवांना राज्याचा अर्धा वांटा देऊन त्यांचें साहाय्य मिळव म्हणजे ते स्वपराक्रमानें पृथ्वी जिंकून धृतराष्ट्राला सम्राट व तुला युवराज म्हणून अभिषेक करतील. म्हणून दुर्योधना, पांडवांशीं सख्य कर. वडील, गुरु व सुहृद् यांच्या शब्दाला मान दे, दुष्टाची संगत सोड, मित्राची प्रीति संपादन कर, म्हणजे तुझें कल्याण होईल." ह्या श्रीकृष्णाच्या म्हणण्याला भीष्म, द्रोण व विदुर यांनींहि उपदेशपर भाषणे करून पुष्टि दिली.

एका पाठोपाठ एक सर्वजणच आपल्यावर उपदेशाचा मारा करीत आहेत हें पाहून दुर्योधन अगदी चिडून श्रीकृष्णाला म्हणाला, "कृष्णा, तुम्हीं सर्वांनीं हें काय मांडलें आहे ? तूं, भीष्म, द्रोण, विदुर आणि आमचे बाबा ह्या सर्वांच्या दृष्टीने मी घोर अपराधी ठरलों आहें, असें दिसतें. असें मीं तुमचें केलें आहे तरी काय ? पांडव शूर, वीर, सच्छील, आणि तुम्हां सर्वांचे लाडकेहि असतील, पण त्यामुळे मी दुष्ट, पातकी कसा झालों हेंच मला समजत नाहीं. पांडव युद्धात देवेंद्रालाहि अजिंक्य असतील, पण द्यूतांत शकुनीपुढें ते पराजित झाले, त्याला मी काय करणार ? द्यूताची आवड असणारा युधिष्ठिर आपण होऊन शकुनीशीं द्यूत खेळला आणि आपलें सर्व राज्य पणास लावून तें हरला; इतकेंच नव्हे, तर त्यानें पण लावून वनवास आपल्या माथीं मारून घेतला, त्यात मी कसा दोषी ठरतों ? हें एकदां सत्यधर्माला स्मरून सांग तर खरें ! पांडव आमच्याशीं युद्ध करणाच्या तयारींत आहेत. कौरवांचा समरांगणांत समूळ नाश करण्याचा त्यांचा बेत आहे असें मी ऐकतों. युद्धाच्या भीतीनें हा मी दुर्योधन घाबरून जाईन अशी त्यांची कल्पना दिसते. त्यांनीं आपल्या पराक्रमाचें स्तोम केवढेंहि माजविलें तरी मरणाच्या भीतीनें मी शत्रूपुढें मान वांकाविणें शक्य नाहीं. आमच्या बाजूला भीष्म, द्रोण, कृप, कर्ण

असे मोठेमोठे अतिरथी महारथी असतांना आम्ही पांडवांच्या दटावणीला भीक घालूं ही गोष्ट कालत्रयींहि होणार नाहीं. आम्ही अस्सल क्षत्रिय आहोंत. रणांगणावर शत्रूला जिंकून यशस्वी होणें, किंवा लढता लढतां धारातीर्थीं मरण पावणें, या दोनहि गोष्टी आम्हांला सारख्याच कीर्तिप्रद आहेत. रणांगणावर वीरशयन करण्याचें भाग्य लाभलें, तर खरा क्षत्रिय आनंदच मानेल. शत्रूपुढें मान वांकाविण्यापेक्षां पराक्रम करितां करितां आम्हांला वीरशयनच प्राप्त झालें तर आमच्यापैकीं कोणीहि खेद करणार नाहीं. ' शत्रूपुढें मान लवाविण्यापेक्षां क्षात्रियानें कळकाप्रमाणें मध्यें मोडून जावें. ' असे मातंग ऋषीनें सांगितलें आहे. प्राण गेला तरी चालेल, पण शत्रूला भीक न घालतां क्षात्रियानें ताठ्यानेंच वागावें असे माझें मत आहे. कृष्णा, पांडवाना राज्याचा अर्धा वाटा आम्हीं द्यावा असें तूं म्हणत आहेस, पण मी तुला एकदांच स्पष्ट सांगू ठेवतों, कीं राज्यार्ध तर त्याना मिळणार नाहींच, पण अगदीं पाहिल्या प्रथम बाबांनीं त्यांना जो अगदीं अल्पसा राज्यांश दिला होता, तोहि मी त्यांना देऊं देणार नाहीं. इतकेंच नाहीं तर मी जिवंत असेपर्यंत सुईच्या तीक्ष्ण अग्रावर राहील इतकाहि राज्याचा भाग पांडवाना आमच्या हातून परत दिला जाणार नाहीं. शत्रूचें म्हणणें मान्य करण्यापेक्षां त्याच्याशीं लढतांना रणांतील वीरशयन प्राप्त झालें तर तेंहि मी आनंदानें पत्करीन. ''

मूढमति व हेकट दुर्योधनाचें हें उन्मत्तपणाचें भाषण ऐकतांच भगवंताचे डोळे खदिरांगारासारखे लाल झाले. ते एकदम म्हणाले, '' ठीक आहे, रणांगणावरील वीरशयन मिळविण्याची तुला फार हौस आहे. तुझी ती हौस लवकरच पूर्ण होईल. तूं एकटाच काय, पण तुझ्याबरोबर तुझे सर्व दुर्मैत्री, तुझे सर्व पक्षपाती रणांगणावर पहुडलेले सर्व जग पाहील. ' पांडवांसंबधीं मीं कांहीं अन्याय केला नाहीं ' असें जें तूं मूर्खपणानें बोलतोस तें खरें नाहीं, इतकेंच मला आतां सर्व सभेला दाखवून द्यावयाचें आहे. पांडवांनीं स्वपराक्रमानें जग जिंकून अपूर्व वैभव मिळविलें, हें राजसूय-यज्ञाच्या प्रसंगीं पाहून तुझ्या अंगाची आग झाली. तुला दुर्बळाला पराक्रमाचें वावडें असल्यानें, शौर्यशाली पांडवांचें वैभव कपटानें हरण

करण्याचा घाट तूं घातलास. द्यूतप्रिय शकुनीला हाताशीं धरून कपट-द्यूताचें नीच कारस्थान तूं रचलेंस. आपल्या अंधळ्या बापाची संमति मिळवून काहींतरी निमित्तानें पांडवाना इंद्रप्रस्थाहून हस्तिनापुरांत बोलावून आणून, ते द्यूत खेळण्याच्या सर्वस्वी विरुद्ध असतांना, त्यांना ह्या कपटी शकुनीशीं द्यूत खेळायला लावलेंस, आणि अशा प्रकारच्या कुटिल कारस्थानांनीं त्याचें सर्वस्व हरण केलेंस. अशी वस्तुस्थिति असताना 'द्यूताची आवड असणारा युधिष्ठिर आपण होऊन शकुनीशीं द्यूत खेळला' असें अत्यंत खोटें भाषण निर्लज्जपणानें तूं माझ्यापुढें करीत आहेस. अस्सल क्षत्रियानें अलोट वैभव स्वपराक्रमानें मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरावी हें युक्त आहे. पण दुर्बळा, वैभव मिळविण्याकारितां, नेहमींच कलह उत्पन्न करून प्राणघात करणाऱ्या व त्यामुळें सज्जनानीं निंद्य ठरविलेल्या कपटद्यूताची योजना करण्याचा अधमपणा तूं केलास, आणि आतां अस्सल क्षत्रियत्वाचा खोटा दिमाख आपल्या भाषणात दाखवितोस! पाडवांचें सर्वस्व अधर्मानें हरण करण्याच्या इच्छेनें तुम्हीं टाकलेलें कपट-द्यूताचे फासे मृत्यूचे पाश बनून तुम्हाला नरकाकडे खेंचत आहेत असें लवकरच तुमच्या अनुभवास येईल! वडील भावाच्या पत्नीला मातेसमान माना व लहान भावाच्या पत्नीला बहिणीसारखी माना असें धर्मशास्त्र सांगतें. पण अधमा, तूं काय वर्तन केलेंस तें ध्यानात आण. पाडवाना प्राणांपेक्षांहि प्रिय असलेल्या त्यांच्या कुलशील संपन्न जायेला—त्या साध्वी द्रौपदीला—दुःशासनाकडून भर सभेंत फरफरा ओढत आणून, तिला नग्न करण्याची, तिचा उपभोग घेण्याची इच्छा, सर्व सभासदासमक्ष निर्लज्जपणानें प्रदर्शित केलीस. इतकें हलकटपणाचें वर्तन तुझ्याशिवाय अत्यंत पाप्यानेंहि आजपर्यंत जगांत केलें नसेल. इतकें करून, वर 'मी पांडवांचा असा अपराध काय केला आहे?' असें मला विचारण्याची तुला लाज वाटत नाहीं. तुझ्या नीचपणाला उपमा तुझ्या नीचपणाचीच! पांडव वन-वासाला निघालेले पाहून तुम्हीं—तूं, दुःशासन व कर्ण अशा तिघांनीं उच्चारलेले हेटाळणीचे शब्द, अनार्य—चांडाळांच्याहि तोंडून निघाले नसते, इतके ते नीच होते. ह्या गोष्टीला साक्ष ते शब्द ऐकणारे तुमचे कौरवच

आहेत. दुर्योधना, लहानपणापासून तूं पांडवांचा द्वेषच केलास. त्याचा प्राण घेण्याचाहि कित्येक वेळां प्रयत्न केलास, त्याची फिरून एकदां आठवण कर. भीमाच्या अन्नांत विष घातलेंस. तो बेशुद्ध स्थितींत असता त्याला डोहांत बुडविलेंस. वारणावतात असतांना कुंतीसह पांडवांना लक्षागृहात जाळून टाकण्याचा प्रयत्न केलास. पांडवाचे तूं कोणते अपराध करावयाचे बाकी ठेवले आहेस, तेंच समजत नाहीं. तुझी बुद्धि मूळचीच वाईट, म्हणून तुला तुझे मातापितर, भीष्म, द्रोण, विदुर यांनीं तुझ्या हिताची गोष्ट कितीदा आणि किती प्रकारानीं सांगितली असतांहि तुझ्या डोक्यांत प्रकाश पडत नाहीं. पांडव सामोपचारानें राज्याचा वाटा मागत असताना तुला तो देण्याची बुद्धि होत नाहीं. आतां युद्धात आपल्या अद्भुत पराक्रमाने तुला पातक्याला सानुज, सामात्य, ससैन्य, यमसदनास पाठवून सर्वच राज्य ते जिंकून घेणार हें स्पष्ट दिसत आहे. धर्मभ्रष्टा, तुझ्या अधर्म्य कृत्यांचे फळ जे अकल्याण तें तुला लवकरच मिळेल."

श्रीकृष्णाचे हें क्रोधयुक्त भाषण ऐकताच दुःशासन दुर्योधनाच्या कानाशीं लागून म्हणाला, "आतां येथें बसण्यांत अर्थ नाहीं. कृष्णाचे हें रागाचें भाषण ऐकून, युद्ध टाळण्याकरितां भीष्म, द्रोण व आपला पिता, हे तला, मला व कर्णाला बांधून कृष्णाच्या स्वाधीन करतील असें चिन्ह मला दिसत आहे." दुःशासनाचें भाषण ऐकून श्रीकृष्णाच्या भाषणानें संतप्त झालेला दुर्योधन मनांत चमकला व एकदम उठून आपल्या अनुयायासह सभेतून चालता झाला. त्या दुष्टाचा एकदम बाहेर जाण्यांत काय हेतू आहे ते पहाण्याकरितां सात्यकि व कृतवर्मा त्यांच्या पाठोपाठ बाहेर गेले. दुर्योधन अनुयायांसह रागानें जळफळत बाहेर पडला हें पाहून श्रीकृष्ण, भीष्म, द्रोण वगैरे सभासदाकडे पाहून म्हणाले, "तुम्हांसारखे पराक्रमी, वयोवृद्ध कौरवपक्षाकडे असताना ह्या ऐश्वर्यानें मस्त झालेल्या मूर्खाला तुम्हांला आवरतां येऊं नये हें मोठें आश्चर्य आहे. प्रसंगाला उचित अशी गोष्ट झटकन केली तर त्यांत सर्वांचेंच कल्याण होतें. मदोमत्त कंस आपल्या वृद्ध पित्याला बंदींत टाकून स्वतः सिंहासनारूढ होऊन आपला सासरा जो जरासंध, त्याच्या

व दुष्ट दानवांच्या जोरावर सर्वांचा छळ करूं लागला, तेव्हां वयोवृद्ध यादव व भोज मुत्सद्द्याच्या अनुमतीनें कंसाचा काटा मीं झटकन काढून टाकला आणि वृद्ध उग्रसेनाला गादीवर बसविला. तेव्हांपासून आपसातल्या हाणामाऱ्या एकदम नाहींशा होऊन सर्व यादव व भोज सुखी झाले, ही गोष्ट तुम्हांला माहीत असूनहि तुम्हांला सर्व कौरव-पाडवांना सुखी करण्याचा मार्ग सुचूं नये याचें मला नवल वाटतें.'' श्रीकृष्णाच्या भाषणाचा उद्देश ध्यानांत येताच अंधळा धृतराष्ट्र मनांत घाबरला. त्यानें विदुरला हाक मारली व तो घाईघाईनें म्हणाला, ''विदुरा, गांधारीला घेऊन ये. तिच्याकडून दुर्योधनाला थोडें सांगून पाहूं. तिचें म्हणणें तो ऐकेल असें मला वाटतें. गांधारी येथें आल्यानंतर दुर्योधनालाहि आम्ही दोघे त्याला बोलवतों आहों असें सागून घेऊन ये.'' धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें विदुर गांधारीला बोलवायला गेला. गाधारीला बोलावून आणण्यांत धृतराष्ट्राचा हेतु निराळाच होता. त्या मायलेकरांना एकेठिकाणीं पाहून, व गांधारीचें दुर्योधनाशीं चालललें भाषण ऐकून भीष्म-द्रोणादिकांच्या मनात श्रीकृष्णानें कंसाच्या उदाहरणानें उत्पन्न केलेली, दुर्योधनाचा कांटा झटकन काढून टाकण्याची कल्पना, दूर व्हावी हा हेतु मनात धरून धृतराष्ट्रानें गाधारीला बोलाविलें होते. गांधारी येतांच धृतराष्ट्रानें तिला झालेला सर्व प्रकार सागितला व दुर्योधनाला चार उपदेशाच्या गोष्टी सांगून त्याला ताळयावर आणण्याचा प्रयत्न करण्याबद्दल तिला सूचना केली. चतुर भगवंतानें धृतराष्ट्राचा हेतु ओळखला, पण पुढें काय काय होतें तें पाहात तो स्वस्थ बसला. आईचा निरोप ऐकून आपल्या मंत्रिमंडळांत सल्ला-मसलत करीत बसलेला दुर्योधन नाखुषीनेंच उठला व विदुराबरोबर पुनः सभागृहांत आला. त्यानें कांहीं तरी निश्चय केला आहे असें त्याच्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतें. त्याच्या पाठोपाठ त्याचे अनुयायीहि सभेत येऊन दाखल झाले. त्यांच्या आपापसांत कांहीं खुणा चालल्या होत्या.

गांधारीनें दुर्योधनाला मोठ्या कळकळीनें उपदेश करण्याला सुरवात केली. त्याच्या जन्माच्या वेळचा इतिहास तिनें त्याला सांगितला. दुर्यो-

धनाच्या जन्मकाळीं झालेलीं अत्यंत अभद्र दुश्चिन्हें पाहून ह्या पुत्राच्या हातून कुलक्षय होईल, असें व्यास–नारदासारख्या ऋषींनीं व भीष्मासारख्या कुरुश्रेष्ठांनीं भाकित करून सर्व कुलाचें रक्षण करण्याकरितां याचा त्याग करण्याला त्या सर्वांनीं परोपरीनें सांगितलें असताहि मातृप्रेमाचेंच प्राबल्य होऊन तिनें कोणाचेंहि न ऐकतां त्याचें किती आस्थेनें संगोपन केलें, सर्वांचें भाकित खोटें पाडण्याकरितां त्याचें मन सुसंस्कृत करण्याची तिनें किती दक्षता बाळगली, पण दुर्दैवानें तें भाकित खरें ठरण्याचीच वेळ कशी प्राप्त झाली, वगैरेसंबंधीं बोलत असताना तिचें हृदय भरून आलें. तिच्या डोळयांवाटे घळघळ अश्रू वाहू लागले. तो प्रकार पाहून भीष्म–द्रोणादिकांचें मन कळवळलें, आणि तिला बोलावून आणण्याचा धृतराष्ट्राचा हेतु सफल झाला. दुर्योधनाचें मन तिच्या बोलण्याकडे मुळींच नव्हतें. तो मातृमुखाकडे व श्रीकृष्णाकडे पाहण्याचें टाळीत होता व मधूनमधून आपल्या अनुयायांच्याकडे सूचक दृष्टीनें पाहात होता. गांधारीचा उपदेश चाललाच होता. ती त्याला, सम्राट्पदाची इच्छा धरणाऱ्या महत्त्वाकांक्षी पुरुषानें आपल्या इंद्रियांचा निग्रह करून त्याची धर्मार्थांच्या ठिकाणीं योजना कशी केली पाहिजे, कामक्रोधादि षड्विकारांना दूर सारून शांत चित्तानें त्यानें शत्रुमित्र कसे पारखावे, सुहृदांच्या वचनाला त्यानें कसा मान द्यावा, वगैरे सद्विचार शास्त्राधार दाखवून कळकळीनें सांगत होती. सांगतां सांगतां ती मुख्य गोष्टीवर आली. भीष्म, द्रोण, विदुर यांसारख्या सुहृदांच्या सांगण्याप्रमाणें व सर्व जगाच्या कल्याणाकरितां झटणाऱ्या भगवन्ताच्या उपदेशाप्रमाणें पांडवांशीं सख्य करण्याची गोष्ट तिनें काढली मात्र, दुर्योधन बाहेर जाण्याकरितां ताडकन् उभा राहिला. त्याचे अनुयायीहि उभे राहिले. आणि आतां ते बाहेर जाणार तोंच चाणाक्ष सात्यकी एक क्षणभरच श्रीकृष्णाच्या कानाशीं लागला आणि नंतर मोठ्या गंभीरवाणीनें बाहेर जाणाऱ्या दुर्योधनाला व त्याच्या अनुयायांना उद्देशून म्हणाला, "दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनी आदि सर्व दुर्जन हो, बाहेर जाण्यापूर्वीं एक क्षणभर थांबून तुम्हांला माझें बोलणें ऐकून घेतलेंच पाहिजे. तुम्ही आतां ज्या उद्देशानें बाहेर जाऊन

ज्या तयारीने आंत येण्याचें ठरविलें आहे, ते तुमचे सर्व बेत माझ्या कानीं आल्यानें राजा धृतराष्ट्र व भीष्म-द्रोणादि सर्व सभासदांच्या कानावर तुमच्या देखत मी ते घालणार आहे. राजा, तुझ्या ह्या आत्मघातकी पुत्रानें आपल्या दुर्मंत्र्यांच्या सल्ल्याने आज येथे एक अत्यंत निंद्य कृत्य करण्याचें ठरविलें आहे. पाडवांच्याकडून दूत म्हणून आलेल्या भगवान् श्रीकृष्णाच्या मुसक्या बांधून त्याला बंदींत टाकण्याचा घाट ह्या दुर्जनांनीं घातला आहे. मंदबुद्धि व अज्ञान मुले रत्नासारखा दिसणारा निखारा पदरांत बांधण्याची इच्छा करितात, त्यांतलाच हाहि एक प्रकार आहे. ह्या दुष्टबुद्धि दुर्जनांनीं आजपर्यंत अनेक दुष्कृत्यें मूर्खपणानें केली असतील, पण आजचें यांचें हें दुष्कृत्य ह्यांच्या मूर्खपणाचा कळस होणार आहे. भगवान् येथें एकटेच सांपडले आहेत, अशी ह्या दुष्टाची कल्पना दिसते. भगवन्ताचे सहृद् पांडव येथें प्रत्यक्ष हजर नसले तरी अर्जुनाचा पट्टशिष्य हा मी सात्यकि येथें भगवन्ताच्या संन्निध उभा आहें हे ह्या दुष्टाच्या ध्यानात नाहींसें दिसतें. भगवन्ताच्या अंगाला स्पर्श करूं इच्छिणाऱ्या पातक्याचे हात एकदम तोडून टाकिले जातील, ह्या गोष्टीचा त्यांनीं त्वरित अनुभव घ्यावा. भगवन्ताला बंदींत टाकूं इच्छिणारे हे दुर्जन स्वतःच्याच सभेंत आम्हां यादववीरांच्या बंदींत पडले आहेत हें ह्यांच्या लवकरच ध्यानांत येईल. तो पाहा सभाद्वारावर रणधुरधर यादव सेनापति कृतवर्मा आपल्या एक हजार निवडक यादव योद्ध्यांनिशी ह्या दुर्जनाच्या मुसक्या बांधण्याकरिता भगवन्ताच्या इशाऱ्याची वाट पाहात उभा आहे. आणि दुर्योधनाचे अनुयायी राजेलोकहो, आतां संभाळा. तुमचा समाचार घेण्यासाठीं भगवंताची अनुज्ञा घेण्याकरितां भगवंताचें दिव्य सुदर्शन चक्र सभेमध्यें प्रगट होत आहे."

सात्यकीचें हें वाक्य संपतें न संपतें तोंच एकाएकीं विजेचा लखलखाट झाल्याचा भास होऊन सर्वांचे डोळे दिपले व लखलखणारीं शस्त्रें धारण केलेल्या हजार वीरांनीं ती सभा व्यापून टाकली. आणि हुबेहुब भगवन्तासारखे दिसणारे सहा दिव्य वीर पुरुष आपापलीं झगझगीत खड्गें उपसून भगवन्ताच्या भोंवतीं येऊन उभे राहिले. हा अकल्पित प्रकार

पाहून सर्व राजेलोकांची गाळण उडाली. दुर्योधन, दुःशासन, कर्ण, शकुनि ह्या चांडाळचौकडीच्या तोंडचें पाणी पळालें दूत म्हणून आलेला भगवान् श्रीकृष्ण अविचारानें अधर्म्य गोष्ट निश्चित करणार नाहीं ही खात्री असल्यामुळें भीष्म-द्रोणादि वीर भगवन्तानें स्वसंरक्षणार्थ बरोबर बाळगिलेल्या तयारीनें चकित होऊन पाहातच राहिले. विदुर गांधारी व धृतराष्ट्र याना धीर देत म्हणाला, " दीपज्योतीवर झडप घालूं पाहाणाऱ्या पतंगाचें अज्ञान तुमच्या ह्या मूर्ख पुत्राच्या ठिकाणीं प्रत्येक गोष्टींत दिसत आहे. दूत म्हणून आपल्याकडे आलेला भगवान् श्रीकृष्ण, ह्या पातक्यानी कांहीं काहीं केलें तरी, अधर्म्य कृत्य मुळींच करणार नाही, ही गोष्ट निराळी. नाहीतर आजच ह्या दुर्योधन-दुःशासनाची ह्या सभेंत शिशुपालासारखी अवस्था झाली असती." विदुराचे भाषण ऐकून श्रीकृष्ण धृतराष्ट्र गांधारीला उद्देशून म्हणाले, "माझ्या मुसक्या बांधायला निघालेल्या तुमच्या ह्या दुष्ट पोरांच्या त्याच्या अनुयायासह मुसक्या बांधून मी त्याना पांडवांच्या स्वाधीन करूं शकतो, पण दूत म्हणून मी येथे आलेला असल्याने दूताच्या कर्तव्याच्या ठरलेल्या मर्यादा मला उल्लंघिता येत नाहींत. दुर्योधनादि ह्या मूर्खांना युद्धाशिवाय वठणीवर आणण्याला दुसरा मार्ग नाहीं असें समजून मी आता परत जातो." श्रीकृष्णाच्या ह्या भाषणानें दुर्योधन, दुःशासन भगवन्ताच्या रागाला आजच्या आज बळी पडत नाहींत असें पाहून जरा धीर येऊन धृतराष्ट्र, भगवान् श्रीकृष्णाला निरोप देण्याचा हेतुने म्हणाला, " कृष्णा, माझ्या पुत्राच्यावर माझी सत्ता चालत नाहीं हें तूं आता प्रत्यक्ष पाहिलेंच आहेस. हें सांगण्याचें कारण, पांडवांच्या विरुद्ध मी नाहीं, तरी पांडवांच्या न्याय्य मागण्या, परिस्थितीनें मी नेत्रहीन, परतंत्र असल्यामुळें मला पूर्ण करता येत नाहींत, हें जाणून तूं माझ्या केविलवाण्या स्थितीकडे लक्ष्य देऊन माझ्यावर कृपा कर आणि आमच्या कुरुकुळाकडे अनुकंपेनें पाहा." आणखीहि पुढें धृतराष्ट्र काही बोलणार होता पण भगवान् श्रीकृष्ण आपल्या आसनावरून एकदम उठले व भीष्मद्रोणादि सभासदांना उद्देशून म्हणाले, " आज ह्या सभेंत काय काय गोष्टी घडल्या

त्या तुम्हीं सर्वांनीं पाहिल्या आहेत. मूर्ख दुर्योधनाचा उन्मत्तपणा व त्याची दुष्ट बुद्धि हीं तुम्हा सर्वांच्या प्रत्ययाला आलीं आहेत. धृतराष्ट्र हा स्वतः सर्वसत्ताधारी राजा असताना पुत्राच्यावर आपली सत्ता चालत नसल्याचें ढोंग कसे कसें करतो आहे, हेंहि तुम्हां सर्वांच्या लक्षांत आलें असेलच. आता आपणा सर्वांचा निरोप घेऊन मी युधिष्ठिराकडे परत जातो." अशा रीतीने सर्वांचा निरोप घेऊन भगवान् श्रीकृष्ण आपल्या रथांत जाऊन बसले. त्याच्या रथापुढें सुदर्शन पथक व रथामागे यादव-सेना चालूं लागली. भीष्म, द्रोण, कृप, विदुर, धृतराष्ट्र, बाल्हिक, अश्वात्थामा, विकर्ण, युयुत्सु इत्यादि महारथी भारती योद्धे त्याच्या रथापाठीमागें त्याला पोंचविण्याकरिता बरेच दूर चालत होते. दुर्योधन-दुःशासनांशिवाय इतर सर्व कौरव व कर्ण त्याला पोंचविण्याकरिता आले होते. कुंतीचा निरोप घेण्याकरिता श्रीकृष्ण विदुराच्या घरीं गेले. तेथे आपल्या आतेला भेटून त्यानीं सभेमध्ये झालेली सर्व हकिगत तिला सांगितली. "धृतराष्ट्राला व दुर्योधनाला नीट समजावून सांगण्याची मीं व ऋषीमंडळीनीं शिकस्त केली, तरी दुष्ट दुर्योधनाला माझे म्हणणे मान्य झाले नाहीं. अंधळा वरून गोड बोलला पण अंतःकरणानें तोहि तितकाच दुष्ट आहे. आतां कौरवांची समजूत आम्ही रणांगणावरच घालूं. म्हणून वेळ न घालवितां मी युधिष्ठिराकडे जाऊन येथें घडलेली सर्व हकिगत त्याला सांगतों, आणि पांडवांना युद्धाची तयारी करण्याची सूचना देतो. आत्याबाई, पांडवांना तुझा कांहीं निरोप असल्यास सांग. मी तो ऐकतों."

कुंती म्हणाली, "केशवा, त्या धर्मात्म्या युधिष्ठिराला माझा निरोप सांग, कीं तारतम्यानें धर्माचा विचार केला तरच धर्म उपयोगी पडतो. अर्थ न समजता वेद घोकणाऱ्या ब्राह्मणाला वेदांत असलेल्या ज्ञानामृताचा कांहींच उपयोग होत नाहीं. धर्मरहस्य समजावून न घेतां धर्माचे भ्रमाखालीं कांहीं तरी करीत राहणें हा केवळ शीण आहे. क्षत्रियांना लावून दिलेला धर्म नीट समजून घे, आणि मग त्याप्रमाणें वाग. मुचुकुंद ह्या नांवाचा एक महान् राजर्षि होऊन गेला. त्याला कुबेर प्रसन्न होऊन राज्य देऊं लागला. पण त्यानें ते आयतें दान घेण्याचे नाकारलें. 'मी जातीचा

क्षत्रिय आहे. मी माझ्या मनगटाच्या जोरावर मिळविलेल्या वस्तूंचाच उपभोग घेत असतो.' असें त्या क्षत्रियश्रेष्ठाचें तेजस्वी उत्तर ऐकून कुबेर संतुष्ट झाला. त्या राजर्षीनें पुढें स्वबाहुबलानें पृथ्वी जिंकून क्षात्रधर्माप्रमाणें पृथ्वीचें पालन केलें. कृष्णा, तूं युधिष्ठिराला माझा निरोप सांग कीं हे महाबाहो, क्षत्रिय शब्दाचा अर्थ ध्यानांत आण, आणि त्याप्रमाणें वाग. क्षतापासून म्हणजे दुःखापासून प्रजेचे पालन करणारा तो क्षत्रिय. साम, दम्न, दंड, भेद यापैकीं कोणताहि उपाय योजून शत्रूंनीं गिळंकृत केलेलें राज्य त्याच्यापासून हिसकावून घे. शत्रु जर सामानें वळत नसेल तर राजधर्माला अनुसरून आता युद्धानें शत्रूला जेरीला आण, पण स्वस्थ बसूं नको. युधिष्ठिरा, विदुलेने आपल्या संजय नांवाच्या पुत्राला केलेला उपदेश नित्य मनात वागव. शत्रूच्या भीतीनें हाय खाऊन हताश होऊन पडलेल्या आपल्या मुलाला तेजस्वी विदुला म्हणाली, 'प्रेतवत् पडून काय राहिलास ? खडबडून उभा राहा. दीन होऊन पुष्कळ काळ जगण्यापेक्षां स्वपराक्रमाने सर्वत्र गाजून मरून जा. क्षणभरच का होईना, टेंभुरणीच्या लाकडाप्रमाणे चारी बाजूंना ठिणग्या धडाडून उडवीत प्रज्वालित राहा. जिवाची चिंता करून कोड्याच्या विस्तवाप्रमाणें ज्वालेवांचून धुमसून धुमसून नाहींसा होऊं नको ! दीर्घकालपर्यंत नुसतें धुमसत राहाण्यापेक्षां एक घटकाभर का होईना, पण धडकून जळणें बरें !' कृष्णा, याप्रमाणे माझा निरोप सांगून तूं त्यांना एकदां जागें कर. पुत्रांसह पांचहि पाडवाना व द्रौपदीला माझा आशीर्वाद सांग."

कुंतीचा निरोप घेऊन श्रीकृष्ण विदुराच्या घरांतून बाहेर आले. भीष्म-द्रोणादि पोंचवायला आलेली मंडळी बाहेर उभी होती. त्या मंडळींत उभा राहिलेला कर्ण पाहून श्रीकृष्ण त्याच्याजवळ गेले. त्यानीं हंसत हंसत त्याचा हात धारिला व त्याला घेऊन ते आपल्या रथावर चढले. भीष्म–द्रोणादि सर्व मंडळींना अभिवादन करून कृष्णानें सर्वांना परत जाण्यास सांगितलें. सर्व मंडळी परत फिरल्यावर श्रीकृष्ण कर्णासह हस्तिनापूरच्या शिवेबाहेर गेले. तेथें रथ थांबवून कर्णाशीं बराच वेळपर्यंत ते बोलले. भगवन्तानीं कर्णाला त्याचें जन्मरहस्य सांगितलें. तो कुंतीचा

मुलगा व पांडवांचा वडील भाऊ असल्यानें त्यानें दुर्योधनाची बाजू सोडून पांडवांच्या बाजूलाच येणें कसें युक्त आहे, युद्धांत साम्राज्य संपादन केल्यानंतर तो वडील भाऊ असल्यामुळें धर्मादि पांडव त्यालाच कसा राज्याभिषेक करतील, वगैरे पुष्कळ लोभनीय गोष्टी भगवन्तांनीं आपल्या रसाळ वाणीनें त्याच्यापुढें ठेविल्या, परंतु कर्णाचा विवेक जागृत होता. अधिरथानें व राधेनें पिता-माता ह्या नात्यानें सूत जातींत त्याला लहानाचा मोठा केला, सर्व संस्कारविधि सूत जातीचेच त्याच्यावर झाले, सूत जातीच्याच सुंदर स्त्रियाशीं त्याचे विवाह झाले, त्या जातींतच त्यांना अपत्यें झालीं. आपल्या अपत्यासंबंधीं सर्व सोयरीकहि सूत जातींशींच झाली, असा सर्व प्रकारें सूत जातीशीं संबंध निगडित झाला असतांना त्या सर्वांना दगा देऊन स्वार्थाकरितां आपल्या मूळ क्षात्रिय जातीचा स्वीकार करण्यांत सूत जातीशीं बेइमान होऊन कृतघ्नपणा केल्याचा दोष आपल्याला लागेल असें त्याला वाटलें. सूत कुलासंबंधीं ही गोष्ट झाली राजा दुर्योधनाच्या जिवावर त्यानें वाटेल तसले राजविलास भोगले होते. दुर्योधनाच्या कृपेनें तो सर्व राजैश्वर्यानें मंडित झाला होता. त्याच्याच आधारावर दुर्योधन पांडवांशी युद्ध करण्यास तयार झाला होता. युद्धामध्यें अर्जुनाशीं लढण्याकरिता दुर्योधनानें त्याचीच निवड करून ठेविली होती. अशा स्थितींत दुर्योधनाचा विश्वासघात करण्याची कल्पना त्याला मुळींच पसंत पडली नाहीं. श्रीकृष्णाच्या मधुर वाणीनें भारला गेल्यामुळें, त्याला आपण पांडव असल्याकारणानें पांडवांशीं प्राणघातक युद्ध करणेंहि जड वाटूं लागलें. त्यानें आपली ही सर्व स्थिति कृष्णापुढें मांडली. भगवन्तांनीं त्याच्या विचारशीलपणाची फारच स्तुति केली. ज्ञातिद्रोह होणार नाहीं, दुर्योधनाचा विश्वासघात करावा लागणार नाहीं, व पांडवांनाहि अन्याय होणार नाहीं असा मार्ग भगवन्तानीं थोडक्यांत त्याला सांगितला. दुर्योधनानें युद्धांत अर्जुनाशीं युद्ध करण्याकरतांच त्याची निवड केली होती. त्याप्रमाणें त्यानें युद्धांत प्राणघातक युद्ध फक्त अर्जुनाशींच करावें, इतर पांडवांच्या प्राणांवर बेतेल असें त्यानें त्यांच्याशीं युद्ध करूं नये, असें भगवन्तांनीं त्याला सांगितलें. भगवन्तांचें म्हणणें

त्याला पसंत पडलें. युद्धात अर्जुनाशींच फक्त प्राणघातक युद्ध करण्याचें व इतर पांडवांच्या जिवाला धक्का न लावण्याचे वचन भगवन्ताना त्यानें दिलें. श्रीकृष्णाचा निरोप घेऊन कर्ण रथाखालीं उतरला व एक प्रकारें संतुष्ट होऊन तो हस्तिनापुरात गेला. आपण पांडवच आहों असें श्रीकृष्ण-मुखानें त्याला कळल्यापासून पांडवांच्या बद्दलच्या मत्सरानें त्याच्या हृद-यातून आपलें ठाणें उठविलें व तो निर्मळ अंतःकरणाचा झाल्यामुळें त्याच्या मुखावरहि आता एक प्रकारचे विशेष तेज चमकूं लागलें. भीष्म-द्रोणादिकांप्रमाणे आता तो केवळ कर्तव्य म्हणूनच अर्जुनाशीं युद्ध करणार होता. कर्ण परत गेल्यावर श्रीकृष्णानीं सारथ्याला जलद चल-ण्याची सूचना करतांच त्यानें रथ भरधाव हाकला; आणि सात्यकीसह भगवान् श्रीकृष्ण उपप्लव्य नगरास येऊन पांडवाना भेटले.

श्रीकृष्णानी पांडवाना व द्रुपदविराटादि पांडवपक्षीय प्रमुख योद्धयाना एकत्र जमवून, त्याना हस्तिनापुरास गेल्यापासून परत येईपर्यंत झालेली सर्व हकिगत सांगितली. दुष्ट दुर्योधनाला धृतराष्ट्राची आंतून फूस आहे. आपल्या सर्व उपदेशाचा हेकेखोर दुर्योधनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. भीष्म, द्रोण, विदुर, गांधारी यांचेहि उपदेश निष्फल ठरले. पांडवांच्या स्वकष्टार्जित व वडिलार्जित राज्यापैकीं सुईच्या तीक्ष्ण अग्रावर राहील इतकी पृथ्वी देखील पांडवाना खुषीनें परत देण्यास दुर्योधन तयार नाहीं. तेव्हा आतां युद्धाशिवाय राज्य परत मिळविण्याचा दुसरा उपायच नाहीं, असें निश्चित ठरवून आपण आल्याचें भगवन्तानें सर्वांना सांगितलें. युद्ध निश्चित ठरलें असें ऐकताच सर्व योद्धयांच्यामध्यें अपूर्व उत्साह दिसूं लागला. युद्धास सज्ज व्हा, युद्धास सज्ज व्हा, ह्या घोषानें सर्व दिशा दणाणून गेल्या. त्यात कुंतीचा निरोप श्रीकृष्णमुखानें ऐकतांच सर्व पांडवांचाहि रणोत्साह दुर्दम झाला. नंतर धर्मराजाच्या आज्ञेनें युद्धाची तयारी झाली. जमलेल्या सर्व सैन्याची मोजदाद होऊन ती सात अक्षौहिणी भरली. सात अक्षौहिणी सैन्याचे सात भाग पाडण्यांत आले व त्या सात भागांवर द्रुपदराजा, विराट, धृष्टद्युम्न, शिखंडी, सात्यकी, चेकितान व भीमसेन असे प्रख्यात सात वीर सेनापती नेमले गेले. ह्या सातांपैकीं सर्व सैन्याचा मुख्य

सेनापति कोणास नेमावयाचें, याची वाटाघाट होऊन सर्वांच्यामतें शूर, संग्रामपटु, अग्नितुल्य तेजस्वी धृष्टद्युम्नाला मुख्य सेनापति करण्यांत आलें. कुरुक्षेत्राकडे जाण्यास सर्व सेना सज्ज झाली. सेनेला निघण्याची आज्ञा देण्याकरिता धृष्टद्युम्नाच्या विनंतीवरून पार्थसारथी भगवान् श्रीकृष्णानें आपला दिव्य व यशस्वी पांचजन्य शंख पाहिल्याप्रथम फुंकला. विजयी पाचजन्याचा विजेच्या कडकडाटाप्रमाणें शब्द ऐकताच सर्व सैन्याच्या अंगावर हर्षानें रोमांच उठले व मग प्रत्येक सेनापतीनें आपापले शंख फुंकतांच ती प्रचंड सेना दुथडी भरून चाललेल्या गंगेप्रमाणें कुरुक्षेत्राकडे चालूं लागली. मुक्काम करीत करीत सर्व पांडव सेना कुरुक्षेत्रात येऊन पोहोंचली. कुरुक्षेत्रातील हिरण्वती नामक पाषाण व कर्दमरहित, स्वच्छ जलानें युक्त आणि सुदर तटाकांनीं शोभिवंत अशा पवित्र नदीच्या काठीं त्या प्रचंड पाडव सेनेची छावणी पडली. सर्व छावणीभोंवतीं श्रीकृष्णानें आपल्या देखरेखीखालीं खंदक खणविला, व रक्षणार्थ पहारा करणाऱ्या शिपायांच्या अनेक चौक्या बांधविल्या. हजारों हजार शिबिरें तयार केलीं गेलीं व भक्ष्य, भोज्य, खाद्य पेय, पदार्थांनीं तीं समृद्ध करविलीं. त्या छावणींत शेंकडों हुशार कारागीर व शरीरशास्त्रवेत्ते वैद्य होते. धनुष्याच्या दोऱ्या, धनुष्यें, चिलखतें, शस्त्रें ह्यांच्या पर्वतप्राय राशी पडल्या होत्या. हत्ती, घोडे याच्याकरतां गवताच्या गंजी लागल्या होत्या. मोठमोठालीं उल्हाट यंत्रें, बाण, तोमर, कुऱ्हाडी, कवचें, तरवारी व भाते याचा फार मोठा साठा होता. छावणीची अशी सुंदर सोयीची रचना करण्याचे भगवान् श्रीकृष्णाचें चातुर्य पाहून सर्व सेनापति, राजे, योद्धे, सैनिक आनंदित झाले. पुण्यशील राजाचा प्रचड मेळावा पाडवाच्या छावणींत जमलेला पाहून विजयश्री पाडवानाच माळ घालणार असें अनुभवी लोक बोलूं लागले.

कौरवांच्या सेनेचा तळहि कुरुक्षेत्रांत येऊन पडला. कौरवांची सेना अकरा अक्षौहिणी म्हणजे पांडवाच्या सेनेच्या दीडपटीहूनहि अर्धी अक्षौहिणी अधिकच होती. दुर्योधनानेंहि आपल्या सैन्याचे निरानिराळे विभाग पाडून त्यांवर सेनापति नेमले होते. दुर्योधनानें मुख्य सेनापति होण्याबद्दल

भीष्मांना प्रार्थना केली. भीष्मांनीं सेनापति होण्याचें दोन अटींवर कबूल केलें. भीष्म म्हणाले, " तुम्ही कौरव व पांडव मला नात्यानें दोघेहि सारखेच आहां. युद्ध चालू असतां ते मला त्यांच्या हिताची एखादी गोष्ट विचारायला आले, आणि ती मला माहित असली तर त्याना ती मी सांगेन. त्यांची बाजू लंगडी करण्याकरिता प्रत्येक दिवशीं दहा हजार योद्धे मी मारीन. पण पांडवांच्यापैकीं कोणाचाहि मी प्रत्यक्ष वध करणार नाहीं, ही एक अट. आणि दुसरी म्हणजे माझ्याशीं रणांगणांत नेहमीं स्पर्धा करूं इच्छिणारा सूतपुत्र कर्ण तरी एक लढेल किंवा मी तरी लढेन. ही दुसरी अट. ह्या दोन अटी तुला मान्य असतील तर मी मुख्य सेनापति होतों. " कर्णाहि रागानें झटकन म्हणाला, " राजा भीष्मालाच पहिल्या प्रथम लढूं द्या. हा रणांगणात लढत असेपर्यंत मी मुळींच लढणार नाहीं. भीष्म रणात पडल्यावर मी अर्जुनाशीं लढून त्याचा नाश करीन. तूं कांहीं काळजी करूं नको. " दुर्योधनानें भीष्माच्या अटी कबूल केल्या आणि भीष्म कौरवांचे मुख्य सेनापति झाले.

भीष्म कौरवांचे सेनापति झाले असें ऐकताच युधिष्ठिर म्हणाला, " श्रीकृष्णा, पहिली धडक आपल्याला भीष्मपितामहाबरोबर द्यावी लागणार, त्या दृष्टीनें आपल्या सैन्याच्या सात विभागांवरच्या सात सेनापतींची नीट योजना करून त्याना योग्य त्या सूचना देऊन ठेवाव्या. " श्रीकृष्णानीं धृष्टद्युम्नाच्या संमतीनें सेनापतीच्या पदावरून भीमाला मोकळा करून त्याला भीष्माच्या समोर पहिली धडक देण्याच्या योद्धयांच्या वरचा मुख्य केला, व भीमाच्या ऐवजीं मगधदेशाधिपति सहदेवाला सातवा सेनापति केला. ह्याप्रमाणें दोन्ही पक्षांची तयारी झाली.

इतक्यांत बलराम, आपण तीर्थयात्रेला जात आहों हें सांगण्याकरितां प्रमुख यादव योद्ध्यांसह पांडवांच्या शिबिरांत आला. पांडवानीं त्याचा यथोचित सत्कार केला. ' कृष्ण तुमचा पाठीराखा असल्यामुळें तुम्हीच विजयी व्हाल. ' असा आशीर्वाद देऊन श्रीकृष्णाचा व पांडवाचा निरोप घेऊन तो तीर्थयात्रेला निघून गेला.

दक्षिण देशाधिपति भीष्मक राजाचा मुलगा व श्रीकृष्णाचा मेव्हणा

रुक्मी, याने इंद्राचें ' विजय ' नामक धनुष्य दृढनिश्चयानें तपश्चर्या करून संपादन केलें होतें. अर्जुनाचें गांडीव धनुष्य व श्रीकृष्णाचें शार्ङ्ग धनुष्य याच्या तोडीचें तें धनुष्य होतें. ते धनुष्य हातात येतांच श्रीकृष्णार्जुनासारखाच रुक्मीहि सर्व क्षत्रियांना भारी झाला. कुरुक्षेत्रात कौरव-पांडवांच्या सैन्याचे तळ पडलेले ऐकताच श्रीकृष्णाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें पांडवांना मदत करण्याकरितां एक अक्षौहिणी सेना बरोबर घेऊन तो पांडवांच्या शिबिरांत आला. पांडवांनीं आनंदानें त्याचे स्वागत केलें. पांडवांच्या भेटी घेऊन सैन्यासह कांहीं काळ विश्रांति घेतल्यानंतर तो अर्जुनाला म्हणाला, " अर्जुना, तूं भीष्म, द्रोण, कृप, कर्ण, यासारख्या अतिरथी महारथी योद्ध्याच्या मदतीनें लढणाऱ्या शत्रुपक्षाशीं लढण्यास कचरत असशील, तर मला सांग, मी यापैकीं कोणत्या योद्धयाला ठार करूं ? मला तूं सांगण्याचा अवकाश, मग तो भीष्म असो, द्रोण असो, कीं कृप वा कर्ण असो, तो माझ्या हातून मेलाच असें समज. इतकें कशाला, मी ह्या सर्वांनाच ठार मारून तुमचें राज्य तुम्हाला मिळवून देतों. " त्या रुक्मीची ही वल्गना ऐकून श्रीकृष्ण, धर्म, भीम, अर्जुन, सर्वच गालांतल्या गालांत हंसले. श्रीकृष्णानें खूण करताच अर्जुन किंचित् हंसून म्हणाला, ' हे वीरा, मी महाबलाढ्य पंडुराजाचा पुत्र व द्रोणाचार्यांचा शिष्य असून माझा जिवलग सखा भगवान् श्रीकृष्ण माझा सारथी आहे. शिवाय गांडीव धनुष्यासारखें दिव्य धनुष्य माझ्या हातीं आहे. अशी मला सर्व बाजूंनीं अनुकूलता असतांना मी कोणत्याही शत्रूला भितों असें म्हणणें शक्य तरी आहे का ? ह्याचा तूंच विचार कर. शिवाय माझा पराक्रम तुला ठाऊक नाहीं असेंहि नाहीं. महाबलाढ्य गंधर्वांच्या सैन्याशीं मी एकटा लढलों, हें तुला ऐकून ठाऊक असेलच. त्या भयंकर खांडववनात देव, दानव, सर्प, यक्ष यांच्याशीं मीं एकट्यानें लढून त्यांना त्या वनांतून घालवून दिलें. निवात कवच व कालकेय दैत्यांची मीं रग जिरविली त्यावेळीं मला कोणाची मदत होती ? विराटनगरासमीप गोग्रहणप्रसंगीं तूं सांगतोस ते भीष्म, द्रोण, कृप, कर्ण वगैरे सर्व वीर कौरवसैन्यांत असतांना मीं एकट्यानें त्या सर्वांची दाणादाण केली, व गाई

सोडवून आणल्या. त्यावेळीं तुझ्यासारखा कोणी साह्यकर्ता मला होता काय ? सारांश, गांडीव धनुष्यासारखें तेजोमय धनुष्य, अक्षय्य भाते व दिव्यास्त्रांनीं नेहमीं सुसंपन्न व सुसज्ज असलेल्या मला कोणाचीहि भीति वाटत नाहीं, आणि मला कोणाच्याहि साह्याची पण जरूर नाहीं. तेव्हां तुला वाटेल तर इकडे राहा, नाहींतर मन मानेल तिकडे जा. " ह्याप्रमाणे अर्जुनानें रुक्मीला झाडून टाकताच रुक्मी मनात खट्टू होऊन सैन्यासह कौरवांच्याकडे गेला. तेथेंहि आपल्या शौर्यासंबंधीं वल्गना करून मदत पाहिजे आहे का, असें विचारताच स्वतःच्या सामर्थ्याची घमेंड असलेल्या दुर्योधनानेंहि त्याचा पाणउतारा केला. तेव्हां रुक्मी ससैन्य परत गेला.

नंतर दुष्ट दुर्योधनानें दुःशासन, कर्ण, शकुनि याच्या मसलतीनें उलूक नांवाच्या दूताला निरोप देऊन पांडवांच्याकडे पाठविलें. त्या निरोपात पांडवांची व पांडवपक्षीय सर्व योद्धयांची भरपूर निंदा केली होती. " भीष्मासारख्या वृद्ध पितामहाला, द्रोणासारख्या वृद्ध गुरूला, ठार मारण्याची तुमच्यासारख्या धर्मनिष्ठांना उत्तम संधि आली आहे. " असा एक खोंचक व निरुत्साहकारक संदेश त्या निरोपांत होता. पांडवांनीं व तत्पक्षीय सर्व योद्धयांनीं कौरवांच्या अंगावर कांटा उभा राहील असें उत्तर त्या निरोप्याबरोबर कौरवांना पाठविलें. अर्जुनाने आपल्या प्रखर संदेशात तर स्पष्टपणेंच कळविलें कीं, " भीष्म-द्रोणाचें बुजगावणें पुढें करून स्वतःचे प्राण वांचविण्याची दुष्ट दुर्योधन-दुःशासनांची व नेभळट कर्ण-शकुनींची युक्ति यापुढें सफल होणार नाहीं. मी पहिल्या घडाक्याला भीष्म द्रोणांना धारातीर्थी निजवून मग तुम्हां सर्वांच्या चिंधड्या उडवीन." हें उत्तर पोहोंचल्यावर दुर्योधन मनांत थोडासा गडबडला. तो शांतनव भीष्माकडे गेला व दोनहि पक्षांच्या बलाबलाविषयीं त्याने त्याच्याशीं चर्चा केली. भीष्मानें दोनहि पक्षांतील रथी, अतिरथी, महारथी यांचीं नांवें त्याला सांगितलीं. कौरवपक्षांत सैन्यबल अधिक आहे, रथ्यांचीहि संख्या अधिक आहे. पण दिव्यास्त्रसंपन्न अर्जुनाच्या रथावर भगवान् श्रीकृष्ण सारथी असल्यामुळें पांडव अजिंक्य आहेत असा निष्कर्ष

भीष्मांनीं दुर्योधनाला सांगितला. तरी पण दुर्योधनाचा निरुत्साह होऊं नये म्हणून त्यांनीं आपण मनापासून लढूं असें त्याला सांगितलें. द्रोणाचार्योनींहि त्याला आश्वासन दिलें. कर्ण तर भीष्म जिवंत असेपर्यंत आपण लढणार नाहीं, अशी प्रतिज्ञाच करून बसला होता. कृप, अश्वत्थामा वगैरे योद्धयांनीं दुर्योधनाला निश्चिंत राहण्यास सांगितलें. भीष्मांनीं, उजाडल्यावर आपण सैन्याचा अभ्दुत व्यूह रचून पांडवांना घोटाळयात पाडणार असल्याचें सांगितले. याप्रमाणें सर्व रात्रभर दुर्योधन युद्धाच्या मसलतींत निमग्न होता. तिकडे पाडवांच्याकडेहि पुढें काय काय करावयाचें त्यासंबंधीं भरपूर खल झाला. श्रीकृष्णानीं सर्व सेनापतींना जरूर त्या सर्व सूचना दिल्या.

ती रात्र संपतांच लखलखीत उजाडल्यावर दोन्ही सैन्यांतील योद्धे स्नानादिकांनीं शुचिर्भूत होऊन संध्यावंदन, अग्नींत होम देणें वगैरे नित्यकर्में आटोपून व शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज होऊन आणि स्वास्तिवाचनें करून आपापल्या रथांवर चढले. अशा रीतीनें सर्व तयारी झाल्यानंतर कौरवांचें अकरा अक्षौहिणी सैन्य कुरुक्षेत्राच्या पूर्वार्धांत येऊन पश्चिमेकडे तोंड करून उभें राहिलें. त्यांच्या समोरच्या पश्चिमार्धांत पांडवांचें सात अक्षौहिणी सैन्य येऊन पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें. कौरवांच्या सैन्याची व्यूहरचना पितामह भीष्मांनीं व पांडवांची व्यूहरचना अग्नीप्रमाणें तेजस्वी अशा धृष्टद्युम्नानें केली. निरनिराळया विभागाचे सेनापती आपापली सेना मुख्य सेनापतीच्या आज्ञेप्रमाणें नीट व्यवस्थेंत उभी आहे कीं नाहीं त्याची पाहाणी करीत होते. कौरवसेनेच्या अग्रभागीं अनुभवी व वृद्ध प्रमुख सेनापति भीष्माचार्य यांचा रथ होता व त्या रथांत बसून भीष्म आपल्या सेनापतींना आज्ञा देत होते आणि सेनापतींचे निरोप ऐकत होते. पांडवसैन्याच्या अग्रभागीं रणधुरंधर तरुण प्रमुख सेनापति धृष्टद्युम्न याचा रथ असून त्याच्याजवळ दुय्यम प्रमुख सेनापति महाबलाढ्य भीम याचा रथ होता. ते दोघेहि आपल्या सेनापतींना सूचना देण्यांत गढून गेले होते. दोन्ही पक्षांत मिळून अठरा अक्षौहिणी सैन्य होतें. एका अक्षौहिणींत २१८७० रथ, २१८८० हत्ती, ६५६१० घोडे व

१०९३५० पायदळ इतकें सैन्य होतें. एका रथावर एक रथी व एक सारथी अशीं दोन माणसें, एका हत्तीवर एक महात व एक योद्धा अशीं दोन माणसें, एका घोड्यावर एक स्वार, आणि सर्व पायदळ असे मिळून एका अक्षौहिणींत २६२४४० सैनिक होतात. ह्याप्रमाणें अठरा अक्षौहिणींतील सैन्याची व रथादि युद्धसाहित्याची परिगणाना केली, तर ४७२३९२० सैनिक व त्यांच्या दिमतीला शस्त्रांचा पुरवठा करण्याकरितां व तोफा वगैरे यंत्रांची व्यवस्था करण्याकरितां कमींत कमी अडीच, पावणे तीन लाख लोक धरले, तर पन्नास लाख सैनिक, ३९३६६० रथ, ३९३६६० हत्ती, ११८०९८० घोडे, शिवाय लक्षावधि तोफा वगैरे यंत्रें एवढें प्रचंड सैन्य होतें. एवढ्या प्रचंड सैन्याने कुरुक्षेत्रांतील आठ दहा कोस तरी प्रदेश सहज व्यापला असेल. पहिल्या दिवशीं समोरासमोर दोन्ही पक्षाच्या प्रचंड सेना व्यूह रचून व्यवस्थित उभ्या करण्यास सेनापतींना किती वेळ लागला असेल त्याचीहि कल्पना येते. सेनापति सर्व सेनेला व्यवस्थित उभी करण्यात व्यग्र असताना महाधनुर्धर अर्जुन आपल्या रथावर सारथ्य करण्याकरिता बसलेल्या भगवान् श्रीकृष्णाला म्हणाला, " कृष्णा, कौरवसैन्यातील प्रमुख योद्धयांचे रथ दिसतील अशा बेतानें माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यें नेऊन उभा कर, म्हणजे सेनापतींची सैन्यव्यवस्था होईपर्यंत, मी कौरवांच्या कडच्या कोणत्या प्रमुख योद्धयांचा युद्धांत पहिल्या प्रथम निकाल लावला पाहिजे, हें प्रत्यक्ष पाहून मनाशीं ठरवून ठेवतों." रथ हाकलण्यापूर्वी भगवानानीं अर्जुनाला रणदेवता जी दुर्गा देवी तिचें भक्तियुक्त अंतकरणानें स्तवन करण्यास सांगितलें. भगवन्तानें सांगतांच अर्जुन रथाखालीं उतरला. हस्तपादप्रक्षालन करून त्यानें आचमन केलें. अशा रीतीनें शुचिर्भूत होऊन अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें त्यानें दुर्गा देवीचें स्तवन करून तिला वंदन केलें. अर्जुनानें केलेलें स्तवन ' दुर्गास्तोत्र ' ह्या नांवानें महाभारतांत ग्रथित केलें आहे. या प्रमाणें दुर्गास्तोत्रानें भिषण व अभूतपूर्व भारतीय महायुद्धाची नांदी झाली.

## प्रकरण ११ वें

# श्रीमद्भगवद्गीतासार

श्रीदुर्गादेवीचें स्तवन झाल्यानंतर धनुर्धर पार्थ भगवन्ताला नमस्कार करून रथावर चढला. भगवन्तानीं लगेच त्याच्या सांगण्याप्रमाणें त्याचा रथ दोन्ही सैन्यांचे मध्यभागीं भीष्म–द्रोणाच्या रथासमोर, जेथून कौरवाचा अपार सेनासमुद्र स्पष्ट दिसेल, अशा ठिकाणीं नेऊन उभा केला. अर्जुनानें कौरवांच्या सेनेकडे लक्षपूर्वक पाहावयाला सुरवात केली. समोरच त्याचे आजोबा—ज्यांनीं लहानपणीं त्याचें अत्यंत वत्सलतेनें पालन केलें, त्याचें सर्व प्रकारचें कोडकौतुक पुरविलें, ज्यानीं तो मोठा होऊन त्यानें कुरुकुलाचें नांव उज्ज्वल करावें असे धनुर्विद्यादि सर्व विद्यांचें शिक्षण त्याला मिळेल अशी व्यवस्था केली, धनुर्विद्येचें शिक्षण घेऊन त्यानें धनुर्विद्येच्या परीक्षेंत सर्व कौरवपांडवांमध्यें अग्रस्थान मिळविलें, असें पाहातांच ज्यांना अत्यंत कौतुक वाटून ज्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू आले आणि ज्यांनीं त्याला प्रेमभरानें पोटाशीं घट्ट धरलें, ते त्याचे पूज्यतम वृद्ध आजोबा—भीष्माचार्य त्याला दिसले. त्यांना वदन करण्याकरिता त्याचें मस्तक चटकन् खालीं वांकलें. ह्यांना आपण तीक्ष्ण बाणांनीं विद्ध करून धारातीर्थी निजविणार ह्या कल्पनेनें त्याच्या अंगावर शहारे आले. त्यानें चटकन् त्यांच्यावरून दृष्टि काढून ती पुढें टाकली, तों ज्यांनीं त्याला साङ्ग धनुर्वेद पढवून आपल्याला ज्ञात असलेली सर्व समंत्र अस्त्रविद्या, सर्व प्रकारच्या शस्त्रविद्येसह त्याच्या स्वाधीन केली, आपला एकुलता एक प्रिय पुत्र अश्वत्थामा पण त्यालाहि धनुर्विद्येतलें अत्यंत गूढ रहस्य असें जें ब्रह्मशिर नांवाचें अस्त्र, तें सांगण्याचें टाळून तें आपल्या पट्टशिष्याला-अर्जुनाला ज्यांनीं अत्यंत कनवाळूपणानें सांगितलें, व त्याला त्रिभुवनात धनुर्धरश्रेष्ठ केला,

ते त्याचे पूज्यतम गुरु वृद्ध द्रोणाचार्य रथांत बसलेले त्याच्या दृष्टीस पडले. ' मीं दिलेल्या धनुर्विद्येचें चीज करून माझा लाडका पट्टशिष्य अर्जुन आपली व गुरु म्हणून माझीहि कीर्ति त्रिभुवनात गाजवील ' असें जें गुरु द्रोणाचार्य नेहमीं अभिमानानें म्हणत तेच गुरुश्रेष्ठ त्यांनींच दिलेल्या धनुर्विद्येनें आपल्या हातून समरांगणावर पडणार, ह्या कल्पनेनें अर्जुन व्याकुळ झाला. राजसूय यज्ञ करण्याचे अगोदर दिग्विजय करून अपार संपत्ति व सम्राट्पदाचा मान आपल्या पराक्रमानें धर्मराजाला मिळवून देताच ज्यानीं आपले परमावधीचे कौतुक करून जमलेल्या सर्व स्नेही राजांसमोर व आप्तेष्टासमोर आपल्या पराक्रमाचे मोठ्या अभिमानानें वर्णन केलें, ते हे दोघे पूज्य भीष्म-द्रोण आपल्या अतुल सामर्थ्यानें पण कृतघ्न-पणें आपल्याच हातून ठार झाल्यानंतर आपल्या पराक्रमाचें कौतुक करणार तरी कोण ? आणि कौतुक करावयाचें तरी कशाकरितां ? हा विचार तर त्याला अतिशय दुःसह झाला. आचार्यांचेकडे पाहावयाला त्याच्या दृष्टीला लज्जा वाटली. ती पुढें वळली तों कृपाचार्य दिसले. अरेरे ! ह्यांना मारून तर आपण आपल्या अधमपणाची कमाल करणार, असें वाटून अर्जुन गलितधैर्य झाला. पांडवांच्यावर कृपाचार्यांचें अकृत्रिम प्रेम होतें. पांडवांच्यावरच्या त्यांच्या प्रेमाला उपमाच द्यावयाची तर ती एक विदुराच्याच पांडवावरील प्रेमाची ! कृप व कृपी हीं दोन आवळीं–जावळीं मुलें, गौतमगोत्री सर्वास्त्रविद्यापारंगत शरद्वान ऋषींचीं. त्याचें पालन-पोषण करून त्यांना शंतनु राजानें लहानाचे मोठे केलें. शंतनु राजानें त्यांना कृपेनें वाढविलें, म्हणून ह्या मुलांचीं नांवें कृप व कृपी अशीं पडलीं. कृपाला सर्व अस्त्रविद्या त्याचे वडील शरद्वान यांच्यापासून मिळाली. शंतनु राजानें आपला मुलगा जो भीष्म, त्याच्याबरोबरच कृपाला वाढविलें, म्हणून पुढें भीष्माप्रमाणेंच कृपाचार्यांनाहि कुरुवंशांत मान मिळूं लागला. कौरव-पांडव हे पहिल्याप्रथम अस्त्रविद्या ह्या कृपाचार्यांच्या जवळच शिकले. भीष्मांच्यासारखेंच कृपाचार्यांचेंहि पांडवांच्यावर फार प्रेम होतें. पितृहीन झालेल्या पांडवांच्याकडे विदुर ज्या प्रेमळ दृष्टीनें पाहात त्याच प्रेमळ दृष्टीनें कृपाचार्य पांडवांच्याकडे पाहात. धनुर्विद्येच्या परीक्षेंत कर्ण अर्जुनाची

बरोबरी करण्याकरितां उभा राहिला असतां, कृपाचार्यांना तें सहन न होऊन त्यांनीं कर्णाचा धिक्कार केला व अर्जुनाबरोबर त्याचें द्वंद्व होऊं दिलें नाहीं. नेहमीं अर्जुनाची कड घेऊन दुर्योधनादि कौरवांना झाडून टाकणारे कृपाचार्य आपल्या बाणांना बळी पडणार, हें अर्जुनाच्या दृष्टीसमोर दिसतांच अशा वत्सल गुरुजनाचा द्रोह आपल्या हातून होणार, म्हणून त्याचा रणोत्साह मावळण्याच्या मार्गाला लागला. तो बेचैन झाला. त्याची दृष्टि अस्थिर झाली. पुढें गुरुपुत्र अश्वत्थाम्याच्या रथाकडे पाहातांच त्याची हत्या आपल्या हातून झाली, तर मातृतुल्य गुरुपत्नी कृपी कशी दुःखी होईल हें अर्जुनाच्या मनात येऊन तो खिन्न झाला. त्यानें पुढें पाहिलें तो पितृतुल्य चुलत चुलता भूरिश्रवा त्यानें पाहिला. नकुल-सहदेवाचा मामा मद्रदेशाधिपति शल्य त्याच्या दृष्टीस पडला. त्याचें मस्तक फिरूं लागलें. ह्या सर्वांना मारल्यानंतर सम्राट्पद हस्तगत झालें आणि अपूर्व ऐश्वर्य स्वपराक्रमानें प्राप्त करून घेतलें, तरी आपल्या त्या पराक्रमाचें कौतुक कोण करणार? कशासाठीं हें ऐश्वर्य मिळवावयाचें? त्याच्यानें कौरवसैन्याकडे पाहावेना. कोणासाठीं हें ऐश्वर्य मिळवावयाचें, असा विचार मनांत येऊन त्यानें आपल्या सैन्याकडे पाहिलें, तों त्याच्या दृष्टीस अभिमन्यु व द्रौपदीचे पांच पराक्रमी पुत्र युद्धोत्साहानें मुसमुसत असलेले दृष्टीस पडले. त्यांचा तो रणोत्साह पाहून क्षणभर अर्जुनाचें चित्त प्रफुल्लित झालें. पण मन हें अत्यंत नाठाळ आहे. उत्साहाच्या उत्तुंग शिखरावरून निरुत्साहाच्या खोल दरींत तें झटकन उडी घेतें. 'मन चिंती तें वैरी न चिंती' अशी म्हणच आहे. ज्यांच्याकरिता हें ऐश्वर्य मिळवावयाचें ते हे आपले प्राणांहून प्रिय पुत्र भीष्म-द्रोणांच्या प्रखर पराक्रमानें भस्मसात् झाले, तर-तर—मग काय? कोणाकरितां हें ऐश्वर्य मिळवावयाचें? ह्या ऐश्वर्याचा उपयोग कोणीं घ्यावयाचा? असे विचार मनांत येऊन त्याचें डोकें गरगरूं लागलें.

त्यानें आपल्या सैन्यावरून दृष्टि झटकन काढली व समोर पाहिलें, तों शंभर कौरवांच्या रथांवरचे ध्वज फडकतांना त्याच्या दृष्टीस पडले. आपल्या प्रखर बाणांनीं हे शंभरहि ध्वज मोडून पडले, आपलें ऐश्वर्य कपटानें

लुबाडणारे व आपला मत्सर करणारे हे शंभर कौरव धुळींत मिळाले म्हणजे तरी आपलें समाधान होईल काय ? हा विचार अर्जुनाच्या मनात आला आणि लगेच त्याचें ' नाहीं ' असेंच उत्तर त्याच्या मनानें दिलें ! काय चमत्कार आहे ! सूक्ष्म विचार केला तर असें दिसतें कीं मनुष्याला ऐश्वर्य पाहिजे असतें तें जगांतल्या इतरेजनानीं दिपून जावें म्हणून नक्की असतें; मनुष्याला पराक्रम करावासा वाटतो तो जगानें वाहवा करावी म्हणून करावा असें वाटत नाहीं. मनुष्य विद्या मिळवून त्रिखंड पंडित होऊं इच्छितो, ती विद्या जगात कीर्ति व्हावी म्हणून तो मिळवीत नाहीं; तर तें ऐश्वर्य, तो पराक्रम, ती विद्या, ह्याच्यापासून प्राप्त होणाऱ्या उत्तम फलाचा उपभोग आपले अत्यंत प्रिय पुत्र, पौत्र, व बंधुवर्ग ह्यांनीं घ्यावा, आपण मिळविलेल्या ह्या गोष्टींचे कौतुक आपल्यावर प्रेम करणाऱ्या आपल्या वडीलधाऱ्या वृद्ध गुरुजनांनीं व प्रिय सुहृदानीं करावे, व आपण मिळविलेल्या ह्या गोष्टींच्या झगझगाटाने आपला हेवा करणाऱ्या शत्रूंनीं दिपून जावें, त्यांनीं मत्सर करीत करीत सतत मनात जळत असावें, म्हणूनच तो त्या सर्व गोष्टी मिळविण्याचा अहर्निश धडपड करीत असतो. तात्पर्य, ऐश्वर्य, पराक्रम व विद्या मिळविण्याला उत्साह देण्याकारितां, मनुष्याला त्याचे अत्यंत प्रिय असे पुत्र, पौत्र आणि बंधुवर्ग, तसेच त्याच्यावर प्रेम करणारे त्याचे वडीलधारे वृद्ध गुरुजन व सहृद् आणि त्याचा निष्कारण द्वेष करणारे त्याचे मत्सरी शत्रु असावे लागतात. सर्वसामान्य मानवी मनाची अशी चिकित्सा केली तर ती नव्याण्णव टक्के बरोबर ठरेल. राज्यैश्वर्य मिळविण्याच्या बाबतींत अर्जुन एकदम गलितधैर्य व निरुत्साही झाला, त्यालाहि मुख्य कारण हेंच झालें. अभिमन्यु, द्रौपदी–पुत्र वगैरे पुत्र, धृष्टद्युम्नादि आप्त, भीष्म–द्रोण–द्रुपदादि वृद्ध गुरुजन, विराट–भगदत्त–कृतवर्मादि सुहृद् व कौरव–कर्णादि शत्रु, ह्या सर्वांचा नाश होणार. मग हें ऐश्वर्य कोणाकारितां, कशाकरितां मिळवावयाचें, असें त्याला वाटलें. राजसूय यज्ञ करण्याचे पूर्वी अर्जुनानें दिग्विजय केला, त्यावेळीं ही सर्व मंडळी होती. त्यावेळीं पांडवांचें देवेंद्रासारखें ऐश्वर्य पाहून ह्या सर्व मंडळींच्या मनावर स्वाभाविक होणारे सर्व परिणाम झाले. त्यामुळें पांडवांना पूर्ण

समाधान झाले. परंतु ह्या मंडळींच्या अभावीं ते समाधान पुनः लाभणे शक्य नाहीं, असे पाहून तें राज्यैश्वर्य मिळविणें व्यर्थ आहे असें अर्जुनाला वाटले. ते राज्यैश्वर्य नको म्हणून हे युद्धच नको, असें त्याने मनाशीं ठराविले. त्याने काय करावयाचे मनांत आणिले, तोहि विचार करण्यासारखे व मानवी मनाची वृत्ति स्पष्ट दाखविणारेच आहे. त्याने आपल्या मनाची झालेली स्थिति, भगवन्ताला थोड्या निराळ्या भाषेत सांगितली. अर्जुन म्हणाला, " कृष्णा, मरण्याकरिता तयार होऊन रणांगणावर आलेल्या ह्या स्वजनांना पाहून माझ्या अंगावर शहारे येत आहेत. माझ्या तोंडाला कोरड पडली आहे. सर्व रणांगणावर जिकडे पाहावे तिकडे स्वजन व सुहृदच दृष्टीस पडत आहेत. आजोबा, काका, मामा, सासरे, गुरु, पुत्र, पौत्र, मेव्हणे, सखे, सुहृद पाहून व त्यांचा नाश रणांगणावर होण्याला मी कारण होणार हे मनांत येऊन मला भयंकर दुःख होत आहे. हे मारले गेल्यानें सर्व कुलक्षय होईल. कुलक्षयाच्या पाठोपाठ सनातन धर्माचा लोप होईल. त्याचा परिणाम वर्णसंकर. वर्णसंकरामुळें श्राद्धादि सर्व क्रिया बंद पडल्याने आमच्या सर्व पूर्वजाचाहि अधःपात होणार, हे निश्चित दिसत आहे. पूर्वजांसह आम्हांला नरकात पाडणारे हे युद्ध मी करणार नाहीं. त्यापेक्षां मी युद्ध करावयाचें सोडून स्वस्थ बसलो असतांना मला शत्रूंनीं ठार मारलें तरी माझें त्यात कल्याणच होईल." असे बोलून श्रीकृष्ण काय बोलतात तें पाहाण्याकारिता हातातलें धनुष्य खाली ठेवून तो स्वस्थ बसला.

अशा रीतीने आपले सर्व बाधव ह्या युद्धांत मरणार, म्हणून खेद करीत बसलेल्या अर्जुनाला भगवान म्हणाले, " हे अर्जुना, तुझ्या उच्चतम क्षात्रिय कुळाला काळिमा लावणारे हें मानासिक दौर्बल्य, ह्या ऐन युद्धप्रसंगीं तुझ्या ठिकाणीं कोठून प्राप्त झालें ? हें दौर्बल्य श्रेष्ठ लोक केव्हाच पत्करीत नाहींत. कारण, हें इहलोकीं अपकीर्तिकारक आणि ह्या जन्मानंतर उत्तम लोक न मिळवून देणारें असें आहे. म्हणून हें टाकून दे आणि ऊठ. " अर्जुन म्हणाला, " हे मधुसूदना, संग्रामांत ह्या पूज्य भीष्म-द्रोणांवर बाण टाकून त्यांचा घात करणें मला योग्य होणार नाहीं. असे करणे अत्यंत कृतघ्नपणाचें होईल. ह्यापेक्षा आमचें राज्य परत

मिळविण्याचा उद्योग सोडून देऊन भिक्षावृत्तीनें व निर्लोभपणानें पृथ्वीच्या पाठीवर कोठेतरी शांतपणाने राहाणें मला अधिक बरे वाटतें. गुरुजनाचा एवढा रक्तपात करून आम्हांला काय मिळणार ? आता आयुष्याचे जे कांहीं थोडे दिवस असतील त्यात ह्या राज्याचा आपल्यापुरता काय उपभोग घेता येईल तेवढाच ! बरें ह्या युद्धांत आमचाच जय होईल म्हणून तरी कोणीं सांगावे ? आम्ही पराक्रमी असल्याने आमचाच जय होणे शक्य आहे, असे जरी मानले, तरी कौरवाना ठार मारल्यानंतर, ते नसताना आम्ही हे राज्यसुख भोगण्यात तरी काय मोठासा पुरुषार्थ आहे ! ज्यांच्या डोळयादेखत राज्यसुख भोगण्यातच खरी मौज आहे ते हे धृतराष्ट्राचे पुत्र मरायला तयार होऊन आमच्या समोर उभे आहेत. आम्हीं ह्या दुष्टाना युद्धात मारावे कीं भिक्षान्न खाऊन शांतपणें कोठें तरी स्वस्थ राहावे ? ह्या दोहोपैकीं कोणती गोष्ट आम्हाला अधिक चागली हेच मला समजत नाहीं. ह्या मानवी जीविताचा खरा हेतूच माहीत नसल्यामुळें मनाला हे दैन्य प्राप्त झाले आहे. कृष्णा, मीं तुला शिष्यभावाने शरण आलों आहे. मीं काय करावे ? मला कोणती गोष्ट करण्यांत शाश्वत सुख होईल तें सांग. सर्व विषयोपभोगानीं भरलेलें शत्रुरहित असे इहलोकींचें राज्यच काय, पण देवेंद्राचेहि राज्य, युद्धांत ह्या सर्वांची वाताहत झाल्यानंतर मला मिळाले, तरी मला समाधान होणार नाहीं, आणि हृदयाला पिळवटून टाकणारा हा शोक नाहींसा होणार नाहीं. ' असें त्या गोविंदाशीं बोलून युद्ध न करण्याच्या निश्चयाने अर्जुन स्वस्थ बसला.

युद्ध करण्याचें सोडून अर्जुनाने भिक्षावृत्तीनें राहाण्याचें ठरविलें हीहि गोष्ट चिंत्य आहे. युद्ध करणे हा क्षात्रियाचा धर्म. भिक्षावृत्तीवर राहून स्वस्थपणे ब्रह्मचिंतन करणें हा ब्राह्मणाचा धर्म. क्षात्रिय वृत्तीने सर्व प्रिय स्वजनाची होळी होऊनची होऊन शत्रूच्या छातीवर पाय ठेवून त्याच्या डोळयादेखत वैभवाचा उपभोग घेण्याचे सुखहि लाभत नाहीं, असें दिसतांच क्षत्रियधर्माचा त्याग करून अर्जुनाच्या मनानें वरून सुलभ दिसणाऱ्या ब्राह्मण-धर्माकडे धाव घेतली. नाशिवंत देह व इंद्रियें याच्या

सुखात बिघाड होतो, असें दिसताच अज्ञानी जीव शाश्वत धर्माला लाथाडायला कसा झटकन तयार होतो याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे युद्ध सोडून स्वस्थ बसणारा हा अर्जुन. शांतिप्रधान ब्राह्मणधर्म उत्तम तऱ्हेनें आचरायचा म्हणजे मनोजय उत्तम प्रकारें साधावा लागतो. मनोजय करतांना इंद्रियांचे व देहाचे कसे हाल हाल होतात, वेळीं प्रपंचसुखाची होळी डोळ्यांदेखत होत असतांना ती कशी सहन करावी लागते, हे बिचाऱ्या अर्जुनाला माहीत नव्हतें. शंभर पुत्रांची स्वतःच्या डोळ्यांदेखत राखरांगोळी होत असतांना चित्ताची लवभरहि चलबिचल होऊ न देणारा शांतिसागर वसिष्ठ ब्राह्मण अर्जुनाला माहीत नव्हता असें कसे म्हणावें ? पण वेळ मात्र अशी आली खरी ! क्षात्रधर्म कसोशीनें पाळून तो तडीला पोंचविण्याच्या वेळीं त्याचे जाज्वल्य स्वरूप दिसताच, क्षात्रियश्रेष्ठ म्हणविणारा अर्जुनहि गडबडला व मनावर भुरळ पडून सुलभ दिसणाऱ्या परधर्माचा अंगीकार करण्यास तयार झाला. देहेंद्रियांना दुःखाचा धक्का लागेल ह्या धास्तीनें स्वधर्माचा त्याग करून वेळ पडेल तसें आचारण करणारे सर्वसामान्य लोकच जिकडे पाहावें तिकडे दिसतात. धर्माचा खरा अर्थ माहीत नसल्यामुळें, जीवाच्या पाठीमागें धर्म लावून देण्याचा हेतु लक्ष्यांत न आल्यामुळें आणि जीवांच्या खऱ्या स्वरूपाच्या गाढ अज्ञानामुळें, मनुष्याची सदोदित अशी तारांबळ उडते. अर्जुनाला राजैश्वर्याचा, ऐश्वर्योपभोगाचा वीट येऊन तो उदासीन झाला व त्याच्यावर वैराग्याची छाया पडल्यासारखी दिसली. पण तो खरा उदासीनपणा नव्हता व तें वैराग्यहि खरें नव्हतें. प्रबळ निराशेनें प्रत्येक मनुष्य आयुष्यांत केव्हां तरी थोडा वेळ उदासीन व विरागी बनलेला दिसतो. परंतु आशेची झुळुक लागून निराशा बाजूला होतांच तो आपल्या मूळ स्वभावावर जातो. मनुष्य खोट्या दुःखाच्या धास्तीनें भलत्याच मार्गाला लागून खऱ्या सुखाला आंचवतो. निराशेनें वैराग्याची, तात्पुरत्या बेगडी वैराग्याची, झळ लागेल तेव्हां सुदैवानें ज्ञानी पुरुष जवळ असेल व तो उदासीन मनुष्य त्या पुरुषाला शरण जाईल, तर ती संधि घेऊन तो ज्ञानी त्याला खऱ्या वैराग्याची ओळख करून देतो; तें

वैराग्य त्याच्या अंगीं औवतांच ज्ञानाचें बीज त्याच्या मनोभूमींत पेरून शाश्वत सुखाचा मार्ग तो ज्ञानी त्याला दाखवितो. भगवंतांनीं अर्जुनाची मनास्थिति पूर्णपणें ओळखली व तो शरण येतांच त्याला ज्ञानमार्ग दाखवून त्याचें मोहपटल त्यांनीं दूर केलें. अर्जुनाला निमित्त करून सामान्यपणें सर्वच अज्ञ माणसांना भगवंतांनीं कनवाळूपणें जो बहुमोलाचा उपदेश केला आहे तो महाभारतात व्यासानीं श्रीमद्‌भगवत्‌गीता या नांवानें सातशें श्लोकांत ग्रथित करून महाभारताला व त्याचबरोबर संस्कृत भाषेला अत्यंत उज्ज्वलता आणिली आहे. संस्कृत भाषेत ह्या भगवद्गीतेवर अनेक विद्वद्वर्य आचार्योंनीं मोठमोठीं भाष्येंहि लिहिलीं आहेत. त्यात श्रीमदाद्य-शंकराचार्योंचे श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य अप्रतीम आहे. मराठींत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजानीं आपल्या अत्यंत रसाळ वाणीनें भावार्थ-दीपिका या नांवानें श्रीमद्भगवद्गीतेचा स्पष्टार्थ सागणारा नऊ हजार ओव्यांचा अप्रातिम विवरण-ग्रंथ लिहून भगवंतांचा अभिप्राय फार सुंदर तऱ्हेनें वर्णन केला आहे. ह्या ग्रंथाला ‘ ज्ञानेश्वरी ’ असें सर्वमान्य नांव मिळालें आहे. श्रीमद्भगवद्गीतेचीं जगांतल्या बहुतेक सर्व प्रमुख भाषेत भाषांतरें झालीं आहेत. अशा ह्या सर्वत्र गाजलेल्या व सर्वांच्या परिचयाच्या सुंदर ग्रंथाचें स्वरूप अगदीं साररूपानें फारच थोडक्यात दाखविण्याचा प्रयत्न ह्या चरित्रग्रंथांत करण्याचें योजिलें आहे. हा प्रयत्न भगवंताला व भगवद्भक्त वाचकांना मान्य होवो अशी भगवंताच्याच चरणीं प्रार्थना आहे.

## श्रीमद्भगवद्गीतासार

भगवान् म्हणाले, “अर्जुना, भीष्मद्रोणादि आपल्यामुळें मरणार असें वाटून तूं एकीकडे शोक करीत आहेस तर दुसरीकडे ज्ञान्याप्रमाणें धर्माधर्माचा विचारहि सांगत आहेस. ज्ञान्याला मरणें व जगणें ह्याचे वास्तविक अर्थ माहीत पाहिजेत. ते तर तुला माहीत असलेले दिसत नाहींत. मी, तूं आणि हे राजे असे आपण सर्व ह्या जन्मापूर्वी केव्हां नव्हतों असें नाहीं; तर आपण पूर्वी होतों, आतां आहों आणि पुढेंहि असणारच. हल्लीं

असलेल्या देहानें आपण पूर्वी नव्हतों व ह्याच देहानें पुढें असणार नाहीं, हें मान्य. एका देहातहि आपण बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृद्धावस्था अशा तीन अवस्था अनुभवितों; तर तशीच 'देहान्तर' हीहि एक आपली म्हणजे जीवाची आणखी एक अवस्था आहे. फरक इतकाच कीं एका देहातल्या तीन अवस्था आपल्या स्मरणांत असतात. 'देहान्तर' ही अवस्था आपल्या स्मरणांत राहात नाहीं. शुभाशुभ कर्माप्रमाणें जीवाला उत्तम, मध्यम, अधम जन्म मिळून निरनिराळे देह प्राप्त होतात. जीव म्हणजे आत्मा, हा नित्य आहे. त्याला जन्म-मरण नाहीं, हा वैदिक धर्माचा परम सिद्धान्त आहे. त्यावरून अर्जुना, तुझ्या लक्षात येईल कीं मरणें म्हणजे जीवानें देहान्तर करणें व जगणें म्हणजे कर्मानें प्राप्त झालेल्या देहांत कर्मफलभोग संपेतों जीवानें वास्तव्य करणें. हा अर्थ ध्यानांत आला कीं, भीष्म काय कीं द्रोण काय, कर्माप्रमाणें मिळालेल्या त्यांच्या देहांत असलेला जीव, कर्मफल संपेपर्यंत त्याच्या देहात वास्तव्य करीत राहील. कर्मफलभोग संपतांच त्या देहाचा त्याग करून तो चालता होईल. तूं राहा म्हटल्यानें तो राहाणार नाहीं व जा म्हटल्यानें जाणार नाहीं. वेड्या, तूं त्यांना मारणार, हा तुला वृथा अभिमान झाला आहे. त्याचें मरणें म्हणजे देहान्तर हें आतां तुला समजलें. पण जीवाच्या हल्लींच्या देहाचा वियोग तुला दुःखकारक होत आहे, त्याला काय करायचें असें म्हणशील तर त्याला एकच उत्तर आहे. जें दुःख केव्हा तरी निश्चयानें नाश पावणाऱ्या देहापासून होणारे आहे तें तुला सहनच केलें पाहिजे. नाशिवंत देह केव्हा तरी नाश पावणारच. भीष्माच्या ह्याच देहाचा वियोग तुला दुःख देत आहे. मग त्याच्या मागच्या जन्मांतील देह तुला कां दुःख देत नाहीं, त्याचाहि विचार कर. म्हणजे तुझें तुलाच समजून येईल कीं त्या मागच्या देहाशीं तुझ्या चक्षुरादि इंद्रियाचा संयोग होत नाहीं, म्हणून तो देह तुला दुःख देत नाहीं. उत्पत्ति-विनाशवान् विषयांशीं इंद्रियांचा संयोग झाला कीं सुख किंवा दुःख, कांहीं तरी होणारच. इंद्रियांशीं संयोग होणारा विषय आपल्याला अनुकूल असेल तर इंद्रियांशीं त्याचा संयोग होतांच सुख होतें; तोच विषय प्रातिकूल झाला कीं लगेच दुःख होतें. उदाहरणार्थ

‘ थंडगार पाणी ’ हा विषय घेऊं. उष्णकालीं त्वगिंद्रियाशीं त्याचा संयोग होताच सुख होते. थंडीच्या दिवसांत त्वगिंद्रियाशीं त्याचा संयोग दुःख-कारक होतो. तात्पर्य, ‘ थंडगार पाणी ’ ह्या विषयांत सुखदुःख नाहीं. तो विषय अनुकूल असेल तर सुख, व प्रतिकूल असेल तर दुःख, हें समजलें व विषयांतला नाशिवंतपणा पूर्णपणें लक्षात आला म्हणजे त्याविषयासंबंधीं अनुकूल-प्रतिकूल भावनाहि तीव्रपणे भासणार नाहींत, आणि इंद्रियांशीं त्याचा संयोग झाला तरी स्वाभाविकपणें उत्पन्न होणारें क्षणभंगर सुखदुःख सहन करण्याची क्रियाहि सहज होऊन जाईल. मग जीव केवळ शाश्वत सुखाचाच अभिलाष करील नित्य अविनाशी अप्रमेय असा एक ‘आत्मा’ हाच आहे; त्यानें धारण केलेले देह इतर सर्व दृश्य विषयांप्रमाणें नाशिवंत आहेत. ते नाशिवंत म्हणजे नष्टप्रायच आहेत. म्हणून ते आपल्याला अनुकूल आहेत कीं प्रतिकूल आहेत, ह्या विचारांत एक क्षणहि घालविणें व्यर्थ आहे. अर्जुना, ऊठ. प्राक्कर्माप्रमाणें तुला हा क्षत्रिय देह प्राप्त झाला आहे. धर्मानें त्याच्या पाठीमागें लावून दिलेलें कर्तव्य, दुसरा कांहींहि विचार न करतां, त्याच्या हातून होऊं दे. कर्मानें देह उत्पन्न होतो. कर्म-फलभोग संपताच तो मरतो, म्हणजे नष्ट होतो. देह धारण करणारा आत्मा जन्माला येत नाहीं. अर्थात् तो मरतहि नाहीं. तो कोणाला मारीत नाहीं, आणि मारलाहि जात नाहीं. तो नित्य, अचल, व्यापक, अव्यय, अचिन्त्य व अविकार्य असा आहे. असें ह्याचें स्वरूप नीट जाणून घे, म्हणजे भीष्मादिकांच्या शरीरासंबधीं तुला शोक होणार नाहीं. जन्माला येणाऱ्या ह्या देहाचें अनित्यत्व ध्यानांत आणलेंस तरी शोक करण्याचें कांहीं कारण नाहीं हें तुला समजेल. जो जन्माला आला त्याला निश्चित मृत्यु आहे. मृत्यु पावला त्याला निश्चित जन्म आहे. ह्या केव्हांहि न टळणाऱ्या गोष्टीसंबंधीं शोक करणें व्यर्थ आहे. स्वप्न-पदार्थ आपण भ्रामक कां समजतों ? त्याला उत्पन्न होण्यास लागणारा योग्य देश-काल तेथें नसतो, म्हणजे त्याचा आदि माहित नसतो. जागृत झाल्यावर ह्या स्वप्नस्थ पदार्थाचें काय झालें, तेंहि समजत नाहीं, म्हणजे त्याला अंत नसतो. आदि नाहीं, अंत नाहीं, जें मध्येंच फक्त भासतें, तें भ्रामक असतें. हें जर

पटतें, तर उत्पत्तीपूर्वी अव्यक्त असणारीं, मरणानंतर अव्यक्त होणारीं आणि जन्म–मरणाच्या मध्यकालांतच फक्त भासणारीं भूतेंसुद्धां स्वप्नवत् भ्रामक आहेत, हें पटलेंच पाहिजे. अर्जुना, आत्म्याचें स्वरूप तुला मीं सांगितलें. तें तुला पटलें नसेल आणि कळलेंहि नसेल. पण त्याबद्दल तुला मी दोष देत नाहीं. आत्म्यासंबंधीं सम्यक् ज्ञान करून घेण्याची प्रबळ जिज्ञासा लक्षावधि विद्वानांत एखाद्याला झाली तर तें एक अद्भुत असें आश्चर्यच समजलें जातें. आत्म्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेणें ही गोष्ट जवळ जवळ अशक्य कोटींतील आहे असा समज आहे. विषयाशारूपी दुस्तर समुद्र ज्यानें उल्लंघन केला आहे, प्राण गेला तरी जे विषयोपभोग सुटणें कठीण, ते विषय ज्यांच्या मनात देखील येऊं शकत नाहींत इतकें वैराग्य ज्यांचे अंगीं बाणलें आहे, अमानित्व, अक्रोधत्व, ब्रह्मचर्य, हा दुर्लभ दैवी साधनसंपत्ति ज्यानें आपलीशी करून घेतली आहे, मोक्ष मिळविणें हा एकच उद्देश ज्याच्या समोर आहे, अशा मुमुक्षूवर ईश्वर, वेद व आचार्य यांचा प्रसाद झाला तरच 'अहं ब्रह्मास्मि' ह्या वेदवचनाचा त्याला साक्षात्कार होतो. आत्मा हा इतका दुर्बोध असल्यामुळेंच आत्मज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य आढळणे म्हणजे आश्चर्यांतलें आश्चर्य आहे, असें म्हटलें जातें. जसें आकाश सर्वगत आहे, तसा आत्मा सर्वव्यापी आहे. घट फुटला असतां घटस्थित आकाशाचा नाश झाला असें म्हणतां येत नाहीं, त्याप्रमाणें देहरूपी घट नष्ट झाला तरी त्याच्या ठिकाणीं असलेल्या सर्वव्यापी आत्म्याचा नाश होणें शक्य नाहीं. आत्म-ज्ञानदृष्ट्या भीष्मादिकांबद्दल शोक करणें कसें बरोबर नाहीं हें तुला दाख-विलें. आतां धर्मदृष्टीनेंहि विचार केला तर शोक करणें कसें अयोग्य आहे, तें तुला दाखवितों.

धर्म व प्रजा यांच्या रक्षणासाठीं क्षत्रियानें युद्ध करून पृथ्वी जिंकावी, असें वर्णाश्रमान्तर्गत क्षात्रधर्म प्रतिपादन करितो. अशा प्रकारच्या युद्धाहून क्षत्रियाला अधिक श्रेयस्कर, अशी दुसरी कोणतीहि गोष्ट नाहीं. हे भारत, तूं क्षत्रिय आहेस, म्हणून हें युद्ध तुझ्या धर्माला सोडून नाहीं. मला तर वाटतें, हें युद्ध म्हणजे तुम्हां भाग्यवान् क्षत्रियांकरिता हें स्वर्गाचें

द्वार आपोआप उघडलें गेलें आहे. हें धर्मयुद्ध जर तूं करणार नाहींस तर कीर्ति व स्वधर्म ह्या दोहोंनाहि तूं मुकशील. तुला धर्मत्याग केल्याचें पातक लागेल, आणि तुझी जिकडे तिकडे अपकीर्ति होईल. संभाविताला अपकीर्ति मरणापेक्षांहि दुःसह आहे. युद्धांत नाश पावणाऱ्या जीवाची दया येऊन तूं युद्धांतून परतलास, असें कोणीच म्हणणार नाहींत. तूं कर्णादिकांना भिऊन परतलास, अशी तुझी निंदा तुझे शत्रू करतील. जें बोलूं नये तें भलभलतें बोलून लोक तुझी निंदा करतील. म्हणून अर्जुना, आतां अधिक विचार न करतां ऊठ आणि युद्धच कर. शत्रूकडून तूं मारला गेलास तर तुला स्वर्ग मिळेल. तूं शत्रूंना जिंकलेंस तर पृथ्वीचें राज्य तुला उपभोगण्यास सांपडेल. तूं सुख-दुःख, लाभ-अलाभ, यांना सारखें मानून, म्हणजे त्यांचा विचार न करतां, स्वधर्म म्हणूनच तूं हें युद्ध कर. तुला पाप लागणार नाहीं हें मी सांगतों. धर्मदृष्टयाहि शोकमोह सोडून युद्धच करणें तुला उचित आहे. परमार्थवस्तुविवेकाविषयींहि मीं तुला सांगितलें आहे. कर्मबंधाच्या योगानें शोक-मोह उत्पन्न करणारी देहाची ही भ्रामक उपाधि जीवाला येऊन चिकटते, व जन्ममरणरूप संसारभय पाठीमागें लागतें. तें निवृत्त होण्याकरितां कर्मापासून बंधाची उत्पत्तीच कशी होणार नाहीं, अशा प्रकारें कर्म करण्याचा उपाय म्हणजे कर्मयोग, मी तुला सांगतों तो ऐक. व्यवहारात आरंभिलेलें कर्म पूर्ण झालें तरच तें फलप्रद होतें. अर्धवट केलेलें कर्म फुकट जातें. पण आत्मज्ञान प्राप्त करून देण्याला साधन होणाऱ्या ह्या कर्मयोगाचें थोडेंसेंहि अनुष्ठान व्यर्थ जात नाहीं. त्याचा संसारभयनाशार्थ उपयोगच होतो. विवेकी पुरुषापुढें 'मोक्ष' हें एकच ध्येय असल्यामुळें, त्याच्या ठिकाणीं वेदवाक्यरूप प्रमाणापासून उत्पन्न झालेली निश्चय-स्वभावाची एकच बुद्धि असते. 'अनन्त संसार' हें ध्येय पुढें असणाऱ्या अविवेकी पुरुषाच्या अनिश्चयात्मिका बुद्धीला कल्पनेचे अनेक फांटे फुटलेले असतात. वेदांमध्यें स्वर्ग, तेथले ते नानाविषयांचे भोग, अनेक प्रकारचीं ऐश्वर्यें यांचें फार रमणीय वर्णन केलेलें असून त्यांच्या प्राप्त्यर्थ नानाप्रकारचीं अनुष्ठानें, याग, विधिविधानादि कर्में सांगितलीं आहेत. वेदांतल्या त्या अर्थवादात्मक

गोष्टी कोणत्या हेतूनें सांगितल्या आहेत, तिकडे लक्ष न देतां विषयासक्तीमुळें, विषयमय अंतःकरण झालेले पुरुष, त्या अर्थवादात्मक वाक्यांतच रंगून जातात. वेदवाक्यांचा अंतिम व मुख्य हेतु जो मोक्ष, त्याच्याकडे त्या अविवेक्यांचें लक्षच जात नाहीं. सत्त्व, रज, तम ह्या तीनहि गुणांनीं युक्त अशा कर्मकांडाचें प्रतिपादन वेदांत केलें आहे. पण तूं मात्र ह्या त्रिगुणात्मक कर्मकांडाचेंच ग्रहण करणारा होऊं नको. तूं नेहमीं सत्त्वगुणाचाच आश्रय करणारा, सुखदुःखादि द्वंद्वापासून दूर राहाणारा, योगक्षेमाला प्रधान न मानणारा व आत्मस्वरूपाविषयीं नेहमीं विचार करणारा असा हो. मग वेदान्तर्गत कर्मकाड त्याज्य आहे काय? असें तूं विचारशील, तर मी सांगतों त्या तऱ्हेनें कर्मकांडात सांगितलेलें कर्म केलें, तर चित्तशुद्धि होऊन ज्ञानग्रहणाची पात्रता अंगीं येते. ह्या दृष्टीनें कर्मकाड अत्यंत उपयुक्त असल्यानेंच तें वेदांनीं प्रतिपादिलें आहे. विहिरी, कूप, तडाग ह्या निरनिराळया लहान जलाशयांनीं मिळून जो कार्यभाग साधतां येतो, तो सर्व बाजूंनीं तुडुंब भरलेला सागरोपम एकच जलाशय हातीं लागल्यास त्यांतहि साधतो. त्याप्रमाणें अनंत कर्में करून जें साधायचें तें एका ज्ञानयोगांत मिळून जातें. अर्जुना, तूंहि ज्ञानाचा अधिकारी झाला नाहींस तोंपर्यंत कर्माचाच अधिकारी आहेस. म्हणून तुझ्या पाठीमागें क्षात्रधर्मानें लावून दिलेलें वेदविहित कर्मच तूं करीत राहा. फक्त त्या कर्मापासून सहज मिळणाऱ्या स्वर्ग, ऐश्वर्य, विषयोपभोग ह्या लौकिक फलांची मुळींच अपेक्षा करूं नकोस. कर्म न करण्याचा आग्रह न धरतां सहज प्राप्त असें विहित कर्म करीत जा. वेदविहित कर्मापासून स्वर्गैश्वर्यादि लौकिक फलांची तर अपेक्षा करूं नकोसच, पण हें आरंभिलेलें कर्म उत्तम तऱ्हेनें सिद्धीस जावो, ह्यानें ज्ञान मिळविण्याचे मार्गांत आड येणारे प्रतिबंध नाहींसे होवोत, ह्यानें ईश्वर प्रसन्न होवो, अशा प्रकारचे संकल्पहि करूं नकोस. हें सहज प्राप्तकर्म वेदविहित आहे, तें केलेंच पाहिजे, ह्या बुद्धीनें तें कर्म कर. अर्जुना, ह्याप्रमाणें पापपुण्यादि द्वंद्वांचा संपर्क लागूं न देतां ईश्वरार्पण बुद्धीनें कर्म करीत असतां तें कुशलतेनें होतें. ह्यालाच कर्मयोगांतील कौशल्य म्हणतात. हा कर्मयोग आचरणारा पुरुष आत्मज्ञानी होऊन जन्ममरणरूप

संसारांतून सुटतो. ज्या वेळीं तुझ्या अंतःकरणावरचा मोहरूपी मल जाईल, त्या वेळीं अनात्मपदार्थांसंबंधीं जेवढें तूं ऐकलें असशील, किंवा तुला ऐकावें असें वाटत असेल, त्या सर्वांबद्दल तुला वैराग्य प्राप्त होईल. अज्ञानी जीवाकरिता वेदांनीं सांगितलेलीं अनेक प्रकारचीं साध्य-साधनें ऐकून चंचल झालेली तुझी बुद्धि, कर्मयोगानें चित्तशुद्धि होऊन विवेक-वैराग्य-संपन्न झाली कीं स्थिर होईल.

• अर्जुन विचारतो, "केशवा, आत्मनिष्ठ अशा स्थितप्रज्ञाचीं लक्षणें कोणतीं ? स्थितप्रज्ञ बोलतो कसा ? त्याचें राहाणें कसें असतें ? त्याचा व्यवहार कसा चालतो ?"

भगवान् म्हणाले, "स्थितप्रज्ञ सर्व प्रकारच्या वासनांचा त्याग करून आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं संतुष्ट असतो. आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक अशीं कोणत्याहि प्रकारची दुःखें प्राप्त झालीं असता, त्याचें मन उद्विग्न होत नाहीं. त्याचप्रमाणें सुखें प्राप्त झालीं असता त्यासंबंधींहि तो निरिच्छ असतो. त्याच्या ठिकाणीं प्रेम, भय, क्रोध हे विकार दिसत नाहींत. तो आपल्या देह-जीवितादिकांविषयीं उदासीन असतो. शुभ गोष्टींचें अभिनंदन व अशुभ गोष्टींचा द्वेष तो करीत नाहीं. असा हर्ष-विषादरहित होऊन विषयांतून आपलीं इंद्रियें तो परत घेऊं शकतो. अशक्त झालेल्या पुरुषाचीं विकल झालेलीं इंद्रियेंहि विषयांकडे धांव घेत नाहींत, पण त्यांमध्यें विषयप्रेम असतें. स्थितप्रज्ञाचीं इंद्रियें सुदृढ असूनहि, त्यानें आत्मस्वरूपाचा अनुभव घेतला असल्यामुळें, त्यांच्या ठिकाणीं विषयप्रेमच नसल्यानें तीं विषयांपासून परावृत्त झालेलीं असतात. विषयप्रेम इंद्रियांच्या मध्यें असेल तर आत्मज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पुरुषाचें मन तीं बलात्कारानें हरण करतात. म्हणून स्थितप्रज्ञ पुरुष त्यांना आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं नेहमीं गुंतवून ठेवून त्यांचा निग्रह करतो. स्थितप्रज्ञ पुरुष चित्ताला नेहमीं आत्मस्वरूपाच्या ठिकाणींच रमवितो. त्याला विषयांचें चिंतनहि तो करूं देत नाहीं. कारण, विषयचिंतनानें विषयांबद्दलची आसक्ति उत्पन्न होते, आसक्तीमुळें प्रत्यक्ष उपभोग घेण्याची इच्छा होते, ती इच्छा पुरी झाली नाहीं म्हणजे क्रोध येतो, क्रोधापासून अविवेक,

अविवेकापासून शास्त्रादिकांचें विस्मरण व विस्मरणामुळें बुद्धीचा नाश होतो. बुद्धीचा नाश म्हणजेच तो पुरुष सर्वस्वी मोक्षमार्गापासून च्युत होतो. अशी ही अनर्थपरंपरा नुसत्या विषयचिंतनानें होते. इंद्रियांना ताब्यांत ठेवून राग-द्वेषरहित झालेल्या पुरुषाला, शरीराला जिवंत ठेवण्याकरितां अवश्य अशा विषयांमध्यें वावरत असतांना चित्तस्वास्थ्य लाभतें. चित्तस्वास्थ्य असलें, म्हणजे त्रिविध दुःखांचा सहज नाश होतो व बुद्धि सर्व प्रकारें स्थिर राहाते. ज्याची बुद्धि स्थिर नाहीं त्याला सतत आत्मानुसंधान लाभत नाहीं, आत्मानुसंधानाच्या अभावीं चित्ताची शांतता नाहींशी होते. शांति नसलेल्या पुरुषाला सुख कोठून मिळणार? आत्मानात्माविवेक करणाऱ्या साधकानें, आपल्या इंद्रियांना विषयांमध्यें स्वच्छंदानें वावरूं दिलें, तर तीं इंद्रियें त्याच्या विवेकी मनाला भलत्याच मार्गाला नेतील. म्हणून अर्जुना, ज्यानें आपलीं इंद्रियें विषयापासून सर्व प्रकारें आवरून धरलेलीं असतात, त्याचीच बुद्धि स्थिर राहूं शकते. परमार्थांत स्थितप्रज्ञ जागरूक असतो, तर अज्ञजन झोपीं गेलेले असतात. लौकिक व्यवहारांत अज्ञजन जागरूक असतात, तर स्थितप्रज्ञ झोपीं गेलेला असतो. सर्व बाजूंनीं असंख्य नद्यांचें पाणी समुद्रांत पडत असतां, तें समुद्राच्या स्वरूपांत बदल करूं शकत नाहीं. त्याप्रमाणें असंख्य विषय निरिच्छ अशा ज्ञानी पुरुषाच्या समोर आले असतांना, त्याला विकारयुक्त करीत नाहींत. अशा ज्ञानी पुरुषालाच शांति प्राप्त होते. विषयासक्त पुरुषाला ती मिळत नाहीं. जो सर्व प्रकारच्या वासनांचा त्याग करून निरिच्छ होतो, आणि कोणाबद्दलहि ममत्वाची भावना न धरतां, अहंकाररहित होऊन जो जगांत वागतो, त्यालाच शाश्वत शांति-सुखाचा लाभ होत असतो. हे पार्थ, अशा ह्या स्थितीला ब्राह्मी अवस्था, म्हणजे ज्ञाननिष्ठा म्हणतात. ह्या ब्राह्मी अवस्थेंत असलेल्या पुरुषाला कोणत्याहि प्रकारचा मोह होत नाहीं. अंत्य वयामध्येंहि ही अवस्था प्राप्त झाली तर जीवाला मोक्ष मिळतो. मग जो जीव आजन्म ह्याच अवस्थेंत असतो त्याला मोक्ष मिळेल हें काय सांगावयास पाहिजे? त्याला मोक्ष मिळणारच मिळणार.

३

अर्जुन म्हणाला, " हे जनार्दना, तुझ्या सांगण्यावरून तुला कर्माहून ज्ञान श्रेष्ठ आहे असें वाटतें असें दिसतें. तर मग मला धर्म म्हणून युद्धासारखीं घोर कर्में करण्याला कां सांगत आहेस? तूं ज्ञानाची थोरवी गाऊन, कर्म कर म्हणून सांगतोस. घोंटाळ्यात घालणाऱ्या ह्या तुझ्या वाक्यानें मी भ्रमांत पडत आहें. म्हणून माझ्या बाबतींत जें निश्चित कल्याणकारक असेल तें नीट ठरवून सांग."

भगवान् म्हणाले, " हे निष्पाप अर्जुना, स्थितप्रज्ञासाठीं ज्ञानयोग व अज्ञजनांसाठीं कर्मयोग, अशा ज्ञानयोग व कर्मयोग ह्या दोन निष्ठा वैदिक संप्रदाय सुरू झाला तेव्हांपासून लागून ठेविल्या आहेत. कर्मयोगाचें आचरण करून अज्ञजनच पुढें ज्ञानयोगाचा अधिकारी असा स्थितप्रज्ञ होतो. कर्मयोगाला, म्हणजे विहितकर्माच्या कर्मानुष्ठानाला, प्रारंभ केल्यावांचून, नैष्कर्म्यसिद्धीला—म्हणजे ज्ञानयोगाला—पुरुष अधिकारीच होत नाहीं. ज्ञानरहित कर्मत्याग म्हणजे कांहीं ज्ञाननिष्ठा नव्हे. कारण, कोणीहि प्राणी कर्म सोडून एक क्षणभरहि राहूं शकत नाहीं. सत्त्व-रज-तमांनीं युक्त असलेल्या प्रकृतीच्या अधीन असलेला जीव, त्याच्यांत ज्या गुणाचें आधिक्य असेल त्याप्रमाणें, कांहींतरी करीत असतोच. मनामध्यें विषयांचें चिंतन चालू असताना नुसत्या कर्मेंद्रियांचें संयमन करण्याचा प्रयत्न जो मूढ पुरुष करतो, त्याच्या पदरीं नुसता ढोंगीपणा येतो. ज्ञानेंद्रियांचा मनानें निग्रह करून कर्म-फलामध्यें आसक्त न होतां कर्मेंद्रियांनीं जो विहित कर्मानुष्ठान सुरू करतो तो चांगला पुरुष समजला जातो. कर्माधिकारी असतांना, विहितकर्म मुळींच न करण्यापेक्षां कर्म करणारा पुरुष श्रेष्ठ होय. विहित कर्मानुष्ठानानें शरीरयात्राहि योग्य चालते. म्हणून अर्जुना, तूं धर्मानें लावून दिलेलीं नित्य कर्में कर. विहित कर्मामध्यें शरीरयात्रा उत्तम तऱ्हेनें चालेल असें कर्महि लावून दिलेलें असतें. उदाहरणार्थ ब्राह्मणाला अध्यापन, क्षत्रियाला प्रजारक्षण, वैश्याला वाणिज्य आणि शूद्राला परिचर्या, हीं तीं कर्में होत. ईश्वरासाठीं केलेलें विहितकर्म बंधनाला कारण होत नाहीं, म्हणून अर्जुना, कर्मफलाची आसक्ति सोडून

ईश्वरार्पण-बुद्धीनें कर्म कर. ब्रह्मदेवानें यज्ञ आणि प्रजा एकदमच उत्पन्न केल्या. आणि ह्या यज्ञाचें अनुष्ठान तुम्हांला इष्ट गोष्ट देईल व तुमची उन्नति करील, असें प्रजांना त्यानें सांगून ठेविलें. तसेंच ह्या यज्ञाच्या योगानें तुम्ही देवांना संतुष्ट करा, म्हणजे तुम्ही संतोष पावाल, अशा गोष्टी देव तुम्हांला देतील. ह्याप्रमाणें परस्परांना संतोष देणारे होऊन तुम्ही आपलें कल्याण करून घ्या, असेंहि त्यानें सांगितलें. यज्ञानें संतुष्ट झालेले देव मनुष्याला इष्ट असलेले भोग मिळवून देतात. ह्या भोगाचा कांहीं अंश पुनः देवाना यज्ञरूपानें देऊन मनुष्यानें ते भोग भोगावेत. तसें जर केलें नाहीं तर शास्त्रदृष्टीनें तो लबाड ठरतो. देवयज्ञादि नित्य यज्ञ करून अवशेष राहिलेलें अन्न खाणारे पुरुष पापमुक्त होतात. स्वतःच्याच पोटाकरता केवळ अन्न शिजविणारे पापी होतात. खाल्लेल्या अन्नापासून शरीरें होतात. पर्जन्यापासून धान्य निर्माण होतें. यज्ञापासून जें अपूर्व उत्पन्न होतें त्या अपूर्वानें पर्जन्य पडतो, आणि ह्या देहधारी यजमानानें केलेल्या विहित कर्मानें यज्ञ होतो. त्या कर्माचें कारण वेद आहेत. ते वेद परमेश्वराच्या श्वासोच्छ्वासापासून प्रगट झाले आहेत. म्हणून वेद परमात्म्याप्रमाणेंच सर्व-गत व सर्वप्रकाशक असून जगच्चक्र चालविणाऱ्या यज्ञाचे प्रवर्तक आहेत. अर्जुना, म्हणून ईश्वरानें प्रवृत्त केलेलें हें जगच्चक्र जो कर्माधिकारी पुरुष यज्ञकर्म करून तसेंच चालू ठेवीत नाहीं, त्या पाप्याचा जन्म व्यर्थ होतो. हें कर्माधिकाऱ्याच्या कर्तव्यासंबंधीं सर्व मीं तुला सांगितलें. कर्मयोगाचें योग्य अनुष्ठान करीत करीत तो पुरुष ज्ञानयोगाचा अधिकारी झाला व आत्मस्वरूपामध्येंच नित्य रममाण होणारा आत्मनिष्ठ बनला, कीं त्याला मात्र कांहीं शास्त्रविहित कर्तव्य म्हणून राहात नाहीं. अशा ज्ञानी पुरुषानें कांहीं कर्म केलें तर त्यापासून फलोत्पत्ति होत नाहीं, न केलें तर प्रत्य-वायहि घडत नाहीं. त्याला स्वतःबद्दल वा दुसऱ्या कोणाबद्दल कर्म करून कांहींच साधावयाचें नसतें. म्हणून तुला जर आत्मनिष्ठ व्हावयाचें असेल तर आसक्तिरहित होऊन धर्मानें लावून दिलेलें विहितकर्म तूं नित्य कर. फलामध्यें आसक्त न होतां विहितकर्म करणारा पुरुष चित्तशुद्धि होऊन ज्ञानयोगाचा अधिकारी होतो. जनकादि क्षत्रिय राजे कर्मानुष्ठानानेंच

ज्ञानयोगाधिकारी झाले. राजा हा प्रजासंरक्षक असतो, तसाच तो धर्मप्रवर्तकहि असतो. लोकांनीं आपापल्या धर्माप्रमाणें चालावें म्हणून त्याना आदर्श होण्याकारितां त्याला धर्माचरण सतत करीत राहावें लागतें. जनकादि राजे तसें करीत राहिले. तूंहि लोकसंग्रहाकारिता विहित कर्म करीत राहिलें पाहिजेस. श्रेष्ठ लोकाचें अनुकरण सामान्यपणें सर्व लोक करतात. अर्जुना, माझेंच उदाहरण घे ना! मला आतां काय मिळवावयाचें राहिलें आहे? तरी मी कर्मानुष्ठान करीतच असतों ना? जर मीं आळसानें विहित कर्म करण्यांत अळंटळं केली तर सर्व लोक माझेच अनुकरण करतील. जर मीं कर्म केलें नाहीं तर लोकांहि धर्माचरण करीत नाहींसे होऊन धर्मभ्रष्ट होतील व नाश पावतील. त्यामुळें वर्णसंकर होईल, व त्यामुळें सर्व क्रियाचा लोप होऊन त्यांच्या पूर्वजाचाहि अधःपात होईल. अशा प्रकारें त्यांच्या सर्वस्वी नाशाला मी कारण होईन. म्हणून हे भारत, लोकसंग्रह करण्याकरता कर्मफलाची आसक्ति न धरतां विद्वानानें कर्म करीत राहावें. अज्ञजनाना, जें आकलन करण्याची शक्ति नाहीं, असें काहीं तरी सागून त्याचा बुद्धिभेद विद्वानानें करूं नये. त्यांच्या हातून सर्व विहितकर्में करवावी. अविवेकी पुरुष अज्ञानाने व सत्त्वरजतमात्मक प्रकृतीनें पराधीन होऊन, सर्व कर्मोचा कर्ता मीच आहे, असा अभिमान धरतो. पण जो तत्त्वज्ञ असतो तो, शरीरेंद्रियें विषयांमध्यें प्रवृत्त झाल्यानें त्यांच्याकडून कर्में होतात, आपला त्यांत कांहीं संबंध नाहीं, असें जाणतो. सत्त्वरजतमात्मक प्रकृतीच्या शरीरेंद्रियादि विकारांनीं मूढ झालेले अज्ञ, इंद्रियांकडून गुणाच्या अधीन होऊन झालेलीं कर्में आपणच केलीं असें समजतात. तरी तत्त्वज्ञ पुरुषानें त्यांचा बुद्धिभेद करूं नये; कारण, त्याच्या योगें कर्मावरील त्याची श्रद्धाच उडून जाईल. अर्जुना, तुझ्या हातून होणारीं सर्व कर्में विवेकानें, तीं आपलीं नाहींत, त्यांपासून निष्पन्न होणाऱ्या फलांशींहि आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं, असें समजून तूं तीं मला, म्हणजे परमात्म्याला, अर्पण कर आणि शोक-मोह-रहित होऊन युद्ध कर. ह्या माझ्या मताचा जे आदरानें, स्वीकार करून त्याचें श्रद्धापूर्वक आचरण करतील, त्यांना कर्मबंधन प्राप्त होणार नाहीं. ह्या माझ्या मताप्रमाणें जे वागणार नाहींत, त्यांचा कर्म-

बंधनाच्या योगानें निश्चित नाश होईल, हें तूं जाण. अमकींतमकीं कर्में करूं नका, असें मनुष्यांना मीं किती सांगितलें तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. अज्ञान्याप्रमाणेंच ज्ञान्याचेहि हातून प्रारब्धकर्माप्रमाणें ज्या गोष्टी घडावयाच्या असतात, त्या गोष्टी घडावयाच्याच. त्या गोष्टी आपण करीत नाहीं, असें निश्चयानें समजून ज्ञानी मोहरहित असल्यानें स्वस्थचित्त असतो. अज्ञानी मनुष्य त्या गोष्टी आपणच करीत आहों असें मोहानें समजून नसतें सुखदुःख भोगतो. आपला क्षत्रिय धर्म हिंसादिकामुळें दोषमय व आचरायला अत्यंत कठीण आहे, आणि ब्राह्मणधर्म दोषरहित व आचरायला सोपा आहे असें जरी तुला वाटत असलें, तरी अर्जुना, उत्तम अनुष्ठान केलेल्या गुणसंपन्न परधर्माहून दोषयुक्त स्वधर्म अधिक चांगला असतो. स्वधर्म आचरीत असताना मरण आलें तरी तें कल्याणकारक आहे, पण परधर्म भयावह आहे.

अर्जुन म्हणतो, "हे कृष्णा, पाप करूं नये हें माहीत असूनहि व पाप करण्याची इच्छा नसूनहि मनुष्याचे हातून पातक होतें. हें पातक त्याच्याकडून बलात्कारानें कोणीतरी करवितो असें दिसतें. तर तें कोण करवितो हें सांग."

भगवान् म्हणतात, "पुरुषाला पापाकडे प्रवृत्त करणारा तो हा प्रसिद्ध काम आहे. जो अडयळा झाला असताना आणि क्रोधरूपानें परिणत होतो तोहि कामच होय. त्यालाच क्रोध म्हणतात. काम हा कधींहि तृप्त न होणारा महापापी आहे. अर्जुना, ह्या कामाला आपला शत्रु समज. धूर अग्नीला, मळ आरशाला, किंवा वार गर्भाला ज्याप्रमाणें आच्छादून टाकतें, त्याप्रमाणें ज्ञानी पुरुषाचा नित्य वैरी, ज्याची तृप्ती कधींच होत नाहीं असा इच्छारूप काम, पुरुषाच्या ज्ञानाला आच्छादित करतो. ह्या कामाचें आश्रयस्थान इंद्रियें, मन व बुद्धि हीं आहेत. ह्या मनबुद्धींद्रियांनीं ज्ञानाला आच्छादून काम देहाभिमानी आत्म्याला मोहांत पाडतो. म्हणून अर्जुना, तूं पहिल्याप्रथम ह्या इंद्रियादिकांचें नियमन करून ज्ञानविज्ञानाचा नाश करणाऱ्या ह्या पाप्याचा ( कामाचा ) त्याग कर. देहापेक्षां इंद्रियें श्रेष्ठ, इंद्रियांपेक्षां मन श्रेष्ठ, मनापेक्षां बुद्धि श्रेष्ठ, आणि बुद्धीच्याहि

पलीकडे असलेला तो आत्मा होय. हे पराक्रमी अर्जुना, याप्रमाणें शुद्ध-चित्ताचे योगानें मनाचें समाधान करून बुद्धीच्या पलीकडे असलेल्या आत्म्याला जाण व हातीं लागण्यास कठीण अशा ह्या कामरूप शत्रूला ठार कर."

---

४

भगवान म्हणतात, "विहितकर्म हें ज्याचें साधन आहे व ज्ञान हें ज्याचें साध्य आहे असा हा अक्षय फळ देणारा योग, मीं प्रथम सूर्याला सांगितला. सूर्यानें मनूला सांगितला. मनूनें इक्ष्वाकूला सांगितला. याप्रमाणें परंपरेनें प्राप्त झालेला हा योग पुष्कळ राजर्षींनीं समजावून घेतला. तूं माझा मित्र असून माझा भक्तहि आहेस, म्हणून हा प्राचीन योग, हें उत्तम रहस्यज्ञान, मीं तुला सांगितलें."

अर्जुन म्हणतो, "कृष्णा, तुझा जन्म अगदीं अलीकडचा आणि सूर्य सृष्टीच्याहि अगोदर झालेला. त्याला तूं हा योग सांगितलास, असें म्हणतोस, तें कसें काय ?"

भगवान म्हणतात, "माझे व तुझे अनेक जन्म होऊन गेले. मला त्या जन्मांचें स्मरण आहे. तूं त्यांना स्मरत नाहींस. जन्मरहित, केव्हाहि क्षय न पावणारा, सर्व प्राणिमात्रांचें नियमन करणारा व सर्वांचा अंतर्यामी असा मी, आपल्या मायेला आपल्या ताब्यांत ठेवून, स्व-सामर्थ्यानें जन्म घेतों. जेव्हां जेव्हां धर्माची ग्लानि होते आणि अधर्माचा उद्भव होतो, त्यावेळीं मी आपल्याला उत्पन्न करितों. दर युगांत, साधूंचें सर्व प्रकारें रक्षण करण्याकरितां, पाप्यांचा नाश करण्याकरितां व धर्माची विसकटलेली घडी उत्तम तऱ्हेनें बसविण्याकारितां, मी जन्म घेतों. अर्जुना, ह्या माझ्या अलौकिक जन्मकर्मांचें रहस्य जो मनुष्य जाणतो, तो हा देह टाकल्यावर फिरून जन्माला येत नाहीं. ज्यांचे विषयप्रेम, भय व क्रोध हे विकार नाहींसे झाले आहेत, जे अंतर्बाह्य मत्स्वरूप झाले आहेत, असे पुष्कळ आत्मनिष्ठ पुरुष आपल्या ज्ञानरूपी तपानें मोक्ष पावले

आहेत. जे माझी ज्या हेतूनें उपासना करितात, त्यांचे तेच हेतू मी पुरवितों. सर्व मनुष्यें आपापल्या अधिकाराप्रमाणें मीं घालून दिलेल्या साध्यसाधनरूप ज्ञान-कर्म-मार्गाचें अवलंबन करितात. आपल्या कर्मांचे फल प्राप्त व्हावें, असें इच्छिणारे पुरुष त्या फलदात्या देवतांची पूजा करितात. ह्या मनुष्यलोकांत कर्मफलें झटकन मिळतात. अर्जुना, गुण व कर्म यांचा नीट विचार करून मीं चार वर्ण व त्यांतील चार आश्रम असें चातुर्वर्ण्य निर्माण केलें. मी व्यवहारदृष्टीनें त्यांचा कर्ता असलों, तरी परमार्थदृष्टीनें मी त्यांचा अकर्ता आहे असें समज. कर्मफलांची मला कधीं इच्छाच नसल्यानें कर्मांपासून उत्पन्न होणाऱ्या पापपुण्याचाहि मला कधीं संपर्क लागत नाहीं. असा सर्व प्रकारें जो मला, म्हणजे आत्म्याला जाणतो, त्याला कर्म बंधनकारक होत नाहीं. पूर्वींच्या मुमुक्षूंनीं अगोदर हें सर्व जाणून, जें कर्म, ज्या तऱ्हेनें त्याच्या पूर्वींच्या मुमुक्षूंनीं केलें, तसेंच त्यांनींहि तें कर्म केलें. अर्जुना, तूंहि त्यांचेंच अनुकरण कर. कर्म काय, अकर्म काय, या विषयीं मोठमोठे विद्वानहि मोहित होतात. म्हणून कर्माकर्मांचा विचार आतां मी तुला सांगतों, तो जाणलास म्हणजे तूं ह्या जन्ममरणरूप संसारांतून मुक्त होशील. शास्त्रविहित कर्मांतलें रहस्य, शास्त्रनिषिद्ध कर्मांतले दोष, व मुळींच कर्म न करण्यामुळें प्राप्त होणारी अवस्था, कर्म करण्याचे हे तीनहि प्रकार समजून घेतलेच पाहिजेत असे आहेत. कर्मांचें यथार्थ स्वरूप फार गहन आहे. जो आपल्या शरीरेंद्रिय प्राणाकडून घडणाऱ्या सर्व प्रकारच्या कर्मांत आपलें अकर्तृत्व पाहातो, आणि ज्याला आपलें कर्म सोडून स्वस्थ बसण्यांत आपलें कर्तृत्व दिसतें तोच खरा ज्ञानी, योगी व सर्व कर्में करणारा होय. त्या विवेकी ज्ञानी पुरुषाचीं सर्व कर्में, विषयेच्छा व इच्छांचें कारण संकल्प यांनीं रहित असतात. ज्ञानरूपी अग्नींत त्याचीं सर्व कर्में भाजून निघालेलीं असल्यानें तीं निष्फल म्हणजे फल न देणारीं होतात. विद्वान लोक अशा मनुष्यालाच पंडित म्हणजे खरा ज्ञानी समजतात. जो आत्मस्वरूपांत रममाण असल्यानें नेहमीं संतुष्ट असतो, ज्याला सुख मिळविण्याकरतां लौकिक वा वैदिक कोणत्याच साधनाची

आवश्यकता नसते, ज्याची कर्मफलाविषयीं आसक्ति नसते, असा पुरुष कर्मानुष्ठान उत्तम प्रकारें करीत असलेला जरी दिसला, तरी तो कांहीं करीत नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. ज्याला कसलीच वासना नाहीं, ज्यानें स्त्री-पुत्रादि परिग्रहाचाहि त्याग केला आहे, आणि ज्यानें अंतःकरणासह सर्व इंद्रियाचा निग्रह केला आहे, तो केवळ शरीर-धारणेपुरतें कर्म करीत असला, तर त्याला त्या कर्मापासून कसलेंच पाप अथवा पुण्य लागत नाहीं. जें मिळेल त्यात समाधान मानणारा, शीतोष्ण, सुखदुःख वगैरे द्वंद्वांचा ज्याच्यावर काहीं परिणाम होत नाही असा, कोणाचा मत्सर न करणारा, व शरीर-धारणेपुरतें मिळालें अथवा न मिळालें तरी ज्याचें चित्त हर्षविषादानें चलित होत नाहीं, अशा संन्याशाला कोणत्याच कर्माचा बंध लागत नाही. कर्म व त्याचे फल याविषयीं ज्याची आसक्ति नाहींशी झाल्यामुळें ज्याला पापपुण्याचें वा धर्माधर्माचें बंधन लागत नाहींसें झालें आहे, असा मनुष्य यज्ञासाठीं जरी कर्म करीत असला, तरी त्याचे तें कर्म फलासह पूर्ण नाश पावतें. कारण त्याचा सर्व यज्ञच ब्रह्मस्वरूप असतो. ज्या मंत्रानीं हवन करावयाचें ते मंत्र, ज्या साधनानीं हवन करावयाचें तीं चमसस्रुक्स्रुवादि साधनें, अग्नींत होमावयाचीं तूप, भात, वगैरे होमद्रव्यें, ज्यात होम करावयाचा तो अग्नि, हवन करणारा यजमान, प्रत्यक्ष होमक्रिया ह्या सर्व गोष्टी ब्रह्मच आहेत, असें तो आपल्या ब्रह्मरूप स्थिरचित्तानें पाहातो. अर्थात् असल्या यज्ञकर्मापासून त्याला इष्ट असलेलें फलहि ब्रह्मच आहे. हा आत्मनिष्ठाचा यज्ञप्रकार सांगितला. अधिकारभेदानें यज्ञ निरनिराळया प्रकारचे आहेत. अज्ञकर्माधिकारी, फलाशेनें इंद्रादि देवांचे प्रीत्यर्थ यज्ञ करितात. दुसरे कर्मनिष्ठच, पण अध्यात्मशास्त्रात ज्यांचा प्रवेश झाला आहे असे योगी, अग्नीला ब्रह्म समजून त्यात यज्ञसाधनानीं हाविर्द्रव्याचा यज्ञ करितात. दुसरे योगी, इंद्रियसंयमरूपी अग्नीमध्यें इंद्रियाचा होम करितात. दुसरे कांहीं योगी, इंद्रियविषयाचा, इंद्रियरूपी अग्नींत होम करितात. दुसरे योगी, सर्व इंद्रियाचीं कर्में व सर्व प्राणांचीं कर्में यांचा विवेकज्ञानानें आत्मसंयमरूप योगाग्नींत होम करितात. सत्पात्रीं दान देण्यानें द्रव्ययज्ञ होतो. तपश्चर्या करण्यानें तपोयज्ञ होतो.

योगाभ्यासानें योगयज्ञ, ऋग्वेदादि वेदांच्या अध्ययनानें स्वाध्याययज्ञ, शास्त्रांच्या अभ्यासानें ज्ञानयज्ञ, असे यज्ञ होतात. तीक्ष्ण व्रतांच्या योगानें यति व्रतयज्ञ करितात. परिमित आहार करून प्राणापानादि वायूंचा निरोध करणारे योगी, यज्ञभावनेनेंच आपलें योगसाधन करितात, आणि निष्पाप होतात. अर्जुना, ह्यांपैकीं एकहि यज्ञ न करणाऱ्या माणसाला इहलोकहि कल्याणकारक होत नाहीं, मग दुसरा उत्तम लोक त्याला मिळत नाहीं हें सांगणें नकोच. असे पुष्कळ प्रकारचे यज्ञ वेदानें सांगितले आहेत. हे सर्व यज्ञ कर्मापासून झालेले आहेत. त्यांतील रहस्य जाणून संसारापासून तूं मुक्त हो. द्रव्यादि साधनांनीं साध्य होणाऱ्या यज्ञाहून ज्ञानयज्ञ अधिक श्रेयस्कर आहे. सर्व कर्मांचा शेवट ज्ञानांत झाला, म्हणजे कर्मांचें बंधन नाहींसें होतें. तें आत्मज्ञान मिळविण्याकरितां तूं तत्त्ववेत्त्या आचार्यांना शरण जा, त्यांना साष्टांग नमस्कार कर. त्यांची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घे, आणि मग बंधमोक्षादिकांबद्दल त्यांना प्रश्न करून तुला आत्मज्ञानाचा उपदेश करण्याबद्दल त्यांची प्रार्थना कर. म्हणजे ते तुला उपदेश करून आत्मज्ञान देतील. तें ज्ञान झाल्यावर तुला पुनः अशा प्रकारचा मोह म्हणून केव्हांच होणार नाहीं. आत्मज्ञान झाल्यावर सर्व चराचर-वस्तु मत्स्वरूप म्हणजे आत्मस्वरूपच असलेल्या तूं पाहशील. सर्व पाप्यांहून अधिक पाप करणारा पापी तूं असलास तरी ह्या ज्ञाननौकेनें तूं सर्व पापें सहज तरून जाशील. ज्याप्रमाणें प्रज्वलित अग्नि इंधनें जाळून त्यांचें भस्म करतो, त्याप्रमाणें हा ज्ञानरूपी अग्नि सर्व संचित-क्रियमाण कर्में जाळून त्यांचें भस्म करून टाकतो. ज्ञानासारखें पावन करणारें ह्या जगांत कांहींच नाहीं. तें आत्म्यासंबंधींचें ज्ञान, कर्मयोग व समाधियोग दीर्घकाल करून सुसंस्कृत झाल्यावर, मुमुक्षूला मिळतें. ज्ञानप्राप्तीचे उपाय करण्यामध्यें अत्यंत दक्ष, जितेंद्रिय व श्रद्धाळु अशा पुरुषाला तें ज्ञान मिळतें, आणि त्या ज्ञानाची प्राप्ति होतांच अतिशय श्रेष्ठ प्रकारची शांति, म्हणजे मोक्ष, त्याला मिळतो. आत्म्याला न जाणणारा संशयी व अश्रद्धाळू पुरुष नाश पावतो. त्याला इहलोक सुखकर होत नाहीं, व परलोकहि मिळत नाहीं. अर्जुना, आत्मज्ञान झाल्याकारणानें ज्याचे सर्व संशय पार नाहींसे झाले

आहेत, व ज्ञानयोगानें ज्यानें सर्व विहित व निषिद्ध, धर्माधर्म उत्पन्न करणाऱ्या कर्मांचा त्याग केला आहे, अशा आत्मनिष्ठ पुरुषाला त्या कर्मांचा बंध लागत नाहीं. म्हणून अर्जुना, अज्ञानामुळें बुद्धींत असलेल्या आत्म्याविषयींच्या संशयाला, ज्ञानरूप खड्गानें तोडून टाक, आणि ज्ञानप्राप्तीचें साधन असा कर्मयोग करायला सुरवात कर. ऊठ, ऊठ, आणि युद्ध कर.

---

## ५

अर्जुन म्हणतो, "कृष्णा, सर्व कर्मांचा संन्यास करायला सांगून पुनः विहित कर्मानुष्ठान कर म्हणून सांगतोस, तेव्हां मी आतां सर्वकर्मसंन्यास करूं, कीं कर्मयोगांत सांगितल्याप्रमाणें विहित कर्मानुष्ठान करूं? संन्यास व कर्मयोग यांतील श्रेष्ठ व अधिक श्रेयस्कर काय तें सांग."

भगवान म्हणतात, "अज्ञ मुमुक्षूनें केलेला कर्मसंन्यास अथवा त्यानें केलेलें कर्मानुष्ठान हीं दोन्हीहि ज्ञानप्राप्तिद्वारा त्याला मोक्ष देणारींच आहेत. पण मुमुक्षु अज्ञ असेल तर त्याच्या ज्ञानरहित कर्मसंन्यासापेक्षां त्याचा कर्मयोगच श्रेष्ठ आहे. जो दुःखसुखें देणाऱ्या साधनांचा द्वेष करीत नाहीं व जो कशाचीहि इच्छा करीत नाहीं असा कर्मानुष्ठान करणारा पुरुषच मुख्यत्वें करून संन्याशी होय. त्या द्वंद्वरहित पुरुषाला कर्मांचें बंधन लागत नाहीं. संन्यास व कर्मयोग, या दोहोंच्या फलांत अंतर आहे असें अज्ञजन म्हणतात. त्या दोहोंचें फल एकच आहे, असें पंडित समजतात. सांख्य व योग फलदृष्ट्या सारखेच आहेत, असें जो मानितो, तोच ज्ञानी. अर्जुना, खरी संन्यस्तवृत्ति कर्मयोगावांचून होणें फार कठीण आहे. ज्ञानयुक्त संन्यास म्हणजे सांख्य. सांख्यांना जसा मोक्ष मिळतो, तसाच कर्मयोगीहि आपल्या विहित कर्मानुष्ठानानें शुद्धचित्त होऊन ज्ञानप्राप्तिद्वारा मोक्ष मिळवतो. शुद्धचित्त व जितेंद्रिय योगी सर्वभूतांच्या ठिकाणीं आत्मस्वरूप पाहूं लागला कीं त्याला कर्म बंधनकारक होत नाहीं. पाहाणें, ऐकणें, स्पर्श करणें, घेणें, चालणें, श्वास घेणें, रस चाखणें, बोलणें, मलमूत्र विसर्जन

करणें, श्वासोच्छ्वास करणें, पापण्यांची उघडझांप करणें, वगैरे सर्व क्रिया इंद्रियें आपापल्या विषयांत प्रवृत्त होऊन करतात. आपला त्यांत कांहीं संबंध नाहीं, असें आत्मस्वरूपमग्न तत्त्वज्ञानें चिंतन करावें. असें चिंतन करणाऱ्या फलाशारहित तत्त्वज्ञान्याला, पाण्यातल्या कमळाला जसें पाणी स्पर्श करीत नाहीं, तसें कर्मानुष्ठान चालू असता कसलेंहि पातक स्पर्श करूं शकत नाहीं. शरीरानें, मनाने, बुद्धीनें, इंद्रियांनीं जीं जीं कर्में कर्मयोगी करतो, तीं तीं त्याच्या चित्तशुद्धीलाच कारण होतात. मनानें सर्व कर्मांचा संन्यास केलेला देहधारी आत्मा देहामध्यें हर्षविषादरहित सुखानें राहातो. तो कोणाला काहीं करण्याबद्दल प्रेरणा करीत नाहीं. कोणाकरितां स्वतः कांहीं करीत नाहीं. देहाच्या सर्व क्रिया अविद्यारूप प्रकृति करीत असते. आत्मा कोणाचें पाप घेत नाहीं, कोणाच्या पुण्याचाहि स्वीकार करीत नाहीं. आत्म्यासंबंधींच्या अज्ञानानें ज्ञान झांकलें जाऊन जीवाला पापपुण्याचा मोह पडतो. आत्म्यासंबंधींच्या ज्ञानानें अज्ञानाचा नाश झाला कीं तें ज्ञान जीवाला आत्मदर्शन करवितें. आत्मज्ञान झालेल्या जीवाला पुनर्जन्म नाहीं. आत्मनिष्ठ पुरुषाला आत्म्याचें सर्वव्यापकत्व दिसतें. त्याला विद्या व विनय ह्यांनीं संपन्न असलेल्या ब्राह्मणाच्या ठिकाणीं, आणि गाय, बैल, हत्ती, कुत्रा, चांडाल, ह्या सर्वांच्या ठिकाणीं आत्मा सर्वत्र सारखाच भरलेला आहे हें दिसतें. ब्रह्मासंबंधीं असा सर्व ठिकाणीं समभाव ठेवणारा आत्मनिष्ठ, जीवन्मुक्त असतो. ब्रह्मस्वरूपात स्थिरचित्त झालेल्या जीवन्मुक्ताला कोणतीहि गोष्ट प्रिय-अप्रिय नसते. त्यामुळें त्याच्या ठिकाणीं हर्ष, उद्वेग, हे विकारहि संभवत नाहींत. शब्दादि बाह्य विषयांकडे पूर्ण दुर्लक्ष्य असल्यामुळें शाश्वत असें आत्मसुखच स्थिर चित्तानें तो अनुभवीत असतो. उत्पत्ति व नाश यानीं युक्त असलेल्या इंद्रिय-विषयांच्या संयोगानें होणाऱ्या सुखांतच दुःखाचीं बीजें आहेत, हें जाणत असल्यामुळें त्यांत तो कधींच रमत नाहीं. तो ह्या शरीरांतले कामक्रोधांचे वेग सहन करतो. त्यांच्या आहारीं न जातां तो आत्मसुखांत मग्न असतो. सर्व बाह्य व्यापार ज्याचे मनानें सुटलेले आहेत, अशा आत्मनिष्ठ संन्याशाला सुखाकरतां आत्म्याव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीच अपेक्षा नसल्यानें त्याला शाश्वत

आत्मसुखाच्या निरतिशय आनंदाचा लाभ नेहमींच मिळतो. ज्याचे पापादि सर्व दोष नष्ट होऊन सर्व संशयहि विनाश पावलेले आहेत; सर्वात्मभावामुळें जो सर्व भूताच्या हितांत रत आहे; इंद्रियें, मन, बुद्धि यांचा निग्रह केल्यामुळें ज्याच्यापासून इच्छा, भय, क्रोध हे दूर झाले आहेत; जो प्राण-अपानादि वायूंना प्राणायामानें व्यवस्थित करून स्थिरचित्त व विवेकशील झाला आहे, असा संन्यासी सर्व प्राण्यांचा सुहृद् व चराचरांचा नियामक अशा मज आत्म्याला जाणून शाश्वत शांति म्हणजे मोक्ष मिळवितो.''

---

६

''निरग्नि व अक्रिय असा पुरुषच तेवढा संन्यासी व योगी आहे असें समजण्याचें कारण नाही. कर्मफलाची आसक्ति सोडून विहित व नियत कर्म करीत राहाणारा सुद्धा संन्यासी व योगी यांच्यासारखाच आहे. अर्जुना, ज्याला संन्यास असें म्हणतात तो योगच आहे. कारण, संन्यासाप्रमाणेंच संकल्पाचा त्याग केल्याशिवाय योग सिद्ध होत नाहीं. योग म्हणजे ध्यानयोग, ध्यानयोग मिळविण्यास पात्र होण्याची इच्छा करणाऱ्याला, फलनिरपेक्ष कर्मानुष्ठानाच्या साधनाची आवश्यकता असते. ध्यानयोग साध्य झाल्यावर, मोक्ष मिळविण्याकरितां, सर्वकर्मसंन्यास हेंच साधन त्याला सांगितलें आहे. जेव्हा मनुष्याच्या हातून सर्व संकल्पांचा त्याग झालेला दिसतो तेव्हांच ध्यानयोग कार्यक्षम होतो. जन्ममृत्युरूप-संसारसागरांत निमग्न झालेल्या जीवात्म्यानें अशा रीतीनें ध्यानयोगारूढ होऊन आपला आपण उद्धार करावा. संकल्पादि दोषांनीं योगारूढावस्थेंतून खालीं उतरून पुनः जन्ममृत्यूंत आपल्याला बुडवूं नये. आपल्या आचारणानें जीवात्माच जीवात्म्याचा हितकर्ता होतो; व जीवात्माच जीवात्म्याचा शत्रु होतो. ज्या पुरुषानें शरीरेंद्रियप्राणांना आपल्या ताब्यात ठेविलें आहे, तो स्वतःचा हितकर्ता होतो व ज्याला ह्यांना जिंकतां येत नाहीं तो स्वतःचा शत्रु बनतो. शरीरेंद्रियादींचा संघात हाच आत्मा, त्याला ज्यानें जिंकलें आहे तो पुरुष जितात्मा होय.

जितात्म्याचें चित्त स्थिर झाल्यानें तो, परमात्मा म्हणजे साक्षी आत्मा याच्या ठिकाणीं आत्मभावानें राहातो. मग त्याला शरीरेंद्रियासंबंधीं होणारीं शीतोष्ण-सुखदुःखादि द्वंद्वें व मानापमान अपाय करूं शकत नाहींत. साक्षी आत्म्यामध्यें आत्मभावानें राहाणाऱ्या जितेंद्रिय पुरुषाला आत्मवस्तु व अनात्मवस्तु यांचें शास्त्रोक्त ज्ञान पूर्णपणें होऊन, त्या ज्ञानाचा अनुभवहि घेतो, व अनात्मवस्तूबद्दल त्याचें अंतःकरण अगदीं विटून वैराग्यसंपन्न होतें. मग त्या योग्याला मातीचें ढेकूळ, दगड आणि सोनें, हीं सारखींच वाटतात. त्याप्रमाणेंच सुहृद्, स्नेही, शत्रु, उदासीन, मध्यस्थ, अप्रिय सदाचरणी व दुराचरणी लोक ह्या सर्वांचीच त्याच्या दृष्टीनें अनात्मवस्तूंमध्यें गणना होऊन त्याच्या तत्त्वज्ञ बुद्धीला त्यापैकीं कोणाबद्दलच प्रिय-अप्रिय भावना होत नाहींत. ध्यानयोगाचा अभ्यास करणाऱ्या पुरुषानें, ह्या वर सांगितलेल्या पुरुषाप्रमाणें, जितेंद्रिय, तृष्णाशून्य, व सर्व परिग्रहरहित होऊन चित्त स्थिर करावें. नंतर त्यानें अत्यंत पवित्र जागेंत दर्भ, हरिणाजिन, मऊ वस्त्र याचें आसन मांडून त्यावर एकाग्र मन करण्याकरितां बसावें. त्यावेळीं शरीर, मस्तक व मान सरळ ठेवून नासिकाग्रीं दृष्टि लावावी. अशा रीतीनें मन एकाग्र करून आत्मस्वरूपाचें चिंतन करावें. अभ्यासामध्यें व्यत्यय येऊं नये म्हणून अभ्यासकानें आहार, विहार, झोंप, जागरण, वगैरे सर्व गोष्टी परिमित कराव्या. अशा प्रकारें अभ्यास चालू झाला म्हणजे त्या योग्याचें चित्त आत्मस्वरूपाकार होऊं लागतें. योगाभ्यासकानें सर्व वासनांचा त्याग करावा. रागादि दोषांनीं मनाला चंचल होऊं न देतां हळू हळू त्याला आत्मस्वरूपाची गोडी लावून तें तेथें कायमचें चिकटून राहील असा प्रयत्न करावा. अशा प्रकारें अभ्यास करतां करतां, चित्तांतील मोहादि सर्व दोष दूर होतात, आणि तें सतत आत्मस्वरूपाकार होऊन राहातें. ज्याचें चित्त शांत झालें आहे, असा योगी निरतिशय ब्रह्मानंदाचा अनुभव घेतो. सर्व चराचर भूतें त्याला आत्मस्वरूपमय दिसतात व आत्मदृष्टीनें सर्वांचीं सुखदुःखें तो पाहूं लागतो."

अर्जुन म्हणतो, "हे कृष्णा, मन तुझ्या ठिकाणीं, म्हणजे परमात्म्याच्या, साक्षी आत्म्याच्या ठिकाणीं स्थिर झालें, म्हणजे तूं सांगितलेल्या सर्व गोष्टी

होणार. पण मन इतकें चंचल आहे कीं त्याचा निग्रह करणें, हें वाऱ्याची मोट बांधण्याइतकें कठीण आहे."

भगवान म्हणतात, " अर्जुना, तूं म्हणतोस तसें हें मन अत्यंत चंचल व निग्रह करायला अतिशयच कठीण असें आहे, पण सतत अभ्यासानें व वैराग्यानें त्याचा निग्रह करतां येतो. "

अर्जुन म्हणतो, " कृष्णा, आणखी एक शंका आहे. मोक्षप्राप्तीकरतां योगमार्गाचा श्रद्धेनें अवलंब करणारा योगी, मोक्षप्राप्ति होण्यापूर्वीच मृत्युवश झाला, तर त्याची स्थिति काय होईल ? "

भगवान म्हणतात, " अर्जुना, तो शुभाचरण करणारा पुरुष दुर्गतीला खास जाणार नाहीं. त्याच्या मृत्यूनें त्यानें केलेल्या पुण्याचरणाचा नाश खचित होणार नाहीं. तो त्या पुण्याच्या जोरावर उत्तम लोकामध्यें जाऊन तेथें पुष्कळ वर्षें राहील, आणि पुनः जन्म घेतांना तो पवित्र आचरण करणाऱ्या श्रीमंताच्या घरीं अथवा एखाद्या योग्याच्या कुलांत अवतीर्ण होईल. पूर्वी केलेला योगाभ्यास तेथें त्याच्या उपयोगी पडेल. तो योगाभ्यासांत त्या जन्मांत आपली पुष्कळच प्रगति करील. अशा रीतीनें मोक्षप्राप्तीला लागणारा अभ्यास पूर्ण होईतों जितके जन्म घ्यावयाला लागतील, तितके जन्म घेऊन तो आपला अभ्यास पूर्ण करून मोक्ष मिळवील. तपस्वी, कर्मी व ज्ञानी, याच्याहिपेक्षां एका दृष्टीनें योगी मला अधिक मान्य आहे. म्हणून अर्जुना, तूं योगी हो. अर्जुना, त्या योग्याची माझ्यावरची श्रद्धा अचल असते म्हणून तो मला सर्वांत मान्य आहे."

---

७

भगवान म्हणतात, " अर्जुना, ज्या अर्थी तुझें मन माझ्या ठिकाणीं आसक्त असून तूं सर्वस्वी माझाच आश्रय केला आहेस, त्या अर्थी माझें —म्हणजे परमात्म्याचें—स्वरूप पूर्णपणें तुला समजणें अवश्य आहे. त्या स्वरूपासंबंधीं मी आतां तुला सांगतों, तें ऐक. आता मी तुला विज्ञानासह म्हणजे अनुभवासह ज्ञान संपूर्णतया सांगतों. तें ऐकल्यावर तुला ऐकण्या-सारखें कांहींच राहाणार नाहीं. हजारों हजार मनुष्यांपैकीं एखादाच

परमात्मस्वरूपाचें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतो. आणि अशा प्रयत्न करणाऱ्या अनेकांतून एखाद्यालाच माझें ज्ञान होतें. अर्जुना, पहिल्या प्रथम तूं माझ्या अपरा आणि परा किंवा निकृष्ट व श्रेष्ठ अशा दोन प्रकारच्या प्रकृती समजावून घे. अपरा म्हणजे निकृष्ट प्रकृति, गंध रस, रूप, स्पर्श, शब्द, अहंकार, महत्तत्त्व व अविद्यात्मक अव्यक्त, अशी आठ प्रकारांची आहे त्या आठ प्रकारापासून अनुक्रमें पृथ्वी, पाणी, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि व अहंकार हीं स्थूल कार्यें झालीं. अपरा प्रकृतीच्या आठ प्रकारांच्या ऐक्यावस्थेंतून जीव नांवाची चैतन्ययुक्त अशी माझी दुसरी परा म्हणजे श्रेष्ठ प्रकृति निर्माण झाली. ह्या माझ्या दुसऱ्या प्रकृतीच्या योगानें जगाची धारणा होते. सर्व भूतें ह्या माझ्या दोन प्रकृतींपासून झालीं आहेत. जगाची उत्पत्ति व लय म्हणजे मीच आहें. माझ्याशिवाय ह्या जगात दुसरें अधिक कांहींच नाहीं. सोन्याच्या दोऱ्यांत सोन्याचे मणि ओंवावेत, तसें जगाचें आत्मभूत असा मीच आत्मस्वरूप धारण करतों. माझ्या रस-रूपांतून सर्व प्रकारचे रस व पाणी; माझ्या तेजस्वरूपांतून सूर्य, चंद्र व अग्नि, माझ्या ॐकार स्वरूपापासून वेद; माझ्या शब्द-रूपापासून आकाश; माझ्या पौरुष-रूपांतून सर्व पुरुष, माझ्या गंधरूपांतून पृथ्वी, अशीं हीं सर्व निर्माण झालीं आहेत. माझें जीवनस्वरूप निरनिराळ्या अन्नरूपानें प्राणिमात्रांचें पोषण करतें. तपरूप मत्स्वरूपांतूनच तपस्वी निर्माण होतात. सर्व भूतें माझ्यापासून निर्माण होतात. बुद्धिमानांच्या ठिकाणीं दिसणारी बुद्धिमत्ता, तेजस्व्याची तेजस्विता व बलवानांत असलेलें कामरागरहित असें बल हीं सर्व त्यांनीं त्यानीं माझ्या त्या त्या स्वरूपांतून उचललीं आहेत. फार काय सांगू, अर्जुना, धर्माला सोडून नसलेला कामहि मत्स्वरूपच आहे. ह्या जगांत दिसणारे सर्व सात्विक, राजस व तामस पदार्थहि माझ्यापासूनच झाले आहेत. फक्त त्यांचें सामर्थ्य माझ्यावर चालत नाहीं. ते सर्व माझ्या अधीन आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हें सर्व जगत् माझ्या स्वरूपांतूनच प्रगट झालें आहे. हें ऐकून तूं अपेक्षा करशील कीं, माझ्यापासून झालेलें हें जगत् माझ्यासारखेंच नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावच

असलें पाहिजे. होय, तसें तें आहेहि. परंतु राग, द्वेष, मोह ह्या त्रिगुणांनीं त्या जगाला मोहित केलें असल्यानें तें आपलें स्वतःचें सत्यस्वरूप जाणत नाहीं, व माझी तर त्याला ओळखच नाहींशी झाली आहे. ही माझी सत्त्वगुणादि मायाशक्ति अति प्रबल आहे. तिचें उल्लंघन करून आपलें सत्यस्वरूप पाहाण्याची इच्छा असेल त्यानें मला शरण आलें पाहिजे. पण माझ्या मायेनें स्वकर्मभ्रष्ट पापी लोकांना इतकें मूढ व अविवेकी बनविलें आहे कीं, ते मला शरणच येत नाहींत. पुण्याचरणी लोक मला शरण येतात. त्यांच्यांतहि आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी असे चार प्रकार आहेत. त्यांत आर्त व अर्थार्थी आपल्या कामापुरतें मला भजतात. माझें दर्शन घेण्याची इच्छा करणारा जिज्ञासु मात्र माझें भजन सतत करतो, व शेवटीं तो ज्ञानी बनतो. हे चारहि प्रकारचे भक्त चांगले आहेत; पण त्यांतला ज्ञानी हा मला फार आवडतो. कारण मत्स्वरूपांत येऊन मिळण्याचा दृढ निश्चय त्यानें केलेला असतो. अनेक जन्माचे शेवटीं त्याचें ज्ञान परिपक्व झालें म्हणजे, हें सर्व जग म्हणजे वासुदेवच आहे, असे ज्ञान होऊन तो मत्स्वरूप होतो. आर्त व अर्थार्थी हे सकाम-भक्त ज्या ज्या कामनेनें ज्या ज्या अन्य देवतांची पूजा करतात ती त्यांची पूजा मीच स्वीकारून त्या त्या देवतांच्या रूपानीं त्यांना त्यांचें इच्छित देतों. ज्या भक्तीच्या जोरावर माझी प्राप्ति करून घ्यावयाची, त्या भक्तीच्या जोरावर हे मतिमंद लोक नाशिवंत फल प्राप्तकरून घेतात. माझ्या अक्षय, उत्कृष्ट परमस्वरूपाला हे मूढ लोक जाणत नाहींत. विहित-कर्मनिष्ठ पुरुष दृढश्रद्धेनें माझें भजन करून मत्स्वरूपाचें सम्यक्ज्ञान करून घेतात. अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ, याचें ब्रह्मस्वरूप पूर्णपणें कळल्यानें मरणकालासारख्या आपत्प्रसंगींहि माझें स्वरूप ते जाणतात."

---

८

अर्जुन म्हणतो, "हे पुरुषोत्तम, ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव व अधियज्ञ कशाला म्हणतात? हे सर्व कोठें आहेत? आणि

मरणाचे वेळीं शांतचित्त पुरुष तुझें कसें स्मरण करतो ?"

भगवान म्हणाले, "निरतिशय अविनाशी तत्त्वाला **ब्रह्म** म्हणतात. देहामध्यें 'अहं' ह्या शब्दानें स्फुरणारें जें जीवात्मतत्त्व तें **अध्यात्म** व भूतोत्पत्तीला कारण होणारा, देवताच्या उद्देशानें तूप, भात वगैरे हविर्द्रव्यांचा जो परित्याग त्याला **कर्म** म्हणतात. कोणतीहि उत्पन्न होणारी, म्हणजे विनाशी वस्तु, उदाहरणार्थ–देह, त्या विनाशी वस्तूला **अधिभूत** म्हणतात. सर्व इंद्रियादि देहसंबंधी वस्तूंना स्वकार्य करण्याची शक्ति देणाऱ्या तत्त्वाला–पुरुषाला–**अधिदैव** म्हणतात. ह्या देहांत असलेल्या, यज्ञाभिमानी देवतेला **अधियज्ञ** म्हणतात. ह्यावरून अध्यात्मादि पंचक देहांतच असून तें ब्रह्मस्वरूप आहे, हें समजून येईल. याप्रमाणें देहासह देहांतील सर्व गोष्टी ब्रह्मस्वरूप आहेत, हें ज्यानें समजून घेतलें, त्याची 'अहं ब्रह्म' अशी वृत्ति नेहमींच असणार. म्हणजे मरणकालींहि असणार. ह्या 'अहं ब्रह्म' वृत्तींतच जो देह सोडतो, तो मत्स्वरूप होणारच. अंतकालीं देह सोडतांनीं पुरुष ज्या पदार्थाचें स्मरण करतो, त्या पदार्थाला तो जाऊन पोहोंचतो. म्हणून अर्जुना, अहोरात्र माझें स्मरण चालू ठेव, आणि युद्ध कर. तूं आपलें मन व बुद्धि मलाच अर्पण केली असल्यानें माझीच प्राप्ति तुला निःसंशय होईल. माझ्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि विषयात चित्त न ठेवणाऱ्याला व माझेंच सतत स्मरण करणाऱ्याला, मी सुलभ आहें. माझी प्राप्ति झालेल्या पुरुषाला अनित्य व दुःखाचें आगर असा पुनर्जन्म प्राप्त होण्याची भीति नाहीं. पुण्याचरणानें व तपश्चर्येनें ब्रह्मलोकापर्यंत कोणताहि लोक प्राप्त करून घेतला, तरी त्या पुरुषाला पुण्यफल संपतांच पुनर्जन्म घ्यावा लागतोच. परंतु अर्जुना, माझी ज्याला प्राप्ति झाली, त्याला मात्र पुनर्जन्म नाहीं. एक हजार युगें म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो व तेवढीच त्याची रात्र असते. ब्रह्मदेवाची रात्र झाली कीं सृष्टीचा लय होतो, व दिवस झाला कीं सृष्टीची उत्पत्ति होते. सृष्टीबरोबरच सर्व भूतमात्रांचाहि लय व उत्पत्ति, हीं होतात. असे सर्व सृष्टीसह वस्तुजाताचें जन्ममरण चालू असतां, अव्यक्त, अक्षर, असें जें माझें परम पद, त्याला पोहोंचलेला माझा भक्त फिरून ह्या संसारांत, म्हणजे जन्म-मृत्यूच्या फेऱ्यांत

सांपडत नाहीं. अर्जुना, अनन्य भक्तीनेंच माझी प्राप्ति होते. अग्नि, ज्योति, दिवस, शुक्लपक्ष व सहा महिन्यांचें उत्तरायण यांच्या अभिमानी देवता ज्या मार्गांत आहेत, त्यांत ब्रह्मोपासकानें देह सोडला असतां तो ब्रह्माला प्राप्त होतो. आणि धूम, रात्रि, कृष्णपक्ष व सहा महिन्यांचें दाक्षिणायन, यांच्या अभिमानी देवता ज्या मार्गांत आहेत त्या मार्गांत योग्यानें देह सोडला असतां तो कर्मफलाला प्राप्त होऊन कर्मफलभोग संपतांच तेथून परत फिरतो. शुक्ला व कृष्णा ह्या नांवानीं प्रसिद्ध असलेल्या दोन गति श्रुतींत सांगितल्या आहेत. हे मार्ग, व अध्यात्मादि प्रश्न समजून घेऊन व त्यांतील रहस्य जाणून जो योगी उपासना करतो तो वेदांत, यज्ञांत, तपश्चर्येंत व दानांत, जें पुण्यफल सांगितलें आहे त्याचें उल्लंघन करून ब्रह्मपदाला प्राप्त होतो."

---

## ९

भगवान म्हणाले, "अर्जुना, जें ऐकिलें असतां तूं जन्ममरणरूप संसारांतून मुक्त होशील असें अत्यंत गुह्य आत्मज्ञान अनुभवासह तुला सांगतों. तुझी माझ्या ठिकाणीं दोषदृष्टि नसल्यानें तुला तें समजेल. तें आत्मज्ञान सर्व विद्यांचा आणि गूढ गोष्टींचा राजा आहे. तें अत्यंत पवित्र व उत्तम ज्ञान असून त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतां येण्यासारखें आहे. तें धर्माला धरून असलेलें व ज्याच्यापासून मिळणारें फल, इतर पुण्यफलाप्रमाणें क्षीण होणारें नाहीं असें तें आत्मज्ञान सर्वश्रेष्ठ असून तें संपादन करण्यास फारच सुलभ आहे. अर्जुना, आत्मज्ञानावर श्रद्धा न ठेवणाऱ्यांचे जन्ममरणाचे फेरे केव्हांच चुकत नाहींत. म्हणून आतां सावधानतेनें ऐक. हें सर्व जग माझ्या अव्यक्त स्वरूपानें व्यापिलें आहे. सर्व भूतें पाण्यावरच्या फेसाप्रमाणें माझ्यामध्यें आहेत मी मात्र त्यांच्यामध्यें नाहीं. अर्जुना, सर्व कल्पना बाजूला ठेवून सूक्ष्म दृष्टीनें तूं पाहा, म्हणजे भूतेंहि माझ्यामध्यें नाहींत, कारण भूतांसह सर्व जग मीच आहें, हें तुझ्या ध्यानांत येईल. माझें स्वरूप भूतांना निर्माण करणारें आहे. भूतांमध्यें

नसतांना भूतांचें धारण-पोषण मी करितों, हें सर्व माझ्या अत्यद्‌भुत ईश्वरी मायेनें दिसतें. सर्व आकाशभर वारा नेहमीं भरून राहिलेला असतो परंतु तो हालवला तरच भासतो. तसा मी एकच एक असतांना, कल्पना मनांत येतांच भूतें निराळीं दिसूं लागतात. कल्पक्षयाच्या वेळीं सर्व भूतें माझ्या अपरा प्रकृतींत असतात. कल्पाच्या प्रारंभीं तीं माझ्या परा प्रकृतीत येतात, असें दिसतें. मी माझ्या ईश्वरी मायेनें भूतांच्या प्रारब्धाप्रमाणें त्याना पुनः पुनः जन्माला घालतों. त्याना पुनः पुनः जन्माला घालण्याचें कर्महि खरोखर मी करीत नाहीं, तर माझ्या साक्षीनें तें होतें. जसे सूर्याच्या प्रकाशात म्हणजे सूर्याच्या साक्षीनें जगाचे सर्व व्यापार चालतात, तरी त्या व्यापाराची सूर्याला दादहि नसते, त्याप्रमाणें माझ्या साक्षीनें जन्माला येणाऱ्या भूतांचीं कर्में मला चिकटत नाहींत. माझ्या अव्यक्त स्वरूपासंबंधीं यथातथ्य गोष्टी मी सागत असताना, मनुष्याचा देह धारण केलेल्या माझी, अविवेकी लोक तुच्छतेनें अवहेलना करितात, व त्या सत्य गोष्टीकडे लक्ष्यच देत नाहींत. म्हणून राक्षसी व आसुरी प्रकृतींच्या तडाख्यांत ते लोक सांपडतात, आणि त्याच्या सर्व आशा, त्यांचीं सर्व कर्में व त्यांचें ज्ञान, हीं सर्व निष्फल होतात. दैवी प्रकृतीचा आश्रय केलेले साधू, महात्मे मी एकटाच चराचरभूत सृष्टीच्या रूपानें नटलो आहें असें जाणून मद्रूप होतात, आणि जितेंद्रिय आणि दृढव्रत होऊन अनन्य चित्तानें सतत माझें वंदन, भजन, कीर्तन व पूजन ते करितात. दुसरे कित्येक ज्ञानी मी एकच एक परब्रह्म असें जाणून परब्रह्माची उपासना करितात. कित्येक सूर्य-चंद्रादि भेदानें माझी उपासना करितात, तर कित्येक विश्वरूपाचीच अनेक प्रकारांनीं उपासना करितात. मला जाणून मग कोणत्याहि प्रकारें उपासना केली तरी ती मलाच पोहोंचते. कारण, जगांतील यच्चयावत् गोष्ट मत्स्वरूप आहे. वेदोक्त कर्म, स्मार्त कर्म, पितरांना दिलेलें अन्न, सर्व औषधि, मंत्र, हविर्द्रव्यें, अग्नि, हवनकर्म, जगताची जननी, जनक, जनकाचा जनक, प्राण्यांना कर्मफल देणारा, प्रणव, ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, कर्माचें फल, पोषण करणारा, सर्वांचा स्वामी, प्राण्यांनीं केलेलें वा न केलेलें

पुण्यपापादि पाहाणारा, सर्व प्राण्यांचें निवासस्थान, शरणागतांची पीडा नाहींशी करणारा, सुहृत्, जगाची उत्पत्ति, स्थिति, लय करणारा, सर्व कर्मफलांचा निधि व जगाचें अक्षय बीज मीच आहें. सूर्यरूपानें शोषण करणारा, इंद्ररूपानें पाऊस पाडणारा, देवांचें अमृत, मर्त्यांचा मृत्यु अर्जुना, फार काय, दृश्य, अदृश्य, सर्व नामरूपवान् पदार्थ मीच आहें. तीन वेदाचें अध्ययन करून त्यात सांगितलेल्या कर्मांनीं यज्ञ करून, सोमपान करून निष्पाप झालेले इंद्रलोकास जातात व तेथे दिव्य भोग भोगतात. पण विषयांच्या इच्छेनें वैदिक कर्ममार्गास अनुसरणारे हे सर्व कर्मी, पुण्य क्षीण होताच मर्त्य लोकात पुनः प्रवेश करतात. अशी त्यांची जा-ये होते. पण मद्रूप होऊन माझें सतत ध्यान करणाऱ्या व उपासना करणाऱ्या विरक्त ज्ञान्यांना अप्राप्त असलेली वस्तु (आत्मज्ञान) मिळवून देण्याची व तिचें सतत रक्षण करण्याची काळजी मी वाहतों. दुसऱ्या देवताचे भक्तहि श्रद्धेने त्या देवतांची पूजा करून अज्ञानानें वस्तुतः माझीच पूजा करतात. कारण सर्व यज्ञाचा भोक्ता व स्वामी मीच आहें. पण हें तत्त्व त्याना न समजल्यानें अज्ञानानें तें मुख्य फलाला मुकतात. देवाची पूजा करणाऱ्यांना त्या देवांची प्राप्ति होते, पितृभक्ताना पितृलोक मिळतो. विनायक, मातृगण, इत्यादींचे भक्त त्या गणलोकाला जातात, आणि माझी पूजा करणारे मला प्राप्त होतात. माझें आराधन करणेंहि इतर देवतांच्या आराधनेपेक्षा सोपे आहे. माझ्या आराधनेत फक्त ज्ञानयुक्त भक्ति असली म्हणजे झालें. या भक्तीनें पान, फूल, पाणी यासारखें मला कांहींहि अर्पण केलें तरी मी त्याचा स्वीकार करतों, व त्या भक्ताला परम फल देतों. म्हणून अर्जुना, तूं जें करशील, खाशील, हवन करशील, दान देशील, तपाचरण करशील, तें सर्व भक्तियुक्त अंतःकरणानें मला अर्पण कर. असें तूं करीत राहिलास म्हणजे चागलीं-वाईट फळें देणाऱ्या कर्मांचें बंधन तुला लागणार नाहीं, व संन्यासयोगाचें रहस्य तुला कळून तूं ज्ञानसंपन्न होशील, आणि तुला मोक्ष मिळेल-म्हणजे तुला माझी प्राप्ति होईल. अर्जुना, सर्व भूतांच्या ठिकाणीं माझी दृष्टि सारखीच आहे. माझे कोणी शत्रूहि नाहींत, मला कोणी प्रियहि नाहींत. माझी जे कोणी

अनन्य भावानें ज्ञानपूर्वक भक्ति करतात ते त्यांच्या भक्तियुक्त अंतःकरणामुळें नेहमीं माझ्याशींच समरस झालेले असतात व मीहि स्वाभाविकच त्यांच्याजवळ असतों. एखादा मनुष्य प्रथम अत्यंत दुराचरणी असला, पण पुढें जर तो माझी मीं सांगितल्याप्रमाणें भक्ति करूं लागला तर तो सदाचरणसंपन्न झाला, असें खुशाल समजावें. कारण त्या माझ्या भक्तीनें त्याला नित्य टिकणारें समाधान मिळेल. माझा भक्त केव्हांहि नाश पावणार नाहीं. हें तर मी निश्चयानें सांगतोंच आहें, पण अर्जुना, आतां तुझ्याहि सर्व शंका-कुशंका साफ नाहींशा झाल्यामुळें आता तूंहि 'भगवत्-भक्ता'चा नाश केव्हांहि होणार नाहीं अशी प्रतिज्ञापूर्वक घोषणा कर. पापाचें फल म्हणून हीन व अज्ञयोनीला प्राप्त झालेल्या स्त्रिया, वैश्य, शूद्र यांसारखे अज्ञहि माझा आश्रय केल्यानें माझे ज्ञानसंपन्न असे भक्त होऊन उत्तम गतीला जातात. मग पुण्ययोनींत जन्मलेले ब्राह्मण व क्षत्रिय, श्रेष्ठ असे राजर्षी ह्यांना ती उत्तम गति मिळेल हें काय सांगायला पाहिजे ? अर्जुना, ह्या क्षणभंगुर व सुखरहित अशा मृत्युलोकांत पण पुरुषार्थांचें साधन अशा मनुष्यदेहांत तूं जन्माला आला आहेस. तर आतां एका क्षणाचाहि विलंब न करितां माझी भक्ति करायला लाग. माझ्या ठिकाणींच ज्याचें मन आहे, असा माझा भक्त तूं हो. माझेंच पूजन करण्याचें ज्याचें शील आहे, असा होऊन मला नमस्कार कर, व माझी प्राप्ति हेंच एक ध्येय डोळ्यापुढें ठेवून माझ्या ठिकाणीं चित्त स्थिर कर, कीं सर्व भूतांचा आत्मा असा जो मी त्या मला तूं येऊन पोंचशील."

---

## १०

भगवान म्हणाले, "अर्जुना, तुझें कल्याण होईल असें आणखी कांहीं मी तुला सांगणार आहें. मी सर्व देवांचें व महर्षींचें आदिकारण असल्यामुळें माझी शक्ति त्यांपैकीं कोणीच जाणत नाहीं. सर्व लोकांचा महान् ईश्वर असा जो मी, त्याला जो जाणील तो सर्व पापापासून मुक्त होईल. बुद्धि, ज्ञान, विवेकी प्रवृत्ति, क्षमा, सत्य, दम, शम, सुख, दुःख, उद्भव,

नाश, भय, अभय, अहिंसा, संतोष, तप, दान, कीर्ति, अकीर्ति, असे प्राण्यासंबंधीं नानाप्रकारचे भाव माझ्यापासून होतात. ज्याच्यापासून सर्व प्रजा निर्माण झाल्या ते सात महर्षी, व चार मनु, मीं मनानें उत्पन्न केले. ह्या माझ्या विभूती व माझी विश्वरचना जो जाणतो, तो स्थिरचित्त होतो. ह्या सर्व जगाची उत्पत्ति माझ्यापासून झाली आहे असें जाणून, जे तत्त्ववेत्ते आपलें चित्त सर्वस्वीं माझ्या ठिकाणीं लावतात, बोलायचे झालें तरी आपापसात माझ्यासंबंधींच जे चर्चा करतात, असें सतत माझेंच भजन करीत असणाऱ्याना मी ज्ञानयोग देतों. त्याच्या योगानें त्यांना माझी प्राप्ति होते. त्याच्या अंतःकरणांत मी वास्तव्य करून बुद्धि-रूप ज्ञानदीपानें त्याचा अज्ञानांधकार नाहींसा करतों.

अर्जुन म्हणतो, "तूं परम तेजस्वी, परम पवित्र, शाश्वत, दिव्य, अज, सर्वांचा आदि, सर्वांचा स्वामी, असा परमात्मा आहेस, असें तूं सागत आहेस. त्याप्रमाणेंच सर्व ऋषी, देवर्षि नारद, असित देवल, व्यासहि सागतात. केशवा, मला हे सर्व खरें वाटतें. देव-दानवहि तुझ्या निरुपाधिक स्वरूपाला जाणत नाहीत. आपलें ज्ञानैश्वर्यसंपन्न असें निरुपाधिक स्वरूप तुझें तूंच जाणण्यास समर्थ आहेस. म्हणून ज्या आपल्या दिव्य विभूतींनीं तूं जगांत दृग्गोचर होऊं शकतोस अशा तुझ्या सर्व विभूती तूंच साग. कोणत्या ठिकाणीं तुझें दर्शन मला होईल ते विस्ताराने मला सांग. म्हणजे तें रूप चिंतनाला उपयोगी होईल."

भगवान म्हणाले, "अर्जुना, तुझ्या म्हणण्याप्रमाणें मी तुला माझ्या मुख्य मुख्य विभूती सागतों. श्रवण कर. सर्व प्राण्याच्या हृदयांतील **आत्मा** मी आहे. सर्व प्राण्यांचें कारण स्थिति व प्रलय मीच आहें. बारा आदित्यांतील **विष्णु** मी. ज्योतींत **सूर्य**, मी मरुत् नावाच्या देवातील **मरीचि** मी, नक्षत्रांमध्यें **चंद्र** मी, वेदांमध्यें **सामवेद**, देवांमध्यें **इन्द्र**, सर्वेंद्रियांतील **मन**, व प्राण्यांतलें **चैतन्य**, मी आहें. अकरा रुद्रातील **शंकर**, यक्ष–राक्षसांत **कुबेर**, आठ वसूंपैकीं पावक म्हणजे **अग्नि**, शिखरयुक्त पर्वतांत **मेरु**, पुरोहितांत **बृहस्पति**, सेनापतींत **स्कन्द** व सरो-वरांत **सागर** मी आहें. महर्षींमध्यें **भृगु**, वाणीमध्यें ॐ हें अक्षर,

यज्ञांत **जपयज्ञ** व स्थावर पदार्थांत **हिमालय**, मी आहें. सर्व वृक्षात **पिंपळ**, देवर्षींत **नारद**, गन्धर्वांत **चित्ररथ**, आणि सिद्धामध्यें **कपिल-मुनि**, मी आहें. सर्व अश्वांमध्यें समुद्रमंथनांतून निघालेला **उच्चैःश्रवा**, गजेंद्रांत **ऐरावत** व मनुष्याच्यामध्यें **राजा**, मी आहें. सर्व आयुधांत **वज्र**, गाईंत **कामधेनु**, प्रजोत्पादनांचें कारण जो **मदन** व सर्पांत **वासुकी**, मी आहें. नागांमध्यें **अनंत**, जलदेवतांत **वरुण**, पितरांत **अर्यमा** व संयमन करणारांत **यम**, मी आहें. दैत्यांत **प्रल्हाद**, गणना करणारांतील **काल**, पशूंत **सिंह**, व पक्ष्यांत **गरूड**, मी आहें. पावन करणारांत **वायु**, शस्त्र धारण करणारांत दाशरथि **राम**, जलचरात **मकर** व वाहणाऱ्या प्रवाहांत **गंगा** मी आहे. सृष्टीची **उत्पत्ति**, **स्थिति**, **लय**, सर्व विद्यात **अध्यात्मविद्या** व वितंडांत **वाद** मी आहें. अक्षरांत **अ** हें अक्षर, समासात **द्वंद्व**, अक्षय असा काल व सर्व जगाच्या कर्मांचें फल देणारा **धाता**, मी आहे. सर्वांच्या प्राणाचें हरण करणारा **मृत्यू**, पुढील अभ्युदयाचा **हेतु**, आणि **कीर्ति**, **श्री**, **वाक्**, **स्मृति**, **मेधा**, **धृति** व **क्षमा** अशा स्त्रियांतील उत्तम अशा ह्या देवता, मी आहें. सामात **बृहत्साम**, छंदांत **गायत्रीछंद**, महिन्यांत **मार्गशीर्ष** महिना व ऋतूंत **वसंत ऋतु**, मी आहें. फशी पाडणाऱ्यांत **द्यूत**, तेजस्वी लोकांतील **तेज**, विजयी लोकांतील **जय** व सात्त्विक लोकातील **सत्त्व** मी आहें. सर्व वृष्णींमध्यें **वासुदेव**, पांडवांमध्यें **अर्जुन**, मुनींमध्यें **व्यास** व सर्वज्ञ विद्वानात **शुक्राचार्य**, मी आहें. दमन करणारांतील **दंड**, जयाची इच्छा करणारांत **नीति**, सर्व गुह्यांत **मौन** व ज्ञानवानांतील **ज्ञान** मी आहें. अर्जुना, सर्व चराचर भूतांचें बीज, मी आहें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे मी ज्यांत नाहीं असें ह्या जगांत कांहींच नाहीं. माझ्या विभूतींना अंत नाहीं. संक्षेपानें ह्या मुख्य मुख्य विभूती तुला मी सांगितल्या. अर्जुना, ज्या ठिकाणीं ऐश्वर्य, कांति, बल व दया ह्यांचें एकत्र वास्तव्य दिसेल, ती माझी विभूति आहे, असें समज. पण अर्जुना, हें सर्व जरी तूं जाणलेंस तरी तुला त्यांत काय लाभ होणार ? हें सर्व जगत् मी माझ्या एका अंशानें धारण केलें आहे."

११

येथपर्यंत श्रीमद्भगवद्गीतेंतील अठरा अध्यायांपैकीं पहिल्या दहा अध्यायांत प्रतिपादन केलेला विषय वाचकापुढें साररूपानें ठेविला आहे. दहाव्या अध्यायांत भगवंतानीं अर्जुनानें विचारल्यावरून आपल्या मुख्य विभूती सांगितल्या व जगांतील प्रत्येक गोष्ट म्हणजे मीच आहें, थोडक्यांत हें सर्व विश्व म्हणजे मीच आहें, असें सांगितलें. भगवंतानीं जगाचें शब्दचित्र अर्जुनापुढें ठेविलें. त्याबरोबर सर्व विश्वरूपी परमेश्वर डोळे भरून प्रत्यक्ष पाहावा अशी अर्जुनाला इच्छा झाली. अर्जुनाचें कोडकौतुक पुरविणाऱ्या भगवंतानें त्याला लगेच दिव्यदृष्टि दिली व आपलें विश्वरूप एकदम त्याच्यापुढें उभें केलें. त्या विश्वरूपांत जन्म–मरणाची भयंकर घडामोड चाललेली पाहून अर्जुन गोंधळला. प्रत्येक प्राणी भगवंताच्या कराल दाढांखालीं चूर्ण होण्याकरता जोराने धांवत सुटला आहे, हे पाहून तो भयचकित झाला. अगणित प्राण्यांचीं तीं सुंदर, कुरुप, मोहक, भयंकर, सौम्य, अक्राळविक्राळ अशीं रूपें, परमेश्वराच्या त्या कालस्वरूपी कराल दाढाखालीं सारखींच चिरडलीं जात आहेत, हें पाहून तो घाबरला. भीष्म–द्रोणासारखे महान् वीर, पण त्यांची त्या दाढांना काय पर्वा आहे ? दैत्य–दानव मोठे भयंकर, पण त्यांची त्या दाढांना महती वाटत नाहीं. दाढेखालीं सापडले कीं गेले. देव, ऋषी, महर्षी, देवर्षी, कांहीं वेळ थांबल्यासारखे दिसत आहेत, पण त्याचीं आसनें डळमळायला लागलीं असून तेहि कालमुखांत पडण्याच्या बेतांत आहेत, असें पाहून तर अर्जुनाच्या तोंडचें पाणी पळालें. कालमुखांत पडणारा तो प्राण्याचा अखंड प्रवाह पाहून अर्जुनाचें धैर्य सुटलें. मी मारणारा, मी मोठा पराक्रमी, मी भगवंताचा लाडका, असा त्याचा सर्व प्रकारचा अभिमान गळाला. देहाहंकार तर कोठल्या कोठें नाहींसा झाला. भक्ताला विश्वरूप दाखविण्याचा भगवंताचा उद्देश सफल झाला. अर्जुनहि तें संहारक रूप पाहून उबगला. तें भयंकर रूप त्याला पाहावेना. तें रूप दृष्टीस पडूं नये म्हणून त्यानें डोळे मिटले. तरी तें दृष्टीपुढून जाईना. त्यानें त्या रूपाकडे पाठ फिरविली, तरी तें त्याच्या समोरून दूर होईना. जिकडे

पाहावें तिकडे तें भयंकर संहारक रूप ! विश्वाचें सत्यस्वरूप त्याला कळलें. ह्या विश्वाच्या जन्म-मरणरूप संहारक स्वरूपांतून बाहेर पडणें हाच खरा मोक्ष, हें त्याला पटलें. त्याकरितां त्या विश्वरूप धारण करणाऱ्याला अनन्य शरण होऊन त्याची करुणा भाकणें, हा उपायहि त्याला कळला. त्यानें हात जोडले. तो सद्गदित झाला. त्यानें भगवंताची स्तुति आरंभली. त्यानें भगवंताला पुनः पुनः नमस्कार केले. अर्जुनाचें अंतःकरण मोहरहित, निर्मळ झालेले पाहून व त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु चाललेले पाहून भगवंतानें त्याला धीर दिला. आपल्या विश्वरूपाचे रहस्य नेहमीं मनात वागविण्याबद्दल अर्जुनाला बजावून त्यांनीं तें त्याच्या दृष्टीपुढून काढून घेतलें. तो मनमोहन शामसुंदर गोविंद आपल्या रथावर घोड्याचे लगाम हातात धरून आपल्याकडे हंसत हंसत पाहात आपल्याशीं बोलत आहे, असें पाहून अर्जुनाला आनंद झाला. भगवान त्याला म्हणाले, " अर्जुना, विश्वरूपाचें रहस्य समजलें ना ? आतां ह्यापुढें कोठेंहि ममत्व न ठेवता माझी प्राप्ति हें ध्येय पुढें ठेवून, माझ्यासाठीं कर्म करणारा माझा भक्त हो. " अशी ही अज्ञाननाशक विश्वरूपदर्शनाची थोडक्यात हकिगत आहे.

---

## १२

अर्जुन म्हणतो, " देवा कृष्णा, अव्यक्त ब्रह्माची उपासना करणारे ज्ञानी भक्त तुला प्राप्त होतात, असें मागें तूं सांगितलेस. आतां ह्या विश्वरूपदर्शनानंतर तुझ्या ह्या सगुण मूर्तीची उपासना करून तुझा भक्त मी व्हावे असा तुझा आशय दिसतो. तेव्हां आतां मला सांग, निर्गुणाची उपासना आणि सगुण भक्ति ह्यांत तुला अधिक मान्य कोणती ? "

भगवान म्हणतात, " माझ्या सगुण रूपांत मन स्थिर करून सतत श्रद्धेनें माझी भक्ति करणारा भक्त मला संमत आहे. सगुण उपासना करणारा उत्तम असें मी म्हणतों, याचा अर्थ मद्रूप झालेल्या ज्ञान्यांना मी कमी लेखतों, असा करूं नकोस. इंद्रियनिग्रह करून व सर्व प्राण्याच्या

हितांत निमग्न राहून, इंद्रियांचा विषय न होणाऱ्या सर्वव्यापक, निर्विकार, नित्य अशा निगुर्णब्रह्माची उपासना करणारे ज्ञानी मलाच प्राप्त होतात. त्याच्याशीं कोणाची तुलना करणें योग्य नाहीं. निर्गुण उपासनेंत सगुणोपासनेपेक्षा अधिक कष्ट आहेत. देहाभिमानी लोकांच्या दृष्टीनें निर्गुणोपासकापेक्षां सगुणोपासक चागले असें मीं म्हटलें. अर्जुना, सर्व कर्में मला अर्पण करुन अनन्यचित्ताने माझ्या सगुणरूपाचे जे नित्य ध्यान करतात, त्याना मी जन्ममरणरूप संसारसागरातून लवकर वर काढतों. म्हणून अर्जुना, तूं आपलें मन व बुद्धि तूं पाहिलेल्या माझ्या सगुणरूपात स्थिर कर, कीं ह्या देहपातानंतर तूं मला खासच येऊन मिळशील. माझ्या ठिकाणीं तुला आपलें चित्त स्थिर करता येत नसेल, तर पूर्वीं तुला सांगितलेल्या ध्यानयोगाचा अभ्यास करून तें स्थिर कर. ध्यानयोगाचाहि अभ्यास करण्यास तूं समर्थ नसशील तर सर्व कर्में केवळ माझ्यासाठींच करणारा असा तूं हो. माझ्यासाठींच कर्में केल्यानेंहि चित्तशुद्धिद्वारा ध्यानयोग सिद्ध होतो. तुला केवळ माझ्यासाठींच कर्में करण्याचेंहि जमत नसेल, तर निदान जीं जीं कर्में तुझ्या हातून होतील, तीं तीं मला अर्पण कर, आणि चित्ताचा निग्रह करुन सर्व कर्मफलाचा त्याग कर. अर्जुना, ज्ञानानें कल्याण होतें. पण ज्ञानापेक्षां ज्ञानयुक्त ध्यान अधिक कल्याणकारण आहे. आणि ज्ञान–ध्यानयुक्त कर्मफलत्याग तर सर्वात चागला आहे. कारण, त्यानंतर लगेच शाति मिळते. म्हणजे जन्ममरण चुकते. अर्जुना, आतां माझ्या भक्तानें कसें असावें, असे मला वाटतें तें सागतों. माझ्या भक्तानें कोणाचाहि द्वेष न करतां सर्वांशीं मित्रत्वानें राहावें. त्यानें कोठेंहि ममत्व बुद्धि ठेवूं नये. त्याने देहाभिमानहि टाकावा. त्यानें सुखःदुखाला सारखेंच मानून नित्य क्षमावान् असावें. जे मिळेल त्यांत सतुष्ट राहून इंद्रियनिग्रहाच्या योगानें व माझ्यावरील दृढ श्रद्धेनें आपलें मन नेहमीं शांत ठेवावें. त्याच्या कोणत्याहि कृत्यामुळें लोकांत क्षोभ उत्पन्न होऊं नये. लोकांच्या कोणत्याहि कृत्यानें त्यानें आपलें चित्तांत क्षोभ उत्पन्न होऊं देऊं नये. हर्ष, क्रोध, भय, क्षोभ यांपासून त्यानें दूर असावें. त्यानें निरिच्छ, अंतर्बाह्य पवित्र, कर्तव्यांत दक्ष, उदासीन व

निर्भय राहून सर्व सकाम कर्मांचा त्याग करावा. स्वतःला इच्छा नसतां अथवा परेच्छेनें एखादी इष्ट वस्तु प्राप्त झाली तर त्यानें हर्ष मानूं नये. तशीच अनिष्ट वस्तु प्राप्त झाली तर तिचा द्वेषाहि करूं नये. दोन्ही वेळीं त्यानें उदासीन राहावें. महान् अनर्थ त्यावर ओढवला तर त्यानें दुःखाश्रु काढून शोक करूं नये, अथवा तो अनर्थ परमेश्वरानें नाहींसा करावा अशी इच्छाहि करूं नये. प्रारब्धानें प्राप्त झालेलें तें संकट फलभोगक्षयानंतर आपोआप नाहींसें होईल असें समजून तें सहन करावें. त्यानें शुभाशुभ कर्मांचा त्याग करावा. शत्रु व मित्र या दोघांच्याहि ठिकाणीं त्यानें सारखी वृत्ति ठेवावी. त्यानें मान, अपमान, शीत, उष्ण, सुखदुःख या सर्व प्रसंगीं समभावना ठेवावी. निंदा-स्तुति त्यानें शांत चित्तानें ऐकावी. आपल्या वाणीचें त्याने नियमन करावें. त्यानें मिळेल तेवढ्यावर संतोषाने उपजीविका करावी. त्यानें कायमचे राहाण्याचे ठिकाण कोठेंच करूं नये. परमार्थवस्तूसंबंधीं त्यानें आपली बुद्धि स्थिर ठेवावी. अर्जुना, असा भक्तिमान् पुरुष मला प्रिय आहे. अशा प्रकारचें धर्म्यं असें मोक्षसाधन, एकनिष्ठेनें जे माझे भक्त करतात, ते मला फार आवडतात.”

---

## १३

भगवान म्हणतात, “अर्जुना, मी आतां तुला प्रकृति-पुरुषासंबंधीचा विवेक सांगतों. ह्या शरीराला क्षेत्र म्हणतात. कारण त्यांत कर्मफलाची निष्पत्ति होते. आणि ह्या क्षेत्राला जाणणारा तो क्षेत्रज्ञ. अनेक शरीरें म्हणजे क्षेत्रें असलीं तरी त्यात एकच क्षेत्रज्ञ आहे व तो मी आहें. क्षेत्र-क्षेत्रज्ञांचें हें जें ज्ञान, तें यथार्थज्ञान होय. क्षेत्र कोणत्या विकारांनीं वगैरे बनतें ? क्षेत्रज्ञाचें सामर्थ्य काय आहे ? वगैरेसंबंधीं ऋषींनीं नानाप्रकारांनीं सांगितलें आहे. त्यांच्यासंबंधीं वेदांमध्यें विचार झाला आहे, व ब्रह्मसूत्रपदांनीं युक्तीनें त्यांना दाखविलें आहे. त्यांच्यासंबंधीं मी तुला संक्षेपानें सांगतों. पंचमहाभूतांचीं सूक्ष्म रूपें, अहंकार, बुद्धि, अव्यक्त, पंच

ज्ञानेंद्रियें, पंच कर्मेंद्रियें, एक मन, पंचविषय, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात म्हणजे शरीरेंद्रियाचा संयोग, चेतना म्हणजे चिदाभासयुक्त अंतःकरणवृत्ति, धृति, हें क्षेत्र होय. आता ज्ञान समजण्याकरितां मी साधनें सांगतों. स्वतःची स्तुति न करणें, धार्मिकपणाचें ढोंग न करणें, प्राण्यांना पीडा न देणें, दुसऱ्याने अपराध केला तरी क्रोध येऊं न देणें, अंतःकरणाचा सरळपणा, गुरुजनाची सेवा, अंतर्बाह्य पवित्र राहाणें म्हणजे देहाचे मलं जलादिकानीं, व अंतःकरणाचे मल वैराग्यादिकानीं घालविणें, बुद्धि स्थिर ठेवणें, शरीरेंद्रियाचा दमशमानीं निग्रह करणें, सर्वप्रकारच्या विषयोपभोगांविषयीं वैराग्य, जन्म, मरण, म्हातारपण, रोग यातील दुःख व दोषाचें चिंतन करणें, विषयात आसक्त न होणें, पुत्र-स्त्री-गृह यांसंबंधीं आसक्ति न धरणें, इष्टानिष्ट स्थितींत शांत चित्ताने राहाणें, मज वासुदेवाचे ठिकाणीं अनन्य भक्ति ठेवणे, एकान्त पवित्र देशांत राहाणें, अज्ञजनाची संगत न करणें, आत्मा व अनात्मा यांच्यासंबंधीं नेहमीं विवेक करणे, तत्त्वज्ञानाचें फल जो मोक्ष, त्याचा योग्य अर्थ जाणणें, हीं सर्व ज्ञानाचीं साधनें आहेत. हीं आचरणांत आणलीं असता जें फल मिळतें तें ज्ञान. ह्या सर्व गोष्टींच्या उलट तें अज्ञान. आता जे जाणायचें तें सागतों. तें जाणल्यानें अमृत म्हणजे मोक्ष मिळतो. अनादि व सतासताहून विलक्षण असें जे ब्रह्म तें ज्ञेय होय. विश्वामध्यें असलेल्या सर्व देहांचे हात, पाय, डोळे, मस्तक, मुखें, कान वगैरे सर्व कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें हीं ह्या ब्रह्माचींच आहेत. कारण त्याच्या चेतनशक्तीमुळें सर्व इंद्रियें आपापले व्यापार करूं शकतात. इंद्रियाच्या चलनवलनादि व्यापारांवरून चेतनशक्ति असलेल्या ब्रह्माच्या अस्तित्वाचा बोध होतो. ब्रह्माला स्वतःला इंद्रियें, अवयव वगैरे कांहींच नसूनहि तें सर्व विश्वाचें अधिष्ठान झालें आहे. हें त्रिगुणरहित असूनहि त्यांच्या सुखदुःखादि कार्याचा उपभोग घेणारें आहे. तें चराचर वस्तूंच्या अंतर्बाह्य भरून राहिलें असतांनाहि त्याचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं. अज्ञ दृष्टीनें तें फार दूर आहे तर ज्ञानदृष्टीनें तें अगदीं जवळ म्हणजे सर्वांच्या हृदयांत आहे. तें ब्रह्म सर्वठिकाणीं एकच भरलेलें असतांना निरनिराळया पदार्थांमुळें भिन्न भिन्न असल्यासारखें दिसत आहे.

खरोखर सर्व पदार्थांची उत्पत्ति, स्थिति, लय, करणारे तेच आहे. सूर्य-चंद्रादि सर्व तेजाचेहि प्रकाशक ज्ञान तेच आहे. त्या ज्ञानाला अज्ञानाचा संपर्कहि लागत नाहीं. ज्ञान, ज्ञेय, व ज्ञानगम्य असे हे ब्रह्मतत्त्व सर्वत्र भरलेले असले तरी त्याचा अनुभव विशेषतः बुद्धीत येतो. ह्याप्रमाणे क्षेत्र, ज्ञानसाधने व ज्ञेय ब्रह्म यासबंधीं संक्षेपानें सांगितलें. हें सर्व जाणल्यानें माझ्या भक्ताला माझी प्राप्ति होते. क्षेत्र म्हणजे प्रकृति, व क्षेत्रज्ञ म्हणजे पुरुष हे दोन्हीहि अनादि आहेत. बुद्धि, इंद्रियें, देह, इत्यादि विकार व सत्त्व, रज, तम, हे गुण प्रकृतीपासून झाले आहेत. कार्य, कारण, कर्तृत्व ही प्रकृतीमुळे होतात. सुखदुःखादि भोगाला पुरुष कारण आहे. प्रकृतीच्या अधीन झाल्यामुळे पुरुषाला गुणभोग भोगावे लागतात. ह्या प्रकृतीच्या संगामुळे पुरुषाला बरे-वाईट जन्म घ्यावे लागतात. प्रकृतीचे व्यापार जवळ उभा राहून पाहाणारा, त्याना अनुमोदन देणारा, त्याच्यापासून उत्पन्न होणारे सुखोपभोग भोगणारा, सर्व ईश्वराचा ईश्वर, असा जो देहांत असणारा आत्मा त्यालाच परपुरुष असे म्हणतात. याप्रमाणे पुरुषाला व गुणासह प्रकृतीला जो जाणतो, तो मुक्त होतो. ध्यानयोग, ज्ञानयोग, अथवा कर्मयोग साधून निरनिराळे योगी ह्या आत्म्याला जाणतात. वरील कोणत्याच योगाचा अवलंब न करतां कित्येक लोक, ब्रह्मनिष्ठ आचार्यांपासून आत्म्याचे नुसते श्रवण करून त्याच्या उपदेशावर पूर्ण श्रद्धा ठेवून आत्म्याचे चिंतन करून उपासना करतात व मृत्युयुक्त संसारातून तरून जातात. अर्जुना, हे सर्व चराचर पदार्थ, क्षेत्र-क्षेत्रज्ञाच्या संयोगापासून झाले आहेत असे जाण. विनाश पावणाऱ्या सर्व सृष्टींत असलेल्या अविनाशी परमात्म्याला जो ओळखतो तोच ज्ञानी. सर्व भूतामध्ये एकरूपानें असलेल्या ईश्वराला म्हणजे आत्म्याला जो जाणतो तो आत्मघातकी होत नाहीं. तो परम गतीला जातो. सर्व कर्मे प्रकृतीकडूनच होतात. आत्मा अकर्ता आहे, हें जो जाणतो तोच ज्ञानी. जगातील निरनिराळीं दिसणारीं सर्व भूतें एकाच आत्म्याच्या अधिष्ठानावर आहेत, हे शास्त्र व आचार्य ह्यांच्या उपदेशानुसार ज्याच्या अनुभवाला येते तो साधक स्वतः ब्रह्मच होतो. हा परमात्मा अनादि, निर्गुण व अक्षय,

असल्यामुळें शरीरांत राहूनहि तो अकर्ताच असतो, आणि त्याला कर्माचे बधन लागत नाहीं. ज्याप्रमाणे सर्वव्यापी आकाशाला त्याच्या सूक्ष्मत्वामुळे कोणत्याहि पदार्थाचा लेप लागत नाहीं, त्याप्रमाणे देहात सर्वत्र असलेला आत्मा देहधर्मांनीं लिप्त हात नाहीं. ज्याप्रमाणे एक सूर्य सर्व जगाला प्रकाशित करतो, त्याप्रमाणे क्षेत्रज्ञ आत्मा सर्व क्षेत्राला प्रकाशित करतो. याप्रमाणे क्षेत्र व क्षेत्रज्ञ यातील भेद, व त्यायोगे भूते व प्रकृति याचा वास्तविक अभाव, ज्ञानदृष्टीने जे जाणतात, ते परमात्मस्वरूप होतात."

---

## १४

भगवान् म्हणाले, "अर्जुना, पुनरपि मी तुला सर्व ज्ञानातले उत्तम ज्ञान सागतो. ते जाणूनच सर्व मुनि ह्या शरीराच्या नाशानंतर सर्वोत्तम गतीला प्राप्त झाले आहेत. या ज्ञानाचा आश्रय केल्याने माझ्या स्वरूपास प्राप्त झालेले ज्ञानी, सृष्टीच्या उत्पत्ति-विनाशकालींहि उत्पत्ति-विनाश पावत नाहींत. माझी प्रकृति ही सर्व भूतांचे कारण आहे. पण ती आपल्या कार्याला म्हणजे सर्व भूताना व्यापून टाकण्याइतकी मोठी असल्यामुळे तिलाच महत् ब्रह्म असे म्हणतात. या महत् ब्रह्मात मी सर्व भूताच्या जन्माचे बीज स्थापन करतो, व त्यापासून सर्व भूताची उत्पत्ति होते. देवमानवादि सर्व योनींमध्ये जीं शरीरें निर्माण होतात, त्याचे उत्पत्ति-स्थान महत् ब्रह्म म्हणजे माझी प्रकृति आहे, व प्रकृतीत उत्पत्तिकारक बीज स्थापन करणारा जनक मी आहे. माझ्या प्रकृतीपासून सत्त्व, रज, आणि तम, ह्या तीन गुणाची उत्पत्ति होते व हे तीन गुण देहातील अव्यय आत्म्याला जणूं काय बद्ध करतात. सत्त्व हा गुण स्वच्छ असल्या-मुळे, तो प्रकाशक व उपद्रव न देणारा आहे. तो आत्म्यामध्ये सुखाची, ज्ञानाची लालसा निर्माण करून त्याला बद्ध करतो. अर्जुना, विषयवासना व विषयासक्ति उत्पन्न करणारा रजोगुण प्रेमरूप आहे असे समज. तो अकर्त्या आत्म्यामध्ये 'मी करतों' अशी भावना उत्पन्न करून त्याला बद्ध करतो, म्हणजे त्याला कर्मासक्त करतो. अज्ञानकार्य असा तमोगुण सर्व

देहवानांना मोह पाडून प्रमाद, आलस्य, निद्रा, यांच्या योगानें त्यांना बद्ध करतो. अर्जुना, सत्त्वगुण प्राण्याला सुखांत व ज्ञानात आसक्त करतो, रजोगुण कर्मामध्ये त्याची आसक्ति वाढवितो, व तमोगुण ज्ञानाला आच्छादित करून प्राण्यामध्यें अनवधान उत्पन्न करतो. प्रत्येक प्राण्यामध्यें ह्या तीनहि गुणांचे अस्तित्व असतें. मग हे गुण वर सांगितलेलीं आपापलीं कार्यें करतात तरी केव्हा, असें विचारशील, तर दुसऱ्या दोन गुणाचा पराभव करून प्रत्येकजण जेव्हां वाढतो तेव्हां वृद्धिंगत झालेला तो आपलें कार्य करतो, असे समज. ज्या वेळीं श्रोत्रादि ज्ञानसाधनांनीं ह्या देहांत ज्ञानाचा प्रकाश उत्पन्न होतो, तेव्हा सत्त्वगुणाची वृद्धि झाली आहे असें समजावें. रजोगुण वाढला असतां लोभ, प्रवृत्ति, कर्माचा आरंभ, अशांति, व इच्छा याची उत्पत्ति होते. आणि तमोगुणाची वाढ झाली असता अज्ञान, प्रवृत्तीचा अभाव, अनवधान आणि भ्रम यांची उत्पत्ति झालेली दिसते. सत्त्वगुणाची वृद्धि झालेली असतांना प्राणी मरण पावला म्हणजे तो उत्तम ज्ञानी लोकांच्या लोकांना म्हणजे सत्यलोक, वैकुंठ, कैलासादि लोकांना जातो. रजोगुणाची वृद्धि झाली असतांना मरण आलें तर तो प्राणी कर्मामध्यें आसक्त असलेल्या मनुष्यांत जन्म पावतो. तमोगुणाची वृद्धि असतां मरण आलें तर पश्वादि मूढ योनींमध्यें प्राणी जन्म घेतो. पुण्यकर्माचें सात्त्विक निर्मळ फळ मिळते. रजोगुणाचें फळ दुःख व तमोगुणाचें फळ अज्ञान आहे. सत्त्वगुणापासून ज्ञान, रजोगुणापासून लोभ, व तमोगुणापासून अनवधान, भ्रम व अज्ञान, यांची उत्पत्ति होते. सात्त्विक लोक ब्रह्मलोक-विष्णुलोक-शिवलोक यांसारख्या उत्तम लोकांस जातात. राजस लोक देवलोक किंवा मनुष्यलोक यांसारख्या मध्यम लोकांत जन्म पावतात. आणि तामस लोक पश्वादि तिर्यग्योनींत जन्मतात. गुणांच्या प्रेरणेनें शरीरेंद्रियेंच सर्व कर्मांचे कर्ते असतात. आपण म्हणजे आत्मा अकर्ताच असतो, हें जो जाणतो तो मद्रूप होतो. देहाची उत्पत्ति होण्यास बीजभूत झालेल्या तीन गुणांचें अतिक्रमण करून व जन्म, जरा, मृत्यु, दुःख, ह्या देहसंबंधी गोष्टी देहावर सोडून जो देहवान् आत्मा मोकळा होतो, त्यालाच मोक्ष प्राप्त होतो."

अर्जुन म्हणाला, "गुणांचें अतिक्रमण केलेला पुरुष कसा ओळखावा? तो वागतो कसा? व गुणांना तो कसा उल्लंघतो?"

भगवान् म्हणतात, "सत्त्वगुणाचें कार्य ज्ञान व सुख; रजोगुणाचें कार्य कर्म करण्याची इच्छा, लोभ व दुःख, व तमोगुणाचें कार्य अज्ञान व मोह. हीं उत्पन्न झालीं असतां जो त्यांच्याबद्दल खेद करीत नाहीं व तीं गेलीं असतां त्यांची इच्छा करीत नाहीं, उदासीनाप्रमाणें जो राहातो, गुणांकडून ज्याची चित्तवृत्ति ढळत नाहीं, गुणांकडेच जो कर्मकर्तृत्व देतो, जो आत्मस्वरूपांतच राहतो, सुखदुःखाला जो सारखें मानतो, जो आत्म्यामध्यें स्थिरचित्त असतो, मातीचे ढेकूळ, दगड व सोनें ज्याला सारखेंच असतें, ज्याला प्रिय—अप्रिय कांहीं नसतें, जो धीर असतो, निंदा व स्तुति ज्याला सारखी वाटते, मान-अपमान ज्याला सारखेच असतात, शत्रु-मित्राशीं जो समतेनें वागतो, व जो सर्व कर्मांचा सर्व तऱ्हेनें त्याग करतो, त्याला गुणातीत म्हणजे गुणांचें आतिक्रमण केलेला म्हणतात. जो अव्यभिचारी भक्तियोगानें माझी सेवा करतो, तो ब्रह्मरूप होण्यास समर्थ होतो. कारण, मी प्रत्यगात्माच अविनाशी, अविकारी, नित्य, धर्मरूप व केवळ सुखरूप, असें ब्रह्म आहें."

---

## १५

ज्ञानानें गुणातीत होतां येतें असें भगवान् म्हणाले. मोक्ष मिळविण्या-करिता गुणातीत होणें अवश्य आहे. गुणातीत करणारें ज्ञान साधकाचे ठिकाणीं टिकून राहिलें तर त्याला मोक्ष निश्चित मिळेल. ज्ञान टिकविण्या-करितां वैराग्याची अत्यंत जरूर आहे. संसार अनित्य व रज्जुसर्पवत् मिथ्या आहे, हें साधकाला पटून तो वैराग्यशील व्हावा, याकरितां संसाराची अनित्यता दाखवून त्यासंबंधीं मिथ्यात्वबुद्धि व्हावी म्हणून भगवान् आतां वृक्षाचें रूपक करून अनित्य संसाराचें रूप सांगत आहेत.

भगवान् म्हणाले, "हा संसारवृक्ष लोकाविलक्षण आहे. इतर झाडाचीं मुळें खालीं, व खोड, शाखा, पल्लव, असा त्यांचा विस्तार वर असतो.

पण ह्या संसारवृक्षाचे मूळ जें सर्वोत्तम ब्रह्म तें वर आहे. त्या मुळाच्या अपेक्षेने ह्या वृक्षाचा शाखा, पल्लव, वगैरे विस्तार खाली पसरलेला आहे. हा वृक्ष कधींहि क्षय पावत नाहीं असा दिसतो, पण ह्याचे नाव 'अश्वत्थ' म्हणजे उद्यापर्यंत न टिकणारा, म्हणजे क्षणभंगुर असे विलक्षण आहे. अनंत वेद हीं ह्या वृक्षाचीं पानें आहेत. पानांनीं वृक्षाचे संरक्षण होते. त्याचे दोष झाकले जातात. वेदांतील कर्मकांडाने ससारवृक्षाचे दोष झाकून त्याचे रक्षण केले आहे. म्हणून जो ह्या वृक्षाचे रूप यथार्थाने जाणतो त्याला वेदवेत्ता म्हणतात. ह्या ससारवृक्षाच्या शाखा सत्त्व, रज, तम, ह्या गुणाच्या बनलल्या असून त्या खाली, वर, जिकडे तिकडे पसरल्या आहेत. ह्या शाखाना विषयरूपी कोमल पल्लवाङ्कुर फुटलेले आहेत, व मनुष्यशरीरात कर्म करण्याला उद्युक्त करणाऱ्या ह्या वृक्षाच्या वासनारूपी लहान लहान मुळया संतत पसरल्या आहेत. ह्या ससारवृक्षाचे रूप जसे येथे वर्णन केले आहे, तसे संसारात पडलेल्या प्राण्याना उपलब्ध होत नाहीं. ह्या जन्ममरणरूप ससाराला आरभ कोठून झाला, हे कळत नाहीं. ह्याचा अंत कोठे आहे, तेहि समजत नाहीं. ह्याला कशाचा आधार आहे, व ह्याची मुळे किती खोल गेलीं आहेत, त्याचाहि पत्ता लागत नाहीं. असे का होते? हा संसारवृक्ष सत्य असता तर त्याच्यासंबधीं वरील सर्व गोष्टी समजल्या असत्या. म्हणून ह्याचें स्वरूप कळण्याकरिता ह्याचे मूळ काय सागितले आहे तिकडे लक्ष दिले पाहिजे. ह्याचें मूळ सर्वोत्तम ब्रह्म असे सागितले आहे. ब्रह्म हे अनादि, अनंत, निराकार, निर्गुण, निरवयव, आणि अव्यक्त असें आहे. अशा मुळापासून उत्पन्न झालेल्या संसारवृक्षाची कथा, म्हणजे मृगजळाने तुडुंब भरून वाहणाऱ्या गंगेच्या वर्णनाइतकीच सत्य आहे. मृगजळाइतकाच हा संसारहि आभासात्मकच आहे. मृगजळ जसें त्याचे कारण जे सूर्यकिरण त्याच्या अज्ञानानें सत्य भासतें, तसाच हा ससारहि त्याचे कारण जे ब्रह्माचे अज्ञान, त्यामुळे सत्य भासतो. तेव्हा ह्या ससाराचे खरे मूळ अज्ञान आहे. अनासक्त होऊन ज्ञानरूपी खड्गाने हे अज्ञानरूपी मूळ तोडून टाकावे कीं हा संसारवृक्ष उन्मुळून पडून त्याचा नाश झालाच म्हणून समजावें. नंतर ज्याच्या अज्ञानानें हा संसार भासला

त्या परब्रह्माला शरण जाऊन, जेथे गेले असता फिरून परत यावे लागत नाही, असे त्याचे पद शोधावे. अहंकार व अविवेक या दोघानीं ज्याना सोडले आहे, नाना तऱ्हेचे विकार उत्पन्न करणारी आसक्ति ज्यांनीं जिंकली आहे, परमात्मस्वरूपदर्शनात जे सतत गढून गेले आहेत, ज्याच्या विषय-वासना निःशेष झाल्या आहेत, व सुखदुःखादि द्वंद्वानीं ज्याना पूर्णपणे सोडले आहे, असे विवेकी पुरुष त्या शाश्वत पदाला प्राप्त होतात. ज्याला सूर्य, चद्र, अथवा अग्नि प्रकाशित करूं शकत नाहींत, व जेथें गेल्यानंतर योगी पुनः जन्ममरणरूप संसारात परत येत नाहींत, असें माझे तेजोरूप श्रेष्ठ ब्रह्मपद आहे.

"ह्या जीवलोकात क्षेत्रज्ञ किंवा जीव म्हणून माझा-परमात्म्याचा-अविद्या-कल्पित एक अंश आहे. तो एक शरीर सोडून जाताना मनासह सहा इंद्रियाना त्याच्या त्याच्या स्थानातून आकर्षण करून घेतो, व दुसऱ्या शरीरात जाताना, वायु जसा पुष्पादिकातून सुवास घेऊन जातो, त्याप्रमाणे तो त्या सहा इंद्रियाना घेऊन जातो व तेथे कान, डोळे, स्पर्शेंद्रिय, जिव्हा, नाक व याना जोडणारे मन याचा अधिष्ठाता होऊन त्याच्या त्याच्या विष-याचा उपभोग घेतो. देहाला सोडून जाताना, देहांत असताना, विषयांचा उपभोग घेताना व तीन गुणानी युक्त असताना ह्या क्षेत्रज्ञाला अज्ञजन पाहात नाहीत (जाणत नाहीत). ज्ञानी लोक ज्ञानदृष्टीने याला पाहातात (जाणतात). श्रवणमननादि साधनानीं आत्मसाक्षात्कार करून घेण्याचा यत्न करणारे शातचित्त योगी आपल्या बुद्धीत असलेल्या त्या आत्म्याचा आत्मरूपाने अनुभव घेतात. पण ज्याचे चित्त शात झालेले नाहीं, अशा यत्न करणाऱ्यानाहि याचा अनुभव येत नाहीं. सर्व जगाला प्रकाशित करते ते सूर्यांतील तेज, आणि चंद्र व अग्नि यामध्यें असलेले तेज, मी जो पर-मात्मा, त्या माझेच आहे, असे समज. मी पृथ्वीमध्ये प्रवेश करून माझ्या मायाशक्तिबलानें मी चराचर भूताना धारण करतो. आणि रसरूप चंद्र होऊन सर्व औषधीचे पोषण करतो. मी प्राण्यांच्या देहाचा आश्रय केलेला जाठर अग्नि होऊन प्राण व अपान वायूंनीं युक्त होत्साता प्राण्यानीं भक्षण केलेले चार प्रकारचें अन्न पचवितो. मीं सर्वांच्या बुद्धीत आत्मरूपाने प्रवेश

केला आहे. मज आत्म्यापासूनच प्राण्यांना त्यांच्या कर्मानुसार स्मरण, ज्ञान व त्यांचा अभाव, ह्या गोष्टी प्राप्त होतात. सर्व वेदांच्या योगानें जाणण्याला योग्य असा परमात्मा मीच आहें, आणि वेदांचा खरा अर्थ जाणणाराहि मीच आहें.

"ह्या लोकांत क्षर व अक्षर असे दोन पुरुष आहेत. सर्व भूतांना क्षर पुरुष म्हणतात, व ईश्वराच्या अचिंत्य मायाशक्तीला अक्षर पुरुष अशी संज्ञा आहे. म्हणजे सर्व विकारजात हा क्षर पुरुष व विकारजाताचें कारण अशी जी कूटस्थ मायाशक्ति, तो अक्षर पुरुष होय. ह्या दोन्ही क्षराक्षरांहून अगदीं निराळा व कोणत्याहि उपाधीचा दोष ज्याला लागला नाहीं, असा एक उत्तमपुरुष आहे. त्याला वेदात परमात्मा असें म्हटलें आहे. तो अव्यय ईश्वर आपल्या चैतन्य-बलशक्तीनें भूः भुवः व स्वः ह्या नावाच्या तीन लोकांत प्रवेश करून त्यांना धारण करतो. अर्जुना, तो मी उत्तम-पुरुष क्षरपुरुषाचें--म्हणजे वर वर्णन केलेल्या संसारवृक्षाचें---अतिक्रमण केलेला, आणि संसारवृक्षाचा बीजभूत अशा अक्षरपुरुषाहून उत्तम असल्यानें, लोकांत व वेदात पुरुषोत्तम या नांवानें प्रसिद्ध आहें. अर्जुना, अज्ञानरहित झालेला जो पुरुष वर सांगितल्याप्रमाणें मला पुरुषोत्तमाला जाणतो तो, मीच सर्वांचा आत्मा आहें, ह्या भावनेनें मला भजतो. हे निष्पाप अर्जुना, हें अत्यंत गुह्य--म्हणजे गुप्त ठेवण्यास योग्य असलेलें--शास्त्र मीं तुला सांगितलें. हें जाणून मनुष्य बुद्धिमान् व कृतकृत्य होतो."

---

## १६

भगवान् म्हणतात, "दैवी प्रकृति संसारांतून मुक्त होण्यास कारण होते. आसुरी व राक्षसी प्रकृती बंधाला कारण होतात. दैवी प्रकृति असणाऱ्याच्या अंगीं पुढील गुण दृष्टीस पडतात. १ अभयम्--शास्त्रानें सांगितलेली गोष्ट निर्भयपणें, निःसंदेहपणें करणें; २ सत्त्वशुद्धिः--अंतःकरणाची अत्यंत शुद्धि; ३ ज्ञानयोगव्यवस्थितिः--शास्त्रांच्या व आचार्यांच्या मुखानें आत्म-अनात्म पदार्थांचें ज्ञान करून घेणें, व मनाच्या एकाग्रतेनें त्याचा

अनुभव घेणें; हा योग—ह्या ज्ञानयोगामध्यें निश्चयानें स्थित असणें; ४ दान; ५ दम; ६ यज्ञ—श्रौत अग्निहोत्र व स्मार्त देवयज्ञ वगैरे करणें; ७ स्वाध्याय-वेदाचें अध्ययन; ८ तप; ९ आर्जवम्—मनाचा सरळपणा; १० अहिंसा; ११ सत्य—अप्रिय व अनृत वर्ज्य करून वस्तुस्थिति जशी असेल तशी सांगणें; १२ अक्रोध—आलेल्या क्रोधाचें उपशमन करणें; १३ त्याग—संन्यास; १४ शान्ति; १५ अपैशुनम्—दुसऱ्याच्या गुप्त गोष्टींचा स्फोट न करणें; १६ दया; १७ अलोलुप्त्व—विषयोपभोग प्राप्त झाले तरी त्याचा भोग घेण्याची इच्छा न होणें; १८ मार्दव; १९ ह्रीः—अकार्याबद्दल लज्जा; २० अचापलम्—कारण नसतांना वाणी, हात, पाय यांची हालचाल न करणें; २१ तेज—प्रगल्भपणा; २२ क्षमा, २३ धृतिः— शरीरेंद्रियांना चांगल्या कामांत उत्साह देणारे धैर्य; २४ शौचम्-अंतर्बाह्यशुद्धि; २५ अद्रोह—दुसऱ्याचा घात करण्याची इच्छा नसणें; २६ न अतिमानिता—स्वतःच्या पूज्यतेविषयींच्या भावनांचा अभाव. अर्जुना, हे दैवीगुण अंगीं आणण्याचा मुमुक्षूनें प्रयत्न करावा. आता आसुरी संपत्तीचे गुण सांगतों. १ दंभ—धार्मिकतेचें ढोंग; २ दर्प—गर्व; ३ अतिमान—आपल्याला फार मोठा व पूज्य मानणें; ४ क्रोध; ५ पारुष्य—कठोरपणा; ६ अज्ञान—कर्तव्य अकर्तव्य न समजणें. हे मुख्य आसुरी गुण असून ते बंधाला कारण होणारे आहेत. अर्जुना, तूं दैवी प्रकृतीचा आहेस. दैव व आसुर असे मनुष्याचे दोन प्रकार आहेत. मी दैवीगुणाचें विस्तारानें वर्णन केले आहे. आतां आसुरी प्रकृतीचीं माणसें कशीं वागतात तें सांगतों. त्यांना पुण्याचरणांत प्रवृत्ति व पापाचरणापासून निवृत्ति असावी यांसंबंधीं ज्ञानच नसतें. शुचिर्भूतपणा हा त्याच्या गांवीं नसतो. सदाचाराची त्यांना ओळख नसते. सत्याला ते मानीत नाहींत. वेदशास्त्रांनीं सांगितलेल्या पापपुण्यांना ते असत्य मानतात. जगाची धारणा करणारा धर्म आहे, हें त्यांना मान्य नसते. परलोक व ईश्वर, हे प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळें नाहींत, असें ते म्हणतात. कामी स्त्री-पुरुषांच्या संयोगापासून प्राण्यांची निर्मिति होते, त्याला प्रारब्ध वगैरेची कांहीं जरूरी नाहीं, हें त्यांचें म्हणणें. हे अल्पबुद्धीचे क्रूर लोक जगाच्या नाशाकरितांच जन्माला येतात. ज्यांची तृप्ति होणें

अशक्य आहे अशा विषयभोगेच्छांच्या नादीं लागून दंभ, मान, मद, इत्यादि दोषानीं युक्त होऊन ते अविवेकानें अनर्थकारक व अपवित्र कृत्यें करतात. मरेपर्यंन्त त्यांना उदरंभरणाची व विषयभोग सतत कसे मिळतील, यांचीच चिंता लागून राहिलेली असते. विषयोपभोग भोगणें हेच आपलें जीवितकार्य असें त्यांना वाटत असतें. शेंकडों आशापाशांनीं बद्ध झालेले हे लोक कामक्रोधांच्या अधीन होऊन विषयोपभोगासाठींच अन्यायानें द्रव्याचा संचय करतात. हें मिळवीन, तें मिळवीन, आज हा लाभ झाला, उद्यां तो लाभ होईल, आज ह्या शत्रूचा नाश केला, उद्यां त्या शत्रूला ठार करीन, मी सत्ताधारी आहे, मी बलवान्, मी सुखी, मी श्रीमान्, मी कुलीन, माझ्यासारखा दुसरा कोण आहे? जारणमारणादि क्रूर धर्म मी आचरीन, माझी खुशामत करणाऱ्यांना ते जें मागतील तें मी देईन. अशा अनेक दुष्ट संकल्पानीं भ्रांतचित्त झालेले ते विषयासक्त शेवटी अपवित्र नरकात पडतात. आपली आपणच थोरवी गाणारे, संपत्ति, मोठेपणा, आणि गर्व यानीं उन्मत्त झालेले, आपण धार्मिक आहों असें दाखविण्याकरिता कीर्ति मिळविण्याच्या इच्छेने कसले वाटेल तसले यज्ञ अविधीनें करतात. मीपणा, बल, काम, क्रोध, दर्प ह्यांनीं भरून गेलेले हे लोक सर्व देहांमध्यें असलेल्या मज परमात्म्याचा एकप्रकारें द्वेष करतात. माझा द्वेष करणाऱ्या त्या क्रूर पापी नराधमाना पुनः मी आसुरी योनींतच जन्माला घालतों. अशा रीतीनें आसुरी योनींतच अनेक जन्म घेऊन माझी प्राप्ति न झाल्याने ते पराकाष्ठेच्या अधोगतीला जातात. काम, क्रोध, लोभ, अशीं हीं आत्म्याचा नाश करणारीं नरकाचीं तीन द्वारेंच आहेत. म्हणून यांचा त्याग करावा. अर्जुना, ह्या तीन तमोद्वारांपासून मुक्त झालेला पुरुष आत्मकल्याणाचें साधन आचरून उत्कृष्ट गतीला जातो. जो वेदशास्त्रांनीं घालून दिलेले आचार सोडून देऊन विषयवासना तृप्त करण्याकरितां स्वच्छदानें वागतो, तो यशस्वी होत नाहीं, त्याला सुख मिळत नाहीं, आणि त्याला उत्तम गतिहि प्राप्त होत नाहीं. म्हणून कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें, याविषयीं निश्चय करण्याकरिता शास्त्र हेंच तुला प्रमाण आहे. म्हणून कर्माचरणाच्या बाबतींत शास्त्रविधान काय आहे तें नीट

जाणून घेऊन तूं कर्म करावेस हेंच तुला योग्य आहे."

## १७

अर्जुन विचारतो, " हे कृष्णा, आसुरी वृत्तीचे लोक शास्त्राला जुमानीत नाहींत हे समजलें. पण ज्याना शास्त्रविधि काय आहे तो माहीत नसल्या-मुळे शास्त्रविधि न पाळता केवळ वृद्धव्यवहार पाहून जे श्रद्धाळुपणानें देवतापूजन करतात, त्याची ती पूजा सात्त्विक, राजस, कीं तामस तें सांग."

भगवान् म्हणाले, " पूर्वजन्माच्या अंतीं मरणसमयीं जे धर्मसंस्कार मनावर झाले असतील, त्या संस्कारांनुसार ह्या देहात स्वभाव बनत असतो. ते संस्कार सत्त्वगुणप्रधान असतील तर ह्या देहात स्वभाव सत्त्वगुणप्रधान असतो. याप्रमाणेंच इतर गुणासंबंधींहि जाणावे त्या स्वभावाला म्हणजे प्रकृतीला, अंतःकरणवृत्तीला अनुसरून श्रद्धाहि तीन प्रकारची असते. त्या श्रद्धेसंबंधीं मी सांगतों तें ऐक. श्रद्धा म्हणजे, आपली इष्ट गोष्ट ह्या अमक्या आचरणानें निश्चित साधेल, असा विश्वास. प्रत्येक जीव श्रद्धायुक्त असतो. तो आपल्या श्रद्धेप्रमाणें आचरण करतो. सत्त्वगुणी म्हणजे सत्त्वगुणप्रधान प्रकृतीचे लोक सत्त्वगुणी देवाचें पूजन करतात. त्यांची श्रद्धा म्हणजे विश्वासपूर्वक केलेलें पूजन, सात्त्विक समजावें. रजोगुणी लोक यक्ष, राक्षस, यांचें पूजन करतात; त्यांची श्रद्धा राजस जाणावी. तमोगुणी लोक प्रेतांना व भूतांना पूजतात, त्यांची श्रद्धा तामस असते. दंभ व अहंकार अंगीं असलेले पुरुष, काम्य विषय व विषयभोगाचा अभिलाष यानीं युक्त झाले कीं त्या वासनांची पूर्ति करण्याकारितां शास्त्रानें विहित नसलेलें असें, सर्व प्राण्यांना आणि स्वतःला पीडा देणारे घोर तप आचरतात. अविवेकानें, निष्कारण उपवासादिकांनीं शरीरेंद्रियांना ते शुष्क करितात, आणि शास्त्रा-नुष्ठानरूप माझी आज्ञा उल्लंघून बुद्धिस्थ असलेल्या मलाहि एका प्रकारें कृश करितात. असल्या मूढ लोकांना तूं आसुरनिश्चयी समज. आहार, यज्ञ, तप व दान, हींहि सात्त्विक, राजस, तामस, अशा तीन प्रकारचीं

असतात. उत्तम प्रकारचें जीवन चित्तस्थैर्य, शरीरेंद्रियसामर्थ्य, निरोगीपणा, अंतःकरणाचा आल्हाद, व परोत्कर्षानें हार्षित होणारें निर्मळ मन, यांना वृद्धिंगत करणारा असा ताजा व रसानें भरलेला, मधुरसप्रधान, घृतादि स्निग्ध-ज्यांतील रस शरीराला चिरकाल उपकारक होतात असासारयुक्त, व ज्याच्याकडे दृष्टि जाताच मनाला प्रसन्नता प्राप्त होते, असा आहार सात्त्विकगुणप्रधान लोकाना आवडतो. अतिशय कडू, अति आंबट, फार खारट, अति कढत, दाहक व रसरहित असे आहार राजस पुरुषांना आवडतात. अर्धें कच्चें शिजलेलें, ज्यांतील मूळचा रस नाहींसा झाला आहे असें, आंबलेलें, दुर्गंधयुक्त, शिळें, उष्टें व अपवित्र असें अन्न तामस लोकांना आवडतें. स्वधर्माला अनुसरून शास्त्रानें सांगितलेला यज्ञ करणें हें कर्तव्यच आहे, असा मनाचा निश्चय करून कोणत्याहि फलाची इच्छा न धरतां केलेला यज्ञ सात्त्विक होय. अर्जुना, फलाची इच्छा धरून व केवळ दंभ माजविण्यासाठीं जो यज्ञ केला जातो त्याला राजस यज्ञ म्हणतात. ज्याला शास्त्राचें कांहींच विधान नाहीं, जो मंत्ररहित, ज्यात अन्नदान केलें जात नाहीं व दक्षिणा दिली जात नाहीं, अशा श्रद्धाशून्य यज्ञाला तामसयज्ञ म्हणतात. देव, ब्राह्मण, गुरु व विद्वान लोक यांचें पूजन करणें, शरीर स्नानादि साधनानीं व मन विवेकानें शुद्ध ठेवणें, सरळ वर्तन करणें, ब्रह्मचर्य पाळणें व कोणत्याहि प्राण्याना व्यर्थ न दुखविणें ह्याला शारीर तप म्हणतात. प्राण्यांच्या मनांत दुःख उत्पन्न न करणारें, सत्य, प्रिय व हितकारक असें भाषण करणें व शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें वेदाध्ययन व शास्त्राध्ययन करणें, हें वाङ्मय-तप म्हटलें जातें.

"मनाची प्रसन्नता, सौम्यता, मनाचें वाणीविषयक संयमन, सर्व विषयापासून मनाचा निग्रह, व मनाचा निष्कपटपणा हें मानस तप होय. फलाची इच्छा न धरितां, सिद्धि व असिद्धि यांविषयीं उदासीन राहून वर सांगितल्याप्रमाणें शरीर, वाक् व मन यांनीं होणारें त्रिविध तप अतिशय श्रद्धेनें केलें असतां, त्याला सात्त्विक तप म्हणतात. आपली लोकांनीं साधू म्हणून प्रशंसा करावी, आपल्याला बहुमान द्यावा, आपली गंधपुष्प-दक्षिणादिकांनीं पूजा करावी, म्हणून केलेलें तप चंचल व अनित्य असतें. त्याला

राजस तप म्हणतात. अविवेकयुक्त निश्चयानें, आत्म्याला पीडा देण्याकरता व दुसऱ्याचा विनाश करण्यासाठीं जें तप आचरिलें जातें तें तामस तप होय. कर्तव्य म्हणून दान दिलें पाहिजे या भावनेनें, प्रत्युपकार करण्याला असमर्थ असलेल्या मनुष्याला दिलेलें, त्याप्रमाणें काशी, मथुरा, कुरुक्षेत्रादि पुण्यक्षेत्रांत केलेलें, कार्तिक माघमासादि पुण्यमासात व संक्रांतीसारख्या पर्वकाळीं दिलेलें, व शमदमतितिक्षादियुक्त वेदपारंगत ब्राह्मणास केलेलें दान सात्त्विक दान होय. प्रसंगीं ह्या मनुष्याचा आपणास उपयोग होईल या भावनेनें त्याला दिलेलें, ह्या दानाचें चांगलें फळ आपल्याला मिळेल या हेतूनें केलेलें, आणि ह्या दिलेल्या द्रव्याला आपण मुकलों असें अतिलोभामुळें वाटून खेदयुक्त अंतःकरणानें दिलेलें जें दान त्याला राजस दान म्हणतात. अपवित्र देशात, अयोग्य कालीं, अपात्र अशा मूर्ख, नीच मनुष्याला केलेलें, व दान घेणाऱ्याचा आदर न करिता त्याच्याबद्दल तिरस्कार दाखवून त्याला दिलेलें जें दान त्याला तामस दान अशी संज्ञा आहे. ॐ तत् सत् असा तीन प्रकारच्या ब्रह्माचा नामनिर्देश सांगितला आहे. ह्यातील प्रत्येक नामानें ब्रह्माचा निर्देश होतो. ह्या तीन नावांचा मिळून 'ॐ तत् सत्' असा एक सामर्थ्यसंपन्न मंत्र बनला आहे. कोणत्याहि शास्त्रविहित कर्माच्या आरंभीं त्याचा उच्चार केला असता त्या कर्मांत जें वैगुण्य पडेल त्याचा दोष नाहींसा होतो. ॐ तत् सत् असा उच्चार करूनच पूर्वी ब्रह्मदेवानें ब्राह्मणादि त्रैवर्णिक, वेद व यज्ञ, निर्माण केले. आतां ह्याचा विनियोग कसा करतात तें मी सांगतों. वेदाध्ययन करणें, वेदार्थ समजून घेणें हें ज्यांचें शील आहे, असे ब्रह्मवादी द्विज, त्यांना शास्त्रानें अवश्य अशा सांगितलेल्या स्वाध्याय, यज्ञ, दान, तप या क्रियांना प्रारंभ करतांना ते ॐ हें नाम उच्चारतात. कर्मफलासक्तीचा त्याग करून मुमुक्षु आपल्या शास्त्रविहित यज्ञ, तप, दान इत्यादि कर्मांच्या प्रारंभीं तत् हा ब्रह्मनिर्देश करतात. अस्तित्व दाखविण्याकरितां किंवा सर्वत्र ब्रह्म आहे हें सांगण्याकरितां व चांगुलपणाचा निर्देश करण्याकरितां, सत् ह्या शब्दाचा उपयोग करतात. त्याप्रमाणेंच प्रशस्त कर्मामध्येंहि सत् शब्दाचा प्रयोग करितात. यज्ञ, दान, तप यांमध्यें जी निष्ठा तिला सत्

म्हणतात. या यज्ञ-दान-तपाकारितां जें कर्म त्याला सत्कर्म म्हणतात, किंवा ॐ तत सत् या त्रिविध नामानें ज्याचा निर्देश केला जातो त्या ब्रह्मा-करितां–परमात्म्याप्रीत्यर्थ-जें जें कर्म केलें जातें, त्याला त्याला सत्कर्म असें नामाभिधान दिलें जातें. सत्कर्म करताना जर कांहीं वैगुण्य उत्पन्न झालें तर ब्रह्माच्या या तीन नांवांचा उच्चार केला असतांना तें नाहींसे होतें. अश्रद्धेनें केलेलें हवन, दिलेलें दान, केलेलें तप व त्याच्याकरिता केलेलीं कर्में हीं सर्व असत् म्हणून गणलीं जातात. तीं परलोकीं फल देऊं शकत नाहींत व इहलोकींहि याच काहीं उपयोग नाहीं."

---

## १८

आतां ह्या अठराव्या अध्यायात, मागील सर्व अध्यायांत आलेले विषय भगवान् संक्षेपाने सागत आहेत. अठरावा अध्याय म्हणजे गीता–ग्रंथाचा उपसंहार आहे. अध्यायारंभीं अर्जुन म्हणतो, " हे महापराक्रमी कृष्णा, संन्यास ह्या शब्दाच्या अर्थाचें यथार्थस्वरूप जाणण्याची माझी इच्छा आहे, आणि हे हृषीकेश, हे केशिनिषूदन, त्याग या शब्दाच्या अर्थाच्या यथार्थ स्वरूपाचें अगदीं निराळें स्पष्टीकरण मी ऐकूं इच्छितों."

भगवान् म्हणाले, " काम्य–कर्मांच्या त्यागाला कांहीं विद्वान् लोक संन्यास समजतात. काहीं विचारशील लोक सर्व कर्मांच्या फलत्यागाला त्याग असें म्हणतात. कांहीं पंडित, कर्में बंधाला कारण होत असल्यामुळें तीं टाकणेंच योग्य आहे, असे म्हणतात. तर यज्ञ दान-तपादि कर्में टाकूं नयेत, असें कांहींचें मत आहे. अर्जुना, ह्या त्यागाविषयीं मीं काय ठरविलें आहे तें ऐक. त्याग तीन प्रकारचा आहे. यज्ञ-दान-तपादि कर्में अवश्य करावीं, टाकूं नयेत. कारण, तीं चित्तशुद्धिकारक आहेत. पण अर्जुना, तीं कर्में करतांना त्यांच्यासंबंधीं आपला कर्तृत्वाभिमान व त्या कर्मांपासून मिळणारीं फलें, यांचा त्याग करावा, असें माझें ठाम मत आहे. नित्यकर्म अज्ञ मुमुक्षूला पावन करणारें असल्यामुळें त्याचा त्याग करणें बरोबर नाहीं. पण नित्यकर्म पावन करणारें आहे, हें माहीत नसल्या-

मुळें अज्ञानानें त्याचा जो त्याग होतो, त्याला तामस–त्याग म्हणतात. कित्येकजण नित्यकर्म शरीराला क्लेशकारक होईल, ह्या भीतीनें त्याचा त्याग करतात. त्या त्यागाला राजस–त्याग म्हणतात. ज्ञानपूर्वक केलेल्या त्यागाचें मोक्षफल असल्या राजस-त्यागानें मिळत नाहीं. नित्यकर्महि कर्तव्य म्हणूनच करावें, त्याच्याबद्दलची आसक्ति व त्याचें फल यांचा मात्र त्याग करावा. ह्या त्यागाला सात्त्विक त्याग म्हणतात. असा सात्त्विक त्याग करणारा पुरुष बंधन करणाऱ्या काम्यकर्मांचा द्वेष करीत नाहीं, आणि चित्तशुद्धिद्वारा उपकारक होणाऱ्या नित्यकर्मांमध्यें आसक्तहि होत नाहीं. आत्मानात्मविवेकानें त्याच्या बुद्धींत प्रवेश केल्यानें त्याचे सर्व संशय नष्ट झालेले असतात. देहालाच आत्मा समजणाऱ्या पुरुषाकडून सर्व कर्मांचा त्याग होणेंच शक्य नाहीं. विवेकाने कर्मफलाचा त्याग करणाऱ्यालाच त्यागी असें म्हणतात. इष्ट, अनिष्ट व मिश्र अशीं कर्मांचीं तीन प्रकारचीं फळें असतात. इष्ट फल म्हणजे देवलोकीं दिव्यभोग प्राप्त होणें; अनिष्ट फल म्हणजे पश्वादि तिर्यग्योनींची प्राप्ति व मिश्र फल म्हणजे मनुष्यदेहाची प्राप्ति. हीं फळें कर्मफलाचा त्याग न करणाऱ्याला मेल्यानंतर मिळतात. संन्याशाला हीं फले केव्हाच मिळत नाहींत. ( संन्यास व त्याग हे एकार्थीच आहेत. ) ज्यात कर्मांची परिसमाप्ति कशी होते हें सांगितलें आहे, अशा वेदान्त—शास्त्रात कर्म घडण्याला अवश्य अशीं पांच कारणें सांगितलीं आहेत, ती आतां माझ्यापासून समजून घे. कर्म घडण्याचें पहिलें साधन देह हें होय. इतर सर्व कारणें ह्या देहाच्या आश्रयानें राहातात, म्हणून देह हें सर्व कारणाचें अधिष्ठान आहे. दुसरें कारण कर्ता, म्हणजे जीव–चैतन्याचें प्रतिबिंब. मींच कर्मे केलीं असें हा जीव भ्रमानें म्हणत असतो. निरानिराळीं इंद्रियें हें तिसरें कारण आहे. प्राणादि वायू हें चौथें कारण. इंद्रियांवर अनुग्रह करणाऱ्या आदित्यादि देवता हें पांचवें कारण, त्याला दैव अशी संज्ञा आहे. मनुष्य शरीर, वाणी, मन, यांनीं जें धर्म-कार्य वा अधर्म–कार्य आरंभितो, त्याला हींच पांच कारणें आहेत. प्रत्येक कर्माचीं अशीं हीं पांच कारणें असतांना, शास्त्र व गुरु ह्यांच्या उपदेशाचा संस्कार ज्याच्या बुद्धीवर झाला नाहीं असा दुर्मति, आत्म्यालाच एकट्याला

त्या कर्मांचा कर्ता मानतो. ज्याच्या बुद्धीवर संस्कार झाला आहे त्याला मी कर्ता अशी भावनाच नसते. एखादी हत्येसारखी भयंकर गोष्ट त्याच्या हातून घडली असें लोकांना दिसलें तरी त्याला ती गोष्ट आपण केली असें वाटत नाहीं, त्यामुळें त्या कर्मांपासून उत्पन्न होणारें पापपुण्यहि त्याला स्पर्श करूं शकत नाहीं. ज्यानें विषय जाणला जातो तें ज्ञान, जाणण्याचा विषय तें ज्ञेय, व जाणणारा तो परिज्ञाता. ज्ञान, ज्ञेय व परिज्ञाता, ही त्रिपुटी कर्मांत प्रवृत्त करणारी सामग्री आहे. करण म्हणजे इंद्रियें, कर्म म्हणजे कर्त्याला इष्ट असेल तें कर्म, कर्ता म्हणजे इंद्रियाकडून कर्म करविणारा म्हणून करण, कर्म, आणि कर्ता, ह्या त्रिपुटींत सर्व कर्मांचा सांठा आहे. ह्या त्रिपुटीपासून सर्व कर्में निघतात. ज्ञानी पुरुष कर्तृत्वच पत्करीत नसल्यामुळें ह्या त्रिपुटी त्याच्या ठिकाणीं नसतातच; म्हणून त्याच्या ठिकाणीं कर्मांचा अभाव असतो. नसलेल्या कर्मांचा बंध त्याला कसा लागणार ?

असो. ज्ञान, कर्म, व कर्ता याचे सत्त्व-रज-तम या तीन गुणांनीं प्रत्येकीं तीन प्रकार होतात. हें कापिल-सांख्य-शास्त्रांत जसें सांगितलें आहे तसें तुला सांगतों तें ऐक. देवमनुष्यपश्वादि भिन्न भिन्न योनी, व सर्व चराचर भिन्न भिन्न पदार्थ या सर्वांमध्यें एकच नित्य, अविनाशी, आत्मवस्तु भरून राहिली आहे, असें जें ज्ञान, त्या ज्ञानाला सात्त्विक ज्ञान म्हणतात. सर्व भिन्न भिन्न भूतमात्रांच्या ठिकाणीं भिन्न भिन्न आत्मे आहेत, असें जें ज्ञान, तें राजस ज्ञान. प्रत्येक शरीरामध्यें शरीराच्या आकाराचा व परिमाणाचा जीव असतो; काष्ठपाषाणादिकांच्या मूर्तीमध्यें तेवढ्याच आकाराचा ईश्वर असतो, मूर्तीशिवाय इतरत्र देव कोठेंहि नाहीं, मूर्ति म्हणजेच ईश्वर, देव, देह म्हणजेच आत्मा-जीव-असें युक्तिशून्य, परमार्थाचा विचारच न करणारें जें अल्प विषयाचें अल्प ज्ञान त्याला तामस ज्ञान म्हणतात. हें सात्त्विक, राजस व तामस ज्ञानाचें वर्णन झालें. आतां तीन प्रकारचीं कर्में सांगतों. शास्त्रानें अवश्य केलेंच पाहिजे म्हणून सांगितलेलें शास्त्रविहित नित्य कर्म, कर्त्याकडून कर्तृत्वाभिमान न धरतां, रागद्वेषरहित होऊन, फलाची इच्छा न करतां कर्तव्यबुद्धीनें जेव्हां केलें जातें, तेव्हां त्या कर्माला सात्त्विक कर्म म्हणतात. जें कर्म फलप्राप्तीची इच्छा धरून कर्तृत्वाभिमानानें

परिश्रमपूर्वक केलें जातें, तें राजस होय. ह्या कर्माचा परिणाम काय होईल, ह्यांत धन, बल, आयुष्य, यांचा किती नाश होईल, ह्यात इतर प्राण्यांना किती पीडा होईल, हें करण्याचें आपलें सामर्थ्य आहे कीं नाहीं, या गोष्टींचा मुळींच विचार न करतां अविवेकानें जें कर्म आरंभिलें जातें, त्याला तामस कर्म म्हणतात. आतां तीन प्रकारचे कर्ते सांगतों. ज्यानें कर्मफलेच्छेचा त्याग केला आहे, ज्यानें कर्तृत्वाभिमान सोडला आहे, शास्त्रविहित कर्म आरंभिल्यापासून त्याची समाप्ति होईपर्यंत अनेक अड-चणी उत्पन्न झाल्या तरी जो धैर्यानें राहातो, कर्तव्य करण्यांत ज्याला अत्यंत उत्साह वाटतो, यशापयशाच्या प्रसंगीं जो निर्विकार असतो, अशा कर्त्याला सात्त्विक कर्ता म्हणतात. विषयासक्त, फल मिळविण्याच्या इच्छेनें कर्म करणारा, लोभी, दुसऱ्याला पीडा देणारा, हर्ष शोकांनीं युक्त, असा जो कर्ता, तो राजस कर्ता होय. चंचल चित्ताचा, कार्याकार्याचें ज्ञान नसणारा, उद्धट, ठक, दुसऱ्याचा अपमान करणारा, आळशी, असंतुष्ट व चेंगट, अशा कर्त्याला तामस कर्ता असें म्हणतात. गुणांच्यामुळें बुद्धि आणि धृति यांचे तीन प्रकार होतात. त्यासंबंधीं सर्व काहीं तुला सांगतों तें ऐक. कर्ममार्ग व मोक्षमार्ग म्हणजे काय, कर्तव्य कोणतें, अकर्तव्य कोणतें, भय कशाचें धरावें व निर्भय कोठें असावें, बंध व मोक्ष म्हणजे काय, ह्या सर्व गोष्टी जी उत्तम प्रकारें जाणते ती सात्त्विकी बुद्धि होय. हा धर्म, हा अधर्म, हें कर्तव्य, हें अकर्तव्य हें निश्चितपणें ठरविण्याची पात्रता ज्या बुद्धींत नसते, ती राजसबुद्धि होय. अधर्मालाच धर्म समजणारी व अशा प्रकारें सर्वच ज्ञेय गोष्टींना विपरीतपणें जाणणारी, अज्ञानानें पछाडलेली जी बुद्धि, ती तामसबुद्धि होय. चित्तैकाग्र्यानें अढळ झालेली अशी जी धृति मन, प्राण व इंद्रियें यांना शास्त्रनिषिद्ध विषयाकडे जाऊं देत नाहीं, त्या धृतीला सात्त्विकी म्हणतात. ज्या धृतीच्या योगानें पुरुष धर्म, अर्थ व काम हें मिळविणें हेंच आपलें कर्तव्य असें समजून त्यांना धारण करतो, आणि ते मिळविण्याच्या प्रसंगीं त्यांच्यापासून मिळणाऱ्या फलांची इच्छा धरतो, ती धृति राजसी समजावी. ज्या धृतीच्या योगानें मनुष्य निद्रा, भय, शोक, विषाद यांना सोडीत नाहीं व विषयसेवनाला पुरुषार्थ

समजतो, ती धृति तामस समजावी. हे भरतश्रेष्ठा अर्जुना, आतां सुखाचे तीन प्रकार मी सांगतों ते ऐक. ज्या सुखाचा जसजसा अधिक परिचय होईल, तसतसा मनुष्य त्यांत अधिकाधिक रममाण होतो, त्याला त्याची गोडी अधिकाधिक वाटू लागते, इतर विषयांचा अतिपरिचयानें वीट येतो, पण ज्या सुखाची गोडी अतिपरिचयानें वाढूं लागते, व सर्व दुःखाचा पूर्णपणें शेवट होतो, जें मिळविण्याकरितां प्रारंभीं शम, दम, विवेक, वैराग्यादि प्राप्त करून घ्यावे लागतात, त्यामुळें फार कष्ट होतात, म्हणून प्रारंभीं जें सुख विषासारखें कडू वाटतें पण परिणामीं अमृतासारखें मधुर वाटून ज्यानें चिरसमाधान लाभतें ते सुख सात्त्विक होय. जे सुख विषयेंद्रियांच्या संयोगापासून उत्पन्न होते, जें आरंभीं अमृतासारखें पण परिणामीं विषासारखें वाटते, त्या सुखाला राजस म्हणतात. जें सुख आरंभीं व शेवटीं आत्म्याला–म्हणजे चिदाभासयुक्त शरीरेंद्रियसंघाताला–मोह पाडणारें होतें, आणि निद्रा, आलस्य व कर्तव्यासंबंधी अनवधानता यामुळे ज्याची उत्पत्ति होते, ते सुख तामस गणले जातें. प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या सत्त्व, रज, तम या तीन गुणांनीं ज्याला सोडलें आहे, असा एकहि प्राणी वा स्थिर–चर पदार्थ सर्व पृथ्वीवर व स्वर्गलोकीं देवांत देखील नाहीं. त्रिगुणमात्मक मायाकार्यच सर्व जगत् असल्यामुळे त्रैलोक्यांतील सर्व प्राणी वा पदार्थ त्रिगुणात्मकच आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्या अंगीं स्वाभाविक असणाऱ्या सत्त्व, रज, तम ह्या त्रिगुणांच्या कमी अधिक प्रमाणाप्रमाणें त्यांचीं कर्मेंहि अत्यंत निरनिराळीं झालीं आहेत. मनोनिग्रह, बाह्येंद्रियांचा निग्रह, शरीर, वाक् व मन यांनीं होणारें त्रिविध तप, क्षमा, अंतःकरणाचा सरळपणा, आत्मज्ञान प्राप्त करून घेणें, शास्त्रांत सांगितलेल्या गोष्टींचा अनुभव घेणें, वेदवचनावर श्रद्धा ठेवणें, हीं ब्राह्मणाला जन्मानें वांट्यास आलेलीं कर्में आहेत. पराक्रम गाजविणें, तेजःस्वीपणा दाखविणें, धैर्य, दक्षता, युद्धांतून पाय मागें न घेणें, दान देणें व सत्ता चालविणें हीं कर्में जन्मानें क्षत्रियाकडे आलेलीं आहेत. शेतकी करणें, पशुपालन करणें, देवघेव करणें हीं कर्में वैश्यांचीं जन्मानें झालीं आहेत. तसेंच सेवारूपकर्म शूद्राचें जन्मानेंच आहे.

आपापल्या कर्मामध्यें निमग्न असलेल्या पुरुषाला संसिद्धि म्हणजे ज्ञान योग्यता प्राप्त होते. आपल्या कर्मामध्यें रत असलेल्या पुरुषाला कशी सिद्धि मिळते तें आतां सांगतों, ऐक. ज्याच्यापासून सर्व भूतांची उत्पत्ति झाली आहे, ज्यानें हें सर्व जग व्यापलें आहे, त्या परमात्म्याची आपल्या कर्मानें पूजा करून मनुष्य सिद्धि मिळवितो. उत्तम रीतीनें अनुष्ठिलेल्या परधर्मापेक्षां गुणहीन स्वधर्म अधिक श्रेयस्कर आहे. प्रकृतीनें—जन्मानें प्राप्त झालेलें कर्म केल्यानें मनुष्याला पाप लागत नाहीं. हे अर्जुना, जन्मताच प्राप्त झालेलें कर्म दोषयुक्त दिसलें तरी तें टाकूं नये. ज्याप्रमाणें ओल्या इन्धनाच्या संयोगाने अग्नि प्रारंभीं धूमाच्छादित असतो, तसा स्वधर्माचा आरंभ करण्यापूर्वी कर्त्याचें अंतःकरण शुद्ध नसल्याने स्वधर्मात त्याला दोष दिसतात. पण स्वधर्माचरण केल्यानें त्याची अंतःकरणशुद्धि होते. अंतःकरण-शुद्धि झाल्यानें सर्व विषयांवरची आसक्ति नाहींशी झालेला असा तो मनाला जिंकून देह, जीवित, भोग, यांविषयींची इच्छाहि नाहींशी करतो, आणि ज्ञानपूर्वक सर्वकर्मसंन्यासानें ज्ञाननिष्ठायोग्यतारूप सिद्धीला प्राप्त होतो. अर्जुना, ज्ञाननिष्ठायोग्यतारूप सिद्धीला प्राप्त झालेला पुरुष ज्या प्रकारानें ब्रह्मरूप होतो, तो प्रकार आतां माझ्यापासून संक्षेपानें नीट समजून घे. ती ज्ञानाची पराकाष्ठा आहे. ज्ञाननिष्ठेला योग्य झालेला पुरुष शुद्ध बुद्धीनें युक्त होऊन, मोठ्या धैर्यानें शरीरेंद्रियादि संघाताचे नियमन करून शब्दस्पर्शादि इंद्रियविषयासंबंधीं राग-द्वेषाचाहि त्याग करतो. तो पवित्र व एकांत स्थानीं राहून, आणि सहज पचण्यासारखें परिमित अन्न भक्षण करून, ध्यान व योग यांत नित्य तत्पर असतो. ऐहिक व पारलौकिक सर्व विषयांविषयीं विरक्त झालेला तो, देहादिकांच्या ठिकाणीं असलेला अहंभाव, कामरागादि युक्त सामर्थ्य, मद, वासना, द्वेष, शरीरधारणा व धर्माचरण, यांनाहि अवश्य असणाऱ्या स्त्रीपुत्रवित्तादि साधनांचा त्याग करतो. अशा रीतीनें सर्वप्रकारें ममत्वाचा त्याग करून अतिशय शांत झालेला तो पुरुष ब्रह्मरूप होण्याला समर्थ होतो. याप्रमाणें ब्रह्मरूप झालेला तो पुरुष सर्वत्र परमानंद-रूप आत्मस्वरूपच अनुभवीत असल्यामुळें त्याला शोक करण्यासारखें व इच्छा करण्यासारखें कांहींच उरत नाहीं. अशा रीतीनें सर्व भूतामध्यें

आत्मस्वरूप पाहाणारा तो माझ्या ज्ञानरूप श्रेष्ठ भक्तीला प्राप्त होतो. माझ्या उपाधिकृतभेदाचा जेवढा विस्तार आहे, व उपाधिभेदांनीं रहित आकाशासारखा अपरिच्छिन्न व असंग असा उत्तमपुरुष मी जसा आहे, त्या मला—अद्वैत, चैतन्यमात्र, एकरसरूप, अज, अजर, अमर, अभय, अनिधन म्हणजे सर्व विकाररहित परमात्म्याला – तो माझ्या ज्ञानरूप श्रेष्ठ भक्तीनें यथार्थ जाणतो व आपणच परमात्मरूप होतो. अशा प्रकारें मत्स्वरूप—परमात्मरूप—झालेला ज्ञानी पुढें कोणतीहि कर्मे करीत राहिला तरी माझ्या कृपेनें माझ्या अक्षयपदींच येतो. म्हणून अर्जुना, माझी प्राप्ति करून घेणे हेंच ध्येय पुढे ठेवून विवेकबुद्धीने आपलीं सर्व कर्मे मला परमात्म्यालाच अर्पण कर, आणि माझ्या बुद्धियोगाचा आश्रय करून माझ्या ठिकाणीं नेहमीं चित्त ठेव. माझ्या ठिकाणी सतत चित्त लावलेंस म्हणजे तूं माझ्या कृपेमुळें जन्मजरामृत्युदुःखादि भयंकर संकटें तरून जाशील. पण अभिमानानें माझें ऐकणार नाहींस तर मात्र नाश पावशील. अहंकाराचा आश्रय करून, मी लढणार नाहीं असे तूं म्हणत आहेस. परंतु हा तुझा निश्चय खोटा आहे. तुझा क्षात्रस्वभाव तुला युद्ध करायला लावीलच. अर्जुना, तुझ्या प्रकृतीनें तुला लावून दिलेल्या ( युद्ध ) कर्तव्यानें तू बद्ध झाला आहेस. अविवेकानें ते करण्याचें तूं इच्छीत नाहीस, पण असा प्रसग प्राप्त होईल कीं, प्रकृतिवश होऊन तूं तें करशील. अर्जुना, सर्व भूतांच्या बुद्धींत राहून, यंत्रावर घातलेल्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणे, परमात्मा त्याना नाचवीत आहे. म्हणून सर्वत्र तोच आहे अशी भावना ठेवून त्यालाच शरण जा. त्याच्या प्रसादामुळें तुला परमशांति व शाश्वत ब्रह्मपद प्राप्त होईल. याप्रमाणें गुह्याहून अतिगुह्य असें हें ज्ञान मी तुला सांगितलें, याचा पूर्णपणें विचार करून मग जसें तुला वाटेल तसें तूं कर. अर्जुना, सर्व गुह्यात अतिशय गुह्य असें माझें सर्वश्रेष्ठ वचन पुनः एकदां ऐक. तूं मला अत्यंत प्रिय आहेस म्हणून मी तुला तुझें हित सांगतों. अर्जुना, माझ्याचमध्यें ज्याचें मन आहे असा तूं हो, माझाच भक्त हो, माझेंच पूजन करणारा हो, मलाच नमस्कार कर, म्हणजे तूं मलाच येऊन पोंचशील, हें मी तुला सत्यप्रतिज्ञा करून सागतों. कारण तूं मला प्रिय आहेस. सर्व धर्म

व अधर्म या दोहोंचाहि परित्याग करून केवळ मलाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. म्हणून, तूं शोक करूं नकोस. हे ज्ञान तूं तपश्चर्या न करणाराला सांगूं नयेस. तसेंच जो माझा भक्त नसेल त्याला तर केव्हांहि सागू नयेस (म्हणजे तो अभक्त तपश्चर्या करणारा असला तरीहि त्याला सागूं नयेस). जो गुरु व ईश्वर याची शुश्रूषा करणारा नसेल त्याला हे ज्ञान तूं सागूं नयेस. त्याचप्रमाणें ज्याला माझें ईश्वरत्व सहन न होऊन जो माझा मत्सर करतो, त्याला सागूं नयेस. हे गीताशास्त्र, हे परमगुह्य ज्ञान, माझ्या भक्ताना सागणे ही माझी शुश्रूषाच आहे, असे जाणून जो हे माझ्या भक्ताना सागेल त्याच्या हातूनहि, हें ज्ञान सागणें ही माझी ज्ञानरूप श्रेष्ठ भक्ति होऊन, तोहि निःसशय मलाच येऊन पोंचेल. माझ्या भक्ताना हे शास्त्र सांगणाऱ्या शास्त्रसंप्रदायकर्त्यापेक्षा मला ह्या जगात आज कोणीहि अधिक प्रिय नाहीं, आणि पुढेहि कोणी असणार नाहीं. धर्माला सोडून नसणाऱ्या आम्हा दोघाच्या संवादरूप ग्रंथाचे जो कोणी अध्ययन करील, त्याच्या त्या अध्ययनरूप ज्ञानयज्ञाने माझें पूजनच झाले आहे, असे मी समजतों. जो कोणी श्रद्धाळु व असूया न करणारा पुरुष हा आमचा संवाद नुसता श्रवण करील तोहि, पुण्य कर्म करणारे ज्या शुभ लोकाना जातात, त्या लोकास प्राप्त होईल. हे पार्था, हे मीं जे ज्ञान तुला सांगितलें ते तूं एकाग्रचित्ताने ऐकलेस ना? हे धनंजया, तुला अज्ञानामुळे झालेला मोह सर्वथा नाहींसा झाला का?"

अर्जुन म्हणतो, "अच्युता, तुझ्या कृपेमुळें माझा मोह नाहींसा झाला, आणि मला आत्मस्मृतीचा लाभ झाला. आतां मी संदेहरहित झालों आहें. आता मी तुझ्या वचनाप्रमाणे वागेन."

संजय म्हणाला, "याप्रमाणें वासुदेवाचा व महात्म्या अर्जुनाचा अत्यंत विस्मयकारक व अंगावर रोमाच उभे करणारा संवाद मीं ऐकला. भगवान् व्यासांच्या कृपेनें, ज्ञानैश्वर्यादिसंपन्न योगेश्वर अशा श्रीकृष्णाच्या तोंडून हा अत्यंत गुह्य संवाद, हा परम श्रेष्ठ योग,—मीं स्वतः आपल्या कानांनीं ऐकला. हे राजा धृतराष्ट्रा, हा केशव व अर्जुन यांचा आश्चर्यकारक संवाद पुनः पुनः आठवून मी पुनः पुनः आनंदित होतों. हे राजा, तें श्रीहरीचें अद्भुत

रूप पुनः पुनः आठवून मला मोठा विस्मय वाटतो, आणि वारंवार मला हर्ष होतो. ज्या पक्षामध्यें योगेश्वर कृष्ण आहे, ज्या पक्षामध्यें धनुर्धर पार्थ आहे, त्या पक्षामध्यें संपत्ति, विजय, ऐश्वर्य, आणि नित्य न्याय आहेत, अशी माझी दृढ भावना आहे."

॥ ॐ तत् सत् श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

भगवान् श्रीकृष्णाच्या मुखकमलांतून निघालेल्या गीतेची थोरवी काय सांगावी ! एका गंगेंत स्नान केल्यानें जसें सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य लागतें, एका श्रीहरीला नमस्कार केल्यानें सर्व देवांना नमस्कार केल्यासारखें होते, सर्व मंत्रांचें सार एका गायत्री मंत्रांत दिसतें, तसें वेदादि सर्व शास्त्रांचें सार एका गीतेंत भगवन्तांनीं आणलेलें आहे. म्हणूनच गीता, गंगा, गायत्री आणि गोविंद ही गकार-चतुष्टयी मनुष्य-मात्राचा उद्धार करणारी आहे, असें जें व्यासादि महर्षि म्हणतात तें अगदीं यथार्थ आहे. भगवंताच्या मुखांतून गीताज्ञान श्रवण करताच सर्व जगताचें स्वरूप यथार्थत्वानें कळून भाग्यवान् अर्जुन स्वोद्धारार्थ स्वधर्मकर्तव्याच्या उत्साहानें भरून गेला. त्याने विश्वरूप भगवंताला त्या भावनेनें नमस्कार केला व स्वकर्तव्य करण्याकरतां प्रसन्न चित्तानें गांडीव धनुष्य उचलून घेऊन रथांत तो आपल्या जागेवर आरूढ झाला. स्मितहास्य करीत श्रीकृष्णानें घोड्याचे लगाम धरून घोड्यांना इषारा देतांच तो कपि-ध्वजानें मंडित असलेला रथ पांडवांच्या सैन्यांत आपल्या जागीं जाऊन उभा राहिला.

———

## प्रकरण १२ वें

# भारतीय युद्ध, यादवी व चरित्रोपसंहार

कौरवसैन्याची सिद्धता आहे हें दाखविण्याकरितां भीष्मांनीं शंख वाजवितांच सर्व कौरव सैन्य निरनिराळ्या सेनापतींनीं वाजविलेल्या शंख-नादानें दुमदुमून गेलें. पांडव-सैन्याची सिद्धता आहे असा संदेश मुख्य सेनापति धृष्टद्युम्नाकडून येतांच भगवान् श्रीकृष्णांनीं आपला पांचजन्य शंख प्रथम वाजविला. त्याबरोबर अर्जुनानें आपला देवदत्त नांवाचा शंख फुंकला. लगेच भीमाचा पौंड्र, धर्मराजाचा अनंतविजय, नकुलाचा सुघोष, सहदेवाचा मणिपुष्पक, हे दिव्य शंख वाजूं लागले. धृष्टद्युम्न, सात्यकि, शिखंडी, विराट, द्रुपद, अभिमन्यु व द्रौपदीपुत्र इत्यादि महा-रथ्यांच्या शंखनादाची त्यांत भर पडतांच, त्या आकाशाला भेदून जाणाऱ्या शंखघोषानें पांडवसैन्य रणावेशानें उसळूं लागलें, आणि कौरव-सैन्य भीतीनें भेदरून गेलें. तो दोन्ही सैन्यांतला शंखनाद थांबला. आतां दोन्ही सैन्यांतल्या मुख्य सेनापतींकडून युद्धाला प्रारंभ करण्याकरता सूचना केव्हां होते हें जाणण्याकरितां सैनिक उतावीळ झाले असतांना एक आश्चर्य घडून आलें. धर्मज्ञ राजा युधिष्ठिरानें आपलें दिव्य आयुध हातांतून खालीं ठेवलें. आपलें कवच काढून ठेवून तो झटकन् रथाखालीं उतरला व पूर्वाभिमुख होऊन व हात जोडून पायींच तो शत्रुसैन्याकडे निघाला. तें पाहून पांडवसैन्यांतले सर्व सेनापति बुचकळ्यांत पडले. भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे धर्मराजाला कांहीं विचारणार तोंच स्मितहास्य करीत भगवान् श्रीकृष्ण त्यांना म्हणाले, " मला धर्मराजाचा अभिप्राय समजला आहे. चला, कांहीं न बोलतां त्याच्या पाठोपाठ चला." हें ऐकतांच भीम, अर्जुन, नकुल सहदेव व आपापल्या रथावरून खालीं उतरून

धर्मराजाच्या मागोमाग जाऊं लागले. भगवानहि सर्व पांडव-सेनापतींना निश्चिन्त राहण्यास सुचवून त्याच्या बरोबर निघाले. पांडव व भगवान् श्रीकृष्ण कौरवसैन्यात शिरून पायीं भीष्मांच्या रथाकडे जाऊं लागताच कौरवसैन्यांतले लोक नाना तर्क-कुतर्क करूं लागले. कोणी म्हणाले, 'भीष्मांच्या आधिपत्याखालीं तयार असलेलें आपलें प्रचंड सैन्य पाहताच पांडवांची गाळण उडून ते भीष्माला शरण जात आहेत.' कोणी म्हणूं लागले, 'शिष्टाईच्या वेळीं पांडवाच्या शौर्याचें भडक वर्णन करणारा हा कृष्ण आतां प्रसंग येतांच पांडवांना भीष्माला शरण जाण्यास सांगत आहे.' कोणी म्हणाले, 'धनंजयासारखा जगद्विख्यात धनुर्धर, व भीमासारखा अतुल बलवान योद्धा हे पाठीराखे असताना हा क्षत्रियकुलाला कलंक लावणारा भेदरट धर्म, शरण जाऊन सर्व जगात पांडवाची छीःथू करून घेणार.' कोणी काहीं, कोणी काहीं असे कौरवपक्षीय सर्वजण धर्मराजाची यथेच्छ निंदाच करूं लागले. आपले बंधु व भगवान् श्रीकृष्ण यांसह धर्मराज भीष्माजवळ येताच त्याने त्या आपल्या जगन्मान्य पितामहाच्या चरणावर मस्तक ठेवलें, त्याच्या अनुजांनीं व श्रीकृष्णानेंहि शांतनव भीष्माला नमस्कार केला. धर्मराज हात जोडून नम्रतेनें म्हणाला, "हे तात, आपल्याशीं लढण्याकरिता आम्हां लेकरांना आपण अनुज्ञा द्यावी. अगदी नाइलाज म्हणून आपल्याशीं युद्ध करणें आम्हांला भाग पडत आहे, हें आपण जाणतच आहां. तेव्हां आम्हा बालकांना विजय मिळावा म्हणून आपण प्रसन्न होऊन आशीर्वाद द्यावा, अशी आपल्या चरणीं प्रार्थना आहे." हे धर्मराजाचें नम्र भाषण ऐकतांच वृद्ध पितामहाचे नेत्र निर्मळ प्रेमाश्रूंनीं भरून आले. आणि ते सद्गदित कंठानें म्हणाले, "माझ्या लाडक्या पंडु-पुत्रांनों, तुमचा विजय होईल, तुमचा विजय होईल, मी त्रिवार सत्य सांगतों, तुमचाच विजय होईल. माझी अनुज्ञा मागण्याकरितां आलात ही तुम्ही फार योग्य गोष्ट केलीत. हा भगवान् श्रीकृष्ण तुमच्या पक्षाला असल्यानें तुमची नीतिमत्ता नेहमीं सर्वोत्कृष्ट आणि सर्वमान्य अशीच राहणार, आणि विजयश्री तुम्हांलाच माळ घालणार. युद्ध टाळण्याकरिता तुम्हीं प्रयत्नाची शिकस्त केलीत, हें मी जाणतों. आतां तुम्ही खुशाल युद्ध करा व आपली राज्य-

लक्ष्मी परत मिळवा. तुम्ही विजयी व्हाल, असा मी तुम्हांला मनःपूर्वक आशीर्वाद देतो." इतके बोलून भीष्मानीं आपला प्रेमळ वरदहस्त धर्मराजाच्या मस्तकावर ठेवला, व भगवंताच्या प्रसन्न मुखकमलाकडे नजर टाकली. धर्मराजाचीहि नजर भगवंताच्या मुखाकडे गेली. श्रीकृष्णानें स्मितहास्य करीत प्रथम भीष्माकडे व नंतर धर्माकडे पाहिलें. भीष्म लगेच म्हणाले, "वत्सा धर्मा, कृष्णाच्या मनात तूं आणखी कांहीं मजपासून मागून घ्यावें असे आहेसें दिसतें. धर्मा, पुरुष हा अर्थाचा गुलाम आहे, अर्थ कोणाचाहि गुलाम नाहीं, असे म्हणतात तें खरें आहे. मी अर्थाचा मिंधा असल्यामुळे कौरव जें सागतील ते मला करावें लागत आहे. कौरवानीं युद्ध करावे असें सांगितल्यामुळें मला त्यांच्या बाजूनें युद्ध केलेंच पाहिजे. म्हणून धर्मा, युद्धाशिवाय माझ्यापासून काय पाहिजे तें मागून घे, असे मला तुला सागावे लागत आहे."

धर्मराज म्हणाला, "हे महाबाहो भीष्मा, माझें कल्याण करावयाचें आहे असे मनात वागवून आपण कौरवाच्या बाजूने लढा. युद्धांत आपला पराजय झाल्याचें मी आजपर्यंत ऐकलें नाहीं. तर आपणाला आम्ही युद्धात जिंकण्याला कसे समर्थ होऊं, तें आपण मजवर प्रसन्न झाला असाल तर मला सागावे, एवढेच माझे मागणे आहे." हे ऐकून भीष्म हसून म्हणाले, "म्हणजे माझा मृत्यु कसा होईल हें मीं तुला सागावें, असेच ना? माझा वध करण्याचा ह्या धनुर्धर पार्थानें आपल्या अतुल अस्त्रविद्येच्या जोरावर कसून प्रयत्न करावा. तुमचा सर्वतोपरी नाइलाज झाला तर पुनः माझ्याकडे ये. माझ्या मृत्यूचा उपाय देखील मी तुला आनंदानें सागेन."

हें ऐकून धर्मानें आपल्या भ्रात्यासह त्या पूज्य पितामहाला वंदन केलें व तो सैन्यांतून वाट काढीत गुरु द्रोणाचार्यांच्या रथाकडे गेला. गुरु द्रोणांना सर्वांनीं वंदन करताच भीष्माप्रमाणेच त्यानींहि 'तुम्ही पांडव विजयी व्हाल' असा मनःपूर्वक आशीर्वाद दिला. धर्मराजानें श्रीकृष्णाच्या सूचनेवरून गुरुद्रोणांनाहि, त्यांचा पराभव कसा होईल व ते युद्ध सोडून दूर होतील असा उपाय काय, म्हणून विचारलें. धर्माचा भावार्थ जाणून

गुरुद्रोणांनाहि हंसूं आलें. आपण कौरवांच्या बाजूनें लढणार आहोंत तें केवळ अर्थानें गुलाम झाल्यानेंच. आपलें चित्त पूर्णपणें पांडवांच्या पक्षाकडे आहे, त्यांचें यश आपण नेहमीं चिंतीत असतों असें भीष्माप्रमाणेंच त्यांनींहि सांगितलें; आणि ते म्हणाले, "धर्मा, मी धनुष्यबाण हातात घेऊन लढत असतांना माझ्या विरुद्ध पक्षाला आजपर्यंत केव्हांहि जय मिळाला नाहीं. मी युद्धातून परत फिरणेंहि शक्य नाहीं. माझा वध झाला तरच मी युद्धांतून दूर होणार. माझ्या हातात शस्त्र असतांना युद्धात माझा वध करूं शकेल, असा तर मला कोणीहि दिसत नाहीं. माझा ज्याच्यावर पूर्ण विश्वास आहे, अशा मनुष्याच्या तोंडून युद्धाच्या गर्दीत एखादी अत्यंत अनिष्ट वार्ता मला ऐकूं आली, आणि खिन्न होऊन व हातांतलें शस्त्र खालीं ठेवून मी चित्तशांत्यर्थ योगसमाधि लावून बसलों असतांना तेवढ्या अवधींत जर माझा कोणीं वध केला, तरच ती गोष्ट शक्य आहे. धर्मा, माझ्या वधाचा उपाय याशिवाय दुसरा कांहीं नाहीं. 'तुमचें कल्याण असो. तुमचा विजय होवो.' असा मी मनःपूर्वक तुम्हांला आशीर्वाद देतों." द्रोणाचा निरोप घेऊन श्रीकृष्णासहित पांडव कृपाचार्यांची युद्धार्थ अनुज्ञा घेण्याकरितां गेले. भीष्मद्रोणांप्रमाणेंच त्यांनींहि धर्मराजाला 'तुम्हां पांडवांचा जय होईल,' असा आशीर्वाद दिला. भीष्मद्रोणांप्रमाणेंच त्यांना त्यांचा पराजय कसा होईल हें धर्मानें विचारिलें असतां ते म्हणाले, "धर्मा, मी चिरंजीव असल्यानें मला मृत्यु येणार नाहीं, हें जरी खरें, तरी मी सेनापति नाहीं व पुढेहि सेनापत्य स्वीकारणार नाहीं. म्हणून माझ्या पराजयावर तुमचा जय अवलंबून नाहीं. तुम्ही युद्ध करा. तुम्हांला जय मिळेल. प्रत्येक दिवशीं प्रातःकालीं युद्धाला निघण्यापूर्वी 'पांडवांचा जय होवो' अशी मी प्रार्थना करीत जाईन. जा धर्मा, विजयी हो." कृपाचार्यांच्या नंतर पांडवांनीं शल्याचा आशीर्वाद घेतला व त्याला कर्णाचा तेजोभंग करण्याची आठवण दिली. यानंतर धर्मराज सर्वांसह आपल्या सैन्यांत येण्यास परतला, तेवढ्यांत श्रीकृष्णांनीं आणखी एक मौज केली. वाटेंत त्यांनीं कर्ण दृष्टीस पडतांच त्याला गांठलें व म्हटलें, 'भीष्म युद्ध करीत आहेत तोंपर्यंत तूं कौरवांच्या बाजूनें युद्ध

करणार नाहींस हें खरें ना ? तर मग भीष्म कौरवांकडून युद्ध करीत आहेत तोंपर्यंत तूं आमच्या बाजूनें युद्ध कर.' तें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून कर्णाला हसूं आलें. तो कृष्णाला म्हणाला, " गोविंदा, तूं पांडवांचा खरा पाठीराखा आहेस. त्याना विजय मिळवून देण्याकरिता तूं किती करामती काढशील तें तुझें तुलाच ठाऊक. मी भीष्म पडेपर्यंत कौरवांच्या बाजूनें लढणार नसलों तरी पांडवाना मदत करणार नाहीं हें खास. पण मी लढायला लागल्यावर कसा लढेन तें माझें मनोगत तूं जाणतोस. मला पुनः आठवण देण्याचें कांहीं कारण नाहीं." कर्णाचें हे भाषण ऐकून श्रीकृष्णहि हंसले आणि त्यांनीं पांडवांना गांठलें. त्यांच्यासह ते स्वसैन्यात परत येऊं लागले. वाटेंत दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं येतांच श्रीकृष्णाच्या सूचनेवरून तेथें थोडें थांबून धर्मराजा कौरवसैन्याकडे तोंड करून मोठ्यानें म्हणाला, " वीरहो, आमचा सत्पक्ष आहे असें जाणून तुम्हापैकीं, आम्हाला साह्य करण्याकरिता, जो कोणी आमच्या बाजूला येईल, त्याचा मी आपला म्हणून आदरानें स्वीकार करीन." धर्मराजाच्या ह्या भाषणाचाहि फार उपयोग झाला. धृतराष्ट्राचा दासीपुत्र महापराक्रमी युयुत्सु आपल्या सेना-पथकासह राजरोस पांडवांना येऊन मिळाला. पांडवांनीं मोठ्या आनंदानें त्याचा मोठा आदर करून त्याला आपल्या पक्षांत सामील करून घेतलें. कौरवपक्षाकडील तयारीची पूर्ण माहिती असणारा एक धुरंधर योद्धा पांडवांना मिळाल्यामुळें त्यांना फार आनंद झाला. पांडव पुनः आपापल्या रथांवर चढलेले पाहून धृष्टद्युम्नादि सर्वांनीं आनंदानें रणगर्जना केल्या. युद्धाला सुरवात झाली.

कौरव-पाडव एकमेकावर चढाई करून निघाले त्या वेळचा देखावा अपूर्व होता. दोन्ही सैन्यांतील शंख, भेरी वगैरे रणवाद्यांचे दुमदुमणारे नाद, मदोन्मत्त हत्ती व घोडे यांचे शब्द, आणि योद्धयांचे सिंहनाद, यांचा एकवटलेला घोष, वायूनें खवळलेल्या समुद्राच्या घोषाप्रमाणें, प्रचंड उठला. जेव्हां असंख्य वीरांच्या धनुष्यांचे टणत्कार सुरू होऊं लागले, व त्यांत अर्जुनाच्या प्रचंड गांडीव धनुष्याचा टणत्कार निनादूं लागला तेव्हां भयानें भेदरटांची गाळण उडाली. बिचाऱ्या घोड्यांनीं तर मलमूत्र-

विसर्जन केलें. लवकरच वीरांच्या बाणांनीं नभोमंडल भरून गेलें. महान् महान् योद्धे आपापल्या बरोबरीच्या योद्ध्यांना गांठून झुंजूं लागले. भीष्म-अर्जुन, दुर्योधन-भीम, दुःशासन-नकुल, धृतराष्ट्रपुत्र दुर्मुख-सहदेव, कृतवर्मा-सात्यकि, शल्य-युधिष्ठिर, द्रोण-धृष्टद्युम्न, सौमदत्ति-शंख, बृहद्बल-अभिमन्यु इत्यादि महारथी ससैन्य एकमेकांशीं भिडले तेव्हां भयंकर रणधुमाळी माजली. योद्धयांचे सिंहनाद, धनुष्यांचे टणत्कार, पायदळाच्या पावलांचा दणदणाट, घोड्याच्या टापांचा खडखडाट, हत्तींच्या गळ्यांतील घंटांचे घणघणाट, आयुधाचे खणखणाट, रथांचे घडघडाट व ध्वजांचे फडफडाट अशा भयंकर एकवटलेल्या आवाजांनीं सर्व आसमंत दणाणून गेलें. बाणानीं आकाश भरून गेलें, वीर नखशिखान्त रक्तानें माखले, हजारों मस्तकें तटतटा तुटून आकाशांत वर जाऊन खालीं पडूं लागलीं. वीरांचे हस्तपादादि तुटतांना त्याचा होणारा कच कच असा आवाज, सोंडा तुटल्यामुळे हत्तींचीं धुडें खालीं पडतांना त्याचे होणारे चीत्कार, जायबंदी झालेल्या घोड्यांचे केविलवाणें खिंखाळणें व घायाळ सैनिकांच्या किंकाळ्या ऐकणाऱ्यांच्या अंगावर शहारे येऊं लागले. मूर्तिमंत मृत्यूचा थयथयाट सुरू झाल्याचा भास होऊं लागला. नकुलानें दुःशासनाच्या रथाचा ध्वज तोडला, घोडे मारले आणि सारथ्याला घायाळ केलें. बृहद्बलानें अभिमन्यूच्या रथाचे घोडे मारून त्याचा ध्वज मोडून टाकला. भीष्मार्जुनाचें युद्ध तर फारच घनघोर झालें. वृद्ध-तरुण कांहीं वेळ समबल दिसूं लागले. विराटपुत्र उत्तर आपल्या हत्तीवर बसून शल्यावर चालून गेला. त्या दोन वीरांचें युद्ध तर फारच रंगलें. शल्याला माघार घेण्याची पाळी त्या तरुण वीरानें आणली. त्याच्या मदोन्मत्त हत्तीनें शल्याच्या रथाच्या जोखडावर पाय ठेवला व त्याच्या रथाचे घोडे ठार मारले. आतां मत्त गजेंद्र रथाचाहि चुराडा करतो, असें पाहातांच शल्यानें जिवावर बेतलें असतांच सोडावयाची अशी दिव्य सर्पतुल्य लोहमय शक्ति उत्तरावर सोडली. उत्तराचें चिलखत फोडून ती शक्ति त्याच्या छातींत घुसली, व उत्तर गतप्राण होऊन हत्तीवरून भूमीवर कोसळला. शल्यानें चलाखी करून आपल्या रथांतून खालीं उडी टाकली, व आपल्या हातां-

तील खड्गानें उत्तराच्या हत्तीची विशाळ शुंडा छाटली. त्याबरोबर तो हत्तीहि गतप्राण होऊन खालीं पडला. असें अद्भुत कर्म करून शल्य कृतवर्म्यांच्या रथावर चढला. आपल्या भावाला मारून कृतवर्म्याच्या रथात बसलेल्या शल्याला पाहाताच उत्तराचा भाऊ विराटपुत्र श्वेत आपलें इंद्र-चापतुल्य विशाल धनुष्य ताणून शल्यावर धांवून गेला. आता हा महारथी श्वेत, शल्याचा प्राण घेतल्याशिवाय राहात नाहीं, असें पाहून कौरवाकडचे सात महारथी, शल्याच्या संरक्षणार्थ धांवले, पण श्वेतानें अद्भुत पराक्रम करून.त्या सातहि महारथ्याचा पराभव करून शल्याला गांठलें. त्या विराट-सेनानोनें धडाक्यानें तीन तीक्ष्ण बाण मारून शल्याला मूर्च्छित केलें. हें पाहतांच सर्व सैन्यांतुन हाय हाय असा शब्द उठला भीष्मांच्या कानांवर तो शब्द जाताच ते स्वतः शल्याच्या मदतीला धांवले. तें पाहून श्वेताच्या मदतीला अभिमन्यु, भीमसेन, सात्यकी, कैकेय, विराट, धृष्टद्युम्न हे महा-रथी वीर धावून गेले. पितामह शांतनव भीष्मानीं त्या महारथ्यावर बाणाचा नुसता पाऊस पाडला. भीष्म व श्वेत याची लढाई अभूतपूर्व झाली. भीष्मांनीं श्वेताचे सारथी व घोडे मारून त्याला विरथ केलें. विरथ झालेला श्वेत हातात प्रचंड गदा घेऊन ती गरगर फिरवीत भीष्मावर धांवला. त्याच्या हातांतून ती भयंकर गदा सुटली तर काय होईल याचा चटकन् अंदाज करून त्या चतुर युद्धनिपुण भीष्मांनीं आपल्या रथांतून खालीं उडी टाकली. त्यांच्या अंदाजाप्रमाणें श्वेतानें ती गदा फेकली. भीष्मांना ठार मारण्याकरता फेंकलेल्या त्या गदेनें भीष्मांचा रथ, ध्वज, सारथी, अश्व जुं-जुंपण्यासह चूर्ण झाला. भीष्मांनीं रथाखालीं अगोदरच उडी घेतली होती, हें ज्यांना माहीत नव्हतें त्यांना तर भीष्म मेलेच असें वाटलें. विरथ झालेल्या भीष्मांच्या मदतीला कृप, विकर्ण, दुर्योधन, व सावध झालेला शल्य हे धांवले; व भीमसेन, सात्यकी श्वेताच्या मदतीला धांवले. हा श्वेत आपल्याला फार जड जाणार हें जाणून भीष्मांनीं मग फार विचार न करतां ब्रह्मास्त्रानें भारलेला मृत्युरूप बाण श्वेतावर टाकला. त्या बाणानें भीष्मांनाहि भारी झालेल्या अतुल पराक्रमी श्वेताचे प्राण हरण केले. त्याबरोबर पांडव अत्यंत दुःखी झाले, व दुर्योधन-दुःशासनादि कौरव

आनंदानें थयथय नाचले. सूर्यास्त झाल्यामुळें युद्ध थाबलें. अशा रीतीनें पहिल्या दिवशीं उत्तर व श्वेत याचा नाश होऊन पांडवाची अपरिमित हानि झाली. दुसऱ्या दिवशीं भीमार्जुनांनीं पहिल्या दिवशींच्या पराभवाचा आपल्या पराक्रमानें पुरेपूर सूड उगविला. भीमानें प्रसिद्ध कालिंग वीरांशीं घनघोर युद्ध केलें. त्या दिवशींच्या युद्धांत भीमानें कलिंगराज भानुमान, त्याचा पुत्र केतुमान, व शक्रदेव, आणि हजारों कलिंगवीर, यांना यमसदनाला पाठविलें. अनिवार झालेल्या भीमावर भीष्माचार्य धांवून गेले. त्याबरोबर गाडीवधन्वा अर्जुन भीमाचें संरक्षण करण्याकरतां धांवला. अर्जुनाचा पराक्रम पाहून त्या दिवशीं भीष्माचार्यहि थक्क झाले. आपल्या प्रखर बाणांनीं भीष्माचार्यांच्या अंगाची त्यानें चाळण केली. द्रोण, कृप, शल्य, विकर्ण यांसारख्या वीरांना अर्जुनाच्या बाणांपुढें टिकाव धरवेना. कौरव योद्धे बारा वाटा पळूं लागले. कौरवसैन्याची झालेली भयंकर प्राणहानि व दाणादाण उडालेली पाहून भीष्म द्रोणांना म्हणाले, " ह्या बलाढ्य अर्जुनानें आज आमच्या सैन्यात केवळ वणवा पेटवून दिला आहे. याच्या ह्या उग्र स्वरूपापुढें आज कोणी तग धरील असें दिसत नाहीं. सूर्यहि अस्तास जाण्याच्या बेतांत आहे. आणखी कांहीं वेळ युद्ध चाललें तर काय अनर्थ होईल हें समजत नाहीं म्हणून मी आतां सैन्याला युद्धापासून विनिवृत्त होण्याची आज्ञा देतों." अर्जुनाच्या पराक्रमाला भिऊन थोडा वेळ आधीं युद्ध बंद करण्याची पाळी भीष्मासारख्या सेनानायकावर आली. त्या दिवशीं कौरव दुःखित अंतःकरणानें परत फिरले. परत फिरतांना पांडवसैन्य जयघोष करीत होतें.

त्या रात्रीं राजा दुर्योधन भीष्माचार्यांच्या शिबिरांत गेला व म्हणाला, " आजोबा, आज आपण, गुरुद्रोण, कृपाचार्य, अश्वत्थामा, असे मोठमोठे महारथी हजर असतांना अर्जुनापुढून आमच्या सैन्यानें पळ काढला, याबद्दल मला अत्यंत खेद होतो. आपण जर पांडवांचा नाश व्हावा या हेतूनें मनापासून युद्ध कराल, तर पांडव म्हणजे आपल्यापुढें कःपदार्थ आहेत, असें मलाच काय, पण आमच्या बाजूच्या सर्वांना वाटतें. आपण मनापासून युद्ध करणार नाहीं असें जर मला अगोदर कळतें, तर मी युद्धाच्या बाब-

तींत कर्णाच्या मतानें चाललों असतों." दुर्योधनाचें हें भाषण ऐकून भीष्मांना अतिशय क्रोध आला. ते म्हणाले, "कृष्णसाहाय्य असलेल्या पार्थापुढे, आमचेंच काय, कोणाचेंच कांहीं चालणार नाहीं. तुझा कर्णहि अर्जुनापुढें काय दिवे लावणार, तें एकदां नाहीं चारदां दिसलें आहे. ठीक आहे; तुझ्या म्हणण्याचा भावार्थ मला समजला. उद्यां मी माझें सामर्थ्य तुझ्याच काय, सर्व जगाच्या प्रत्ययाला येईल असें दाखवितों. जा आतां. उद्याचें माझें समरकर्म पाहून काय तर्ककुतर्क करायचे असतील ते कर." भीष्म रागावले, आतां ते उद्यां कांहीं तरी अद्भुत करून दाखवतील, अशी खात्री वाटून दुर्योधन आनंदानें आपल्या शिबिरांत गेला. तेथें कर्ण, दुःशासन, शकुनि, हें त्रिकुट त्याची वाट पाहात होतेंच. दुर्योधनानें सांगितलेली हकीगत ऐकून त्यानाहि बरें वाटलें. तिसरे दिवशीं सर्व सकाळभर पाडवाचीच सरशी दिसत होती. पण माध्याह्न उलटून सूर्य दुसऱ्या बाजूला कलला मात्र, भीष्मांनीं आपलें अपूर्व युद्धसामर्थ्य दाखविण्यास सुरवात केली. सर्पासारखे विषारी बाण ते चौफेर फेंकूं लागले. पांडवांकडच्या रथी, महारथी, यांना आव्हान करकरून ते झुंजूं लागले. त्यांच्यापुढें जे आले ते एक पळाले तरी किंवा मेले तरी. टिकाव धरून कोणीच राहूं शकेना. भीष्म चौफेर बाण सोडीत असतां अलातचक्राप्रमाणें, पाहावें तिकडे आहेतच असा भास होत होता. पांडवांकडचे हजारों हत्ती व घोडे मारले गेले. एका पाठोपाठ एक रथी धारातीर्थीं पडूं लागला. रक्तमांसाचा चिखल झाला. मरून पडलेले हत्ती, घोडे, योद्धे यांनीं सर्व भूमि इतकी व्याप्त झाली होती कीं, तींतून रथ जाण्याला वाट मिळेना. पांडवसैन्याची अशी दाणादाण झालेली पाहून भगवान अर्जुनाला म्हणाले, "अर्जुना, हा म्हातारा भीष्म क्रोधानें बेभान झाला आहे. चल, त्याच्यासमोर मी तुझा रथ नेऊन उभा करतों. पराक्रमानें आणि तपश्चर्येनें आजपर्यंत मिळविलेल्या दिव्यास्त्रांचा मारा करून आज ह्या म्हाताऱ्याला तूं कायमचा निर्जीव. भीष्म-द्रोणांना मारण्याची उपप्लव्यांत केलेली प्रतिज्ञा आज खरी कर." अर्जुनानें कृष्णाच्या म्हणण्याला संमति देतांच, कृष्णानीं तो दिव्य रथ भीष्माच्या बाजूला नेला. अर्जुनानें भीष्मांचे बाण थांबविण्याची शिकस्त

केली. तरी देखील त्यांची चौफेर बाणवृष्टि थांबेना. पाडवसैन्याची अपरिमित हानि झाली. पांडवांचे सैन्यात त्या दिवशीं भीष्माच्या भीतीनें मोठी लाजिरवाणी पळापळ झाली. अशा पांडवसेनेच्या गोंधळलेल्या स्थितींत अर्जुनावर विकर्ण, जयद्रथ, भूरिश्रवा, कृतवर्मा, विंद, अनुविंद, सुदक्षिण, क्षुद्रक आणि मालव देशाचे राजे चालून आले. अर्जुन व कृष्ण शत्रूच्या चतुरंग बलानें वेढले गेले आहेत, असें पाहून सात्यकि त्यांच्या साह्यार्थ धांवून आला. भीष्माच्या तडाक्यामुळें त्रासून पळणाऱ्या वीराना उद्देशून तो म्हणाला, "क्षत्रियाना अत्यंत लाजिरवाणी अशी गोष्ट तुम्ही करतां आहांत. परत फिरा. धारातीर्थी मरून स्वर्ग मिळवा, पण पळून जाऊन तुमच्या क्षत्रियकुलाना कलंक लावूं नका." श्रीकृष्णांनीं सर्व स्थिति बारकाईनें लक्ष्यपूर्वक अवलोकन केली. भीष्मानीं पांडवसैन्याची एवढी दाणादाण केली, पण अर्जुनाचा प्राणघात करावा असें ते त्याच्याशीं लढले नाहींत. अर्जुनहि हे आपले वृद्ध आजोबा, अशा भावनेनें भयंकर प्राणघातक अस्त्रें भीष्मांवर टाकीना. हें लपंडावाचें युद्ध भगवानाला सहन झालें नाहीं. "परत फिरा, पळूं नका!" म्हणून कंठशोष करून रथ्यामहारथ्याना सांगणाऱ्या सात्यकीला भगवान् म्हणाले, "सात्यके, थांब. उगाच कंठशोष करूं नकोस. पळत आहेत त्यांना खुशाल पळून जाऊं दे. येथें नुसतें उभें राहण्याचें जे ढोंग करीत आहेत, त्यांनाहि पाहिजे तर जाऊं दे. तूंहि थोडा थांब, आणि आता चमत्कार पाहा. अन्यायानें लढणाऱ्या मदोन्मत्त दुर्योधनादि कौरवांचे व त्यांच्या बाजूनें लढणाऱ्या या विवेकहीन भीष्मद्रोणादिकांचे प्राण हरण करून जगाला स्वास्थ्य देण्याचें व धर्माला सुप्रतिष्ठित करण्याचें कर्तव्य पांडवांकडच्या अस्सल क्षत्रिय योद्ध्यांनीं केलें पाहिजे. ह्या युद्धांत हातांत शस्त्र न धरण्याची माझी प्रतिज्ञाहि ह्या कर्तव्यापुढें मी झुगारून देतों, आणि भीष्म-द्रोणांची आजच्याआज समाप्ति करून ह्या दुष्ट कौरवांना यमसदनाचा मार्ग दाखवितों." असें म्हणून भगवानांनीं हातांतले लगाम फेंकून देऊन रथाखालीं उडी घेतली व खड्ग घेऊन ते भीष्मावर धांवून गेले. त्यावेळीं तो शामसुंदर भगवान् कल्पान्तकाळच्या अग्नीप्रमाणें उग्र भासला. त्याला

आपल्याकडे येतांना पाहून भीष्म म्हणाले, "ये ये माधवा, आज तूं प्रत्यक्ष माझ्यावर चालून आलास, हा माझा फार मोठा मान झाला. माझ्या आजच्या ह्या पराक्रमाला सर्व त्रैलोक्य मान डोलवील. ये ये केशवा, तुझ्या हातून मला मृत्यु आला, तर मी आपल्याला मोठा भाग्यवान् समजेन." भगवानाच्या पाठोपाठ अर्जुनानें रथांतून खालीं उडी घेतली व त्यानें भगवंताला गाठून व आपल्या हाताचा घट्ट विळखा घालून त्याला थांबविलें आणि म्हटलें, "कृष्णा, माझ्यावर रागावून तूं भ्रष्टप्रतिज्ञ होऊं नकोस. मी आपल्या बंधूंची व पुत्राची शपथ घेऊन तुला सागतों, कीं मी जें कर्म करीन म्हणून उपप्लव्यात प्रतिज्ञा केली तें कर्म करण्यास मी चुकणार नाहीं." अर्जुन कर्तव्योन्मुख झालेला पाहून भगवान् पुनः रथारूढ झाले. आणि मग मात्र गाडीव धनुष्यानें केलेला भडिमार अपूर्व असाच झाला. अर्जुनावर भीष्मानीं सोडलेली शक्ति, दुर्योधनानें फेकलेला तोमर, भूरिश्रव्यानें सोडलेले सात उत्कृष्ट भल्ल, व शल्यानें फेकलेली गदा, यांचा एकेकाच बाणानें फडशा पाडून, नंतर त्या सर्वांना बाणांचा भडिमार करून अर्जुनानें सर्वांना त्राहि त्राहि करून सोडलें. ह्याप्रमाणें युद्धाचा तिसरा दिवस समाप्त झाला.

चवथ्या दिवशीं भीमानें धृतराष्ट्राचे सेनापति, सुषेणादि आठ पुत्र मारिले. धृष्टद्युम्नानें महाधनुर्धर सायंमनिपुत्र मारला. पाचव्या व सहाव्या दिवशीं भीमपुत्र घटोत्कच व अर्जुनपुत्र अभिमन्यु, यानीं विलक्षण पराक्रम करून कौरवांची जय मिळविण्याची आशा पार नाहींशी केली. सातव्या व आठव्या दिवशीं भीमसेनानें धृतराष्ट्रपुत्रापैकीं सुनाभादि बारा पुत्रांना यमलोकीं पाठविलें. ह्या दोन दिवसात नकुल-सहदेवाचा पराक्रम पाहून कौरवांच्या तोंडचें पाणी पळालें. नवव्या दिवशीं अर्जुनाला चेव आणण्याकरितां भगवंताला पुनः भीष्मावर धांवून जाण्याचें नाटक करावें लागलें. त्या दिवशींहि भीष्मार्जुनाच्या समरकर्मांत दोन्ही पक्षांची भयंकर हानि झाली भीष्म हे इच्छामरणी होते. त्यांच्याकडून त्याचा मृत्युयोग समजल्याशिवाय उगीच युद्ध करीत बसणें व्यर्थ आहे, असें भगवानांनीं ठरवून नवव्या दिवशीं रात्रीं ते धर्मराज, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव,

यांना घेऊन भीष्माच्या शिबिरांत गेले. भीष्मांनीं त्या सर्वांचें आनंदानें स्वागत केलें व त्यांनींहि भीष्मांना प्रेमानें नम्रतापूर्वक वंदन केलें. भीष्मांनीं त्याच्या येण्याचा हेतु ओळखला. तेहि आतां त्या अन्याय्य युद्धाला व असंख्य वीरांच्या हत्येला कंटाळले होते. म्हणून धर्मानें विचारतांच त्यांनीं त्याला सांगितलें, " धर्मा, महारथी शिखंडी हा पहिल्याप्रथम स्त्री असल्यानें मी त्या योद्धयाशीं लढणें पाप समजतों. तो माझ्यावर चालून येऊन माझ्याशीं युद्ध करूं लागला कीं मी धनुष्य खालीं ठेवीन. मग अर्जुनानें त्याच्या मागें उभा राहून व मी त्याचा आजा वगैरे कांहींएक मनांत न आणता आपल्या परमतीक्ष्ण बाणांनीं मला घायाळ करून खालीं पाडावें. मग मी आपल्या इच्छेप्रमाणें देह सोडीन. शिखंडीशीं मी युद्ध करणार नाहीं, हें कौरवांना व तत्पक्षीय सर्व योद्धयाना ठाऊक असल्यामुळे त्या वेळीं शिखंडीचें मात्र पूर्ण रक्षण करून त्याला माझ्यासमोरून मी खालीं पडे-पर्यंत हालूं देऊं नका. पण कौरवांच्याकडून जर कां शिखंडी माझ्या-समोरून थोडा दूर केला गेला तर मी धनुष्य उचलीन आणि मग मात्र मी तुम्हांलाच काय, सर्व त्रिभुवनाला भारी आहें, ह्याची जाणीव ठेवा. जा, भगवान् कृष्ण तुमचा पाठीराखा आहे, तो तुमच्या हातून सर्व गोष्टी व्यवस्थित पार पाडील. " इतकें बोलून भीष्म भगवंतांच्याकडे वळले व म्हणाले, "कृष्णा, माझ्या मृत्युसमयीं तुझें हें ज्ञानसंपन्न, प्रफुल्लित, सुहास्य सुंदर मुखकमल माझ्या डोळ्यांसमोर राहूं दे. एवढी माझ्यावर कृपा कर, म्हणजे अज्ञानांधःकाराची अडचण मला न होतां मी मोक्षाला जाईन." हें ऐकून भगवंतांनीं भीष्माला प्रेमभरानें आलिंगन दिलें. त्यावेळीं दोघां-च्याहि डोळ्यांतून प्रेमाश्रू आले. नंतर भीष्मांचा निरोप घेऊन भगवान् पांडवांसह आपल्या शिबिरांत परत आले.

भारतीय युद्धाचा दहावा दिवस चिरस्मरणीय झाला. भीष्मांनीं सांगि-तल्या तशाच सर्व गोष्टी घडून आल्या. भीष्मांसमोर लढण्याकरितां येणाऱ्या शिखंडीला पुढें येऊं न देण्याबद्दल कौरवपक्षीय सर्व योद्धयांनीं हातांवर शिर घेऊन पांडवपक्षीयांशीं सामना दिला. अर्जुनाचें सामर्थ्य त्या दिवशीं सर्वांच्या अनुभवास आलें. शेंकडों महारथ्यांपासून शिखंडीचें

संरक्षण त्यानें एकट्यानें केलें व त्याच वेळीं तो भीष्माशींहि लढत राहिला. शेवटीं त्यानें शिखंडीला भीष्मासमोर आणून भीष्माशीं त्याचें युद्ध होण्याचा प्रसंग जमवून आणिला. शिखंडीला पाहातांच भीष्मांनीं धनुष्य खालीं ठेवलें. त्यावेळीं शिखंडीच्या आड उभा राहून बाण मारणाऱ्या अर्जुनाचा प्रतिकार करण्याकरितां द्रोण, कृप, बाल्हिक, भूरिश्रवा, अश्वत्थामा, शल्य, वगैरेंनीं आपलें होतें नव्हतें तेवढें शस्त्रास्त्रसामर्थ्य प्रगट करून रक्ताच्या नद्या वाहविल्या. पण अर्जुनाने त्या सर्वांना तोंड देऊन भीष्माच्या अंगांत एवढे शर घुसविले कीं त्यायोगें तो जगप्रसिद्ध योद्धा घायाळ झाला. सर्व योद्धयाना तोंड देताना अर्जुन शिखंडीच्या मागून जरा बाजूला झाला कीं, भीष्म त्याच्यावर दिव्यास्त्राचा वर्षाव करीतच होते. पण अर्जुन त्यांच्या अस्त्रांचा नाश करून पुनः शिखंडीच्या मागून त्यांच्यावर बाणाचा पाऊस पाडी. असें होता होतां भीष्माना अर्जुनाचे अंगांत घुसलेले बाण सहन करणें अशक्य होऊन शेवटीं ते रथाखालीं पडले. भारताला ललामभूत असलेला व वीराच्या कोंदणात मध्यभागीं बसविलेला दिव्य हिरा एकाएकीं निखळून पडला. भारतीय आकाशातील अत्यंत तेजःपुंज तारा एकाएकीं अस्ताला गेला. भीष्मांचा देह रथाखालीं पडला, तेव्हां त्यांच्या अंगांत इतके शर घुसले होते कीं, त्यांच्या देहाला भूमीचा स्पर्श न होता तो शरासनावर वरच्यावर राहिला. मोक्षेच्छु पुरुषानें दक्षिणायनांत देह ठेवणें प्रशस्त नाहीं, असें शास्त्र असल्यानें भीष्मानीं उत्तरायण सुरू होईपर्यंत वाट पाहात त्या शरशय्येवर पडून राहावयाचें ठरविलें. त्यांच्या सांगण्याप्रमाणें अर्जुनानें कौशल्यानें त्यांच्या मानेखालीं जमीनींत बाण मारुन शरांवर त्यांचें मस्तक व्यवस्थित राहील असें केलें. त्यानें एका शरावर जलाभिमंत्रण करून तो भूमींत मारला व पाताळगंगेची धार त्यांच्या मुखांत पाहिजे त्यावेळीं पडेल, अशी व्यवस्था केली. दुर्योधनानें त्यांच्या शरशय्येभोंवतीं विस्तीर्ण खंदक खणून त्यांना कोणत्याहि तऱ्हेचा त्रास होऊं नये असा त्या जागेचा पूर्ण बंदोबस्त केला. भीष्म याप्रमाणें उत्तरायणाची वाट पाहात पडून राहिले.

अर्जुनाच्या रथावर हातांत घोड्याचे लगाम धरून बसलेल्या श्रीकृष्णाच्या

हातांतच पांडवांच्या बाजूचीं युद्धसूत्रेंहि होतीं. भगवानांच्या चातुर्यानेंच प्रत्येकवेळीं पांडवांची बाजू सांवरली जात होती. भीष्म लढत होते तों-पर्यंत कर्णानें युद्धांत भाग घेतला नव्हता. कर्ण हें एक अर्जुनावरचें फार मोठें संकट होतें. इंद्रानें ब्राह्मणाच्या रूपानें कर्णाचीं दिव्य कवच-कुंडलें हरण केलीं, त्यावेळीं कर्णाचें दातृत्व पाहून इंद्र प्रसन्न झाला व त्यानें कर्णाला आपली दिव्य वासवी शक्ति दिली. ही अमोघ शक्ति ज्याच्या नांवाचा उच्चार करून सोडली जाईल त्याचा ती नाशच करील अशी होती. फक्त ती सोडण्याची एकच अट होती. दुसऱ्या कोणत्याहि उपायानें शत्रु हटत नाहीं, आतां शत्रूच्या हातून सुटण्याला दुसरा इलाजच नाहीं अशी वेळ आली म्हणजेच ती शक्ति सोडावी असें ती शक्ति देतांना इंद्रानें सांगितलें होतें. अर्जुनाशीं आपला घनघोर संग्राम होऊं लागला, म्हणजे अर्जुनाचा खात्रीपूर्वक नाश करण्याच्या हेतूनें ती शक्ति कर्णानें अगदीं जिवापाड जपून ठेविली होती. या शक्तीच्या जोरावरच पांडवाशीं युद्ध करण्याचा सल्ला दुर्योधनाला त्यानें दिला होता, ही गोष्ट भगवंताला माहीत होती. भारतीय युद्धांत पहिले दहा दिवस कर्ण युद्धांत नसल्यानें, श्रीकृष्ण स्वस्थचित्त होते; परंतु आतां कर्णार्जुन युद्धप्रसंग, ती शक्ति कर्णाजवळ असेपर्यंत, कसा टाळावा या विचारांत ते पडले. भीष्मानंतर गुरु द्रोण कौरवसेनेचे मुख्य सेनापती झाले. राजा दुर्योधनाच्या डोक्यांत धर्मराजाला जिवंत पकडण्याबद्दल गुरु द्रोणांना गळ घालण्याचें कोणीं भरविलें तें एक भगवान् जाणे. पहिल्या दहा दिवसांत पांडवांचें, विशेषतः भीमार्जुनांचें, अचाट सामर्थ्य पाहून लढून जय मिळेल असें दुर्योधनास वाटेना. म्हणून धर्माला पकडून व त्याला पुनः द्यूत खेळायला लावून पांडवांना पुनः दीर्घ काल वनांत पाठवण्याची मूर्ख व खुळचट कल्पना दुर्योधनाला कोणीं तरी सुचविली. ती त्याला पटली, आणि गुरु द्रोणाचार्यांना त्यानें धर्माला युद्धांत जिवंत पकडण्याबद्दल गळ घातली. 'अर्जुनाला दूर कोठें तरी युद्धांत गुंतवून ठेवलात तर तो जवळ नसतांना मी धर्माला जिवंत पकडून तुझ्या स्वाधीन करतों.' असें आचार्योंनीं त्याला सांगितलें. अर्जुनाला युद्धार्थ आव्हान देऊन दूर कोण नेणार, हा प्रश्न

उपस्थित झाला. तेव्हां त्रिगर्त देशचे पांच राजपुत्र सत्यरथ, सत्यवर्मा, सत्यव्रत, सत्येषु, व सत्यकर्मा हे आपले दहा हजार रथी घेऊन आले; मालव व तुंडिकेर हे आपले तीस हजार रथी घेऊन आले; प्रस्थलाधिपति पुरुषश्रेष्ठ सुशर्मा हा आपल्या भावांसह दहा हजार रथी घेऊन पुढें आला. ह्या सर्व राजांनीं अर्जुनाला युद्धार्थ आव्हान देण्याचें ठरविलें. अर्जुनाला तरी मारूं, नाहींतर आम्ही तरी मरून जाऊं, पण युद्धांतून परत फिरणार नाहीं; अशा त्यांनीं अग्निसाक्षिक शपथा घेतल्या. अशा शपथा घेतलेल्या राजांना संशप्तक हें नांव पडलें. संशप्तकांनीं युद्धाला आव्हान देतांच, वीरश्रेष्ठ सत्यजिताला धर्मराजाच्या रक्षणास ठेवून अर्जुन त्याच्याशीं लढण्यास गेला. द्रोणांनीं इकडे पांडवांशीं घनघोर युद्ध सुरू केलें. धर्माला त्यांनीं जवळ जवळ पकडलेंच, असें पाहून त्याच्या रक्षणाकरितां ठेविलेला अमोघ पराक्रमी शूर सत्यजित आचार्यांच्यावर धावून गेला. त्यानें आपल्या अस्त्रनैपुण्यानें आचार्यांनाहि चकित केलें. त्याच्या एका तीक्ष्ण बाणानें आचार्य मर्मस्थानीं विद्ध होऊन क्षणभर मूर्च्छित झाले, परंतु लगेच त्यांनीं सावध होऊन आपल्या प्रखर अर्धचंद्र बाणानें सत्याजिताचें मस्तक उडविलें. त्याबरोबर भीम क्रुद्ध होऊन आचार्यांच्यावर धांवला. भीमसेनाच्या मदतीला सात्यकि, धृष्टद्युम्न, चेकितान हेही धांवून गेले. आचार्यांनीं आपल्या बाणानीं त्या सर्वांची दाणादाण उडवून त्याना पळवून लावलें. युधिष्ठिराला सोडून जायचेंच नाहीं अशा निश्चयानें भीम कसाबसा टिकाव धरून राहिला होता.

अशा वेळीं कर्ण त्याच्यावर चालून गेला तर थकलेला भीम पडेल तरी, नाहींतर पळून जरी जाईल, असें वाटून दुर्योधन कर्णाला चिथावणी देऊं लागला. पण पांडवांवर नेहमीं दांतओठ खाणारा कर्ण, भीमावर चालून जाईना, हें पाहून दुर्योधनाला आश्चर्य वाटलें. कर्णाच्या ह्या विचित्रपणाचें कारण त्याला स्वतःला व भगवानांनाच माहित होतें. याप्रमाणें सतत दोन दिवस आचार्य धर्माला गांठण्याकरितां झटत होते. ह्या दोन दिवसांत अर्जुनानेंहि पुढें आलेल्या संशप्तक राजांचा धुव्वा उडविला. प्राग्ज्योतिषपूरच्या वृद्ध भगदत्त राजानें अर्जुनावर वैष्णवास्त्र सोडून

मोठाच प्रसंग आणिला. परंतु भगवानाला वैष्णवास्त्राचा परिहार कसा करायचा हें माहित असल्यामुळें त्या अस्त्राला आपल्या अंगावर घेऊन, त्यानें अर्जुनाला वांचविलें. हा भगदत्त इतका वृद्ध होता कीं याच्या सर्व अंगावरचे केस पिकून सर्वांगाला सुरकुत्या पडल्या होत्या. पापण्यासुद्धां सुरकुतून डोळे झांकून गेल्यामुळे ते उघडे राहाण्यासाठीं पापण्या फडक्यानें वर आंवळून टाकाव्या लागल्या होत्या. प्राग्ज्योतिषपूरच्या नरकासुराचा भगवंतानें वध केला होता, त्याचा सूड घेण्याकरितां हा वृद्ध भगदत्त कौरवांना मिळाला होता. केवढी ही सूडबुद्धि ! आणि युद्धाची हौस ! अर्जुनानें ह्या भगदत्ताचा वध केला. तिसऱ्या दिवशीं द्रोणाचार्यांनीं चक्रव्यूहाची रचना केली. कृष्णार्जुन संशप्तकाबरोबरच लढण्यात गुंतले होते. त्या दिवशीं ह्या व्यूहरचनेनें पांडवांच्यावर मोठेंच संकट आणलें. पण अर्जुनासारखाच, किंबहुना त्याच्यापेक्षांहि अधिक पराक्रमी, त्याचा सोळा वर्षांचा पुत्र अभिमन्यु यानें धर्माच्या सांगण्यावरून हा व्यूह फोडण्याचा प्रयत्न केला, व फोडला. व्यूह फोडण्याची विद्या त्याला अर्जुनापासून अवगत झाली होती. आंतून बाहेर येण्याची विद्या मात्र अद्याप त्याला शिकायची होती. हा पराक्रमी बालवीर व्यूहांत शिरला. त्यानें द्रोण, कर्ण, अश्वत्थामा, कृप, कृतवर्मा, बृहद्बल अशा महारथी वीरांचा एकेकट्याचा पराभव करून त्यांची गाळण उडविली. शेवटीं हा अनावर बालक आज सर्वांनाच लोळवितो, असें पाहून धर्मयुद्धाचे नियम बाजूला ठेवून ते सर्व महारथी एकट्या अभिमन्यूवर चालून गेले. त्याच्या मदतीला येणारे भीम, सात्यकि, नकुल, सहदेव, धृष्टद्युम्न ह्या सर्व योद्धयांना जयद्रथानें, उग्र तपश्चर्येच्या योगानें शंकरापासून मिळविलेल्या एका वराच्या जोरावर व्यूहद्वाराशीं अडवून ठेवलें. व्यूहांत एकाकी सांपडलेल्या त्या अभिमन्यूला सर्वांनीं मिळून ठार मारलें. पांडवांना अतिशय दुःख झालें. संशप्तकांचा पूर्ण नाश करून परत आलेल्या अर्जुनाला तर फारच शोक झाला. कृष्णांनीं सर्वांना समजुतीच्या गोष्टी सांगून सर्वांचें समाधान केलें. ज्यांनीं एकत्र मिळून व अधर्मयुद्ध करून अभिमन्यूला ठार मारिलें त्या सर्व योद्धयांवर व विशेषतः जयद्रथावर अर्जुन फारच

चिडला. त्यानें " उद्या युद्धांत अस्तमानापर्यंत जयद्रथाचा वध करीन, नाहींतर स्वतः अग्निकाष्ठ भक्षण करीन." अशी भीषण प्रतिज्ञा केली. ती प्रतिज्ञा ऐकून जयद्रथ अत्यंत घाबरला. तो युद्ध सोडून स्वदेशीं जाण्याच्या तयारीला लागला. पण दुर्योधनानें द्रोणाचार्यांच्याकडून त्याला आश्वासन देऊन, ठेवून घेतलें. सर्वांनीं मिळून अस्तमानापर्यंत जयद्रथाचें रक्षण करायचें, म्हणजे अर्जुन स्वतःच्या प्रतिज्ञेनें मेलाच, असें वाटून कौरवांना आनंद झाला.

चवथ्या दिवशीं अर्जुनानें न भूतो न भविष्यति असें घनघोर युद्ध करून कौरवाकडचे दहा हजार रथी तिसऱ्या प्रहरापर्यंत मारले. युधिष्ठिर, भीम, नकुल, सहदेव, ह्या सर्वांनींच त्या दिवशीं अपूर्व पराक्रम गाजविला. भीमानें अलंबुष राक्षसाला ठार मारलें. केकय राजानें क्षेमधूर्तीला मारलें, चेदिदेशाधिपति धृष्टकेतूनें वीरधन्व्याचा नाश केला. भीमानें कर्णाचा पराभव करून दुःशासन–दुर्योधनांचा पराभव केला. सात्यकीनें भूरिश्रवाला ठार मारलें. इतकें सर्व झाले पण जयद्रथाची गांठ पडेना. अर्जुन गोंधळला; पण योगेश्वर कृष्णांनीं आपल्या योगमायेनें जिकडे तिकडे अंधःकार उत्पन्न करून सूर्यास्त झाल्याचा भास उत्पन्न केला. त्याबरोबर जयद्रथाच्या भोंवतालचें रक्षणाचें कार्य सैल पडून जयद्रथ अर्जुनाच्या दृष्टीस पडला. जयद्रथाचें मस्तक जो भूमीवर पाडील त्याचें मस्तक शतधा विदीर्ण होईल, असा एक वर जयद्रथाचा बाप वृद्धक्षत्र यानें जयद्रथाला दिला होता, ही गोष्ट भगवंताला माहीत होती. ही धोक्याची सूचना अर्जुनाला देऊन भगवंतांनीं जयद्रथाचें मस्तक दिव्य अस्त्रांनीं तोडून तें खालीं पडूं न देतां वरच्यावर उडवीत अस्त्रप्रभावानें अरण्यांत वृद्धक्षत्र तपश्चर्या करीत होता त्याच्या मांडीवर पडेल असें कर, असें त्याला सांगितलें, आणि भगवानांनीं एकदम आपली योगमाया आवरून अंधःकार नाहींसा केला. त्याबरोबर मावळता सूर्य व अर्जुनाच्या दिव्यास्त्रानें वर उडविलेलें जयद्रथाचें मस्तक एकदमच सर्वांच्या दृष्टीस पडलें. तें मस्तक दिव्यास्त्रानें उडवीत नेऊन अर्जुनानें, अरण्यांत संध्योपासनेंत मग्न असलेल्या वृद्धक्षत्राच्या मांडीवर पाडलें. तो घाबरून एकदम उठला त्याबरोबर तें मस्तक जमिनीवर पडलें व वृद्धक्षत्राचें

मस्तक शतधा विदीर्ण झालें. त्याचा दुष्ट वर त्यालाच फलद्रूप झाला.

जयद्रथाचा वध होतांच कौरवसैन्यांत एकच हाहाःकार उडाला. दुर्योधन राजा एकदम निस्तेज पडला. त्याचे डोळे दुःखाश्रूंनीं भरून आले. तो द्रोणाचार्यांचे पुढें जाऊन उभा राहिला, व कांहींसा वैतागून म्हणाला, " आचार्य, आपलें अर्जुनाविषयीं शिष्यवात्सल्य असल्यामुळें आपल्याकडून लढण्यात हयगय झाली, म्हणून आमचा जय इच्छिणारे लोक एका पाठोपाठ एक मृत्युमुखीं पडले. आपल्यापुढून अर्जुन व्यूहाचे मध्यभागीं असलेल्या जयद्रथापर्यंत जाऊन पोहोंचतो व त्याचा वध करतो ही गोष्ट लाजिरवाणी आहे." दुर्योधनाचे हे मूर्खपणाचे उद्गार ऐकून आचार्य खवळले व एकदम म्हणाले, " तुझा कर्ण जिवंत असता त्याच्या देखत अर्जुनानें जयद्रथाचा प्राण घेतला हें तुझ्या लक्षांत येत नाहीं. कृपाचार्य, शल्य, अश्वत्थामा, दुःशासन, शकुनी व तूं स्वतः हजर असतांना तुमच्या डोळ्यांदेखत जयद्रथाचें मस्तक अर्जुनाच्या दिव्यास्त्रानें आकाशात उडून स्यमंतपंचकाच्या बाहेर पडलें, ह्याची लाज तुम्हाला वाटत नाहीं. ह्या गोष्टीपासून तुम्हाला कांहीं बोधहि होत नाहीं अं! कृष्णार्जुनाच्या पुढें तुम्हांलाच काय, कोणालाच जय मिळणार नाहीं. जेथें धर्म, नीति, तेथें कृष्ण; आणि जेथें कृष्ण तेथें जय हा सिद्धान्त आहे. राजा, तुला किती सांगितलें तरी कांहीं समजत नाहीं, असें पाहून भीष्म वैतागानें पडेपर्यंत लढले. मींहि आज तोच निश्चय केला आहे. हे पाडव, पाचाल, माझ्यावर धावून येत आहेत. सूर्यास्ताला अद्याप अवकाश आहे. आज रात्रींदेखील युद्ध चालू राहील. आज पांडव-पाचालाचा तरी युद्धांत माझ्या हातून नाश होईल, नाहीं तर मी तरी धारातीर्थीं देह ठेवीन. धर्मशील पांडवांचा नाश कसला होतो म्हणा! तुझें धर्मभ्रष्टाचें अन्न खाल्लेल्या माझ्या बुद्धींत मात्र आज अधार्मिकता शिरू पाहात आहे. अस्त्रें न जाणणाऱ्या लोकांचाहि मी आज अस्त्रांनीं धुव्वा उडविणार आहें. पाचालांना ठार केल्याशिवाय मी आज कवच उतरणार नाहीं. अश्वत्थाम्याला 'सोमकांचा पिच्छा सोडूं नकोस' असा माझा निरोप सांग." असें बोलून आचार्य पांडवांच्यावर तुटून पडले. दुर्योधन लगेच कर्णाकडे आला.

आचार्यांना आपण काय बोललों व त्याचा परिणाम काय झाला हें त्यानें त्याला मोठ्या आनंदानें सांगितलें पण त्याच्या आनंदावर त्याच्या मित्रानेंहि आज विरजण घातलें.

कर्ण म्हणाला, "राजा, द्रोणाचार्यांना निष्कारण दोष देऊं नकोस. ते आपल्या प्राणांचीहि पर्वा न करतां आपल्या सर्व सामर्थ्यानें लढत आहेत हें मला दिसतें. कृष्ण सारथी असलेल्या अर्जुनापुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं, हा त्याचा दोष नाहीं. कारण अर्जुन तसाच गुणसंपन्न आहे. कर्तृत्ववान्, अस्त्रसंपन्न, शूर अर्जुनानें अभेद्य कवच घालून अप्रतिम गांडीव धनुष्य हातांत घेतलें, आणि घोड्याचे लगाम शस्त्र, शास्त्र व अस्त्र ह्यांनीं संपन्न असलेल्या योगेश्वर कृष्णानें हातांत धरलें, म्हणजे त्यांच्या-समोर टिकेल असा वीर त्रैलोक्यांतहि मला कोणी दिसत नाहीं. राजा, घाबरूं नकोस. मी त्यांच्याशीं युद्ध करणार आहें. पण तें कर्तव्य म्हणून करणार आहें. मी मोठा प्रयत्नवादी आहें. पांडवांचा नाश करण्याचा आजपर्यंत आपण थोडाथोडका का प्रयत्न केला ? आपण पांडवांना विष-प्रयोग केले, लाक्षागृहांत जाळलें, द्यूतांत कपटानें जिंकलें, राजनीतीला धाब्यावर बसवून अरण्यांत पाठविलें, अशा किती तरी गोष्टी आपण केल्या. पण दैवानें त्या हाणून पाडल्या. दैव आणि प्रयत्न यांच्यामध्यें हा झगडा आहे. दैव-दैव म्हणजे तरी काय ? आपणच मागें केलेलें कर्म, तेंच दैव ! राजा, आपलें दैवहि आपले प्रयत्नच घडवीत असतात." असें किती वेळ तरी कर्ण बोलत होता. दुर्योधनाला त्याचें बोलणें कांहींच कळलें नाहीं. कर्णाच्या मनांत काय गोंधळ चालला होता हें एक भगवंत जाणे, असें म्हणण्याची आतां अवश्यकता नाहीं. कर्णाच्या मनांतला गोंधळ आमचे विचारवंत वाचक आतां जाणत आहेत अशी कल्पना आहे. असो.

द्रोणांनीं आपलें सर्व सामर्थ्य एकवटून युद्धाला आरंभ केला. लवकरच काळोख पडला. मग रात्रींचें भीषण युद्ध सुरू झालें. आचार्यांनीं केकयांस व धृष्टद्युम्नाच्या पुत्रांना यमलोकाची वाट दाखविली. त्यांनीं पांडवांकडच्या महारथी शिबीला ठार मारलें. भीमसेनानें कलिंगराजाच्या पुत्राला ठार

मारलें, अश्वत्थाम्यानें द्रुपद व कुंतिभोज यांचे पुत्र मारले. सात्यकीनें महारथी सोमदत्ताला ठार मारलें, तेव्हां कौरवसैन्यांत एकच हाहाःकार झाला. कर्णानें चवताळून सात्यकीशीं युद्ध सुरू केलें. सात्यकीचा पराभव करून अर्जुनाशीं सामना देण्याचा त्यानें निश्चय केला. त्याबरोबर भगवानांनीं घटोत्कचाला जवळ बोलाविलें व त्याला म्हटलें, "बाळा घटोत्कचा, आज ह्या रात्रींच्या युद्धांत तूं महाधनुर्धर कर्णाला जिंक. पांडव धृष्टद्युम्नाच्या सेनापत्याखालीं द्रोणाचार्योंशीं लढतील. कर्णाला जिंकून तूं आज मोठी कीर्ति मिळव. आज तूं आपल्या पराक्रमानें सर्व कौरवांना सळो कीं पळो करून सोड. आज तूं कर्णाशीं असें युद्ध कर कीं सर्व लोक तुझा पराक्रम नेहमीं गात राहातील." कृष्णाच्या ह्या भाषणानें घटोत्कचाला उत्साह आला. तो म्हणाला, "भगवन्, आज राक्षसी मायेनें मी ह्या कर्णासह सर्वांचीच कशी चटणी उडवतों तें पाहा." इतकें बोलून घटोत्कचानें कर्णाशीं युद्धाला सुरवात केली. रात्रींच्या वेळीं त्याची राक्षसी माया कर्णालाहि असह्य झाली. घटोत्कच एकदम अदृश्य होई. एकाएकीं वृक्ष, पाषाण, पर्वत, कौरवसैन्यावर येऊन कोसळत. कौरवांकडच्या अलायुध नांवाच्या भयंकर राक्षसाला घटोत्कचानें ठार मारलें. त्यामुळें त्याच्याशीं सामना द्यायला कोणीच राहिलें नाहीं. सर्वांचे प्राण भयंकर संकटांत सांपडले, हें पाहून दुर्योधनादि सर्व कौरव कर्णाला ती वासवी शक्ति, अदृश्य राहून अनर्थकारक युद्ध करणाऱ्या घटोत्कचावर टाकण्यास सांगूं लागले. कर्ण थोडा कां कूं करूं लागला. पण दुर्योधन वैतागानें म्हणाला, "कर्णा, आतां तूं आमचा अंत पाहूं नकोस. हा घटोत्कच उजाडेपर्यंत असाच जर युद्ध करीत राहिला, तर आमच्यापैकीं कोणीहि जिवंत राहील, असें मला वाटत नाहीं." दुर्योधनाचें भाषण ऐकून कर्ण म्हणाला, "राजा, कृष्णार्जुनांचा नाश करण्याकरितां मुद्दाम राखून ठेवलेली वासवी शक्ति एकदां अशा रीतीनें फुकट गेली म्हणजे–" दुर्योधन एकदम म्हणाला, "म्हणजे, कृष्णार्जुनांशीं प्रसंग पडल्यावर काय करावयाचें ? असेंच ना ? त्याचा विचार करण्याकरितां तूं अथवा आम्ही उरलेले कौरव ह्या घटोत्कचाच्या हातून जिवंत तर राहिलों पाहिजे ना ?

आज ह्या राक्षसी मायेतून सर्वांचा बचाव कर. पुढचें पुढें."

दुर्योधनाचे हे शब्द कर्णालाहि पटले. घटोत्कचानें केलेला तो भयंकर संहार पाहून कर्ण सिंहासारखा चवताळला. त्यानें ती अमोघ, भयंकर, वैजयंती नावाची वासवी शक्ति घटोत्कचाच्या नांवानें सोडून दिली. ती भयंकर शक्ति कडाडत निघाली. तिनें राक्षसी मायेचा एकदम नाश केला व ती घटोत्कचाच्या हृदयाचा भेद करून आकाशात अंतर्धान पावली. घटोत्कच गतप्राण होऊन जमिनीवर कोसळला, तें पाहून सर्व कौरव हर्ष-भरित होऊन सिंहनाद करूं लागले. रणवाद्यें वाजवून व जयघोष करून सर्व कौरव आनंदानें कर्णाचे अभिनंदन करूं लागले. इकडे पांडवसैन्यात सर्वत्र खिन्नता पसरली; पण कृष्णाला मात्र इतका हर्ष झाला कीं त्यानीं रणगर्जना केली, टाळया वाजविल्या, आणि अर्जुनाला आनंदानें अलिंगन दिलें. कृष्णाचा हा हर्ष पाहून अर्जुन व इतर पाडव गोंधळले. त्यानीं कृष्णाला ह्या हर्षाचें कारण विचारताच भगवान उल्लसित वृत्तीनें म्हणाले, "पांडवहो, घटोत्कचानें आज तुमची केवढी कामगिरी केली आहे, त्याची तुम्हांला कल्पना तरी आहे काय? आज पराक्रमी घटोत्कचाने आपल्या मरण्यानें तुम्हां सर्वांचे प्राण वांचवून विजयाचा मार्ग तुम्हाला मोकळा करून दिला आहे. इंद्राने कर्णाचीं जन्मसिद्ध कवच-कुंडलें हरण केलीं. आणि आज या घटोत्कचाने त्याची अमोघ शक्तीहि नाहींशी करून देवांनाहि अजिंक्य असलेल्या कर्णाला, तुमच्यापुढे निर्माल्यवत् करून सोडलें. त्या शक्तीने, कर्णाने ठरविल्याप्रमाणें, अर्जुनाचे प्राण हरण केले असते तर काय अनर्थ झाला असता ह्याची नुसती कल्पना करा. माझ्या लाडक्या अर्जुनाला कर्णाशीं युद्धात प्रसंग पडूं नये म्हणून मी कां झटत होतों हेंहि तुमच्या लक्षात आलें असेल." भगवताच्या हर्षाचें कारण कळतांच पांडव, कृष्णानें युक्तीनें केलेल्या कार्याची कल्पना येऊन, सद्गदित झाले. केवळ कृष्णामुळेंच आपण सर्व संकटांतून मुक्त होत आहोत, हें त्यांना समजलें व धर्मराजानें तसें कृष्णाला बोलून दाखविलें. सर्व पाड-वानीं भगवंताची स्तुति केली. असो. ह्या गोंधळांत मध्यरात्र उलटली. दोन्ही बाजूचे सैनिक झोंपेनें अगदीं मरगळून गेले. तेव्हां दोन्ही बाजूंच्या

सेनापतींनीं चंद्रोदय होईपर्यंत रणांगणांत झोंप घेण्यास सर्व सैनिकांस परवानगी दिली. त्याबरोबर जे ज्या स्थितींत होते त्या स्थितींत ते झोंपीं गेले. घोडेस्वार घोड्याच्या मानेवर मान ठेवून झोंप घेऊं लागले. हत्तींवरचे योद्धे हत्तींवर, रथी रथांत व पायदळ हातातल्या आयुधांवर मान टेकून झोंप घेऊं लागले. चंद्रोदय झाला, आणि लढाईची सुरवात झाली. पुनः सूर्योदयाला संध्योपासनेकरिता थोडा वेळ सर्व क्षत्रिय थांबले. तेवढ्यात दुर्योधन आचार्यांना भेटला व म्हणाला, " आचार्य, पांचाल अद्याप जिवंत आहेत. आपण त्याना मारल्याशिवाय अंगांतलें कवच उतरणार नाहीं, हें ध्यानांत आहे ना ? आता शिष्यावरचें प्रेम थोडें बाजूला ठेवा. " दुर्योधनाच्या भाषणानें आचार्य खवळले व म्हणाले, " राजा, मीं माझ्याकडून लढण्याची शिकस्त केली आहे. अर्जुनाचें सामर्थ्य किती आहे ह्याची तुम्हांला अद्यापहि नीट कल्पना येत नाहीं, याचेंच मला आश्चर्य वाटतें. आतां तुझ्यासाठीं, मीं काल म्हटल्याप्रमाणें, माझीं अस्त्रें मीं अस्त्रानभिज्ञ लोकांवर टाकून त्यांचा वध करणें, एवढेंच एक शिल्लक राहिलें आहे. माझा अंत जवळ आल्यामुळें हा अक्षम्य अधर्म माझ्या-हातून होणार असें दिसतें. जा, आतां सर्व पांचाल मेलेले तूं पाहशील. "

यानंतर आचार्यांनीं अस्त्र कोणावर सोडायचें आणि कोणावर नाहीं ह्याचा विधिनिषेध न ठेवतां सर्व पाचाल सेनेची धुळधाण चालविली. सेनाबल नाहींसें होतांच आचार्यांच्या दिव्यास्त्रांना द्रुपद, विराट, यांसारखे वृद्ध राजेहि बळी पडले. हें पाहून धृष्टद्युम्नानें आचार्यांवर सूड उग-विण्याचा निश्चय करून घनघोर युद्ध आरंभिलें. भगवंतांनीं भीमाला एका बाजूला बोलावून कांहीं कानगोष्ट केली व म्हटलें, " ह्या अधर्मानें युद्ध करणाऱ्या द्रोणाशीं आतां सरळपणानें युद्ध करण्यांत अर्थ नाहीं. " भीमानें भगवंतांची सूचना मान्य केली. त्यानें आपल्याच पक्षांतील मालव-पतीचा ' अश्वत्थामा ' नामक एक प्रचंड हत्ती आपल्या गदेनें ठार केला व ' अश्वत्थामा मारला गेला, ' अशी द्रोणांच्या कानांवर जाईल अशी ओरड केली. द्रोणांनीं हे शब्द ऐकले मात्र. ते एकदम व्याकुळ झाले. त्यांच्या हातांतून धनुष्य गळलें. त्यांनीं सत्यभाषी धर्मराजाला ह्या बातमींत

सत्यता कितपत आहे तें विचारिलें. भगवंताच्या सांगण्यावरून त्यावेळीं सत्यभाषी धर्महि सत्यापासून भ्रष्ट झाला. 'अश्वत्थामा मेला असें मींहि ऐकलें.' असें तो म्हणाला, व 'हत्ती कीं मनुष्य' हे शब्द तो ओठा-तल्या ओठात पुटपुटला. पृथ्वीला स्पर्श न करतां चालणारा त्याचा रथ, एकदम पृथ्वीला लागला. असो. द्रोणाचार्यांनीं शस्त्रत्याग करून योग-समाधि लाविली. ती संधि साधून धृष्टद्युम्नानें आपल्या खड्गाने त्याचा शिरच्छेद केला. अर्जुन–सात्यकीसारख्या वीरांना तीं गोष्ट आवडली नाहीं, पण भगवंतानीं धृष्टद्युम्नाला शाबासकी दिली. अधर्मयुद्ध करणाऱ्या आचा-र्यांशीं अधर्मानें वागण्यांत कांहींच पातक नाहीं, धृष्टद्युम्नानें केलें तें योग्यच केलें, असें त्यानीं सागितलें. द्रोणाचार्य पडतांच कौरवाचा धीर खचला. ते दीन झाले. सर्व कौरव सेना भयभीत होऊन पळूं लागली. दुर्योधन, कर्ण यांनींहि भीतीने आपला मोर्चा फिरविला. कृपाचार्य व शल्य हाय हाय म्हणत परत फिरले. त्याबरोबर सर्वांचाच धीर खचून सर्वां-नींच रणांतून पळ काढिला. एक अश्वत्थामा मात्र क्रोधानें बेहोष होऊन पांडवांच्या सैन्यावर तुटून पडला. त्यानें पांडवांच्यावर दिव्य नारायणास्त्र सोडिलें. ह्या अस्त्रावर दुसऱ्या कोणालाच कांहीं इलाज करता येण्या-सारखा नव्हता. तें अस्त्र पांडवसैन्यावर येतांच एकच हाहाःकार उडाला. पण पांडवांचे पाठीराखे भगवान् श्रीकृष्ण यांना ते अस्त्र माहीत होतें, आणि त्याचा उपसंहार कसा करावा त्याचेंहि ज्ञान होतें. श्रीकृष्ण एक-दम म्हणाले, "वीरहो, लवकर शस्त्रें खाली ठेवा व आपल्या वाहनां-वरून खालीं उतरून उभे राहा, आणि ह्या नारायणास्त्राला वंदन करा. ह्या अस्त्राला शांत करण्याचा हाच एक मार्ग आहे." भगवंताच्या आज्ञेप्रमाणें सर्वांनीं केलें, पण भीमाला हातातून शस्त्र खालीं ठेवण्याचा अपमान वाटूं लागला. तें अस्त्र भीमावर जाऊं लागतांच परम कारुणिक भगवंतांनीं स्वतः भीमाला रथांतून खालीं ओढलें, आणि त्याच्या हाता-तलें शस्त्र त्याच्याकडून खालीं ठेवविलें, तेव्हां तें नारायणास्त्र शांत झालें. नंतर अश्वत्थामाहि जळफळत परत फिरला. तो उरलेला दिवस दोन्हीहि सैन्यांनीं युद्ध न करितां आपापल्या शिबिरांत घालविला.

दुसऱ्या दिवशीं उजाडल्यावर सर्वांनीं स्नान, संध्योपासना वगैरे धर्मविधि केल्यावर युद्धार्थ निघण्याची तयारी केली. दुर्योधनानें कर्णाला सैनापत्याभिषेक केला. कर्ण पाडवांचा नाश करील अशी दुर्योधनाची पहिल्यापासून खात्री होती. तोहि त्या दिव्य वासवी शक्तीच्या जोरावर कृष्णार्जुनाना जुमानीत नव्हता. पण आता तोहि आपलें सामर्थ्य मनात समजून होता. कर्णाच्या आधिपत्याखालीं पहिल्या दिवशीं कौरव पांडवाची जवळ जवळ सारखीच हानि झाली. कांहीं बाबतींत पाडवाचीच त्या दिवशीं सरशी झाली. दुसऱ्या दिवशीं कर्ण दुर्योधनाला म्हणाला, "राजा, धनुष्यबाण, शस्त्रास्त्रविद्या, या सर्व बाबतींत मी अर्जुनापेक्षां कांकणभर अधिक आहें. पण अर्जुनाच्या रथावर कृष्णासारखा कुशल सारथी असल्याने त्याच्यापुढें मला जय मिळविणें कठीण जातें. आपल्याकडे कृष्णासारखाच सारथ्यकर्मात कुशल मद्रपति शल्य आहे. तो जर माझें सारथ्य करील तर मी अर्जुनाला हां हां म्हणतां जिंकीन." दुर्योधनानें कर्णाचें म्हणणें ऐकून शल्याला कर्णाचें सारथ्य करण्याबद्दल विनंति केली. त्यानें शल्याची कृष्णाशीं तुलना करून कांहीं बाबतींत कृष्णापेक्षा शल्य अधिक कुशल आहे अशी त्याची स्तुति केली. "मी कर्णाला जें कांहीं प्रिय-अप्रिय बोलेन, तें कर्ण ऐकून घेण्यास तयार असला, तर मी त्याचें सारथ्य करीन." असें शल्यानें सांगितले. कर्णानें तें मान्य केलें व शल्य कर्णाचा सारथी झाला. युधिष्ठिराला दिलेल्या वचनाप्रमाणें शल्यानें र' ंत बसून सारथ्यकर्म करीत असतांना कर्णाचा अनेक वेळां तेजोभंग केला. कर्णानें शल्याला पुष्कळवेळां योग्य उत्तर देऊन निरुत्तर करण्याचा प्रयत्न केला. कर्णानें त्या दिवशीं फार मोठा पराक्रम केला. नकुल, सहदेव, धर्मराज त्याच्या तावडींत सांपडले असतां, कृष्णाला दिलेल्या वचनाप्रमाणें त्यानें त्यांना सोडून दिलें. त्या दिवशीं एक फारच भयंकर गोष्ट झाली; ती म्हणजे, भीमानें दुःशासनाचा कंठ आपल्या खड्गानें फोडून आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें त्यानें त्याच्या नरडीचा घोंट घेतला व त्याचें रुधिर प्राशन केलें. त्यावेळेस भीमाचें तें उग्र रूप पाहून कौरव सैन्याची दाणादाण झाली. दुःशासनानें केलेल्या सर्व अपराधांचा उच्चार करून, दुर्योधन, कर्ण,

शकुनि, याच्या देखत प्रतिज्ञापूर्ति करतांना भीमाला चढलेला आवेश पाहून सर्वजण घाबरून गेले. दुःशासनाचा वध होताच त्याचे शूर भ्राते भीमावर धांवून गेले पण अग्नीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें त्यांची स्थिति होऊन भीमानें त्याना यमलोकाला पाठविलें. ह्याच वेळीं कर्ण पाहात असतांना त्याचा प्रिय पुत्र जो वृषसेन, त्याचा अर्जुनानें वध केला. शेवटीं कर्णार्जुनयुद्ध सुरू झाले. कर्णानें, आपल्या अद्भुत अस्त्रविद्येनें अर्जुनावर पुष्कळवेळा मात केली. हें अपूर्व युद्ध पाहाण्याकारिता मोठमोठे ऋषिमुनीहि आले होते. कर्णार्जुनाची दिव्य अस्त्रविद्या पाहून महारथी-योद्धे संतुष्ट झाले. हे दोघेहि अस्त्रविद्यानिपुण योद्धे जिवंत राहावेत असें वाटून अश्वत्थाम्यासारख्या योद्धयानें तसल्या प्रसंगीं दुर्योधनाला पाडवांशीं सख्य करून ते युद्ध थांबविण्याबद्दल उपदेश करून पाहिला. पण कर्ण अर्जुनाला ठार मारील असा दृढ विश्वास उराशीं घट्ट धरून ठेवलेल्या दुर्योधनानें अश्वथाम्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. कर्णाच्या हातून अर्जुन आज खास मरणार, असें त्याला वाटत होतें. क्षणाक्षणाला तो अर्जुनाच्या पडण्याची अगदीं उत्कंठेनें वाट पाहात होता. कर्णाला उत्तेजन देण्याकारितां दुर्योधनादि सारखे त्याचा जयघोष करीत होते. दोघेहि वीर एकमेकाच्या बाणानीं रक्तानें न्हाऊन निघाले. शेवटीं अर्जुनापुढें आता आपला टिकाव लागत नाहीं अशी खात्री होऊन कर्णानें अर्जुनवधाकरिता निर्वाणीचा म्हणून ठेवलेला सर्पमुख उग्र बाण आपल्या धनुष्याला जोडला व अर्जुनाच्या कठाचा नेम धारिला. तें पाहून शल्य म्हणाला, "कर्णा, तुझा नेम बरोबर धरला गेला नाहीं असें मला वाटतें. पुनः लक्षपूर्वक नेम धर." ऐन वेळीं हे शब्द ऐकतांच कर्णाची चलबिचल झाली. पण अभिमानानें पुनः नेम धरण्याचें त्यानें नाकारलें. अशा चलबिचल झालेल्या वृत्तींत तो बाण कर्णाच्या हातून सुटला. शल्यानें अगदीं आणीबाणीच्या वेळीं कर्णाची चलबिचल करून युधिष्ठिराला दिलेलें आपलें वचन राखलें. तो भयंकर बाण येत आहे असें पाहतांच भगवंतांनीं आपलें सारथ्य-कौशल्य दाखविलें. कर्णाच्या चलबिचल झालेल्या वृत्तीनें थोडासा नेम चुकलाच. त्यांत भगवंतांनीं रथाला झटकन गिरकी दिली, आणि

घोड्यांना इषारा देतांच ते पुढच्या गुडघ्यांवर टेकले. त्याबरोबर रथ कलथा झाला आणि कर्णाच्या बाणानें अर्जुनाचा फक्त किरीट उडविला. किरीट उडविल्यामुळें संतप्त झालेल्या अर्जुनानें कर्णावर तीक्ष्ण बाणांचा जणूं काय पाऊस पाडला.

आपला आतां मात्र टिकाव लागत नाहीं असें वाटून कर्ण परशुरामापासून घेतलेलीं निर्वाणीच्या वेळीं सोडण्याचीं दिव्य अस्त्रें धनुष्यावर योजण्याच्या तयारीला लागला. परंतु त्याला मिळालेले विप्रशाप त्यावेळीं एकाएकीं फलद्रूप होऊं लागले. त्याच्या रथाचें चाक एकाएकीं पृथ्वींत रुतून बसलें. त्यामुळे घोड्यांचें सामर्थ्य व सारथ्याची कुशलता निष्फल झाली. काहीं केल्या रथ जागचा हलेना. तो अस्त्रांचें स्मरण करूं लागला, त्याला अस्त्रें आठवेनात. एकीकडे अर्जुनाच्या बाणांनीं तो कासावीस झाला. त्या स्थितींत तो रथावरून खालीं उतरून रथचक्र वर काढण्याचा प्रयत्न करतां करतां अर्जुनास म्हणाला, " अर्जुना, एक क्षणभर थांब. मी जमिनींत घुसून बसलेलें रथचक्र वर काढीपर्यंत थांब. तूं रथांत आहेस, मी जमिनीवर उभा आहें. ह्यावेळीं माझ्यावर बाण टाकणे अधर्म आहे. अर्जुना, तूं खरा क्षत्रीय आहेस म्हणून मी सांगतों, हें अधर्म्य युद्ध तूं करूं नकोस." तें ऐकून भगवान् उपहासपूर्वक मोठ्यानें हंसून म्हणाले, "कर्णा, तुला आणि धर्माची आठवण! महदाश्चर्य आहे! कर्णा, रजस्वला, एकवस्त्रा द्रौपदीला सभेंत ओढून आणण्याचा दुःशासनाला सल्ला दिलास, तेव्हां धर्माची तुला आठवण झाली नाहीं! अक्षविद्येंत अज्ञ धर्मराजाला कपटानें जिंकलेंत, तेव्हां तुझा धर्म कोठें होता? बारा वर्षांचा खडतर वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास संपवून परत आल्यानंतर पांडवांना त्यांचें राज्य नाकारतांना तुला धर्माची आठवण झाली का? राधेया, तुम्हीं भीमाला विषान्न चारलेंत, पांडवांना लक्षागृहांत जाळण्याचा प्रयत्न केलात, त्यावेळीं तुझा धर्म कोठें होता? 'तूं पतिहीना झालीस असें समज, आणि दुसरा पति करून घे' असें निर्लज्जपणें द्रौपदीला बोलून, दांत काढून हीः हीः करून हंसलास तेव्हां, अधमा कर्णा, तुझा धर्म कोठें नाहींसा झाला होता? नीचा, तुम्हीं सहा महारथ्यांनीं एकट्या

अभिमन्यु बाळाला व्यूहांत कोंडून ठार मारलेंत त्यावेळीं तुला धर्माची आठवण झाली नाहीं, आणि आतां धर्माच्या नांवानें कंठशोष करतो आहेस? धर्मभ्रष्टा, तुझ्या प्राणावर बेतल्यावर धर्माचें स्मरण तुझ्या उपयोगीं पडणार नाहीं. आज तूं अर्जुनाच्या हातून जिवंत सुटत नाहींस, समजलास!" श्रीकृष्णाचें बोलणें ऐकून कर्ण लज्जित झाला. इतक्यांत अर्जुनानें त्याचा ध्वज मोडून पाडला व कर्णाचा नाश करण्याकरितां महेंद्राच्या वज्रासारखा एक प्रखर शर भात्यांतून बाहेर काढून त्याची गाडीव धनुष्यावर स्थापना केली. अर्जुनानें एकदां भगवान् कृष्णाकडे पाहिलें. त्याची मान्यता मिळ-तांच, त्यानें तो प्रखर बाण कर्णावर टाकला मात्र, त्या चक्र जमिनींत घुसून बसलेल्या रथात बसून अर्जुनावर बाण टाकण्याची धडपड करणाऱ्या कर्णाचें सूर्यासारखें तेजस्वी मस्तक त्या बाणानें उडविलें, आणि त्याचा तो सुंदर देह रथाखालीं कोसळून पडला.

कर्ण पडतांच कृष्णार्जुनांनीं आपले दिव्य शंख वाजविले. पांडवसैन्य शंख, भेरी व जयघोष ह्यांनीं भरून गेलें, व त्यांनें दुःखी कष्टी व शोकाकुल झालेल्या कौरवांचा एकदां निकाल लावण्याच्या इच्छेनें कौरवांच्यावर चढाई केली. कर्णवधानें व्याकुल व दीन झालेला दुर्योधन स्वतःच प्राणभयानें पळूं लागला. इतर उरलेल्या महारथ्यांची काय अवस्था झाली असेल तें वर्णन करण्याची अवश्यकताच नाहीं. रणभूमी सोडून, रणभूमी-पासून दोन योजनें लांब असलेल्या पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या पठारावर पोहोंचेपर्यंत त्यांनीं मागें म्हणून पाहिलें नाहीं. तेथें गेल्यावर सर्वांच्या जिवांत जीव आला. त्यावेळीं दोनप्रहर उलटून तिसऱ्या प्रहरास सुरवात झाली होती. सर्व योद्धे थोडे स्थिरचित्त झाल्यावर, आपण भेकड-पणें इतके लांब पळत आलों, ही गोष्ट क्षत्रियत्वाला लांच्छनास्पद आहे, असेंच सर्वांना वाटलें. अश्वत्थामा—कृपाचार्यादिकांनीं दुर्योधनाला धीर दिला, व शल्याला सेनापति करून पांडवांवर चालून जाण्याची त्याच्या मनाची तयारी करविली. त्याप्रमाणें शल्याला सैनापत्याभिषेक करून पुनः सर्वजण रणभूमीवर परतले. कौरव शल्याच्या आधिपत्याखालीं परत आलेले पाहतांच भगवान् कृष्ण धर्माला म्हणाले, "धर्मा, ह्या शल्याला

यमसदनीं पोंचवील असा वीर आपल्या सैन्यांत एकटा तूंच आहेस. भीष्म, द्रोण, कर्ण यांच्यापेक्षांहि हा युद्धांत मोठा अनर्थ करणार आहे. तुझ्या धार्मिक तेजाचा परिणाम मात्र त्याच्यावर असा कांहीं विलक्षण झाला आहे कीं तो तुला पाहून कचरतो. तेव्हां त्याच्याशीं आज तूं युद्ध कर." भगवंताची आज्ञा शिरसामान्य करून धर्मराजानें त्या दिवशीं युद्धांत शल्याला गांठून त्याच्याशीं घनघोर संग्राम केला. धर्मराजाच्या साह्याला भीष्म, धृष्टद्युम्न, जे जे म्हणून आले, त्याचा शल्यानें हा हा म्हणतां पराभव केला. धर्मराजापुढें मात्र त्याचें सामर्थ्य चालेना. धर्माच्या अलौकिक धर्मतेजानें तो दिपून गेला होता. अशा स्थितींत युद्ध लवकर आटपण्याची श्रीकृष्णानें सूचना करतांच धर्मराजानें एक भयंकर उग्र शक्ति शल्यावर सोडली. त्या शक्तीनें शल्याला गतप्राण करून जमिनीवर लोळवलें. मग मात्र कौरव सैन्याच्या दुर्दशेला सीमा उरली नाहीं. त्या दिवशीं मोठ्या शिकस्तीनें जे क्षुद्र वीर पळाले तेवढेच बचावले; बाकी दुर्योधनाशिवाय सर्व कौरव भीमानें मारिले; व सुदर्शन, सुशर्मा, शकुनि वगैरे सर्वांना क्रुद्ध झालेल्या पांडवांनीं रणभूमीवर निजविलें. अश्वत्थामा, कृपाचार्य व कृतवर्मा यांच्याशिवाय नांव घेण्यासारखा कोणीहि जिवंत राहिला नाहीं. दुर्योधन जो पळाला तो दूर एका बाजूला असलेल्या एका डोहाच्या अनुरोधानें चालला. वाटेंत त्याला संजय दिसला, त्याच्याजवळ धृतराष्ट्रास आपण जिवंत असल्याचें कळविण्यास सांगून, तो त्या डोहात शिरला व जलस्तंभन करण्याची विद्या त्याला अवगत असल्यामुळें त्यांत तो दडून बसला. संजय धृतराष्ट्राला निरोप सांगण्याकरितां निघाला तेव्हां त्याला वाटेंत कृपाचार्य, अश्वत्थामा व कृतवर्मा हे भेटले. राजा दुर्योधन डोहांत लपून बसल्याचें त्यानें त्यांना सांगितलें. ते तिघेहि त्या डोहाजवळ गेले. कृपाचार्य व अश्वत्थामा यांनीं त्याला बाहेर निघण्याबद्दल सांगितलें पण दुर्योधन बाहेर येण्याचें टाळूं लागला. इतक्यांत कांहीं मासे पकडणारे कोळी त्या डोहावर आले. त्याबरोबर ते तिघेहि तेथून चालते झाले. पण त्या कोळ्यांनीं पाण्याच्या आंतून दुर्योधन बोलत असतांना येतां येतां ऐकलें. त्यांनीं ती बातमी दुर्योधनाच्या शोधांत असलेल्या

पांडवांना सांगितली. तेव्हां भगवानासह सर्व पांडव त्या डोहावर आले.

भगवान् श्रीकृष्णांनीं युधिष्ठिराला सांगितलें, "राजा धर्मा, तूं ह्या दुर्योधनाला कांहीं गोड व कांहीं मर्मभेदक भाषण करून तो युद्धार्थ बाहेर येईल असें कर. बाकीच्या कोणाच्याहि शब्दाला तो दाद देणार नाहीं; पण कधींहि वाईट, मर्मभेदक भाषण न करणारा असा तूं जर या वेळीं मर्मभेदक बोलशील तर तो संतापून बाहेर येईल." भगवान् सांगतील तसें करावयाचें असें युधिष्ठिरानें ठरविलें असल्यामुळें तो दुर्योधनाला मर्मभेदक भाषणांनीं ताडन करूं लागला, व शेवटीं म्हणाला, "दुर्योधना, मी इतका तुला लागण्यासारखें बोलत असताना तूं निर्लज्जपणानें पाण्यांत स्वस्थ पडून आहेस. तूं सर्वस्व तर घालविलेंसच, पण 'मानी दुर्योधन' म्हणून मिळविलेली कीर्तिहि घालविलीस. पितामह, चुलते, गुरु, मित्र, मामा, संबंधी, सगेसोयरे, या सर्वांचा घात करून, सर्वांना मृत्युमुखांत लोटून स्वतःचा जीव वांचविण्याकरिता षंढ बनून लपून बसलास, ही गोष्ट आमच्या सर्व कौरव कुळाला कलंक लावणारी आहे. ऊठ, अधमा ऊठ. खऱ्या क्षत्रियासारखा बाहेर येऊन आतां युद्ध कर." युधिष्ठिराच्या तोंडून इतके वाईट शब्द आजपर्यंत कोणाबद्दलहि कधींच निघाले नव्हते. त्याच्या तोंडून हे मर्मभेदक शब्द ऐकताच दुर्योधन संतापून आंतूनच म्हणाला, "धर्मा, तूं मला काय मरणाला भिणारा षंढ समजतोस! मी एकटा, व फक्त गदा हेंच शस्त्र धारण करणारा पाहून मला पाहिजे तसें बोलतोस याची तुलाच लाज वाटली पाहिजे. शस्त्रास्त्रांनीं युक्त असलेल्या तुमच्याजवळ चतुरंग सैन्य आहे. आणि मी एकटा व गदेशिवाय दुसरें शस्त्र जवळ नसलेला असा आहें; हें पाहून, पिंजऱ्यांत सांपडलेल्या सिंहाला खडे मारणाऱ्या बायकापोरांचें तूं अनुकरण करतोस." हें ऐकून भीम मोठ्यानें हंसून म्हणाला, "अहारे सिंह! दुर्योधना, मूर्खा, पिंजऱ्यांत कोणींतरी फसवून पकडलेला तूं कोणी वनसिंह नसून, स्वतःच भित्रेपणानें लपून बसलेला ग्रामसिंह आहेस." युधिष्ठिर म्हणाला, "दुर्योधना, ये, ये, वर ये. तूं एकटा आहेस म्हणून भिऊं नकोस. आम्हा पांडवांपैकीं वाटेल त्याच्याशीं तूं आपल्या गदेनें युद्ध कर; आणखी मी

आपण होऊन तुला सांगतों, आम्हां पांचांपैकीं एकाला मारिलेंस म्हणजे तुला राज्य मिळेल. आणि त्याचे हातून तूं मरण पावलास तर तुला स्वर्गप्राप्ति होईल. '' युधिष्ठिराचें हें भाषण श्रीकृष्णाला मुळींच आवडलें नाहीं. भगवान् त्याला एकीकडे म्हणाले, " धर्मा, काय बोललास हें ? तुमच्यापैकीं कोणा पाहिजे त्याच्याशीं गदायुद्ध करून राज्य मिळवायला त्याला तूं सांगतो आहेस ? कांहीं विचार केलास का ? हें पुनः तूं अवघड द्यूतच खेळतो आहेस, दुसरें कांहीं नाहीं ! पंडुकुंतींची संतति नेहमीं वनवास व दारिद्र्य भोगण्यासाठींच जन्मास आली आहे कीं काय, कोण जाणे ! दुर्योधनानें भीमाशीं युद्ध करण्याचें ठरविलें तर ठीक आहे, पण जर कां तुझ्या सांगण्याचा फायदा घेऊन त्यानें नकुल, सहदेव, अर्जुन किंवा तूं यापैकीं कोणास गदायुद्ध करण्यास भाग पाडलें तर काय अनर्थ होणार हें दिसतेंच आहे. '' पण दुर्योधनाच्या भाषणानें युधिष्ठिर ह्या दिव्यांतून सुटला. दुर्योधन युधिष्ठिराचें भाषण ऐकून एकदम वर आला व म्हणाला, " धर्मा आतां बोललेलें खरें कर. हा मी गदायुद्धाला तयार आहें. तुमच्यापैकीं कोणींहि एकट्यानें माझ्याशीं गदायुद्ध करण्यास तयार व्हावें. '' दुर्योधनाच्या तोंडून हे शब्द निघण्याचा अवकाश, एका क्षणाचाहि विलंब न लावतां भीमसेनानें आपली गदा उचलली व तो दुर्योधनापुढें उभा राहून म्हणाला, " हं, चल ! हा मी एकटा तुझ्याबरोबर लढतों. हे सर्व प्रेक्षक म्हणून माझें गदानैपुण्य पाहतील. '' भगवंतांनीं सुटकेचा श्वास सोडला. इतक्यांत यात्रेला गेलेला बलराम तेथें प्राप्त झाला. दुर्योधन व भीम हे दोघेहि गदायुद्ध त्याच्याजवळच शिकले होते. त्याला आपल्या शिष्यांचें गदायुद्ध पाहाण्याची इच्छा होतीच. बलराम येतांच त्याचें युधिष्ठिरानें स्वागत केलें, व भीम-दुर्योधनांचें गदायुद्ध पाहण्याची त्याला विनंति केली. बलराम म्हणाला, " ठीक आहे. पण मला वाटतें, हें युद्ध असें कोठेंतरी न होतां, तें कुरुक्षेत्रांतील पवित्र रणभूमीवर, म्हणजे स्यमंतपंचकांत होऊं दे. त्या सनातन क्षेत्रांत युद्ध करीत असतां मरण आलें तर निश्चयानें स्वर्ग मिळतो. '' बलरामाचें हें म्हणणें सर्वांना मान्य झालें. लगेच सर्वजण स्यमंतपचकांत आले व बलरामानें

अनुज्ञा दिल्यावर गदायुद्धाला सुरुवात झाली.

पहिल्या प्रथम भयंकर वाग्युद्ध झालें. दुर्योधन ताठ्यानें वाटेल तें बडबडला. भीमानें, दुर्योधनादि चांडाळ-चौकडीनें केलेल्या पातकाचा पाढा वाचला, अंधळ्या धृतराष्ट्राच्या दुष्टबुद्धीचें वर्णन केलें, व शेवटीं तो म्हणाला, " दुर्योधना, अधमा, आतां तुझ्यासंबंधीं मीं केलेल्या प्रतिज्ञांची नीट आठवण कर. भरसभेत द्रौपदीला माडी उघडी करून थोपटून दाखविलीस आणि अधमपणाचा कळस केलास, त्या गोष्टीचें नीट स्मरण कर. आतां द्रौपदीच्या छळाबद्दलचा सूड मी कसा उगवितों, तें नीट पाहा. " गदायुद्धाला सुरवात झाली. तें उत्तम रंगले. त्याचें तें गदानैपुण्य पाहून सर्वांनीं मान डोलविली. शेवटीं भगवानानीं भीमाला खूण करिताच त्याला आपल्या प्रतिज्ञेची आठवण झाली. त्यानें संधि साधून दुर्योधनाच्या मांड्यावर गदेचा भयंकर तडाखा मारला व त्याच्या मांड्यांचे चूर्ण केलें. त्याबरोबर दुर्योधन पृथ्वीवर धूळ खात पडला. भीमानें आपली प्रतिज्ञा पुरी केली. गदायुद्धांत बेंबीच्या खालचे बाजूस प्रहार करूं नये असा नियम असतांना भीमानें दुर्योधनाच्या मांड्या गदाघातानें मोडल्या व त्याला मारलें, हें पाहून बलराम खवळला. पण श्रीकृष्णानीं, भीमानें आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें केलें ते बरोबर केलें, असें सागून त्याचा राग शात केला. बलराम नंतर रथात बसून द्वारकेला गेला. मांड्या मोडल्यामुळें धुळींत तळमळत असलेला दुर्योधन दात ओठ खाऊन क्रोधानें युधिष्ठिराला व श्रीकृष्णाला म्हणाला, " धर्मा, कृष्णा, मी आतां मरतों. माझे प्राण देहाचा त्याग करून बाहेर जाऊं पाहात आहेत. पण ध्यानांत ठेवा, धार्मिकतेचा टेंभा मिरविणारा हा धर्म आणि शास्त्रज्ञ, नीतिज्ञ, म्हणून आपला उदोउदो करून घेणारा तूं कृष्ण, तुम्ही दोघेहि पाहात असतांना मी भीमाकडून अधर्मानें मारला गेलों. कृष्णा, तूंच त्याला अधर्मानें मला मारण्याबद्दल सल्ला दिलास. ह्या पातकाचीं फळें तुम्ही भोगाल. " श्रीकृष्ण म्हणाले, " होय! मींच सल्ला दिला. ज्या सभेंत तुम्ही कपटद्यूत खेळलांत, ज्या सभेंत तुम्हीं महापातक्यांनीं द्रौपदीची विटंबना केलीत, त्या सभेंत मी उपस्थित असतों तर त्याच वेळीं तुम्हांला यमसदनाला पाठविण्याचा

सल्ला मीं पांडवांना दिला असता. म्हणजे हा तुम्हां पातक्यांबरोबर असंख्य जीवाचा झालेला संहार झाला नसता. आतां मरतांना दुसरे तिसरे काही विचार मनांत न आणतां पश्चात्तापानें हृदय शुद्ध करून मर. म्हणजे तुला सद्गति तरी मिळेल.'' इतकें बोलून, शत्रूंचा पूर्ण नाश करून आनंदित झालेल्या पांडवांना व तत्पक्षीयांना शिबिराकडे परत जाण्याची भगवंतांनीं आज्ञा केली.

सर्व पांडव मुदित अंतःकरणानें शिबिराजवळ आले. कौरवांच्या शिबिरांचाहि ताबा पांडवांनीं घेतला. कौरवाच्या सर्व स्त्रियांना युयुत्सू बरोबर त्यांनीं हस्तिनापुराला पाठविलें. भगवंतांनीं सर्वांना रणवेष उतरून ठेवण्यास सांगितलें. अर्जुनाला गांडीव धनुष्य आणि अक्षय भाते घेऊन रथांतून खालीं उतरण्याची आज्ञा केली. अर्जुन खालीं उतरल्यावर वरचा कपिध्वजहि अदृश्य झाला. नंतर योगेश्वर भगवान् खालीं उतरले मात्र, तो रथ धडाडून जळून खाक झाला. भीष्म, द्रोण, कर्णादिकांनीं सोडलेलीं अग्न्यस्त्रें रथाभोंवतीं घिरट्या घालीत होतीं. पण योगीश्वराच्या मंत्रयोगसामर्थ्यानें त्या अस्त्रांचें त्यावेळीं कांहीं चाललें नाहीं. असो. त्या रात्रीं सर्व पाचालवीर, द्रौपदीपुत्र वगैरे योद्धे शिबिरांत स्वस्थ चित्तानें निजले. पांच पांडव व सात्यकि यांना भगवंतांनीं शिबिरांत न निजतां त्या रात्रीं पुण्यकारक व ओघवती अशा नदीच्या कांठीं वास करण्यास सांगितलें. श्रीकृष्ण स्वतः हास्तिनापुरांत आपल्या रथात बसून गेले, व तेथें धृतराष्ट्र-गांधारी यांचें सांत्वन करून परत पांडवांच्याकडे आले. त्या रात्रीं आणखी एक फार भयंकर गोष्ट घडून आली. अश्वत्थामा द्रोणाचार्यांचा घात करणाऱ्या धृष्टद्युम्नादि पांचालवीरांचा सूड घेण्याबद्दल जळत होता. तो कृप व कृतवर्मा यांच्यासह मरणोन्मुख राजा दुर्योधनाजवळ गेला. राजा दुर्योधनाच्या अनुमतीनें त्यानें आपल्याला कृपाचार्योकडून सैनापत्याभिषेक करून घेतला, आणि राजाची अनुज्ञा घेऊन ते तिघे मध्यरात्रीच्या सुमारास धृष्टद्युम्नादि पांचाल निजलेल्या शिबिरद्वाराजवळ आले. त्यानें रुद्रदेवतेला प्रसन्न करून घेऊन त्या देवतेकडून भयंकर खड्ग प्राप्त करून घेतलें होतें. तें खड्ग घेऊन तो शिबिरांत घिरला आणि सुखानें निघोर

श्रीकृष्णाचे समकालीन जाड ठशांत दिले आहेत. पिढींतले मधले पुरुष दिले नाहींत. पुराणप्रसिद्ध तेवढेच दिले आहेत.



नेजलेल्या धृष्टद्युम्नादि वीरांचा व द्रौपदीपुत्रांचा सुप्तावस्थेंत त्या खड्गानें त्यानें नाश केला. जे लोक झोंपेंतून जागे झाले त्यांच्यावर अस्त्रप्रयोग करून यानें बहुतेक सर्वांचा निकाल लावला. जे त्यांतून सुटले ते आरडाओरडा करीत पाडवांच्याकडे आले. द्रौपदी वगैरे स्त्रियांच्या कानावर त्यांच्या पुत्रांच्या नाशाचें वृत्त जातांच त्या धांवत तेथें आल्या. पांडवांच्यासह भगवानहि धांवतच तेथे आले. अश्वत्थाम्याच्या ह्या अत्यंत नीच कृत्यानें पांडव फार क्रुद्ध झाले. द्रौपदीनें तर, अश्वत्थाम्याला ठार मारून त्याच्या मस्तकांत असलेला दिव्य मणि घेऊन याल, तरच माझें समाधान होईल, असें पांडवांना सांगितलें. श्रीकृष्ण, भीम व अर्जुन यांनीं अश्वत्थाम्याचा पाठलाग केला. अश्वत्थामा भीमार्जुनाच्या भीतीनें पळत सुटला, तो वाटेंत मरणोन्मुख असलेल्या दुर्योधनाजवळ आला. तेथें थोडी धुगधुगी असलेल्या राजाला कृप व कृतवर्मा घडलेली गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करीत होते. अश्वत्थाम्यानें ओरडून आपण कृतकृत्य झाल्याचें राजाच्या कानावर घालतांच तशाहि स्थितींत दुर्योधनानें आपला आनंद प्रगट केला व त्यानें प्राण सोडला. आपल्या पाठीमागें भीमार्जुन लागले आहेत, असें सांगून अश्वत्थामा आश्रयाकरिता भागीरथीतीरावरील व्यासांच्या आश्रमात धांवत गेला; पण श्रीकृष्ण, भीम व अर्जुन यानीं त्याला तेथें गांठलेंच. अश्वत्थाम्यानें एकदम अविचारानें सर्व पाडवांचा निःपात करण्याकरितां ब्रह्मास्त्र सोडलें. त्या अस्त्राचा उपसंहार कसा करावा हें माहित नसतांना त्यानें प्राणभयानें हें अविचाराचें कृत्य केलें. हें पाहून अर्जुनानें त्या ब्रह्मास्त्रावर ब्रह्मास्त्रच सोडलें. त्याबरोबर त्या दोन अस्त्रांनीं भयंकर अग्निवर्षाव करायला सुरुवात केली. शेवटीं व्यासांनीं व श्रीकृष्णांनीं सांगितल्यावरून अर्जुनानें त्या दोन्ही अस्त्रांचा उपसंहार केला. व्यासांनीं अश्वत्थाम्याची खूप निर्भर्त्सना केली. अर्जुनानें, व्यासांनीं सांगितल्यावर, अश्वत्थाम्याच्या डोक्यांतला दिव्य मणि काढून घेतला व त्याला मृततुल्य केलें. गुरुपुत्र व ब्राह्मण म्हणून त्याला त्यानें जिवंत राहूं दिलें इतकेंच! अर्जुनानें ब्रह्मास्त्राचा उपसंहार केला तरी उत्तरेच्या गर्भांत असलेल्या बालकावर त्याचा परिणाम होणारच होता. तेव्हां भगवान् अश्वत्थाम्याला म्हणाले,

" मी माझ्या योगसामर्थ्यानें तेथें गर्भांतहि बालकाला सुरक्षित ठेवीन. पण थोर पवित्र ब्रह्मकुलाला कलंक लावणाऱ्या अश्वत्थाम्या, तूं मात्र तुझ्या पापाचें फळ भोगीत एकटा, निर्जन अरण्यात रक्त, पूं यांनी शरीर दुर्गंधित झालेला असा तीन हजार वर्षे भटकत राहाशील." व्यासानीं, श्रीकृष्णांनीं अश्वत्थाम्याला दिलेल्या शापाला अनुमोदन दिलें. त्याप्रमाणें अश्वत्थाम्याची भयंकर अवस्था झाली. तो दिव्य मणि घेऊन भगवान् भीमार्जुनांसह द्रौपदीजवळ आले. तो मणि पाहून द्रौपदीचें समाधान झालें. तिनें तो मणि धर्मराजाला गुरुप्रसाद म्हणून मस्तकावर धारण करण्यास सांगितले. धर्मराजानें तो मणि धारण करतांच तो अपूर्व तेजानें झळकूं लागला.

नंतर व्यास व विदुर ह्यांनीं धृतराष्ट्रादिकाचें, नानाप्रकारें उपदेश करून, समाधान केल्यावर भगवान् सर्व पांडवांसह धृतराष्ट्राच्या भेटीला गेले. अंधळा धृतराष्ट्र पुत्रशोकानें अतिशय संतप्त झाला होता. त्याचे शंभर पुत्र भीमानें ठार मारले म्हणून तो भीमावर मनांत दांत ओठ खात होता. भीम जर आपल्या तडाख्यांत सापडला, तर त्याला ठार मारून पुत्रांबद्दल आपण सूड उगवावा असें अंधळ्याच्या मनांत होतें. भगवानांनीं चातुर्यानें त्याचें मनोगत जाणलें व दुर्योधनानें गदायुद्धाचा अभ्यास करण्याकरतां जो भीमाचा लोखंडी पुतळा तयार केला होता, तो धृतराष्ट्रभेटीच्या वेळीं जवळ आणून ठेविला. धृतराष्ट्राला पांडवांची भेट खरोखर नको होती. परंतु पांडव भेटीस आले, हें कळल्यावर शिष्टाचार म्हणून तो युधिष्ठिरास भेटला. त्यानें त्याला आलिंगन दिले, व 'तुझा धाकटा भाऊ भीम कोठें आहे?' असें त्याला विचारलें. 'हा मी भीम आपल्या दर्शनास आलों आहें,' असें म्हणून भीम पुढें होऊं लागला तों भगवंतांनीं त्याला हातांनीं मागें ओढलें व भीमाचा पुतळा अंधळ्यापुढें ढकलला. क्रोधानें विचारहीन झालेल्या अंधळ्या धृतराष्ट्रानें भीम म्हणून त्या पुतळ्याला दांत ओठ खाऊन आपल्या छातीशीं इतकें घट्ट आंवळलें कीं तो पुतळा भग्न होऊन खालीं पडला. पण ह्या भयंकर कृत्यानें धृतराष्ट्राची छाती फाटून मुखांतून रक्त येऊं लागलें. रक्तानें न्हाऊन तो भूमीवर पडला तेव्हां संजय पुढें झाला व त्यानें त्याला सावध केलें.

तेव्हां त्याचा क्रोध शांत झाला. मग भीम आपल्या हातून मेला असें वाटून त्याला पश्चात्ताप झाला व 'हायरे भीमा, मीं दुष्टानें हें काय केलें!' असें म्हणून तो शोक करूं लागला. तेव्हा भगवान् म्हणाले, "धृतराष्ट्रा, अजूनहि तुझ्या बुद्धींत पालट होत नाहीं. हें काय? तुझ्या अविचारानें तूं आपल्या पुत्राना आवरूं शकला नाहींस, म्हणून एवढा भयंकर संहार झाला. अद्याप तरी सावध हो, आणि धर्मशील पाडवानाच आपले पुत्र मानून मन स्वस्थ करण्याचा प्रयत्न कर. शोक करूं नकोस. सर्व महा-युद्धांत जे पाडव सुरक्षित राहिले, ते मी येथें हजर असताना कसे नाश पावतील? तुझा भीम सुरक्षित आहे. तूं त्याच्या लोखंडी प्रतिमेचा भंग केलास, समजलास?" ह्यानंतर धृतराष्ट्राला पुष्कळ उपदेश करून भगवंतांनीं त्याला भीमादि सर्वांना भेटविलें. भगवंतानीं नंतर पांडवाची व गाधारीची भेट करविली. गाधारी एवढी विचारी, सुस्वभावी म्हणून गाजलेली, पण तिनें डोळयावर बांधलेल्या पट्ट्यातुन युधिष्ठिराचे नखांकडे क्रोधदृष्टीनें पाहिलें, तेव्हां तीं सुंदर नखें काळीं ठिक्कर पडलीं. क्रोधावेशात तिनें "कौरवकुळाप्रमाणें तुझ्या यादव कुळाचाहि शेवटीं आपसांतल्या कलहा-नेंच नाश होईल!" असा भगवानाला शाप दिला. "जे व्हायचें आहे तेच तूं बोलत आहेस तुझ्या म्हणण्याप्रमाणे व्हावें अशी माझीच इच्छा आहे." असें भगवान हंसत हंसत म्हणाले, तेव्हां तीहि शुद्धीवर आली. नंतर तिनें पांडवाच्या ठिकाणींच, श्रीकृष्णाचे सांगण्याप्रमाणे, पुत्रदृष्टि ठेवून आपलें मन स्वस्थ केलें.

ह्यानंतर पांडव आपल्या कुंतीमातेला भेटले. अहाहा! त्या माता-पुत्रांच्या भेटीचा आनंद काय वर्णावा!! आनंदाश्रूंनीं तिनें आपल्या पुत्रांना व भगवंताला न्हाऊं घातलें. असो. पुढें भगवंतानीं पांडवांच्याकडून त्यांच्या मृत आप्तेष्टाचीं क्रियाकर्मोत्तरें करविलीं. नंतर उत्तम सुहुमूर्त पाहून त्यांच्या राज्याभिषेकाची तयारी केली. भगवानानीं अनेक ऋषिमुनि, पुण्याचरणी क्षत्रिय राजे व वेदवेत्ते ब्राह्मण याच्यासमक्ष मोठ्या थाटानें व विधिपूर्वक धर्माला स्वहस्तानें अभिषेक करून साम्राज्यपदावर बसविलें. कर्तुमकर्तुम् अशा भगवानाचें सामर्थ्य दृष्टीस पडून सर्वांना भगवंतांची

यावेळीं खरी ओळख पटली. शरपंजरीं पडलेल्या भीष्मांकडून भगवंतांनीं राजा धर्माला राजधर्मादि सर्व धर्मप्रसंगांचा बहुमोल उपदेश करविला. त्यानंतर उत्तरायण लागतांच भीष्मांनीं नश्वर देहाचा त्याग करून भगवानादेखत मोक्षपद प्राप्त करून घेतलें. कांहीं दिवस पांडवांच्या सहवासांत आनंदानें घालवून, पांडव साम्राज्यपदावर सर्वप्रकारें सुप्रतिष्ठित झाले असें पाहून, भगवानांनीं द्वारकेस जाण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांनीं आपल्या प्रिय अर्जुनाला पुनः थोडा धर्मोपदेश केला, तो 'अनुगीता' या नांवानें प्रसिद्ध आहे. पांडव व कुंती यांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन व पुनः येण्याचें अभिवचन देऊन भगवान् श्रीकृष्ण सात्यकीसह द्वारकेस गेले. जातांना त्यांनीं आपल्याबरोबर सुभद्रेला नेलें. भगवान् कृष्ण फार दिवसांनीं भेटल्यामुळें द्वारकेंत सर्व लोकांना अतिशय आनंद झाला. वसुदेवादि सर्व लोक कौरवपांडव-युद्धाची हकिगत ऐकण्यास उत्सुक होते. भगवंतांनीं युद्धाची हकीगत संक्षेपानें सांगितली. अभिमन्यूची हकीगत भगवानाला सांगवेना, इतके ते सद्गदित झाले. त्यावेळीं वसुदेव, देवकी व सुभद्रा तर मूर्च्छित होऊन पडली. कृष्णांनीं नानाप्रकारचें तत्त्वज्ञान सांगून सर्वांचें समाधान केलें.

इकडे पांडवांनीं पापानिरसनार्थ अश्वमेध करण्याची तयारी केली. भगवंतांना पुनः निमंत्रण गेलें. उत्तरेच्या प्रसूतीचा काळ यावेळींच असल्यामुळें सुभद्रेला घेऊन श्रीकृष्ण हस्तिनापुरास आले. योग्यवेळीं उत्तरा प्रसूत झाली. मुलगा झाला. अश्वत्थाम्यानें निःपांडवी पृथ्वी करण्याकरितां सोडलेल्या अस्त्रप्रभावानें तो मुलगा जन्मतांच मृततुल्य मूर्च्छित झाला. त्या प्रसंगाकरितां मुद्दाम तेथें उपस्थित असणाऱ्या योगेश्वर श्रीकृष्णानें आपल्या योगसामर्थ्यानें त्या बालकावरचा अस्त्रप्रभाव नाहींसा करून त्याची मूर्च्छा घालविली, आणि त्याला सावध केलें. त्यावेळीं उत्तरा, सुभद्रा, द्रौपदी व सर्व पांडव यांना अत्यंत हर्ष झाला. आपल्या कुळाचा अंकुर व साम्राज्यपदाचा वारस असें तें बालक कृष्णकृपेनें सुरक्षित असलेलें पाहून त्यांनीं पुत्रजन्मोत्सव फारच थाटानें केला. त्या कुलदीपक बालकाचें नांव यधिष्ठिरानें 'परीक्षिति' असें ठेविलें. पुढें

अश्वमेधहि उत्तम तऱ्हेनें पार पडला. याप्रमाणें आपल्या प्रिय पांडवाना सर्व प्रकारें सुखी करून भगवान् द्वारकेला गेले.

भगवान् श्रीकृष्ण पांडवांना सर्वप्रकारें सुखी करून द्वारकेंत आले, त्यावेळीं त्यांचें वय ८३ अथवा ८४ होतें. या पुढील आपला ३६ वर्षांचा बहुतेक सर्व काळ त्यांनीं द्वारकेंत काढला. मधून मधून पांडव द्वारकेस येऊन गोविंदाचा पाहुणचार घेत चार दिवस सुखानें राहात असत, तर भगवानहि हस्तिनापुरास जाऊन आपल्या प्रिय आतेभावाच्या प्रेमळ संगतींत कांहीं काळ आनंदानें घालवीत असे. हस्तिनापूरच्या सम्राट्पदावर धर्मराजा, व द्वारकेंत यदुनाथ भगवान् श्रीकृष्ण हे दोन धर्मशील, नीतिज्ञ व सदाचारसंपन्न महाबलाढ्य पुरुष सत्ताधारी असल्यामुळें जिकडे तिकडे शांतता आणि सुबत्ता नांदूं लागली. पांडव-यादवांच्या पुढे उघडपणे डोकें वर काढील असा शत्रु सर्व भरतखंडांत कोणीहि राहिला नाहीं. भरतखंडांतल्या बहुतेक सर्व भागांतील महारथी राजे आपापल्या सैन्यानिशीं भारतीय युद्धात धारातीर्थीं पडले होते. खरोखर भारतीययुद्धाची झळ यादवांना भगवंतांनीं फारशी लागूं दिली नव्हती, असें म्हटलें तरी चालेल. पांडवांच्या बाजूनें सात्यकि व कौरवांच्या बाजूनें कृतवर्मा, असे दोघेजण आपल्या थोड्या सैन्यानिशीं लढले. सात्यकीचे दोन पुत्र व कृतवर्म्याचा बंधु व पुत्र आणि तें सैन्य एवढीच फक्त यादवांची हानि त्या युद्धांत झाली. सात्यकि व कृतवर्मा हे दोघेहि सुखरूप परत आले होते.

ह्यावेळीं यादवांच्याकडे बलाढ्य योद्धयांचा भरणा अपूर्व होता. एकट्या भगवंताच्या पुत्रांपैकीं प्रद्युम्नादि अठरा पुत्र महारथी होते. भगवंताच्या तोडीचा वीर कोणी नव्हता, याची प्रतीति भारतीय युद्धात आलीच होती. बलरामाच्या तोडीचा योद्धाहि भरतखंडांत कोणी नव्हता. दानव प्रदेशांत वसुदेवानें आपले पुत्र व इतर यादव सरदारांचे पुत्र यांना शूरसेनाच्या देखरेखीखालीं युद्धशास्त्रांत अत्यंत तरबेज केलें होतें, त्यांतूनच श्रीकृष्णाचें निवडक हजार योद्धयांचें प्रसिद्ध सुदर्शन पथक निर्माण झालें होतें. ह्या पथकांत हुबेहुब कृष्णाप्रमाणें दिसणारे सहा तेजस्वी योद्धे पूर्वी एकदां दृग्गोचर झाल्याचें मागें वर्णन आलेंच आहे. ते कोण असतील ह्याची

कल्पना वाचकांनीं केली असेलच. ते वसुदेव-देवकीपुत्र हिमालयाच्या पायथ्याशीं एक नमुनेदार यादवराज्य चालवीत होते. कृष्णावरील प्रेमामुळें ते महत्त्वाच्या प्रसंगीं सुदर्शन पथकांत भाग घेत असत. यादवांचीं दुसरींहि अनेक चक्रें किंवा पथकें श्रीकृष्णांनीं तयार केल्यामुळें भगवानाना चक्रधर असें लोक संबोधीत. हींहि वर्णन वाचकांच्या लक्षात असेलच. थोडक्यांत सांगायचें म्हणजे सैन्यबल, संख्याबल, शौर्य व संपत्ति या बाबतींत यादवांची बरोबरी करील असें दुसरें राज्य नव्हतें. अशा प्रबल राज्याला श्रीकृष्णासारखा नेता लाभल्यानें यादवांच्या भाग्याला सीमा नव्हती असें म्हटलें तरी चालेल. भगवान् सर्वांशीं प्रेमळपणानें वागत. ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशीं एकदां संबंध आला त्याना त्याना ते कधींहि विसरले नाहींत. संपत्तीचा मद, ज्ञानाचा ताठा, अथवा सामर्थ्याची घमेंड, यापैकीं कोणत्याच दुर्गुणानें त्याना कधीं स्पर्श केला नाहीं. अठरा विश्वे दारिद्र्य असलेला त्यांचा लहानपणचा प्रेमळ गुरुबंधु सुदामा ब्राह्मण त्याना भेटताच ते त्याच्याशीं किती प्रेमळपणानें वागले, त्यानें भेट म्हणून आणलेल्या पोह्यांच्या कण्या त्यांनीं किती प्रेमानें खाल्ल्या, आणि त्यानें न मागतां त्याला किती संपत्ति दिली ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. दीनदुबळ्या लोकांना भगवान हें एक मोठें आश्रयस्थान होतें. गोब्राह्मणप्रतिपालक हें विशेषण भगवानांना फारच शोभून दिसे. किंबहुना गोब्राह्मणप्रतिपालक हें विशेषण क्षत्रिय राजे लोकांना भगवानांच्या नंतरच मिळूं लागलें. वेदांचे व ब्राह्मणांचे अभिमानी, वर्णाश्रमधर्माचे प्रणेते, व षट्शास्त्रांचें रहस्य यथार्थत्वानें जाणणारे भगवान् मोठमोठ्या वेदवेत्त्या, तपस्वी ऋषिसमुदायांतहि मान्यता पावले. भगवानांच्या नजरेखालीं सर्व प्रकारचे यज्ञयाग द्वारकेस झाले. अनेक वेळां धर्म-परिषदा झाल्या. धर्मकारण असो वा राजकारण असो त्यासंबंधीं भगवंतांचा सल्ला घेण्याकरितां भरतखंडांतल्या कानाकोपऱ्यांतलेहि लोक द्वारकेला येत. ह्याप्रमाणें भगवंतांच्या योगानें यादवांची द्वारकापुरी व यादव हीं सर्वत्र गाजलीं. अशा प्रकारें भगवंताच्या कृपेनें यादवांनीं ऐश्वर्याचें शिखर गांठलें.

कांहीं काळ यादव ऐश्वर्याच्या अत्युच्च शिखरावर स्थिर झाल्या-

सारखें दिसलें. परंतु सर्वसंहारक उग्र कालाची नजर त्यांवर गेली मात्र, ऐश्वर्य मिळण्याचे वेळीं त्याच्यामध्यें उत्पन्न झालेली बुद्धि, तेज, दूरदृष्टि, धर्मश्रद्धा, भगवद्भक्ति व वेदान्त–तत्त्वज्ञान हीं सर्व त्यांच्यापासून हळूहळू दूर जाऊं लागलीं. आपल्या ऐश्वर्यसंपन्नतेचें कारण श्रीकृष्ण आहेत, याचा त्यांना विसर पडत चालला. कर्तुमकर्तुम् असे आपणच आहोंत, असें त्याना वाटूं लागलें. यज्ञयागाना, धर्मपरिषदाना व श्रीकृष्णांशीं तत्त्वज्ञाना-संबंधीं चर्चा करण्याकरितां आणि त्याच्या दर्शनाकरितां येणाऱ्या वेद-वेत्त्या तपस्वी ब्राह्मणासंबंधीं यादव तरुणाना अनादर वाटूं लागला. त्यांची यट्टा करावी, त्याची निंदा करावी, अशी त्याची प्रवृत्ति होऊं लागली, व धर्मावरची त्यांची श्रद्धा ढळूं लागली. येथूनच त्याच्या अधः-पाताला सुरवात झाली. एकदां तपोधन नारदादि मुनि द्वारकेंत आले असता त्याच्या अंतर्ज्ञानाची टवाळी करण्याच्या कुबुद्धीनें प्रेरित झालेल्या, श्रीकृष्णाच्या पुत्रानीं आपल्यापैकीं साबाला गरोदर स्त्रीचा वेष दिला. त्या वेषधारी स्त्रीला घेऊन ते त्या ऋषींच्या जवळ गेले आणि " ह्या आमच्या बभ्रूच्या स्त्रीला पुत्र व्हावा अशी इच्छा आहे. तेव्हां तिला काय होणार आहे तें सागावें किंवा आपण कृपा करून तिला पुत्र होईल असा आशीर्वाद तरी द्यावा, म्हणजे तिला समाधान होईल. " असें म्हणाले. त्रिकालज्ञ मुनींनीं त्यांचें तें कपट ओळखलें व ते संतप्त झाले आणि लगेच म्हणाले, " या कृष्णाच्या स्त्रीवेषधारी सांब पुत्राला एक लोखंडी मुसळ होईल, आणि तें तुम्हां सर्व यादवांच्या नाशाला कारण होईल. ह्या मुसळानेंच तुम्ही आपापसांत लढून मराल." ही शापवाणी ऐकून कृष्णपुत्र घाबरले. सांबानें घाईघाईनें स्त्रीवेष उतरला, तेव्हा त्या वेशांतून खरोखरच एक लोखंडी मुसळ प्रगट झालें, तेव्हा मात्र ब्रह्मशापानें आपला नाश खास होणार हें जाणून त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांनीं ती गोष्ट उग्रसेन राजाच्या कानांवर घालून तें मुसळ दाखविलें. तें मुसळ पाहून व ऋषींचा शाप ऐकून राजा खिन्न झाला. कृष्ण रागावेल म्हणून राजानें ती गोष्ट कृष्णाच्या कानावर न घालतां आपल्या बुद्धीनें त्या मुसळाचा नाश करून विप्रवाणी खोटी

ठरवण्याचा प्रयत्न केला. त्यानें सेवकांना त्या मुसळाचें चूर्ण करून तें चूर्ण समुद्रांत फेंकून द्यायला सांगितलें. सेवकांनीं तें मुसळ कानशीनें घांसून त्याचें पीठ केलें. पण शेवटीं ह्या मुसळाची एक बारिक अणुकुचीदार झीण राहिली. तिचें कांहीं केल्या चूर्ण होईना. तेव्हा कंटाळून त्यांनीं त्या चूर्णाबरोबर ती झीणहि समुद्रांत फेंकून दिली. तें चूर्ण समुद्राच्या लाटांनीं समुद्राच्या तीरावर लव्हाळे उगवले होते त्यांत फेंकलें गेलें, व ती अणकुचीदार कांब एका माशानें गिळली. तो मासा कोळ्याच्या जाळ्यांत सांपडला. कोळ्यानें तो मासा एका व्याधाला विकला. व्याधाला त्या माशाच्या पोटांत ती कांब सांपडली. त्यानें ती आपल्या बाणाच्या अग्राला लावून ठेविली. उग्रसेनानें आपल्याकडून त्या ब्रह्मशापाची गोष्ट श्रीकृष्णापासून लपविली, परंतु ज्या ऋषींनीं शाप दिला त्यांनींच ती गोष्ट श्रीकृष्णाच्या कानांवर घातली. क्रोधाच्या तडाक्यांत आपण सांपडल्यानें आपल्या तोंडून शापवाणी निघून गेली, असें त्यांनीं श्रीकृष्णाला सांगितलें. यादवांचा विनाशकाल समीप आला हें भगवंतांनीं जाणलें. यादव कसल्या तरी धुंदींत आपसांत लढून मरतील, हें भविष्य व तो ब्रह्मशाप यांसंबंधीं त्यांनीं बलरामाला सर्व सांगितलें. ब्रह्मशाप खोटा होणार नाहीं, हें समजूनहि प्रयत्न म्हणून श्रीकृष्ण व बलराम यांच्या आज्ञेनें "द्वारकेंत कोणींहि मद्यपान करूं नये. ही आज्ञा मोडणाऱ्याला सुळीं दिलें जाईल." अशी दवंडी पिटली गेली.

द्वारकेंत लवकरच भयंकर उत्पात होऊं लागले. भयानक वावटळी उठूं लागल्या. सूर्याला मोठमोठीं खळीं पडूं लागलीं. वारवर भूकंप होऊं लागले. कोल्हे-कुत्रीं मोठमोठे हेल काढून रडूं लागलीं. सारिका कर्कश शब्द करूं लागल्या. सारस पक्षी घुबडासारखे शब्द करूं लागले. रस्त्यांतून भरदिवसा उंदरांचा सुळसुळाट झाला. गर्दभांचे शब्द वारंवार ऐकूं येऊं लागले. कुत्र्यांच्या पोटीं मांजरासारखीं दिसणारीं पिलें जन्म पावलीं. गाईंना विलक्षण अवयवांचीं वासरें होऊं लागलीं. अशा विपरीत गोष्टी निसर्गांत दिसूं लागल्या. यादव तरुण बेफाम वृत्तीनें वागूं लागले. ते ब्राह्मण, पितर व देव यांना तुच्छ लेखूं लागले. घरांत वाडवडिलांचा

पदोपदीं अपमान होऊं लागला. पत्न्या पतींशीं अमर्यादेनें वागूं लागल्या. पतींनींहि पत्नींशीं वागण्याचे नियम बाजूला सारले. भारतीय युद्धाचे वेळीं जसा तेरा दिवसांचा कृष्णपक्ष होऊन शुक्लपक्षांत वृद्धि व्हावयाची ती न होतां पौर्णिमेचा क्षय होऊन त्यादिवशीं आणखी ग्रहण लागलें, तसा योग ह्यावेळींहि येऊन तो यादवनाश सुचवूं लागला. याप्रमाणें अनेक दुश्चिन्हें होऊं लागलेलीं पाहून भगवानांनीं यादवांचा नाश जवळ आला हें जाणलें. त्यांनीं आपल्या आवडत्या सुदर्शन पथकातील वीरांना स्वस्थानीं जाण्याची आज्ञा दिली. भगवान अथवा बलराम यांची अनुमति न घेतां सर्व यादव-वीरांनीं प्रभास क्षेत्रासारख्या पवित्र ठिकाणीं महिना पंधरा दिवस राहून यथेच्छ चैन करावयाची असे ठरविलें. उंची वस्त्राभरणें अंगावर घालून यादववीर आपापल्या वाहनात बसले. हत्ती, घोडे, राहुट्या, नानाप्रकारचे भक्ष्य, भोज्य, पेय पदार्थ, तशींच अत्यंत मादक मद्यें, नानाप्रकारचें मांस, त्यांनीं बरोबर घेतले व प्रभास क्षेत्रांत जाऊन तळ ठोकला. वसुदेव, उग्र-सेन यांसारखे म्हातारे लोक व अगदीं लहान मुलें व स्त्रिया तेवढ्या द्वार-केंत राहिल्या. हा सर्व प्रकार काय होतो हें पाहाण्याकरितां भगवान कृष्ण व बलराम निमूटपणें प्रभास क्षेत्रांत गेले. त्याप्रसंगीं उद्धवासारखा साधु-वृत्तीचा मनुष्यहि श्रीकृष्णाच्या मागोमाग प्रभास क्षेत्रास गेला. तें पाहून भगवंतांनीं त्याला आपल्याजवळ बोलाविलें आणि म्हटलें, "उद्धवा, तूं आतां येथें राहूं नकोस. मलाहि न जुमानणाऱ्या ह्या सगळ्या यादवांचा विनाशकाल अगदीं समीप आला आहे. माझेंसुद्धा ह्या जगांतलें कार्य संपल्यासारखें मला दिसत आहे. म्हणून ह्या नश्वर तनूचा त्याग करण्याच्या तयारीस मींहि आतां लागावें, असें मला वाटतें." भगवंतांच्या तोंडून हे शब्द ऐकतांच उद्धवाला अत्यंत वाईट वाटलें. भगवान् आपल्या शरी-राचा त्याग करणार ही कल्पनाहि त्याला असह्य झाली. हें पाहून परम कारुणिक भगवंतांनीं त्याला तत्त्वज्ञान सांगून या असार संसाराचें वास्त-विक स्वरूप काय आहे, तें नीट पटवून दिलें, आणि त्याचा शोक, मोह नाहींसा केला. त्याला संन्यस्त वृत्तीनें बदरिकाश्रमीं राहून, राहिलेलें आयुष्य आत्मचिंतनांत घालविण्यास सांगितलें. ज्याचा जसा अधिकार

तसा त्याला उपदेश करून त्याला मोक्षमार्गाला लावून देण्याची भगवंताची कुशलता याहि वेळेला दृष्टीस पडली. हा उद्धवाला केलेला उपदेश भागवतांतील एकादश-स्कंधांत ग्रथित केला आहे. असो.

उद्धव बदरिकाश्रमीं गेल्यानंतर, एक दिवस, चैनींत दंग असलेल्या सर्व यादवांनीं भोजनोत्तर अनिवार मद्यप्राशन केलें. श्रीकृष्ण संनिध असतांना देखील त्याना न जुमानितां आकंठ मद्यप्राशनानें प्रमत्त झालेले सात्यकि व कृतवर्मा एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढूं लागले. सात्यकि म्हणाला, "हा कृतवर्मा आपल्याला मोठा क्षत्रिय वीर म्हणवितो. पण भारतीय युद्धांत गाढ झोंपीं गेलेल्या पाचालांचा व द्रौपदीपुत्राचा वध करताना ह्याला शरम वाटली नाहीं." ह्यावर कृतवर्मा उसळून म्हणाला, "हात तुटलेला भूरिश्रवा रणात प्रायोपवेशन करून बसला असताना त्याचा वध करताना तुला तरी कोठें शरम वाटली?" सात्यकीला हें दूषण दिलेलें ऐकतांच श्रीकृष्णांनीं कृतवर्म्याकडे क्रुद्ध दृष्टीनें पाहिलें. त्याबरोबर सात्यकीला एकदम स्फुरण येउन तो म्हणाला, "द्रौपदीपुत्रांना तशा स्थितींत ठार मारणाऱ्या, धृष्टद्युम्नासारख्या वीराला गाढ झोंपेंत मारणाऱ्या व स्यमंतक-मण्याच्या लोभानें सत्राजिताचा खून करणाऱ्या ह्या महापातक्याला हा पाहा मी एकदम यमसदनीं पाठवितों!" असें म्हणून मद्यानें धुंद झालेल्या सात्यकीनें खड्गानें कृतवर्म्याचा शिरच्छेद केला. क्रोधानें खवळलेला सात्यकि कृतवर्म्याच्या आप्तेष्टांची सरसहा कत्तल करीत सुटला. त्याबरोबर सर्व भोज व अंधक त्याच्यावर धांवून गेले. हें पाहून प्रद्युम्न सात्यकीच्या मदतीला धांवला. त्याबरोबर सर्वांनीं मिळून सात्यकि व प्रद्युम्न यांना ठार केलें. आपल्या पुत्राचा व सात्यकीचा नाश झालेला पाहातांच भगवान् क्रुद्ध झाले. त्यांनीं समुद्रतीरावचे लव्हाळे उपटून हातांत घेतले तों त्यांचें वज्रासारखें मुसळ बनलें. त्या मुसळानें ते समोर दिसेल त्याला ठार करीत सुटले. बलरामानेंहि कृष्णाचेंच अनुकरण करून भयंकर संहार सुरू केला. लव्हाळ्याचें वज्रासारखें मुसळ बनतें हा शोध लागतांच त्या दारुड्या यादवांनीं लव्हाळे उपटून भराभर हातांत घेतले व त्यांच्या बनलेल्या मुसळांनीं एकमेकांचे प्राण घेतले. रथी, महारथी

सर्वांचीच सरसहा कत्तल झाली. थोडक्याच काळांत सुमारें पाच लाख यादव योद्धे या मद्याच्या प्रभावाने एकमेकांत मारामारी करून करून पडले. त्या मद्यप्यांच्या कृत्यानीं भडकून बलराम-कृष्णासारख्यांचा तोल सुटल्यासारखा दिसला, तेथें इतराची काय कथा! त्या धुमश्चक्रींत श्रीकृष्णाचे एकनिष्ठ उपासक बभ्रु व दारुक श्रीकृष्णाचा शोध करीत आले. दारुकाला पाहून भगवान् म्हणाले, "दारुका, तूं आता येथें एक क्षणभरहि न थांबतां माझा रथ घेऊन एकदम कुरुक्षेत्रास जा. ब्रह्मशापानें यादव एकमेकांचा वध करून कसे नाश पावले हे अर्जुनाला साग व त्याला द्वारकेंत घेऊन ये; म्हणजे तो द्वारकेंत असलेल्या सर्वांना हस्तिनापुरास घेऊन जाईल.' दारुकाची रवानगी केल्यानंतर भगवान् बभ्रूला कांहीं सांगणार होते तोंच कोठून तरी एक मुसळ गरगर फिरत येऊन त्यानें बभ्रूचा प्राण घेतला. तेथें असलेल्यापैकीं शेवटचा यादव योद्धा पडला असें पाहातांच श्रीकृष्ण स्वस्थचित्तानें बलरामास म्हणाले, "रामा, मी द्वारकेंत जाऊन पित्याच्या कानावर येथील वर्तमान घालतों, व नरश्रेष्ठ अर्जुन येईतों धीरानें राहा, असें त्याना सागून त्याच पावलीं परत येतों. मग आपण दोघेहि योगबलानें ह्या तनूचा त्याग करून निजधामास जाऊं.' केवढें चित्तस्थैर्य हें! कालानें प्रेरणा करताच इतरांप्रमाणे दंगलींत सहभागी झालेले भगवान् त्या सर्व भयकर प्रकाराकडे साक्षी ह्या नात्यानें किती उदासीनतेनें पाहात होते! पुत्र, पौत्र, आप्त, इष्ट, सखे सोयरे व सर्व प्रकारच्या ऐश्वर्यानें परिपूर्ण भरलेला स्वतःचा संसार डोळ्यांदेखत उधळला गेला असताना कांहीं विशेष झालेंच नाहीं अशा तऱ्हेनें बलरामाशीं निजधामाला जाण्यासंबधानें बोलून भगवान् द्वारकेला गेले.

भगवंतानीं पिता वसुदेव, माता देवकी, स्वस्त्रिया, आणि यादव स्त्रिया ह्यांना प्रभास क्षेत्रांत संहारक कालानें गाजविलेला प्रताप शांतपणें सांगितला. त्याबरोबर एकच हलकल्लोळ उडाला. तशाहि स्थितींत भगवंतांच्या मुखावर स्मित-हास्य दिसतांच सर्वजण आपला शोक आवरून त्यांच्याकडे पाहूं लागले. भगवान् म्हणाले, "मला वाटलेंच होतें, हा प्रकार ऐकून तुम्ही रडून आकांत करणार म्हणून! रडलांत, चांगलें झालें! आतां

थोडा विचार करा. त्या सर्वांचें आयुष्य संपतांच कांहींतरी निमित्त होऊन त्यांचे देह पडले. त्यांच्याकरितां रडणारे तुम्ही आपल्याला अमर समजता आहांत कीं काय? धीर धरा. काळाची दृष्टि तुमच्याकडे वळल्यावर तुम्हीहि सर्व त्यांनाच जाऊन मिळाल. तोंपर्यंत अर्जुन येथें येऊन तुमची सर्व व्यवस्था करील. मी व राम कृतकृत्य झालों आहों व आमचा इहलोकीं वास करण्याचा कालखंडही भरला आहे. आम्ही आता योगाचा अवलंब करून लवकरच निजधामास जाऊं." इतकें अत्यंत शांतपणें सांगून भगवान् प्रभासाला आले. तेथे बळरामाला योगमग्न स्थितींत पाहून त्यांना समाधान वाटलें. बळरामानें योगबलानें तनुत्याग करतांच, भगवान् स्वतः तनुत्यागाच्या उद्देशानें एका वृक्षाला टेंकून बसले. इतक्यांत 'जरा' नामक एका व्याधानें माशाच्या पोटात सापडलेली लोखंडाची शीण लावलेला विषारी बाण मृगभ्रमानें भगवंतावर टाकला. त्यामुळें भगवंताच्या पायांतून रक्ताची धार लागली. व्याधाला त्याची चूक लक्षांत येतांच तो घाबरला. पण भगवंतानें स्मितहास्य करून त्याला धीर दिला. त्यांनीं त्या व्याधाला 'तुला उत्तम लोक मिळेल' असा आशीर्वाद दिला, व त्याला आनंदानें जाण्यास सांगितलें. केवढी क्षमाशीलता आणि केवढी शांति ही! गीता-तत्त्वज्ञान उपदेशणाऱ्या भगवंतानें तें तत्त्वज्ञान आपल्या आचरणांत असल्याचें शेवटपर्यंत दाखविलें. असो. याप्रमाणें एकशेंवीस वर्षें जगदोद्धारार्थ धारण केलेला पवित्र देह पडण्याची वेळ येतांच अत्यंत आनंदानें व शांतचित्तानें त्या देहाचें विसर्जन करून भगवान् आत्मस्वरूपांत लीन झाले.

भगवंताच्या आज्ञेप्रमाणें दारुकाबरोबर अर्जुन द्वारकेला आला. वसुदेवानें तेथील सर्वांना त्याच्या स्वाधीन करून शांतचित्तानें कृष्णस्मरण करीत आपला देह ठेवला. देवकीनें वसुदेवाबरोबर सहगमन केलें. नंतर अर्जुन सर्व मंडळीसह प्रभासास गेला. त्यानें त्या भयंकर संहार-स्थानांतून बळरामाचा व भगवंताचा देह शोधून काढला, आणि भगवंताच्या वज्र नांवाच्या नातवाकडून त्यांचा यथाविधि अंत्यसंस्कार केला. रुक्मिणी आदि कृष्णस्त्रियांनीं कृष्णदेहाबरोबर अग्निप्रवेश केला. नंतर यादव स्त्रिया, मुलें

व भगवानाच्या उरलेल्या वृद्ध आप्तेष्टांना घेऊन अर्जुन हस्तिनापुरास गेला. धर्मराजानें वज्रास इंद्रप्रस्थाच्या गादीवर बसविलें. पुढें पांडवहि परिक्षितीस हस्तिनापूरच्या सिंहासनावर बसवून हिमालयांत निघून गेले.

वाचकहो, आम्हांला श्रीकृष्णचरित्रासंबंधीं जें कांहीं सांगावयाचें होतें तें सांगून झालें. आतां आपल्यापुढें श्रीकृष्णाचें समग्र चरित्र आहे. त्याकडे विहंगमदृष्टीनें पाहिलें तरी पुष्कळच उद्बोधक गोष्टी स्पष्टपणें आपल्या डोळ्यासमोर उभ्या राहातात. भगवंतांचें बाळपण अनेक प्राणसंकटांनीं व्यापलेलें दिसतें. त्यांचें तरुणपण बलाढ्य शत्रूंच्या स्वाऱ्या परतविण्यांत व देशावर आणि धर्मावर घाला घालणाऱ्या नराधमांचा नाश करण्यांत व्यतीत झालेलें दृष्टीस पडतें. सुप्रसिद्ध भारतीय युद्धांतील घनघोर प्रसंगांतून पाडवांचें रक्षण करण्यांत भगवान् आपल्या उतार वयांत गढून गेलेले दिसतात. आणि शेवटीं झालेल्या भीषण यादवींत, उत्कर्षाच्या पराकोटीस पोहोंचलेल्या यादवांचा भयंकर संहार होऊन, त्या भडकलेल्या कालाग्नींत आपले पुत्र-पौत्र, आप्त-इष्ट सर्व वैभवासह जळून खाक होत असतांना भगवान् शांतचित्तानें तो सर्व प्रकार पाहात आहेत, हें दृश्य दृष्टीस पडतांच आपल्या अंतःकरणांत कालवाकालव होऊन विचाराचे कल्लोळ उत्पन्न होतात. कर्तुमकर्तुम् समर्थ म्हणून जगप्रसिद्ध झालेले भगवान् आपल्या बांधवांची व प्रत्यक्ष आपल्या संसाराची होळी होत असतांना असे स्वस्थ कसे बसले ? हा विचार मनाचा गोंधळ उडवतो, आणि भगवंतांनीं सांगितलेलें गीता-तत्त्वज्ञान लक्षपूर्वक अवलोकन करण्याकडे मनाची सहजच प्रवृत्ति होते. भगवंतांचें आयुष्य सर्व प्रकारच्या संकटांनीं ग्रासून टाकलेलें असतांना, गो-ब्राह्मण, आश्रित आणि स्वधर्म, यांचें रक्षण करण्याकरितां त्यांनीं सतत केलेले प्रयत्न, त्यांचें शौर्य, त्यांचा अलौकिक स्वार्थत्याग, व अतुल बुद्धिमत्ता आणि सतत अभ्यासानें साध्य केलेली आणि अर्जुनाच्या निमित्तानें सर्व मुमुक्षूंना गीतारूपानें उपदेशिलेली अध्यात्मविद्या पाहून मन आश्चर्यानें थक्क होतें व कृतज्ञतेनें भरून येतें. भगवंताच्या मुखांतून प्रकट झालेल्या ह्या अध्यात्मविद्येच्या योगानें, मनुष्याला संकटाची जाणीवसुद्धां न होतां प्रारब्धकर्मानें देहाच्या पाठीमागें लागलेल्या संसारयातेंतून

तो शांतपणें कसा पार पडतो, हें भगवान् श्रीकृष्णानें स्वतःच्या चरित्रानें सर्व जगाला सोदाहरण शिकविलें. श्रीकृष्णचरित्र-रहस्यांतून दुसऱ्याहि अनेक विचारार्ह गोष्टी वाचकांना मिळून त्यांची विचारशक्ति जागृत व्हावी ह्या उद्देशानें लिहिलेलें सदाचार-मालेंतील हें 'श्रीकृष्णचरित्र-रहस्य' नांवाचें पहिलें पुष्प श्रीकृष्णजयंतीच्या दिवशीं भगवच्चरणांवर भक्तिभावानें आम्ही अर्पण करतों.

'ॐ तत् सत्' ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

समाप्त.